म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
. क्र. 9100

REFBK-0001456
REFBK-0001456

किंमत दीड रुपया

रवि १०१८

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक नं. १०
ता.
ठाणे.

१८००

सत्कार्योत्तेजक सभा—धुळें

[ श्रीरामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांत प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग सोळावा

सर दुसरा ] [ माणि पांचवा

# श्रीदिनकरांची स्फुट कविता

REFBK-0001456

माझे विश्रांतीचें वर्म । अखंड सद्गुरूचें नाम ॥

सर्व हक्क राखून ठेविले आहेत

ग्रंथ संग्रहालय
क्र. १४५६

१८३९ ज्येष्ठ शुद्ध १३

किंमत दीड रुपया

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या

श्रीआत्माराम

छापखान्यांत छापून धुळें येथें प्रसिद्ध केला.

क्रा. ४७१

॥ श्रीराम ॥

# श्रीदिनकरांची स्फुट कविता

## अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठांक |
|---|---|
| स्फुट श्लोक, प्रकरणें १–५० ... ... ... | १–४८ |
| स्फुट अभंग, १–३७८ ... ... ... ... | ४९–१६८ |
| स्फुट पदें, १–४१९ ... ... ... ... | १६९–२९० |
| हिंदुस्थानी पदें, ४२०–४३९ ... ... ... | २९०–२९४ |
| स्फुट श्लोक, प्रकरणें ५१–९१ ... ... ... | २९४–३२० |
| श्रीमारुतिस्तवराज ... ... ... ... | ३२०–३२३ |
| ललितें, आरत्या वगैरे १–१८ ... ... ... | ३२३–३३० |
| सूची ... ... ... ... ... | ३३१ |

ग्रंथ ... नं. ७०९ ... ठाणे

॥ श्रीराम ॥

# श्रीदिनकरांची स्फुट कविता

## प्रस्तावना

### स्वहिताचा मार्ग

**सखया मनुजा स्वहितीं तूं सावध होईं** ॥ प. ३४

( १ ) स्वानुभवदिनकर ग्रन्थाच्या प्रस्तावनेंत श्रीदिनकरांचें त्रोटक चरित्र दिलें आहे. त्यानंतर त्या चरित्रांत भर पडेल अशी कांहीं विशेष माहिती झालेली नाहीं. श्रीसमर्थांच्या एकंदर शिष्यवर्गांत दिनकरांची योग्यता फार मोठी असली पाहिजे. पारमार्थिक योग्यता सर्व शिष्यांची सारखी च, पण त्यांच्या इतके व्युत्पन्न शिष्य फार च थोडे होते. दिनकरांच्या विद्वत्तेची साक्ष यांचा अप्रतिम ग्रन्थ स्वानुभवदिनकर देत च आहे. त्यांची ही स्फुट कविता हि त्यांच्या एकनिष्ठ गुरुभक्तीला व अलौकिक विद्वत्तेला साजेशी अशी च आहे. ती वाचून मी माझ्या मनाला प्रश्न केला कीं, या सर्व कवितेचें धोरण काय आहे, तिचें साध्य कोणतें, कोणत्या एका विशिष्ट कार्यासाठीं तिची प्रवृत्ति आहे. या प्रश्नाचें मनानें जें उत्तर दिलें तें च प्रस्तावनारूपानें वाचकांस सादर करीत आहे.

( २ ) दिनकरांच्या या ६१९ श्लोकांचें, ३७८ अभंगांचें, ४३९ पदांचें व बाकीच्या कवितेचें एक च प्रयोजन दिसतें.

**निमिष्य पळ घडि उगें नसावें । स्वहित समजावें** ॥ पद ३१-२

हें वाचकांच्या मनावर बिंबवावें, त्यांना स्वहिताचा मार्ग दाखवावा व त्या मार्गानें जाण्याविषयीं त्यांना प्रवृत्त करावें, एवढ्या च साठीं दिनकरांचा हा सारा खटाटोप होय. आमची हीन स्थिति, अज्ञानदशा पाहून मोठ्या कळवळ्यानें, पूर्ण

वात्सल्यानें ते आह्मांस सांगत आहेत. एक पळ सुद्धां वायां जाऊं देऊं नये असें ते ह्मणतात, पण आमची कथा काय सांगावी ! उभ्या जन्मांत कधीं स्वहिताचा विचार आमच्या मनांत येत नाहीं. निमिष्य, पळ, घडि यांची गोष्ट कशाला, जन्मचे जन्म आह्मी स्वहिताचा विचार केल्यावांचून घालवीत असतों ! पूर्वपुण्याईनें नरदेहासारखा देह जोडला असतां, तो अव्यंग आहे तों च ह्मणजे तरुणपणीं च प्रत्येकानें स्वहिताच्या मार्गाला लागावें, हें युक्त होय.

**दिनकर ह्मणे सार । जोंवरी नरदेह स्थीर ।**
**तों तूं प्राण्या स्वहितविषयीं न लवीं उशीर ॥** पद २

ह्मातारपणच्या आपदा सर्वांनीं वर्णिल्या आहेत, हेतु हा कीं, ह्मातारपण येईल आणि मग हरिभजनाला लागूं, तोंवर बायकापोरांचा प्रपंच करूं, अशी वाट पहात कोणीं बसूं नये.

**गडाडील रे कंठ जेव्हां कफानें ।**
**शरारीत कांपेल काया जरेनें ।**
**तधीं ठाकती दूर सर्वत्र कोण्हीं ।**
**न होतां असें तों स्मरे चापपाणी ॥** श्लो. २०-१

ह्मातारपण ह्मणजे पराधीनता, अशा पराधीन स्थितींत मग कांहीं दुसऱ्या उपाधी नसतात, तेव्हां ह्मातारपणीं सुखानें हरि हरि ह्मणत बसूं, अशा भ्रमांत कोणीं राहूं नये.

**जातील नेत्र मग पाहसि राम कैसा ।**
**जातील कान मग ऐकसि राम कैसा ।**
**जातील हात मग पूजिसि राम कैसा ।**
**जों स्वस्थ देह तंव तूं भज जानकीशा ॥** श्लो. ३८-९

जन्मभर जो व्याप करावा त्याचें च ह्मातारपणीं चिंतन होतें, दुसरीकडे मन लागत नाहीं, लागणें शक्य नसतें, अशी इतरांची दशा पहात असून हि आपला भ्रम कांहीं जात नाहीं, इतरांच्या ह्मातारपणच्या आपदा दिसत असून हि मन ताळ्यावर येत नाहीं व भगवद्भजनाकडे चित्त लागत नाहीं, याला काय ह्मणावें ? आपण आपल्या ऐन उमेदींत जो व्याप करीत असतों तो वाईट असतो असें कोणाचें ह्मणणें नसतें. राष्ट्रांतील सर्व तरु-

[stamp]

गांनीं आमरण गिरिगव्हरीं वास करून आत्महित साधावें, अशी संप्रदायाची शिकवण नाहीं. सर्व लोक सुखी असावेत, अशी इच्छा असल्यास लोककार्यार्थ व्याप आटोप केला पाहिजे, धके चपेटे सोसले पाहिजेत, असा तर या संप्रदायाचा मामला आहे. पण लोककार्य करणें ह्मणजे सर्व विधिविधानाला फांटा देणें, आचारविचार बुडविणें व हरिभजन गुंडाळून ठेवणें, असें मात्र नव्हे. प्रयत्न तर पाहिजे च, पण तो यशस्वी होण्यास भगवत्कृपा संपादिली पाहिजे. भगवत्कृपा हा सर्व प्रयत्नाचा पाया असावा. असें न होईल तर केलेले सर्व अकटोविकट प्रयत्न फोल होतील.

( ३ ) साधुसंतांनीं केलेला हा उपदेश आपण इतक्या वेळां ऐकत असतों कीं, आतां त्याचें कोणाला च कांहीं वाटेनासें झालें आहे ! साधुसंतांच्या शब्दावरील आपला विश्वास उडाला ह्मणावें तर खरोखर तसें नसतें. सर्व साधुसंतांविषयीं महाराष्ट्राला पूर्ण आदर आहे. मग हें असें कां होत आहे ? आदराची ही अशी विचित्र तऱ्हा कोठची कीं, ज्यांच्या विषयीं आदर असावयाचा त्यांच्या उपदेशाचा मात्र आमच्या हातून पूर्ण अनादर व्हावा ! याचें कारण आह्मांस इतकें च दिसतें कीं, सत्पुरुषांच्या उपदेशाप्रमाणें वागण्याला मनाचा जो खंबीरपणा असावा लागतो तो मुळीं च उरला नाहीं. बहुतांशीं परिस्थितीनें आमच्या मनाला दौर्बल्य आलें आहे व कष्ट करण्याची देहाला ताकद उरली नाहीं. या आमच्या शारीरिक व मानसिक अधःपाताला कांहीं अंशीं आमचें आह्मी हि कारण आहोंत. ही आगंतुक दुर्बलता आमच्या इतकी आंगवळणी पडली आहे कीं तिचें च आतां आह्मांस उलट भूषण वाटूं लागलें आहे !

( ४ ) ही स्थिति पालटण्याला काय करावें ? दृष्टीचें अंधत्व, मनाचा निरुत्साह व शरीराची दुर्बलता नष्ट कशानें व्हावी ? स्वसुखाचा मार्ग दिसूं लागून तो आक्रमण्याचें धैर्य कशानें यावें ? याला उपाय काय ?

**स्वसुखासी कारण मजला । येक हा उपाय सुचला ।**
**शरण रिघावें सद्गुरुला ॥** प. १६८

हा उपाय सर्वांना पटेल काय ? हल्लींचा काळ तर स्वयंभू सिद्धांचा दिसतो ! पण सद्गुरुवांचून कधीं कोणाचें कल्याण झालें आहे काय ? दिनकर कांहीं कमी विद्वान नव्हते. चारी वेद, साही शास्त्रें व अठरा पुराणें त्यांना अवगत

होतीं, तरी त्यांचें समाधान कांहीं केल्या झालें नाहीं ! गुरुप्राप्तीसाठीं त्यांना सारखी तळमळ लागली च होती.

भेटीलागीं जीव तळमळी कैसा । जळेंवीण जैसा मत्स्य पडे ॥ १ ॥
तैसें माझें जिणें तुझिया वियोगें । धांव लागवेगें दीनानाथा ॥ २ ॥
जैसा धीर नव्हे पतीविण कांते । औषधी वसंतेवीण जैस्या ॥ ३ ॥
चंद्रेवीण जैसे पीडती चकोर । दीन दिनकर स्वामीवीण ॥४॥ अ. ४२

समर्थांची भेट होण्यापूर्वी दिनकरांनीं कसे श्रमसायास केले ते आपण स्वानुभवदिनकराच्या प्रस्तावनेंत पाहिले च आहेत. सद्गुरुभेट होतां च त्यांनीं देहाचें निंबलोण उतरिलें ! गुरुकृपेचें महत्त्व आपणांस कळेना त्याला दिनकरांनीं काय करावें. त्यांचे नंतरचे उद्गार मात्र असे आहेतः—

सद्गुरुसारिखे जिवलग सोयरे । न दिसे दुसरे त्रिभुवनीं ॥ ध्रु० ॥
काय सांगों कैसें कृपेचें करणें । संसारधरणें निरासिलें ॥ १ ॥
माझें निज मज अनंता काळाचें । दिधलें तें साचें काय सांगों ॥ २
सांगों जातां वाचा शब्देंसी निमाली । मनेंसीं विराली कल्पना हि ॥
असंभाव्य सुख ध्याताध्यानेंवीण । ध्येय चि संपूर्ण केलें मज ॥ ४ ॥
केलें मजवीण मज निरंतर । ह्मणे दिनकर रामदास ॥ ५ ॥ अ २५२-१

यांतली गोडी आपणांस कशी समजावी ? दिनकरांचें हें चरित्र पाहिलें ह्मणजे इतकें दिसतें खरें कीं, गुरुचरणाची एकदा गोडी लागली ह्मणजे गुरुभक्त वेडा बनतो ! दिनकर च काय, श्रीसमर्थांचे सारे शिष्य असे च वेडे झाले होते. श्रीवेणाबाई तर फार च वेडया बनल्या होत्या ! यांत शिष्यांकडे कांहीं बोल नाहीं. श्रीसमर्थांची प्रतिज्ञा च मुळीं तशी आहे.

आतें भेटों येती त्यांस वेड लावितो ।
रामीरामदास ऐसें अबद्ध बोलतो ॥

आपणांला कधीं असें वेड लागेल काय ? त्यांनीं त्या वेळीं राजापासून रंकापर्यंत सर्वांना च वेड लावलें होतें, तें च वेड महाराष्ट्राला पुन्हां कधीं लागेल काय ? गुरुप्रेमानें शिष्य एकदा वेडा बनला ह्मणजे गुरुचरणीं तो आपलें सर्वस्व अर्पण करण्यास तयार होतो, सारें ब्रह्मांड त्यास मग ठेंगणें वाटूं लागतें.

मजला ह्मणोत भला नष्ट । श्रेष्ठ अथवा क्रियाभ्रष्ट ॥ अ ३७४-१
परि मी रामपिसा जालों । गुरुवाक्यें विश्वासलों ॥ ध्रु० ॥

**संतति संपत्ति सर्वस्वेंसीं । जावो राहो ब्रह्मांडेंसीं ॥ २ ॥**
**दिनकर ह्मणे निरंतर । निंदूं वंदूं चराचर ॥ ३ ॥**

गुरुकृपा झाली ह्मणजे इतका बेफिकिरपणा वाटतो !

( ५ ) असे वेड लावणारे सद्गुरु कोठें भेटतील ह्मणून महाराष्ट्रानें तरी संशयांत पडण्याचें कांहीं कारण नाहीं. महाराष्ट्रास पाहिजे तसे पूर्णावतारी सद्गुरु त्यास लाभले आहेत, हें त्याचें परम भाग्य होय. याचा अर्थ असा नाहीं कीं, इतर कोणी सत्पुरुष आदरणीय नाहींत. वडिलांचा मान ठेवावा असें ह्मटल्यानें चुलत्यांचा अपमान करावा, असा अर्थ होत नाहीं. प्रपंचाची परमार्थाशीं सांगड घालणारे सद्गुरु भेटले ह्मणजे नुसत्या परमार्थाचे उत्कृष्ट धडे सांगणारे थोर पुरुष असेव्य होतात, असें नाहीं. ते हि तितके च सेव्य व पूज्य होत. महाराष्ट्रगुरूंचा निश्चय झाला, पण प्रश्न असा आहे, ते आमचा अंगिकार करतील काय ? याविषयीं कोणी साशंक होण्याचें किंवा खेद करण्याचें कारण नाहीं. त्यांनीं स्वतः च या संशयाची निवृत्ति केलेली आहे व तसा कोणा कोणाला अनुभव आल्याचें हि सांगतात.

**माझी काया आणि वाणी । गेली ह्मणाल अंतःकरणीं ।**
**परि मी आहे जगज्जीवनीं । निरंतर ॥ १ ॥**
**आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।**
**असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ॥ २ ॥**

असें त्यांचें आपणांस शेवटचें आश्वासन आहे. तेव्हां आत्मारामदासबोधादि ग्रन्थांना च गुरुरूप मानून त्यांची सेवा केली, परम पावन गुरुचरित्राचा सारखा ध्यास घेतला, स्नानसंध्या, जपजाप्य, आचारविचार, बोलणें चालणें, इत्यादि सर्व कर्में सांप्रदायिक पद्धतीनें यथासांग व सुचित्तपणें झालीं, नाना उपायांनीं सद्गुरूंना आपल्या हृदयांतून क्षणभर हि बाहेर जाऊं दिलें च नाहीं, तर त्यांची कृपा झाल्यावांचून खचित राहणार नाहीं ! त्यांची कृपा व्हावी ह्मणून यांपैकीं आपण काय केलें आहे किंवा करीत असतों ? तर मग, आपण अजून कोरडे च असावें, यांत काय आश्चर्य आहे ? सद्गुरुभेटीसाठीं दिनकरांचा जीव जसा कासावीस होई तसा आपला कधीं होतो कां ? स्वप्नसाक्षात्कारानंतर प्रत्यक्ष भेट होईपर्यंत बारा महिने अशनपानावांचून केवळ

दिनजनकरुणेच्या धांवण्या धांवतोसी।
म्हणुनि दिनकराच्या धीर आहे मनासी॥ श्लो. २९-५

या विश्वासावर दिनकरांनीं जसा प्राण धरला, त्याप्रमाणें आपल्या सुखांत कधीं तिळमात्र तरी अंतर पडतें काय ? सद्गुरुकृपा फुकाची नाहीं ! पूर्ण विश्वास पाहिजे. प्राणांतीं हि निर्धार ढळला न पाहिजे ! दिनकरांचा निर्धार पहा :

जरि हो मज रामदास्य मानेना।
जरि हो मज रायदास्य मानेना॥ ध्रु॥ पद १३७

पडों नभमंडळ उडऊं समीर। राहोनि काय शरीर॥ १॥
तडकों वीज फुटों हीन शिर। व्यर्थ चि काय उशीर॥ २॥
सीमा उलंघूं बुडऊं सागर। काय उगा चि विकार॥ ३॥
उतटों भूमि खचों मेरुमंदर। चेंदों देहप्रकार॥ ४॥
जनीं निरंजनीं न मिळों थार। करुणा करी दिनकर॥ ५॥

अशा निश्चयानें आपण त्यांना शरण गेलें पाहिजे. उगी च भांबावून जाऊं नये व कोणा तरी बुडत्याची कास धरूं नये. भोंदु गुरु आतां आहेत आणि तेव्हां नव्हते, असें कांहीं नाहीं. ते सर्व काळीं आणि स्थळीं असणार च. तेव्हां विनाकारण कोणाच्या तरी नादीं लागून स्वतःची फसगत करून घेऊं नये. आपले गुरु आपणांस कळले, आतां उगी च वणवण करण्याची आपणांस काय गरज आहे ? आपले गुरु ते, जे

करीं टाळी वाचे राम। दास गर्जती निष्काम।
सर्वकाळ हा चि नेम। ध्यान दृष्टीं लक्षुनी॥
हरिकीर्तनीं सौरस। समुदायाचा हव्यास।
पर्वें जयंत्यांचा ध्यास। चित्त वित्त लाउनी॥
ब्रह्मानंदें हेलावती। शांती चोहटां नाचती।
आपपर हें नेणती। संतोषासी सेउनी॥
ऐसे वैष्णव उदार। देती सुखाचे उद्गार।
त्यांचे पदीं दिनकर। देहभाव निरसुनी॥ १॥ पद ३६२

( ६ ) अशांच्या चरणीं नम्र होऊन त्यांना स्वहिताचा मार्ग पुसावा. दिनकरांना स्वहिताचा मार्ग त्यांनीं च दाखविला. चुकलों, दिनकरांचे भाग्य याहून हि थोर होतें ! त्यांचें तीव्र वैराग्य व मुमुक्षुत्व पाहून आदल्या

वर्षी प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांनीं श्रीसमर्थवेषानें दिनकरांच्या शिरीं वामहस्त ठेवून दोन गोष्टी करावयास सांगितल्या होत्या व नंतर पुढच्या वर्षी प्रत्यक्ष श्रीसमर्थांचें त्यांना दर्शन झालें ! श्रीरामचंद्रांनीं प्रबोधिलेल्या दोन गोष्टी ह्मणजे ( १ ) विप्रकुलक्रमकर्म व ( २ ) रामोपासन.

**विप्रकुलक्रमकर्म करावें । रामउपासन चित्तिं धरावें ॥** श्लो. ४६-१

या दोन गोष्टींविषयीं जेथें प्रत्यक्ष रामाज्ञा आहे, तेथें आणखी कोणीं जास्त काय सांगावयास पाहिजे ! या दोन्ही गोष्टी या संप्रदायांत प्रमुख होत. त्यांच्याशिवाय इतर जी सांप्रदायिक स्वहिताची शिकवण आहे, तिचा विस्तारपूर्वक उल्लेख खालील पदांत केलेला आहे.

**नरदेहीं उत्तम जन्म । पावोनियां सत्समागम ।**
**निजाचारें विहितकर्म । आचरे तो मार्ग परम ॥** पद १७२-१
**॥ ध्रु० ॥ रामनामें गर्जना करी । नित्यनेमें स्वधर्माचारीं ।**
**सार्थकाचा काळ जो भरी । धन्य प्राणी तो चि संसारीं ॥१॥**
**नित्य न्यायें वर्तणें ज्याचें । मर्यादेचें बोलणें साचें ।**
**काय सांगों आणिक त्याचें । कर्तव्य जें तें निश्चयाचें ॥ २ ॥**
**सर्व काळ तो सार्थकाचा । भरितसे मोठ्या दैवाचा ।**
**पुण्यश्लोक मेरु धैर्याचा । पावक चि तो वैराग्याचा ॥ ३ ॥**
**क्षमारूपें धरणीऐसा । आर्जवें तो उदक जैसा ।**
**आत्मज्ञानें मार्तंड जैसा । चाळक तो समीरा सरिसा ॥ ४ ॥**
**विज्ञानी तो नभाचे परी । व्यापक तो सर्वां अंतरीं ।**
**दिनकर ह्मणे निर्विकारी । जन्हि वर्ते तो सदाचारीं ॥ ५ ॥**

( १ ) सत्समागम, ( २ ) विहित कर्म, ( ३ ) रामनामस्मरण, (४) नित्यनेम, ( ५ ) आचारविचार, ( ६ ) सततोद्योग, ( ७ ) न्यायें वर्तणें, ( ८ ) मर्यादेचें बोलणें, ( ९ ) निश्चयात्मक चालणें, ( १० ) धैर्य, ( ११ ) वैराग्य, ( १२ ) क्षमा, ( १३ ) आर्जव, ( १४ ) आत्मज्ञान, ( १५ ) चाळणा, ( १६ ) विज्ञान, ( १७ ) व्यापकता, ( १८ ) निर्विकारता, इत्यादि स्वहिताच्या मार्गावरील ठाणीं होत. पण त्यांत विशेष कटाक्ष मात्र वर्णाश्रमधर्म व उपासना यांविषयीं दिसतो.

**कर्मउपासनाज्ञानविज्ञानेंसीं । बोधावें जनासी वर्णाश्रमें ॥**

( ७ ) यथासांग वर्णाश्रमधर्म पाळणें व श्रीरामोपासना चालविणें या गोष्टी सोप्या नाहींत. त्यांवर आतां च तेवढे घाले पडत आहेत आणि पूर्वी नव्हते, असें नाहीं. कलियुग आतां प्रमाणें तेव्हां हि होतें च. वर्णाश्रम-धर्माला पायाखालीं तुडवून त्यावर स्वेच्छाचाराची इमारत उभारण्याची हांव शिश्नोदरपरायणांना आज जशी आहे तशी त्या वेळीं हि होती.

**आधीं च युग कळीचें । त्यावरि राज्य यवनांचें ॥** अ. २५४-१
**आतां स्वधर्म कोण राखे । जालें अधर्मासारिखें ॥ ध्रु० ॥**
**गुरुत्व विश्वाचें ज्या आंगीं । ते ब्राह्मण सेविती भांगी ॥ २ ॥**
**षट्कर्मेसीं स्नान त्यागी । जनीं ह्मणवी ज्ञानयोगी ॥ ३ ॥**
**आश्रमाचें नाम मठ । तेथें भांगीं भरले घट ॥ ४ ॥**
**गांजे तमाखु धुमाळी । गुर्गुडीची गवांदी घाली ॥ ५ ॥**
**सर्वब्रह्माचा उपदेश । बोधी कर्माचा हराश ॥ ६ ॥**
**दिनकर ह्मणे कळीं संत । भ्रष्टाचारें होती विख्यात ॥ ७ ॥**

दिनकर ह्मणतात, या युगांत भ्रष्टाचार हें च साधुत्वाचें लक्षण होऊं पहात आहे. जों जों एकादा भ्रष्टाचार अधीक करील तों तों त्याची प्रतिष्ठा विशेष होणार आहे. अशांना दिनकरांनीं एके ठिकाणीं बैलसाधु ह्मटलें आहे. मनुष्यें येथून तेथून एक आहेत, तीं एका च परमेश्वराचीं लेंकरें होत, अशा रीतीनें हे बैलसाधु आपल्या एकंकाराचें समर्थन करीत असतात.

**कैंचे वर्णाश्रम कैंचें क्रियाकर्म । सर्व सर्व ब्रह्म खल्विदं हें** ॥अ.९-५
**बोधी चराचर करी येकंकार । ऐसा शिश्नोदरपरायण ॥ ६ ॥**

त्यांच्या हें कधीं लक्षांत येत नाहीं कीं,

**भेद ईश्वर करून गेला । तो यांच्या बाचेन नवचे मोडिला ॥**

आधीं च मनसोक्त आचाराची प्रवृत्ति आणि त्यांत परिस्थिति अनुकूल, मग त्या चेष्टांना काय विचारावें ! या सर्वब्रह्या बैलांना नमस्कार असो !

**आह्मांघरीं आहे सर्वब्रह्या बैल । तयाची येईल स्थिति कोणा ॥ १ ॥**
**कोण्हासी हि न ये स्थिति त्या बैलाची । दृष्टि समतेची सर्वभावीं ॥२॥**
**सर्वभावीं तया ब्रह्म चि देखणें । नाहीं विचारणें शुद्धाबद्ध ॥ ३ ॥**
**शुद्धाबद्ध भाव धरिले समान । विष्टा आणि अन्न सारिखें चि ॥ ४ ॥**
**सारिखी चि माये आणि दुजी गाये । उडतां न पाहे द्वैताचार ॥ ५ ॥**
**आचार विचार अवघा येकंकार । जाला ब्रह्माकार बद्या बैल ॥ ६ ॥**

**बैलाची हे क्रिया वर्तें तदाकार । करा नमस्कार गोसांवी हो ॥ ७ ॥**
**गोसावी सक्रोध उठोनी चालिले । दिनकरा आलें हांसें थोर ॥अ.३१३**

तथापि काल जरी बैलसाधूंना व एकंकारप्रवर्तकांना अनुकूल असला तरी त्यांना त्यांच्या मार्गानें जाऊं देऊन इतरांनीं साधुसंतांच्या उपदेशाप्रमाणें वागून आपलें स्वहित करून घेतलें पाहिजे. इतरांनीं

**चांगलें बोलावें चांगलें चालावें ।**
**चांगलें शोधावें सर्वकाळ ॥ १ ॥** अ. २७८
**सर्वकाळ सर्व चांगलें चि व्हावें ।**
**ह्मणिजे जाणावें चांगलें चि ॥ २ ॥**
**चांगलें सेवितां चांगलें चि जालें ।**
**दिनकरा आलें प्रत्ययासी ॥ ३ ॥**

इतरांनीं आपआपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागून यथोपदिष्ट श्रीरामोपासना चालविली पाहिजे. उपासना ही सर्व सद्गुणांची जननी होय. उपासना ह्मणजे मोठी शक्ति आहे. सर्व संकटांत मनाला धीर देणारी उपासनेसारखी दुसरी गोष्ट नाहीं. तिचा भक्ताला मोठा आधार असतो.

**उपासनेची नाहीं पाठी । तयास भलता च कुटी ॥**

असें श्रीसमर्थांनीं स्वानुभवानें शिकविलें व त्याची प्रतीति त्यांच्या शिष्यप्रशिष्यांना आली. दिनकर आपला अनुभव सांगतात:—

दासांचें जें उणें न साहे जयासी ।
त्या दीनबंधूसी शरण जावें ॥ १ ॥
शरण जावें तया घालील पाठीसी ।
सन्मुख काळासी येवं नेदी ॥ २ ॥
येवं नेदी कांहीं दासां जडभारी ।
अपंगूनि वारी दैन्यदुःख ॥ ३ ॥
दैन्यदुःख कैंचें देवाच्या दासांसी ।
मागें पुढें त्यांसी सांभाळितो ॥ ४ ॥
सांभाळितो देव दासां निरंतर ।
ह्मणे दिनकर सप्रचीत ॥ ५ ॥ अ. १३९

यासाठीं आपण श्रीसमर्थांना शरण जाऊन आमरण यथाविधि उपासना चालविली पाहिजे.

श्री राम जय राम जय जय राम हा चि नेम ॥ ध्रु० ॥

हा चि निरंतर मंत्र जपावा ।
संसारार्णव समूळ तरावा ॥ १ ॥
शिवसनकादिक मुनिवर ध्याती ।
नारद तुंबर सप्रेम गाती ॥ २ ॥
सिद्ध महा कपिलादिक नेमें ।
दिनकर मुक्त निरंतर नामें ॥ ३ ॥

या नामस्मरणाचा प्रताप फार मोठा आहे. तो आपणांस न पटेल तर तो कालमहिमा ह्मणावयाचा ! इतकी तर गोष्ट खरी ना कीं, आपण त्याचा अनुभव घेऊन पाहिल्यावांचून आपला अविश्वास प्रदर्शित करीत असतो. अनुभव न पाहतां आधीं च दूषण देणें कितपत समंजसपणाचें आहे, याचा आपण च विचार करावा. स्वतः अनुभव घ्यावयाचा नाहीं व

विषाचें निर्विष करी जानकीश ।
ऐसी बहुतांस साक्ष असे ॥ १ ॥
धन्य देवराया न कळे तुझी दया ।
जीवांच्या धावया धांवतोसी ॥ ध्रु० ॥
साक्ष ऐसी आणि पुराणें गर्जती ।
नवल हें चित्तीं वाटतसे ॥ २ ॥
वाटतसे तवं प्रत्यक्ष चि जालें ।
दिनकरा आलें प्रत्ययासी ॥ ३ ॥ अ. २६३

अशी कोणी साक्ष दिली तर ती मानावयाची नाहीं, त्या शहाण्याची खात्री ब्रह्मदेव हि करूं शकणार नाहीं. अपरिचित मनुष्यास राम राम केल्यानें त्याला समाधान वाटतें, राम राम ह्मटल्यानें दुर्जन देखील विरमतो, असें आपण सामान्य व्यवहारांत हि पहातो. रामनामाचा महिमा अगाध आहे !

अद्भुत नामाची करणी । स्वयें जाणे शूळपाणी ।
विषयबाधा हरली तत्क्षणीं ॥ १ ॥

॥ ध्रु० ॥ या रामनामें ॥ ध्रु० ॥

उफराटें नाम स्मरला । वाल्हा वाल्मिकमुनि जाला ।
शतकोटी रामायण वदला ॥ २ ॥

दोषांची वसती भूमिका । थोरल्या नामाची गणिका ।
शुकमिसें नेली परलोका ॥ ३ ॥
उदकीं बुडतीं ज्या शिळा । दुजयासी नेती तळा ।
शतयोजनसागर त्या तरल्या ॥ ४ ॥
नामाचा महिमा ऐसा । वर्णवेना विधिहरशेषा ।
दिनकर ह्मणे मज निश्चय हा ऐसा ॥ ५ ॥ प. २१९

असा दिनकरांचा निश्चय असल्यामुळें त्यांना नामस्मरणाचें वेड लागावें हें साहजिक आहे. नामस्मरणाच्या योगानें त्यांची स्थिति कशी झाली होती ती पहा:

राम माझे मनीं राम माझे ध्यानीं ।
राम माझे वाणी अखंडित ॥ १ ॥
राम धनी मज राम धनी मज ।
राम धनी मज निरंतर ॥ ध्रु ॥
राम घरीं दारीं हिंडतां व्यापारीं ।
राम क्षणभरीं दुरी नव्हे ॥ २ ॥
राम जनीं वनीं अखंड श्रवणीं ।
संपूर्ण लोचनीं भरलासे ॥ ३ ॥
राम पाहें येथें राम पाहें तेथें ।
उभा जेथें तेथें सर्वां ठाईं ॥ ४ ॥
सर्वांतरीं राम निबिड निष्काम ।
दिनकर रामदास ह्मणे ॥ ५ ॥ अ. ८

अशा रीतीनें ज्यांना सर्वत्र श्रीराम दिसूं लागले, ते उपाधी करीत असून हि उपाधींत न सांपडतां, त्यांच्या सर्व क्रिया राममय व्हाव्या, हें सहज आहे. बसतां राम, उठतां राम, चालतां राम, बोलतां राम, देतां राम, घेतां राम, खातां राम, पितां राम, याप्रमाणें रामावांचून ज्यांच्या हातून कोणता च व्यवहार होत नाहीं, अशा गुरुभक्तांचा अधिकार केवढा होय !

माझे मनीं नांदे श्रीराम आपण ।
काय चिंता जाण असे आतां ॥ १ ॥ अ. १०४
आतां नाहीं चिंता बाहेर अंतरीं ।
आहे चापधारी सर्वां ठाईं ॥ २ ॥
सर्वां ठाईं राम सदोदित भासे ।
दिनकारा कैसें चोज पाहें ॥ ३ ॥

बोलण्याला आणि लिहिण्याला या गोष्टी सोप्या आहेत, पण असे गुरुभक्त आतां आपणांस कोठें तरी आढळतात काय ? दिनकर ह्मणतात, श्रीसमर्थांच्या चरणांचा आश्रय करून आह्मांला हा लाभ झाला ! श्रीसमर्थांनीं आह्मां शिष्यांना वाणी बनविलें! आह्मी दुकानदार झालों! आमच्या दुकानांत राम-नामाशिवाय दुसरी वस्तु नाहीं ! ग्राहकांनीं आपलीं काया, वाचा आणि मन हीं आह्मांस द्यावीं आणि आमच्यापासून रामनाम घ्यावें.

**भावाचा पसारा घातलासे आह्मी ।**
**केणें रामनामीं भरलेंसे ॥ १ ॥** अ. ६०
**भरलेंसे केणें अच्युत गोविंद ।**
**माधव मुकुंद लक्षवरी ॥ २ ॥**
**लक्षवरी देणें सवदा अलक्ष ।**
**राखोनियां पक्ष स्वकर्माचा ॥ ३ ॥**
**कर्म वाचा मन नाणें हें घेऊन ।**
**केणें नारायण विकूं आह्मी ॥ ४ ॥**
**आह्मी वाणी केलों रामीरामदासें ।**
**करितां विश्वासें शागीर्दीसी ॥ ५ ॥**
**शागीर्दी करितां तें चि आह्मी होणें ।**
**दिनकर ह्मणे रामदास ॥ ६ ॥**

असें आमचें दुकान मुक्तद्वार आहे, तरी आमच्या दुकानीं माल घेणारा ग्राहक वर्णाश्रमधर्माचा प्रतिपाळ करणारा असा पाहिजे, असा आमच्या दुकानचा नियम आहे.

## राखोनियां पक्ष स्वकर्माचा

अशीं ठळक अक्षरें लिहिलेली फळी आमच्या दुकानांत सर्वांच्या नजरेस पडेल अशा ठिकाणीं लावलेली आहे. अशा दुकानदारांना व राम-नामाचें अक्षय्य भांडवल पुरविणाऱ्या त्यांच्या धनीसाहेबांना अनन्यभावें शरण जाऊन त्यांच्या कृपाप्रसादानें प्रत्येकानें आपलें संदेहरहित स्वहित साधावें, सुखी व्हावें, आणि निजानंदीं मग्न व्हावें, अशी प्रार्थना आहे.

**सकळ कल्याण आमचें । नित्य चिंतन रामाचें ॥ ७ ॥**
**प्रसाद हा चि संतांचा । दिधला जिव्हाळा प्रेमाचा ।**
**सरता जालों कायावाचा । जनीं वनीं विजनीं ॥ १ ॥**

निसंदेह जालों देहीं । संदेहासी ठाव नाहीं ।
भव विभव कैंचें काई । नित्य मुक्त वर्ततां ॥ २ ॥
दिनकर ह्मणे रामदास । भाग्यें भेटले आह्मांस ।
सुखी केले सावकाश । निजानंद देउनी ॥ ३ ॥ पद १०१

---

## उपसंहार

श्रीदिनकरांच्या कवितेचें स्वरूप मला सामान्यतः जसें भासलें तसें निवेदन केलें आहे. या कवितेच्या मुख्य धोरणाचा तेवढा च मी विचार केला आहे. कवितेंत तत्कालीन समाजस्थितिदर्शक जे अनेक उल्लेख आहेत त्यांचा परामर्ष दुसऱ्या कोणी तरी घ्यावा. अशा उल्लेखांपैकीं एकाचा विचार प्रस्तावनेंत करूं, असा हवाला ग्रन्थाचें संपादन चालू असतां टिपेंत दिलेला असल्यामुळें तेवढा मात्र विचार येथें केला पाहिजे. श्लोकबद्ध प्रकरणांपैकीं पहिल्या प्रकरणाचा तेविसावा श्लोक असा आहे:

अति रमणिय देखा पेठ बुऱ्हाणश्याही ।
बहुत सुखस्वरूपें नांदती लोक ते हीं ।
करिति विशद वार्ता धर्मसंस्थापनेच्या ।
निशिदिनिं निजनेमें ध्यास सिद्धेश्वराचा ॥

ही बुऱ्हाणशाही पेठ कोणची हें निश्चयानें सांगतां येत नसलें, तरी असें वाटतें कीं, तिसगांवच्या जवळ ती पेठ असावी. निजामशाहींत तिसगांव फार मोठें शहर होतें व असें सांगतात कीं त्याच्या किती तरी पेठा होत्या. आज हि तिसगांवच्या बाहेर पडलें ह्मणजे जुन्या पेठांची पांढरी उध्वस्त पडलेली दिसते. तींत च त्या वेळची ही रमणीय बुऱ्हाणशाही पेठ असावी. दिनकरांच्या पूर्वी शंभर दीडशें वर्षे निजामशाहींत बुऱ्हाण निजामशाहा या नांवाचे दोन सुलतान होऊन गेले, त्यांच्यापैकीं कोणा एकाच्या नांवानें ही पेठ वसविली गेली असावी. दिनकरांच्या पूर्व वयांत जरी लोक सुखानें नांदतांना बाह्यतः दिसत असले तरी समाजाची सर्वांगांनीं होत असलेली अवनति व धर्माचा होत असलेला सारखा ऱ्हास हीं पाहून पुनरपि धर्मराज्य कसें व्हावें, याचा विचारी लोकांत, उघड किंवा गुप्त, खल होत असला पाहिजे. सिद्धे-

श्वराचें पवित्र स्थान तिसगांवपासून जवळ च आहे व तेथें च तर श्रीदिनकरांनीं पुरश्चरण करून गुरुकृपा संपादन केली.

असे आणखी इतर जे उल्लेख आहेत त्यांचा विचार वाचक करतील च. दिनकरांची कविता खरोखर किती तरी गोड आहे ! पण ती वाचावयास वाचकांना वेळ सांपडेल ना ? कारण

**कित्येक म्लेंच होऊन गेले । कित्येक फिरंगणांत आटले ।**
**देशभाषानें रुधिले । कितीयेक ॥** दासबोध १५-२-३
**मऱ्हाष्टदेश थोडा उरला । राजकारणें लोक रुधिला ।**
**अवकाश नाहीं जेवायाला । उदंड कामें ॥ ४ ॥**

हें वर्णन थोड्या फार फरकानें आजच्या स्थितीला हि लागतें !

**कित्येक युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें गुणें उन्मत्त जाले ।**
**रात्रंदिवस करूं लागले । युध्यचर्चा ॥ ५ ॥**
**उदिम्यास व्यासंग लागला । अवकाश नाहींसा जाला ।**
**अवघा पोटधंदा च लागला । निरंतर ॥ ६ ॥**

अशी तऱ्हा जवळजवळ आज हि झाली आहे ! तेव्हां अशा गलबल्यांत तुह्मी कोठचे दिनकर आणि त्यांची कविता घेऊन बसलात. वेळ आहे कोणाला ? खरें आहे ! आपलीं महत्त्वाचीं कामें सोडून दिनकरांच्या कवितेचें पुस्तक हातीं घेऊन बसा असें आमचें हि ह्मणणें नाहीं. पण आपल्या चोवीस तासांच्या कार्यक्रमांत जो कांहीं थोडासा काळ प्रपंचांत जात असेल त्यांतील अगदीं थोडा वेळ काढून तो आमच्या सांप्रदायाला व सांप्रदायिक कवितेला मिळावा अशी प्रार्थना आहे !

स्वानुभवदिनकर ग्रन्थ आणि ही स्फुट कविता मिळून दिनकरांची सर्व कविता प्रकाशित झाली, असें वाचकांनी समजूं नये. ही स्फुट कविता तिसगांव येथील दोन बाडांतून घेतली आहे. बाडें तत्कालीन असून एक आडवें आहे व दुसरें उभें आहे. आडवें बाड साद्यन्त आहे. त्याचीं १८४ पृष्ठें आहेत. उभें बाड मात्र अनादि, अनंत आहे ह्मणावयाचें. त्याचीं ७ ते १२६ पृष्ठें बांधलेलीं असून १२९ वें, १३४ वें व आणखीं दोन पानें सुटलेलीं आहेत. या बाडाचीं शेवटचीं १५।२० पानें फाटण्यांत गेलेलीं दिस-

तात. पहिल्या सहा व शेवटच्या पंधरावीस पानांतील दिनकरांच्या कवितेला आपण तूर्त तरी मुकलों आहोंत. ह्मणून ह्मणतों दिनकरांची सर्व कविता उपलब्ध होऊन प्रकाशित झाली आहे, असें समजूं नये. संशोधनाला अजून वाव आहे.

तिसगांव मठ व मठपति दिनकर यांची जी सेवा सभेला घडली तिचें सर्व श्रेय रा. रा. अमृत बापूजी रसाळ यांस आहे. स्वानुभवदिनकराप्रमाणें दिनकरांची ही स्फुट कविता हि संपादण्याचें काम रा. दाजीबा देव यांनीं केलें आहे.

यापुढें आतां कांहीं काळ तंजावराकडे जावा अशी इच्छा आहे. तिकडील मठाविषयीं माहिती मालेंतील भाग सतरावा, **श्रीसांप्रदायिक विविध विषय**, द्वितीय खंड, यांत यथावकाश येईल व ग्रन्थांपैकीं **मेरुस्वामिकृत रामसोहळा** ग्रन्थ, मालेंतील भाग अठरावा ह्मणून हातीं घेणार आहोंत. श्रीसमर्थचरणीं महाराष्ट्राचें जें चित्त जडलेलें आहे त्यानें सभेची ही अल्प सेवा गोड करून घ्यावी, अशी प्रार्थना आहे.

धुळें–१८३९ ज्येष्ठ शुद्ध १३

८८
१९१८

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

# श्रीसद्गुरुस्तवन

## पद

साधु रे धन्य साधु रे ॥ ध्रु० ॥

सकळ चराचर त्रिविध देवा ।
समान अंतरिं वेधु रे ॥ १ ॥

षड्रिपुचा संव्हार करूनी
दासासि केला बोधु रे ॥ २ ॥

पंचभूतादि त्रिगुण माया ।
समूळ शोधिला शोधु रे ॥ ३ ॥

अहं सोहं हें गिळुनी ठेला ।
विवेक परमानंदु रे ॥ ४ ॥

षड्गुणेश्वर तो स्वामी माझा ।
कल्याण कृपासिंधु रे ॥ ५ ॥

# श्रीदिनकरांची स्फुट कविता

## [ १ ]

## ॥ श्रीरामप्रार्थना ॥

### ॥ श्लोक ॥

॥ श्रीरामसमर्थ ॥

नमन तुज गणेशा आदरें हें चि आतां ।
अवगुण मुढता हे वारणें जी समर्था ।
हृदयकमळग्रामीं स्वामिनें[1] वासु कीजे ।
दिनकरमुखपद्में ग्रंथ तां बोलवीजे ॥ १ ॥
सकळगुणवरिष्ठे शारदे विश्वमाते ।
त्वरित सकृप होणें बाळकांतें अनंते ।
स्वरुपय रसनेचें होउनी नित्य राहे ।
दिनकरमुढलीळा वारणें शीघ्र माये ॥ २ ॥
नमन तुज समर्था श्रीगुरु बोधरूपा ।
श्रुति विधि भुमि[2]धरातें वर्णितां जी अमूपा ।
स्वरुपिंसह स्वरूपें हा नमस्कार माझा ।
दिनकर दिनें[3] स्वामी वंदितों दास तूझा ॥ ३ ॥
निरजदळ[4]परागीं गुंतले भृंग जैसे ।
रघुविरपदपद्मीं चित्त रीझेल तैसें ।

---

१ त्वां. २ शेषाला. ३ दीन, अनाथ. ४ कमलपत्राच्या गंधरजामध्यें.

तरि च भव न बाधी सर्वथा या जनाला ।
दिनकरवरदाता प्रार्थिजे सार्थकाला ॥ ४ ॥
दशरथकुळदीपा जानकीप्राणनाथा ।
अवसर बहु जाला भेटिला कां सनाथा ।
सकळ हि अपराधां सर्वथा क्षेम कीजे ।
दिनकर दिन देवें साक्षपें तोषवीजे ॥ ५ ॥
सुररिपु वधुनीयां मोक्ष त्यांलागि दाता ।
न धरित अरिभावा सर्वदा सर्वत्राता ।
सुरस भजनलीळा काय यां तो न तारी ।
परि जन भुलले कीं वीषई लिप्त भारी ॥ ६ ॥
जननि जठरवासीं वागवी बाळकासी ।
सकळ दिवस होतां पूर्ण पैं जन्म त्यासी ।
जननिपिडणसौख्या तें अणुमात्र नेणें ।
दिनकरप्रभुराजा होतसे याप्रमाणें ॥ ७ ॥
कुरुपि सकळरूपीं प्राप्त तें बाळ होतां ।
जन मनिं विट मानी देखतां बाळ येतां ।
परि जननिपित्याला प्रीति अद्भूत त्यासीं ।
दिनकर हिन सर्वैं वीट येना प्रभूसी ॥ ८ ॥
अळस मद त्यजा रे राम चित्तीं धरा रे ।
सजनगुण[1] वरा रे स्तब्धता हे हरा रे ।
अवगुण निवटा रे देह रामें भरा रे ।
दिनकर करितो रे वीनती हे तुम्हा रे ॥ ९ ॥
निशिदिनिं रघुराजा प्रेमभावें भजावें ।
विषयजनित सूखा शीघ्र सोडूनि द्यावें ।
हरिजनगुणसौख्या साधनीं दृढ होवें ।

---

१ सज्जनाचे गुण.

दिनकरप्रभु तोषे या गुणानीं स्वभावें ॥ १० ॥
निजगृह निगमाचें सार जें आगमाचें ।
सदसुख[1] त्रिगुणांचें धाम सर्वां जिवांचें ।
अज[2] सजनजनांचें वंद्य जें साम्यतेचें ।
स्वसुख दिनकराचें राम स्वानंदतेचें ॥ ११ ॥
त्यजुनि विषयकामा घे मना रामनामें ।
सजनहृदयधामा ध्याइजे नित्यनेमें ।
अमुप अधमकर्मा शीघ्र सोडूनि द्यावें ।
दिनकरप्रभु कृपाळू या प्रकारें स्वभावें ॥ १२ ॥
निरजजनित[3]मूखां वर्णितां जो न फावे ।
दशशत[4]मुखगीरा भंगल्या ज्या प्रभावें ।
विधि[5] उरग[6] सवेदां[7] जो न ये तूळणेतें ।
दिनकरप्रभु तो पैं राम आद्यंत वर्त्ते ॥ १३ ॥
परम सकृप हा कां आजि सक्रोध जाला ।
अवसर दिनदयाळें भेटिला काय केला ।
सचलित मन त्रिाळें चित्त चक्कीत जालें ।
दिनकरें दिन तुझें राघवा काय केलें ॥ १४ ॥
निजसुख सजनाचें शीघ्र चित्ता धरावें ।
भजनसजनलीळासाधनीं लीन व्हावें ।
दृढतर शुभमार्गी साक्षपेंसीं भरावें ।
दिनकर निजभावें रामपाईं स्वभावें ॥ १५ ॥
परम विरह होतो राघवेंवीण प्राणा ।
नयनिं निज न लागे याविना कंठवेना ।
निशिदिनिं सजना रे चित्त हें भ्रांत जालें ।
दिनकरप्रभु येना सर्व हि व्यर्थ गेलें ॥ १६ ॥

---

१ सत्सुख. २ जन्म ( मरण ) रहित स्वरूप. ३ नीरजजनित=ब्रह्मदेव. ४ सहस्रमुखांचा जो शेष त्याच्या वाणी. ५ ब्रह्मदेव, ६ शेष. ७ वेदांसहित.

हृदय तडके माझें राघवेंवीण बाई ।
शरिर श्रवत घर्मं कंप रोमांच देहीं ।
करुणव[1] मज दिनाची येइना काय कीजे ।
दिनकरप्रभु न भेटे तैं जनीं व्यर्थ जीजे[2] ॥ १७ ॥

विषयजनितसूखें चित्त हें लीन जालें ।
मुढजनगुणलीळासंगतोषीं मिळालें ।
अहेर[3] पदपदार्थँ काय कैसें करावें ।
अघटित घडतें रे राघवा शीघ्र पावें ॥ १८ ॥

परधन परकांता देखतां जीव रंजे ।
विलसे हृदय तोषें स्वप्निं ही तें चि गाजे ।
मन सजनवियोगें बाष्कळार्थासि धांवे ।
अघटित घडतें रे राघवा शीघ्र पावें ॥ १९ ॥

परसुखपरतोषें थोर पैं दुःख होतें ।
परदुखपरदोषें हर्ष वाटे मनातें ।
परगुणपरलीळा देखतां तें न भावे ।
अघटित घडतें रे राघवा शीघ्र पावें ॥ २० ॥

जठरभरणकार्या लोक नाडूनि रामा ।
रुढजनिं करि कीर्त्ति लाउनी चित्त नेमा ।
वरिवरि धरि नाका अंतरीं अंतरावें ।
अघटित घडतें रे राघवा शीघ्र पावें ॥ २१ ॥

आळसि अधम खोटे नष्ट चांडाळ पापी ।
परि तुझें ह्मणवी मी हें चि आश्चिर्य सोपी ।
सकळ दिनकरातें हें क्षमा तां करावें ।
अघटित घडतें रे राघवा शीघ्र पावे ॥ २२ ॥

---

१ दया, कृपा. २ जगावें. ३ अहः=दिवस. रात्रंदिवस या अर्थी.

अति रमणिय देखा पेठ बुऱ्हाणदर्यांही[1] ।
बहुत सुखस्वरूपें नांदती लोक ते ही ।
करिति विशद वार्ता धर्मसंस्थापनेच्या ।
निशिदिनिं निजनेमें ध्यास सिद्धेश्वराचा ॥ २३ ॥
प्रतिदिनिं सुमनेंसीं आर्त बाणेश्वरेसीं ।
विलसे हृदय भेटी घ्यावया ज्या जनासीं ।
परम सुरस ज्यालें[2] पाहातां त्या जनांचें ।
दिनकर ह्मणे जीणें तें चि पैं सार्थकाचें ॥ २४ ॥
शिव शिव शिव स्मरा रे नित्य सद्भावनेनें ।
निशिदिनिं पळपळेंसीं होत आयुष्य ऊणें ।
क्षण गत न ये पूढें हें जना ठाउकें कीं ।
असोनि दिनकराचा स्वामि ध्यातो पिनाकी ॥ २५ ॥
जननिपद पराचे अंगनेलागिं यावें ।
परधन निजस्वार्थें स्वप्निं ही नातळावें ।
घडिघडि रसनेनें रामपीयूषें[3] घ्यावें ।
दिनकरमन रामीं रामरूप स्वभावें ॥ २६ ॥
करिं चकिरें[4] विराजे खेळतां जीव रंजे ।
दुखति बहुत नेटें दंड तैं काय कीजे ।
न मनुनि दुख तें ही खेळतां राग लोकां ।
परम दिनकराचा क्रोध सर्वांसि देखा ॥ २७ ॥
बडबड खडकाळी कोरडी बोल नाहीं ।
निरुपणघनधारा येत लोटें प्रवाहीं ।
अणुभरि निजआस्थाबोल जेथें धरेना ।
दिनकरप्रभु तेथें केवि पेरे सुजाणा ॥ २८ ॥

---

१ कोणत्या कालास व स्थलास अनुलक्षून हा उल्लेख आला आहे याचा विचार प्रस्तावनेंत करूं आहे. २ जिणें किंवा जन्म या अर्थानें. ३ रामनामामृत. ४ चक्राप्रमाणें खेळण्याची एक वस्तु.

कटकट पुळकांटी दाटली द्वेपकांटी ।
समुळ भरलि सेखीं दाटती पुष्पवाटीं ।
अणुभरि सुखछाया सात्विकांतें दिसेना ।
दिनकरप्रभु तेथें केवि तोषे सुजाणा ॥ २९ ॥
निपट निकट आहे पैल तो राम पाहें ।
फुकट प्रकटतोहे द्वंद सोडूनि राहें ।
अवचट झट झोडी काळ नर्डीस फोडी ।
दिनकरप्रभुज्ञानेंवीण तों जन्मकोडी ॥ ३० ॥
क्षणभरि हरिनामीं हेत धारेचिना कीं ।
क्षणभरि हरिध्यानीं चित्त हें नातळे कीं ।
क्षणभरि हरिरंगीं बुद्धि निश्चीत नाहीं ।
दिनकर हिन जालें हीत नव्हे चि कांहीं ॥ ३१ ॥

---

# [ २ ]

# ॥ मनाचे श्लोक ॥

## ॥ गणपतिनमन ॥

### ॥ श्रीराम ॥

नमो पार्वतीपुत्र विघ्नेश्वरातें । जयाचेनि नामें मतीमंद ज्ञाते ।
तया पादपद्मीं मना स्थीर व्हावें । मनाचीं शतें श्लोक होतीं स्वभावें ॥१॥
नमो विघ्नविध्वंसना श्रीगणेशा । दयाब्धी दया शीघ्र कीजे दिनेशा ।
कृपा जैं तुझी हीनदीना जनासी । दुधूं धांवती ते चि वाचस्पतीसी ॥२॥
कृपा जे तुझी ते चि इच्छीतसे मी । गणेंद्रा मतें सांटवीं बुद्धिधामीं ।
करीं दूरि दुर्बुद्धि हे शुद्धबोधें । हरीं हीनमत्तें हिनत्वीं विवीधें ॥ ३ ॥

---

१ केंसाप्रमाणें बारीक कांटे, पुलक=शाहारे येऊन सर्वांगावरील केंस ताठ उभे राहणें. २ शुद्ध विचार.

विरंचीसदाशीवशक्रादिकांतें । सदा वंद्य तूं सद्गुणी त्रीदशांतें ।
ह्मणोनी गणेशाभिधानें त्रिलोकीं । तुतें वर्णिजे नित्य सद्बुद्धि दे कीं ॥४॥
तुझी वर्णव्यक्ति वदे कोण वाचा । मुळीं बुद्धिदानी जनीं तूं जनाचा ।
भलें हे चि ठेऊं पदीं मस्तकासी । करीं जें कळे तें चि दीवाकरासी ॥५॥

---

# [ ३ ]

## ॥ शारदानमन ॥

॥ श्रीराम ॥

नमो विश्वमाते शिवे चित्स्वरूपे । नियंते अनंते अनंतस्वरूपे ।
तुझी वर्णव्यक्तीलिळा कोण वानी । जेथें नेतिशब्दें वदे वेदवाणी ॥१॥
तुझा योग योजी असा तों दिसेना । तुझे व्यक्तिच्या वोतल्या व्यक्ति नाना ।
तुझी तूं तुला वर्णिसी काय कैसी । नियंते परे वर्णिली केवि जासी ॥२॥
परे शारदे सर्व वीशारदांगे । सुसंगे तुझ्या दर्शनें संग भंगे ।
तुझें ज्ञान होतां तुला तूं चि होसी । भवानी शिवानी दुजी वाणि कैसी॥३॥
अचक्षासि चक्षू अपाण्यासि पाणी । अपक्षासि पक्षु अवाच्यासि वाणी ।
अलक्षासि लक्षावया लक्षणेंसीं । नव्हे तें चि पैं स्थापिलें तां चि त्यासी ॥४
अनाम्यासि तां नाम निर्माण केलें । अशी तूं तुला कोण वर्णील बोलें ।
नमस्कारितों दृश्यद्रष्टास्वरूपें । कृपादृष्टि दीवाकरा दे अमूपे ॥ ५ ॥

---

१ देवांना. २ नियमन करणारी परमेश्वरी. ३ परावाणीरूप शारदे. ४ जें होण्यासारखें नाहीं तें.

## [ ४ ]

### ॥ अव्यक्तसद्गुरुनमन ॥

॥ श्रीराम ॥

अनुर्वाच्य वाचेसि कैसें वदावें । असंभाव्य भाऊनि कैसें भजावें ।
अरूपासि कैस्या स्वरूपें पाहावें । नमो सद्गुरु काय कोणा ह्मणावें ॥१
अनाम्यासि नामें कसें आळवावें । अकामासि कामें कसें कामवावें ।
अमूर्त्तासि ध्यानीं कसें आकळावें । नमो सद्गुरु काय कोणा ह्मणावें ॥२
अपादासि पाईं कसें शीर ठेऊं । अलक्षासि चक्षें कसें लक्ष लाऊं ।
अमूर्पासि नेमें कसें आवरावें । नमो सद्गुरु काय कोणा ह्मणावें ॥ ३ ॥
असो गूढ हें मूढ मी काय जाणे । समस्तांत अज्ञान कांहीं च नेणें ।
मुळीं द्वैत निःशेष जातां स्वभावें । नमो सद्गुरु काय कोणा ह्मणावें ॥४
चमत्कारली भावना भावितां ही । नुरे ज्ञानज्ञातेनसीं ज्ञेय तें ही ।
ह्मणे दीन दीनेश येणें स्वभावें । नमो सद्गुरु काय कोणा ह्मणावें ॥५॥

---

## [ ५ ]

### ॥ व्यक्तसद्गुरुनमन ॥

॥ श्रीराम ॥

पहा संत संतापत्यागी विरागी । सखे सांख्ययोगें महाराज योगी ।
परानंददानी दयादक्ष ज्ञानी । नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥ १ ॥
अनाथां जिवांकारणें देहधारी । कृपासिंधु जे पूर्ण लीळावतारी ।
जगोद्धारकर्ते चि नीराभिमानी । नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥२॥

---

१ व्यापक स्वरूपास.

स्वसंवेद्य देणें जयांचें सरेना । दरिद्रें देहेबुद्धिच्या राहिजेना ।
असंभाव्य भांडारिंचे अर्थदानी । नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥३॥
प्रवृत्तीस संरक्षिते स्वाश्रमीचे । महानिश्चइ छेदिते संशयाचे ।
समाधिस्थसांम्राज्य[1] संवादखाणी । नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥४॥
ह्मणे दीन दीनेश निष्कामभावें । घडे लाभ ज्यांला तयांला चि फावे[2] ।
महालाभ हा नेणवे वेदवाणी । नमस्कार माझा तया मोक्षपाणी ॥ ५ ॥

---

## [ ६ ]

### ॥ श्लोक दशक ॥

॥ श्रीराम ॥

मना मानसीं थोर धारिष्ट द्यावें । मना हीन चांचल्य सोडूनि द्यावें ।
मना ज्ञानवैराग्यपथीं भरावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ १ ॥
मना कल्पना निर्विकल्पीं धरावी । मना भावना निर्जनांची[3] करावी ।
मना काम निष्कामतेमाजि न्यावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥२॥
निरालंब औलंब तेथें करावा । निराभास साभास तेथें धरावा ।
निराकार आकारभावीं वसावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ ३ ॥
मदा मार देणें प्रभूचे कृपेनें । अहं गर्व ताठा विदारीत जाणें ।
पुढें क्रोध निक्रोध होणें स्वभावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ ४ ॥
विधीची विधी ते मना आठवावी । क्रियेची क्रिया आदरेंसीं वरावी ।
नितीचे नितीमाजिं वेगीं वसावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ ५ ॥
मना कामना काम कल्पूं नको रे । मना भावना भाव भाऊं नको रे ।
मना पावना पाव पावोनि ज्योंवें[4] । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥६॥

---

१ समाधीपासून उत्पन्न होणाऱ्या स्वानंदसाम्राज्यांत दंग असणारे.
२ आकळतो. ३ एकांताची. ४ जगावें.

मना ज्या जना राघवीं हेत नाहीं । तया दुर्जनाचें नसे हीत कांहीं ।
नसावें जनीं राघवेंवीण जीवें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ ७ ॥
मना बोलतां चालतां राम ध्यावा । जळा सेवितां जेवितां तो स्मरावा ।
जनीं जागतां नीजतां नाम ध्यावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥८॥
सुखा भोगितां राम भोक्ता ह्मणावें । जनीं बैसतां ऊठतां हें चि ध्यावें ।
निमिष्यार्धं रामेंविणा तें न[1] जावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥ ९ ॥
तुला सीकवीसा मना कोण आहे । परी वीनती आदरें हे चि पाहें ।
जेणें राम दीवाकरीं तें चि ध्यावें । सदा सर्वदा रामदासीं भजावें ॥१०॥

---

## [ ७ ]

॥ श्रीराम ॥

भजावें मना त्यासि जो वंद्य वेदा । पुराणादिकां शास्त्रबुद्धां प्रबुद्धां ।
विबुद्धांदि नानाप्रकारें पदाब्जीं । अती लीन तो राम वंदा शिराब्जीं ॥१॥
स्मरासारिखा[2] ज्या हरें दग्ध केला । तपस्वी उदासीन निष्कंप जाला ।
तया वीषबाधा मना प्राप्त होतां । निवाला अकल्पीत तो नाम घेतां ॥२॥
मना पाहतां वेदशास्त्रें पुराणें । तयांमाजि यें रामनामें प्रधानें ।
ययांवीण तों सार कोठें दिसेना । ह्मणोनी स्मरे रे सदा देवराणा ॥३॥
नसे वृत्ति रामीं जया पामराची । तया प्राप्त होणार पुरी यमाची ।
गती नर्कवासीं सदा त्या जिवासी । नसे आवडी ज्यासि सीतापतीसी ॥४॥
मना तूं रतीरंगरंगीं न रंगें । त्वरेनें रमारंगरंगीं सुरंगें ।
असे हे तनू मानवी त्या प्रसंगें । धरीं सारवीचार हा लागवेगें ॥ ५ ॥
मना सज्जना सज्जनीं सज्ज व्हावें । मतीहीन तात्पर्य सोडूनि द्यावें ।
स्वधर्में स्वहीतार्थ रामीं रमावें । करावें असें तें चि ज्यांलें[3] ह्मणावें ॥६॥

---

१ मुळांत ‘ न ’ गळालेला आहे. २ मदनासारिखा. ३ जन्मसार्थक झालें असें.

नृदेहीं तिळांतुल्य ऊगें नसावें ।, गतीगम्य सीतापतीसी करावें ।
न व्हावें भुमीभार येऊनि जीवें । तरावें स्वयें पूर्वजा उद्धरावें ॥ ७ ॥
मना ज्या नरा भाव रामीं न भावे । तया दुर्जना रौरवांचे पुरावे ।
नव्हे अन्यथा भाष नेमेस्त आहे । असे साक्ष दीवाकरा नित्य पाहें ॥८॥

---

## [ ८ ]

### ॥ श्रीराम ॥

घडीनें घडी सार्थकाची भरावी । कदा चित्तवृत्ती प्रपंचीं नसावी ।
अखंडीत हा जानकीकांत ध्यावा । वृथा फुंजे या वैभवाचा त्यजावा ॥१
पाहातां नसे देह हा शाश्वताचा । नसे भर्वसा येक तो ही क्षणाचा ।
असें जाणतां भूलसी काय जीवा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥२
वसावा मनीं भाव साद्यंत आधीं । अनाचारवृत्तेक तो सर्व बाधी ।
विवेकार्थ शोधूनि भावार्थ घ्यावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥३
महामूढता प्राप्त होतां मनाला । भरीं दुर्भरीं योजिती साधकाला ।
अतर्कैक या सर्व वृत्ती हराव्या । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥४॥
प्रिया सूत या वैभवाचेनि गूणें । महामीळणीं मीळती सौख्यतेनें ।
सुखा भंगतां टाकिती पूर्वभावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥५॥
जनीं योजितां सार तें आडळेना । जनीं योजितां मूढता हे शमेना ।
अश्या सर्व ही वैभवाच्या चि मावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥६
बहू जन्मजन्मांतरें पुण्यसाटी । घडे जन्म तैं मानवी सार घांटी ।
असें फांवतां राम चित्तीं वसावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥७
जनीं सर्वभावें स्वभावें चि रामीं । धरावी बरी वृत्ति हे पूर्णकामी ।
सदा काळ हा सार्थकाचा भरावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥८

---

१ यत्किंचित, क्षणभर देखील. २ अनुभवसिद्ध. ३ अभिमान. ४ स्वेच्छेनें वागण्याची प्रवृत्ति. ५ शोधितां, पाहतां.

सदा सर्वदा रामरामेति वाणी । वदावी अती आदरें सौम्यवाणी ।
सदा निश्चयो स्वस्वरूपीं घडावा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥९॥
करी जो जसा त्या तसा राम आहे । प्रतिभास या दर्पणाचेनि न्यायें ।
अखंडीत दीवाकरीं रामसेवा । वृथा फुंज या वैभवाचा त्यजावा ॥१०॥

---

## [ ९ ]

॥ श्रीराम ॥

धडाडीत पापें मुखें नाम घेतां । थडाडीत कांपे कळीकाळ चित्ता ।
निमोलें जना नेघवे हें फुकाचें । अभाग्या जिआ रामचिद्रूप कैचें ॥१॥
बहू भाग्य लक्षानुलक्षीं[1] विराजे । जनीं संपतीचा पुरुषार्थ गाजे ।
परी अंतरीं राम हा आठवेना । तयां[2] आगि लाऊनि जावें अरण्या ॥२
गडाडीत वाचा सदा रामनामें । कडाडीत वैराग्य जेथें स्वधर्मे ।
खडाडीत जें ज्ञान वेदांत बोले । वसे जेथ ते भूमिके भाग्य आलें ॥ ३
मुखें राममार्तंड[3]वाचाउजेडें । तमाद्भूत[4] अज्ञा[5]न हें सर्व ऊडे ।
चिदानंद स्वानंद जोडे निर्वाडें[6] । भ्रम भ्रांति अज्ञानता सर्व मोडे ॥ ४
विचारें विचारीं विचारासि चित्ता । अवीचार वारीं निवारीं विवर्ता ।
पदार्थासि[7] जाणोनि सूखें स्थिरावें । असावें नसावें जनीं धन्य व्हावें ॥५
महद्भाग्य सत्ता जनीं प्राप्त होतां । न वीटे रघूराजनिर्धूतपंथा ।
जनीं भाग्य तें धन्य जालें तयांचें । जया अंतरीं ध्यान सर्वोत्तमाचें[8] ॥ ६
स्मरें रे मना रामरामेति वाणी । हरीं रे महापापिणी दृष्टे[9] वाणी ।
जेणें सारवीचार हाता चढेना । तया टाकिजे ध्याइजे त्या निदानीं[10] ॥७

१ लाखों लोकांच्या ठिकाणीं. २ त्या भाग्याला व संपत्तीला. ३ राम हा च सूर्य, याच्या वाणीरूप उजेडानें ह्मणजे रामनामगर्जनेनें. ४ तमोद्भूत=तमापासून उत्पन्न होणारे. ५ मुळांत ' न ' गळालेला आहे. ६ निणर्यात्मक रीतीनें, निश्चयानें. ७ वस्तूप, परब्रह्मस्वरूपास. ८ श्रीरामाचें. जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा। ( श्रीसमर्थ ). ९ दुष्ट. १० सर्व जगाचें आदिकारण जो श्रीराम त्यास.

शिळा ते आहिल्या पदस्पर्श होतां । अजामेळ ध्यातां चि कैवल्यदाता ।
शुकाच्या मिसें कुंटिणी ते विमानीं । स्मरें राम दीवाकरा सारवाणी ॥८॥

---

[ १० ]

॥ श्रीराम ॥

मना या जना भीनं[1] कांहीं घडेना । बरा शुद्ध सन्मार्ग चित्तीं वसेना ।
सदा निंदिती भक्तिमार्गा कुभावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥१॥
जयांचेनि संगें तुटे रामसेवा । जयांचेनि संगें घडे पापठेवा ।
तयांमाजि वास्तव्य चित्ता न व्हावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥२॥
महाथोर लज्जा मुखें नाम घेतां । भयें दुर्जनाच्या मनीं थोर चिंता ।
असा अंतरीं धाक ज्यांच्या प्रभावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥३॥
अकस्मात संदेह जो संग कारी[2] । अकस्मात जो भक्तिधैर्या विदारी ।
असा संग तेथें मना तां नसावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥४॥
स्वधर्मेंचि चाले स्वहीतार्थ बोले । सदा ज्ञानवैराग्यवीना न बोले ।
तयाचा तिरस्कार लोकां स्वभावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥५॥
जया राम निष्काम निर्धूत[3] व्हावा । तेणें नित्य येकांत सेवींत जावा ।
मना या जनाचेनि संगें न ज्यावें[4] । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥६
जयांचेनि संगें समाधान भंगे । जयांचेनि संगें स्वहीतार्थ खंगे[5] ।
तयांचेनि संगें मना कोण नीवे[6] । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥७
सदाशीव सेवी जनाभीन[7] रानें । फिरे राम आरण्य ज्यांचेनि[8] भेणें ।
तेथें मानवा कोण भावार्थ फावे । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥८

---

१ भीतीनें. २ याचा संबंध 'संदेह' शब्दाकडे ध्यावा. 'जो संग अकस्मात संदेह कारी' असा अन्वय. ३ स्वच्छ, कलंकरहित. ४ जगावें. ५ दुर्बल होतो, साधत नाहीं. ६ शांत होईल. ७ जनांच्या भीतीनें. ८ निंदकांच्या अपवादाच्या भीतीनें.

नको रे मना राघवेंवीण जीणें । जिणें राघवेंवीण तें जाण सूणें[1] ।
मना हीत जें आपुलें तें करावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें ॥९
मना सर्वथा वीनतो तूज आतां । अखंडीत दीवाकरा राम त्राता ।
घडे त्या प्रकारासि सावंत ध्यावें । सुखें सांडुनी त्या अरण्यांत जावें॥१०

---

## ( ११ )

॥ श्रीराम ॥

अरण्यांत तारुण्यकाळीं वसावें । महा धैर्य वैराग्य चित्तीं धरावें ।
पुढें भक्तिज्ञानें उरावें नुरावें । सदा संतपंथासि सेवीत जावें ॥ १ ॥
वृथा बोलणें साधनेंवीण बाणे । वृथा सर्व हि सत्क्रियेंवीण जाणें ।
वृथा संतसंगेंविना सर्व कांहीं । मना हीत जें आपुलें तें चि पाहीं ॥ २
जगीं धन्य संसार त्या मानवाचा । निजध्यास ज्याला सदां राघवाचा ।
रघूराजसावीण अन्यत्र नेणे । मना धन्य माता तयाचीच जाणें ॥ ३ ॥
मना येइना राम वाचेसि ज्याचे । तया सोहळे भोगती रौरवांचे[2] ।
बहू जाचिती येम त्या प्राणियाला । जनीं राघवेंवीण जो जीव त्याला ॥
मना राघवेंवीण आशा दुराशा । मना राघवेंवीण वांछा अवांछा ।
मना राघवेंवीण जें सर्व कांहीं । जनीं दुःख त्यायेव्हडें थोर नाहीं ॥ ५
जयाचे मुखीं राम नाहीं सुवाचा । तयाचे शिरीं दंड वाजे यमांचा[3] ।
सदा नर्कवासीं वसे वास त्याचा । निजध्यास नाहीं जया राघवाचा ॥६
विचारीं मना आपुलें कोण आहे । स्त्रियापुत्रमित्रादिकें बापमाये ।
सुखाचीं समस्तें जनें वैभवाचीं । त्यजीं संगती घे बरी राघवाची ॥७॥
अनीवारेंसी धारणा रामरूपीं । धरीं शीघ्र दीवाकरा वृत्ति सोपी ।

---

१ सुनें=शून्यरूप, व्यर्थ. २ रौरव नामक नरकाचे. ३ जया नावडे नाम त्या येम जाची । श्रीसमर्थश्लोक १०१. ४ ' र ' मुळांत गळाला आहे.

सुखानंद आनंद जेणें विराजे । यमादुर्जनाचे शिरीं कांबि वाजे ॥८॥

---

# [ १२ ]

॥ श्रीराम ॥

अनीवार धारिष्ट वैराग्य होतां । घडे पंथ निर्धूत ज्ञातृत्व चित्ता ।
तेणें जन्म सारांशतेमाजि आलें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ १
मि माझें तुझें जीव भावे अविद्या । बरें शोधितां सर्वथा हे कुविद्या ।
उरे शोध्यं जें सार सिद्धीसि ठेलें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥२
अहंता उडे शुद्ध सद्वासनेनें । सोहंता जडे नित्य सन्मार्गतेनें ।
सोहंतेअहंतेविना ऐक्य जालें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥३॥
सदा कर्म ऊपासना ज्ञान जाणे । विचारासि यांच्या अणुमात्र नेणें ।
असो हें असें ज्ञान शुद्धीन वोळे । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥४
हरे पूर्वपक्षार्थ सिद्धांत जागे । पुढें सर्वसिद्धांत पूर्वार्थ वागे ।
पुन्हां शुद्धसिद्धांत होतां चि ज्यालें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ ५
परत्रासि वाच्यांशता फार घेणें । विना वाच्य लक्षांशता लक्ष तेणें ।
बरें लक्ष आलक्ष ठायासि आलें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ ६
विर्वणें तनु देह चत्वार भूतें । विसंचूंनि तत्त्वांश शुद्धांश मत्तें ।
विचारूनियां योजनें लभ्य जालें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥७
बरें कर्म ऊपासना राघवाची । माहावाक्यविवर्णता ज्ञान तें चि ।
विरे दृश्य अदृश्य बोधें निराळें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥८॥

---

१ बळें भक्तारीपूशिरीं कांबि वाजे । श्रीसमर्थश्लोक २९. २ सार्थकतेप्रत ३ शोधण्याची वस्तु. ४ प्राप्त झालें. ५ शोधनानें, आत्मानात्मविचारानें. ६ परत्र=परलोक. ७ निश्चय झाला. ८ विवरण करून. ९ विकार होऊन. १० विचार, विवेक करून.

नृदेहीं जिवा वास होतां त्वरेनें । कराके सखे संत कैवल्यनाणें[1] ।
त्यजावें मनें हें अरत्रीक[2] वाल्हें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें ॥९॥
असो सर्व दीवाकरा गोष्टि सांडीं । तुलें रामदासांविना कोण गोडी ।
प्रभूवीण तो ध्यास वायां न बोलें । न होतां असें जन्म हें व्यर्थ गेलें॥१०

---

# [ १३ ]

॥ श्रीराम ॥

मना शुद्धभावें करीं येक निष्ठा । महाश्रेष्ट जो श्रेष्ठश्रेष्ठां वरिष्ठां ।
तया राघवातें भजावें स्वभावें । उरोनी नुरावें कुळा उद्धरावें ॥ १
नव्हे द्वैत नाद्वैत जें रूप कांहीं । असे सर्व व्यापूनियां सर्व देहीं ।
तया राघवातें मना शीघ्र पाहें । स्वयें अंतरीं शोधितां स्थीर राहें ॥२॥
नसे येकदेशी नसे सर्ववासीं । न भेटे कदां पाहतां लोचनासी ।
असें रूप जें व्यापुनी सर्व आहे । परी पाहतां सर्वथा सर्व नव्हे ॥३॥
निमिष्येक हा राम देईल भेटी । त्रिधा कर्म दग्धोनि होईल खोटी[9] ।
महाभीम माया विरे येकि हेळां[10] । पडे वीमळीं दृष्टि साक्षेप जाला ॥४॥
धरा[11] जीवनीं पावकीं वायु स्वर्गीं । निधीं स्थावरीं जंगमीं स्वर्गवर्गीं ।
जनीं वीजनीं व्यापुनी राम आहे । विवेकें चि दीवाकरा शीघ्र पाहें ॥५

---

१ संत कसे आहेत, तर, ते मोक्षपदवीप्रत पोंचविणारें ( नाणें ) मधलें साधन आहेत. २ इहलोकचे. ३ मालक, पोशिंदा. ४ श्रद्धा, निश्चय. ५ कोणती हि वृत्ति शिल्लक राहिली न पाहिजे; परमावधीच्या अनन्य भक्तीनें. ६ अशा सर्वव्यापक श्रीरामास, मना, तूं पहा; पण कसा पाहशील ? स्थूल दृष्टीनें तो दिसणार नाहीं, तर त्याला अंतर्दृष्टि पाहिजे. ७ तें स्वरूप सर्व ठिकाणीं व्यापून राहिलेलें आहे, तरी तें तेवढें च कांहीं सर्व नव्हे. सर्व ब्रह्मांड व्यापून तें शिल्लक आहे तें आहे च. ८ संचित, क्रियमाण आणि प्रारब्ध असें तीन प्रकारचें कर्म. ९ गोळा. १० क्षणांत. ११ पृथिव्यादि पंचभूतांमध्यें.

## [ १४ ]

॥ श्रीराम ॥

मना जन्म जेव्हां तुला प्राप्त जाला । यमासारिखा शत्रु तेव्हां उदेला ।
त्रिवा[1]चा न चूके खरें झुंझ त्यासी । असे देखिला कोण उपाय यासी ॥१
मना [3]जो न लेखी विधी शक्र रुद्रा । करी कोण लेखा असंख्या महेंद्रा ।
करी अंत जो सर्व आका[4]रवासी । असे देखिला कोण उपाय यासी ॥२
महाभीम विस्तीर्ण लंबायमाने । कडाडीत कर्कोटे भिगूळवाणें ।
पुढें ठाकतां रूप कांटाळवेशी । असे देखिला कोण उपाय यासी ॥ ३
प्रिया पुत्र जामात बंधु सुखाचीं । सुखा भंगतां ते न येती फुकाचीं ।
असें जार्णतां लागती नित्य सोसीं । असे देखिला कोण उपाय यासी ॥४
सदा राम दीवाकरीं शुद्धरूपें । विराजे जनीं सर्व रामप्रतापें ।
मना सांडुनी त्यासि तूं भूललेंसी । असे देखिला कोण उपाय यासी ॥ ५

---

## [ १५ ]

॥ श्रीराम ॥

उपायासि योजीसिना शीघ्रकाळें । परस्तावसी प्रांत होणार वेळे ।
अमोलीक हें मानवी देह हातीं । पुढें सांपडेना प्रवर्तें हितार्थी ॥ १ ॥
मना जन्मसाफल्य तों अल्पमात्रें । परी प्राप्त नाहीं जना काळिसूत्रें[9] ।
मि माझें तुझें हे वृथा जल्पें[11] वादे । किती नाडले देह वादें व्यर्थवादें[12] ॥२॥
सदा वीषयीं वृत्ति हे रूढ जाली । घनानंद स्वानंदलीळा बुडाली ।
अविद्यात्मकें या जना भूलि आली । सुविद्या मना सर्व लोपोनि गेली ॥३

---

१ त्रिवार सत्य. २ हा प्रश्न आहे. ३ जो यम, काळ. ४ ज्यांना आकार ह्मणून आहे त्यांचा, ह्मणजे दृश्यजात सर्व पदार्थांचा. ५ खेंकड्याप्रमाणें. ६ भयानक. ७ कंटाळा अथवा तिरस्कार उत्पन्न होईल अशा वेषाचें. ८ जाणूनबुजून. ९ अत्यंत नाश. १० आयुष्य वाढविण्याची युक्ति कोणाला च सांपडत नाहीं. ११ वल्गना, गर्वोक्ति. १२ विवादें, वितंडवादानें.

नृदेहीं मना जैं भत्रालागि भ्यावें । पशूदेहधारीं कसें तें करावें ।
जिवीं हें चि आश्चिर्य तों थोर वाटे । मुढा झांकणें नेत्र जें तें चि खोटें ॥४
हिताहीत जाणे धरीना मनानें । जितां सुक्तता ठाव जीवी न जाणे ।
मुखीं नाम तें ही फुकाचें न बोले । भुमीभार प्राणी वृथापृष्ट[1] ज्यालें ॥५॥
हितातें न जाणे भल्यातें पुसेना । असो पूसिलें सांगतां तें कळेना ।
कळे तों नसे चित्त सुचित्त कोठें । मना ते विकारी भिकारी करंटे ॥६॥
न मानीं मनीं वीट जो वीषयांचा । प्रपंचीं रुढे[2] चित्त भोगीं सुखाचा ।
गळा गीळितां मछ जें सौख्य पावे । प्रपंची जना तेपरीं भोग भावे ॥७
रुंढे[3] मूढ सदृढ पाषांडपंथा । वदे बंड आखंड ऊण्या पदार्था ।
मतीमंद निर्द्वंद्वें[4] त्या आवडेना । अघांचा[5] पती देखतां पाहवेना ॥ ८ ॥
जनामाजि वास्तव्य सुखें करावें । परि या जनाचेनि संगें नसावें ।
असोनी जळीं पद्म जैसें न लिंपे । नसोनी असावें प्रपंचीं स्वरूपें ॥९॥
नमो राम माता नमो राम पीता । नमो राम भ्राता नमो राम त्राता ।
नमो राम दाता नमो राम भोक्ता । नमो राम दीवाकरीं नीतिवंता ॥१०

---

# [ १६ ]

॥ श्रीराम ॥

निरीं क्षीर संयुक्त होतां चि हंसें । विवंर्चूनि[6] क्षीरा त्यजी नीर जैसें ।
तदंन्यायें[7] विश्वीं असे विश्वभर्त्ता । विवंर्त्ता[8] विसंची[9] भला तो संपुर्त्ता[10] ॥१
सपुर्त्ता अपुर्त्ता असें ही घडेना । तथा बोलण्यावीण ठाईं पडेना ।
अनुर्वाच्य वाचेसि आणूनि संतीं । जनांते अनुर्वाच्य कीजे महंती ॥२॥

---

१ पुष्ट या अर्थानें. २ वाटतात. ३ धरून बसतो. ४ निर्द्वंद्व=विघ्नरहित. ५ पातकांचा. ६ घोळून, शोधून. ७ त्या च न्यायानें. ८ प्रपंचरूपी भोवऱ्यास. ९ नाशवंत आहे असें विचारपूर्वक जाणतो. १० परिपूर्ण.

॥ श्रीराम ॥

श्रीरामा चिद्रूपा सुखमय गहना जीवजिवना ।
दिनानाथा रंम्या निगमागमा आर्त निपुणा ।
निजानंदा सद्या विद्रद विशदा दोषदमना ।
त्वरें पावें नाथा दिनकरसदना पद्मनयना ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

कां मूढा भ्रमसी अनेक फिरसी देशांतरें धुंडिसी ।
नाना स्थावरजंगमासि धरिसी रानें वनें सेविसी ।
वृथ्या साध्य असाध्य जल्प करिसी तीर्थाटणें हिंडसी ।
मूर्खा कां सिणसी स्मरें दिननिशीं श्रीरामसें मानसीं ॥ १ ॥

---

[ १७ ]

॥ श्रीराम ॥

कळेना तुळेना लिळा आंतुडेना । प्रमांणु प्रमाणें मना आकळेना ।
बहू धारणा त्या हिना सर्व जाल्या । जेथें उन्मनी चित्कळा त्या विराल्या ॥ १
असंभाव्य जें भावने भाववेना । गुणातीत निर्गूण तें चोजवेना ।
किती तर्क संपर्क वृत्ती निमाल्या । जेथें उन्मनी चित्कळा त्या विराल्या ॥ २
जयाचे प्रभेची प्रभा भानुरूपी । जयाचे कळेची कळा युंदुरूपी ।
जयाचे स्वरूपीं श्रुती दूरि ठेल्या । जेथें उन्मनी चित्कळा त्या विराल्या ॥ ३
निराभास साभास जेथें घडेना । निराकार आकार तेथें दिसेना ।
कळेना गुरूवीण हें कांहिं केल्यां । जेथें उन्मनी चित्कळा त्या विराल्या ॥ ४ ॥

---

१ वृथा. २ परमाणु. ३ मनाचें लीनत्व होतें अशी पांचवी अवस्था. ४ चैतन्यकलिका. ५ इंदु=चंद्र.

अकल्पीत दीवाकरा निर्विकल्पीं । भरातें निवावें प्रभूचे प्रतापीं ।
बरा वोस हा तों नृदेहासि आल्यां । जेथें उन्मनी चित्कळा त्या विराल्या ॥५

## [ १८ ]

॥ श्रीराम ॥

समारंभ आरंभला राघवाचा । निसंदेह जो कार्यकर्ता तयाचा ।
न मानी दुजे अन्यथाकार्यसोसीं । असे रामविश्राम त्याच्या श्रमासी ॥१॥
न ये वीट जो नीट सर्वाप्रकारें । न मीळे कधीं कल्पनेच्या विकारें ।
करी काम निष्काम अत्यादरेंसीं । असे रामविश्राम त्याच्या श्रमासी ॥२॥
न ये अंतरीं हें दुजें ऐक्यतेनें । सदा वर्तणें शुद्ध सद्वासनेनें ।
जनीं धन्य दीवाकरा त्या जनासी । असे रामविश्राम त्याच्या श्रमासी ॥३

## [ १९ ]

॥ श्रीराम ॥

मना सांडि रे भ्रूलता वीषयांची । मना सांडि रे संगती दुर्जनांची ।
मना सांडि रे भावना वैभवाची । मना संगती घे बरी राघवाची ॥१॥
मना सांगतां दुःख तों वोंड आहे । घडे सांग संसारिका सर्व पाहें ।
परी वीनती आदरें तूज हे ची । मना आवडी घे बरी राघवाची ॥२॥
मना दुःख जें होतसे गर्भवासीं । असंभाव्य तें वर्णितां वैखरीसी ।
तया दूर तां व्हावया युक्ति साची । मना आवडी घे बरी राघवाची ॥३
न ये धामविश्राम अंतीं सुजाणा । न ये हेम तें क्षेम संसर्ग नाना ।
त्यजीं ये समस्तें जणें वैभवाचीं । मना आवडी घे बरी राघवाची ॥४॥

१ सोय, मार्ग. २ हावरेपणानें विपरीत कार्यांत मन घालीत नाहीं. ३ भ्रूलता=भ्रुकुटी, भोंवई, विषयांची भ्रूलता=विषयांकडली दुष्ट नज़र. ४ मोठें.

किती जोडिसीं द्रव्य पैं घातपातें । किती दाविसी वित्पती[1] या जनातें ।
दगा पावसी धाडि येतां येमाची । मना आवडी घे बरी राघवाची ॥५॥
नको दृष्ट शब्दें दुषूं देवभक्ता । नको दृष्ट कापट्य योजूं विरक्ता ।
नको घातकें सर्व तुझ्या जिवाचीं । मना आवडी घे बरी राघवाची ॥ ६ ॥
नको रे मना सज्जना खेद वादें । नको रे मना दुर्जना संग बोधें ।
नको रे मना संगती कल्पनेची । मना आवडी घे बरी राघवाची ॥७॥
मना शोधितां शोध्यता तों दिसेना । जनीं निश्चयो येक तत्त्वीं वसेना ।
दिनेशा लिळा सर्व ही कल्पनेची । त्यजीं आवडी घे बरी राघवाची ॥८॥

---

## [ २० ]

॥ श्रीराम ॥

गडाडील रे कंठ जेव्हां कफानें । थरारीत कांपेल काया जरेनें ।
तधीं ठाकती दूर सर्वत्र कोण्हीं । न होतां असें तों स्मरें चापपाणी ॥१
निमिष्यें पळें जात आयुष्य वायां । वृथा सार्थकेंवीण जीणें मराया ।
नको रे मना व्यर्थ येऊनि जाणें । कटा[2] राघवेंवीण जीणें न जीणें ॥२
मनें मानणें मान्यमान्या जनांतें । मनें सोडणें हीन कर्माधमातें ।
मनें योजणें सार साचार चित्तें । मनें जाणणें जें जिवा जीववीतें ॥३॥
जिवा जीववीतें जिवा नीरवीतें । जिवीं निर्जिवीं जें सदा येक वर्त्ते ।
असें जें मना तें चि शोधूनि पाहें । स्वयें शोधितां स्थीर होऊनि राहें ॥४
करीं कामना भावना राघवाची । त्यजीं वासना ते मना वैभवाची ।
धरीं धारणा भूषणा चिन्मयाची । नको यातना सज्जना ते यमाची ॥५॥
मना राघवेंवीण जें अन्न खाणें । जनीं जाण तें सर्व विष्टेप्रमाणें ।
मना सेवणें राघवेंवीण पाणी । विषाहूनि त्या जीवनें जीवहानी ॥ ६ ॥

---

१ व्युत्पत्ति, विद्वत्ता, ज्ञान. २ अरेरे, हाय !

मना भूषणें राघवेंवीण जें जें । जनीं प्रेतशृंगारता जेवि कीजे ।
तदंन्याय जीणें जनीं त्या जनाचें । नसे आर्त्त ज्यालागि सीतापतीचें ॥७॥
मुखें गर्जना राघवाची करावी । कथा आदरें निर्भरें आयकावी ।
सदा पाहणें रामरूपासि नेत्रीं । वसे वास निःशंक तेणें परत्रीं ॥ ८ ॥
अनिवार हे वृत्ति जाणा मनाची । तया भेटि देणें बरी चिन्मयाची ।
तेणें शांति सर्वांगवासीं विलासे । अती हीन ते वृत्ति निःशेष नासे ॥९॥
मना मीपणा क्षीणता जों न पावे । मना भावना राघवीं तों न भावे ।
अभिमान सांडूनि नानाप्रकारें । दिनेशा भजें राम तूं निर्विकारें ॥१०॥

॥ मनाचे श्लोक संपूर्ण ॥

---

# ॥ स्फुट श्लोक ॥

## [ २१ ]

### ॥ श्रमाचें श्लोकपंचक ॥

॥ श्रीराम ॥

झडझडित झडाडां वायु झाडीत नेटें । कडकडित कडाडां मोडती वृक्षबेटें ।
भरभरित भरारां ऊडती माळचक्रें[1] । फडफडित फडाडां भेदिती कर्णनेत्रें ॥१
थडथडित थडाडां फूटती अंगगात्रें । भडभडित भडाडां रक्त लोटे वेगत्रें[2] ।
भरत सरसरारां मृत्तिका सैर नेत्रीं । नयनिं गृह न दीसे पातली कृष्णरात्री ॥
जनक भगिनि बंधु अश्व सर्वा कळत्रा ।
पडालि फुटि[3] समस्तां प्राप्त रेखा विचित्रा ।
अवचितिं पडाति पूढें गेहभिंती धडाडां ।
उडाति अमुप काष्ठें तृण माड्या तडाडां ॥ ३ ॥

---

१ उंचवट्यावरून येणारी वाऱ्याची भोंवरी. २ तोंडांतून. ३ फुटाफूट झाली.

नर पशु वनिता ही लेंकुरें वांसुरेंसीं ।
नज गृहभुलि सैरा फीरती ग्रामवासी ।
नयनिं भरलि धूळी मार्ग तेणें दिसेना ।
फिरत पडत गर्त्तांमाजिं कित्तेक नाना ॥ ४ ॥
नयनिं पथ न लक्षे धुंद मोठा धुळोरा ।
अवगत गृह न भासे धूकटें भ्रांति सैरा ।
दिनकर समई ते भ्रांतनिभ्रांत जाला ।
न कळत रघुराजें स्वगृहामाजि नेला ॥ ५ ॥

## [ २२ ]

### ॥ क्षुधेचें श्लोकपंचक ॥

॥ श्रीराम ॥

क्षुधा लागली देह निःसत्त्व जालें । भ्रमें चित्त दुश्चित्तधामीं बुडालें ।
नये कां कृपा जानके बाळकाची । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ १ ॥
क्षुधापूर्णिमा पूर्ण निर्माण जाली । अदेही आळस्यें प्रभा रूढ केली ।
तेणें निःप्रभा आजि चंद्राननाची[2] । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ २
महापर्व हें प्राप्त होतां भस्यांनीं[1] । दयातीर्थे तेथें चि न्हावें निदानीं ।
क्षुधा हारणें अन्नदानें भुतांची । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ ३ ॥
कळाकाळिमा पावलीसे देहाला । बहु त्रासिलें जूंभकीं[3] या मुखाला ।
गळाली तनु सर्व माते दिनाची । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ ४ ॥
बरें जें तुला मानलें तें चि आतां । न टाकीं परी धैर्य मी प्राण जातां ।
नसे आस अन्यत्र कोण्हा जनाची । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ ५
न बोले प्रभूसीं तुझी निर्दया हे । मला गांजिलें फार तां आजि माये ।
जनीं रूढ तूं माय दीनाकराची । लिळा आजि निष्ठूर कां वो दयेची ॥ ६ ॥

१ खड्ड्यांत. २ मुखचंद्राची. ३ जांभईनें.

॥ श्रीराम ॥

चुरु चुरु चुरु चोखी जीवती ते गळांची ।
गळत घळघळाळां धार लाळामृताची ।
अहंसोहंगतिनादें चिंतनाचे तनाचे ।
दिनकरमन रामीं सर्वदा रंजलेंसे ॥ १ ॥

# [ २३ ]

## ॥ श्लोक अवतारदशक ॥

॥ श्रीराम ॥

॥ श्रीमच्छराम ॥

त्रिधी मूकला शंकशब्दें श्रुतीसी । भ्रमें व्यापला बाहला श्रीहरीसी ।
वधी मच्छरूपें स्वभक्तारि वेगीं । त्वरें दे श्रुती ब्रह्मया ते प्रसंगीं ॥ १ ॥

॥ श्रीकूर्मराम ॥

तळा चालिली हे धरा पापभारें । तधीं कूर्मरूपें धरी पृष्ठि धीरें ।
तेणें निश्चळा हे भुमी नित्य राहे । समस्तांसि संस्थापिता देव आहे ॥२॥

॥ श्रीवाराहराम ॥

धरेची घडी घे हिरण्याक्ष जेव्हां । दिनानाथ वाराह होऊनि तेव्हां ।
असूरांसि निर्दाळुनी सौख्यदानी । मना देव आहे स्वभक्ताभिमानी ॥३॥

॥ श्रीनृसिंहराम ॥

मुखें नाम प्रल्हाद घेतां पित्यानें । बहू त्रासिलें फार दुर्वासनेनें ।
तयाकरणें श्रीपती स्तंभवासी । विदारी नृसिंहाख्य तो दानवासी ॥ ४ ॥

॥ श्रीवामनराम ॥

छळीतां बळी निर्जरांलागि भारी । तधीं श्रीहरी वामनु ब्रह्मचारी ।
नटोनी बळी सप्तपाताळवासी । चिरंजीव तो सौख्य दे निर्जरांसी ॥५॥

१ देवांना.

॥ श्रीफरशराम ॥

धरेना धरे भार जैं फार जाला । हरीनें ऋषीचे[1] गृहीं वास केला ।
रिपू मर्दुनी दे मही ब्राह्मणासी । महाख्याति हे भार्गवें विप्रवौंशीं ॥ ६ ॥

॥ श्रीरामदाशरथी ॥

सुरेंद्रासि जैं घातलें बंदिशाळे । दिनानाथ तैं सूर्यवौंशासि आले ।
अरीनाशें विश्वासि दे सौख्य वेगें । चिरंजीव केले जनीं दास दोघे[2]॥७॥

॥ श्रीकृष्णराम ॥

लिळाविग्रही श्रीहरी सोमवंशीं[3] । रिपू त्रासणें रक्षणें पांडवांसी ।
अरीमित्रभावें समस्तांसि देवें । दिजे मुक्ति निर्व्याजभावें[4] स्वभावें ॥ ८ ॥

॥ श्रीबौद्धराम ॥

हरी लाघवी[5] वास बौद्धावतारीं । स्वयंबोध सावेव तो रूपधारी ।
अवस्ता असी तैं जनीं जाण भावें । करी जो जसा तो तसा सत्य पावे ॥९

॥ श्रीकल्कीराम ॥

पुढें म्लेंछनिर्वंशतेलागि पाहें । महाविष्णु तो कल्कि होणार आहे ।
स्वभक्तारि नाशावया देहधारी । दिनेशा प्रभु विष्णु तो निर्विकारी ॥१०

॥ अवतारदशक संपूर्ण ॥

---

## [ २४ ]

॥ श्रीराम ॥

उदासीन जो देव या भक्तकाजा । तया देवसें[6] कोण बोलेल वोजा ।
असे देव उदंड जे कामकारी[7] । जनीं फार ते वासनेचे भिकारी ॥ १ ॥

---

१ जमदग्नि ऋषीचे. २ बिभीषण व मारुती. ३ यादवकुळांत. ४ अहेतुकपणें. ५ नाटकी, किंवा मायाळु. ६ वास्तवीक पाहूं गेलें तर. ७ कामुक, भक्ताकडून कांहीं तरी मिळण्याची इच्छा करणारे.

बरा फोडिला नीट पाषाणगोटा । तया मर्दिला दाट सिंधूर घांटा[1] ।
बहू पुष्पमाळा पुढें पंचखाजें[2] । अनेकी पुजा कल्पनेच्या समाजें ॥ २ ॥
जत्या बोलती वाजती फार डांका[3] । पुढें घूमती रंडिका त्या अनेका ।
तेथें बोलती चंडिका माय आली । नमस्कार साष्टांग सर्वत्र घाली ॥३॥
पती स्वस्त्रियेचे पदीं शीर ठेवी । ह्मणे जननी कामना पूरवावीं ।
अती नम्रता देखतां दादल्याची । न बोले महागर्वसत्ता तियेची ॥ ४ ॥
अहेवा[4] सहेवा[5] बहु काकवंध्या[6] । नमस्कारिती विप्र तृष्णार्त्त मेधा ।
असें देखतां श्लाघ्यता थोर चित्तीं । अहंगर्व ताठा विशेषें विवर्त्ती ॥५॥
करा हातखोडे शिरीं घ्या भंळंदीं[9] । पदीं शंकळा[10] जीभ टोंचा निशब्दीं ।
गळीं पाठि टोंचूनि चाला राहाडीं[11] । इहीं अर्चनीं तोषवा माय चंडी ॥६॥
असें बोलतां रीझती लोक लंडी[12] । बधु[13] द्रव्य पुत्रार्थ आशाबरांडी[14] ।
असी लोधतां[15] प्राप्त सेखीं न सोडी । पुढें बोलती नाडिलें व्यर्थ रांडी ॥७
अविद्याभ्रमें लोक हे धुंद जाले । प्रपंचीं मि माझ्या सुखें लोधवीले ।
अवीचार तेणें जनीं रूढ जाला । जेणें सारवीचार लोपोनि ठेला ॥ ८ ॥
दिशा दाटल्या पूर्ण ज्याच्या स्वरूपें । जयामाजि ब्रह्मांडगोळे अमूपे ।
तया रामरूपासि कोण्ही पुसेना । कसे मोहिले भ्रांतिनें जीव नाना ॥९॥
फुलें पंचखाजें न लागेति पानें । पुजा फार सिंधूर कीं द्रव्य बोणें[16] ।
न याचूनि जो देव दीना न वंची[17] । दिनेशा असा येक जो राम तो चि ॥१०

---

१ मोठा पट्टा. २ पंचखाद्य. ३ भक्तीण घुमत असतांना त्यावेळीं तोंडानें जें गाणें ह्मणत असतात व वाद्यें वाजवितात तें. ४ अविधवा, सुवासिनी स्त्रिया. ५ त्या उलट ह्म० विधवा. ६ एकवार प्रसूति झाल्यानंतर पुन्हां गर्भधारणा न होणाऱ्या स्त्रिया. ७ योग्यता. ८ आगंतुक लक्षणें आंगीं येतात. ९ एका खापरांत चिंध्या व तेल घालून, पेटवून तें खापर डोक्यावर धरतात असें एक साधन. १० शृंखला. ११ राडी अथवा खाई. १२ भित्रे. १३ बद्ध. १४ आशाळभूत. १५ झोंवले असतां. १६ नैवेद्य. १७ फसवीत नाहीं.

## [ २५ ]

॥ श्रीराम ॥

### ॥ श्रीसिद्धेश्वरवंदन ॥

जगन्नाथ शंभू गिरिजाविळासी । जनीं चिंतितां जो भवाब्धीसि नाशी ।
जया चिंतनें चित्त सन्मार्गवासी । मना वंदि त्या नित्य सिद्धेश्वरासी ॥ १
जटाजूट वाहे शिरीं नित्य गंगा । जिचें नाम घेतां अघें जाति भंगा ।
कपाळीं[2] शशी शोभतो स्वप्रकाशीं । मना वंदि त्या नित्य सिद्धेश्वरासी ॥ २
उदेला जसा कोटि चंडांशमेळा[1] । सतेजें प्रभा तेवि पंचाननाला ।
वसे नीडळीं नेत्र[3] तो अग्निवेशीं । मना वंदि त्या नित्य सिद्धेश्वरासी ॥ ३
विषें कंठ नीळा धरी रुंडमाळा । वसे वामभागीं सदा शैलबाळा ।
बरें चर्चिलें भस्म सर्वांगवासीं । मना वंदि त्या नित्य सिद्धेश्वरासी ॥ ४ ॥
शरीरीं धरी सर्प कंदर्पशत्रु[4] । दशायूध हातीं तुळी भूतमित्रु ।
विराजे परीधान व्याघ्रांबरेंसीं । मना वंदि त्या नित्य सिद्धेश्वरासी ॥ ५ ॥

---

## [ २६ ]

॥ श्रीराम ॥

### ॥ श्रीरामकरुणा ॥

मी दीन तूझें हिन पापरूपी । अन्याय रामा मज सर्व सोपीं ।
पुढें असें मी न करी दयाळा । क्षमा करी सर्व दिवाकराला ॥ १॥
तूं जाणता अंतरहेतसाक्षी । तुजवीण हें कोण समस्त लक्षी ।
तुझी अशी सर्व अगाध लीळा । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ २ ॥
अगम्य तूझी करणी गमेना । चांडाळ मी रे मजला कळेना ।
प्रभू तुसीं गर्व बहूत केला । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ३ ॥

---

१ चंडांशु=सूर्य. २ कपाळावर. ३ तृतीय नेत्र. ४ मदनारि शंकर.
५ "याकारणें साधशील लीळा" पाठांतर.

विषयांध जालों पतनीं बुडालों । मायाविकारें अति धुंद केलों ।
तेणें गुणें अंतरलों पदाला । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ४ ॥
निरूपणीं सादर चित्त नाहीं । चिंतानदीचे पडिलों प्रवाहीं ।
तेणें न रूचे प्रभुगूणलीळा । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ५ ॥
नको नको रे जनसंग रामा । तूं तूटसी ज्या धरितां चि आह्मा ।
घडे बहु संगति ते कृपाळा । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ६ ॥
ज्याचेन संगें भवताप भंगे । ज्याचेन संगें निजरूप भोगे ।
ते संगतीचा प्रभु कोप केला । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ७
अध्यात्मसंस्थापन ही कळेना । मद गर्व ताठा सहसा शमेना ।
भावार्त तो ही न मने मनाला । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ८ ॥
येणें पदार्थें बहु हीन जालों । कुळाभिमानें प्रभु फुंजवीलों[1] ।
सन्मार्ग तो ही न रुचे जिवाला । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ ९ ॥
पतीत मी पावन तूं समर्था । दीनासि नाहीं तुजवीण त्राता ।
हें सर्व तूं जाणत स्वात्मलीळा । क्षमा करीं सर्व दिवाकराला ॥ १० ॥

---

## [ २७ ]

॥ श्रीराम ॥

जाला अन्याय मोठा विषयविषकुटा सेविला म्यां वरिष्ठा ।
तेणें योनी अचाटा प्रतिगमन कटों[2] दैन्य तो योग खोटा ।
जाणेना मी करंटा तवपदिं निकटा राहतां वीट मोठा ।
तो वारीं शीघ्र ताठा दिनकरप्रभु तूं रामचंद्रा वरिष्ठा ।
माता माता ह्मणावी परवधु बरवी अर्थआशा त्यजावी ।
दुर्बुद्धी ते नसावी हिनकुळपदवी साधुनिंदा हरावी ।
श्रीरामीं वृत्ति द्यावी अहितगति जिवीं शीघ्र सोडूनि द्यावी ।
सत्कीर्ती वाढवावी दिनकरपदवी रामरूपीं स्वभावीं ॥ २ ॥

---

१ गर्व केला. २ अरेरे !

[ २८ ]

॥ श्रीराम ॥

टकमक नयनाला लागली रामरूपीं । पवनमनन चाले स्थीर मोपीत मापीं ।
अचळगति तनूची साजिरी सर्वभावें । दिनकररुप रामीं रामरूप स्वभावें ॥

---

॥ श्रीराम ॥

लोकीकीं घात होतां जिवलग मरतां दुःखशोकीं पडावें ।
संसारीं चर्फडावें तडफड करितां बोंबलावें रडावें ।
हाहा हाहा ह्मणावें ह्रदयकरकमळीं तोंड हाणोनि घ्यावें ।
मेले ते व्यर्थ गेले तळमळित पुढें ऊचलावें चलावें ॥ १ ॥

---

[ २९ ]

॥ श्रीराम ॥

रघुपति मति माझी संगडोहीं बुडाली ।
त्रयमदमगरीं ते शीघ्र वोढूनि नेली ।
सुखदुख कटकपाटीं सांठवीलें समर्था ।
भ्रमगति झकवीलों धांव रे धांव आतां ॥ १ ॥
पतित उदितें जालों पाव तूं पावना रे ।
त्यजुनि भजनजाळें साधि वेगीं मिनां रे ।
विघडि ह्रदय कपाटें लाउनी वृत्तिटांकी ।
दिनपाति ह्मणवीता लागलें आपणां कीं ॥ २ ॥

---

१ मदत्रय=विद्यामद, धनमद व कुलमद. २ प्रारब्धरूपी कपाटांत. ३ भूल पडली. ४ उत्कंठित. ५ मच्छरूपी मला. ६ वृत्तिरुप किंकरें लाऊन.

विनवितों रघुराया नीरसीं मोहमाया ।
तुजविण सुखछाया कोण दासां कराया ।
जननि जनक धायो जाण माईक माया ।
विकळ सकळ काया प्राण जाईल वायां ॥ ३ ॥
बहुविध भववेथा सोसवेना समर्था ।
बहुविध गुणगाथा कोण वारील आतां ।
बहुविध बहु आहे जाण सज्ञान माये ।
तुजविण करुणा हे काय जाणेल धाये ॥ ४ ॥
अगणित गणवेना वेदशास्त्रां पुराणा ।
तव गुणमहिमा ते केवि वर्णेल दीना ।
दिनजनकरुणेच्या धावण्या धांवतोसी ।
ह्मणुनि दिनकराच्या धीर आहे मनासी ॥ ५ ॥

---

## [ ३० ]

॥ श्रीराम ॥

सजन सुगमपंथें पावती पाय तूझे ।
विजन सुखविलासें माजती मोक्षमाजें ।
जनिं वनिं विजनीं ते कीर्तिरूपें चि ज्याले ।
रघुपति हिन माझें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ १ ॥
न कळे न कळे नेणे भक्ति तूझी विशाळा ।
न कळे न कळे नेणे मुक्ति तूझी दयाळा ।
न कळे न कळे नेणे मुक्ति चित्तें गर्योळें ।
रघुपति मुढ माझें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ २ ॥

---

१ धात्री ह्मणजे दाई. २ हें ' चित्ता ' चें विशेषण, वेडें, मूर्ख.

बहुविध भजनाच्या भावना त्या न जाणे ।
बहुविध सजनाच्या भक्तिपंथासि नेणे ।
बहुविध विजनाच्या धारणा सर्व भूले ।
रघुपति जड माझें जन्म हें व्यर्थ गेलें ॥ ३ ॥

परम कृपणचित्तें वित्त संचीत केलें । परतरपरमार्गी लागतां दुख जालें ।
अनुभरि स्वहितार्थी देह कैसें न वोळे । रघुपति क्रुर माझें जन्म हें व्यर्थ गेलें ॥

रघुपति तुझें नामीं तो हि विश्वास नाहीं ।
रघुपति तुझे ध्यानीं चित्त दुश्चीत पाहीं ।
परि दिनकर तूझें हें चि पैं वर्म जालें ।
रघुपति मग तेव्हां काय पां व्यर्थ गेलें ॥ ५ ॥

---

## [ ३१ ]

### ॥ श्रीराम ॥

दिनकरकुळचंद्रा चेयारुनेत्रा पवित्रा ।
अति सुलेलितगात्रा ख्यातविख्यातगोत्रा ।
शशिधरप्रितिपात्रा पूर्णयिंदुवगत्रा ।
दिनकरमुळमंत्रा वेदवेद्या परत्रा ॥ १ ॥

---

### ॥ श्रीराम ॥

दिनकरकुळभद्रा राजसा रामभद्रा । दिनकरकुळचंद्रा राजसा रामचंद्रा ।
दिनकरकुळकीर्ती राजसा रामकीर्ती । दिनकरकुळमूर्ती राजसा राममूर्ती ॥

---

१ चारु=उत्तम. २ सुंदर. ३ शंकराची ज्यावर प्रीति आहे अशा रामा. ४ पूर्णचंद्राप्रमाणें स्वच्छ मुख ज्याचें आहे अशा रामा. ५ भद्र=शुभ, मंगलकारक.

## [ ३२ ]

### श्लोक स्वतंत्र

॥ श्रीराम ॥

परांगनेचा अभिलाषकारी । कैंचे तयाला पुरुषार्थ चाऱ्ही ।
भारें धरा हे अध जांव[1] पाहे । रजस्वला नांव जसी न साहे ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

अघटित घडताहे सिंधु पाषाण वाहे ।
कनकनगर जालें दग्ध हें चित्र पाहें ।
वनचर रजनीशा जिंकिती शब्दपैजा ।
त्वरित दशमुखा तूं वोळगें रामराजा ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

रजनिचरवरा[2] त्या राघवें काय केलें ।
हरुनि परवधु हें व्यर्थ कां वैर आलें ।
रघुपति तुज जाला सैंवरीं प्राणदाता ।
शिव शिव शिव सीता हे तुझी सत्य माता ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

जनकवधविलोकें क्षोभला अर्जुनारी ।
नृप सकळ इळेचे वेळवेळां विदारी ।
धनुषमद तयाचा राघवें दूरि केला ।
तदुपरि प्रतियोद्धा कोण आहे तेयाला ॥ १ ॥

१ जाऊं. २ सर्व राक्षसांमध्यें श्रेष्ठ अशा रावणा.

## [ ३३ ]

॥ श्रीराम ॥

निगमविधिविधाना । रामनामाभिधाना ।
सुरवरवरदानीं । पाव आह्मा निदानीं ।
अगणित तव सीमा । कोण जाणे निसीमा ।
तुजविण शरपाणी । सौख्य नेणों सुपाणी ॥ १ ॥
मुनिजनमनमित्रा । त्रासिसी तूं अमित्रां ।
परतर परतंत्रा । आद्यआद्या स्वतंत्रा ।
निजसुखगतिरोधा । दुर्निवारावरोधा ।
अपरपरविधाना । भक्तध्यानावधाना ॥ २ ॥
नगपतिदुहितेचा[१] कांत ध्यातां विटेना ।
निजहितसुखनिष्ठा लागली ते सुटेना ।
परम विशम वेथा[२] भंगली नाममात्रें ।
दिनकर ह्मणे गावीं ऐसियाचीं चरित्रें ॥ ३ ॥

---

## [ ३४ ]

॥ श्रीराम ॥

॥ वृद्धावस्था ॥

चळचाळित चळाळां कांपती हातपाये ।
फळफळित फळाळां मूत्रनीरोध नव्हे ।
भरभरित भरारां राशि नेटें भरारीं ।
दिनकर ह्मणे सेखीं सर्व काया थरारी ॥ १ ॥

---

१ हिमालयाची मुलगी जी पार्वती, तिचा. २ हलाहल विष प्यालयामुळें झालेला दाह.

घळघळित घळाळां लाळ तोंडीं घळाळी ।
भळभळित भळाळां वाहती नाकनाळीं ।
पचपच जळ नेत्रीं वाहतां धीर नाहीं ।
तर्‍हि हि दिनकरा तो न स्मरे राम पाहीं ॥ २ ॥
तरतर विषयांची सोडि खोटी जगेना ।
भरभर करि रामीं देह प्रांति तगेना ।
फरफर करिं अंतीं काळ वोढील जेव्हां ।
दिनकर ह्मणे कोण्ही येतिना तूज तेव्हां ॥ ३ ॥
मरण दुरि दुर्‍हावें येइना लागवेगें ।
गळित शरिरशक्ति निंदिती आप्तवर्गे ।
अगणित दुख तेव्हां जाण निश्चीत बापा ।
ह्मणोनि दिनकरा तो राम राम स्मरें पां ॥ ४ ॥

---

## [ ३५ ]

॥ श्रीराम ॥

बहुत कठिण दीसे चित्त तुझें सुजाणा ।
हृदय तडके माझें दुःख हें काय नेणा ।
धरुनि तुजनिमित्यें प्राण हा ठेविलासे ।
झडकरि गुणराशी तोडि निर्वाणफांसे[1] ॥ १ ॥
कठिण दिवस गेले फार तूझ्या वियोगें ।
घडिघडि अविचारीं चित्त माझें उपांगे ।
निशिदिनें किति आतां धीर स्वामी धरावा ।
जरि न ये करुणा तैं जीव लागेल द्यावा ॥ २ ॥
अझुनि तर्‍हि सुजाणा जाणणें दुःख माझें ।
वय गत न ये पूढें काय दुश्चीत तूझें ।
सकळ त्यजुनि धंदा येकदां येथ यावें ।
नयनिं नयनभेटि देउनी शीघ्र जावें ॥ ३ ॥

---

१ अंतसमयींचे यमाचे पाश.

मजप्रति निकराचीं उत्तरें काय देणें ।
त्यजुनि दिन विदेशीं राहणें कोण जीणें ।
कवण मिनलि नेणें सुंदरा अप्सरासी ।
ह्मणउनि मज नाथें सोडिलें ये प्रवासिं ॥ ४ ॥
नयनिं सुचिर पत्रा देखतां स्थीर होणें ।
जरि तुज मम नाथा तो चि विश्वास देणें ।
तरि मग सुख जीवा तें चि शोधीन पाहें ।
समज विशद वार्ता भाष नेमस्त आहे ॥ ५ ॥

---

## [ ३६ ]

## करुणापर श्लोक

### श्रीराम

जाते घडी ते न दिसे पुढें रे । गवाविला काळ वृथा मुढा रे ।
आतां तऱ्ही सावध होय वेगीं । स्मरें जया जानकि वामभागीं ॥ १ ॥
नको करूं अंतरिं खेद कांहीं । होणार जें सादर तें चि पाहीं ।
चिंतार्णवीं कां पडणें सुजाणा । करील तें होइल रामराणा ॥ २ ॥
त्रिताप संताप अमूप पापें । मी तापलों पाव कृपाप्रतापें ।
पाहें मला सिंधुसुता कटाक्षें । मानीन दुःखें सकळें अलक्षें ॥ ३ ॥
जो दीसतो रे भ्रमतां चि गेला । संदेह देहीं अति रूढ जाला ।
बळावली बुद्धि अहंपणाची । वार्ता बुडाली प्रभु तूंराणाची ॥ ४ ॥
सोहं चिदानंद परात्रिचा मी । तो कां भ्रमे निभ्रमसा सकामी ।
अहंपणें नाथ अनाथ जालों । अनेक जन्मांतर घेत मेलों ॥ ५ ॥
कित्तेक जन्में घुसिदर्दुरांचीं[1] । कित्तेक ते मुंगसमार्जरांचीं ।
कित्तेक श्वानेंगजकेशरींचीं । मी पावलों स्वामिस नेणतां चि ॥ ६ ॥
अनेक जन्में खगरासभांचीं । विंचूपिसाढेंकुणगांधिलांचीं ।
गोंबीं अळी जंबुक मर्कटांचीं । मी पावलों स्वामिस नेणतां चि ॥ ७ ॥

---

1 दर्दुर=बेडूक.

बहूत जन्में तरु सर्प रामा । इष्टा किडे होउनि सेविली म्यां ।
अनेक संख्या न गणे जयांची । मी पावलों स्वामिस नेणतां चि ॥८॥
या च्यारि खाणी प्रति च्यारि वाणी । चौऱ्यासि लक्ष्यांतर सौख्ययोनी ।
या भोगितां कोण दशा सुखाची । मी पावलों स्वामिस नेणतां चि ॥९॥
न बोलवेसा अपराध जाला । तेणें गुणें अंतरलों पदाला ।
दिवाकरा सादरता प्रपंचीं । मी पावलों स्वामिस नेणतां चि ॥ १० ॥

---

## [ ३७ ]

॥ श्रीराम ॥

पतीत रामा हिन मी विकारी । भ्रमिस्त नानापरि छंदकारी ।
धेरा तळा चालिलि पापभारें । मारूनियां टाकिसिना चि कां रे ॥ १ ॥
अहंपणें राक्षस मी दयाळा । निंदीतसें भक्तमुनीजनाला ।
लीळावतारें जन रक्षिसी तूं । मारूनियां टाकिसिना मला तूं ॥ २ ॥
तूं आपुल्यांचा प्रतिपक्षकारी । त्यांचेनि दुःखें सिणतोसि भारी ।
नाना प्रकारें धरिसी स्वरूपें । विदारिसी दैत्यकुळें प्रतापें ॥ ३ ॥
चतुर्मुखालागुनि मच्छ होसी । कूर्मस्वरूपें धरिसी महीसी ।
हिरण्यचक्षूसि वधूनि देवा । वाराहरूपें हरिसी अभावा ॥ ४ ॥
नृसिंहदैत्यात्मजरक्षणासी । अचेत खांबीं प्रभु चेतलासी ।
सुरेश्वरालागुनि वामनाचें । स्वरूप होसी बळिदंडनाचें ॥ ५ ॥
तूं रेणुकेचा प्रतिपक्षकारी । तीकारणें भार्गव ब्रह्मचारी ।
देवद्विजां साह्य तुं राम होसी । कृष्णावतारें यदुवंश वेसी ॥ ६ ॥
कळीयुगीं बोध सुबध्द देवा । तूं सज्जनाचा करिसी कुढावा ।
वर्णाश्रमा रक्षण कल्कि आतां । होसील साकार पुढें अनंता ॥ ७ ॥

---

१ वास्तविक दुःखयोनी असें पाहिजे. हा विरोधी शब्दप्रयोग आहे. २ पृथ्वी. ३ हिरण्याक्ष दैत्यास. ४ नास्तिक्यबुद्धीस. ५ हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद याच्या संरक्षणाकरितां. ६ इंद्राचें भय निवारण्याकरितां. ७ रक्षण,

ये ये रितीं भाविक भावनेचें। स्वरूप घेसी प्रभु आवडीचें।
न पाहसी सार असार कांहीं। भुलोनि भावें पडसी प्रवाहीं॥ ८॥
सोसूनि त्यांचीं सकळें अरिष्टें। निर्दाळिसी दैत्यकुळें अचाटें।
रामा पदीं सज्जनरक्षणाचें। अखंड चाले ब्रिद वैभवाचें॥ ९॥
तें ब्रीद साचें तरि देवदेवा। विदारिसी राक्षसदेहभावा[1]।
नाहीं तरी हें अवघें चि खोटें। दिवाकरा वाटत ऊफराटें॥ १०॥

---

## [ ३८ ]

॥ श्रीराम ॥

### संसारभोग

संसारभोग भवरोग जनासि लावी। हें जाणते जन जन्ही तन्हि तें चि भावी।
संपूर्ण तृप्ति न घडे लुलु[2] वीषयांची। श्रीरामचंद्रभजनेविण नर्क ची ची॥१॥
संसार सार असतां तरि वीतरागी। कां सोडिते सुखविलासपदा सवेगीं।
नाना गुहादरकुव्याप्रति रीघते कां। सोडूनि अन्न धन वैभव टीकते कां॥२॥
संसार दुस्तर असे बहुता प्रकारें। याकारणें विधिहरादिक निर्विकारें।
नानापरी परसुखाश्रय चोजवीती। तेथें किती मनुज वित्पति माजवीती ॥३
दुर्योधनादिक दशग्रिव[3] गर्वराशी। गेले असे चहुंयुगीं बहुसे निराशी।
त्यांच्या गती वदत शास्त्र बहू पुराणें। तें ऐकतां चि मुनि आदरिताति रानें॥
गेले असंख्य सुख वैभव राज्य दारा। सोडून देश सदनें धन गर्वगारा[4]।
होऊनि लीन भजती परमार्थ पंथें। श्रीराम राम स्मरतां भय कोण तेथें॥५॥

माता पिता सुहृद बंधु सखे स्वदारा।
कांहीं अयुक्त घडतां करिती विदारा।
अंतासि कोण करि साह्य असें पहावें।
ऊगें चि तल्लिन कसें विषयांसि व्हावें॥ ६॥

---

१ आमच्यामध्यें जे राक्षसांच्या अंगचे गुण (दुर्गण) आहेत ते नाहींसे कर.
२ आवड. ३ रावण. ४ गार=खांच, खळगा.

देखोनि वैभव समस्त हि आप्त होती ।
लाऊनि आप्तपण भोंदुन सौख्य घेती ।
कांहीं अकल्पित दशा जरि हीन जाली ।
जाती पळोनि मग ते दुरि वेगळाली ॥ ७ ॥

सर्वत्र वैभवसखीं उमजें मुढा रे । पाहें स्वहीत गधड्या देहेबुद्धीच्या रे ।
वार्धक्य येइल पुढें मग हीत कैंचें । तारुण्यदेह करिं सार्थक तों देहाचें ॥८॥

जातील नेत्र मग पाहसि राम कैसा ।
जातील कान मग ऐकसि राम कैसा ।
जातील हात मग पूजिसी राम कैसा ।
जों स्वस्थ देह तंव तूं भज जानकीशा ॥ ९ ॥
आतां असो बहुतसें मज बोलवेना ।
सर्वस्व सोडूनि भजा करुणानिधाना ।
त्यावीण तों दिनकरा जनिं सौख्य कैंचें ।
श्रीरामदास्य करितां हित चौदेहांचें ॥ १० ॥

---

## [ ३९ ]

### सद्गुरुकृपा

॥ श्रीरामकर्ता ॥

स्वसूख माझें मज चोजवीतां[१] । कौतूक जालें वदों काय आतां ।
न बोलवे तें परि आठवातें[२] । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ १ ॥
ते धन्य जे सद्गुरुदास्य भावें । सदां मनीं तृप्त सुखस्वभावें ।
न देखती द्वैत निरंतरातें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ २ ॥
क्षमेसि थारा न करी च कोण्ही । ते हिंडतां कष्टलि दैन्यवाणी ।
तोषूनि ते आणिलि आश्रमातें[३] । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ३ ॥
हें विश्व नानापरि भिन्नवेषें । नांदे स्वभेदें त्रिगुणप्रकाशें ।
ऐक्यासि आणी स्वरुपें तयातें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ४ ॥

---

१ जाणवितां. २ आठवतें. ३ त्या क्षमेला आपल्या अंतःकरणांत आनंदानें थारा दिला.

शांतीस कोण्ही न वरीत देहीं । दयेसि कंटाळति सर्व पाहीं ।
त्या आणिल्या सोडुनि लोकिकातें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ५ ॥
वैराग्य ज्याचे घरिं दास रावे । नैराशतादासि न जाय थांबे ।
सद्भक्ति दे वीजनवारियातें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ६ ॥
प्रबोध तो तन्मय छत्रधारी । विवेक तो सार निसार वारी ।
सायुज्यता नाचत आळवीते । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ७ ॥
त्रितापदावानळ तप्त पोळी । त्याकारणें ज्ञान उदास[1]जाळीं ।
विज्ञान तें वारित वीजनातें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ८ ॥
संतुष्टता सांगत गुह्य गोष्टी । तल्लीनता भिन्नपणा समेष्टी[2] ।
अभिन्नता चाळितसे विधीतें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ ९ ॥
कौतूक हें दीनकरा स्वदेहीं । जीतां जिवें देहविदेह नाहीं ।
अपूर्व पूर्वाहुन नीज जें तें । ऐसी कृपा सद्गुरुची जयांतें ॥ १० ॥

**श्रीराम**

रामेंविना जे घडि जात बापा । ते तूज कोठें मग सांपडे पां ।
ह्मणोनियां सावध राम घेणें । पाल्यासि पातें न लगों चि देणें ॥ १ ॥
रामेंविना बोलसि बोल कोडें । फळेंविना ते जसिं वांझ झाडें ।
तैसेंपरी देह अभाविकाचें । जन्मोनि जालें भुमिभार सां[3]चें ॥ २ ॥

---

## [ ४० ]

॥ श्रीराम ॥

### सवाई[4] वृत्त

रामरमापतिसें स्मरतां तुटे जन्म समूळ विकारविलासी ।
शांत दशा अंवगे निज मानस होय सुखोदित मोक्षनिवासी ।
काम अकाम शमे मद मान समान जनींवनिं सर्व उदासी ।
नाम सुधारस सेविति त्यां गति होइल दीनकरा विजनेंसीं ॥ १ ॥

---

१ त्या तापाचा उपसर्ग न व्हावा ह्मणून ज्ञान हें आपणास वैराग्यरूपीं थंड जाळींत नेऊन बसवितें. २ एकत्र करते. ३ श्लोक अपूर्ण दिसतात; मुळांत पुढें निरनिराळे श्लोक लागले आहेत. ४ भासते.

झांकुनि नेत्र उगे चि कसे जन भुलले दुर्भर दुस्तर कामें ।
मी मम भूवन कामिनि कांचन बंधु सुता सुत नेमित नेमें ।
आमिश गीळित मीन परी गळ अंतर फोडिल हें न गमे ।
दीन दिवाकर स्वामि सितावर सांडिति त्यागति सादर येमे ॥ २ ॥
परकामिन ते जननी ह्मणसी परद्रव्य सरी वमनी धरिसी ।
परभूशण दूशणसें वरिसी परसंग निसंगसमें तुळिसी ।
परआर्त्त निरार्त्त कसें गणिसी परशब्द निशब्द तुकें तुकिसी ।
तरि वस्तु परात्पर तूं चि दिनेश कीं काय मना दुसरें ह्मणसी ॥३॥
इंदुकळा निडळीं विलसे शिरिं शोभत कीरिटि तेजप्रकाशें ।
करिं अंकुश मोदक पद्म कुठार तुळी कटिं व्याळ[1] विराजतसे ।
मूषकवाहन सिंधुरचर्चन माळ गळां वरि शोभतसे ।
वंदुनि तो चि गणेंद्र दिवाकर मागतसे वर सार वदेसें ॥ ४ ॥
जय जननी[2] वदनीं प्रकटें वद सार विचार सुधारस जैसा ।
संशयकिंतु पडे श्रवणीं अति दुर्धर शब्द न उद्भवि तैसा ।
रंजति सज्जन सेविति दुर्जन ज्ञानविरक्तिप्रकाशित ऐसा ।
शब्दप्रबंद वदे तुं सरस्वति वंदि दिवाकर प्राकृतभाषा ॥ ५ ॥
द्वंदनिकंदन पूर्ण सनातन श्रीगुरु हें अभिधान जिवाचें ।
नामरुपातित जें रुप अंतरिं गोचर होय कृपेन जयाचे ।
तें रुप वैखरिनें स्तविजे तरि कुंठित स्पर्श न जेथ परेचे ।
सर्व असो पदिं मस्तक ठेउनि वंदि दिवाकर सार सुखाचें ॥ ६ ॥
निर्गुण जो न गणे गुणिं तो गणितां चि गुणा सगुणा कसितो ।
आग्रह सांडुनि श्रीगुरुतें भज निर्गुण तो सगुणा करितो ।
हे चि कळा अकळा प्रभुची निज येकपदीं सकळां धरितो ।
धन्य हो धन्य जे श्रीगुरुअंकित दीन दिवाकर विस्मित होतो ॥ ७ ॥

---

१ सर्प. २ वाग्देवी.

## [ ४१ ]

### चंपकमालावृत्त

॥ श्रीराम ॥

देवकळा अकळा सकळांला । जोंलि असे लिन जे विषयांला ।
ते मुढ रौरव भोगविलासीं । प्राप्त चिरंतन तें पद त्यांसी ॥ १ ॥
कोण कसी मति येईल चित्तीं । होइल कोण दशा मग अंतीं ।
तें न कळे रतिकांतविलासीं । सोडुनि राम कसा भुललासी ॥ २ ॥
पावन जो नरदेह सुजाणा । रामपदीं करिं सादरवाणा ।
तो सुखदायक तों हिन केला । धन्य रे धन्य तुझे जननीला ॥ ३ ॥
रत्नमणी कवडीसम गेला । तेवि नृदेह प्रपंचलिनाला ।
सारविचार जयासि कळेना । तो जड जीव जनीं खळवाणा ॥ ४ ॥
ना न ह्मणा स्मरतां सुखदानी । सज्जनभूषण जो शरपाणी ।
तो रघुराज दिवाकरस्वामी । तारिल ठेविल रे निजधामीं ॥ ५ ॥

---

## [ ४२ ]

॥ श्रीराम ॥

धूसर गंध बुके उडतां । मनिं तोष कसा गगनापरता ।
कोपसि कां धरणीधुळि येतां । सांडि मनींहुन या गुणलत्ता ॥ १ ॥
कामिनि द्रव्य पदार्थ मनांतुन । आवडती परि सुटसी कैसा ।
दीनदयाळ रघूत्तम स्वामी । सोडुनियां भ्रमसी मदऊर्मीं ॥ २ ॥
काळ कराळ भयंकर आहे । दुर्जन गंजन जो क्रुर पाहें ।
दुर्धर तो बहु येइल जेंव्हां । सोडवि कोण बळी तुज तेंव्हां ॥ ३ ॥

---

१ कर्ता 'देवकळा' २ त्वां, तूं.

[ ४३ ]

॥ श्रीराम ॥

द्रव्यमदें प्रमदामद भावी । गर्वित घोर सत्ता बळ दावी ।
शब्द वदे अति कर्कशवाणे । पापि पुरातन तो खळ जाणें ॥ १ ॥
दुर्धर हा भवसागर खोटा । केवि तुला तरवेल सुनाटा ।
मोहित मोहबळें हित नेलें । सार्थक सर्व समूळ बुडालें ॥ २ ॥
हेमवधूरत[1] चित्त सुटेना । लौकिक गौरव तो हि घटेना ।
जेवि भुले मिन आमिषगोडीं । तें न कळे गळ साधक वोढी ॥ ३ ॥
भवसागरिं तेवि नृदेह मिनाला । साधक काळ तो शोधित आला ।
मोहगळीं विषयामिष तोंडीं । लाउनियां ममतारज्जु वोढी ॥ ४ ॥
ते समईं बळ केवि सुजाणा । होसिल मोहगळें दिनवाणा ।
जाणोनि हें न पडे गळवोढीं । सोडिं दिवाकरस्वामिस जोडीं ॥ ५ ॥

[ ४४ ]

श्रीराम

जो रघुराज कृतांतविदारी । सज्जनतारक जो सुखकारी ।
तो त्यजिला रतिकामविलासें । देखोनि नर्कगुहा भुललासे ॥ १ ॥
नर्कभरींव हें वोंगळवाणें । कामिनीदेह नरंगळ जाण ।
हास्यविनोद क्रिडा रत त्यासी । धन्य असा सुत ते जननीसी ॥ २ ॥
दैन्यदशा पतिहीन वधूला । ते चि दशा कि अभक्त जनाला ।
सूतकिसे दिसती हिन पापी । जे विटले रघुराजस्वरूपीं ॥ ३ ॥
जानकिनाथ स्मरारि[2] स्मरे रे । अंतरूपविलासभरें रे ।
तो दिनबंधु मुढा मग कोठें । भूलसि कां नरदेहकचाटें ॥ ४ ॥
सोडुनि सर्व प्रपंचविलासा । पाहें रे जानकिनायक कैसा ।
त्याविण दीनकरा सुख खोटें । भोगिति भार धरेसि[3] सुनाटें ॥ ५ ॥

---

१ कनक व कांता यांत रमलेलें ( गुरफटलेलें ). २ शंकर. ३ पृथ्वीला.

## [ ४५ ]

॥ श्रीराम ॥

### श्रीदिनकरांचें आर्त चित्त

काय करूं रमणा रमवेना । चित्त विहीतपदीं लिगटेना[1] ।
पामर किंकर धीर धरींना । काय किजे तुमजे प्रभुराणा ॥ १ ॥
या विषयांभिणें[2] कांहिं घडेना । सारविचार कसा उमजेना ।
स्थीर समीर नव्हे पळ कोठें । चंचळ तेवि मनोमति लोटे ॥ २ ॥
चंचळ निश्चळ केवि करावें । साधुनि साध्य कसें परि ध्यावें ।
जेथिल तेथ कसें निवसावें । स्वस्वरुपीं मन कोठें जडावें ॥ ३ ॥
अव्यय अक्षर जें रुप स्वामी । तें कधिं होइल हे मनऊर्मी ।
ऊठतसे मन कोठुनि देवा । बोध त्वरेनें दिनासि करावा ॥ ४ ॥
ठेउनि मस्तक श्रीपदिं भावें । स्वामिनें बाळ सनाथ करावें ।
ऐकोनि हास्य करी प्रभुराजा । दीनकरा शिरिं हा कर माझा ॥ ५ ॥

---

## [ ४६ ]

॥ श्रीराम ॥

### श्रीसमर्थांचा अनुग्रह

बोधुनि बोध प्रबोधनमार्गें[3] । ठेवित वामकरा शिरिं वेगें ।
विप्रकुलक्रमकर्म करावें । रामउपासन चित्तिं धरावें ॥ १ ॥
तत्त्वमसीसें प्रतिष्ठुनि दिल्हें । निर्सुनि देह निसंदेह केलें ।
कर्म उपासन ज्ञान निजांचें । साधन नित्य अखंड परेचें ॥ २ ॥
जागृति येउनि जों पुढें पाहे । दीप असे परि मूर्ति न लाहे ।
विस्मय तो येक राघव जाणे । मूढ मतीहिन कांहिं न जाणे ॥ ३ ॥
शालिवाहान शके पंधरासें । श्याहात्तरी प्रद फाल्गुनमासे ।
पूर्ण हुताशनिचे निशिसंधीं । स्वप्नदशेप्रति प्राप्त समाधी ॥ ४ ॥

---

१ लागेना. २ विषयांच्या भीतीनें. ३ सांप्रदायाच्या उपदेशपद्धतीनें ४ स्वानुभवदिनकर, कलाप १६ किरण ४ पहा.

दिनकरा तधिं हे स्थिति जाली। स्वामिनें स्वप्रदेशें रुढ केली।
गुप्त पुढें प्रकटार्थ निघाली। सन्यकरें रामदासिं जियाली[1] ॥ ५ ॥

## [ ४७ ]

### प्रमाणिकावृत्त

॥ श्रीराम ॥

अखंड सावधान रे। प्रपंच हा तुफान रे।
नको भ्रमिस्त मानसीं। वृथा चि काय नाडसी ॥ १ ॥
विवेक घे परोपरीं। विचार सार विवरीं।
भजें अनंत व्यापका। त्यजीं विचार जो फिका ॥ २ ॥
नियंतें[2] अंत ज्या नसे। जनावनांत जो वसे।
नसे असा तसा हरी। विचारितां जिवांतरीं ॥ ३ ॥
नृदेह सार लाधलें। जेणें स्वहीत सोडिलें।
तयासि येमयातना। पदोपदीं क्षणक्षणा ॥ ४ ॥
स्वहीत रामचिंतनें। घडे बरें विचारणें।
दिवाकरा प्रचीत रे। श्रीराम मोक्षधाम रे ॥ ५ ॥

## [ ४८ ]

॥ श्रीराम ॥

विकल्प हा उकाव्रतो। सुजाण लोक नाडतो।
बहुत जाड वाढतो। विवेक त्यासि भक्षितो ॥ १ ॥
असा विवेक तो धरा। प्रमाणप्रत्ययो वरा[3]।
स्वरूपधारणा बरी। घडेल कीं तद्रूपरी ॥ २ ॥
सरेल देहभाव रे। शमेल द्वैतबुद्धि रे।
हरे त्रितापयातना। विचारितां निरंजना ॥ ३ ॥

---

१ जीवविली, जीवन दिलें. २ नियत, अखंड, निरंतर. ३ प्राप्त करून घ्या.

सतंत संत संत तो । निग्रंत अंत नाशितो ।
जनीं वनीं उदास तो । स्वरूपवास लक्षितो ॥ ४ ॥
दिवाकराशिरीं करु । जधीं धरील सद्गुरु ।
तधीं जिवासि हे दशा । गळे बळें अहंनिशा ॥ ५ ॥

---

## [ ४९ ]

### ॥ श्रीराम ॥

विचारवंत संत हो । समस्त भाग्यवंत हो ।
तुह्मांस वीनती त्वरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ ॥ १ ॥
तुह्मासमान योग्यता । नसे अशी सभाग्यता ।
ह्मणौनि सांगतों बरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ २ ॥
अपाय फार ये युगीं । नसे उपाय तो जगीं ।
उगे चि काय निस्तुरे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ३ ॥
शिवासि लागली संवे[1] । महाविषाग्नि तो निवे ।
तसे चि सर्व आदरें । स्मरा श्रीराम राम रे ॥ ४ ॥
तपोधनासि आवडे । अनू[2] दुजें तें नावडे ।
स्वहीतमूळ हें चि रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ५ ॥
स्वहीतसें करावयां । दुजें नसे तरावया ।
भवार्णवीं विशेष रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ६ ॥
मतिभ्रमासि वारिता । नसे असा विचारितां[3] ।
समर्थ मोक्षधाम रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ७ ॥
बहुत क्लेशकारकें । तपें वयासि हारकें ।
सिणों नका उगे चि रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ८ ॥
कितेक निग्रही जनें । वृथा अटव्यसेवनें ।
श्रमासि थार होत रे । स्मरा श्रीराम राम रे ॥ ९ ॥

---

१ संवय. २ अन्य. ३ विचार केला असतां.

हिमाग्नि धूम्रपान रे । भुगर्भशून्यवास रे ।
ह्मणे दिनेश व्यर्थ रे । स्मरा श्रीरामं राम रे ॥ १० ॥

---

[ ५० ]

॥ श्रीराम ॥

## त्रुटित श्लोक

जेथें नसे संगति सज्जनाची । तये गृहीं राघवभक्ति कैंची ।
वृथा जळो संपति त्या मुढांची । जेथें नसे संगति सद्गुरूची ॥ १ ॥
विश्वास तेथें अणुमात्र नाहीं । तृष्णानदीचे पडले प्रवाहीं ।
सीमा तुलंघे हिन संशयाची । जेथें नसे संगति सद्गुरूची ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥

घडि घडि रसनेनें रामपीयूष घ्या रे ।
प्रतिदिन हिन गोष्टी सर्व सोडूनि द्या रे ।
परम कठिण आहे काळ विक्राळवाणा ।
छळिल बहुत तो रे प्रांतेवेळे सुजाणा ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

यंत्रें टाळ मृदांग श्रुतिमिळणीं मीळोनियां जातुसे ।
दासांचा समुदाय भावगजरें रंगीं उभा ठातुसे ।
माळा हार अपार दिव्य सुमनें गुंफूनियां आदरें ।
गंधें कुंकुम केशरें सुखकरें दिव्यांबरें धूंशरें ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

अचतुर नर कां हो व्यर्थ जन्मासि आला ।
परमहिन मुढाचा पृथ्विये भारु जाला ।
अचळ पद कळेना रामरूपीं मिळेना ।
सबळ मद गळेना वृत्ति ते ही वळेना ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

करकर न करावी प्रीति रामीं धरावी ।
गरगर फिरवी ते वासना वीसरावी ।

---

१ गुहेंत जाऊन वसणें. २ अत्यंत नाशाच्या वेळीं, मरणोत्तर. ३ धुसर=सुगंधी द्रव्य.

हरि हरि ह्मणतां तो देव तात्काळ पावे ।
अति विमळ पवाडे मानसीं आठवावे ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

रविकुळटिळकाचें रूपलावण्य पाहों ।
रविकुळटिळकाचे चिंतनीं चित्त राहो ।
रविकुळटिळकाची कीर्ति जीवीं भरावी ।
रविकुळटिळकाची मूर्त्ति जीवीं धरावी ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

कमळनयन रामें वेधिलें पूर्णकामें ।
सकळ भय विरामे रामविश्रामधामें ।
घननिळतनु श्यामे चित्त तोषे विरामें ।
भजन शुभ स्वनेमें तारिजे रामनामें ॥ १ ॥

---

॥ श्रीराम ॥

आतां येक विचार सार करणें संदेह संव्हारणें ।
निःसंदेह सदा मनीं विवरणें सन्मार्ग संस्थापणें ।
नाना पंथ अयुक्त सर्व दुषणें पाषांड उच्छेदणें ।
आत्मज्ञानप्रवाह रामभजनें दीवाकरा प्रेरणें ॥ १ ॥
माया मूळ समूळ निर्मुळ असे मिथ्या च जाली नसे ।
तीतें सत्य करूनि ब्रह्म ह्मणती ते संत ज्ञानी कसे ।
छायेला पुरुषाभिधान धरितां संदेह चित्तीं वसे ।
याचा शोध देहाष्ट हे दिनकरा निर्सूनियां होतसे ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥

दास्य ज्यासि न घडे जनकाचें । ते चि जाण महसा जन काचें ।
भावपूर्वक पुजी जनकासी । तो चि वास करितो जन कासीं ॥ १ ॥

दास्य ज्यासि न घडे जननीचें[1] । ते पडेत पतनी जन नीचे ।
भक्तिभाव हृदईं जननीचा । देत उच्च पदवी जन नीचा ॥ २ ॥

॥ श्रीराम ॥

दृश्य घडे कसें ब्रह्म सखोलपणें तुं विचारुन पाहें विवेकें ।
ब्रह्म निरामय निर्गुण तें दृश्य नासुन जाइल सेवटिं देखें ।
ऐसें हें आसुनि सर्व हि ब्रह्मसें निश्चयें मानुन जल्पति मूर्खें ।
सुंदर सांगत दृश्य निरासुन ब्रह्म निरंजन होउन ठाके ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

हळहळ विषयांची सर्व सोडूनि द्यावी ।
अति विमळ विचारें वस्तुची भेटि घ्यावी ।
भजन जन तराया आदरेंसीं करावें ।
परम सुखि भरावें राघवीं दृढ व्हावें ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

मधुकर मन माझें रामपादांबुजीं हो ।
सगुणगुणपरागीं नित्य रंगोन राहो ।
अचपळगुणगूणीं बैसली प्रीति दूणी ।
शरण चरण भावें जाहला राम ऋणी ॥ १ ॥

॥ श्रीराम ॥

परमसुखनदीचा मानसीं पूर लोटे ।
घननिळतनु जेव्हां अंतरीं राम भेटे ।
सुख परमसुखाचें रामलावण्य साचें ।
स्वरुप जगदिशाचें ध्यान त्या ईश्वराचें ॥ १ ॥

श्लोक संपूर्ण

---

1 ब्रह्मस्वरूपाची.

# स्फुट अभंग

[ १ ]

॥ श्रीराम ॥

ज्ञानेंवीण मोक्ष सर्वथा न घडे । वाउगे पवाडे साधनांचे ॥ ध्रु० ॥
ज्ञान सार बापा ज्ञान सार बापा । ज्ञान सार बापा निश्चयेंसी ॥ १ ॥
ज्ञानें मुक्त जीव जाले चहुं युगीं । त्यावीण वाउगी सर्व क्रिया ॥ २ ॥
तें येक जोडावें मग सर्व करावें । जन उद्धरावे परोपरीं ॥ ३ ॥
कर्मउपासनाज्ञानविज्ञानेंसीं । बोधावें जनासी वर्णाश्रमें ॥ ४ ॥
वर्णाश्रमधर्म संरक्षूनि थोर । ह्मणे दिनकर मोक्ष दीजे ॥ ५ ॥

[ २ ]

॥ श्रीराम ॥

गेली घटिका नये पुढें । कीजे स्वहित रोकडें ॥ ध्रु० ॥
नाहीं भर्वसा क्षणाचा । घात कठीण काळाचा ॥ १ ॥
रीघ शरण सद्गुरुपाईं । तेथें अभिनव स्वसुख पाहीं ॥ २ ॥
दिनकर ह्मणे भावें । शिकविलें हें मानावें ॥ ३ ॥

[ ३ ]

॥ श्रीराम ॥

कळीं कीर्तन तारक । ऐसें बोलति ब्रह्मादिक ॥ ध्रु० ॥
नाम सार नाम सार । नामें होतो जगदोद्धार रे ॥ १ ॥
नाम जीवाचें जीवन । नाम भवबंधमोचन रे ॥ २ ॥
रामनामासी विन्मुख । तया रौरव सन्मुख रे ॥ ३ ॥
नामें नामाचें स्वरूप । जीव जाले पैं अमूप रे ॥ ४ ॥
दिनकर नामीं लीन । नामीं शमलें जीवशिवपण रे ॥ ५ ॥

[ ४ ]

॥ श्रीराम ॥

## राग गौडी

जीवाच्या जीवना सद्गुरु निधाना । विनवितों करुणा करीं देवा ॥ ध्रु० ॥

पुरे पुरे आतां संसार मागुता । गर्भवासव्येथा तोडीं माझी ॥ १ ॥
रौरवांच्या कोटी भोगितां हिंपुटी । जालों तूं चि दृष्टीं पाहातोसी ॥ २ ॥
पतितांचें काये पाहासी पावना । दावीं निज खुणा दिनकरा ॥ ३ ॥

[ ५ ]

॥ श्रीराम ॥

## वैराटिका

पडो हें आकाश पृथ्वी जावो तळा । परी तो जिव्हाळा न खंडे कीं ॥ १ ॥
न खंडे अखंड चिंतन देवाचें । न चिंतितां वाचे चाले नाम ॥ २ ॥
चाले नाम नित्य अवस्थांवेगळें । न जाय खंडलें कोण्हा काळें ॥ ३ ॥
काळातीत नाम काळाचे अंतरीं । मशकाभीतरीं नाम तें चि ॥ ४ ॥
नामें नामातीत दिनकर जाला । विश्वासतां बोला सद्गुरूच्या ॥ ५ ॥

[ ६ ]

॥ श्रीराम ॥

## राग वैराटिका

अवतारीं अवतार येक रघुवीर । मोक्षाचें भांडार भाविकांचें ॥ १ ॥
भाविकांचें भाग्य प्रकाशलें जगीं । ह्मणुन वीतरागी योगी जाले ॥ २ ॥
योगी जाले योगें अहंबुद्धित्यागें । रामदाससंगें दिनकरु ॥ ३ ॥

[ ७ ]

॥ श्रीराम ॥

राम माझा पिता राम माझी माता । राम सखा भ्राता सोयरा तो ॥ १ ॥
राम गणगोत राम कुळदेवत । मुळीं मूळतंत राम माझा ॥ २ ॥ ७ ॥
राम माझा सर्व अंतरींचा भाव । दिनकरा माव नाहीं रामीं ॥ ३ ॥

[ ८ ]

॥ श्रीराम ॥

राम माझे मनीं राम माझे ध्यानीं । राम माझे वाणीं अखंडित ॥ १ ॥ ध्रु०

राम धनी मज राम धनी मज । राम धनी मज निरंतर ॥ ध्रु ॥
राम घरीं दारीं हिंडतां व्यापारीं । राम क्षणभरीं दुरी नव्हे ॥ २ ॥
राम जनीं वनीं अखंड श्रवणीं । संपूर्ण लोचनीं भरलासे ॥ ३ ॥
राम पाहें येथें राम पाहें तेथें । उभा जेथें तेथें सर्वां ठाईं ॥ ४ ॥
सर्वांतरीं राम निबिड निष्काम । दिनकर रामदास ह्मणे ॥ ५ ॥

[ ९ ]

॥ श्रीराम ॥

नागवी पाषांड नागवी पाषांड । नागवी पाषांड करी त्यासी ॥ ध्रु ॥
पाषांडाचें तोंड न राहे अखंड । बोलतां वितंड तड पाडी ॥ १ ॥
ह्मणे कैंचा देव कैंचा भक्तिभाव । अवघें चि वाव माईक हें ॥२॥
कैंचें वेदशास्त्र कैंचें तीर्थक्षेत्र । अरत्र परत्र कैंचें काई ॥ ३ ॥
कैंचें मान्यामान्य कैंचें पापपुण्य । बडबडी जघन्य विषईं भांड ॥४॥
कैंचे वर्णाश्रम कैंचें क्रियाकर्म । सर्व सर्वं ब्रह्म खल्विदं हें ॥ ५ ॥
बोधी चराचर करी येकंकार । ऐसा शिश्नोदरपरायण ॥ ६ ॥
दिनकर ह्मणे पाषांडी तें सुणें । अनाचारें जाणें रौरवासी ॥ ७ ॥

[ १० ]

॥ श्रीराम ॥

भाग्य उदेलें देहभूमिचें । ठाणें आलें सद्गूरूचें ॥ १ ॥
फिटला द्वंदाचा दुःकाळ । जाला समसुखें सुकाळ ॥ ध्रु ॥
पाषांडाच्या धाडी । बोधें केल्या तडातोडी ॥ २ ॥
अज्ञानाचे पुंड । ज्ञानें केलें पैं दुखंड ॥ ३ ॥
उठउनि अविवेकाचीं ठाणीं । केली विवेकें बैसणी ॥ ४ ॥
निरसुनि भजक भज्य । येकछत्री रामराज्य ॥ ५ ॥
भजनाचें निर्भमपत्र । सोहंमुद्रा वरी विचित्र ॥ ६ ॥
कर्म उपासना ज्ञान । वर्णाश्रम संरक्षून ॥ ७ ॥

---

१ अधम. २ कुत्रें.

नवविध पेंठा वसविल्या । कीर्तनसुखें माजविल्या ॥ ८ ॥
हा चि कौल त्रैलोक्यास । ह्मणे दिनकर रामदास ॥ ९ ॥

[ ११ ]

॥ श्रीराम ॥

भक्तिपेंठें भरला हाट । मिनले वैष्णवांचे थाट ॥ १ ॥ ध्रु ॥
सवदा घेवो सोहंसिद्धि । वेचवेचूं देहबुद्धि ॥ ध्रु ॥
सत्य भावाचें दुकान । संतीं मांडिलें संपूर्ण ॥ २ ॥
बरी फावलीसे वेळ । नरदेह पावन मूळ ॥ ३ ॥
देत्यां घेत्यां पडली गांठी । वाट चालिली उफराटी ॥ ४ ॥
येणें जाणें जेथिल तेथ । सर्व जालें यिथंभूत ॥ ५ ॥
अनुर्वाच्य सुख बाणे । अनुभवी तो चि जाणे ॥ ६ ॥
दिनकर रामींरामदास । भक्तिपेंठें स्वप्रकाश ॥ ७ ॥

[ १२ ]

॥ श्रीराम ॥

माझें विश्रांतीचें वर्म । अखंड सद्गुरूचें नाम ॥ ध्रु० ॥
वेधु लागला निजांचा । फुंज शमला जाणिवेचा ॥ १ ॥
जनीं वनीं निरंजनीं । न दिसे दुजें त्रिभुवनीं ॥ २ ॥
ज्ञान ज्ञेय ज्ञातेपण । सरलें ध्येय ध्याता ध्यान ॥ ३ ॥
शब्देंसीं क्षरलें मौन । अपूर्णेंसीं परिपूर्ण ॥ ४ ॥
दिनकर रामींरामदास । हें हि नुरोनियां निःशेष ॥ ५ ॥

[ १३ ]

॥ श्रीराम ॥

येके आंगीं दोनी पाहे । माझा बाप सद्गुरु माये ॥ ध्रु० ॥
माझे मज चि नवल । बोलों जातां निरसे बोल ॥ १ ॥
मायेकडे जंव जंव पाहे । तंव तंव बाप विन्मुख होये ॥ २ ॥
होतां बापाकडे दृष्टी । पडे माये पूतां तुटी ॥ ३ ॥

---

१ अभयपत्र. २ बाजार. ३ खर्च करूं, देहबुद्धि देऊन बदला सोहंसिद्धि घेऊं.

पाहों करुनी दोघे येक । तेंव्हां मज तें कैंचें सुख ॥ ४ ॥
कोणा सांगों ऐसी मात । पाहतां दुजें चि न दिसे जेथ[1] ॥ ५ ॥

[ १४ ]

॥ श्रीराम ॥

## राग वैराटिका

पुण्याचा प्रताप आगळा या नामीं । ह्मणोनियां तुह्मी स्मरा भावें ॥ध्रु०॥
स्मरा भावें ब्रह्मपुराण प्रथम । दुसरें तें पद्मपुराण पैं ॥ १ ॥
पुराण श्रीविष्णु तिसरें सहिष्ण । जाणती वितृष्ण भक्तजन ॥ २ ॥
भक्तजन शिवपुराण चउथें । जाणती भावार्थें भागवत ॥ ३ ॥
भागवत महापुराण पांचवें । नारद साहवें पुराण तें ॥ ४ ॥
पुराण सातवें मार्कंडेय ऐसें । आठवें विश्वासें अग्निनामें ॥ ५ ॥
नामें तें भविष्यपुराण नववें । विख्यात जाणावें तिहीं लोकीं ॥ ६ ॥
तिहीं लोकीं ब्रह्मविवर्तपुराण । दाहावें सज्ञान जाणती तें ॥ ७ ॥
जाणती तें लिंगपुराण अक्रावें । वाराह बारावें पुराण तें ॥ ८ ॥
पुराण तेरावें स्कंध तें जाणावें । वामन.चौदावें नाम जया ॥ ९ ॥
जया कूर्म नाम पुराण पंध्रावें । मच्छ तें सोळावें पुण्यरूप ॥ १० ॥
पुण्यरूप थोर गरुडपुराण । सत्रावें संपूर्ण मोक्षमूळ ॥ ११ ॥
मोक्षमूळ महाब्रह्मांडपुराण । अठरा हे जाण व्यासें केलीं ॥ १२ ॥
व्यासें केलीं विश्व तरावयालागीं । श्रवणसंयोगीं महापुण्य ॥ १३ ॥
महापुण्यें घडे सद्गतीचा लाभ । धन्य ते स्वयंभ पुण्यश्लोक ॥ १४ ॥
पुण्यश्लोक भावें ऐकती वाचिती । पूजिती स्वशक्तीं देती दान ॥ १५ ॥
देती दान तया लाभ कैवल्याचा । उद्धार वंशाचा व्यास बोले ॥ १६ ॥
व्यास बोले अष्टादश हे पुराणें । यांचिया स्मरणें दोष जाती ॥ १७ ॥
दोष जाती नामें स्मरतां चि जीवें । प्रभाते सद्भावें उठोनियां ॥ १८ ॥
उठोनियां नेम धरावा हा मनीं । करावी चिंतणी सुखरूप ॥ १९ ॥

---

1 हा अभंग अपूर्ण असावा.

सुखरूपें होये सार्थक जीवाचें । नामस्मरणाचें महापुण्य ॥ २० ॥
महापुण्य नामें पुराणांचीं घेतां । भवभयचिंता नाशे त्यांची ॥ २१ ॥
नाशे त्यांची बाधा या नामस्मरणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ २२ ॥

[ १५ ]

॥ श्रीराम ॥

नमन सद्भावें तुज गजानना । करुणानिधाना दीनबंधु ॥ १ ॥
दीनबंधु देवा कृपेच्या सागरा । पावें तूं माहेरा अनाथांच्या ॥ २ ॥
अनाथांच्या नाथा चिंतितों अंतरीं । यावें झडकरी येक वेळ ॥ ३ ॥
येक वेळ यावें सनाथ करावें । दुरी नवजावें जवळुनी ॥ ४ ॥
जवळुनी मज दिनकर ह्मणे । सनाथ करणें दयानिधी ॥ ५ ॥

[ १६ ]

॥ श्रीराम ॥

जेथें पाहे तेथें साजिरा श्रीराम । कोठें हि विराम स्थळ नाहीं ॥ १ ॥
स्थळ नाहीं माझ्या श्रीरामावांचून । सर्वपारिपूर्ण व्यापलासे ॥ २ ॥
व्यापलासे ऐसें पाहात पाहातां । पाहातो तत्वतां तो हि तो चि ॥३॥
तो हि तो चि द्रष्टा दृश्य सर्व राम । सबाह्य संभ्रम त्याचा त्यासी ॥४॥
त्याचा त्यासी ऐक्य दिनकर मी न । बोलों जातां मौन अपरेसीं ॥५॥

[ १७ ]

॥ श्रीराम ॥

भावाचें भुकेलें आर्ताचें तान्हेलें । संतांपुढें लोळे सद्गदित ॥ १ ॥
सद्गदित कंठ ज्ञान जेऊं मागे । पाजा जीवन जगें जाणिजेना ॥२॥
जाणिजेना तें चि भोजन घातलें । दिनकरा जालें समाधान ॥ ३ ॥

[ १८ ]

॥ श्रीराम ॥

सात्विकें मिळती प्रेमाच्या पैसारें[1] । बोलती उत्तरें मनोहर ॥ १ ॥
मनोहर वाणी सुललित[2] कैसी । जैसी अमृतासी माधुर्यता ॥ २ ॥

---

१ पैसारु=अवकाश ( हंसकोश ). ' पै सारें ' अशीं निराळीं पदें ठेऊन अर्थ जुळत नाहीं. २ कोमल, मृदु.

माधुर्यता त्या हि हूनि हे अगाध । जेणें स्वात्मबोध जागा होय ॥ ३ ॥
जागा होय बोध सात्विकांच्या संगें । उरिजेना आंगें अहंभावें ॥ ४ ॥
अहंभाव खंगे स्वस्वरूपभोगें । दिनकरा सांगे रामदास ॥ ५ ॥

[ १९ ]

॥ श्रीराम ॥

नित्य निरंतर देव निर्विकार । तयाचा आधार सज्जनासी ॥ १ ॥
सज्जनासी आणि सर्व जना तो चि । परि सज्जनाची वस्ति तेथें ॥ २
वस्ति तेथें ते चि जाले तदाकार । दिसती साकार अज्ञानासी ॥ ३ ॥
अज्ञानासी तेथें वस्ति निरंतर । परि तो विचार नेणती ते ॥ ४ ॥
नेणतां स्वरूप जन्म न चुकती । कोटि वेळ येती जाती मूढ ॥ ५ ॥
जाती मूढ होती नर्कारूढ पापी । जयांसी स्वरूपीं ज्ञान नाहीं ॥ ६ ॥
ज्ञान नाहीं त्यांसी रौरव मिरासी । दिनकरा कैसी अपूर्वता ॥ ७ ॥

[ २० ]

॥ श्रीराम ॥

भाग्य महद्भूत साधूचा दर्शनीं । पुण्याचिया श्रेणी[1] पदोपदीं ॥ १ ॥
पदोपदीं यज्ञदानादिकें पुण्यें । बोलती पुराणें आणि शास्त्रें ॥ २ ॥
शास्त्रांचा विश्वास मानिती सज्जन । निंदिती दुर्जन पापरूप ॥ ३ ॥
पापरूप धन्य तो नव्हे सामान्य । स्वसिद्ध[2] अमान्य करीं बळें ॥ ४ ॥
बळें अनहित करी तो हि भला । दिनकरा त्याला दंडवत ॥ ५ ॥

[ २१ ]

॥ श्रीराम ॥

वैष्णवांचा संग हो कां पळभरी । नव्हो[3] कल्पवरी दुर्जनांचा ॥ १ ॥
दुर्जनाचा संग स्वप्नीं हि न व्हावा । अखंडित व्हावा संतसंग ॥ २ ॥
संतसंगें निवे काया वाचा मन । जीवा समाधान निरंतर ॥ ३ ॥
निरंतर सुख वैष्णवांच्या संगें । दुःखाचिया पांगें[4] पांगिजेना ॥ ४ ॥

---

१ पंक्ति. २ स्वसिद्ध किंवा स्वतःसिद्ध. ३ न होवो. ४ पराधीनपणानें.

पांगिजेना ऐसा वैष्णवांचा लाभ । दिनेश स्वयंभ[1] रामदासीं ॥ ५ ॥

[ २२ ]

॥ श्रीराम ॥

उतराई व्हावें काये सद्गुरूचें । सांकडें जन्मांचें फेडियेलें ॥ १ ॥
फेडियेलें भय चौऱ्यासी लक्षांचें । घातलें कृपेचें अधिष्ठान ॥ २ ॥
अधिष्ठानीं साक्ष मज माझी जाली । ते हि दुऱ्हावली निरंजनीं ॥ ३ ॥
निरंजनीं थार केली निरंजना । ऐसा सद्गुरुराणा दीनोद्धारी ॥ ४ ॥
दीनोद्धारी त्याचें उतराई होणें । हें तंव बोलणें अप्रमाण ॥ ५ ॥
अप्रमाण सर्व ह्मणे दिनकर । आकाशासी थार कोण करी ॥ ६ ॥

[ २३ ]

॥ श्रीराम ॥

तीर्थ व्रत सर्व माझा सद्गुरुदेव । कल्पांतीं हि भाव नेणें दुजा ॥ १ ॥
नेणें दुजा भाव सद्गुरुवांचुनी । अवस्था उन्मनी अंगसंगें ॥ २ ॥
अंगसंगातीत सद्गुरुभजन । नित्य द्वैतेंवीण घडतसे ॥ ३ ॥
घडतसे ज्यांसी ते चि हें जाणती । सुखें सुखावती कामेंवीणें[2] ॥ ४ ॥
कामेंवीण काम दिनकर ह्मणे । महाराज जाणे निष्कामता ॥ ५ ॥

[ २४ ]

॥ श्रीराम ॥

किती सांगों वारंवार । काळ महा दुर्निवार ॥ १ ॥
ह्मणउनि सावध येक वेळ । सद्गुरुपाय धरीं केवळ ॥ २ ॥
थोरथोरां ज्याचा धाक । देहबुद्धी लाउनि केले रंक ॥ ३ ॥
सकळ सृष्टीचा जो नाशी[3] । दिनकर ह्मणे तो सद्गुरुदास ॥ ४ ॥

[ २५ ]

॥ श्रीराम ॥

सोडुनियां देहबुद्धि काम । प्रकट पाहें आत्माराम ॥ ध्रु० ॥
नाना साधनीं सायास । देहबुद्धीचा विलास ॥ १ ॥

---

१ स्वतःसिद्ध वस्तु. २ इच्छारहित होऊन. ३ नाश करणारा जो प्रत्यक्ष महाकाळ विकाळ यमधर्म तो देखील.

देहबुद्धीचा जो त्याग । तो गे तो चि आत्मयोग ॥ २ ॥
दिनकर ह्मणे धन्य तो चि । देहबुद्धि त्यागे जो प्रपंची ॥ ३ ॥

[ २६ ]

॥ श्रीराम ॥

माझें माझें ह्मणतां पाहें । कल्प गेले लवलाहें ॥ ध्रु० ॥
परि तें नव्हे चि कोण्हाचें । अवघें येका जगदीशाचें ॥ १ ॥
घातेंपातें मेळविलें । सकळ येथें चि राहिलें ॥ २ ॥
आपण मरोनियां गेलें । रांडापोरां भरीं घातलें ॥ ३ ॥
वायां सीण चि उरला कीं । येकें नाडुनि दिधलें येकीं ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे राम राम । सार्थक न करी तें अधम ॥ ५ ॥

[ २७ ]

॥ श्रीराम ॥

आतां नेती क्षणां नेती । ज्याचें तें चि घेउनि जाती ॥ ध्रु० ॥
तूं कां सिणसी अहंपणें । वायां विषयांचीं भरणें[1] ॥ १ ॥
देह त्याचा जीव त्याचा । अवघा सृष्टिक्रम ज्याचा ॥ २ ॥
दिनकर ह्मणे माझें न ह्मणें । अवघें देवाचें करणें ॥ ३ ॥

[ २८ ]

॥ श्रीराम ॥

दुर्योधनाऐसा राजा । पीडिले गोत्रज आणि प्रजा ॥ १ ॥
काय समागमें नेलें । सर्व सोडुनि अंतीं गेले ॥ २ ॥
देह त्यजिलें स्वराज्येसीं । येकल्या जीवें नर्क सोसी ॥ ३ ॥
न विचारिलें[2] करितां कर्म । विषयी लोकांचा संभ्रम ॥ ४ ॥

---

१ भरती. २ योग्यायोग्य असा विचार केला नाहीं.

इहलोकीं अपकीर्ति । स्वर्गलोकीं नर्कप्राप्ति ॥ ५ ॥
दिनकर ह्मणे यां हे गति । इतरां जीवां कैसी स्थिति ॥ ६ ॥

[ २९ ]

॥ श्रीराम ॥

रामनाम सार सांगे गौरीहर । धरीं निरंतर मानसीं तें ॥ १ ॥
मानसीं तें धरीं साराचें हि सार । निवालें अंतर जेणें माझें ॥ २ ॥
जेणें माझें जालें पूर्ण समाधान । तें चि तूं निधान साधीं आतां ॥३॥
साधीं आतां नाम नामापासीं राम । रामें सर्व काम पूर्ण होती ॥ ४ ॥
पूर्ण होती नेम घेतां नित्य नाम । दिनकरा वर्म चोजवलें ॥ ५ ॥

[ ३० ]

॥ श्रीराम ॥

जाणे वेदशास्त्र इतिहासादिक । पुराणें सम्यक वेदभाष्यें ॥ १ ॥
वेदभाष्यअर्थ वाखाणी यथार्थ । आगमी सामर्थ्य यथाविधी ॥ २ ॥
यथाविधी जाणे मंत्रयंत्रविद्या । नाना गद्यपद्यादिका कळा ॥ ३ ॥
कळा सर्व जाणे आत्मज्ञानेंवीण । तयासी अज्ञान बोलिजेतें ॥ ४ ॥
बोलिजेतें सर्व वेदशास्त्रांदिकीं । अज्ञानासी मुक्ति आत्मज्ञानें ॥ ५ ॥
आत्मज्ञानें मुक्ति ब्रह्मादिकां जाली । ऐसी आहे बोली सज्जनाची ॥६॥
सज्जनसंगतीं आहे भुक्ति मुक्ति । तयावीण गति नसे कोठें ॥ ७ ॥
नसे कोठें ते हि अज्ञानासी थार । ह्मणे दिनकर रामदास ॥ ८ ॥

[ ३१ ]

॥ श्रीराम ॥

संतसंगें जाणे येक आत्मज्ञान । जाणीवेचें भान आटऊनि ॥ १ ॥

---

१ दुर्योधनरावणादिकांसारख्या राजे लोकांची. २ समजलें. ३ संपवून.

आटऊनि सर्व देहीं देहभाव । नित्य अनुभव अनुभवी ॥ २ ॥
अनुभवीं मन जालें पैं उन्मन । तयासी विज्ञान वेद ह्मणे ॥ ३ ॥
वेद ह्मणे आणि प्रत्ययासी आलें । दिनकरा जालें समाधान ॥ ४ ॥

[ ३२ ]

॥ श्रीराम ॥

जयाचें स्वसुख तया चोजवेना । कीजे काय जाणा यासि कोणें ॥ १ ॥
ज्याचें हित त्यासी नावडे चोखट । नरदेह नीट पावोनीयां ॥ २ ॥
वायां भूमिभार ह्मणे दिनकर । सार्थकविचार जया नाहीं ॥ ३ ॥

[ ३३ ]

॥ श्रीराम ॥

अनुभवेंवीण वाउगा सिणसी । भल्यांसी निंदिसी साभिमानें ॥ १ ॥
साभिमानें सुख मूर्खा उपजेना । उपहास नाना कां करिसी ॥ २ ॥
कां करिसी वाया हानि लाभेंवीण । यातना दारुण अपवादें ॥ ३ ॥
अपवादें निंदा करीतां साधूची । सीमा त्या पापाची बोलवेना ॥ ४ ॥
बोलवेना ऐश्या दोषांचिया राशी । रौरव मिरासी अंतीं पाहें ॥ ५ ॥
अंतीं पाहें ऐसें दिनकर ह्मणे । प्रातिवीण सुनें भुंके जैसें ॥ ६ ॥

[ ३४ ]

॥ श्रीराम ॥

हनुमंता राम विध्वंसितां सळें[1] । सीतेसी आगळें[2] समाधान ॥१॥ ध्रु० ॥
ऐसें हें नवल परि सत्य आहे । विचारुनि पाहे सज्ञान तो ॥ छ ॥
समाधानें थोर आनंद सीतेसी । देखतां रामासी छिन्नभिन्न ॥ २ ॥
रडती राक्षस दुःख रावणासी । आक्रंदे मानसीं शोक करी ॥ ३ ॥

---

१ छल करून. २ अधिक.

अहा कटाकटा राम हनुमंतें । केला हत हातें रुद्ररूपें ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे जाणती पंडित । सज्ञान ते येथ ह्मणोनियां ॥ ५ ॥

[ ३५ ]

॥ श्रीराम ॥

निंदितसे देव निंदितसे धर्म । निंदितसे कर्म वर्णाश्रम ॥ ध्रु० ॥
निंदेऐसा दोष नाहीं त्रिभुवनीं । पूर्वज पतनीं निंदकाचे ॥ १ ॥
निंदितसे योग याग व्रतें दानें । तपादि साधनें ज्ञान भक्ति ॥ २ ॥
निंदितसे तीर्थे क्षेत्रें निरूपणें । देवाचीं कीर्त्तनें सात्विकांचीं ॥ ३ ॥
निंदितसे साधु संत ऋषी ज्ञानी । आणि समाधानी योगेश्वर ॥ ४ ॥
धन्य ऐसा तो हि दिनकर ह्मणे । सुकृत वेचणें दोषांसाठीं ॥ ५ ॥

[ ३६ ]

॥ श्रीराम ॥

केशवा पतन देखोनी पांडवीं । मानिजेत जीवीं हर्ष थोर ॥ १ ॥ ध्रु०
न व्हावें तें जालें विचारें पाहिजे । तरीच लाहिजे कोण्हीयेकें ॥ १ ॥
घोर घोषें वाणीं रडती कौरव । पतनीं केशव देखोनियां ॥ २ ॥
दिनकर ह्मणे जाणती सज्ञान । जयां कृपा पूर्ण राघवाची ॥ ३ ॥

[ ३७ ]

॥ श्रीराम ॥

हरिभक्त माझ्या जीवाचे सोयरे । तयांसी आदरें दंडवत ॥ १ ॥
दंडवत भावें जीवें निंबलोण । सर्वस्वें चरण वोळगेन[1] ॥ २ ॥
वोळगेन संत संतांचे कृपेनें । संसारधरणें उठऊनी ॥ ३ ॥
उठऊनि सर्व ब्रह्मांडेंसीं माया । वोवाळीन पायां सज्जनांच्या ॥ ४ ॥
सज्जनांच्या योगें दिनकर ह्मणे । आकाश ठेंगणें वाटे मज ॥ ५ ॥

---

१ सेवा करीन.

[ ३८ ]

॥ श्रीराम ॥

वैष्णवांचा संग घडो येक क्षण । होईल पावन कुळ माझें ॥ १ ॥
कुळ माझें शुद्ध आब्रह्मापासूनि । वैकुंठभुवनीं वास त्यासी ॥ २ ॥
वास त्यासी घडे कैवल्यसुखाचा । थारा संसाराचा कैंचा मग ॥ ३ ॥
कैंचें मग त्यांसी येणें जाणें घडे । अवघें चि उडे भ्रममूळ ॥ ४ ॥
भ्रममूळ सर्व दिनकर ह्मणे । संतसंगतीनें कळों आलें ॥ ५ ॥

[ ३९ ]

॥ श्रीराम ॥

संतांची संगती नावडे चि जया । तो जीव रुणिया संसाराचा ॥ १ ॥
संसार भोगितां नारा[1] ये पतित । सत्संगाची मात कोठें तया ॥ २ ॥
कोठें तया कैंचें स्वसुख निजांचें । दिनकरा साचें त्रिशुद्धीसीं ॥ ३ ॥

[ ४० ]

॥ श्रीराम ॥

सवंसारीं जोडी जोडा रे संतांची । सोडा अविद्येची देहबुद्धि ॥ १ ॥
देहबुद्धि सोडा आत्मराम जोडा । ज्ञानशस्त्रें खुडा कल्पनेसी ॥ ध्रु ॥
बहुतां जन्मांचे शेवटीं लाधलें । नरदेह भलें सार्थकाचें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे सावधान होणें । अखंड सेवणें संत पाईं ॥ ३ ॥

[ ४१ ]

॥ श्रीराम ॥

अखंडित सुख स्वानुभवी जाणे । तयावीण नेणे दुजें कोण्ही॥१॥ध्रु०॥
धन्य स्वानुभवी धन्य स्वानुभवी । ब्रह्मानंदें जीवीं वोथरत ॥ ध्रु ॥
रडे[2] हांसे कांपे सद्गदितकंठीं । रोम स्वेद उठी हांका देत ॥ २ ॥

---

१ नार=नर्क. २ अश्रुभाव उत्पन्न होतात.

ऐसीं चिन्हें भाव उठती सर्वदा । देहबुद्धिभेदा पालटित ॥ ३ ॥
नाहीं तें प्रकटे दिसे तें पालटे । जीव जैं झगटे स्वस्वरूपीं ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे ज्याचें तो चि जाणे । तयावीण नेणे दुजा कोण्ही ॥५॥

[ ४२ ]

॥ श्रीराम ॥

भेटीलागीं जीव तळमळी कैसा । जळेंवीण जैसा मत्छ पडे ॥१॥ ध्रु०॥
तैसें माझें जिणें तुझिया वियोगें । धांव लागवेगें दीनानाथा ॥ ७ ॥
जैसा धीर नव्हे पतीवीण कांते । औषधीं वसंतेवीण जैस्या ॥ २ ॥
चंद्रेवीण जैसे पीडती चकोर । दीन दिनकर स्वामीवीण ॥ ३ ॥

[ ४३ ]

॥ श्रीराम ॥

नांवारूपातीत तो देव पाहावा । संतांसी पुसावा निजभावें ॥ १ ॥
निजभावें संत दाविती सतंत । नामरूपहेत निरसूनि ॥ २ ॥
निरसूनि देहीं देहभाव सर्व । नित्य निरावेव संतकृपा ॥ ३ ॥
संतकृपां जालें जें नव्हे कोण्हासी । उपमा तयासी काय देणें ॥ ४ ॥
काय देणें आतां दिनकर ह्मणे । नुरे चि बोलणें निशब्देंसीं ॥ ५ ॥

[ ४४ ]

॥ श्रीराम ॥

मृत्युलोकीं कैंची सुखाची काहाणी । दुःखांची भरणी भरतसे ॥१॥ ध्रु०
ऐसिया ठायासी येणें जाणें देवा । धांवे कृपाळुवा दयानिधी ॥ ७ ॥
तूं चि बाप माये बंधु चापपाणी । नेईं सोडऊनि येथूनीयां ॥ २ ॥
दिनकर ह्मणे अपराधकोटी । आणूं नको दृष्टीं दीनानाथा ॥ ३ ॥

[ ४५ ]

॥ श्रीराम ॥

## वैराटिका

सोयरा जीवाचा सांगाती निजांचा । कैवारी दासांचा रामदास ॥ १ ॥
रामदास दासां सांभाळितो कैसा । जीव प्राणा जैसा तैसा पाहे ॥२॥
तैसा पाहे संग जोडला विख्यात । महिमा अद्भूत बोलवेना ॥ ३ ॥
बोलवेना ऐसे उपकार केले । पुराणीं बोलिले रघुवीर ॥ ४ ॥
रघुवीर कीर्ति वर्णिती स्वमुखें । मारुतीच्या तुकें नसे कोण्ही ॥ ५ ॥
नसे कोण्ही ऐसें प्रचीतीसी आलें । तें केवि वर्णिलें जाय आह्मां ॥६॥
आह्मांसी भर्वसा तुझिये कृपेचा । सत्य काया वाचा मनोभावें ॥ ७ ॥
मनोभावें भाव तुझिये चरणीं । दिनकरा ह्मणीं विसंभसी ॥ ८ ॥

[ ४६ ]

॥ श्रीराम ॥

जयासी नाठवे स्वहित आपुलें । भूमिभार जालें जिणें त्याचें ॥ १ ॥
जिणें त्याचें वाया जनीजनार्दने । असोनि पतन तया घडे ॥ २ ॥
तया घडे ऐसें देखतदेखतां । नाहीं कथावार्ता राघवाची ॥ ३ ॥
राघवाची कथा पतितपावन । जाणती सज्जन सुखरूप ॥ ४ ॥
सुखरूप जया नाठवे श्रीराम । तयासी विश्राम यातनेचा ॥ ५ ॥
यातनेचे भोग तया पापियांसीं । जयाचे मानसीं राम नाहीं ॥ ६ ॥
राम नाहीं जया दिनकर ह्मणे । तया येणें जाणें दुःखरूप ॥ ७ ॥

[ ४७ ]

॥ श्रीराम ॥

शरयूचे तीरीं अयोध्या नगरीं । नांदतो कैवारी राम माझा ॥ १ ॥
स्वामी माझा आहे त्रैलोकीं समर्थ । शंकर जाणत लीळा त्याची ॥२॥
लीळा त्याची नित्य वेदशास्त्र बोले । पुराणीं वर्णिलें रूप ज्याचें ॥३॥
रूप ज्याचें जना तारायासि जालें । भक्तांलागीं केलें अवतरण ॥ ४ ॥
अवतरण केलें जाला जगदोद्धार । रामें दिनकर तारियेला ॥ ५ ॥

[ ४८ ]

॥ श्रीराम ॥

तुळसीच्या माळा वैष्णवांच्या गळां । सप्रेम गोपाळा आळविती ॥ १ ॥
आळविती रागें रंगें तानमानें । देवाचीं लक्षणें नानापरी ॥ २ ॥
नानापरी छंद भेद सोडूनीयां । आळविती राया पंढरीच्या ॥ ३ ॥
पंढरीच्या तुंकें[1] तुंकावें[2] तें काय । उपमेसी साहे ऐसें नाहीं ॥ ४ ॥
ऐसें नाहीं दुजें दिनकर ह्मणे । जेथें नारायणें वस्ति कीजे ॥ ५ ॥

[ ४९ ]

॥ श्रीराम ॥

बहुत काळ गेला उरलासे थोडा । चांडाळाच्या तोंडा राम न ये ॥१॥
निंदेचा हव्यास करी रात्रिदिस । न सोडी नर्कास किडा जेवि ॥ २ ॥
तेवि पापियाचें जिणें कुंभपाकीं । दिनकरा निकी रामसोये ॥ ३ ॥

[ ५० ]

॥ श्रीराम ॥

माया हे असंत[3] ब्रह्म नित्य संत[4] । विचारी सतंत[5] तो चि संत[6] ॥ १ ॥
संत ह्मणवितां वाटे समाधान । निंदितां रुदन करूं लागे ॥ २ ॥
तैसा विरुळा संत सर्वी सदोदित । अखंड डुल्लत निजानंदें ॥ ३ ॥
आनंदाच्या छंदें नेणे स्तुति निंदा । सतंत तो सदा संत जाणा ॥ ४ ॥
जाणता हि संत नेणता हि संत । कर्दम[7] बहुत होत असे ॥ ५ ॥
असे तें निरशी नसे तें प्रकाशी । तेथें अज्ञानासी समाधान ॥ ६ ॥
समाधान होतें मी माझ्या निराशें । माया मिथ्या भासे दिनकरा ॥ ७ ॥

---

१ महत्वाचें. २ तुलना करावी. ३ खोटी. ४ चिरकाल टिकणारें. ५ नित्य. ६ ब्रह्मस्वरूप चळत नाहीं, ढळत नाहीं, आहे तसेंच सर्वकाळ आहे असा स्वात्मत्वें-करून दृढानुभव ज्यास तो पुरुष. ( हंसकोश ) ७ सगळेच संत ह्मणवायास लागले ह्मणजे एकच घोटाळा होतो.

[ ५१ ]

॥ श्रीराम ॥

सज्जनसंगतीं पावणें सद्गति । चुके अधोगति जन्म जरा ॥ १ ॥
जन्म जरा हरे पाप दुःख सरे । अहंपण विरे स्वकर्मेंसीं ॥ २ ॥
स्वकर्मेंसीं पाहीं विदेहत्व देहीं । विदेही अदेही दिनकर ॥ ३ ॥

[ ५२ ]

॥ श्रीराम ॥

सज्जनमंडण गुणांचें निधान । भाविकां भूषण शरपाणी[1] ॥ १ ॥
शरपाणी आहे जेथें तेथें पाहें । अणु[2] हि न राहे रामेवीण ॥ २ ॥
रामेवीण जन ते वोकासिमान[3] । दिनकरा धन्य रामदास ॥ ३ ॥

[ ५३ ]

॥ श्रीराम ॥

धन्य तो चि काळ धन्य ते चि वेळ । वाचेसी दयाळ आठवला ॥१॥
आठव उरला आपण हरला । आठवीं राहिला आठऊ चि ॥ २ ॥
आठवीं आठव सोहं स्वयमेव । दिनकरा भाव निज नामीं ॥ ३ ॥

[ ५४ ]

॥ श्रीराम ॥

राग वैराटिका

कायावाचामनें सद्गुरुसेवनें । संसारधरणें उठे वेगीं ॥ १ ॥
वेगीं हें साधन सद्भावेंसीं कीजे । चित्त समर्पिजे त्यांचा पदीं ॥ २ ॥
पदीं पद प्राप्त जयांचे कृपेनें । दिनकरा झणें विसंबसी ॥ ३ ॥

[ ५५ ]

॥ श्रीराम ॥

रामेंविण जिणें व्यर्थ जनीं वनीं । मृत्तिकेसी धणी[4] जाण बापा ॥ १ ॥
बाप माये राम सर्वांचा आधार । तयाचा अव्हेर करूं नका ॥ २ ॥

---

१ श्रीरामचंद्र. २ तिळमात्र देखील. ३ ओकारीप्रमाणें किळसवाणें. ४ तृप्ति.

नका रामेंवीण सीण असे थोर । ह्मणे दिनकर रामदास ॥ ३ ॥

[ ५६ ]

॥ श्रीराम ॥

रामासी भजतां रामदास होणें । तरी च भोगणें मोक्षपद ॥ १ ॥
पदीं लागे मोक्ष रामदास होतां । दासीं पैं तत्वता सर्व सिद्धि ॥ २ ॥
सिद्धींची हि सिद्धि भक्तां आत्माराम । तो चि पैं संभ्रम दिनकरा ॥३॥

[ ५७ ]

॥ श्रीराम ॥

अकळ न कळे पार या रामाचा । भार या भक्तांचा वाहातसे ॥ १ ॥
वाहातसे चिंता रात्रंदीस त्यांची । माउली भक्तांची भुललीसे ॥ २ ॥
भुललीसे प्रेमें सानें थोर नेणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ३ ॥

[ ५८ ]

॥ श्रीराम ॥

ऐसियांची संगति नको जानकीपति । बांधोनिया देती यमाहातीं ॥१॥
रडती लेंकलेंकी पुसती ठेवणें । सखीं तें पिसुणें होती बापा ॥ २ ॥
इष्ट मित्र दारा वैभवाचा थारा । जाणतां निस्तुरा होसी कैसा ॥ ३ ॥
जाणोनि ऐसी मात करीं आत्महित । भजें भगवंत संतसंगें ॥ ४ ॥
नाहीं तरी नाडसी पडसी गर्भवासीं । मी माझें ह्मणसी तेणें गुणें ॥५॥
धरुनी दोन्ही कान घोषें नारायण । गर्जतां निर्वाण नसे कोण्हां ॥ ६ ॥
दिनकररामीरामदास ह्मणे । अनुभवें जाणे तो चि धन्य ॥ ७ ॥

[ ५९ ]

॥ श्रीराम ॥

भुलले हे जन भरले अव्हाटां[1] । परत्रींच्या वाटा सोडुनीयां ॥ १ ॥
सोडुनीयां सर्व सार्थकविचार । भरले अपार हीनमार्गीं ॥ २ ॥

---

1 आडवाटेला.

हीनमार्गीं लीन होतील जे कोण्हीं । पडती पतनीं निरयांचे ॥ ३ ॥
निरयांचे भोग तरीच चुकती । जरी आंतुडती सीतानाथ ॥ ४ ॥
सीतानाथकृपा दिनकरा पूर्ण । तेणें परिपूर्ण सर्व कांहीं ॥ ५ ॥

[ ६० ]

॥ श्रीराम ॥

भावाचा पसारा घातलासे आह्मीं । केणें[3] रामनामीं भरलेंसे ॥ १ ॥
भरलेंसे केणें अच्युत गोविंद । माधव मुकुंद लक्षवरी ॥ २ ॥
लक्षवरी देणें सवदा अलक्ष । राखोनियां पक्ष स्वकर्मांचा ॥ ३ ॥
कर्म वाचा मन नाणें हें घेऊन । केणें नारायण विकूं आह्मी ॥ ४ ॥
आह्मी वाणी केलों रामींरामदासें । करितां विश्वासें शागीर्दीसी ॥ ५ ॥
शागीर्दी करितां तें चि आह्मी होणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ६ ॥

[ ६१ ]

॥ श्रीराम ॥

जन्मोजन्मीं दुःख होतसे अपार । दुस्तर संसार नानापरीं ॥ १ ॥
परोपरीं आतां आदरेंसीं बरें । सद्भावाच्या भरें ऐसें कीजे ॥ २ ॥
कीजे पैं उच्चार गर्जोनियां वाचें । पवाडे रामाचे रात्रंदीस ॥ ३ ॥
रात्रंदीस गोडीआवडीच्या भरें । भावाच्या निर्धारें रामपदीं ॥ ४ ॥
पदींपद प्राप्त श्रीरामभजनें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ५ ॥

[ ६२ ]

॥ श्रीराम ॥

अहंबुद्धि सांडीं सोहंबुद्धि मांडीं । तेणें कल्पनेची वाढी खुंटीं बापा ॥ १ ॥ ध्रु॥
तुजला तूंचि पाहीं तुजवीण दुजें नाहीं ।
पाहोनि स्थिर राहीं जेथिच्या तेथ ॥ छ ॥
पाहों जातां आपणा देह जाईजणा । धरूनि अहंपणा कां गुंतणें गा ॥ २ ॥

---

१ प्राप्त करून घेतील. २ दुकान. ३ जिन्नस. ४ मोठेपणा, कीर्ति. ५ अशाश्वत.

मीपण तूंपण हें भ्रमाचें लक्षण । साक्षीविलक्षण आत्माराम ॥ ३ ॥
स्वसंवेद्य रूप जीवशिवावेगळें । तें केविं आकळे अहंबुद्धीं ॥ ४ ॥
दिनकरा रामदासीं मीपण तूंपण । नाहीं नाहीं आण माझी मज ॥ ५ ॥

[ ६३ ]

॥ श्रीराम ॥

आकाशाचे घ्राणीं वोविजे वेसणी । उदकीं दिनमणी सांपडे जेवि ॥१॥
तेवि देहामाजीं सांपडेल देव । नित्य निरावेव परब्रह्म ॥ ७ ॥
ठसावे आरिसां प्रतिबिंबठसा । देखोनियां पिसा जीव जैसा ॥ २ ॥
मृगजळडोहीं मीन तळपत । साधक धावत धरूं जेवि ॥ ३ ॥
गंधर्वनगरीं मनोहर रचना । तेथिंच्या ब्राह्मणा नित्य पुजा ॥ ४ ॥
मुळीं देह नाहीं तेथें देव कैंचा काई । दिनकरा नवाई रामदासीं ॥५॥

[ ६४ ]

॥ श्रीराम ॥

संतसमागमें वेदांत श्रवणें । मननें साधनें निजध्यास ॥ १ ॥
निजध्यासें घडे स्वरूपसाक्षात्कार । मुक्त चराचर ऐक्यभावें ॥ २ ॥
भावें भावातीत दिनकर रामीं । योगपूर्ण कामीं कामातीत ॥ ३ ॥

[ ६५ ]

॥ श्रीराम ॥

धन्य आजि जालें जन्माचें सार्थक । भेटले दायक स्वसुखाचे ॥ १ ॥
स्वसुखाचे दानी देखतां नयनीं । त्रिताप शमोनी गेले तेव्हां ॥ २ ॥
गेले तेव्हां कोठें नेणों देहभाव । न कळे हे माव सद्गुरूची ॥ ३ ॥
सद्गुरूची लीळा त्याचा तो चि जाणे । वर्णितां पुराणें वेडावलीं ॥४॥
वेडावलीं शास्त्रें आणि चाऱ्ही वेद । सद्गुरु अभेद वर्णवेना ॥ ५ ॥
वर्णवेना तेणें लागलेंसे द्वंद । सर्वांसी विरोध परस्परें ॥ ६ ॥

परस्परें वादवेवाद वाढला । तेणें तो कुंठला स्वात्मबोध ॥ ७ ॥
आत्मबोधज्ञान त्रैलोकीं पावन । गेलेसे लोपोन मत्तवाद ॥ ८ ॥
मत्तवाद सर्व जनीं विरूढले । शिवें प्रबोधिलें पार्वतीस ॥ ९ ॥
पार्वतीस होतां तें चि प्रकटलें । हंसरूपें दिल्हें विरंचीसी ॥ १० ॥
विरंचीपासुनी सनकादिकां जालें । तैसें चि फावलें नारदासी ॥११॥
नारदानें व्यास ज्ञानें प्रकाशिला । तेणें उद्धरिला जगत्रय ॥ १२ ॥
जगत्रई शब्द वर्ततसे सांग । व्यासोच्छिष्ट जगत्रय ऐसें ॥ १३ ॥
ऐसें हें विख्यात प्रतिपाद्य वेदांतीं । गीताभागवतीं कृष्ण बोले ॥ १४ ॥
कृष्ण बोले भक्तिवैराग्येंसीं ज्ञान । तें चि पैं सज्जन निरोपिती ॥१५॥
निरोपिती परी ज्यांचें तेहीं घेणें । जीवां उद्धरणें आत्मज्ञानें ॥ १६ ॥
आत्मज्ञानेंवीण संसाराचा सीण । न चुके निर्वाण जन्मांतर ॥ १७ ॥
जन्मांतरीं आह्मीं केलें पुण्य थोर । भेटला उदार गुरुराज ॥ १८ ॥
गुरुराजें थोर नवल पैं केलें । मीं माझें चोरलें दिल्हें मज ॥ १९ ॥
दिल्हें मज माझें स्वरूप ठाईंचें । वोझें अनादीचें उतरिलें ॥ २० ॥
उतरिलें ह्मणों तारि जैसें तैसें । असोनियां नसे नवल हें चि ॥ २१ ॥
नवल हें चि थोर श्रीगुरुस्वामीचें । उत्तीर्ण तयाचें केविं होणें ॥२२ ॥
होणें जाणें जेणें खोडिलें संपूर्ण । आटिलें मीपण मजमाजीं ॥ २३ ॥
मजमाजीं मज पाहतां मी नाहीं । आहे सर्व कांहीं सत्ता तुझी ॥ २४ ॥
सत्ता तुझी सर्व आहे नाहीं साच । वाचें अनुर्वाच्य न बोलवें ॥ २५॥
न बोलवें वाचें माईक वाच्यांश । लक्षांशेंसीं पक्ष जेथें आटे ॥ २६ ॥
आटेना कल्पांतीं रूप सद्गुरूचें । साक्ष त्रिकाळांचें सदोदित ॥ २७ ॥
सदोदित रूप रामींरामदास । तेथें चि सहवास दिनकरा ॥ २८ ॥

## [ ६६ ]

॥ श्रीराम ॥

सर्वातीत देव नित्य निरावेव । तयासी सावेव ह्मणसी कैसा ॥ १ ॥
कैसा घडे वायु आकाशासारिखा । माया ब्रह्म देखा घडे केविं ॥ २ ॥

वडे केविं दृश्य द्रष्टा रूप येक । विचारीं विवेक शास्त्राधारें ॥ ३ ॥
शास्त्राधारें ब्रह्म नित्य निराकार । विचारें साकार वारीं माया ॥ ४ ॥
वारीं माया सर्व शोधीं ब्रह्म एक । त्याविण अविवेक नको बोलों ॥५॥
बोलों नको वाचें ब्रह्माचा सुकाळ । दिसे तें सकळ ब्रह्म ऐसें ॥ ६ ॥
सर्व ब्रह्म ऐसी भावितां भावना । जासील पाहुणा रौरवासी ॥ ७ ॥
वेदांती विचार अन्वय वितिरेक । पाहे तो विवेक वेदांतींचा ॥ ८ ॥
वेदांतीं सिद्धांत विमळ ब्रह्म शुद्ध । माया हे अबद्ध सर्वपणें ॥ ९ ॥
सर्वातीत सर्व विमळ ब्रह्म येक । दिनकरा विवेक रामदासीं ॥ १० ॥

[ ६७ ]

॥ श्रीराम ॥

देव निराकार आकार हे माया । ते चि देव वायां बोलों नये ॥ १ ॥
छायेसी च नर ह्मणे अविचार । माया ब्रह्माकार कल्पूं नये ॥ २ ॥
कल्पूं नये सर्व ब्रह्म हे भावना । दिनकरा खुणा रामदासीं ॥ ३ ॥

[ ६८ ]

॥ श्रीराम ॥

त्रिभुवन जाळी तो येक शंकर । तयाचा संव्हार करी काळ ॥ १ ॥
काळाचा हि काळ परि हा कृपाळ । विशाळ दयाळ परोपरीं ॥ २ ॥
जितां जीवें मारी मारूनियां तारी । ऐसा स्नेह करी दुजा कोण ॥३॥
काळपणें जागे स्नेह तों न भंगे । वज्रासी हि आंगें भेदिलेंसे ॥ ४ ॥
भेदिलें विश्व परि विश्व न जाणे । दिनकर ह्मणे रामदास ॥ ५ ॥

[ ६९ ]

॥ श्रीराम ॥

विषयांची भीक लागली ज्या नरा । भिकारी तो खरा अविद्येचा ॥१॥
लक्ष चौऱ्यासी घरें भिक्षेलागीं फिरे। परि पोट न भरे कांहीं केल्यां ॥२॥

इंद्र चंद्र शिव देवोदेवीं सर्व । भिकेची राणीव[1] करितातीं ।। ३ ।।
विषयभीक शमे ऐसें स्थळ नाहीं । गुरूवीण पाहीं त्रिभुवनीं ।। ४ ।।
तें स्थळ जो पावे तो येक सदैव । संतृप्त स्वयमेव होऊनि ठाके ।।५।।
धन्य सद्गुरुदास भिकेसी लावी भीक । आपण निःशंक चोजें[2] पाहे ।।६।।
दिनकर ह्मणे वंदा संतपाये । जें त्रिभुवनीं न समाये तें प्राप्त तेथें ।।७।।

[ ७० ]

।। श्रीराम ।।

सर्वांठाईं कैसा मत्सर सरिसा । विश्रांति मानसा घेवं[3] नेदी ।। ध्रु० ।।
कैसा हा मच्छर लागला अनिवार । संसार दुस्तर तरिजे केविं ।। १ ।।
स्वजात विजात अखंड भांडत । कुंथती पंडित परस्परें ।। २ ।।
तापसी अनुतापी सन्यासी प्रतापी । धरिती विकल्पीं येकमेकां ।। ३ ।।
सासु सुना जावा पिता पुत्र भावां । मछर हा सर्वां सोडीना कीं ।।४।।
असोनि मछरीं[4] मत्सरा नातळे । दिनकर लोळे त्याचे पदीं ।। ५ ।।

[ ७१ ]

।। श्रीराम ।।

रामनामेंवीण सिणवणें वाचा । सांटा तो पापाचा नोहे[5] काई ।। १ ।।
काई रामाऐसें आहे दुजें सांग । ठेवीसें अभंग[6] निजपदीं ।। २ ।।
निजपददानी येक आत्माराम । दिनकरा वर्म रामदासीं ।। ३ ।।

[ ७२ ]

।। श्रीराम ।।

संतांसी तारक जन्मला निंदक । दोषांसी ग्राहिक[7] केल्यावीण ।। १ ।।
दोषांलागीं त्याचा जन्म जाला जनीं । भूषण निंदानीं सज्जनासी ।।२।।
सज्जनासी दोष नवल हें थोर । काई कीजे धीर पाप्यां नसे ।। ३ ।।
पापियांसीं भासे पाप सर्वां ठाईं । पुण्याची नवाई न दिसे त्यां ।। ४ ।।

---

१ राज्यें. २ नवल, कौतुक. ३ घेऊं. ४ मत्सरी लोकांमध्यें वावरत असूनहि. ५ होणार नाहीं काय? ६ अढळ ७ संतांना दोषांचें ग्रहण करावयास लावल्याशिवाय.

न दिसे चांदिणें जैसें जंबुकांसी । झांकणें डोळयांसी पडे त्यांच्या ॥५॥
त्यांच्यापरीं जनीं निंदक वर्तती । दोषांचा करिती सांठा थोर ॥ ६ ॥
थोर ते चि जनीं रामें सिद्ध केले । संत धुवविले त्यांच्या मुखें ॥७॥
मुखें नित्य निंदा करिती निंदक । कैवल्याचें सुख तें चि संतां ॥ ८ ॥
संतांचे जे दोष घेऊनि वाचेनें । योजिलें बुडणें पूर्वजांसी ॥ ९ ॥
जैसें बुडविलें आपुल्या कुळासी । तारिलें तैसें चि सज्जनाच्या ॥१०॥
देऊनियां खरें कुडें घेणें गांठीं । नवल हें सृष्टीं देखियेलें ॥ ११ ॥
हें तों नव्हे कोण्हा निंदकावेगळें । धन्य त्याचें ज्याले त्रिभुवनीं ॥१२॥
त्रिभुवनीं येक निंदक उदार । नाहीं पारावार त्याचे युक्ती ॥ १३ ॥
युक्तीनें चि ज्यानें आब्रह्मापासुनी । घातलें पतनीं पूर्वजांसी ॥ १४ ॥
धन्य धन्य ऐसा जन्मोजन्मीं ज्यावा । चिरंजीव व्हावा व्यासाऐसा ॥१५॥
ऐसा दीनानाथें निर्मिला तारक । दिनकरा सुख निंदकाचें ॥ १६ ॥

## [ ७३ ]

॥ श्रीराम ॥

अनंतां जन्मांचे दास देवा तुझे । मानितोसि वोझें कोण्या काजा ॥१॥
कोण काज आह्मां धरावया दुजें । अन्यायाचें खोजें बोल वेगीं ॥ २ ॥
बोल वेगीं नको भ्रमाचें मैंदावें । दंडवत भावें तुझां पाईं ॥ ३ ॥
पाईं लीन आहे अन्योन्य प्रकारें । सांगावें निर्धारें सीताकांतें ॥ ४ ॥
सीताकांतें गोष्टी न संगतां ऐसी । पुसतसों जैसी मूळकथा ॥ ५ ॥
कथा न संगतां नाहीं उरी पुढें । वँर्मांचे पवाेड दारां येती ॥ ६ ॥
येती वर्में ऐसें कासी हो ह्मणे । दिनकर ह्मणे रामदास ॥ ७ ॥

## [ ७४. ]

॥ श्रीराम ॥

नरदेहा आलियां निस्तुरा न राहें । यातनेच्या भयें सावधान ॥ १ ॥

---

१ कोल्ह्यांस. २ वाईट, खोटें. ३ जियालें=जिणें. ४ जन्मावा. ५ खाय, खाऊ. ६ मंदपण. ७ गुह्याचे. ८ चव्हाट्यावर.

सावधान मन अखंड स्वरूपीं । लागतां साक्षेपीं दक्षपणें ॥ २ ॥
दक्षपणें लक्षी अलक्षांचा पक्ष । पावसील मोक्ष पक्षपातें ॥ ३ ॥
पक्षपातांवरी सहजसमाधि । साधणें हे सिद्धि नरदेहीं ॥ ४ ॥
नरदेहीं लव[1] निमिष[2] अक्षर । पळ घडी स्थिर स्वस्वरूपीं ॥ ५ ॥
स्वरूपाची सिद्धि साधनेंसीं घडे । दुःखाचे पवाडे दग्ध होती ॥ ६ ॥
दग्धपट्टारिती देहीं विदेहत्व । दिनकरा तत्व रामदासीं ॥ ७ ॥

[ ७५ ]

॥ श्रीराम ॥

भक्तीचिये पेठें सद्भाव दुकान । मांडिलें संपूर्ण संतजनीं ॥ १ ॥
संतजनवाणीं सोडिलेंसे केणें । आवडे तें घेणें स्वधर्मेसीं ॥ २ ॥
स्वधर्माचें नाणें वेंचूनि सवदा । ध्यावे चिदानंदा शुद्धबोधें ॥ ३ ॥
बोधें बोधूनीयां जीवाचीये जीवीं । भली निरावेवी ठेवाठेवी ॥ ४ ॥
ठेवाठेवी केली धन्य ते ग्राहिक । फिरती निःशंक पेठेमाजीं ॥ ५ ॥
पेठेमाजीं थोर होते कलकल । मृदंगेंसीं टाळ झणाणिती ॥ ६ ॥
झणाणिती वीणे नाद टिपऱ्यांचे । दिंडीपताकांचे भार सैरा[3] ॥ ७ ॥
सैरा गदारोळ रामनामघोषें । पेठे कौलें[4] असे तेणें गुणें ॥ ८ ॥
गुणेंसीं निर्गुण आनंदेंसीं होणें । पुसूनि टाकणें संवसारा ॥ ९ ॥
सारादोरा नसे जन्ममृत्युवेठीं । बेगारीची गोठी नसे तेथें ॥ १० ॥
तेथें येणें जाणें सरे येकसरें । न उरे दुसरे पेठे जाणें ॥ ११ ॥
पेठे जाणें जालें भलें दिनकरा । जोडिलें उदारा रामदासा ॥ १२ ॥

[ ७६ ]

॥ श्रीराम ॥

अयोध्येचा स्वामी दास आह्मी त्याचे । तो चि पैं आमचें देवतार्चन ॥ १ ॥
अर्चन रामाचें येक आह्मी जाणों । देवता त्या नेणो दुजेपणें ॥ २ ॥

---

१ क्षण. २ डोळ्यांचें पातें लवतें न लवतें तों. ३ अफाट. ४ करार अथवा परवानगी पत्र.

दुजेपणें कोठें नातळे हें मन । श्रीरामावांचून क्षणभरी ॥ ३ ॥
क्षणभरी रामविस्मरण घडे । नरकाचे पवाडे ते च्चि आह्मा ॥ ४ ॥
आह्मी रामदास ह्मणे दिनकर । अन्यथा उत्तर नव्हे जाणा ॥ ५ ॥

[ ७७ ]

॥ श्रीराम ॥

वोडगस्त जिणें नको देवा माझें । रंक आहे तूझें रामचंद्रा ॥ १ ॥
रामचंद्राऐसा स्वामी शीरीं असे । तेथें कोण वसे दुष्ट चिंता ॥ २ ॥
दुष्ट चिंता तुझी होतां तां छेदिली । कृपेची माउली मायेवीण ॥ ३ ॥
मायेवीण माझें करिसी संरक्षण । तुजवीण कोण जाणों आह्मी ॥ ४ ॥
आह्मी तुझे जाण सत्य हें उत्तर । ह्मणे दिनकर रामदास ॥ ५ ॥

[ ७८ ]

॥ श्रीराम ॥

देवाचें कीर्तन ऐकतां श्रवणीं । जावें लोटांगणीं भक्तिभावें ॥ १ ॥
भावें हरिदास मस्तकीं वंदावे । आनंदें करावे नामघोष ॥ २ ॥
नामघोष मुखीं करीं वाजे टाळी । पातकांची होळी क्षणमात्रें ॥ ३ ॥
क्षणमात्रें गेलें जळोंनि पातक । कीर्तनाचें सुख थोर असे ॥ ४ ॥
थोरलें सार्थक होतसे कीर्तनें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ५ ॥

[ ७९ ]

॥ श्रीराम ॥

जैसें चंद्रेंवीण चकोरा निर्वाण । कीं मेघावांचून चातकासी ॥१॥ ध्रु०॥
तैसें माझें चित्त भेटीतें इच्छित । याधरी समर्थ दीनानाथ ॥ ७ ॥
रवीच्या वियोगें चक्रवाकें जैसीं । कीं न येतां पतीसी पतिव्रता ॥ २ ॥
वसंतावांचून जैशा वनस्पती । साधकासी खंती मोक्षालागीं ॥ ३ ॥
लोभियाचें चित्त जैसें अर्थालागीं । आरोग्यासी रोगी इच्छी जैसा ॥४॥
राघवावांचून हीन दीन व्योमी । दिनकर रामीं रामदास ॥ ५ ॥

[ ८० ]

॥ श्रीराम ॥

आह्मी कां पतित तूं कैसा पावन । बोल झडकून हे चि कथा ॥ १ ॥
हे चि कथा जरी न सांगसी रामा । मग बोल आह्मा ठेऊं नको ॥२॥
नको देवा ठकूं पावन ह्मणौनि । नसे तुज कोण्ही आह्मावीण ॥ ३ ॥
आह्मावीण तुज कैंचें देवपण । ह्मणतों पावन तुज आह्मी ॥ ४ ॥
आह्मीं तुज केलें नाम रूप कर्म । येऱ्हवीं निष्काम कोण पुसे ॥ ५ ॥
कोण पुसे तुझे निर्गुण पवाडे । बोल वाडेकोडे कळे जैसे ॥ ६ ॥
जैसें मुक्ताफळ लेणाराकरितां । पावे उत्तमता उत्तमांगीं ॥ ७ ॥
निशिवीण दिन कोण बोले रामा । झकविसी आह्मा थोरपणें ॥ ८ ॥
थोरपणें थोर आह्मी तुजहूनि । पाहें विचारूनि अंतर्यामीं ॥ ९ ॥
अंतर्यामीं तुज दिल्हें रामा घर । तेथें निरंतर नांद सुखें ॥ १० ॥
नांद सुखें थोरपण पैऱ्हां सांडीं । बोडुनीया शेंडी संकल्पाची ॥ ११ ॥
संकल्पाचा मांज धरूनीयां देवा । जिंकिसी राघवा केविं भक्ता ॥ १२ ॥
भक्तांशिरोमणी नाम हें मिरवीसी । विचारीं मानसीं हें चि कैसें ॥ १३ ॥
कैसें आतां किती पुसों तुजलागीं । निसंगाचा संगीं संग कैंचा ॥१४॥
संग कैंचा तुज येकलें तूं येक । आमुचें त्रैलोक्य भरलेंसे ॥ १५ ॥
भरलेंसे ऐसें ऐकतां उत्तर । प्रेमें सीतावर धांविनले ॥ १६ ॥
धांवोनीया ऐक्यें रामें दिनकर । आळंगूनि स्थिर बुझाविला ॥ १७ ॥
बुझाविला रामें दिनकर रामीं । रामदासकामीं निष्कामता ॥ १८ ॥

[ ८१ ]

॥ श्रीराम ॥

पितों ब्रह्मचारी जननी कुमारी । तयांचे उदरीं जन्म आह्मां ॥ १ ॥
आह्मी भोगूं स्थान जन्मलों जेथून । तें चि अभ्यर्चन निरंतर ॥ २ ॥

---

१ 'ठकवूं' या अर्थानें. २ पलीकडे. ३ समजूत केली. ४ हा व पुढील दोन अभंग हीं परमार्थातील कोडीं आहेत.

निरंतर राखिली जनकाची साली । रंजवीत भली गुह्यस्थानीं ॥ ३ ॥
गुह्यस्थान भोगें रमतां संयोगें । मानिजेत जगें कर्मभ्रष्ट ॥ ४ ॥
भ्रष्ट कीं वरिष्ठ अनुभवी जाणती । दिनकरा मुक्ति रामदासीं ॥ ५ ॥

[ ८२ ]

॥ श्रीराम ॥

पाटकरीसवें रिझतां संयोगें । पोटा आलीं दोघे मातापिता ॥ १ ॥
पिता जाला पुत्र जननी दुहिता । जावाई तत्वता ज्येष्ठ सुत ॥ २ ॥
जाली ऐसी मात धन्य हा विवर्त । पावन पतित जैसे तैसे ॥ ३ ॥
जैसें तैसे शुद्ध जालों आह्मी भ्रष्ट । सोडितां वरिष्ट वर्णाश्रम ॥ ४ ॥
वर्णाश्रमधर्म दिनकर ह्मणे । सत्य मिथ्या जाणे दीनानाथ ॥ ५ ॥

[ ८३ ]

॥ श्रीराम ॥

परा हे कुंटिणी तिष्ठविते द्वारीं । भोगाया अंतरीं परेशासीं ॥ १ ॥
परेशासी भेटी होते पराद्वारें । ह्मणौनि निर्धारें रातलीये ॥ २ ॥
रातलीये कैसी ऐकें अर्धमात्रें । अगणित कळत्रें सोडूनीयां ॥ ३ ॥
सोडूनीयां घर सासू भावे देर । चित्तीं निरंतर रातलीये ॥ ४ ॥
रातलीये पराद्वार–अंगभूतें । होणार तें होतें होत जात ॥ ५ ॥
होत जात कांहीं न देखे वो बाई । केलें नेणों काई येणें मज ॥ ६ ॥
मजमाजीं मज लावियेलें चाळा । देतुसे (स)गळों अखंडीत ॥ ७ ॥
अखंडीत निजीं निजऊनि मज । वाचें न ये चोज बोलतां तें ॥ ८ ॥
बोलतां तें सुख बोला बोळवण । जागृति आणि स्वप्न निद्रेमाजीं ॥९॥
माजीं मज केलें ऐसें या परेशें । बोलतां निःशेषें उरी नाहीं ॥ १० ॥
उरी नाहीं स्नानसंधे जपध्याना । श्रवण कीर्तना कुळाचारा ॥ ११ ॥
कुळाचार आणि देशाचार पाप । कां पुण्य अमूप कर्माकर्म ॥ १२ ॥
कर्म धर्म सर्व संन्यासिलें येणें । केलें भ्रष्टपणेंवीण भ्रष्ट ॥ १३ ॥
भ्रष्ट जालों आह्मी पराद्वारेंकरी । सत्य पराद्वारी साधुसंत ॥ १४ ॥

---

१ रत झालें. २ मुळांत 'गळा' असा शब्द आहे.

साधुसंता मोक्ष प्राप्त परद्वारें । सत्य ये उत्तरें निश्चयाचीं ॥ १५ ॥
निश्चयाची वाणी न मने त्या हानी । पडती पतनीं अधःपातीं ॥ १६ ॥
अधःपात आम्हां असतां चि नसे । परद्वारसोसें हारपलों ॥ १७ ॥
हारपलों रामींरामदासगुणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ १८ ॥

[ ८४ ]

॥ श्रीराम ॥

संसाराचें सुख सर्वस्वें घातक । जाणतां निःशंक जालें कैसें ॥ १ ॥
कैसें सुख घडे सर्पाचां विवरीं । निद्रा सेजेवरी नाराजांचे[1] ॥ २ ॥
विषा गोडपण भलें जिव्हेपासीं । घातक प्राणासी क्षणमात्रें ॥ ३ ॥
तैसें संसाराचें सुख वरी गोड । परि तें दुवाड जाण बापा ॥ ४ ॥
बाप माये बंधु पुत्र मित्र कांता । जावाई दुहिता सर्वत्रेंसीं ॥ ५ ॥
ऐसीं ये सर्व हि मानितां आपुलीं । परि ये राहिलीं प्रांत होतां ॥ ६ ॥
होतां प्राणा अंत न सोडवी राजा । येका अधोक्षजावीण कोण्ही ॥७॥
कोण्ही न ये कामा श्रीरामावांचुन । जाणोनी नयन न झांकावे ॥८॥
झांकिले लोच्यन रामरूपीं जेहीं । गेले ते लवलाहीं अधःपाता ॥ ९ ॥
अधःपात टळे श्रीरामस्मरणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ १० ॥

[ ८५ ]

॥ श्रीराम ॥

अतित अभ्यागत येतां अकस्मात । तया आर्त्तभूत[2] चित्त द्यावें ॥ १ ॥
द्यावें अन्नदान उदक संपूर्ण । कीजे समाधान यथाशक्ति ॥ २ ॥
शक्तिविरहित कीजे तो अनर्थ । जाणोनी पदार्थ तैसे कीजे ॥ ३ ॥
कीजे भूतदया भगवंत भाऊनी । चित्त समाधानीं ठेऊनीयां ॥ ४ ॥
ठेऊनीयां मन श्रीरामचरणीं । साधुसंत ज्ञानी वोळखावे ॥ ५ ॥
वोळखावे देव भक्तसमुदाय । करावे उपाय सेवेलागीं ॥ ६ ॥
सेवा घडे जया भावें सज्जनाची । तयाच्या वंशाची सार्थकता ॥ ७ ॥
सार्थकता जाली वंश उद्धरला । विश्वासतां बोला सज्जनाच्या ॥ ८ ॥

---

१ नाराज-नाराच=बाण. २ त्याची इच्छा समजून घेण्याविषयीं आतुर होऊन.

सज्जनाच्या बोलें शत्रु मित्र सम । धरूनि निष्काम धरणें वेगीं ॥ ९ ॥
वेगीं हें करीतां प्रिय भगवंता । तयाचिया चित्ता तोष थोरु ॥ १० ॥
तोष थोर मातें श्रीरामासी येणें । दिनकर ह्मणे जननीसी ॥ ११ ॥

[ ८६ ]

॥ श्रीराम ॥

जननी ह्मणे बापा ऐकें दिनकरा । अज्ञान तूं खरा कळलें मज ॥ १ ॥
मज तूं सिकवीसी दानधर्म करीं । लोक घरोघरीं पाहें कैसे ॥ २ ॥
कैसे पांहे जन नांदे धनधान्यें । मिर्वीती भूषणें परोपरीं ॥ ३ ॥
परोपरीं कां रे छळिसी आह्मांसी । काई या धर्मासी ह्मणों तुझ्या ॥४॥
तुझ्या संगें आह्मी दिनकरा जाण । जालों हीन दीन माता ह्मणे ॥५॥

[ ८७ ]

॥ श्रीराम ॥

विश्व हें चि ब्रह्म जल्पती अधम । अनुभवें वर्म न जाणतां ॥ १ ॥
न जाणतां ब्रह्म निर्गुण निष्काम । संसाराचा श्रम तुटे कैसा ॥ २ ॥
कैसें जन वन घडे जनार्दन । सगुण निर्गुण येक केविं ॥ ३ ॥
केविं ब्रह्म माया पुरुष कें[2] छाया । आत्मा तो चि माया शब्दोशब्दीं ॥४॥
शब्दज्ञान खोटें अनुभवेंवीण । दिनकरा सीण सर्वब्रह्मीं ॥ ५ ॥

[ ८८ ]

॥ श्रीराम ॥

सूर्य मृगजळ गगन आभाळ । डोळा चि पटळ केविं घडे ॥ १ ॥
केविं दृश्य द्रष्टा येक चि पापिष्टा । जिव्हा होते कुष्टा असत्यानें ॥२॥
असत्याचा सीण न करिती सज्जन । स्वरूपाची खूण जाणोनीयां ॥३॥
जाणोनीयां सत्य ब्रह्म निर्विकार । वारून विकार मूळमाया ॥ ४ ॥
माया हे सगुण ब्रह्म तें निर्गुण । ऐक्य विचक्षण न मानिती ॥ ५ ॥
मानिती ते हीन आत्मज्ञानेंवीण । दिनकरा खूण रामदासीं ॥ ६ ॥

---

१ श्रीस्वानुभवदिनकराच्या प्रस्तावनेंत दिनकरांचें त्रोटक चारित्र देतांना हा अभंग आलेला आहे. २ कोठें.

[ ८९ ]

॥ श्रीराम ॥

साधूसी नमस्कार करितां सीण थोर । जाणों तेहीं पितर सिंतरिले[1] ॥ १ ॥
ऐसा दुराचारी न भरे विचारीं । त्यासी येमपुरी केली देवें ॥ २ ॥
देशाची कामिनी वेश्या सवंदणी[2] । तिचीये चरणीं लोळे कैसा ॥ ३ ॥
पाणे सुगंधेलें हार बुके वस्त्रें । कटीं कटसूत्रें तिज वाहे ॥ ४ ॥
वेश्येचिये पाईं चित्त वित्त प्राण । अर्पिले संपूर्ण विषयदासें ॥ ५ ॥
वेश्या गणगोत वेश्या मातातात । वेश्या कुळदेवत दें्हाराचें ॥ ६ ॥
धन्य वेश्यादास स्वहित सोडूनि । दिनकरा पतनीं वास त्याचा ॥ ७ ॥

[ ९० ]

॥ श्रीराम ॥

जाणते हो जाणा नेणिवेच्या खुणा । सोहं अनुसंधाना साधुनीयां ॥१॥
साधुनीयां साध्य सिद्धस्वरूपाचें । स्थान गोल्हाटाचें[3] लक्षुनीयां ॥ २ ॥
लक्षितां लक्षणीं अलक्षाचा पक्ष । सर्वसाक्षी दक्ष चित्स्वरूपीं ॥ ३ ॥
चित्स्वरूपीं चित्त होतसे निश्चित । ठाईं पडे हेत संतसंगें ॥ ४ ॥
संतसंगें संग होतो निःसंगाचा । साधे निशब्दाचा अंतर्भाव ॥ ५ ॥
भावें भावातीत होणें हें नवल । स्वरूप निर्मळ अखंडीत ॥ ६ ॥
अखंडीत ब्रह्म शुद्ध चराचरीं । दिनकराअंतरीं निरंतर ॥ ७ ॥

[ ९१ ]

॥ श्रीराम ॥

संकल्प विकल्प हे दोन्ही मनाचे । ह्मणौनि कर्माचे दोषधर्म ॥ १ ॥
दोषधर्में येणें जन्मा येका घडे । संसारपवाडे कर्ममार्गें ॥ २ ॥
कर्ममार्गें येणें जाणें हें तों सत्य । कर्माचें सामर्थ्य मनापासीं ॥ ३ ॥
मनापासीं आलें कर्म जन्म मृत्यु । संकल्पाचा हेत धरूनीयां ॥ ४ ॥
धरूनीयां तें चि मन रामपाईं । मग कोणे ठाईं होतें कोण ॥ ५ ॥

---

१ झकविलें. २ परट्याचें तादण. ( ज्ञानेश्वरी कोश ) ३ औटपीठावरलें योगशास्त्रोक्त स्थान.

होतें जातें मन जालें रामार्पण । जन्ममृत्युशीण उरे कोठें ॥ ६ ॥
उरी कोठें ठेऊं रामेंवीण आह्मी । दिनकर रामीं रामदास ॥ ७ ॥

[ ९२ ]

॥ श्रीराम ॥

श्रीरामरंगेणीं रंगलेंसे चित्त । बोरंगली मात विषयांची ॥ १ ॥
विषयांची गोडी जाली कडु विष । भावें जगदीश वोळगतां ॥ २ ॥
वोळगतां राम संसाराचा शीण । गेला पैं जळोन क्षणमात्रें ॥ ३ ॥
क्षणमात्रें हरे जन्म मृत्यु जरा । स्मरतां उदारा राघवासी ॥ ४ ॥
राघवावेगळें आह्मां कोण्ही नसे । रात्रिदिस वसे मन तेथें ॥ ५ ॥
मन रामपदीं अर्पिलें सावेव । आतां दुजा भाव धरी कोण ॥ ६ ॥
कोण रामेंवीण चिंता रामभक्तां । दिनकरा कथा वार्ता ते चि ॥ ७ ॥

[ ९३ ]

॥ श्रीराम ॥

नसो भाग्य सत्ता संपदा वैभव । वसो हा राघव नित्य वाचें ॥ १ ॥
वाचें नारायणउच्चार न खंडे । वर्णित पवाडे रात्रिदीस ॥ २ ॥
रात्रिदीस जेहीं हे जोडी जोडिली । तेहीं वंशावळी उद्धरिली ॥ ३ ॥
उद्धरिले सर्व आपपरलोक । धन्य भाग्य देख हें चि येक ॥ ४ ॥
हें चि येक भाग्य सर्वामाजीं थोर । ह्मणे दिनकर रामदास ॥ ५ ॥

[ ९४ ]

॥ श्रीराम ॥

नितुंबूनि तुंबा तूंपणाचा केला । मीं जीवीं बांधला तरायासी ॥ १ ॥
तरायासी तूंसें मीसें बुडवण तूंपणाची खूण । वेगीं धरा ॥
वेगीं धरा आतां दिनकरा तूंतें । हारी शीघ्र मीतें न हारितां ॥ ३ ॥

[ ९५ ]

॥ श्रीराम ॥

सर्वामधें सार नरदेह थोर । सार्थक साचार घडे तेथें ॥ १ ॥

---

१ ठाव अथवा स्थिति. २ श्रीरामसभेमध्यें.

घडे तेथें जरी भजन रामाचें । तरी संसाराचें वोझें कोणा ॥ २ ॥
कोण्हासी या रामें अव्हेरिलें नाहीं । जडमूढ पाहीं उद्धरिले ॥ ३ ॥
उद्धरिलें सिळे लागतां चरण । अहिल्या पावन जाली जेणें ॥ ४ ॥
जेणें जळामाजीं तारिले पाषाण । वधिले रक्षोगण साक्षपेंसीं ॥ ५ ॥
साक्षपेंसीं जेणें देवां[1] सोडविलें । बिभीषणा दिल्हें अक्षैपद ॥ ६ ॥
पदोपदीं रामें वृक्ष वनांतरीं । तारिले निर्भरीं स्पर्शनेंसीं ॥ ७ ॥
स्पर्शनें चि जेणें वान्नरां तारिलें । चिरंजीव केलें वायुसुता ॥ ८ ॥
शुकाचिया मिसें गणिकेसी मुक्ति । अजामेळा गति हे चि जाली ॥९॥
हे चि गति सर्वां खेचरां भूचरां । वान्नरां निर्जरां मानवांसीं ॥ १० ॥
गंधर्वां जळचरां किन्नरां अपारां । रामें चि विचारा सर्वा गति ॥११॥
गतीची हि गति राम कृपामूर्ति । धरिती जे चित्तीं ते चि धन्य ॥१२॥
ते चि धन्य येक त्रैलोक्यामाझारीं । जयांचे अंतरीं निजध्यास ॥१३॥
ध्यास रामेंवीण अन्यत्राचा नेणें । उद्धारिलें तेणें पूर्वजांसी ॥ १४ ॥
पूर्वजांसीं स्वयें उद्धारिलें लोकां । कैवल्याच्या सुखा सुखरूपें ॥ १५ ॥
सुखरूपें सुख दिनकरा राम । रामेंवीण भ्रम सर्व असे ॥ १६ ॥

[ ९६ ]

॥ श्रीराम ॥

मना धरीं आतां हे चि सारसोय । अन्यथा उपाय तुज नाहीं ॥ १ ॥
नाहीं सार्थकता जों नाहीं वंदिले । संतांचीं पाउलें निश्चयेसीं ॥ २ ॥
निश्चयेसीं घडे सज्जनसेवन । बाणे समाधान सप्रचित ॥ ३ ॥
सप्रचित होतां आत्मप्रचीतीसी । शास्त्रप्रचीतीसी श्रवण कीजे ॥४॥
श्रवण कीजे नित्य साक्षपेंसीं सार । मननें विचार विचारिजे ॥ ५ ॥
विचारिजे दृढ निजध्यासें मनीं । घडे समाधानीं साक्षात्कार ॥ ६ ॥
साक्षात्कार शास्त्रप्रचीतीनें केला । बोधत्वेंसीं जाला ऐक्यलाभु ॥ ७ ॥
ऐक्यलाभु होये सद्गुरुसेवनें । मायाभ्रम ज्ञणें दूरि टाके ॥ ८ ॥

---

१ देवांना.

दूरि ठाके सर्व माया मिथ्याभान । स्वप्नाकार जाण विस्तार हा ॥ ९ ॥
विस्तार हा सत्य मूढासी मानेल । तो चि विश्वासेल अविद्येसी ॥१०॥
अविद्येसी जन होतील जे लीन । भोगिती पतन निरयांचें ॥ ११ ॥
रौरवांचें दुःख आहे बहु थोर । शास्त्र निरंतर बोलतसे ॥ १२ ॥
बोलतसे वेद परमार्थ निर्धार । तराया संसार संतसंगें ॥ १३ ॥
संतसंगेंवीण मनासी न थोर । जों नाहीं निर्धार दृढ केला ॥ १४ ॥
दृढ केला जेहीं निश्चयाचा संग । जाले ते अभंग संशयातीत ॥१५॥
संशयातीत वस्तु सोहंस्वानुभवें । रूप नाम जीवेंभावें मिथ्या ॥ १६ ॥
मिथ्या जाली सर्व दृश्यवंत माया । जातुसे विलया जगदाकार ॥१७॥
जगदाकार जातां पुढें येकमेव । नित्य निरावेव परब्रह्म ॥ १८ ॥
परब्रह्म येक दिनकरा जाण । माया मिथ्याभान स्वानुभवें[1] ॥ १९ ॥

[ ९७ ]

॥ श्रीराम ॥

अतुळ महिमा न तुळवे कोण्हा । जातां जागरणा येकादशीं ॥ १ ॥
येकादशीव्रत साधन विख्यात । स्वयें आर्तभूत देव जेथें ॥ २ ॥
जेथें देव उभा सप्रेमें डोलत । सद्गदित होत निजानंदें ॥ ३ ॥
निजानंदें तेथें जातां पुण्यश्लोकीं । सायोज्यतामुक्ति लागे पदीं ॥ ४ ॥
पदोपदीं यज्ञदानें पृथ्वीऐसीं । जातां कीर्तनासी पुण्य लाभे ॥ ५ ॥
पुण्य लाभे ऐसा महिमा कीर्तनीं । स्वयें चक्रपाणी अनुवादे ॥ ६ ॥
अनुवादे देव तें चि धरा चित्तीं । दिनकरा गति हरिकीर्तनीं ॥ ७ ॥

[ ९८ ]

॥ श्रीराम ॥

येमाची यातना होतां पूर्वजांसी । होती कासाविसी तेणें दुःखें ॥ १ ॥

---

१ एकमेव, नित्य, निरावेव अशा परब्रह्मस्वरूपाच्या शेवटच्या स्थितीप्रत पोंचण्याची ज्या साधकाची खरोखर इच्छा असेल त्यानें या अभंगांत वर्णिल्या-प्रमाणें ' संतसेवे ' पासून प्रारंभ करून क्रमाक्रमानें एक एक पायरी ओलांडित गेलें पाहिजे. यातील हा साधनक्रम फारच सुंदर आहे.

दु:खें दुखवोनि सार्थक इच्छिती । वोंशीं हरिभक्ति करूं कोण्ही ॥ २ ॥
कोण्ही तऱ्ही हो कां भावार्थी वैष्णव । हरिल रौरव कीर्तनानें ॥ ३ ॥
कीर्तन आवडीं करूं बंधु पुत्र । अथवा दौहित्र कन्या तऱ्ही ॥ ४ ॥
कन्या तऱ्ही व्हावी हरिपरायण । तेणें उद्धरण आह्मांलागीं ॥ ५ ॥
आह्मांलागीं केलें मुक्त यमाळइं[1] । पितर हें पाहीं इच्छितातो ॥ ६ ॥
इच्छिती कीर्तन येकादशीव्रत । दिनकरा मात कीर्तनाची ॥ ७ ॥

[ ९९ ]

॥ श्रीराम ॥

दशमीं प्रयाग[2] वैष्णवांचा संग । माघस्नानीं योग अहोरात्रीं ॥ १ ॥
अहोरात्रीं घडे दशमीं साधनें । कोटि माघस्नानें यथाविधी ॥ २ ॥
यथाविधी घडे दशमीच्या योगें । वैष्णवांच्या संगें महोच्छाव ॥ ३ ॥
महोच्छाव दिंडीपताकांचे भार । नामाचा गजर पदोपदीं ॥ ४ ॥
पदोपदीं गाती नाचती वैष्णव । देवाचें वैभव वाखाणिती ॥ ५ ॥
वाखाणिती कीर्ति वाद्यांचा गजरीं । मृदांग झल्लरी वीणे टाळ ॥ ६ ॥
टाळ करताळी आनंदें धुमाळी । आणिती राउळीं[3] मिरवूंनियां ॥ ७ ॥
मिर्वूनियां दिंडी आणिली स्वस्थाना । कोटि माघस्नाना शिरीं फळ ॥८॥
फळप्राप्ति घडे दशमीच्या योगें । दिनकर सांगे मृत्यलोकीं ॥ ९ ॥

[ १०० ]

॥ श्रीराम ॥

आली येकादशी संतोष मानसीं । न माय आकाशीं समाधान ॥ १ ॥
समाधानें येती वैष्णव कीर्तना । लागेन चरणा तनुमनें ॥ २ ॥
तनुमनें त्यांसी वोवाळीन प्राण । सांडेवा[4] होईन त्यांचे पाईं ॥ ३ ॥
त्यांचे पाईं चोजें[5] आहे माझें गूज । साधलें सहज सहजें चि ॥ ४ ॥
सहजेंसहज येकादशी आली । दिनकरा जाली सुप्रसन्न ॥ ५ ॥

---

१ यमाच्या दरबारांतून. २ प्रयागास माघस्नानाचा योग घडणें यापेक्षां देखील दशमीस अहोरात्रीं वैष्णवांचा संग घडणें हें जास्त पुण्यदायक आहे. ३ मंदिरांत. ४ कुरवंडी, ओवाळणी. ५ नवल.

[ १०१ ]

॥ **श्रीराम** ॥

तीर्थ वैष्णवांचें ते चि सर्व तीर्थें । द्वैत मनोरथें न मानितां ॥ १ ॥
मानितां पर्वणी सर्वां शिरोमणी । त्रैलोक्यपावनी येकादशी ॥ २ ॥
येकादशी व्रत वैष्णवांच्या संगें । अहोरात्रीं जागे हरिकथे ॥ ३ ॥
कथानिरूपणें जालें पैं सार्थक । दिनकरा देख कलयुगीं ॥ ४ ॥

[ १०२ ]

॥ **श्रीराम** ॥

वैष्णवांची कांशी ते हे येकादशी । न मारूनि कैसी मोक्ष देते ॥१॥
देते भाविकांसी वैकुंठीचें दैवं । अर्थ प्राण जीव राखोनीयां ॥ २ ॥
नलगे धावणें नलगे खर्चणें । नलगे मरणें मोक्ष लाभे ॥ ३ ॥
मोक्षलाभासाठीं वाराणसी लोक । करिती निःशंक येकादशी ॥ ४ ॥
येकादशी आली जालें समाधान । दिनकरा धन्य जिणें जालें ॥ ५ ॥

[ १०३ ]

॥ **श्रीराम** ॥

पतितपावन सत्य नारायण । रचिलें विंदाण दासांलागीं ॥ १ ॥
दासांलागीं काशी ते चि येकादशी । केली अनर्थासी सर्व जना ॥२॥
सर्व जना जाणें नलगे पैं कोठें । तीर्थें आणि तटें फिरावया ॥ ३ ॥
फिरावया कोठें नसे कांहीं काज । घरा ये सहज येकादशी ॥ ४ ॥
येकादशी धावे जीवमात्रापासीं । पडों नेदी त्यासी श्रम कांहीं ॥ ५ ॥
श्रम कांहीं नव्हे अर्थें जीवें प्राणें । मोक्षाचें सांजणें भाविकांसी ॥ ६॥
भाविकांची काशी सत्य येकादशी । अनुमान मानसीं न धरावा ॥ ७ ॥
न धरावा कांहीं संदेह मानसीं । सर्वत्र जीवांसी तारक हे ॥ ८ ॥
तारक हे माये त्रिभुवना पाहे । दिनकरा सोये दासपाईं ॥ ९ ॥

---

१ भेदभाव. २ पूर्वीं काशीयात्रा करून घरीं सुखरूपपणें परत येणें ह्मणजें पुनर्जन्म झाल्याप्रमाणें मानीत असत हें या अभंगावरून स्पष्ट दिसतें. ३ कुशलतची योजना. ४ सोपी. ५ मैत्री अगर सामग्री.

[ १०४ ]

॥ श्रीराम ॥

माझे मनीं नांदे श्रीराम आपण । काय चिंता जाण असे आतां ॥ १ ॥
आतां नाहीं चिंता बाहेर अंतरीं । आहे चापधारी सर्वा ठाईं ॥ २ ॥
सर्वा ठाईं राम सदोदित भासे । दिनकरा कैसें चोज पाहें ॥ ३ ॥

[ १०५ ]

॥ श्रीराम ॥

चोजवला राम सबाह्यअंतरीं । सर्व चराचरीं नांदतसे ॥ १ ॥
नांदतसे कांहीं न होनि या जनीं । होणें जाणें कानीं नायिके तो ॥२॥
नाइकोनि सर्व चैतन्यचाळक । दिनकरा सुख त्याचे रूपीं ॥ ३ ॥

[ १०६ ]

॥ श्रीराम ॥

कीर्तना जावया नाहीं आराणुक[1] । चाळणा अनेक संसाराची ॥ १ ॥
संसाराची चिंता स्वप्नीं हि सुटेना । करी विवंचना अंतवंत[2] ॥ २ ॥
अंतवंत[3] राम नाठवे पापिया । दिनकरा माया करी ऐसें ॥ ३ ॥

[ १०७ ]

॥ श्रीराम ॥

माया हे मांगीण अहंकार मांग । दोघांचा संयोग जेथें असे ॥ १ ॥
जेथें असे यांची संपदा राहिली । शुचित्वाची बोली केविं तेथें ॥ २ ॥
केविं तेथें घडे आचार विचार । प्रत्यक्ष अघोर[4] संचलासे ॥ ३ ॥
संचलासे ऐसें जाणते जाणती । करिती वित्पत्ती[5] वाउगी[6] चि ॥ ४ ॥
वाउगें चि सर्व ह्मणे दिनकर । जों हा अहंकार गेला नाहीं ॥ ५ ॥

[ १०८ ]

॥ श्रीराम ॥

जन्मांतरीं केलें सुकृत आगळें[7] । तरी च देखिलें अभिनव[8] ॥ १ ॥

---

१ आवड. २ नाशवंताची. ३ या ठिकाणीं 'अंत होईपर्यंत' असा अर्थ करावा. ४ पातकांचें आगर. ५ कार्यकारणभाव. ६ भलती च. ७ अधिक, पुष्कळ. ८ नवल.

अभिनव रूप मी माझ्या निरासें । प्राप्त जालें कैसें संतसंगें ॥ २ ॥
संतसंगें जीव पावे निजयोग । दिनकरा संग सांगे जाला ॥ ३ ॥

[ १०९ ]

॥ श्रीराम ॥

नाठवितां राम आठवे अंतरीं । ऐसी केली परी गुरुदेवें ॥ १ ॥
गुरुदेवें देव लाविला अखंड । खांडिलें वितंडे मायामूळ ॥ २ ॥
मायामूळ मिथ्या निसंदेह आत्मा । स्वयें परमात्मा सोहं ब्रह्म ॥ ३ ॥
सोहं ब्रह्म शुद्ध त्रिविध विचारें । गुरु साक्षात्कारें आत्मस्थिति ॥ ४ ॥
आत्मस्थिति प्राप्त द्वैतेंवीण सिद्ध । दिनकरा बोध रामकृपा ॥ ५ ॥

[ ११० ]

॥ श्रीराम ॥

वेद शास्त्र स्मृति पुराणें गर्जती । आत्मज्ञानें गति सर्व जीवां ॥ १ ॥
सर्व जीवां मोक्ष होतो आत्मज्ञानें । सद्गुरुकृपेनें ज्ञान लाभे ॥ २ ॥
ज्ञानलाभालागीं सत्संग धरणें । स्वयें उद्धरणें नरदेहीं ॥ ३ ॥
नरदेहीं जीव राहे ज्ञानेंवीण । चांडाळ तो जाण दुराचारी ॥ ४ ॥
दुराचारी हित सोडिती सर्व हि । दिनकरा पाहीं नवलावो ॥ ५ ॥

[ १११ ]

॥ श्रीराम ॥

सर्व चराचरीं नांदतो श्रीहरि । रितें अणुभरी स्थळ नाहीं ॥ १ ॥
स्थळ नाहीं कोठें श्रीहरीवेगळें । विकल्पी भरले विकल्पानें ॥ २ ॥
विकल्पानें हरि अंतरला दुरी । अखंड अंतरीं असतां हि ॥ ३ ॥
असतां श्रीहरि संगें निरंतरीं । विषयांचे भरीं चोजवेना ॥ ४ ॥
चोजवेना तरी अनहित जालें । दिनकरें केलें भविष्यासी ॥ ५ ॥

[ ११२ ]

॥ श्रीराम ॥

श्रीराम आसनीं श्रीराम शयनीं । श्रीराम भोजनीं ह्मणा वाचें ॥ १ ॥

---

१ अपूर्व. २ परिपूर्ण, अव्यंग. ३ गोष्ट. ४ विशाल. ५ जाणता येत नाहीं.

श्रीराम बोलतां श्रीराम जागतां । श्रीराम चालतां बोला पंथीं ॥ २ ॥
श्रीराम नाचतां श्रीराम उडतां । श्रीराम खेळतां धरा चित्तीं ॥ ३ ॥
श्रीराम भुवनीं श्रीराम निर्वाणीं । श्रीराम स्मरणीं स्मरा भावें ॥ ४ ॥
श्रीराम जोडितां श्रीराम नाडितां । श्रीराम ताडितां ध्यावा घोषें ॥ ५ ॥
श्रीराम घडितां श्रीराम जडितां । श्रीराम बोधितां न सोडावा ॥ ६ ॥
श्रीराम दळितां श्रीराम कांडितां । श्रीराम वागतां सोडूं नये ॥ ७ ॥
श्रीराम श्रवणीं श्रीराम पुराणीं । श्रीराम कीर्तनीं भावें ह्मणा ॥ ८ ॥
सर्वी सर्वभावीं श्रीराम चिंतावा । विस्मरण जीवा हों नेदावें ॥ ९ ॥
द्यावें चित्त रामीं अहंता सोडुनी । मन समाधानीं राखोनियां ॥ १० ॥
राखियेला हेत अखंड चिंतनीं । तयांचे चरणीं दिनकर ॥ ११ ॥

## [ ११३ ]

॥ श्रीराम ॥

येक नाहीं तेथें कैंचें आणूं दुजें । अविद्येच्या माजें[1] माजों नये ॥ १ ॥
आहे नाहीं ऐसी भाष नाहीं जेथें । अहं सोहं तेथें कैंचें बापा ॥ २ ॥
द्वैतातीत शुद्ध हें जेथें न साहे । अनुर्वाच्य पाहें केवीं वांचूं[2] ॥ ३ ॥
वाचेतीत वाचा बोले कोणेपरीं । नाहीं निर्विकारीं विकारता ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे जरी अनुमान[3] । तरी जा शरण सद्गुरूसी ॥ ५ ॥

## [ ११४ ]

॥ श्रीराम ॥

आह्मां अनाथांची श्रीगुरु माउली । कृपेची साउली चळों नेदी ॥ १ ॥
चळों नेदी तेणें जालें समाधान । त्रिताप जळोन दग्ध जाले ॥ २ ॥
दग्ध जाले सर्व देहीं देहभाव । कृपेचे स्वभाव प्रकटले ॥ ३ ॥
प्रकटले हे हि जाणीव सोडिली । खोडिली हे बोली बोलेंवीण ॥ ४ ॥
बोलेंवीण बोले कृपा श्रीगुरूची । दिनकरा साची सफळित ॥ ५ ॥

---

१ आधिक्यानें, मस्तीनें. २ बोलूं. ३ संशय.

[ ११५ ]

॥ श्रीराम ॥

गुरु माझी माये गुरु माझी धाये[1] । गुरुविण काये जाणों आह्मी ॥धृ०॥
आह्मी नेणों कांहीं श्रीगुरुवांचूनि । सगुणीं निर्गुणीं गुरुनाथ ॥ १ ॥
गुरुनाथीं सेवा तो चि पैं व्यापार । होतसे अपार जोडी[2] तेथें ॥ २ ॥
जोडियेलें तीर्थ तीर्थां शिरोमणी । अखंडित धणी[3] गुरुगृहीं ॥ ३ ॥
गुरुगृहा जाणें तें चि तीर्थाटण । तनुमनु अर्पण तें चि दान ॥ ४ ॥
दान दिल्हें सर्व गुरुदेवापाईं[4] । दिनकरा नाहीं दुजा भाव ॥ ५ ॥

[ ११६ ]

॥ श्रीराम ॥

बहुवस खंती लागतसे चित्तीं । केंव्हां कृपामूर्ति भेटसील ॥ १ ॥
भेटसी केधवां आह्मां पतितांसी । वियोग मनासी साहवेना ॥ २ ॥
साहवेना पळ येक वियोगाचें । तूं चि करुणेचें अधिष्ठान ॥ ३ ॥
अधिष्ठान आह्मां अनाथां सनाथ । कराया समर्थ तूं चि रामा ॥ ४ ॥
तूं चि रामा येक अत्रीं परत्रीं । दुजें चराचरीं नेणों देवा ॥ ५ ॥
नेणों देव धर्म मुद्रा ध्यान जप । कर्मखटाटोप बहुविध ॥ ६ ॥
बहुविध क्रिया अनुष्ठान विधी । नेणों हें त्रिशुद्धी तुजवीण ॥ ७ ॥
तुजवीण रामा गोमटें आणिक । नावडे निःशेष तुझी आण ॥ ८ ॥
तुझे पाय दिव्य मज पतितासी । न जाणे मानसीं दुजें कांहीं ॥ ९ ॥
दुजें कांहीं नेणें हे चि विज्ञापना । साक्ष मनीं मना देव जाणे ॥१०॥
देव जाणे सर्व दिनकरहेत । यावरी उचित तें चि कीजे ॥ ११ ॥

[ ११७ ]

॥ श्रीराम ॥

बाळींभोळीं दीनेंहीनें सर्वगुणें । जैसीं तैसीं लीन तुझा पाईं ॥ १ ॥
तूं बाप तूं माये सजनसोयरा । तोडीं येरझारा गर्भवास ॥ ७ ॥
समाधान कोठें नव्हे या मनाचें । तयालागीं साचे पाय तुझे ॥ २ ॥

---

१ धाया=धात्री, दाई. २ नफा. ३ तृप्ति, समृद्धि. ४ चांगलें.

दिनकर दीन शरण देवदेवा । नेणे दुजें सेवा हे चि माझी ॥ ३ ॥

[ ११८ ]

॥ श्रीराम ॥

सकळ देवांचा देव गुरुदेव । करी निरावेव सावेवासी ॥ १ ॥
सावेव साभास परी निराभास । सद्गुरूचा दास निश्चयेंसीं ॥ २ ॥
निश्चयेंसीं जाला सर्वी सर्वातीत । दिनकरा सत्य मिथ्या नव्हे ॥ ३ ॥

[ ११९ ]

॥ श्रीराम ॥

कोण्या पुण्यें मज जोडती वैष्णव । ऐसें कैंचें दैव दैवहीना ॥ १ ॥
दैव हीन माझें जाणतों मी बरें । तरी च अंतरे त्यांच्या पाया ॥ २ ॥
त्यांचे पाईं आहे जीवांचें जीवन । करिती ते धन्य त्यांची सेवा ॥३॥
त्यांची सेवा घडे जयांचीये वंशीं । तयांच्या भाग्यासी पार नाहीं ॥४॥
पार नाहीं सत्य ह्मणे दिनकर । सखा रघुवीर केला जिहीं ॥ ५ ॥

[ १२० ]

॥ श्रीराम ॥

मनातीत मनीं कैसेपरीं ध्यावें । स्वामीनें सांगावें बाळकासी ॥ १ ॥
बाळकासी बोध करावा विमळ । संशयाचें मूळ तुटे जेणें ॥ २ ॥
तुटे जेणें द्वैत राहे सदोदित । दिनकरा आर्त तये बोधीं ॥ ३ ॥

[ १२१ ]

॥ श्रीराम ॥

देखिलें नयनीं सावळें रूपडें । चित्त तयाकडे जडलेंसे ॥ १ ॥
जडलेंसे रूप नयनीं साजिरें । कास पीतांबरें घेतलीसे ॥ २ ॥
घेतलीसे आंगीं चंदनाची उटी । पदक शोभे कंठीं वैजयंती ॥ ३ ॥
वैजयंतीमाळा पुष्पें रत्नांकिता । कानीं सतेजता कुंडलांची ॥ ४ ॥
कुंडलें सतेज किरीट मस्तकीं । प्रभा तेणें लोकीं दाटलीसे ॥ ५ ॥
दाटलीसे दृष्टि भक्तवृंदाकडे । पाहे तयाकडे पद्मनेत्रें ॥ ६ ॥

पद्म शंख चक्र गदायुधें हातीं । चतुर्भुज मूर्ति शोभे कैसी ॥ ७ ॥
कैसी भक्तांलागीं उभी जेथें तेथें । कृपेचेनि पंथें तिष्ठतसे ॥ ८ ॥
तिष्ठतसे कृष्णस्वरूप सुंदर । ह्मणे दिनकर रामदास ॥ ९ ॥

[ १२२ ]

॥ श्रीराम ॥

ध्यानीं आकळेना कळेना मनासी । तें चि अहिर्निशीं कैसें ध्यावें ॥१॥
कैसें ध्यावें ध्येय ध्यानासी अतीत। अचिंत्यासी चित्त चिंती कैसें ॥२॥
कैसें सर्वी सर्व सर्वातीत आहे । कळेसा उपाये निरोपावा ॥ ३ ॥
निरोपावा मज माझा अनुभव । मिथ्या देहभाव कैसा असे ॥ ४ ॥
कैसा असे भास मायाअविद्येचा । विवर्त ब्रह्मींचा केवीं घडे ॥ ५ ॥
केवीं घडे ऐसें सांगावें स्वामीनें । दिनकर ह्मणे निजभावें ॥ ६ ॥

[ १२३ ]

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ चित्ता सुचित्त होईं । दुश्चित्त नको कांहीं ।
भज आतां लवलाहीं । सद्गुरुपदीं ॥ ध्रु ॥
सद्गुरूसी शरण । जो कोण्ही भावार्थें पूर्ण ।
तो चि येक जनीं धन्य । होऊनि ठेला ॥ १ ॥
येणें चि सार्थकता जीवासी पाहातां। घडे हित सर्वथा संशयातीत ॥२॥
तो चि येक दृढ संग धरीं चित्ता अभंग। दिनकर निःसंग रामदासीं ॥३॥

[ १२४ ]

॥ श्रीराम ॥

निराधारीं कैसा राहिला भूगोळ । भोंवतें सकळ अंतराळ ॥ १ ॥
अंतराळीं राईसमान पाषाण । टाकितां फिरोन तळीं पडे ॥ २ ॥
तळीं पडे हें तों देखती सकळ । वाटतें नवल भूगोळाचें ॥ ३ ॥
भूगोळ राहिला कोणाच्या आधारें । सांगावें निर्धारें दीनानाथें ॥ ४ ॥
दीनानाथ संत दिनकर ह्मणे । निरशिती धरणें संशयाचें ॥ ५ ॥

[ १२५ ]

॥ श्रीराम ॥

अहो जना तुह्मीं निस्तुरें[1] नसावें । सावधान व्हावें निजहिता ॥ १ ॥
निजहितालागीं नरदेह श्रेष्ठ । बोलती वरिष्ठ ब्रह्मादिक ॥ २ ॥
ब्रह्मादिक देव सनकादिक संत । महिमा वर्णित नृदेहाची ॥ ३ ॥
नृदेह हा आद्य सुल्लभ दुर्लभ । येथें आत्मलाभ होत असे ॥ ४ ॥
होत असे ज्ञान पूर्ण समाधान । ह्मणऊनि मान्य अन्य[2] लोकां ॥ ५ ॥
अन्य लोक घेती जन्म नरदेहीं । तयावीण नाहीं मोक्षप्राप्ति ॥ ६ ॥
मोक्षप्राप्ति येणें देहें बहुजना । करा विवंचना वेदशास्त्रीं ॥ ७ ॥
वेद शास्त्रें आणि पुराणें गर्जती । गीताभागवतीं मान्य केला ॥ ८ ॥
मान्य चहुं युगीं नरदेह तो हा । अनयासें पाहा लाधलासे ॥ ९ ॥
लाधलासे तरी सज्जनीं मानावा[3] । हीन न करावा कोण्हेपरीं ॥ १० ॥
कोण्हेपरीं कांहीं वांछा न ठेवावी । संगति धरावी सज्जनाची ॥ ११ ॥
सज्जनसंगाचें आर्त बहु कीजे । जिज्ञासा सहजें आंगीं बाणे ॥ १२ ॥
बाणे तयावरी अर्थाअर्थी दशा । त्यावीण सहसा नसे छंदु ॥ १३ ॥
छंदु वोडेंकोडें लागतां मनासी । विलंब ज्ञानासी नसे तेथें ॥ १४ ॥
नसे तेथें कांहीं पाहाणें लक्षण । अर्थाअर्थी चिन्ह देखतां चि ॥ १५ ॥
देखतां अर्थार्थी कृपा कीजे संतीं । ज्ञानाची संस्मृति तया लाभे ॥ १६ ॥
लाभे परमार्थ परत्रींचा अर्थ । संसारअनर्थ नाश पावे ॥ १७ ॥
नाश पावे तम सूर्योदईं[4] जैसा । ज्ञान होतां तैसा संवसारु ॥ १८ ॥
संवसारु नाशे सहित कल्पना । स्वयमेव ज्ञानारूढ होतां ॥ १९ ॥
रूढ होतां ज्ञानीं होतें समाधान । मोक्षश्रीचें चिन्ह आंगीं बाणे ॥ २० ॥

---

१ निसुर, निष्काळजी, बेफिकीर. २ लोकत्रयापैकीं मृत्युलोका खेरीज जे स्वर्ग व पाताळ यांतील देव दानव वगैरे सर्वांना. ३ नरदेह अनायासें लाभला ह्मणून त्याची हेळसांड न करतां, त्याची योग्य निगा ठेवून त्याला सत्कारणीं लावावा. ४ अत्यन्त.

आंगीं बाणे क्षमा दया आणि शांति । निजानंदें वृत्ति सुखरूप ॥२१॥
सुखरूपें रूप सुखाचें वोतलें । न जाय खंडिलें कोण्ह्या बांगें ॥ २२ ॥
कोण्ह्या बागें ज्ञानी नव्हे अनोरिसा । सर्वस्वें सरिसा सर्वकाळ ॥२३॥
काळत्रईं जैसा सूर्य जैसा तैसा । अवस्थात्रईं ऐसा ज्ञानी जाण ॥२४॥
जाणपणातीत जाणीव जाणिजे । विज्ञान बोलिजे तिये नांव ॥ २५ ॥
नांवरूपातीत स्वसंवेद्य स्वयें । अनुर्वाच्य पाहें रूप त्याचें ॥ २६ ॥
रूप त्याचें ऐसें होये नरदेहीं । याहिपरें काई लाभ असे ॥ २७ ॥
लाभ असे मोठा सोडी तो करंटा । भरलासे ताठा वैभवाचा ॥ २८ ॥
वैभवाच्या भरें भरलासे पापी । न विचारी सोपी आत्मसोये ॥ २९ ॥
सोये सोडुनीयां निदसुरा जाला । वोसणातें कुळा अनादीच्यां ॥३० ॥
अनादीच्या छंदें अहंतेच्या मदें । जल्पतसे भेदें माझ्या तुझ्या ॥ ३१ ॥
माझ्या तुझ्या भेदें भेदला पतित । स्वप्नीं हि स्वहित नाइके तो ॥३२॥
नाइके तो कानीं आचार विचार । धन दारा घर ह्मणे माझें ॥ ३३ ॥
ह्मणे माझा देश हस्ती घोडे गांव । मिरासीचा ठाव पूर्वजांचा ॥ ३४ ॥
पूर्वजांचें नांव या देहें राखिलें । उजेडा आणिलें बळात्कारें ॥ ३५ ॥
बळात्कारें वृत्ति साधिल्या कित्तेकी। संख्या न ये लेखीं लेखितां हि ॥३६॥
लेखितां अपार उच्छेद विप्रांचे । केले कित्तेकांचे अपमान ॥ ३७ ॥
अपमानें साधुसंत उडवीले । या जीवें मानिलें नाहीं कोण्हा ॥ ३८ ॥
नाहीं कोण्ही आह्मासमान पाहातां । पृथ्वी धुंडाळितां परोपरीं ॥३९॥
परोपरीं ऐसें नांव वडिलांचें । आणियेलें साचें उजेडासी ॥ ४० ॥
उजेडा आणिले पूर्वज सायांसें । धन्य जिणें ऐसें नाहींतऱ्ही ॥ ४१ ॥
नाहींतरी लोक कासया जन्मले । भूमिभार जाले कीर्तिवीण ॥ ४२ ॥
कीर्तिवीण जन कासया वांचले । सांदीस घातलें कुळ थोर ॥ ४३ ॥

---

१ बागा=मार्ग ( हंसकोश ). २ घटकोघटकीं बदलणारा. ३ यापेक्षां आणखी. ४ झोपाळुं. ५ बरळूं लागला. ६ वाडवडिलांपासून चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें. ७ अत्यन्त प्रयत्नानें.

कुळ थोर परी तीर्थयात्रा करी। नित्य नाक धरी अनुष्ठानीं ॥ ४४ ॥
अनुष्ठानें स्नानें संध्या होम दानें। माळा विलेपनें विभूतीचीं ॥ ४५ ॥
विभूति लाउनी फिरे वृंदावनें। पुराणश्रवणें नित्य करी ॥ ४६ ॥
नित्य करी वरीं पर्वे महोच्छाव। मांडुनीयां देव कथा करी ॥ ४७ ॥
कथा करी रडे नाचे लोकांपुढें। वाखाणी पवाडे जनापासीं ॥ ४८ ॥
जनाची हि भीड न धरी निर्लज्ज। लावियेली लाज कुळवंता ॥ ४९ ॥
कुळवंत लोक पाहाती खालतें। देखोनीयां यातें चकूचंकिती ॥ ५० ॥
चकूचकिती ऐसा टाळकुट्या जाला। कासयासी आला संसारासी ॥५१॥
संसारासी यावें नांवासी राखावें। नाहींतरी जावें देशांतूनि ॥ ५२ ॥
देशांतूनि जावें कळे तें करावें। अथवा राहावें कीर्तिरूपें ॥ ५३ ॥
कीर्तिरूपें राहे तो येक संसारी। मानिजेत थोरीं साभिमानें ॥ ५४ ॥
साभिमानें आला साभिमानें गेला। लोकांत उरला साभिमानें ॥५५॥
साभिमानेंवीण जळो ज्यालेंपण। जातों वायांवीण सद्भाविकें ॥ ५६ ॥
सद्भाविकें नांव सर्व बुडविलें। धन्य माझें ज्यालें भूमंडळीं ॥ ५७ ॥
भूमंडळीं येक मी माझ्या वैभवें। कोण्ही हि न पावे तुकै ऐसें ॥ ५८ ॥
ऐसें वोसणात घोरे गर्वघोरें। न दिसे दुसरें दृष्टीपुढें ॥ ५९ ॥
दृष्टीपुढें न ये इंद्र चंद्र शिव। बापुडे मानव तेथें किती ॥ ६० ॥
किती आतां पुरे दुष्टाचे स्वभाव। वारियासी वाँव कोण घाली ॥६१॥
कोण घाली मन वर्णाया पतित। परि हा संकेत वोळखीचा ॥ ६२ ॥
वोळखिजे नष्ट ऐसियां चिन्हांचा। नरदेह काचों केला तेणें ॥ ६३ ॥
केला तेणें थोर अपराध जनीं। जनकाची राणी कष्टविली ॥ ६४ ॥
कष्टविली व्यर्थ नवमासवरी। अंतीं येमपुरी प्राप्त तिला ॥ ६५ ॥
प्राप्त तिला नर्क पूर्वजांसहित। धन्य ऐसा सुत भूमिभार ॥ ६६ ॥
भूमिभार पापी नरदेहीं जाला। थितां अंतरला स्वहितासी ॥ ६७ ॥
स्वहिताचा देह कैसा अन्हेरिला। कौडीसमें दिल्हा चिंतामणी ॥६८॥

१ कुजबुजूं लागलें. २ जिणें. ३ महत्त्व. ४ वाव=अवकाश. वाऱ्याची मोट कोण बांधील ? ५ अपारिपक्व. ६ माता. ७ वायां.

चिंता मनीं वाहे कुटंबाची थोर । सोडुनी विचार स्वहिताचा ॥ ६९ ॥
स्वहिताचा देह पाविजेना पुढें । ह्मणौनि रोकडें हित कीजे ॥ ७० ॥
हित कीजे बळें सांडोनि लौकिक । होइजे निःशंक सदाचारें ॥७१॥
सदाचारीं मन निश्चळ करावें । सद्भावें धरावें सत्संगासी ॥ ७२ ॥
सत्संगाचा भर लागतां चित्तासी । तेव्हां स्वहितासी नाहीं उणें ॥७३॥
नाहीं उणें मग आपुलें स्वसुख । निश्चयाचें बीक[1] ठाईं पडे ॥ ७४ ॥
ठाईं पडे हेत तें चि तें स्वहित । ऐसी आहे मात सत्संगाची ॥७५॥
सत्संगाची लीळा तो चि येक जाणे । असत्संग जेणें निरशिला ॥७६॥
निरशिले देह चाऱ्ही देहभाव । सत्संग त्या नांव शास्त्र ह्मणे ॥ ७७ ॥
शास्त्र ह्मणे ऐसें प्रचीतीसी आलें । निःशब्दें चि जालें समाधान ॥७८॥
समाधानी नर सर्वांसी सारिखा । राया आणि रंका भेदु नेणे ॥७९॥
भेदु नेणे भेदीं भेदु नेणे बोधीं । भेदु नेणे द्वंदीं वर्त्ततां हि ॥ ८० ॥
वर्त्ततां व्यापारीं धावतां संसारीं । नांदे घरदारीं परि भिन्न[2] ॥ ८१ ॥
भिन्न जैसें नभ सर्वी बिंबोनीयां । तैसा तो ज्ञानिया काळत्रईं ॥८२॥
काळत्रईं तपे तपन[3] सर्वदा । परि नेणे भेदा तैसा ज्ञानी ॥ ८३ ॥
तैसा ज्ञानी जैसें उदकीं कमळ । असे सर्वकाळ अलिप्त चि ॥ ८४ ॥
अलिप्त रसना रस चघळितां । तैसेपरीं ज्ञाता सर्व करी ॥ ८५ ॥
सर्व करी कर्म वर्णाश्रमधर्म । नित्यादिक नेम चळों नेदी ॥ ८६ ॥
चळों नेदी विधि वेदविभागा चि । वाट पाषांडाची मोडुनीयां ॥८७॥
मोडुनीयां खोटें खरें प्रतिपादी । अभावाची मांदी[4] जाळुनीयां ॥ ८८ ॥
जाळुनीयां कुंडें संस्थापी सत्कर्म । उपासनाधर्म चालावया ॥ ८९ ॥
चालावया पंथ भोळ्यांभाविकांसी । आणि अज्ञानांसी हळु हळु ॥९०॥
हळुं हळु पंथ सात्विकें क्रमिती । ह्मणऊनि भक्ति उपासना ॥ ९१ ॥
उपासना करी सगुण देवाची । वाट अभक्तीची छेदुनीयां ॥ ९२ ॥

---

१ तेज. २ व्यापार, संसार किंवा घरदार या ठिकाणीं तो अभिन्नपणें वर्तत असून पुन्हां त्यापासून निराळा राहतो, ह्मणजे त्यांत च गुरफटून राहात नाहीं. ३ सूर्य. ४ समूह. ५ वाईट.

छेदुनीयां नाना कित संशयाचे । प्रतिपादी साचें आत्मज्ञान ॥ ९३ ॥
आत्मज्ञानें मोक्ष आहे सर्व जीवां । तो चि नावांनावां बोध करी ॥९४॥
बोध करी सर्व जना परोपरीं । नेणे नर नारी येकात्मता ॥ ९५ ॥
येकात्मताज्ञान रामउपासन । सत्कर्मपाळण वेदयुक्त ॥ ९६ ॥
वेदयुक्त ऐसा ज्ञानी वोळखावा । तयासी पुसावा देवदेव ॥ ९७ ॥
देवदेव होतां स्वयें देव होणें । नाथिल्या अनुमानें उरिजेना ॥ ९८ ॥
उरिजेना देहें विदेहें अदेहें । निदान निर्वाहे स्वयमेव ॥ ९९ ॥
स्वयमेव ब्रह्म सद्गुरुकृपेनें । दिनकर ह्मणे रामदास ॥ १०० ॥
रामदास रामीं पावले सद्बोध । तो चि पैं प्रसाद दिनकरा ॥ १०१ ॥
दिनकर ह्मणे परंपरा ऐसी । विख्यात मनासी कल्पवेना ॥ १०२ ॥
कल्पवेना ऐसी साधली सुभूमि । दिनकरा रामीरामदासीं ॥ १०३ ॥

[ १२६ ]

॥ श्रीराम ॥

निर्लज्ज वैष्णव नाहीं लाज यांसी । तें चि अहर्निशीं गाती सदा ॥धृ०॥
हरि नारायण रामकृष्ण ह्मणा । हें चि क्षणक्षणा ह्मणवीती ॥ १ ॥
कांहीं रागरंग नृत्य तानमान । भौटिवेचें चिन्ह तें हि नाहीं ॥ २ ॥
आवडे भांडीव कोकशास्त्रकथा । यावीण सर्वथा कथा काई ॥ ३ ॥
कांहीं गद्यें पद्यें बीर बाल कोडीं । गातां परवडी समाधान ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे ऐसे श्रोते धन्य । करिती अमान्य भगवत्कथा ॥ ५ ॥

[ १२७ ]

॥ श्रीराम ॥

शशि सूर्य तारा ग्रहांचीं मंडळें । जाती अंतराळे कोणे गतीं ॥ १ ॥
कोणे गतीं मेघ वर्षती जीवन । तयांमाजीं जाण विद्युल्लता ॥ २ ॥
विद्युल्लता घँन गर्जना करिती । कैसी यांची रीति निरोपावी ॥ ३ ॥
निरोपावी पृथ्वी आहे कास्यावरी । राहिली निर्धारीं कैसेपरीं ॥ ४ ॥

---

१ विपरीत भाव. २ क्षण–क्षणा. ३ चिकित्सा, अनुमान. ४ व्यवस्था लावतो, निवारण करतो. ५ बीरभाटीव=वीररस. ६ निरनिराळ्या प्रकारांनीं. ७ मेघ.

कैसेपरी चळे समूह जीवांचा । शक्रधनुष्याचा[1] योग कैसा ॥ ५ ॥
योग कैसा तया शशीच्या कळांचा । येती जाती साच्या कोठें कैस्या ॥ ६ ॥
कोठें कैसी राहे उरली सत्रावी[2] । काळिमा ते जीवीं कासियाची ॥ ७ ॥
कासियाची सर्व सृष्टि विकारली । कोणें विस्तारिली कोठुनीयां ॥ ८ ॥
कोठुनीयां सर्व चराचर जालें । कास्याचें वोतलें सांगा स्वामी ॥ ९ ॥
सांगा स्वामी दीन दिनकर ह्मणे । संशय धरणें चुके जेणें ॥ १० ॥

[ १२८ ]

॥ श्रीराम ॥

नभाऐसें ब्रह्म वायोऐसी माया । विचारें प्रत्यया येत असे ॥ १ ॥
येत असे परी करावा विचार । वायो जगदाकार विस्तारला ॥ २ ॥
विस्तारला वायो चंचळ मायावी । नित्य निरावेवीं विचरत ॥ ३ ॥
विचरत सर्व निश्चळीं चंचळ । ह्मणौनि सकळ वायुमुळें ॥ ४ ॥
वायुमुळें पिंडब्रह्मांडरचना । प्रमाणु[3] चळेना तयावीण ॥ ५ ॥
तयावीण कांहीं न घडे सर्वथा । सर्व कर्ता भोक्ता हरिता तो ॥ ६ ॥
हरिता तो सर्व आपणांसहित । दिनकरा मात प्रत्ययाची ॥ ७ ॥

[ १२९ ]

॥ श्रीराम ॥

वेधलेंसे मन तयाचे चरणीं । जयाची करणी असंभाव्य ॥ १ ॥
असंभाव्य लीळा नेणे नीळकंठ । नामें चि संकट निवारिलें ॥ २ ॥
निवारिलें दुं:ख[4] उफराट्या नामें । सुफराट्या नामें कोण बुडे ॥ ३ ॥
कोण बुडे देही स्मरतां श्रीराम । त्रैलोक्यविश्राम कृपाळु जो ॥ ४ ॥
कृपाळु जो लक्ष चौऱ्यासी जीवांसी । स्मरतां चि नाशी जन्म जरा ॥ ५ ॥
जन्म जरा दु:ख रामदासां कैंचें । वर्तणें जयांचें रामरूपीं ॥ ६ ॥
रामरूपीं रामदास कैसेपरी । जैसें भिंतीवरी चित्र पाहें[5] ॥ ७ ॥

---

१ इंद्रधनुष्याचा. २ जीवनकळा. ३ परिमाणु. ४ वाल्याकोळ्याचें दु:ख. ५ भिंतीवरील चित्र भिंतीपासून निराळें नसतें त्याप्रमाणें.

पाहें जैसी नभीं नीळिमा-प्रकाश । तैसे रामदास स्वरूपेंसीं ॥ ८ ॥
स्वरूपें निर्मळ उदास केवळ । ऐसें करी शील नाम ज्याचें ॥ ९ ॥
नाम ज्याचें ऐसें दिनकर ह्मणे । तयासी वर्णनें कोणेपरीं ॥ १० ॥

[ १३० ]

॥ श्रीराम ॥

न धरवे धीर वाटतसे खंति । केंव्हां कृपामूर्ति देखेन मी ॥ १ ॥
देखेन केधवां जीवाचा विसांवा । देहीं देहभावा नुरऊनी ॥ २ ॥
नुरऊनि भाव दिनकर ह्मणे । उठो हें धरणें वियोगाचें ॥ ३ ॥

[ १३१ ]

॥ श्रीराम ॥

हरिभक्त ज्ञानी पूर्णसमाधानी । जयांची रहणी अनुर्वाच्य ॥ १ ॥
अनुर्वाच्य त्यांच्या दर्शनें स्पर्शनें । सुखसंभाषणें असंभाव्य ॥ २ ॥
असंभाव्य साधु ह्मणे दिनकर । घडो निरंतर दास्य त्यांचें ॥ ३ ॥

[ १३२ ]

॥ श्रीराम ॥

घडो दास्य मज संतांचें ये देहीं । तेणें लवलाही उद्धरेन ॥ १ ॥
उद्धरणें माझें आहे त्यांचे पाईं । तयांवीण नाहीं त्रिभुवनीं ॥ २ ॥
त्रिभुवनीं कायावाचामनेंप्राणें । नेणे दुजेपणें दुजें कांहीं ॥ ३ ॥
दुजें कांहीं कैंचें चरणांवांचूनि । अवस्था उन्मनी जेथें जीवा ॥ ४ ॥
जेथें जीवा होये वाव बंदमोक्ष । ते पाहे प्रत्यक्ष संतपाये ॥ ५ ॥
संतपाये ऐसे असंभाव्य जनीं । घेईन मी धणी[1] निरंतर ॥ ६ ॥
निरंतर ह्मणे दिनकर आतां । साधन तत्वतां नाहीं दुजें ॥ ७ ॥

[ १३३ ]

॥ श्रीराम ॥

दुजें नाहीं कांहीं मुक्तीचें साधन । चरणांवांचून संतांचीया ॥ १ ॥

---

१ तृप्ति होईपर्यंत.

संतांचिये पाईं आहे निजगूज । लाधलें[१] हें मज मजवींण ॥ २ ॥
मजवीण मज दिनकर ह्मणे । अखंड साधणें संतपायें ॥ ३ ॥

[ १३४ ]

॥ श्रीराम ॥

संतांचिये पाईं नाहीं भाव जया । तो जीव रुणिया यातनेचा ॥ १ ॥
यातनेचे बंदीं पडे अहंभावें । विषयवैभवें लोधोनीयां ॥ २ ॥
लोधोनियां प्राणी जाय अधःपातीं । भोगी यातायाती निरंतर ॥ ३ ॥
निरंतर पापी संतकृपेंवीण । जननीस शीण व्यर्थ केला ॥ ४ ॥
व्यर्थ जिणें त्याचें जाला भूमिभार । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ १३५ ]

॥ श्रीराम ॥

जळो या मूढांची वाणी संशयाची । कानीं पडतां चि अनहित ॥ १ ॥
अनहित होतें मूर्खांच्या संयोगें । दिनकर सांगे कळयुगीं ॥ २ ॥

[ १३६ ]

॥ श्रीराम ॥

सीण नको करूं कांहीं । राघवाचा छंदु घेईं ॥ ध्रु० ॥
रामीं होईं सावधान । तुझें आहे येथें कोण ॥ १ ॥
येणें जाणें येकायेकीं । अवघीं राहती विषयसखीं ॥ २ ॥
दिनकर ह्मणे दीनानाथ । ध्यातां होईजे सनाथ ॥ ३ ॥

[ १३७ ]

॥ श्रीराम ॥

राम दासांचा कैंपेक्षी[२] । काळांतरीं हि नुपेक्षी ॥ ध्रु० ॥
पतितपावन ऐसें नाम । जया शोभे अविश्रमें[३] ॥ १ ॥
बहुत सुकृतेंकरीं[४] । दीनानाथ साहकारी ॥ २ ॥
दिनकर ह्मणे धन्य धन्य । दीनोद्धारी रघुनंदन ॥ ३ ॥

---

१ झोंबून. २ कैवारी. ३ निरंतर. ४ करीं=योगानें, मुळें.

[ १३८ ]

॥ श्रीराम ॥

नाम गोड नाम गोड । सेवी त्याचे पुरे कोड ॥ ध्रु० ॥
हरि हरि हरि हरि । परतल्या वाचा च्यान्ही ॥ १ ॥
सुख सांगों कैसें पैरीं । निश्चयासी आली हारी ॥ २ ॥
दिनकर ह्मणे ऐसी पैरी । नाम करी निजनिर्धारीं ॥ ३ ॥

[ १३९ ]

॥ श्रीराम ॥

दासांचें जें उणें न साहे जयासी । त्या दीनबंधूसी शरण जावें ॥ १ ॥
शरण जावें तया घालील पाठीसी । सन्मुख काळासी येवं नेदी ॥ २ ॥
येवं नेदी कांहीं दासां जडभारीं । अंपंगूनि वारी दैन्यदुःख ॥ ३ ॥
दैन्यदुःख कैंचें देवाच्या दासांसी । मागें पुढें त्यांसी सांभाळितो ॥ ४ ॥
सांभाळितो देव दासां निरंतर । ह्मणे दिनकर सप्रचीत ॥ ५ ॥

[ १४० ]

॥ श्रीराम ॥

जेथें नाहीं आत्मज्ञान । तेथें कैंचें समाधान ॥ ध्रु० ॥
सावधान सावधान । अखंड नामीं अनुसंधान ॥ १ ॥
देहबुद्धीच्या सन्मानें । फुंजों नका अभिमानें ॥ २ ॥
वैभव जाईजेणें पाहो । याचें शाश्वत धरिलें काय ॥ ३ ॥
आतां तऱ्ही सावध होईं । सद्गुरूसीं शरण जाईं ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे पाहें । कळिकाळ दुर्घट आहे ॥ ५ ॥

[ १४१ ]

॥ श्रीराम ॥

आत्मज्ञानाचें विंदाणें । जाणे तो चि तो सज्ञान ॥ ध्रु० ॥
भावें शरण त्यासी जावें । प्रचीतीनें समजावें ॥ १ ॥
निरंतर समाधानी । ज्यांसी द्वैताची सिराणी ॥ २ ॥

---

१ प्रकारानें. २ गोष्ट. ३ संकट. ४ पोसून, संरक्षण करून. ५ अशाश्वत. ६ लक्षण. ७ महत्व, श्रेष्ठता.

भक्तिज्ञानेंसीं वैराग्य । ज्याचे ठाईं हें सौभाग्य ॥ ३ ॥
शांति क्षमा आणि दया । वस्ति आल्या जया ठाया ॥ ४ ॥
अखंड अनुसंधानीं भर । मोक्ष देऊनी उदार ॥ ५ ॥
न्यायनीतीसीं मर्यादा । संप्रदाईं हे संपदा ॥ ६ ॥
दिनकर ह्मणे ऐसा संत । भाग्यें भेटे अकस्मात ॥ ७ ॥

[ १४२ ]

॥ श्रीराम ॥

दोष करितां सुख वाटे । झाडा देतां हृदय फुटे ॥ ध्रु० ॥
आपेंआप पडे फासां । बोल नाहीं जगदीशा ॥ १ ॥
समाधान गिळितां गळ । वोढितां मच्छा तळमळ ॥ २ ॥
अनाचारें झांकी डोळे । आंगीं जडतां आरंबळे[1] ॥ ३ ॥
पापें करितां न मनी कोण्हा । अंतीं दिसे केविलवाणा ॥ ४ ॥
येथें शब्द नाहीं देवास । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ १४३ ]

॥ श्रीराम ॥

भकाश[2]मंडपामाझारीं । बैसले संत परात्परीं ॥ ध्रु० ॥
कथा करितां निरंतरीं । उसंत[3] नाहीं क्षणभरी ॥ १ ॥
अखंड नामीं अनुसंधान । जडलें मीतूंपणेंवीण ॥ २ ॥
अनुहातें[4] टाळी वाजे । तेणें घोषें अंबर गाजे ॥ ३ ॥
रवि शशी दोही भागीं । दोघे समभावें मृदांगी ॥ ४ ॥
माजीं गाती रामदास । तो आनंद गिळूं पाहे गगनास ॥ ५ ॥
स्वरयुक्त टाळ धरी । सोळाजण[5] विशमहारी ॥ ६ ॥
ऐसें अखंड कीर्तन । पाहतां उन्मीळित लोच्यनें[6] ॥ ७ ॥

---

१ हरंबळणें=तळमळणें. २ भकास=उध्वस्त, उजाड. ३ विसावा. ४ मध्यें खळ न पडतां, अखंड. ५ पंचतन्मात्रा, पंचज्ञानेंद्रियें, पंचकर्मेंद्रियें व मन अशीं सोळा सूक्ष्म तत्वें. ६ ब्रह्मांडांतील या अखंड कीर्तनानंदाचा अनुभव घेण्याइतकी विशाल दृष्टि श्रीदिनकरांची झाली होती हें या अभंगावरून स्पष्ट दिसतें !

मीतूंपणा सुटतां गांठी । अपार कीर्तनाची लुटी ॥ ८ ॥
ऐसा लुटिला जगदीश । ह्मणे दिनकररामदास ॥ ९ ॥

[ १४४ ]

॥ श्रीराम ॥

ज्यांचे वाचे न ये नाम । त्यांसी फार छळिती येम ॥ ध्रु० ॥
ध्या रे नाम राघवाचें । सोपें सुगम फुकाचें ॥ १ ॥
जो लाजे हरिकीर्तना । तो वर्णसंकर जाणा ॥ २ ॥
द्वेषें न मनी जो संतांस । त्याच्या पितरां नर्की वास ॥ ३ ॥
शके वाजवितां टाळी । त्यासी दुःखाची दिवाळी ॥ ४ ॥
न मनी पुराण कीर्तन । त्यासी यमपाशीं बंधन ॥ ५ ॥
निंदी सन्मार्ग संतांसी । अधःपतन त्याच्या वंशासी ॥ ६ ॥
तीर्थ क्षेत्र जे निंदिती । तप्तलोहीं ते लोळती ॥ ७ ॥
झोंपी जाये हरिकीर्तनीं । तो नपुंशक जन्मोजन्मीं ॥ ८ ॥
दिनकररामदास ह्मणे । सार्थक होतसे कीर्तनें ॥ ९ ॥

[ १४५ ]

॥ श्रीराम ॥

भावें ऐकावें कीर्तन । नाम ध्यावें धरुनी कान ॥ ध्रु० ॥
तेणें उद्धार वंशासी । तारक राम भाविकांसी ॥ १ ॥
ज्यांचे वंशीं हरिभक्ति । कैवल्यपदीं ते वसती ॥ २ ॥
टाळ मृदांग नाना ध्वनी । गर्जती वैष्णववीर वाणीं ॥ ३ ॥
दिंडी पताका महोच्छाव । कीर्तनीं नाचती वैष्णव ॥ ४ ॥
कळिकाळा पडिला धाक । वैष्णव गर्जतां निःशंक ॥ ५ ॥
थोर कळियुगीं कीर्तन । बाधक जप तप अनुष्ठान ॥ ६ ॥
अवस्थातीत नामघोष । तेथें दिनकररामदास ॥ ७ ॥

---

१ भ्रष्ट, २ कान धरून=अनन्य, नम्र होऊन.

[ १४६ ]

॥ श्रीराम ॥

पहा नवल वर्तलें कैसें । माझें मीपण जालें अनारिसें ॥ ध्रु० ॥
धन्य धन्य सद्गुरुचोज । नाचविलें स्वानंदाचें भोजें ॥ १ ॥
पाहतां पाहणें न दिसे दृष्टी । आत्माराम अभेद सृष्टीं ॥ २ ॥
दिनकरा[2] दिनकर सर्व । जेथें निर्द्वंद भावाभाव ॥ ३ ॥

[ १४७ ]

॥ श्रीराम ॥

परात्पर साधूं जाणे । तो चि साधु पूर्णपणें ॥ ध्रु० ॥
तैसे साधु कोण पुसे । ज्यांसी स्वरूपज्ञान नसे ॥ १ ॥
परात्पर पराद्वारें । प्राप्त होतसे विचारें ॥ २ ॥
गुरूविण न कळे हें भडसें[3] । ह्मणे दिनकररामदास ॥ ३ ॥

[ १४८ ]

॥ श्रीराम ॥

पहा न धरी जनकाँची भीड । मातेलागीं ह्मणे द्वाड ॥ ध्रु० ॥
कैसा मातला सज्जन । समान धरी जन विजन[6] ॥ १ ॥
त्यजूनि दोघे निजस्वार्थे । निघे वेगळा परमार्थे ॥ २ ॥
घेऊनि गुणसौम्या नोवरी । वसे गगनाचां मंदिरीं ॥ ३ ॥
न मनी वेद शास्त्र देव । ह्मणे हें जननीचें लाघव ॥ ४ ॥
ऐसा बाईलेच्या छंदें । नाचे अखंड निजानंदें ॥ ५ ॥
बोधपुत्र क्षमासून । त्यांवरी कृपा करी पूर्ण ॥ ६ ॥
ऐसा हीनें सर्वगुणें । दिनकररामदास ह्मणे ॥ ७ ॥

---

१ राज्य. २ भावाभावशून्य अद्वैत स्थिति प्राप्त झाल्यावर श्रीदिनकरांना स्वस्वरूपाशिवाय दुसरें कांहीं च दिसेना. ३ महत्व. ४ ब्रह्माची. ५ सायेस. ६ अरण्य, एकांतवास. ७ त्रिगुणांचा गर्भ धारण करणारी. ८ कुशलता. ९ या ठिकाणीं हें विशेषण उपरोधिक आहे.

[ १४९ ]

॥ श्रीराम ॥

समाधानापरतें सुख । पाहतां न दिसे निःशेष ॥ ध्रु० ॥
काळत्रईं अबाधित । रामें केलें सदोदित ॥ १ ॥
ज्ञान ज्ञेयीं हारपलें । ज्ञेय ज्ञेईं सामावलें ॥ २ ॥
दिनकररामींरामदास । अखंड जनींवनीं उदास ॥ ३ ॥

[ १५० ]

॥ श्रीराम ॥

लीळा न कळे राघवजीची । स्थित चाळी[1] त्रैलोक्याची ॥ ध्रु० ॥
धन्य रामींरामदास । भजतां जाले पैं उदास ॥ १ ॥
देहीं विदेहीं अदेहीं । रामेंवीण दुजें नाहीं ॥ २ ॥
आदि मध्य अंत राम । न भजतां गांजिल येम ॥ ३ ॥
नाम रूप नाशे कर्म । अविनाश येक आत्माराम ॥ ४ ॥
तो चि जोडला आह्मांस । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

( १५१ )

॥ श्रीराम ॥

न कळे राग तानमान । येक जाणों नारायण ॥ ध्रु० ॥
ऐसा आमचा धांगडधिंगा । गोड लागे पांडुरंगा ॥ १ ॥
नेणों कळाकौशल्यता । पदप्रबंध अन्वयकथा ॥ २ ॥
नेणों कथनी नेणों ज्ञान । नेणों तत्वांचें विवरण ॥ ३ ॥
नेणों सभाजन सज्जन । नेणों चातुर्याची खूण ॥ ४ ॥
ऐसे आह्मी ठसठोंबेस[2] । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ १५२ ]

॥ श्रीराम ॥

मुळीं मूळहेत संपूर्ण । तें चि शोभे सुखासन[3] ॥ ध्रु० ॥
आह्मी भोई आह्मी भोई । देहीं विदेहीं अदेहीं ॥ १ ॥

१ चाळवी. २ विद्या हीन, कलाहीन, अक्षरशत्रु. ३ पालखी.

चतुर्विधा भक्ति बरी । ते चि सुपती माझारीं ॥ २ ॥
टेंकावया टेंकणें लोड । मऊ विवेक वाडेंवाड ॥ ३ ॥
धृति निजधैर्याची दांडी । ज्यांन्हीं देह वागविती गडी ॥ ४ ॥
वरी पिंजरी चिद्रूपाची । निजवृत्ति निश्चयाची ॥ ५ ॥
बैसणामाजीं आत्माराम । परिपूर्णत्वें निष्काम ॥ ६ ॥
दिनकरा सुख लाधलें । भोईपणीं पद शोभलें ॥ ७ ॥

[ १५३ ]

॥ श्रीराम ॥

घोषें गर्जतां गोविंद । श्रोत्यांवक्त्यांसी आनंद ॥ ध्रु० ॥
आतां व्हावें सावधान । जालें कीर्तन संपूर्ण ॥ १ ॥
करीं टाळी वाचे राम । हा चि सार्थकसंभ्रम ॥ २ ॥
ऐकोनि नामाचा गजर । पळती येमाचे किंकर ॥ ३ ॥
स्वासोस्वासीं नारायण । जपतां नाहीं मृत्युजन्म ॥ ४ ॥
नित्य यावें कीर्तनास । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ १५४ ]

॥ श्रीराम ॥

पोटीं विषयांचा अभिळाश । वरिवरि दाखवी भजनास ॥ ध्रु० ॥
बाप धन्य तो दैवाचा । नव्हे सबाह्य राम साचा ॥ १ ॥
माळामुद्रावेषधारी । टिळाटोपी डंबं करी ॥ २ ॥
ह्मणे दिनकररामदास । स्वरूपेंवीण गर्भवास ॥ ३ ॥

[ १५५ ]

॥ श्रीराम ॥

धन्य आजिचा दिवस । स्वामीचरणीं रहिवास ॥ ध्रु० ॥
आह्मी दैवाचे दैवाचे । चरण देखिले संतांचे ॥ १ ॥
कैंचा जन्म मृत्यु जरा । काळ केला पाठिमोरा ॥ २ ॥
घोषें वेतां रामनाम । महापापें जालीं भस्म ॥ ३ ॥

---

१ आर्त, जिज्ञासा, अर्थार्थ व ज्ञान. (स्वा. दि. ८-३-३) २ स्थूलसूक्ष्मादि. ३ पिंजरा. ४ अंतर्बाह्य. ५ दंभ.

भावें हरिदास गर्जती । तेणें श्रवणें कैवल्यप्राप्ति ॥ ४ ॥
नित्य यावें हरिकीर्तना । तेणें संसार भंगोणा[1] ॥ ५ ॥
सकळां हा चि नमस्कार । अखंड सेवा हरिजागर ॥ ६ ॥
कीर्तन तारक सर्वांस । ह्मणे दिनकररामदास ॥ ७ ॥

[ १५६ ]

॥ श्रीराम ॥

येका आत्मज्ञानेंवीण । जितुलें ज्ञान तितुलें शून्य ॥ ध्रु० ॥
करूनि दृष्टि ऊफराटी । घेणें आपेंआप[2] भेटि ॥ १ ॥
दिनकररामदास ह्मणे । अनुभवी तो चि जाणे ॥ २ ॥

[ १५७ ]

॥ श्रीराम ॥

सात पद चौदा कर । नव तोंडें पांच नेत्र ॥ ध्रु० ॥
ऐसा देखतां हेरंबै[3] । गेला संसार स्वयंभ ॥ १ ॥
दीढ शिर लंबोदरु । दाहा दशन सुंदरु ॥ २ ॥
दिनकरा रामदासीं । भेटि जाली मूळपुरुषीं ॥ ३ ॥

[ १५८ ]

॥ श्रीराम ॥

श्वानामुखीं परमान्न । मर्कटासी सिंहासन ॥ ध्रु० ॥
तैसें विषयासक्ता ज्ञान । प्राप्त जालें पारि तें भिन्न ॥ १ ॥
अंधाघरीं सूर्य उभा । नपूंसकापुढें रंभा ॥ २ ॥
दिनकरा सद्गुरुवीण । सेळियेगळां जैसे स्तन ॥ ३ ॥

[ १५९ ]

॥ श्रीराम ॥

गोंचिड लिगटे दुधापासीं । परि ते सेवी अशुद्धांसी[4] ॥ ध्रु० ॥
तैसा हृदईं आत्माराम । त्यजूनि धरिती विषयकाम ॥ १ ॥
बेडुक अखंड कमळापासीं । परि गांठी पडली चिखलेसीं ॥ २ ॥
दिनकरा रामामाजीं जन । जैसे उदकांत पाषाण ॥ ३ ॥

---

१ नाश. २ आपली आपण. ३ विराटपुरुषरूपी गणपति. ४ रक्त.

[ १६० ]

॥ श्रीराम ॥

आत्मज्ञानेंवीण नर । नर नव्हे खरा खर[1] ॥ ध्रु० ॥
व्हावें सावध नरदेहीं । आयुष्य जातसे लवलाहीं ॥ १ ॥
गेली घटिका न ये पुढें । स्वहित करावें रोकडें ॥ २ ॥
दिनकरा ज्ञानेंवीण । न चुके जन्ममृत्युशीण ॥ ३ ॥

[ १६१ ]

॥ श्रीराम ॥

जैसें तडाग[2] जीवनेंवीण । तैसें भजनावांचुनि ज्ञान ॥ ध्रु० ॥
भजन सार भजन सार । भजनें होय जगदोद्धार ॥ १ ॥
जैसें सूर्येवीण आकाश । तैसा भजनरहित स्वप्रकाश ॥ २ ॥
दिनकरा भजनेंवीण । शब्दब्रह्माची ठणठण[3] ॥ ३ ॥

[ १६२ ]

॥ श्रीराम ॥

नवजाय कधीं हरिकीर्तना । धांवे वेश्येच्या रंगणा[4] ॥ ध्रु० ॥
धिग्य धिग्य त्याचें जाळें । पूर्वज रौरवीं घातले ॥ १ ॥
निघे वेश्येसी सामोरा । लपे संत येतां घरा ॥ २ ॥
वर्णी वेश्यांचीया गुणा । संतां निंदी क्षणक्षणा ॥ ३ ॥
लोळे वेश्येच्या पायितीं[5] । थुंकी देखोनीयां संतां ॥ ४ ॥
वेश्येसाठीं फुलें पानें । संतांघरीं घेतो घेणें[6] ॥ ५ ॥
निःशंक नर्की जैसा किडा । तैसा वेश्यांमार्जी वेडा ॥ ६ ॥
ह्मणे दिनकर मनोभावें । जैसें करी तैसें पावे ॥ ७ ॥

[ १६३ ]

॥ श्रीराम ॥

कैसा करावा विचार । संतीं मांडिला जोजार[7] ॥ ध्रु० ॥

---

१ गाडव. २ तळें. ३ रिकाम्या भांड्याच्या आवाजाप्रमाणें पोक
४ सभामंडपांत. ५ पायथ्याशीं. ६ मानमरातब. ७ संकट.

संत नाचती आनंदें । निंदक तारावे गोविंदें ॥ १ ॥
अखंड पडिले उठिले घरीं । हे तोडावे शस्त्रेंकरीं ॥ २ ॥
बुडविलीं आमुचीं घरें । उदास केलीं रांडापोरें ॥ ३ ॥
यांचें न व्हावें दर्शन । संत जावे देशींहून ॥ ४ ॥
दिनकररामदास ह्मणे । जैसें देणें तैसें घेणें ॥ ५ ॥

[ १६४ ]

॥ **श्रीराम** ॥

पैलं[1] पाहें कीर्तनीं देव । डोले सोडुनि देहभाव ॥ ध्रु० ॥
काय किती झोंपीं जाणें । घाला घातला पापानें ॥ १ ॥
तीर्थांचीया कोडी[2] । उभीं व्रतें[3]परवडीं ॥ २ ॥
प्रेमें डोलती हरिदास । नयनीं लक्षूनी परेश ॥ ३ ॥
सकळ देव रिद्धिसिद्धि । श्रवणीं तत्पर निरोपाधी ॥ ४ ॥
ऐसे स्थळीं विकल्प[4] । दिनकर ह्मणे तें चि पाप ॥ ५ ॥

[ १६५ ]

॥ **श्रीराम** ॥

देव देव देव देव । देव ह्मणतां कैंचा भेव ॥ ध्रु० ॥
अखंड नाचावें उडावें । नाभिस्वरें[5] नाम ध्यावें ॥ १ ॥
वाजउनी करताळिका । हाकारावें[6] रामा येका ॥ २ ॥
कथाकरुणेच्या[7] कल्लोळें । वोसंडावे नेत्र जळें ॥ ३ ॥
होऊनि सप्रेम स्वानंदें । सोडवावीं कळीचीं ब्रीदें ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे रामदास्य । मोठें ब्रीद हें संतांस ॥ ५ ॥

[ १६६ ]

॥ **श्रीराम** ॥

घोषें गर्जतां गोविंद । श्रोत्यांवक्तयांसी आनंद ॥ ध्रु० ॥
ध्यावें नाम गोविंदाचें । जळती पर्वत महापापांचे ॥ १ ॥

---

१ पलीकडे. २ कोटीसंख्या. ३ उपचार, प्रकार. ४ विपरीत भावना. ५ नाभीपासून उत्पन्न होणाऱ्या तार किंवा उंच स्वरानें. ६ मोठ्यानें बोलवावें. ७ करुणकथेच्या. ८ भरून वाहावे.

हरिकीर्तनासी यावें । सावध होऊनि बैसावें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे तैं सार्थक । कथेसी होतां मन निष्टंक[1] ॥ ३ ॥

[ १६७ ]
॥ श्रीराम ॥

धंदा करितां जातो काळ । कैसा नेणे तो बरळ ॥ ध्रु० ॥
नेणे सार्थक आपलें । माझें माझें ह्मणतां मेलें ॥ १ ॥
दिवसा धंदा रात्रीं झोंप । सिकवितां मानी कोप ॥ २ ॥
दिनकर ह्मणे तो चांडाळ । ज्यासी भजनाचा विटाळ ॥ ३ ॥

[ १६८ ]
॥ श्रीराम ॥

विचार कीजे या द्वैताचा । राहे[3] देव तो चि साचा ॥ ध्रु० ॥
देव निर्मळ निश्चळ । माया समळ चंचळ ॥ १ ॥
चंचळ मायेचा निरास । होतां देव चि सावकाश ॥ २ ॥
जेथें पूर्वपक्ष[4] नाहीं । तेथें देव न पडे ठाईं ॥ ३ ॥
चंचळ निश्चळ ह्मणती येक । ते पंडीत पढतमूर्ख ॥ ४ ॥
दिनकररामदास ह्मणे । संतसंगें खूण बाणे ॥ ५ ॥

[ १६९ ]
॥ श्रीराम ॥

जें जें दिसे तें तें नाशे । न दिसे तें जैसें तैसें ॥ ध्रु० ॥
तें चि व्हावें संतसंगें । देहबुद्धीच्या वियोगें ॥ १ ॥
सर्वातीत परब्रह्म । अखंड निर्मळ निष्काम ॥ २ ॥
ह्मणे दिनकररामदास । अविनाशीं कैंचा नाश ॥ ३ ॥

[ १७० ]
॥ श्रीराम ॥

प्रकट जालें घरोघरीं । बोंब पडली राजद्वारीं ॥ ध्रु० ॥
काय सांगावें तें कैसें । थोरथोरां कळलें असे ॥ १ ॥

---

१ निश्चिंत. २ छांदिष्ट, अभिष्ट. ३ अविनाशपणें नित्य राहणारा. ४ देवाच्या स्वरूपाविषयीं शंकासमाधान. ५ प्राप्त व्हावें.

न संगतां प्रकटे गूज । न कळे प्रारब्धाचें चोज ॥ २ ॥
दिनकरा निर्लज्जपणें । अखंड जनींवनीं वसणें ॥ ३ ॥

[ १७१ ]

॥ श्रीराम ॥

थिंता अर्थ पराहातीं । देऊनि करीं कुंथाकुंथी ॥ ध्रु० ॥
कैसें पाहें पां नवल । सूर्य आंधारें व्याकुळ ॥ १ ॥
इच्छा धरितां व्याजांची । हानी होतसे मुदलाची ॥ २ ॥
दिनकररामदास ह्मणे । दिवाळखोरीं हें करणें ॥ ३ ॥

[ १७२ ]

॥ श्रीराम ॥

व्याजाचिये आशें । तेळींचें बाहिर ये आपैसें ॥ ध्रु० ॥
देतां ख्यातीचेनि भरें । न विचारी खोटें खरें ॥ १ ॥
मागों जातां न पडे गांठीं । गोठीं सांगतसे उफराटी ॥ २ ॥
व्याजासकट गिळी मुदल । ह्मणे दिनकर तो खोंट्याळ ॥ ३ ॥

[ १७३ ]

॥ श्रीराम ॥

सीतानाथ सीतानाथ । भजे तो केवि अनाथ ॥ १ ॥
येमधाम येमधाम । जेथें नाहीं श्रीरामनाम ॥ २ ॥
दिनकरा रामीं गम्य । नामें चि विश्रामधाम ॥ ३ ॥

[ १७४ ]

॥ श्रीराम ॥

राम राम राम राम । राम ह्मणतां कांपे येम ॥ १ ॥
बाधक योगयागकर्म । तारक येक रामनाम ॥ २ ॥
दिनकरा स्मरतां राम । धाकें पळती कळिकाळ कॉम ॥ ३ ॥

---

१ जवळ असलेला. २ तळघरांतलें. ३ आपोआप. ४ ( विश्रामधामाची ) प्राप्ति. ५ मदन.

[ १७५ ]

॥ श्रीराम ॥

बहुतें निंदकें नाडलीं । कृतत्रेताद्वापारकळीं ॥ ध्रु० ॥
देव भावाचा आंखिला । निंदकांसी दुऱ्हावला ॥ १ ॥
भावें भाविकें तरलीं । कीर्तिरूपें विस्तारलीं ॥ २ ॥
मिळो भाविक निमिष्यभरी । न मिळो निंदक कल्पवरी ॥ ३ ॥
भाविकांसी रक्षी देव । निंदकाचे शिरीं घाव ॥ ४ ॥
भावें दिनकर रामीं । विनटला पूर्णकामीं ॥ ५ ॥

[ १७६ ]

॥ श्रीराम ॥

तारांगणीं भरिलें नभा । चंद्रेवीण कैंची शोभा ॥ ध्रु० ॥
तैसीं उदंड देवोदेवीं । रामेंवीण काय करावीं ॥ १ ॥
बत्तीस लक्षणें देहीं । परि तो येक चि प्राण नाहीं ॥ २ ॥
फळेंवीण बहुतें फुलें । ह्मणे दिनकर अवघीं फोलें ॥ ३ ॥

[ १७७ ]

॥ श्रीराम ॥

मनुष्येंवीण देश । जैसें कणेंवीण कणीस ॥ ध्रु० ॥
तैसें रामेंवीण सर्व । अवघी डंबाची राणीवं ॥ १ ॥
जैसें शरीर सावेव । परि नासिकासी अभाव ॥ २ ॥
दिनकरा पाहें कैसें । दृष्टीवीण डोळस जैसें ॥ ३ ॥

[ १७८ ]

॥ श्रीराम ॥

अऱ्हांसऱ्हा बोले ज्ञान । परि तें न दिसे भजनाचें चिन्ह ॥ ध्रु० ॥
तरि तें अवघें शब्दज्ञान । व्यर्थ बोलांचें भूषण ॥ १ ॥
साधनेंवीण भोजन । प्रेमेंवीण तें गायन ॥ २ ॥

---

१ अडकली. २ अंकित झाला. ३ रंगून गेला. ४ व्यर्थ. ५ इकडले तिकडले.

दिनकरा ब्रह्मज्ञान । कामा न ये भजनेंवीण ॥ ३ ॥

[ १७९ ]

॥ श्रीराम ॥

अभाग्य निंदी संतजना । सभाग्य वंदी क्षणक्षणां ॥ ध्रु० ॥
जैसा भाव तैसी सिद्धि । निमग्न संत निजानंदीं ॥ १ ॥
थुंकूं जातां नभाकडे । फिरोनि थुंका तोंडीं पडे ॥ २ ॥
दिनकरा नवल कैसें । दर्पणीं पाहावें तैसें भासे ॥ ३ ॥

[ १८० ]

॥ श्रीराम ॥

अनुभवाचें सोडुनि वर्म । जो तो ह्मणे सगुणब्रह्म ॥ ध्रु० ॥
ब्रह्म क्षराक्षरातीत । ऐसें शास्त्रांचें संमत्त ॥ १ ॥
ब्रह्म नित्य निर्विकार । कैसें घडे तें सविकार ॥ २ ॥
ब्रह्म निर्गुण निराकार । केवि सगुण तें साकार ॥ ३ ॥
ब्रह्म नित्य सदोदित । सर्वा होतो उदय अस्त ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे माया ब्रह्म । ह्मणती ते पापी अधम ॥ ५ ॥

[ १८१ ]

॥ श्रीराम ॥

कर्म उपासना ज्ञान । वेदीं आहे परिछिन्न ॥ ध्रु० ॥
वेदां दूषी तो चांडाळ । ज्ञानी नव्हे तो नव्यांळ[1] ॥ १ ॥
सकळ जीवां वेदाधार । वेदाधारें सचराचर ॥ २ ॥
वेद नेणोनियां पापी । भरती संकल्पविकल्पीं ॥ ३ ॥
टवाळ[2] ज्ञानें कथिती खोटीं । साक्षीवीण आटाआटी[3] ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे रामदास । साक्षीवीण ज्ञान फोसें[4] ॥ ५ ॥

[ १८२ ]

॥ श्रीराम ॥

आह्मी दास हरिदासांचे । शिरीं वाहों त्यांचे मोचे[5] ॥ ध्रु० ॥

---

१ नष्ट, द्वाड. २ लटिकीं, निरर्थक. ३ दगदग, श्रम. ४ व्यर्थ, तुच्छ. ५ जोडे.

धन्य जालों तेणें गुणें । सरता केलों प्रेमखुणें ॥ १ ॥
सेवा लागली अनिवार । कांहीं न कारितां अपार ॥ २ ॥
दिनकर ह्मणे जाणे । जो रीते तनुमनें ॥ ३ ॥

[ १८३ ]
॥ श्रीराम ॥

जळें लवण सिवतलें[3] । जैसें नुरे चि वेगळें ॥ ध्रु० ॥
तैसें मिळतां रामरूपीं । विरोनि[4] जाणे पुण्यपापीं ॥ १ ॥
स्वयें समुद्र जाली गंगा । नाम रूप गेलें भंगा[5] ॥ २ ॥
स्वयें चंदन जाल्या बोरी । रामीं दिनकर ऐसेंपरीं ॥ ३ ॥

[ १८४ ]
॥ श्रीराम ॥

जैसी निजध्यासें अळी । सर्वांगें भ्रमर जाली ॥ ध्रु० ॥
तैसें रामरूप व्हावें । सोहंभावीं परतावें ॥ १ ॥
जळीं पडतां जळगार । विलंब नाहीं होतां नीर ॥ २ ॥
परिसें लोह सुवर्ण केलें । रामें दिनकर सामाविलें ॥ ३ ॥

[ १८५ ]
॥ श्रीराम ॥

नाथ असतां अनाथ केलें[6] । भव नसतां भवीं बुडविलें ॥ ध्रु० ॥
कैसी कल्पना लागली पाठीं । माझी मज चि पाडिली तुटी ॥ १ ॥
स्वयें पावन पतित होणें । देवा भजणें विभक्तपणें ॥ २ ॥
दिनकरा सद्गुरुवीण । कोण करी इचें कंदन[7] ॥ ३ ॥

[ १८६ ]
॥ श्रीराम ॥

आतां कैसें करुं रे देवा । मज माझी च लागली सेवा ॥ ध्रु० ॥
पाहतां पूज्य पूजक दोन्ही । थितें येकपण गेलें हारपोनि ॥ १ ॥

---

१ वंद्य, पुढारी. २ रत होई. ३ शिवलें, मिळालें. ४ एकरूप होऊन. ५ नाशाप्रत. ६ कोणीं? तर कल्पनेनें. ७ हनन.

ज्ञान ज्ञेय ज्ञातेंपण । सामावलें ध्येय ध्याता ध्यान ॥ २ ॥
दिनकरा रामींरामदास । रामेंवीण रामीं सौरसें[4] ॥ ३ ॥

[ १८७ ]

॥ श्रीराम ॥

माझें चित्त तुझे पाईं[1] । जडलें राहो निसंदेहीं ॥ ध्रु० ॥
भय गेलें देवराया । काळ वंदी आमच्या पायां ॥ १ ॥
केवों[2] कोण इतरांचा । अवघा प्रताप सद्गुरूचा ॥ २ ॥
सरतों[3] जालों संतांपाईं[1] । पुढें आतां भय काई ॥ ३ ॥
दिनकररामदास ह्मणे । ज्याचें सुख तो चि जाणे ॥ ४ ॥

[ १८८ ]

॥ श्रीराम ॥

अतुंर वैराग्य उपजे मानसीं । स्त्रीपुत्रधनासी नाश जेंव्हां ॥ ध्रु० ॥
स्वसुखदायक विवेक वैराग्य । जेंव्हां महद्भाग्य तेंव्हां लाभे ॥ १ ॥
संपदेच्या नाशें त्रासला अंतरीं । धरिलें शरीरीं दुःख थोर ॥ २ ॥
दुःखें जाजावला जाला वनवासी । विटंबी वेषासी परोपरीं ॥ ३ ॥
परोपरीं ऐसा फिरे देशोदेश । परि तें मानस आशाबध्धी ॥ ४ ॥
आशाबध्धी जयां तें जरी मिळालें । मागुतें मांडिलें प्रपंचासी ॥ ५ ॥
प्रपंचासी रची सर्व चि मागुता । पुत्र धन कांता पूर्वस्थिति ॥ ६ ॥
पूर्वस्थिती आला सोडिलें वैराग्य । ऐसा तो अभाग्य पापरूपी ॥ ७ ॥
पापरूप प्राणी अतुर वैरागी । कैंची तयालागीं दृढबुद्धि ॥ ८ ॥
दृढबुद्धि पूर्वपुण्यें प्राप्त होये । तरी लागेल सोये विवेकाची ॥ ९ ॥
विवेकाच्या योगें जें बाणे वैराग्य । तें चि महद्भाग्य ज्ञानियांचें ॥१०॥
ज्ञानियांचें भाग्य विवेक वैराग्य । तेणें तो सभाग्य निरंतर ॥ ११ ॥
निरंतर ज्ञानी दिनकर ह्मणे । अतुरता जेणें सोडियेली ॥ १२ ॥

---

१ ऐक्यभाव. २ पाड. ३ कृतकृत्य, वंद्य. ४ उतावीळपणाचें, तात्कालिक.

[ १८९ ]

॥ श्रीराम ॥

मजहूनि सानें नाहीं कोण्ही थोर । सर्व चराचर मजमाजीं ॥ १ ॥
मजमाजीं सर्व मी हि सर्वामाजीं । द्वैत हें सहजीं एकमेव ॥ २ ॥
एकमेव होतां अद्वयविचारें । नित्य निरंतरें समाधान ॥ ३ ॥
समाधान ते चि निर्विकल्पस्थिति । येणें जाणें गति कैंची काये ॥४॥
कैंची काय माया अनुर्वाच्य ब्रह्म । दिनकरा वर्म संतकृपा ॥ ५ ॥

[ १९० ]

॥ श्रीराम ॥

आह्मी महाकाळ मारक काळाचे । दास राघवाचे श्रीदागळे ॥ १ ॥
काम क्रोध लोभ जाले गतप्राण । स्वरूप देखोन वैष्णवांचें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे संसार भुररें । वांजेच्या कुमरें रचियेलें ॥ ३ ॥

[ १९१ ]

॥ श्रीराम ॥

समारंभ आला देवाचा समीप । करा रे साक्षेपें बहुतांहातीं ॥ १ ॥
बहुतांहातीं तुह्मीं साह्यभूत व्हावें । पडों चि नेदावें उणें कांहीं ॥ २ ॥
उणें कांहीं नका सावधानपणें । सर्व सांभाळणें सर्वकाळ ॥ ३ ॥
सर्वकाळ निद्रा मद टाळाटाळी । विषयांची रळी[४] सोडूनीयां ॥ ४ ॥
सोडूनि आळसदंभमछरासी । आणि मान्यतेसी जीवांतूनी ॥ ५ ॥
जीवांतूनि शंका सर्व सोडूनीयां । येका देवराया सांटी पाहा ॥ ६ ॥
पहा नरदेहीं कायावाचामनें । अर्थे जीवें प्राणें सादर जो ॥ ७ ॥
सादर जो सदा सर्वभावें करी । देहभावा उरी न ठेऊनि ॥ ८ ॥
न ठेऊनि उरी नित्य निरंतर । होऊनि तत्पर सांभाळीत ॥ ९ ॥
सांभाळीत सर्व तो चि भक्तराज । देशधडी लाज केली जेणें ॥ १० ॥
केली जेणें ऐसी प्रीति राघवेंसीं । त्याच्या वैभवासी काय सांगों ॥११॥

---

१ लहान. २ चेडें, चेटुक. ३ खटपट, यत्न. ४ विनोद. ५ सोवत, संगत. ६ ठाव, स्थिति.

काय सांगों त्याचें वैभव वाचेनें । केला असे जेणें देव ऋणी ॥ १२ ॥
देव ऋणी ज्याचा तो जीव देवाचा । महिमा मी त्याचा बोलों काई ॥ १३ ॥
बोलों काई जया वर्णिती पुराणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ १४ ॥

[ १९२ ]

॥ श्रीराम ॥

पार्वतीस सदाशिव । सांगतसे अंतर्भाव[1] ॥ ध्रु० ॥
श्रीराम जयराम । हें चि जप सोडुनि काम ॥ १ ॥
छळितां चि विषें मज । सांपडलें हितगुज ॥ २ ॥
सारांचें हि निजसार । गुह्याचें हि गुह्य थोर ॥ ३ ॥
त्रिभुवनीं तरणोपाय । सकळ जीवां सांगों काय ॥ ४ ॥
दिनकरकुळदीप[2] । माझें ध्येय ध्यान जप ॥ ५ ॥

[ १९३ ]

॥ श्रीराम ॥

विश्वाची जननी तूं कुळस्वामिनी । पुरवीं भवानी इच्छा माझी ॥ १ ॥
इच्छा माझे मनीं आहे बहु थोर । श्रीरामीं अंतर रंगे जरी ॥ २ ॥
रंगे जरी मन अखंड राघवीं । तरी तुझी दिवो[3] उजळीन ॥ ३ ॥
उजळीन दिवी गोंधळीं नाचेन । कंठीं दरुशन मिरवीन ॥ ४ ॥
मिरवीन माये तुझीं च भूषणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ५ ॥

[ १९४ ]

॥ श्रीराम ॥

विनवितों देवा तुज खंडेराया । मनोरथां माझ्या पूर्ण करीं ॥ १ ॥
पूर्ण करीं माझे मनोरथ आतां । राघवीं तत्वतां मन रंगो ॥ २ ॥
मन रंगो रामीं कायावाचाजीवें । आणीक न भावे तयावीण ॥ ३ ॥
तयावीण दुजें नावडे आणीक । देई तें चि येक महिपति ॥ ४ ॥
महिपति इच्छा करिसील पूर्ण । देव्हारां मांडीन तरी तुज ॥ ५ ॥

---

१ अभिप्राय. २ सूर्यवंशाला विशेष प्रकाशमान करणारा दीप जो श्रीरामचंद्र. ३ दिवटी. ४ प्रतिमा ?

तुज कुळदेव कुळींचा करीन । माझी इच्छा पूर्ण जरी होये ॥ ६ ॥
जरी होये मन राघवीं निमग्न । तरी तूं सर्वज्ञ खंडेराया ॥ ७ ॥
खंडेराया फार आहेसी सत्वांचा । तरी हा इच्छेचा पांग फेडीं ॥ ८ ॥
पांग फेडीं माझा रामाच्या भजनें । जरी असे घेणें नवसासी ॥ ९ ॥
नवस घेऊनि वासना पुर्वीसी । ठेंगणें कीर्तीसी भुवनत्रय ॥ १० ॥
भुवनत्रंई कीर्ति वाढेल अपार । ह्मणे दिनकररामदास ॥ ११ ॥

[ १९५ ]

॥ श्रीराम ॥

सकळ देवांचा[1] कैवारी । ज्यासी ध्यातो त्रिपुरारि ॥ ध्रु० ॥
तो चि जोडला आह्मांस । धन्य केलें अनाथास ॥ १ ॥
जड[2] तारिले सागरीं । भग्न केली येमपुरी ॥ २ ॥
दिनकर ह्मणे त्रैलोक्यास । ज्याच्या नामाचा विश्वास ॥ ३ ॥

[ १९६ ]

॥ श्रीराम ॥

जननी ये जिवलगे ये गे पांडुरंगे । दीनालागीं वेगें कृपा करीं ॥ ध्रु० ॥
कृपा करीं आतां नको वीट माझा । अनन्य मी तुझा शरणागत ॥१॥
शरणागतालागीं तूं चि येकि जगीं । ह्मणोनी सलगी[3] करीतसे ॥ २ ॥
करितां थोर-थोर जाले पैं अपार । तें ऐकतां सादर मी हि जालों ॥३॥
जालों तुझा दास सत्य माझी भाष । तुजवीण विशेष नसे कोण्ही ॥४॥
नसे कोण्ही ऐसें प्रत्ययासी आलें । या निश्चयासी टळे तरी आण तुझी ॥५॥
तुझी कांस[4] दृढ धरिली गे माये । आतां कोण भय आहे सांग ॥ ६ ॥
सांगतां पावणें शब्दाचिये खुणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ७ ॥

[ १९७ ]

॥ श्रीराम ॥

राम राम नित्य वदे वाणी ज्याची । तेणें संसाराची नित्य केली[5] ॥ १ ॥

---

१ भक्तांचा अंत न पाहणारा. २ जड पाषाण. ३ बरोबरी, अतिपरिचय. ४ आश्रय. ५ खेळ, क्रीडा.

नित्य केली थोर अत्रीं परत्रीं । सार्थकाचां सूत्रीं आनंदेंसीं ॥ २ ॥
आनंदेंसीं जेणें केली पैं सवंसाटी । तेणें पैं गोमटी सायुज्यता ॥ ३ ॥
सायुज्यता जाली राम जनीं वनीं । अनुभवनिदानीं ऐसें घडे ॥ ४ ॥
घडे ऐसें जरी दिनकरा जाण । सवंसारसीण तरी चुके ॥ ५ ॥

[ १९८ ]

॥ श्रीराम ॥

न लगे स्नान संध्या लक्ष ध्यान मुद्रा । नित्य रामचंद्रा आठवीतां ॥ १ ॥
आठवितां राम न लगे काळ वेळ । त्रिकाळ निर्मळ रामनामें ॥ २ ॥
नामीं शुद्धाशुद्ध अवद्ध सुवद्ध । नाहीं पैं निषिद्ध रामनामीं ॥ ३ ॥
रामनामीं नर करिती अव्हेर । भोगिती साचार रौरवांसी ॥ ४ ॥
रौरवांसी आटे तरी च दिनकरा । श्रीराम अंतरामाजीं येतां ॥ ५ ॥

[ १९९ ]

॥ श्रीराम ॥

रामनाम मंत्र सुगम फुकाचा । मोळांच्या मंत्रांचा मुगुटमणी ॥ १ ॥
मुगुटमणी मंत्र हा दो अक्षरांचा । तारक सर्वांचा शिव जाणे ॥ २ ॥
शिव जाणे तें चि धरणें हो चित्तीं । दिनकर विनति करीतसे ॥ ३ ॥

[ २०० ]

॥ श्रीराम ॥

दिनकराकुळीं कुळदीप राम । शुद्ध परब्रह्म अवतरलें ॥ १ ॥
अवतरलें शुद्ध चैतन्य साकार । कराया उद्धार जडजीवां ॥ २ ॥
जीवां तारियेलें नाना उपायेंसीं । मित्रसकामेंसीं आणि वैरें ॥ ३ ॥
वैरी[५] मित्र दोघां भक्तां पद येक । कैवल्यदायक दीनानाथ ॥ ४ ॥
दीनानाथ शिरीं असोनीयां ऐसा । नका लागो सोसा[६] विषयांच्या ॥ ५ ॥
विषयांच्या सोसें पतन प्राणासी । व्हावें कासाविसी नानापरीं ॥ ६ ॥
नानापरीं संग सोडीं दिनकरा । रामदासी पुरा सिद्ध होई ॥ ७ ॥

---

१ बरोबरी. २ अनुभवाच्या शेवटीं. ३ अडथळा. ४ मोळा=ओझें. ५ रावणासारखे विरोधी भक्तीचे. ६ हावरेपणाला.

[ २०१ ]

॥ श्रीराम ॥

माझा मज चि विसर । तो चि साजिरा[1] संसार ॥ ध्रु० ॥
करीं निर्गति[2] सद्गुरुमाये । पतिताचें पाहासी काये ॥ १ ॥
अपराधी मी अनाथ । कृपा करूनि करीं सनाथ ॥ २ ॥
दिनकर दीन तुझें । त्यासी काय संसारवोझें ॥ ३ ॥

[ २०२ ]

॥ श्रीराम ॥

बहुतां जन्माचां सेवटीं । स्वामीचरणीं पडली मिठी ॥ ध्रु० ॥
धन्य जालों जालेपणें । गुरुकृपाअनुसंधानें ॥ १ ॥
देहीं असतां देहभाव । परि समूळ जाहलें वाव ॥ २ ॥
बद्ध मुक्त ऐसी वार्ता । दिनकरा कें[3] तत्वता ॥ ३ ॥

[ २०३ ]

॥ श्रीराम ॥

सांपडलें निजें सद्गुरुचरणीं । सर्वकाळ धणी स्वसुखाची ॥ १ ॥
स्वसुखाची धणी दुजेपणेंवीण । निरंतर जाण सेऊं आतां ॥ २ ॥
सेऊं आतां सेव्य[4] सनकादिकांचें । भान रसनेचें निरसूनी ॥ ३ ॥
निरसूनि मायाअविद्येचें बंड । वाउगें थोतांड संकल्पाचें ॥ ४ ॥
संकल्पाचें मूळ छेदूनी सकळ । होऊं निश्चळ सस्वरूपीं ॥ ५ ॥
सस्वरूपीं नित्य संचलें स्वहित । शुद्ध सदोदित द्वैतेंवीण ॥ ६ ॥
द्वैतेंवीण सुख सद्गुरुकृपेनें । दिनकर ह्मणे अखंडीत ॥ ७ ॥

[ २०४ ]

॥ श्रीराम ॥

अखंडीत सेऊं सद्गुरुचरण । जन्ममृत्युशीण नाशावया ॥ १ ॥
नाशावया सर्व संसाराचें मूळ । साधन निर्मळ सुखरूप ॥ २ ॥

---

१ शोभिवंत. २ निर्गति करीं=येणें जाणें चुकव. ३ कोठें. ४ आत्मस्वरूप.

सुखरूप येक हें चि त्रिभुवनीं । सांगे शूळपाणी पार्वतीस ॥ ३ ॥
पार्वतीस गुरुगीताउपदेश । त्यामाजीं विशेष गुरुभक्ति ॥ ४ ॥
गुरुभक्ति सार सर्वांमध्यें थोर । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ २०५ ]

॥ श्रीराम ॥

काय सांगों बोलें[1] । बोलतां न ये ऐसें केलें ॥ ध्रु० ॥
ऐसा थोर नवलाव । नेणों काय केली माव ॥ १ ॥
अहंतेसीं अहंभाव । सेखीं नुरवी चि सोहंभाव ॥ २ ॥
दृश्य द्रष्टा दर्शन वाव । उरों नेदी च स्वयमेव ॥ ३ ॥
कृपा ऐसी सद्गुरूची । अनुर्वाच्य महिमा जिची ॥ ४ ॥
दिनकर रामीं रामदास । हें हि नुरे चि निःशेष ॥ ५ ॥

[ २०६ ]

॥ श्रीराम ॥

मजऐसा कोण अपराधी आहे । गुणदोष पाहे सज्जनाचे ॥ १ ॥
सज्जनाचे दोष वाचेसीं उच्चारी । भेदितां जिव्हारीं[2] कांटाळेना ॥ २ ॥
कांटाळेना मन अखंड निंदितां । मज काय माता प्रसवली ॥ ३ ॥
प्रसवली मज ऐस्या पतितासी । नख कां नळीसी[3] दिल्हें नाहीं ॥ ४ ॥
दिल्हें नाहीं विष ह्मणे दिनकर । धरणीसी भार कां ठेविलें ॥ ५ ॥

[ २०७ ]

॥ श्रीराम ॥

आपुलीं ह्मणौनि राहिलों निश्चित । तों तें अकस्मात अंतरलीं ॥ १ ॥
अंतरलीं सर्व सखीं प्रपंचाचीं । करावी कोणाची आश आतां ॥ २ ॥
आतां रामा येक तूं चि माझें सर्व । कळों आलें माव तुजवीण ॥ ३ ॥
तुजवीण मज दिनकर ह्मणे । नाहीं आतां ह्मणें विसंबसी ॥ ४ ॥

[ २०८ ]

॥ श्रीराम ॥

चंचळ साकार मायेचें स्वरूप । निश्चळ अरूप परब्रह्म ॥ १ ॥

---

१ शब्दांनीं. २ अंतःकरणास. ३ गळ्याच्या नळीला.

परब्रह्म नित्य अखंड संचलें । संतीं विचारिलें मायेतीत ॥ २ ॥
मायेतीत वस्तु मायेच्या निरासें । दिनकरा कैसें अभिन्नव ॥ ३ ॥

[ २०९ ]

॥ श्रीराम ॥

जाणते नेणते बोलती स्वभावें । मायेसि सोडावें सर्वस्वेंसीं ॥ १ ॥
सर्वस्वेंसीं माया सोडावी ते कैसी । जिनें निर्गुणासी आच्छादिलें ॥२॥
आच्छादिलें ब्रह्म स्वयं प्रकटली । सर्व विस्तारली ब्रह्मांडेंसीं ॥ ३ ॥
ब्रह्मांडेंसीं पिंडरचना जयेची । थोर थोर हें चि बोलताती ॥ ४ ॥
बोलताती तिचें रूप आहे कैसें । निरंतर वसे कोठें कैसी ॥ ५ ॥
कोठें कैसी माया निर्माण हे जाली । कल्पांतीं आटली कोणेपरीं ॥ ६ ॥
कोणेपरीं याचा पाहावा विचार । ह्मणे दिनकररामदास ॥ ७ ॥

[ २१० ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्मीं मूळमाया जाहली निर्माण । बोलतां दूषण लागों पाहे ॥ १ ॥
लागों पाहे दोष विचारें पाहतां । निर्हेतीं तत्वतां हेत कैंचा ॥ २ ॥
हेत कैंचा तया निर्गुण ब्रह्मासी । इच्छा अनिच्छासी कैसी घडे ॥ ३ ॥
कैसी घडे माया छाया अरूपाची । सत्ता निर्गुणाची करी कोण ॥४॥
करी कोण माया समळ चंचळ । ब्रह्म तों निर्मळ निश्चळ तें ॥ ५ ॥
निश्चळ तें ब्रह्म नित्य निर्विकार । माया हे विकार जाली कैसी ॥ ६ ॥
जाली कैसी माया दिनकर ह्मणे । बरी विचारणें प्रत्ययेंसीं ॥ ७ ॥

[ २११ ]

॥ श्रीराम ॥

गगनीं पवन पवनीं दहन । दहनीं जीवन कैसें जालें ॥ १ ॥
कैसें जालें बापा जीवनीं भुवन । भुवनीं निर्माण पिंड कैसे ॥ २ ॥
कैसीं पंचभूतें भिन्नें ऐक्य जालीं । सृष्टीं विस्तारलीं कोणेपरीं ॥ ३ ॥
कोणेपरीं ऐक्य होऊनि रचलीं । अंतीं विसंचलीं गेलीं कैसीं ॥ ४ ॥

---

१ नवल.

गेलीं कैसीं भूतें जेथील तेथें चि । पुढें त्या जीवाची स्थित कैसी ॥५॥
स्थित कैसी कोठें येणें जाणें कोणा । करी विवंचना अंतवंत ॥ ६ ॥
अंतवंत वृत्ति विचारें विवर । ह्मणे दिनकररामदास ॥ ७ ॥

[ २१२ ]

॥ श्रीराम ॥

व्यानीं संचरोनि अंतःकर्णसंगें । श्रोत्रेंद्रिययोगें शब्द घेतो ॥ १ ॥
शब्द आकाशींचा विषय घेऊनि । सोडी विचारूनि वागेंद्रियें ॥ २ ॥
वागेंद्रियें त्याग करी द्विविधाचा । दिनकरा साचा तो चि कोण ॥३॥

[ २१३ ]

॥ श्रीराम ॥

समानसंदोषें मनःसमागमें । त्वचेंद्रियें नेमें स्पर्श भोगी ॥ १ ॥
स्पर्श तो वायूचा विषय सेऊनि । सोडी विचारूनि पाण्येंद्रियें[1] ॥ २ ॥
पाण्येंद्रियें त्याग करी द्विविधाचा । दिनकरा साचा तो चि कोण ॥ ३ ॥

[ २१४ ]

॥ श्रीराम ॥

उदानीं मिश्रित होऊनियां वेगें । बुद्धीच्या संयोगें चक्षुद्वारें ॥ १ ॥
चक्षुद्वारें रूपविषयो तेजाचा । भोगी त्याग त्याचा पदेंद्रियें ॥ २ ॥
पदेंद्रियें त्याग करी द्विविधाचा । दिनकरा साचा तो चि कोण ॥३॥

[ २१५ ]

॥ श्रीराम ॥

प्राणेंसीं संचरें चित्त संयोगेंसीं । जिव्हाइंद्रियेंसीं रस सेवी ॥ १ ॥
रस उदकाचा विषय भोगूनि । सोडी संतोषोनी शिश्नेंद्रियें ॥ २ ॥
शिश्नेंद्रियें त्याग करी द्विविधाचा । दिनकरा साचा तो चि कोण ॥३॥

[ २१६ ]

॥ श्रीराम ॥

अपानीं रिघोनि अहंकारसंगें । घ्राणेंद्रिययोगें गंध सेवी ॥ १ ॥

---

1 पाणी=हस्त.

गंध धरणीचा विषयो घेऊनि । त्यागी निरसूनि गुदेंद्रियें ॥ २ ॥
गुदेंद्रियें त्याग करी द्विविधाचा । दिनकरा साचा तो चि कोण ॥ ३ ॥

[ २१७ ]

॥ श्रीराम ॥

पंचेंद्रियद्वारें पंचप्राणेंकरीं । पंचीकर्णें धरी विषयांसी ॥ १ ॥
विषयपंचक भोगूनि अंतरीं । मग त्याग करी कर्मेंद्रियें ॥ २ ॥
कर्मेंद्रियें त्याग करी तोष पावे । अथवा दुखवे अंतर्यामीं ॥ ३ ॥
अंतर्यामीं ऐसा भोगिता त्यागिता । तो कोण तत्वता विचारावा ॥ ४ ॥
विचारावा दृढ तयाचा विवर । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ २१८ ]

॥ श्रीराम ॥

हांक मारुनि कानापासीं । जरा आली निश्चयेंसीं ॥ ध्रु० ॥
काय निश्चिंत राहासी । सोडुनीयां श्रीरामासी ॥ १ ॥
आतां येथुनि पालट पाहें । देहसंग विलया जाये ॥ २ ॥
दात पडती नेत्र जाती । कान असोनि नाईकती ॥ ३ ॥
कांप सुटे हातापाया । जिव्हा न वळे नाम गाया ॥ ४ ॥
मन भ्रमे पूर्वपंथें । भ्रम पडे जेथें तेथें ॥ ५ ॥
श्वासोश्वासीं दमा दाटे । कंठ घोरे घर्घराटें ॥ ६ ॥
आंग कांपे थरथरां । तऱ्ही पाहासी रांडापोरां ॥ ७ ॥
मोहममतेनें पोसिलीं । तें तों अवघीं दुऱ्हावलीं ॥ ८ ॥
दिनकर ह्मणे सावध होईं । लागे स्वहिताचे सोईं ॥ ९ ॥

[ २१९ ]

॥ श्रीराम ॥

दीनवच्छळ[1] श्रीराम । भक्तकामकल्पद्रुम[2] ॥ १ ॥
त्याचा लागो मना छंदु । ज्याचे नामीं परमानंदु ॥ ध्रु० ॥
बहुतांचा साहकारी । दास ज्याचा त्रिपुरारि ॥ २ ॥

---

१ मार्गाला. २ भक्तांच्या इच्छा पुरविणारा कल्पवृक्ष.

गुरुसंप्रदायेंवीण । मंत्र जाणे सर्व जन ॥ ३ ॥
कोण्ही नेणे न ह्मगे अंतीं । ऐसें न दिसे त्रिजगतीं ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे अलभ्य लाभ । नरदेहीं हा स्वयंभ ॥ ५ ॥

[ २२० ]

॥ श्रीराम ॥

राम राम लिहितां पत्रीं । शत्रु तो हि चाळी मैत्री ॥ ध्रु० ॥
ऐसा नामाचा बडिवार । रोकडा चाले साक्षात्कार ॥ १ ॥
पत्रीं न लेहतां राम राम पाहें । मित्र तो हि शत्रु होये ॥ २ ॥
येत्यां जात्यां राम राम पंथीं । न ह्मणतां अनर्थ होती ॥ ३ ॥
राम राम वोळखीवीण । ह्मणतां कितेक समाधान ॥ ४ ॥
राम राम न ये अंतीं वाचे । उठिती कडके अपवादाचे ॥ ५ ॥
दुराचारी अंतीं रामा । बाहतां ह्मणती तो पुण्यात्मा ॥ ६ ॥
रामनामाऐसें सार । भुवनत्रंई नाहीं थोर ॥ ७ ॥
विषबाधा शंकराची । शमली राम ह्मणतां चि ॥ ८ ॥
दिनकर ह्मणे पुण्यश्लोक । रामस्मरणें सर्व लोक ॥ ९ ॥

[ २२१ ]

॥ श्रीराम ॥

सावध होई स्वहितासी । काळ लागला पाठीसी ॥ ध्रु० ॥
राम कृष्ण नारायण । अखंड करीं कां हें चिंतन ॥ १ ॥
विसरोनियां यमयातना । काय होसी विषयाधीना ॥ २ ॥
दिनकर ह्मणे रामरंगीं । जीवा रंग लागवेगीं ॥ ३ ॥ ॥

[ २२२ ]

॥ श्रीराम ॥

भय काय हो आह्मांसी । असतां रघुवीर पाठीसीं ॥ ध्रु० ॥
अखंड पाठीराखा देव । काळाशिरीं ज्याचा घाव ॥ १ ॥

---

१ 'श्रीराम' हा उघडा मंत्र आहे. हा सर्वांनीं जपावा. त्याला गुरुसांप्रदाय पाहिजे असें नाहीं.

आह्मी रामवेळाईंत । जेथें तेथें तो राखत[1] ॥ २ ॥
दिनकर ह्मणे आदिअंतीं । सबाह्य रक्षी सीतापति ॥ ३ ॥

[ २२३ ]

॥ श्रीराम ॥

सीता[2] रामाची हे माता । राम रामाचा हो पिता ॥ ध्रु० ॥
लटिकें नव्हे हें यथार्थ । साक्ष यासी रघुनाथ ॥ १ ॥
रामा आणि हनुमंतासी । संग नाहीं निश्चयेंसीं ॥ २ ॥
रामा आणि परशरामा । भेटी नाहीं ऐसी सीमा ॥ ३ ॥
रामा आणि सौमित्राचा । वनवासीं संग कैंचा ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे असत्य मानी । पातित तो चि त्रिभुवनीं ॥ ५ ॥

[ २२४ ]

॥ श्रीराम ॥

शुद्धेंसीं सबळ[3] माझें । जाऊनि राहो स्वरूप तुझें ॥ ध्रु० ॥
स्वसंवेद्य[4] निरंजन । अखंड अनस्युत[5] घन ॥ १ ॥
तत्पदेंसीं त्वंपद । नुरोनि उरो असिपद ॥ २ ॥
दिनकर ह्मणे तत्वमसि । महावाक्य त्रिपदेंसीं ॥ ३ ॥

[ २२५ ]

॥ श्रीराम ॥

माझी गृहिणी[6] मजपासीं । अखंड विन्मुख निजांगेंसीं ॥ ध्रु० ॥
माझें मज चि नवल वाटे । नसतें भासे उफराटें ॥ १ ॥
विन्मुखपणें चि घराचार । येव्हडा रचिला पैं संसार ॥ २ ॥
येणें चि रीतीं चराचर । चाळी सृष्ट्यादि व्यापार ॥ ३ ॥
उत्पत्तिस्थितिप्रळयेंसीं । खेळु खेळे अहिर्निशीं ॥ ४ ॥
स्वलीळा चि जेव्हां सन्मुख होये । तेव्हां जालें विलया जाये ॥ ५ ॥

---

१ कैवारी. २ हा कोड-अभंग आहे. ३ शबल, औपाधिक. ४ ज्ञानस्वरूप. ५ अनुस्यूत=निर्लेप. ६ मायारूप उपाधि ही च कोणी स्त्री.

वियोग होतां जालेपणा । आपण नुरे चि वेगळेपणा ॥ ६ ॥
गृहिणी जातां घराचार । विसंचला[1] पैं संसार ॥ ७ ॥
आतां आह्मी आह्मां निरंतर । गृहिणीवीण निर्विकार ॥ ८ ॥
दिनकर ह्मणे सरलें काज । विवेकप्रळई ऐसें चोज ॥ ९ ॥

[ २२६ ]

॥ श्रीराम ॥

मीपणाचिये मुळीं । सोहंपणें गांठी घाली ॥ १ ॥
तेव्हां होसी जैसा तैसा । विवरतां सोहं हंसा ॥ ध्रु० ॥
असतां अखंड समाधानें । नुरिजे बद्धमुक्तपणें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे चौथें पद । विचारितां साधक सिद्ध ॥ ३ ॥

[ २२७ ]

॥ श्रीराम ॥

आतां सोडीं विषयध्यास । सद्गुरुचरणीं करीं रहिवास ॥ १ ॥
मृत्यु आला मारेंमार । कोण राखों शके शूर ॥ ध्रु० ॥
काळासमोर झुंझारे । काय तगती रांडापोरें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे लेका । करीं सद्गुरु पाठीराखा ॥ ३ ॥

[ २२८ ]

॥ श्रीराम ॥ ( ललीत )

भगवद्दासांचें मंडण[2] । प्रार्थीतसे कर जोडुन ॥ ध्रु० ॥
आह्मांकरितां श्रम फार । देवा होतसे अपार ॥ १ ॥
अखंडित जागरण । देवालागीं करूं शीण ॥ २ ॥
ऐसे अपराधी थोर । परि नेणों दुजी थार[3] ॥ ३ ॥
आठवावें काय काय । सर्वस्वेंसीं धरणें पाय ॥ ४ ॥
दिनकररामदास ह्मणे । गगना थार करीजे कोणें ॥ ५ ॥

---

१ नासला, २ भूषण जो श्रीराम त्याला. ३ आश्रय.

[ २२९ ]

॥ श्रीराम ॥

काय शाश्वत देहाचें । देह भोजन काळाचें ॥ ध्रु० ॥
कैसा अद्यापि निस्तुरा । गेलें वैभव आली जरा ॥ १ ॥
गेलीं मुंडें[1] अवतारांचीं । पदवी कोण मनुष्याची ॥ २ ॥
दिनकर ह्मणे वेग करीं । भावें संतसंग धरीं ॥ ३ ॥

[ २३० ]

॥ श्रीराम ॥

रजस्वलेचें अशुद्ध । त्याचा देह हा प्रसिद्ध ॥ ध्रु० ॥
करिती सोंवळें कर्माचें । कर्म होतसे देहाचें ॥ १ ॥
अशुद्धशब्दें नाहीं शुद्ध । तें सर्वांगीं प्रसिद्ध ॥ २ ॥
वास नवमास जठरीं । मूत्रानर्काचा[2] दाथेरीं[3] ॥ ३ ॥
विटाळ देहासी जन्मतां । विटाळ थोरे देह जातां ॥ ४ ॥
वोतीव देह विटाळाचा । तेथें अहंभाव काश्याचा ॥ ५ ॥
ज्याकरितां देह शुद्ध । तो सोडिला स्वतसिद्ध ॥ ६ ॥
दिनकर ह्मणे शुद्ध होती । जेन्हां सत्संग धरिती ॥ ७ ॥

[ २३१ ]

॥ श्रीराम ॥

आमुचिये कुळीं श्रीराम दैवत । अन्यत्रांची मात कोण जाणे ॥ १ ॥
कोण जाणे दुजें दैवत माईक । सोडुनी विवेक शाश्वताचा ॥ २ ॥
शाश्वताचें बीक[5] श्रीराम सर्वथा । आदिमध्यअंता पुरलासे ॥ ३ ॥
पुरोनि उरला सर्वा ठाईं राम । निर्मळ निष्काम सर्वसाक्षी ॥ ४ ॥
सर्वसाक्षी राम सर्वांसी चोरला । न पाहाती लीळा अनुपम्य ॥ ५ ॥
अनुपम्य राम योजिला सज्जनीं[6] । जाहले निर्वाणीं रामीं राम ॥ ६ ॥
रामीं रामदास जाले पैं उदास । तो चि पैं हव्यास[7] दिनकरा ॥ ७ ॥

---

१ मुंड-मस्तक. २ उकाड्यांत. ३ थांबे. ४ अहंभावाचा त्याग करणें व सत्संग धरणें यामुळें च देह खरा शुद्ध होतो. ५ शोभा, तेज. ६ श्रीसमर्थांनीं. ७ छंद.

[ २३२ ]

॥ श्रीराम ॥

मरणाऐसा वैरी । अखंड उभा उरावरी ॥ ध्रु० ॥
काय अद्यापि निस्तुरा । आला जरेचा डांगोरा ॥ १ ॥
देह कांपे भ्यालेपणें । पालटोनि पहिल्या गुणें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे आतां तरी । सद्गुरुसंगें हा निवारी ॥ ३ ॥

[ २३३ ]

॥ श्रीराम ॥

अगाध पुण्याचिया गुणें । प्राप्त नरदेहाचें ठाणें ॥ ध्रु० ॥
सावध व्हा रे लागवेगें । स्वहित करा संतसंगें ॥ १ ॥
आयुष्याचा नाहीं नेम । देह खचतां कैंचा राम ॥ २ ॥
दिनकर ह्मणे वैभव नीट । तों चि साधा वैकुंठपीठ ॥ ३ ॥

[ २३४ ]

॥ श्रीराम ॥ (ललीत)

राम दासांचें मंडण । भवभयाचें खंडण ॥ ध्रु० ॥
नाम घ्या रे लवलाहें । भुलों नका ममतामोहें ॥ १ ॥
नाम जपतां पळे काळ । तुटे संसाराचें मूळ ॥ २ ॥
नाम शिवाचें चिंतन । विषयवीषविध्वंसन ॥ ३ ॥
नाम भजनाचें आयुष्य । निगमागमाचें रहस्य ॥ ४ ॥
नाम अखंड स्मरण । दिनकरा परिपूर्ण ॥ ५ ॥

[ २३५ ]

॥ श्रीराम ॥

जोंवरि नाहीं दिनकर । तोंवरि प्रबळ अंधकार ॥ ध्रु० ॥
तैसें ज्ञानेंवीण बापा । नव्हे काळदंड सोपा ॥ १ ॥
औषध न मिळे रोगासी । तों तों बळ संन्यपातासी ॥ २ ॥
वीष घेउनि अमर होणें । दिनकर ह्मणे लाजिरवाणें ॥ ३ ॥

[ २३६ ]

॥ श्रीराम ॥

काय निश्चित जालासी । मृत्यु लागला पाठीसी ॥ ध्रु० ॥
उपाय देख हातोंहातीं । शरण रीघ रघुनाथीं ॥ १ ॥
माझ्या सोफे पडशाळा । काय सोडविती तुला ॥ २ ॥
हस्ति घोडे दासदासी । काय भांडती येमासीं ॥ ३ ॥
अंतीं सर्व हि राहील । वास स्मशानीं घडेल ॥ ४ ॥
सेखीं जाणें येकायेकीं । दिनकर सांगे मृत्यलोकीं ॥ ५ ॥

[ २३७ ]

॥ श्रीराम ॥

गोप्य नाहीं परमार्थ । जो पाहे त्याचा स्वार्थ ॥ ध्रु० ॥
वायां येऊनि न जावें । वेगीं सार्थक करावें ॥ १ ॥
वेदशास्त्रपुराणांचें । हें चि सांगणें सर्वांचें ॥ २ ॥
तें चि मानावें सद्भावें । दिनकर ह्मणे निजभावें ॥ ३ ॥

[ २३८ ]

॥ श्रीराम ॥

सत्ता आलियां हातासी । प्राणी सोडी स्वहितासी ॥ ध्रु० ॥
कैसा पाहा दुराचारी । स्वयें आत्महत्या करी ॥ १ ॥
न विचारी पापपुण्य । दोष करितां न करी शीण ॥ २ ॥
परदारा परधन । अभिळाशी ज्याचें मन ॥ ३ ॥
गेला काळ सार्थकाचा । नेणे विचार स्वहिताचा ॥ ४ ॥
अधःपतनीं वास त्यासी । दिनकर ह्मणे सावकाशीं ॥ ५ ॥

[ २३९ ]

॥ श्रीराम ॥

आसनीं श्रीराम भोजनीं श्रीराम । राम होतां काम स्मरा वाचें ॥ १ ॥
श्रीराम जागतां श्रीराम नीजतां । श्रीराम खेळतां ह्मणा भावें ॥ २ ॥
राम ह्मणा घरीं राम ह्मणा दारीं । राम क्षणभरी नोसोडावा ॥ ३ ॥

ध्यानीं रामध्यान मानसीं चिंतन । श्रवणीं श्रवण राम करा ॥ ४ ॥
ह्मणे दिनकर नित्य निरंतर । भजनविचार सार धरा ॥ ५ ॥

[ २४० ]

॥ श्रीराम ॥

सद्भावें नमन सद्गुरुचरणा । जेणें निजखुणा दावियेलें ॥ १ ॥
दावियेलें माझें मज जें चोरलें । वोझें उतरिलें अनादीचें ॥ २ ॥
अनादीचें मूळ वारिलें सकळ । केलें पैं निर्मळ सदोदित ॥ ३ ॥
सदोदित राम त्रैलोक्यविश्राम । विमळ निष्काम विश्वातीत ॥ ४ ॥
विश्वातीत राम दासां स्वस्तिक्षेम । दिनकरा वर्म चोजवलें ॥ ५ ॥

[ २४१ ]

॥ श्रीराम ॥

अजामिळ सुब्राह्मण । दासिसंगें पतित जाण ॥ ध्रु० ॥
निमित्य पाहोनियां त्यासी । देवें नेलें वैकुंठासीं ॥ १ ॥
दासीपोटीं दाहा पुत्र । त्यांत नारा प्रीतिपात्र ॥ २ ॥
त्यासी विसंभेना घडी । यमदूत करिती वोढावोढी ॥ ३ ॥
नारा खेळतसे पोरांत । वियोग जाला अकस्मात ॥ ४ ॥
मोहें भोंवतें न्याहाळी । नारा येना कां जवळी ॥ ५ ॥
नारायेणा नारायेणा । मोहें जल्पे[1] क्षणक्षणा ॥ ६ ॥
मीसें पाहोनि विष्णुदासीं । झगडा करूनि येमासीं ॥ ७ ॥
ऐसा पतितपावन हरि । भजतां काय तो अव्हेरी ॥ ८ ॥
दिनकर ह्मणे विषयगोडी । सांडुनि भजा रे आवडीं ॥ ९ ॥

[ १४२ ]

॥ श्रीराम ॥

शुकमिसें गणिकेसी । रामें नेलें वैकुंठासीं ॥ ध्रु० ॥
काय ऐसें हें घडेल । राम दासां अव्हेरील ॥ १ ॥

---

१ ओरडूं लागला. २ निमित्त.

[ २३६ ]

॥ श्रीराम ॥

काय निश्चिंत जालासी । मृत्यु लागला पाठीसी ॥ ध्रु० ॥
उपाय देख हातोंहातीं । शरण रीघ रघुनाथीं ॥ १ ॥
माड्या सोफे पडशाळा । काय सोडविती तुला ॥ २ ॥
हस्ति घोडे दासदासी । काय भांडती येमासीं ॥ ३ ॥
अंतीं सर्व हि राहील । वास स्मशानीं घडेल ॥ ४ ॥
सेखीं जाणें येकायेकीं । दिनकर सांगे मृत्यलोकीं ॥ ५ ॥

[ २३७ ]

॥ श्रीराम ॥

गोप्य नाहीं परमार्थ । जो पाहे त्याचा स्वार्थ ॥ ध्रु० ॥
वायां येऊनि न जावें । वेगीं सार्थक करावें ॥ १ ॥
वेदशास्त्रपुराणांचें । हें चि सांगणें सर्वांचें ॥ २ ॥
तें चि मानावें सद्भावें । दिनकर ह्मणे निजभावें ॥ ३ ॥

[ २३८ ]

॥ श्रीराम ॥

सत्ता आलियां हातासी । प्राणी सोडी स्वहितासी ॥ ध्रु० ॥
कैसा पाहा दुराचारी । स्वयें आत्महत्या करी ॥ १ ॥
न विचारी पापपुण्य । दोष करितां न करी शीण ॥ २ ॥
परदारा परधन । अभिळाशी ज्याचें मन ॥ ३ ॥
गेला काळ सार्थकाचा । नेणे विचार स्वहिताचा ॥ ४ ॥
अधःपतनीं वास त्यासी । दिनकर ह्मणे सावकाशीं ॥ ५ ॥

[ २३९ ]

॥ श्रीराम ॥

आसनीं श्रीराम भोजनीं श्रीराम । राम होतां काम स्मरा वाचें ॥ १ ॥
श्रीराम जागतां श्रीराम नीजतां । श्रीराम खेळतां ह्मणा भावें ॥ २ ॥
राम ह्मणा घरीं राम ह्मणा दारीं । राम क्षणभरी नोसोडावा ॥ ३ ॥

ध्यानीं रामध्यान मानसीं चिंतन। श्रवणीं श्रवण राम कथा ॥ ४ ॥
ह्मणे दिनकर नित्य निरंतर। भजनविचार सार धरा ॥ ५ ॥

[ २४० ]

॥ श्रीराम ॥

सद्भावें नमन सद्गुरुचरणा। जेणें निजखुणा दावियेलें ॥ १ ॥
दावियेलें माझें मज जें चोरलें। वोझें उतरिलें अनादीचें ॥ २ ॥
अनादीचें मूळ वारिलें सकळ। केलें पैं निर्मळ सदोदित ॥ ३ ॥
सदोदित राम त्रैलोक्यविश्राम। विमळ निष्काम विश्वातीत ॥ ४ ॥
विश्वातीत राम दासां स्वस्तिक्षेम। दिनकरा वर्म चोजवलें ॥ ५ ॥

[ २४१ ]

॥ श्रीराम ॥

अजामिळ सुब्राह्मण। दासिसंगें पतित जाण ॥ ध्रु० ॥
निमित्य पाहोनियां त्यासी। देवें नेलें वैकुंठासी ॥ १ ॥
दासीपोटीं दाहा पुत्र। त्यांत नारा प्रीतिपात्र ॥ २ ॥
त्यासी विसंभेना घडी। यमदूत करिती वोढावोढी ॥ ३ ॥
नारा खेळतसे पोरांत। वियोग जाला अकस्मात ॥ ४ ॥
मोहें भोंवतें न्याहाळी। नारा येना कां जवळी ॥ ५ ॥
नारायेणा नारायेणा। मोहें जल्रे[1] क्षणक्षणा ॥ ६ ॥
मीस[2] पाहोनि विष्णुदासीं। झगडा करूनि येमासीं ॥ ७ ॥
ऐसा पतितपावन हरि। भजतां काय तो अव्हेरी ॥ ८ ॥
दिनकर ह्मणे विषयगोडी। सांडुनि भजा रे आवडीं ॥ ९ ॥

[ १४२ ]

॥ श्रीराम ॥

शुकमिसें गणिकेसी। रामें नेलें वैकुंठासी ॥ ध्रु० ॥
काय ऐसें हें घडेल। राम दासां अव्हेरील ॥ १ ॥

---

१ ओरडूं लागला. २ निमित्त.

शिळेसी लाऊनि चरण । अहिल्या केली पुरातन ॥ २ ॥
दिनकर ह्मणे ऐसा येरां । भजतां केवीं पाठिमोरा ॥ ३ ॥

[ २४३ ]

॥ श्रीराम ॥

पावोनि नरदेह सार । स्वहित न करी तो गव्हार[1] ॥ ध्रु० ॥
रामनामरत्न कंठीं । न बांधे तो पतित सृष्टीं ॥ १ ॥
प्रपंचाची घडमोडी । करितां उसंतें न पडे घडी ॥ २ ॥
दिनकर ह्मणे नवल मोठें । लाभेंवीण व्यर्थ आटे[3] ॥ ३ ॥

[ २४४ ]

॥ श्रीराम ॥ ( ललीत )

सावध होऊनि घडिघडीं । सार्थक करावें तांतडीं ॥ ध्रु० ॥
अखंड नामीं सावधान । स्वरूपीं होऊनि तल्लीन ॥ १ ॥
जोंवरि आहे स्वस्थ काया । तों तूं न घलीं निमिष्य वाया ॥ २ ॥
दिनकर रामीं रामदास । विनवीतसे साधकांस ॥ ३ ॥

[ २४५ ]

॥ श्रीराम ॥ ( ललीत )

आह्मी दास सज्जनांचे[4] । संप्रदाई रघुनाथाचे ॥ ध्रु० ॥
धन्य आह्मी जनीं वनीं । अखंड सोहंअनुसंधानीं ॥ १ ॥
आह्मां ऐसा जो जो होये । धन्य वंश त्याचा पाहें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे ते हि धन्य । जयां ज्ञानेंसीं सौजन्य ॥ ३ ॥

*[ २४६ ]

॥ श्रीराम ॥

न ये समागमें माता पिता बंधु । येका दीनबंधुवांचूनीयां ॥ १ ॥
तो चि ध्याईं मना नित्य निरंतर । जया गौरीहर विसंभेना ॥ ध्रु० ॥
अवघें जाइजेणें पिंडेसीं ब्रह्मांड । वाउगें चि बंड रामेंवीण ॥ २ ॥
दिनकर ह्मणे जनीं निरंजनीं । श्रीरामवांचूनी सखे कोण ॥ ३ ॥

---

१ मूर्ख. २ विसांवा. ३ खपतो, श्रम करितो. ४ सज्जन हा शब्द श्रीसमर्थांना अनुलक्षून आहे. ५ अशाश्वत.

* येथें एका बाडांतील अभंग संपून दुसऱ्यास आरंभ झाला आहे.

[ २४७ ]

॥ श्रीराम ॥

काय सांगों आतां माझें मी पाहातां । न दिसे तत्वतां बोलावया ॥ १ ॥
ऐसी जाली मात शोधितां निवांत । करीतां येकांत सद्गुरूसी ॥ ध्रु० ॥
ध्येय ध्याता ध्यान ज्ञेय ज्ञाता ज्ञान । त्रिपुटीचें भान नुरोनीयां ॥ २ ॥
दिनकर ह्मणे ज्याचें तो चि जाणे । जाणणें नेणणें जाऊनीयां ॥ ३ ॥

[ २४८ ]

॥ श्रीराम ॥

कोणाचें अरत्र कोणाचें परत्र । सकळ हें सूत्र अविद्येचें ॥ १ ॥
सद्गुरुवांचूनि कोण्हाचें हि कोण्ही । सखे त्रिभुवनीं नाहीं बापा ॥ ध्रु० ॥
बाप माये बंधु देहाचा समंधु । ममतेचा बाधु सर्व कांहीं ॥ २ ॥
आप्तवर्ग सखीं वैभवाच्या लेखीं । तें जातां पारखीं सवें होतीं ॥ ३ ॥
संसार केवळ जैसें मृगजळ । दिनकरा बोल कैंची तेथें ॥ ४ ॥

[ २४९ ]

॥ श्रीराम ॥

वर्णाश्रमधर्म सत्क्रियापाळण । करिती ते धन्य संत ज्ञानी ॥ १ ॥
विश्वाचे तारक कुकर्मछेदक । धर्माचे स्थापक मर्यादेचे ॥ ध्रु० ॥
शास्त्राधारें ज्याचें वर्तणें अगाध । त्रिकांड प्रसिद्ध वेदयुक्त ॥ २ ॥
वेदयुक्त ज्ञान कर्म उपासना । येणें मार्गें जना प्रबोधिती ॥ ३ ॥
प्रबोधिती त्यांचे पदीं दिनकर । नित्य निरंतर सर्वभावें ॥ ४ ॥

[ २५० ]

॥ श्रीराम ॥

स्वधर्माचा पक्ष रक्षणें साधूसी । सन्मार्गें जनासी तारावया ॥ १ ॥
धन्य संत जनीं जीवांचे तारक । प्रबोधें मारक अविद्येचे ॥ ध्रु० ॥
क्षणभरी संग जयां घडे यांचा । महिमा तयांचा कोण जाणे ॥ २ ॥
दिनकर रामीं रामदास ह्मणे । नरदेहा येणें धन्य जालें ॥ ३ ॥

[ २५१ ]

॥ श्रीराम ॥

दीनासी तारावें सनाथ करावें । संकटीं रक्षावें दीनबंधु ॥ ध्रु० ॥
दीनबंधु ऐसीं ब्रीदें तूं धरिसी । तरि कां करिसी अनारिसें[1] ॥ १ ॥
अनारिसें नको कोण्हांचें आयकों । सिकविलें सिकों देवराया ॥ २ ॥
देवराया ह्मणें अव्हेरिसी दीनें । दिनकर ह्मणे सांभाळावीं ॥ ३ ॥

[ २५२ ]

॥ श्रीराम ॥

सद्गुरुसारिखें जिवलग सोयरें । न दिसे दुसरें त्रिभुवनीं ॥ ध्रु० ॥
काय सांगों कैसें कृपेचें करणें । संसारधरणें निरशिलें ॥ १ ॥
माझें निज मज अनंता काळाचें । दिधलें तें साचें काय सांगों ॥ २ ॥
सांगों जातां वाचा शब्देंसीं निमाली । मनेंसीं विराली कल्पना हि ॥ ३ ॥
असंभाव्य सुख ध्याताध्यानेंवीण । ध्येय चि संपूर्ण केलें मज ॥ ४ ॥
केलें मजवीण मज निरंतर । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ २५३ ]

॥ श्रीराम ॥

राम साधूंचें मंडण । राम संसारखंडण ॥ १ ॥
मज तो चि नयनीं दावा । नाहीं तरी येमेसीं दावा[2] ॥ ध्रु० ॥
राम विश्वाचें भुवन । राम सर्वांसी पावन ॥ २ ॥
राम दिनकरभूषण[3] । राम भवभयशोषण ॥ ३ ॥

[ २५४ ]

॥ श्रीराम ॥

ऑधीं च युग कळीचें । त्यावरि राज्य यवनांचें ॥ १ ॥

---

१ वेगळें, भिन्न, दीनबंधु या नांवाप्रमाणें मज दीनाचें रक्षण कां करीत नाहींस ? मला तुझ्यापासून वेगळें कां करतोस ? २ वैर. मला राम दिसला नाहीं तर यमराज माझ्याशीं वैर करील. ह्म० माझे हालहाल करील. ३ सूर्यवंशास भूषण किंवा मज दिनकरास भूषणरूप होय. ४ या अभंगांत, त्या वेळच्या समाजाची स्थिति कशी होती, ती दिनकरांनीं सांगितली आहे.

आता स्वधर्म कोण राखे । जालें अधर्मा सारिखें ॥ ध्रु० ॥
गुरुत्व विश्वाचें ज्या आंगीं । ते ब्राह्मण सेविती भांगी ॥ २ ॥
षट्‌कर्मेंसीं स्नान त्यागी । जनीं ह्मणवी ज्ञानयोगी ॥ ३ ॥
आश्रमाचें नाम मठ । तेथें भांगीं भरले घट ॥ ४ ॥
गांजे तमाखु धुमाळी । गुर्गुडीची गंवांदी[1] घाली ॥ ५ ॥
सर्वब्रह्माचा उपदेश । बोधी कर्माचा हरांश[2] ॥ ६ ॥
दिनकर ह्मणे कळीं संत । भ्रष्टाचारें होती विख्यात ॥ ७ ॥

[ २५५ ]

॥ श्रीराम ॥

स्वधर्म विश्वासी तारक । अधर्म करित्यासी मारक ॥ १ ॥
ऐसें गीताभागवतीं । स्वयें सांगे लक्ष्मीपति ॥ ध्रु० ॥
जो रजतमाचा भेद । काम्य कर्माचा उच्छेद ॥ २ ॥
शैवागम[3] शाक्तागम । सोडुनि रक्षावा स्वधर्म ॥ ३ ॥
निषिद्ध कर्मे विधिविधानें । नाचरावीं मुमुक्षानें ॥ ४ ॥
वर्णाश्रमयातिधर्म । ब्रह्मार्पणें होती निष्काम ॥ ५ ॥
समता आत्मत्वें समजावी । भेदें सत्क्रिया राखावी ॥ ६ ॥
जीवेश्वरा ऐक्य जेव्हां । दिनकर ह्मणे मोक्ष तेव्हां ॥ ७ ॥

[ २५६ ]

॥ श्रीराम ॥

पावोनियां उत्तम जन्म । परंतु नेणें आत्माराम ॥ १ ॥
काय केलें देवराया । मनुष्यजन्म गेलें वायां ॥ ध्रु० ॥
पाहातां वर्णाश्रमाकडे । उठती पाषांडांचीं बंडें ॥ २ ॥
स्वहितासाठीं संतां शरण । गेलों परि तें न ये खूण ॥ ३ ॥
जीवेश्वराचें ऐक्यज्ञान । न दिसे वैराग्यलक्षण ॥ ४ ॥
शाक्तमार्गी पडिला दृष्टी । कांटाळलें मन उठी ॥ ५ ॥

---

१ अन्नछत्र. २ हरास, =ह्रास. ३ आगम=शास्त्र किंवा आचार.

भ्रष्टाचारेंसीं समंध । वरपंगाचा ज्ञानबोध ॥ ६ ॥
स्नानसंध्या गुर्गुडीची । समाधि लाविती भांगीची ॥ ७ ॥
स्वधर्म गेला बारा वाटीं । अवघी विषयांची राहाटी ॥ ८ ॥
ज्ञान वैराग्य भजन । कैंचें अवघें बाष्कळपण ॥ ९ ॥
जयासी आस्था मोक्षालागीं । तेणें न लागावें ये मार्गीं ॥ १० ॥
दिनकररामदास ह्मणे । आह्मी सुटलों दैवगुणें ॥ ११ ॥

[ २५७ ]

॥ श्रीराम ॥

अनंत पुण्यांचिया कोटी । भांडवल माझे गांठीं ॥ १ ॥
तेणें गुणें पद लाधलें । अहं सोहं निरसोनि गेलें ॥ ध्रु० ॥
कर्म उपासना ज्ञान । तनु चतुष्टय विवर्ण ॥ २ ॥
स्वधर्माचें संरक्षण । करुनी केलें पैं अनन्य ॥ ३ ॥
दैवी संपदेची माळा । सद्गुरायें घातली गळा ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे मीतूंवीण । अभिन्न सर्व त्रिभुवन ॥ ५ ॥

[ २५८ ]

॥ श्रीराम ॥

ऐकतां कीर्तन सोडवेना घर । सोसेना जोजार वैष्णवांचा ॥ १ ॥
वैष्णवांचें गाणें करकर मोठी । तिडीक ल्लहाटीं उठे थोर ॥ २ ॥
उठे थोर प्रीति वेश्येचे रंगणीं । सप्रेम चरणीं धांवे तेथें ॥ ३ ॥
धांवे तेथें हर्ष मानी मनीं मोठा । वैभवाचा ताठा मुसमुसी ॥ ४ ॥
मुसमुसी काममदमच्छरेंसीं । निंदी सन्मार्गासी वेश्यादास ॥ ५ ॥
वेश्यादास निंदी संतसाधुजना । वर्णी नृत्यांगना पदोपदीं ॥ ६ ॥
पदोपदीं त्यासी रौरवांचें ठाणें । दिनकर ह्मणे दिल्हें देवें ॥ ७ ॥

[ २५९ ]

॥ श्रीराम ॥

जळीं स्थळीं राम चंचळीं निश्चळीं । राम सर्वकाळीं सर्वां ठाईं ॥ १ ॥
सर्वांठाईं राम आहे पुरातन । पाहें परिछिन्न अनुभवें ॥ २ ॥
अनुभवीं राम निर्मळ निष्काम । दिनकरा वर्म रामदासीं ॥ ३ ॥

[ २६० ]

॥ श्रीराम ॥

सांपडला राम विश्वाचा विश्राम । नित्य समागम न खंडे कीं ॥ १ ॥
न खंडे सुगंध अखंड सुमनीं । तैसा शरपाणी[1] दासांपासीं ॥ २ ॥
दासांपासीं राम रामीं रामदास । दिनकरा वास निजधामीं ॥ ३ ॥

[ २६१ ]

॥ श्रीराम ॥

कैंचे काय आह्मी कैंचे काय तुह्मी । भ्रमाची हे ऊर्मि वाउगी चि ॥ १ ॥
आह्मा सर्व सम नेणों आप पर । द्वैताचा जोजारें[2] कैंचा काई ॥ ध्रु० ॥
अज्ञानासी भ्रम ज्ञाता तो निभ्रम । निर्मळ निष्काम सदोदित ॥ २ ॥
सदोदित ज्ञानी सोहं हंसा भरें । दिनकरा खरें आत्मज्ञान ॥ ३ ॥

[ २६२ ]

॥ श्रीराम ॥

जन पाहे जना दृश्यद्रष्टेपणें । तैसीं ज्ञानाज्ञानें होय नव्हे ॥ १ ॥
होय नव्हे मिथ्या विचारेंसहित । दृश्यद्रष्टामात जैसी जनीं ॥ २ ॥
तेवीं मिथ्या पाहें जन जनार्दन । दिनकरा मौन शब्दोशब्दीं ॥ ३ ॥

[ २६३ ]

॥ श्रीराम ॥

विषाचें निर्विष करी जानकीश । ऐसी बहुतांस साक्ष असे ॥ १ ॥
धन्य देवराया न कळे तुझी दया । जीवांच्या धावया धांवतोसी ॥ ध्रु० ॥
साक्ष ऐसी आणि पुराणें गर्जती । नवल हें चित्तीं वाटतसे ॥ २ ॥
वाटतसे तवं प्रत्यक्ष चि जालें । दिनकरा आलें प्रत्ययासी ॥ ३ ॥

[ २६४ ]

॥ श्रीराम ॥

दासांचें गौरव राखे जानकीश । तयांचें सर्वस्व स्वयें सोसी ॥ १ ॥

---

१ शर ह्मणजे बाण आहे ज्याचे हातीं तो, श्रीराम. २ जंजाळ, खटपट.

स्वयें सोसी राम दासांचा विश्राम । नित्य अविश्रम राखे त्यांसी ॥ २ ॥
राखे त्यांसी ऐसीं बोलतीं पुराणें । दिनकर ह्मणे सप्रचित ॥ ३ ॥

[ २६५ ]

॥ श्रीराम ॥

सत्संगाचें फळ काय तें आईक । करूनि निःशंक मनोभाव ॥ १ ॥
मनोभाव जेव्हां सत्संगीं जडला । तेव्हां चि लाधला स्वप्रकाशा ॥ २ ॥
स्वप्रकाशज्ञान विज्ञानेंसीं भक्ति । विषयविरक्ति असंभाव्य ॥ ३ ॥
असंभाव्य दशा शांतिक्षमायुक्त । शमली अयुक्त देहबुद्धि ॥ ४ ॥
देहबुद्धि गेली उरलें केवळ । स्वरूप सकळ सत्संगाचें ॥ ५ ॥
सत्संगाचें फळ स्वरूपाची सिद्धि । दिनकरा बोधीं साधकांसी ॥ ६ ॥

[ २६६ ]

॥ श्रीराम ॥

अहो जना तुह्मी करा हित कांहीं । प्रपंचप्रवाहीं पडों नका ॥ १ ॥
नका काळ वृथा जातुसे सर्वदां । नसोनि आपदा कां भोगावी ॥ २ ॥
भोगावी संपदा वैकुंठपीठींची । धरूनि भक्तीची वाट नीट ॥ ३ ॥
वाट नीट आहे धरितील त्यांसी । भोगिती सुखासी मोक्षाचिया ॥ ४ ॥
मोक्षाचिया सुखें सुखरूपें राम । स्मरतां चि श्रम दूरि ठाके ॥ ५ ॥
दूरि ठाके मायाजनित जें सुख । श्रीराम निःशंक चिंतितां चि ॥ ६ ॥
चिंतितां चि नाम उफराटें वाल्हा । वाल्मीक तो जाला येणें मार्गें ॥ ७ ॥
येणें मार्गें शत कोटी रामायण । भविष्य निर्माण केलें तेणें ॥ ८ ॥
केलें नारदानें हें चि अनुष्ठान । वाचे नारायण अखंडित ॥ ९ ॥
अखंडित ध्रुव प्रल्हाद तुंबर । नामीं निरंतर सद्भावेंसीं ॥ १० ॥
सद्भावें चि संत सनकादिकां जालें । गजेंद्रासी नेलें निजपदा ॥ ११ ॥
निजपदीं शुकवामदेवादिक । अक्रूर निष्टंक भक्तिमार्गें ॥ १२ ॥
भक्तिमार्गें सर्व जे कोण्ही लागले । ते चि येक नेले वैकुंठासी ॥ १३ ॥

---

१ श्रम वाटू न देतां.

वैकुंठसुखाची गोडी ज्याचे चित्तीं । तेणें रामीं वृत्ति दृढ द्यावी ॥१४॥
दृढ बुद्धि हे चि निश्चयेंसीं कीजे । अखंड लाविजे मन रामीं ॥ १५ ॥
मन रामीं रंगे तरी च सार्थक । नाहींतरी नर्कवास जीवां ॥ १६ ॥
वास जीवा होतां नरदेहीं बरा । तेथें येरझारा चुकवाव्या ॥ १७ ॥
चुकवाया अन्य देहीं कैंचें ज्ञान । तेणें पैं पतन चौऱ्यासीचें ॥ १८ ॥
चौऱ्यासी लक्ष्यांचें दुःख नरदेहीं । रामनामें पाहीं चुकवावें ॥ १९ ॥
चुकवावें ऐसें बहुत बोलती । परि न ये चित्तीं लोकांचीये ॥ २० ॥
लोकांचिये वाचे न ये राम राम । जाचितील येम त्या लोकांसी ॥२१॥
लोकिक सांडुनी लोकिकामाझारीं । दिनकरा धरीं येक राम ॥ २२ ॥

[ २६७ ]

॥ श्रीराम ॥

येक राम धरा त्रैलोक्याचा नाथ । तयाविण हेत नका कोठें ॥ १ ॥
नका कोठें धरूं माईक भजन । सीतापतिवीण सर्व मिथ्या ॥ २ ॥
सर्व मिथ्या ऐसी साक्ष दिनकरा । श्रीराम अंतरामाजीं येतां ॥ ३ ॥

[ २६८ ]

॥ श्रीराम ॥

जैसें चंद्रेंवीण चकोरा निर्वाण । कीं मेघांवांचून चातकासी ॥ १ ॥
तैसें माझें चित्त भेटीतें इच्छित । यावरी समर्थ दीनानाथ ॥ ध्रु० ॥
रवीच्या वियोगें चक्रवाकें जैसीं । कीं न येतां पतीसीं पतिव्रता ॥ २ ॥
वसंतावांचून जैस्या वनस्पति । साधकांसी खंति मोक्षालागीं ॥ ३ ॥
लोभियाचें चित्त जैसें अर्थालागीं । आरोग्यासी रोगी इच्छी जैसा ॥४॥
राघवावांचूनि हीनें दीनें व्योमी । दिनकर रामीं रामदास ॥ ५ ॥

[ २६९ ]

॥ श्रीराम ॥

चोजवला[2] राम सद्गुरुकृपेनें । आतां भिन्नपणें अभिन्नता ॥ १ ॥

---

१ इच्छा, कामना. २ जाणवला.

अभिन्नता बिंबीं जेवि प्रतिबिंबा । नाथिला खोळंबा उपाधीचा ॥ २ ॥
उपाधीच्या लोपें बिंब प्रतिबिंबीं । तैसा चि स्वयंबीं[1] दिनकर ॥ ३ ॥

[ २७० ]

॥ श्रीराम ॥

जेथें ज्याची पडे गुंतोनी वासना । तेंथें त्याच्या प्राणा वासु घडे ॥ १ ॥
वासु घडे जेव्हां दोघां येके ठांई[2] । संकल्प हा पाहीं रूढे तेथें ॥ २ ॥
रूढे तेथें मग जें जें कल्पी तें तें । ममतेच्या हातें[3] अहं भावी ॥ ३ ॥
अहंभावें करी नाना धर्माधर्म । आणि कर्माकर्म देहाधारें ॥ ४ ॥
देहाधारें प्राणी विषयांच्या भरें । उगंडेना[3] थोरें साभिमानें ॥ ५ ॥
साभिमानें भोगी स्वर्गनर्कभोग । संसाराचा पांग तेणें योगें ॥ ६ ॥
तेणें योगें जीव न विचारी देव । पतिताचा भाव देहभावी ॥ ७ ॥
देहभावी जीव दिनकर ह्मणे । सेविती साजैणें संसाराचें ॥ ८ ॥

[ २७१ ]

॥ श्रीराम ॥

नरदेह पावोनीयां । भक्तिवीण गेलें वांया ॥ १ ॥
त्राहे त्राहे दीनबंधु । तैसा नलगे तुझा वेधु ॥ ध्रु० ॥
विषयांलागीं झुरे जैसा । मायामोहें झळंबे[7] कैसा ॥ २ ॥
दिनकर ह्मणे हें नवल । येमपाशीं जाणवेल ॥ ३ ॥

[ २७२ ]

॥ श्रीराम ॥

अज्ञानाचें जन्म खोटें । पडलें अविद्येच्या लोटे ॥ १ ॥
नारायण नारायण । चांडाळासी उद्धरी कोण ॥ ध्रु० ॥
निंदी स्वधर्माची सोये । त्याची मात सांगों काये ॥ २ ॥

---

१ स्वयंभीं, स्वतःसिद्ध वस्तूच्या ठिकाणीं. २ हातानें किंवा साह्यानें. ३ उगडणें=विसरणें किंवा उगंड=उगड=उद्धार उद्धरेना. ४ पराधीनत्व. ५ बोलणें किंवा मैत्री. ६ छंद. ७ झळंबणें=पोळणें गुदमळणें

स्वयें नेणें न करी कांहीं । करित्यासी वारी पाहीं ॥ ३ ॥
परोपकार नेणे [1] कांटी । फळत्या वृक्षांभोंवतीं दाटी ॥ ४ ॥
ऐसा पतित सर्वगुणें । दिनकररामदास ह्मणे ॥ ५ ॥

[ २७३ ]

॥ श्रीराम ॥

संतसंग नाहीं जया । स्वहित कोठें लाभे तया ॥ १ ॥
हरि हरि हरि हरि । पतितासी कोण तारी ॥ ध्रु० ॥
वायां सिणविली माये । भूमिभार प्राणी होये ॥ २ ॥
दिनकर ह्मणे तो हि धन्य । ऐसा प्राणी जो अज्ञान ॥ ३ ॥

[ २७४ ]

॥ श्रीराम ॥

आतां जाणें क्षणा जाणें । नाहीं कोण्हासी राहाणें ॥ १ ॥
करा जोडी सत्संगाची । आधीं तोडा प्रपंचाची ॥ ध्रु० ॥
बहुत नाडिले सवंसारें । पछाडिले अहंकारें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे वेग करा । धरा शुद्ध परंपरा ॥ ३ ॥

[ २७५ ]

॥ श्रीराम ॥

रामेंवीण जिणें पाहें । जात असे लवलाहें [2] ॥ १ ॥
काय जालासी निदसुरा । धरूनियां रांडा पोरां ॥ ध्रु० ॥
अवघीं वैभवाचीं भूतें । स्वार्थें झडपूं आलीं तूतें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे पाहें खरा । प्रपंच सर्व चोरांचा थारा ॥ ३ ॥

[ २७६ ]

॥ श्रीराम ॥

माझें कर्म खोटें ठाके मजआड । तेणें भवभीड वाटतसे ॥ १ ॥
धांव धांव देवा अंतरापासून । नेईं सोडवून येथूनीयां ॥ ध्रु० ॥

---

१ स्वतः उचलून देववत नाहीं व झाडावरील फळें लोक खातील ह्मणून त्या भोंवतीं कांटे लावून ठेवतो. २ त्वरित.

बहुतां जनांची केली सोडवण । पतितपावन नाम साजे ॥ २ ॥
दिनकर ह्मणे कायावाचामनें । दुजें कांहीं नेणें तुजवीण ॥ ३ ॥

[ २७७ ]

॥ श्रीराम ॥

संत जिवलग सोयरे जीवाचे । भेटवा निजांचे निजदानी ॥ १ ॥
निजदानी संत भेटती केधवां । आर्त वाटे जीवा मनांतूनि ॥ २ ॥
मनांतूनि हेत संतांचे चरणीं । लागलासे ध्यानीं न ये दुजें ॥ ३ ॥
न ये दुजें कांहीं भावेंने भावितां । अखंडित संतां झुरतसे ॥ ४ ॥
झुरतसे त्यांचें मागे पायेंवणी । वेऊं द्या रे धेणी निरंतर ॥ ५ ॥
निरंतर सेवा घडो माझ्या जीवा । तेणें देहभावा पालटीन ॥ ६ ॥
पालटीन सर्व दिनकर ह्मणे । तयांचे कृपेनें अविद्येसी ॥ ७ ॥

[ २७८ ]

॥ श्रीराम ॥

चांगलें बोलावें चांगलें चालावें । चांगलें शोधावें सर्वकाळ ॥ १ ॥
सर्वकाळ सर्व चांगलें चि व्हावें । ह्मणिजे जाणावें चांगलें चि ॥ २ ॥
चांगलें सेवितां चांगलें चि जालें । दिनकरा आलें प्रत्ययासी ॥ ३ ॥

[ २७९ ]

॥ श्रीराम ॥

सद्गुरूनें केलें संपूर्ण चांगलें । सर्व निर्वटिलें मजमाजीं ॥ १ ॥
मजमाजीं मज लावियलें निज । अखंड सहज सर्वकाळ ॥ २ ॥
सर्वकाळ कांहीं आपपर नाहीं । देह जातां पाहीं असतां हि ॥ ३ ॥
असतां हि सर्व नाहीं हें अपूर्व । नसतां हि पूर्व अपूर्वता ॥ ४ ॥
अपूर्वता थोर ह्मणे दिनकर । जेव्हां वेर-कर सद्गुरूचा ॥ ५ ॥

---

१ आत्मवस्तूचें दान देणारे, स्वस्वरूपाची भेट करून देणारे. २ भावना= अंतःस्फुरण. ३ संतांकरितां. ४ तीर्थ. ५ तृप्ति होईपर्यंत. ६ निर्मूल केलें. ७ माझ्यामधील सर्व गुणदोषांचें. ८ देही असून विदेही होणें किंवा हे सर्व दृश्य पदार्थ असून न भासणें. ९ वरदायक.

[ २८० ]

॥ श्रीराम ॥

राम हा विश्राम धरितील त्यांचा । महिमा तयांचा कोण जाणे ॥ १ ॥
कोण जाणे लीळा रामाच्या दासांची । वर्णितां शेशाची वाणी खुंटे ॥२॥
वाणी खुंटे जयां वर्णितां शास्त्रांची । दिनकरा साची अपूर्वता ॥ ३ ॥

[ २८१ ]

॥ श्रीराम ॥

रामदास माझ्या सोयरे जिवाचे । देखेन तयांचे पाय केन्हां ॥ १ ॥
पाय केन्हां दृष्टी पडतील साचे । उतरीन देहाचें निंबलोण ॥ २ ॥
निंबलोण सर्वभावेंसीं करीन । नुरोनि उरेन सेवेलागीं ॥ ३ ॥
सेवेलागीं देह देहेंविण राहे । दिनकरा पाहें नवलाव ॥ ४ ॥

[ २८२ ]

॥ श्रीराम ॥

गोविंद गोविंद लागो मना छंद । वाउगा वेवाद कासयासी ॥ १ ॥
कासयासी सीण रामनामेंवीण । भोगावे दारुण भवरोग ॥ २ ॥
भवरोग येमयातनेचें मूळ । बोलती सकळ संतजन ॥ ३ ॥
संतजनीं नाम दिधलें निजांचें । तें चि मना साचें सोडूं नये ॥ ४ ॥
सोडूं नये नाम साराचें हि सार । ह्मणे दिनकररामदास ॥ ५ ॥

[ २८३ ]

॥ श्रीराम ॥

आह्मां अनाथांचा सोयरा श्रीरंग । करूनि अभंग[१] सांभाळितो ॥ १ ॥
सांभाळितो देव आपुल्या दासांसी । संकट तयांसीं पडों नेदी ॥ २ ॥
संकटीं धावणें निर्भय राखणें । हें येक करणें गोविंदाचें ॥ ३ ॥
गोविंद तो बाप गोविंद माउली । कृपेची साउली अनाथांची ॥ ४ ॥
अनाथांचा नाथ दिनकर ह्मणे । सर्वकांहीं जाणे तो चि येक ॥ ५ ॥

---

१ पुन्हां कधीं हि भंग पावणार नाहीं असे; निर्भय, स्थिरचित्त.

[ २८४ ]

॥ श्रीराम ॥

गोविंदाचे दास गोविंद सांभाळी । लेंकुरा माउली जेणें रीतीं ॥ १ ॥
जेणें रीतीं माये बाळा हे उपमा । न साहे श्रीरामा सर्वथा हि ॥ २ ॥
सर्वकाळीं देव सांभाळी भक्तांसी । दुःकाळीं[१] बाळांसी माता खाये ॥ ३ ॥
मातेची उपमा देवासी न साहे । अधिक तो आहे कोटिगुणें ॥ ४ ॥
कोटीच्या हि कोटी दिनकर ह्मणे । देवें उद्धरणें निजभक्तां ॥ ६ ॥

[ २८५ ]

॥ श्रीराम ॥

नाम पडतां श्रवणीं । ह्रदयीं भासे चापपाणी ॥ १ ॥
राम राम राम राम । सकळ जीवांचा विश्राम ॥ ध्रु० ॥
राम मनीं अखंड वाचे । राम विस्मरण देहाचें ॥ २ ॥
बहुतां जन्मांचें सुकृत । दिनकरा सफाळित ॥ ३ ॥

[ २८६ ]

॥ श्रीराम ॥

आपेंआप भेटी संतसमागमें । स्वानुभववर्मे चोजवलीं ॥ १ ॥
चोजवला देव चोजवला देव । चोजवला देव अंतरींचा ॥ ध्रु० ॥
अंतरींचा देव द्वैतेंवीण सर्व । भोगितां गौरव अंतरेना ॥ २ ॥
अंतरेना कदा नित्य निरंतर । ह्मणे दिनकररामदास ॥ ३ ॥

[ २८७ ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्मज्ञानेंवीण न चुकती जन्म । तपें तीर्थें यज्ञ केले जऱ्ही ॥ १ ॥
केले जऱ्ही याग योग चांद्रायणें । अथवा साधनें शमादिकें ॥ २ ॥
शमादिक दम दायक जन्माचे[२] । दिनकरा साचें चोजवलें ॥ ३ ॥

---

१ दुष्काळांत. २ जन्ममरणपरंपरेचे.

[ २८८ ]

॥ श्रीराम ॥

भावाचा भुकेला उभा विटेवरी । पाहा भीमातीरीं पांडुरंग ॥ १ ॥
पांडुरंगरंगें रंगले धांवती । आरोळिया देती हरिनामें ॥ २ ॥
नामाच्या गजरें आनंदाच्या भरें । तृप्त दिनकरें केलें देवा ॥ ३ ॥

[ २८९ ]

॥ श्रीराम ॥

न करावी निंदा भोळ्यांभाविकांची । त्यांचिये पाईंची धुळी व्हावें ॥ १ ॥
व्हावें तनुमनें भावें जीवें प्राणें । सांडवा करणें या देहाचा ॥ २ ॥
देहाचा भरंवसा नाहीं ब्रह्मादिकां । दिनकरा निका निजभाव ॥ ३ ॥

[ २९० ]

॥ श्रीराम ॥

किती आतां सोस वासनेच्या संगें । सोडियेले जागे इंद्रियांनीं ॥ १ ॥
इंद्रियांनीं देह सोडिला सर्व हि । आतां असे काई भरंवसा ॥ २ ॥
भरंवसा ज्यांचा होता तुझे मनीं । तुज ते टाकुनी पाय गेले ॥ ३ ॥
पाय गेले हात कान डोळे दात । अझूनि निश्चिंत कैसा होसी ॥ ४ ॥
होसी का पतित असता पावन । दिनकर खूण सांगतसे ॥ ५ ॥

[ २९१ ]

॥ श्रीराम ॥

विश्वासेना मन साधूचिये पाईं । चिंता वाहे देहीं प्रपंचाची ॥ १ ॥
प्रपंचाची व्याधी विषयांच्या भरें । लागली निर्धारें प्राणियांसी ॥ २ ॥
प्राणी जिता जीवें सुकृत नाठवे । निंदी सर्वभावें भाविकांसी ॥ ३ ॥
भाविकांची निंदा करी कुचराई । धन्य नरदेहीं तो हि येक ॥ ४ ॥
तो हि येक धन्य ह्मणे दिनकर । करी नर्की थारें पूर्वजांसी ॥ ५ ॥

---

१ सांडोवा=त्याग किंवा कुरवंडी. २ स्थानें; किंवा जागरुकता, आपापले व्यापार. ३ राहिवास.

[ २९२ ]

॥ श्रीराम ॥

आनंदाच्या भरें बैसोनियां त्रिंदीं । भाविकांसी निंदी उल्हासेंसीं ॥ १ ॥
उल्हासेंसीं जैसा पतंग दीपासी । झडपी प्राणासी जाळावया ॥ २ ॥
जाळावया तैसे पूर्वज आपुले । निंदकानें दिल्हे यमाहातीं ॥ ३ ॥
यमाहातीं वंश निंदकाचा पडे । तऱ्ही वाडेकोडें जल्पतसे ॥ ४ ॥
जल्पतसे जैसें श्वान याचकांसी । तैसा दिननिशीं भुंके पापी ॥ ५ ॥
पापी तो देवाचा सखा भाविकांचा । दिनकरा त्याचा लाभ असे ॥ ६ ॥

[ २९३ ]

॥ श्रीराम ॥

ॐकाराचा अर्थ विचारीं विचारें । पावसी निर्धारें समाधान ॥ १ ॥
समाधानें याचीं अंगें विचारावीं । क्षराक्षरानावीं वर्तती जें ॥ २ ॥
वर्त्तती जें दोन्ही सर्व चराचरीं । तयांचे संहारीं अनुर्वाच्य ॥ ३ ॥
अनुर्वाच्य सुख द्वैतेंवीण घेणें । ज्याचें तो चि जाणे ज्ञप्तिवीण ॥ ४ ॥
ज्ञप्तिवीण ज्ञेय संतसमागमें । दिनकरा रामें प्रबोधिलें ॥ ५ ॥

[ २९४ ]

॥ श्रीराम ॥

क्षर नाशिवंत अक्षर शाश्वत । दोहींचा ऐक्यार्थ जेथें घडे ॥ १ ॥
तें चि समाधान तें चि समाधान । तें चि समाधान निश्चयाचें ॥ ध्रु० ॥
अहंभाव सरे सोहंभाव स्फुरे । स्फुरण हि नुरे विसरेंसीं ॥ २ ॥
विसरेंसीं जेथें स्मरण आटलें । दिनकरा जालें अनुर्वाच्य ॥ ३ ॥

[ २९५ ]

॥ श्रीराम ॥

जयांचिये मनीं श्रीरामचिंतन । आणीक साधन नाहीं दुजें ॥ १ ॥
नाहीं दुजें कांहीं मोक्षाचें कारण । श्रीरामावांचून भूमंडळीं ॥ २ ॥

---

१ रस्त्यावर, चव्हाट्यावर. २ अत्यंत आवडीनें. ३ निंदा करतो. ४ निंदकाचें घर असावें शेजारीं । ( तुकाराम ) ५ लयसाक्षी ज्ञानाखेरीज, केवळ अनुभवानें.

भूमंडळीं नाम नेणे तो पापिया[1]। जन्मा येऊनियां काय केलें ॥ ३ ॥
काय केलें तेणें सार्थकावांचून । संसाराचा सीण करूनीयां ॥ ४ ॥
करूनियां ऐसें दिनकर ह्मणे । केलें तें भोगणें लागे पुढें ॥ ५ ॥

[ २९६ ]

॥ श्रीराम ॥

स्वकर्माचा पंथीं संदेहाचा गांव । तेथें देहभाव ठाणापति ॥ १ ॥
ऐसा हा चांडाळ खेळे नाना खेळ । कामारे[1] कळिकाळ ज्याचे घरीं ॥ध्रु०॥
देहबुद्धीवाटें जे येतां देखती । तयांसी फांसिती[2] सर्वकाळ ॥ २ ॥
सर्वकाळ वेगीं सोडूनीयां वापा । धरीं पंथ सोपा सज्जनाचा ॥ ३ ॥
सज्जनसंगतीं चुकती सायास । निसंदेही वास सोहंपंथें ॥ ४ ॥
सोहंपंथें दीन दिनकर लीन । नित्य समाधान येणें पंथें ॥ ५ ॥

[ २९७ ]

॥ श्रीराम ॥

अनाथां सनाथ करी सद्गुरुनाथ । संशयाची मात निरसूनि ॥ १ ॥
निरसूनी देह आणि देहभाव । करी निरावेव निजकृपा ॥ २ ॥
निजकृपादृष्टीं पाहातां चि जीव । जालें स्वयें शिव सदोदित ॥ ३ ॥
सदोदित जनीं सदोदित वनीं । तिहीं त्रिभुवनीं सदोदित ॥ ४ ॥
सदोदित करी कृपा सद्गुरूची । दिनकरा साची सफळित ॥ ५ ॥

[ २९८ ]

॥ श्रीराम ॥

स्वकर्मआचार आणि उपासना । करीं विवंचना विचाराची ॥ १ ॥
विचारीं वेदांत सद्गुरुकृपेनें । साधीं प्रचीतीनें आत्मज्ञान ॥ २ ॥
आत्मज्ञानें मूळ साधलें आपलें । दिनकरा जालें समाधान ॥ ३ ॥

[ २९९ ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्मज्ञानेंवीण उपदेश फोल । श्रुतीचे हे बोल गर्जताती ॥ १ ॥

---

१ सेवक. २ पाश टाकतात.

गर्जताती वेद पुराणें सर्व हि । साधुसंत पाहीं मुनीजन ॥ २ ॥
मुनीजन ज्ञानी पूर्ण समाधानी । ज्ञानेंवीण वाणी न वोलती ॥ ३ ॥
न बोलती कदां वेदबाह्य ज्ञान । पाषांडाचें चिन्ह जाणोनीयां ॥ ४ ॥
जाणोनियां सत्य तें चि तें स्थापिती । काल्पनिक मति निरसूनि ॥ ५ ॥
निरसूनि सर्व सहज वर्तणें । त्रिकांडसाधनें[1] जडांलागीं[2] ॥ ६ ॥
जडांलागीं जनीं संतां अवतरणें । दिनकर ह्मणे रामदास ॥ ७ ॥

[ ३०० ]

॥ श्रीराम ॥

होतें तें सहज जातें तें सहज । वाटतसे चोज अहंतेचें ॥ १ ॥
अहंतेचें रूप पाहातां नाडळे । वेढांळॊं[3]वियेलें ब्रह्मादिकां ॥ २ ॥
ब्रह्मादिक केले जड मूढ वेडे । अगाध पवाडे नाथिले चि ॥ ३ ॥
नाथिलें चि लागे निदान[4] चुकतां । सद्गुरुसमर्था नोळखतां ॥ ४ ॥
नोळखतां हानी होते थोरथोरां । साक्षी दिनकरा रामदासीं ॥ ५ ॥

[ ३०१ ]

॥ श्रीराम ॥

तीर्थाटणें करी पुजी देवोदेवीं । परि निजभावीं नाहीं मन ॥ १ ॥
मन घरदारीं लागलेंसे नेमें । देह तीर्थं भ्रमे सर्वकाळ ॥ २ ॥
सर्व काळ गेला संदेहाच्या मुळें । दिनकरा जालें अनहित ॥ ३ ॥

[ ३०२ ]

॥ श्रीराम ॥

हित नरदेहीं होतसे सर्वांचें[5] । खंडण जन्माचें संतसंगें ॥ १ ॥
संतसंगें होतां मग काय दुजें । असणें सहेजें सर्वकाळ ॥ २ ॥
सर्वकाळ घरीं असो जावो दुरी । फिरो दिगांतरीं तीर्थें क्षेत्रें ॥ ३ ॥
क्षेत्रें क्षेत्रज्ञासी पावती त्यांचेनि[6] । मुक्त जनीं वनीं संतसंगें ॥ ४ ॥

---

१ कर्म, उपासना आणि ज्ञान हीं तिन्ही साधनें. २ ज्ञानहीनाकारितां. ३ भुलविलें. ४ चिकित्सा, कार्यकारणभाव. ५ सत्संगानें सहजस्थिति प्राप्त होते. ६ अशा स्थितप्रज्ञमनुष्यामुळें च क्षेत्रांतील देव क्षेत्रस्थांना भेटतो.

संतसंगें करी कर्मधर्मक्रिया । अलिप्त तो माया सिवेना कीं ॥ ५ ॥
सिवेना कीं कांहीं कल्पनेचें अंग । करी सर्व सांग विधियुक्त ॥ ६ ॥
विधियुक्त असे संतसंग नसे । तया गर्भवासें सोडिजेना ॥ ७ ॥
सोडिजेना ऐसें वेदशास्त्र बोले । निर्दाळिजे काळें अज्ञानासी ॥ ८ ॥
अज्ञानासी मोठी धबाधबी आहे । दिनकरा पाहें ज्ञानेंवाण ॥ ९ ॥

[ ३०३ ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्मज्ञानी जाला भावार्थ सोडिला । थारा हि मोडिला भजनाचा ॥१॥
भजनाचें नांव वाचेसी नाणावें । मुक्त विचरावें अखंडित ॥ २ ॥
अखंडित ऐसे प्रबोध करिती । मोडूनियां स्थिति भावार्थाची ॥ ३ ॥
भावार्थाचें मूळ मोडुनी सधरें[2] । करिती व्यापार इंद्रियांचे ॥ ४ ॥
इंद्रियांचे भोग विषयांचे पांगें[3] । न सुटती चांग साधु ऐसे ॥ ५ ॥
ऐसे दुराचार भोगिती अघोर । ह्मणे दिनकररामदास ॥ ६ ॥

[ ३०४ ]

॥ श्रीराम ॥

ज्ञानियांचें चिन्ह वोळखावें जनीं । निजसमाधानी सर्वकाळ ॥ १ ॥
सर्वकाळ कर्म वर्णाश्रमधर्म । करितां निष्काम संकोचेना ॥ २ ॥
संकोचेना मनीं उपासनेलागीं । महोच्छाव जगीं पर्वें करी ॥ ३ ॥
पर्वें करी कथा दिंडी निरूपणें । गाजवी कीर्तनें ब्रह्मगोळ ॥ ४ ॥
ब्रह्मगोळातीत जें रूप अगम्य । गमूनि तें सौम्य स्वयें होये ॥ ५ ॥
स्वयें सर्वातीत करितो सर्व हि । ज्ञानी त्यासी पाहीं ह्मणिजेतें ॥ ६ ॥
ह्मणिजेत वेदें त्रिकांडभजन । कर्म उपासन आणि ज्ञान ॥ ७ ॥
ज्ञान प्रतिपादी सर्व हि उच्छेदी । भेदाचीये बंदीं पडला तो ॥ ८ ॥
पडला तो वेदबाह्य नांव त्यासी । संतांचे सभेसी निंद्य जाला ॥ ९ ॥
निंद्य जाला प्राणी अत्रीं परत्रीं । दिनकरा धात्री वेदविद्या ॥ १० ॥

---

१ अज्ञानी माणसास यमापासून घात आहे असें समजावें. २ आश्रययुक्त. ३ पराधीनत्व. ४ दाई.

[ ३०५ ]

॥ श्रीराम ॥

जगद्गुरु वेद तया देणें भेद । केवीं तें प्रसिद्ध ज्ञान बापा ॥ १ ॥
बापा वेदेवीण कैंचें समाधान । घडे हें प्रमाण पाषांडासी ॥ २ ॥
पाषांडासी वेद अप्रमाण जाला । जैसा जंबुकाळा[1] निशाकरें[2] ॥ ३ ॥
निशाकर सर्व जनीं जगद्वंद्य । तो हि केला निंद्य वांयसांनीं[3] ॥ ४ ॥
वायर्वेसें मत्तें सर्व वेदेवीण । वादकांसी सीण अस्माधानें ॥ ५ ॥
अस्माधानी जीवें वंदावे सज्जन । मग समाधान सप्रचित ॥ ६ ॥
सप्रचित ज्ञानी विचारी वेदांत । समाधानीं चित्त राखोनीयां ॥ ७ ॥
राखोनियां सर्व वेदांचा वेव्हार । नित्य निर्विकार अनुभवी ॥ ८ ॥
अनुभवी भवविभव सोडूनि । तेथें दुजेपणीं उरी कैंची ॥ ९ ॥
उरी कैंची कर्म ब्रह्म ह्मणावया । दिनकरा मायासमवेत ॥ १० ॥

[ ३०६ ]

॥ श्रीराम ॥

नेणे भजन रामाचें । जळो वैभव तयाचें ॥ १ ॥
भूमिभार पापी नर । नेणे सारासारविचार ॥ ध्रु० ॥
वित्पत्तीचा सीण केला । अंतीं ब्रह्मराक्षेस जाला ॥ २ ॥
रामेंवीण जो जो श्रम । तो तो दिनकरा भ्रम ॥ ३ ॥

[ ३०७ ]

॥ श्रीराम ॥

कोणाचें हें घर वेव्हार विचार । सर्व हि संसार नाथिला चि ॥ १ ॥
वायां सिणतसे संसारिक जन । मी माझें हें स्वप्न नेणोनीयां ॥ ध्रु० ॥
नाथिला प्रपंच सत्य मानियेला । थितां[4] अंतरिला आत्मारामु ॥ २ ॥
आत्माराम सर्व ब्रह्मांडायेव्हडा । नेणोनियां मूढा येणें जाणें ॥ ३ ॥
येणें जाणें त्याच्या दर्शनें शमेल । फिरोनि पाहील ज्याचा तो चि ॥४॥
ज्याचा तो चि स्वयें दिनकर ह्मणे । सद्गुरूचे खुणें बाणतां चि ॥ ५॥

---

१ कोल्ह्यास. २ चंद्र. ३ कावळयांनीं. ४ लटकीं. ५ ( अंतरांत ) असलेला.

[ ३०८ ]

॥ श्रीराम ॥

कोरडें चि आलें कोरडें चि गेलें । कोरडें चि जालें कासावीस ॥१॥
अनायासें पडे अमृताचां कुंडीं । रिघों नेदी तोंडीं लवैयेक[1] ॥ २ ॥
तैसें पापियसी कैंचें रामसुख । कीर्तनीं साशंक बैसतां चि ॥ ३ ॥
बैसला चि असे परी तेथें नसे । घरदारसोसें नाडियेलें ॥ ४ ॥
नाडलें अत्रीं परत्रीं नाडलें । दिनकरें केलें भविष्यासी ॥ ५ ॥

[ ३०९ ]

॥ श्रीराम ॥

स्वप्नीं तें हि आह्मी न जाणों कीर्तन । भिडेसी घालून नेलें संतीं ॥१॥
नेलें संतीं परि नाहीं वरें जालें । तस्करीं घेतलें खानें[2] घरीं ॥ २ ॥
घरीं तडातोडी जाली रांडापोरां । आणि उजगरा आह्मांलागीं ॥ ३ ॥
आह्मांलागीं जाली कथा सुप्रसन्न । गेलें धनधान्य आली भीक ॥ ४ ॥
आली भीक घरा कीर्तन ऐकतां । दिनकरा वार्ता कौतुकाची ॥ ५ ॥

[ ३१० ]

॥ श्रीराम ॥

कीर्तनासी जावें रोकडें[3] जागावें । [4]थितें अंतरावें झोंपेलागीं ॥ १ ॥
झोंपेलागीं थोर व्हावें कासावीस । अणि हरिदास छळिताती ॥ २ ॥
छळिताती कैसे मारविती हाका । रामनामें देखा क्षणक्षणा ॥ ३ ॥
क्षणक्षणा हात किती हो पिटावे । काय यांचें घ्यावें कोरडें चि ॥ ४ ॥
कोरडें चि आह्मां कां हो दिनकर । छळी निरंतर परोपरीं ॥ ५ ॥

[ ३११ ]

॥ श्रीराम ॥

आह्मांवरी देव येक खंडेराव । तयावीण भाव नेणों कांहीं ॥ १ ॥
नेणों राम कृष्ण देव नारायण । मल्हारीवांचून दुजा देव ॥ २ ॥

---

१ लवक=किंचित. २ खाण=खणणें. ३ प्रत्यक्ष. ४ वाया.

दुजा देव येक ह्माळसेचा टांक । भैरोबा आणीक चंडाबाई ॥ ३ ॥
चंडाबाई माये कडकडां खाये । दरुषण पाहें गळां तिचे ॥ ४ ॥
तिचें विसरतां रूप कोढी व्हावें । मग काई ध्यावें राघवाचें ॥ ५ ॥
राघवाचें नांव कोरडें तें काई । सत्य चंडाबाई मलुखानें ॥ ६ ॥
मलुखान बाप आई चंडाबाई । भैरोबा तो भाई आह्मांघरीं ॥ ७ ॥
आह्मांवरीं राम ह्मणतां चि जाण । होतें निसंतान रामनामें ॥ ८ ॥
रामनामें भीक लागे थोरथोरां । नको दिनकरा छळूं आह्मां ॥ ९ ॥

[ ३१२ ]

॥ श्रीराम ॥

हिवराचे खोंडीं आमुचें दैवत । ऐसें कडाडित दुजें नाहीं ॥ १ ॥
धन्य कुळगोत आमुचें विख्यात । बिरोवा नांदत आह्मांघरीं ॥ २ ॥
आह्मांवरीं नसे आणिकांचा थारा । नको दिनकरा रामकथा ॥ ३ ॥

[ ३१३ ]

॥ श्रीराम ॥

आह्मांवरीं आहे सर्वब्रह्या बैलें । तयाची येईल स्थित कोणा ॥ १ ॥
कोण्हासी हि न ये स्थित त्या बैलाची । दृष्टि समतेची सर्वभावीं ॥ २ ॥
सर्वभावीं तया ब्रह्म चि देखणें । नाहीं विचारणें शुद्धाबद्ध ॥ ३ ॥
शुद्धाबद्धभाव धरिले समान । विष्टा आणि अन्न सारिखें चि ॥ ४ ॥
सारिखी चि माये आणि दुजी गाये । उडतां न पाहे द्वैताचार ॥ ५ ॥
आचार विचार अवघा येकंकार । जाला ब्रह्माकार बश्या बैल ॥ ६ ॥
बैलाची हे क्रिया वर्ते तदाकार । करा नमस्कार गोसांवी हो ॥ ७ ॥
गोसांवी सक्रोध उठोनी चालिले । दिनकरा आलें हांसें थोर ॥ ८ ॥

[ ३१४ ]

॥ श्रीराम ॥

आत्मज्ञानेंवीण जीवासी पतन । यातना दारुण होत असे ॥ १ ॥

---

१ मल्लारीस च मल्लुखान ह्मटलें आहे. २ सर्व ब्रह्ममय आहे असें ह्मणून शुद्धाशुद्ध विचार न पाहणारा, स्वैर वर्तन करणारा.

होते आटाआटी अज्ञानासी मोठी । लाभेंवीण कष्टी कोण्या काजा ॥२॥
काज नरदेहीं दिनकरा पाहीं । सद्गुरूचे पाई मोक्षसुख ॥ ३ ॥

[ ३१५ ]

॥ श्रीराम ॥

मोक्षाचिये वाटें जाती पुण्यश्लोक । गर्जताती सुख स्वसुखाचें ॥ १ ॥
स्वसुखाची धणी देती याचकासी । मोक्षश्री तयांसी न विसंबे ॥ २ ॥
विसंबेना पाहें दिनकरा कैसें । भाग्य मोक्षश्रीचें सोडितां हि ॥ ३ ॥

[ ३१६ ]

॥ श्रीराम ॥

गजेंद्राची वार्ता आइकों श्रवणीं । परी संशय मनीं वाटतसे ॥ १ ॥
तैसा दीनालागीं पावसील जरी । सत्य वार्ता तरी वाटे मज ॥ ध्रु० ॥
रक्षिली पांचाळी पांडवांसहित । जीवीं मिथ्याभूत वाटतसे ॥ २ ॥
दिनकरा संकट आलेंसे अचाट । वारितां वरिष्ठ होसी देवा ॥ ३ ॥

[ ३१७ ]

॥ श्रीराम ॥

प्रपंचवारुळीं संसारभुजंग । झोंबिला अव्यंग अहंसंधीं ॥ १ ॥
धांवे सद्गुरुरामा जीवाच्या विश्रामा । सोडउनी निजधामा नेणें मज ॥ध्रु०॥
विषयवीष देवा चढलें सर्वांगीं । जैसें हरण आगीं अरंदळे[1] ॥ २ ॥
सुखगोडीचा झेंडु[2] बैसलासे कंठीं । तेणें आटाआटी[3] होते थोर ॥ ३ ॥
ऐसा अजगर समूळ उतरी । न दिसे निर्द्धारीं त्रिभुवनीं ॥ ४ ॥
ऐकतां करुणा अयोध्येचा राणा । सोडविलें दीना दिनकरा ॥ ५ ॥

[ ३१८ ]

॥ श्रीराम ॥

लक्ष कोटी देवा अपराध माझे । जाले कीं सहजें तुजपुढें ॥ १ ॥
न जाणोनि तुझी लीळा हे अपार । केले अविचार दोष देवा ॥ २ ॥

---

१ आरंबळणें असा शब्द आहे, त्याचा अर्थ मोठ्यानें ओरडणें, किंकाळ्या फोडणें. २ रक्ताची गुळणी. ३ श्रम, दगदग.

आतां करी कोण क्षमा तुजवीण । पतिततारण नाम कैसें ॥ ३ ॥
नेणपणें बाळ मातेसीं बरळ[1] । करी खळखळ नानापरीं ॥ ४ ॥
तैसें देवा जालें नेणतां जें कांहीं । करी क्षमा तें हि दिनकरा ॥ ५ ॥

[ ३१९ ]

**॥ श्रीराम ॥**

बाळाचे गुणदोष देखतां माउली । आनंदाचां मेळीं चोज करी ॥ १॥
तैसो तूं माउली आह्मां अनाथांसी । तुजवीण सोसी केलें कोण ॥२॥
ह्मणें विसंबसी आपुल्या दासांसी । धरूनि प्रेमेंसीं दिनकरा ॥ ३ ॥

[ ३२० ]

**॥ श्रीराम ॥**

न कळे तुझें नाम न कळे तुझें प्रेम । न कळे विश्राम परत्रींचा ॥ १ ॥
परि तुझा दास परि तुझा दास । नेणें दुजी वास[2] दयानिधि ॥ ध्रु० ॥
न कळे तुझें ध्यान न कळे तुझें ज्ञान । न कळे तुझें मान अगाध जें ॥२॥
न कळे तुझें कांहीं अरत्र परत्र । ह्मणे दिनकररामदास ॥ ३ ॥

[ ३२१ ]

**॥ श्रीराम ॥**

जातां मी येकला येतां मी येकला । मध्यें चि दुकला कैंचा आणूं ॥१॥
माझा मी मुळींचा येकला येकटु । दुसऱ्याच्या घोंटुं[3] भरूनियां ॥ २ ॥
मी माझा सांगाती मज कोण्ही नसे । सांगतो विश्वासें दिनकर ॥ ३ ॥

[ ३२२ ]

**॥ श्रीराम ॥**

मी माझा जनक जननी दुहिता । पुत्र हि तत्वतां माझा मी चि ॥ १ ॥
माझा मी चि बंधु सजन सोयरा । इष्ट मित्र दारा माझा मी चि ॥ २ ॥
माझा मी सर्व हि येथींचा तेथींचा । निज मी निजांचा दिनकरु ॥ ३ ॥

---

१ छांदिष्ट. २ सोय. ३ घोंटभरणें=जीव घेणें.

[ ३२३ ]

॥ श्रीराम ॥

वोडगस्त जिणें देवा माझें फार । तुझें मन स्थिर जालें कैसें ॥ १ ॥
धाव धाव कैसा निवांत अझूनि । ब्रीद हें चरणीं कासयासी ॥ ध्रु० ॥
चिंतेचीये पूरीं चालिलों वाहात । कोणासी सामर्थ्य काढावया ॥ २ ॥
दिनकर ह्मणे कां होसी उदास । बोल करणीस लागतसे ॥ ३ ॥

[ ३२४ ]

॥ श्रीराम ॥

अमृत सेवितां अमर चि होणें । बोलती पुराणें आणि शास्त्रें ॥ १ ॥
परि अनुमान परि अनुमान । परि अनुमान विचारितां ॥ ध्रु० ॥
विचारितां मनीं जरी हें अमृत । अमर करीत अमरांसी ॥ २ ॥
अमरांसी नाश न होता कल्पांतीं । तरी हे वेदंति सत्य होती ॥ ३ ॥
प्रत्यक्ष अमर जाती मृत्युपंथें । अनुमान येथें काय असे ॥ ४ ॥
ह्मणौनि हें[४] खोटें नामामृत सार । सेवा निरंतर आत्मस्थितीं ॥ ५ ॥
आत्मस्थितीं नाम अखंड सेवावें । तदाकारें व्हावें नामामृतें ॥ ६ ॥
नामामृतें जीव होये तदाकार । ह्मणे दिनकररामदास ॥ ७ ॥

[ ३२५ ]

॥ श्रीराम ॥

देहबुद्धि जवं निरसली नाहीं । तवं हित कांहीं केल्यां नव्हे ॥ १ ॥
केल्यां नव्हे देव धर्म तीर्थ व्रत । वाउगा संकेत सर्व कांहीं ॥ २ ॥
सर्व कांहीं घडे जातां देहबुद्धि । साधे आत्मसिद्धि सोहंभावें ॥ ३ ॥
सोहंभावें बुद्धि जडतां स्वरूपीं । तेव्हां पुण्य पापी उरिजेना ॥ ४ ॥
उरिजेना द्वैतें दिनकर ह्मणे । निसंदेह होणें सप्रचित ॥ ५ ॥

[ ३२६ ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्मांडा येव्हडा देहीं देहभाव । धरूनियां देव पाहां धावे ॥ १ ॥

---

१ ओढाताणीचें. २ संशय. ३ भाषण, वाणी. ४ अमृत सेवितां अमर चि होणें । हें ह्मणणें. ५ स्वस्वरूपीं एकरूप.

पाहों धावे सर्व भूमंडळ फिरे । परि निर्विकारें भेटिजेना ॥ २ ॥
भेटिजेना देवें त्रैलोक्य हिंडतां । तो देव तत्वता भेटे घरीं ॥ ३ ॥
भेटे घरीं देव जातां देहभाव । तयावीण जीव पापरूपी ॥ ४ ॥
पापरूपी जीव देहभावें केला । दिनकरा आला प्रत्ययासी ॥ ५ ॥

[ ३२७ ]

॥ श्रीराम ॥

सूर्यवंशाचें कल्याण[१] । करी पतितासी पावन ॥ १ ॥
मना ते चि बरवी सोये[२] । त्याचे नामीं रंगोनि राहे ॥ ध्रु० ॥
जीव तारिले अगणित । जे जाले नामीं रत ॥ २ ॥
दिनकरा तरि च धन्य । मन कीजे रामार्पण ॥ ३ ॥

[ ३२८ ]

॥ श्रीराम ॥

नरदेहाचें भूषण । निजकर्मसंस्थापन ॥ १ ॥
जेणें जडजीव पावन होती । तें चि सज्जन प्रतिपादिती ॥ ध्रु० ॥
उपासना ब्रह्मज्ञान । करी पावन सकळ जन ॥ २ ॥
भक्तिभाव निरूपण । शुद्ध वैराग्याचें चिन्ह ॥ ३ ॥
मायाब्रह्मींचें विवरण । निःसंदेह समाधान ॥ ४ ॥
सर्व रक्षूनि संपूर्ण । सहजस्थितीचें कारण ॥ ५ ॥
हें चि ज्ञानियांचें चिन्ह । दिनकर सांगे खूण ॥ ६ ॥

[ ३२९ ]

॥ श्रीराम ॥

घडिघडीं क्षीण आयुष्य । होतें न जाणे मनुष्य ॥ १ ॥
ऐसें पाप सबळ गांठीं । रामनामीं पाडी तुटी ॥ ध्रु० ॥
गेलें न ये येक निमिष्य । कैसे भ्रमले निजहितास ॥ २ ॥
कामक्रोधाचा पडिभर । मद मछर ममता फार ॥ ३ ॥

---

१ सूर्यवंशाचा उद्धार करणारा श्रीरामचंद्र. २ मार्ग. ३ समजत नाहीं असें नाहीं, तर समजून वारंवार विस्मृति होते, असा अर्थ. ४ अधिकता.

अभिमान तिरस्कार । तेणें नेणें स्वहिताचार ॥ ४ ॥
दिनकरा सत्य जाण । तयां[1] पतितांऐसें चिन्ह ॥ ५ ॥

[ ३३० ]

॥ श्रीराम ॥

भूलि आली अहंतेची । धुळी जाली स्वहिताची ॥ १ ॥
नरदेह गेलें वायां । बुडविलें अहंमाया ॥ ध्रु० ॥
केली माती आयुष्याची । पुरी वसविली येमाची ॥ २ ॥
दिनकर ह्मणे रामा । पापी भार धरेसि[2] दुरात्मा ॥ ३ ॥

[ ३३१ ]

॥ श्रीराम ॥

ज्ञानाचें विज्ञान[3] होतां समाधान । नाहींतरी भिन्न येकदेशी ॥ १ ॥
येकदेशी ज्ञान अहंतेचें चिन्ह । विज्ञानावांचून कामा न ये ॥ २ ॥
कामा न ये शब्दज्ञानाचें काबाडें[4] । व्यर्थ बडबड शुकाऐसी ॥ ३ ॥
शुक बोले बोल सिकविले सैरां[5] । न ये तेथें गिरा मुकी होये ॥ ४ ॥
होये ऐसें जाण विज्ञानावांचून । दिनकरा मौन विज्ञानतां[6] ॥ ५ ॥

[ ३३२ ]

॥ श्रीराम ॥

कल्पनेचा जीव कल्पनेचा शिव । कल्पनेचा देव चोजवला[7] ॥ १ ॥
चोजवला देव नित्य निरावेव । त्यावांचूनि माव वाच्यांशाची ॥ २ ॥
वाच्यांश लक्षांश शुद्धांशेसीं आटे[8] । तेव्हां देव भेटे द्वैतेंवीण ॥ ३ ॥
द्वैतेंवीण देव सर्वां ठाईं नांदे । वादकांसी भेदें[9] चोजवेना ॥ ४ ॥
चोजवेना देव सत्संगावांचूनि । दिनकरा वाणी निश्चयाची ॥ ५ ॥

---

१ श्रेष्ठवर्णाचे असले तरी त्यांना. २ पृथ्वीला. ३ ज्ञान व अज्ञान हीं दोन्ही मावळून जी उर्वरित स्थिति राहते ती. ४ व्यर्थ ओझें. ५ स्वैर, स्वछंदी. हें पुढील 'न ये' चें क्रियाविशेषण. ६ विज्ञान झालें असतां. ७ जाणला गेला, समजला. ८ कमी होत होत नाहींसें होईल. ९ भेदबुद्धीनें.

[ ३३३ ]

॥ श्रीराम ॥

अंतरींचा देव चोजवीना कोण्ही । नाना भाव मनीं भावनेचे[1] ॥ १ ॥
भावना चेतवी तो देव पाहावा । कासया फिरावा भूगोळु हा ॥ २ ॥
भूगोळीं पाषाण धातु झाडें पाणी । पूजिती चरणीं धांवधांवों ॥ ३ ॥
धांवोनियां भाव लाविती पाषाणा । तेथें देवराणा उभा ठाके ॥ ४ ॥
उभा ठाके देव अंतरींचा भाव । पाषाणाची माव मिथ्या असे ॥ ५ ॥
मिथ्या असे परी न कळे अज्ञाना । संसारयातना याचिलागीं ॥ ६ ॥
याचिलागीं संग संतांचा तारक । दिनकरा देख अखंडित ॥ ७ ॥

[ ३३४ ]

॥ श्रीराम ॥

वादकें बुडालीं व्यवाद सांगतां । थित्या[2] भगवंता अंतरलीं ॥ १ ॥
अंतरलीं भेदें कामनासमंधें । द्वैताच्या विरोधें अहंभावें ॥ २ ॥
अहंभावें गेलीं अधःपाता फार । दिनकरा पुरे मत्तवाद ॥ ३ ॥

[ ३३५ ]

॥ श्रीराम ॥

सत्यपंथें चाले सत्यवाद बोले । सत्यासी न भुले कल्पवरी ॥ १ ॥
कल्पवरी सत्य आचरे विचारें । सत्य सत्याचारें सत्य चि तो ॥ २ ॥
सत्य चि तो जाला असत्याच्या त्यागें । दिनकरा संगें सद्गुरूच्या ॥३॥

[ ३३६ ]

॥ श्रीराम ॥

काया हे पंढरी भक्तिभीमेतीरीं । तेथें आत्मा हरि नांदतुसे ॥ १ ॥
आत्मा पांडुरंग निसंगांचा संग । तिष्ठतो अभंग सर्वांमाजीं ॥ ध्रु० ॥
भावपुंडरीक देव त्या सन्मुख । अवलोकी मुख वेळोवेळां ॥ २ ॥
ज्ञान हा गरुड महाद्वारीं उभा । लक्षितो स्वयंभा पांडुरंगा ॥ ३ ॥
पांडुरंगीं संत रंगले अखंड । खंडिलें[3] वितंड[4] मायामूळ ॥ ४ ॥

---

१ आस्तिक्यबुद्धीचे. २ ( अंतर्यामीं ) असलेल्या. ३ तोडून टाकलें. ४ विशाळ.

निवृत्तिचंद्रभागा घडलें पैं स्नान । भवव्याधि जाण दग्ध जाल्या ॥५॥
गुरुआज्ञा आषाढी गुरुभक्ति कार्तिकी । यात्रा जाली निकी नरदेहीं ॥६॥
नरदेहीं सार लाधला दिनकर । जालें पंढरपुर गुरुकृपा ॥ ७ ॥

[ ३३७ ]

॥ **श्रीराम** ॥

पंढरीस माझा गुंतलासे हेत । सांगा कोणी मात विठोबाची ॥ १ ॥
विठोबाची खांति लागतसे चित्तीं । न कंठे[2] निवृत्ति[3] न करवे ॥ २ ॥
न करवे सांडी त्याचिया पायांची । वेदना मनाची बोलवेना ॥ ३ ॥
बोलवेना मात जाणती सज्ञान । अंतरींची खूण न संगतां ॥ ४ ॥
न संगतां परी न चाले प्रातेसीं । दिनकरा सोसीं सहजस्थिति ॥ ५ ॥

[ ३३८ ]

॥ **श्रीराम** ॥

विचारूनि तुंबा तूंपणाचा केला । मीं जीवीं बांधला तरायासी ॥ १ ॥
तरायासी तूं तें मी हें बुडवण । तूंपणाची खूण वेगीं धरीं ॥ २ ॥
वेगीं धरीं आतां दिनकरा तूंतें । निरसूनि मीतें संतसंगें ॥ ३ ॥

[ ३३९ ]

॥ **श्रीराम** ॥

सत्य देव येक माया मिथ्या देख । भासत अनेक गुणमयी ॥ १ ॥
गुणमयी माया जातसे विलया । गेलें तें तों आयां न ये कधीं ॥ २ ॥
न ये कधीं मिथ्या सत्यासी पाहतां । दिनकरा चिंता चित्स्वरूपीं ॥ ३ ॥

[ ३४० ]

॥ **श्रीराम** ॥

मृत्यलोकासी जालें येणें । कोणे सुरसाईचें जिणें ॥ १ ॥
सावधान सावधान । अखंड नामीं अनुसंधान ॥ ध्रु० ॥

---

१ चांगली, यथासांग. २ कंठणें=क्रमणें, काढणें. ३ ( विठोबापासून ) पराङ्मुखता. ४ त्याग. ५ आल्या प्रसंगास. ६ भोपळा. ७ आकारास. ८ सत्य देवासी.

आतां जाणें क्षणा जाणें । नाहीं कोण्हासी राहाणें ॥ २ ॥
आयुष्य आहे तों तांतडीं । साधा स्वहिताची घडी ॥ ३ ॥
राय रंक अवघे जन । भजनमार्गें लाउनि मन ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे संतसंगें । सार्थक होतें लागवेगें ॥ ५ ॥

[ ३४१ ]

॥ श्रीराम ॥

अहंकार करी दूर । संसारी तो महा शूर ॥ १ ॥
जनीं तो चि जनार्दन । सर्वीं सर्व तो चि धन्य ॥ ध्रु० ॥
सोडी ममते स्त्रीचा संग । स्वस्वरूपीं होय निःसंग ॥ २ ॥
विषय धन फार । तयांसी चित्तीं न करी थार ॥ ३ ॥
विवेकें काढी मोहपाश । तयासी कैंचा गर्भवास ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे तो चि मान्य । उपमा दीजे ते ते न्युन्य ॥ ५ ॥

[ ३४२ ]

॥ श्रीराम ॥

जें जें येइल तुझ्या मना । तें तें करीं रघुनंदना ॥ १ ॥
मी तों काया वाचा मनें । सर्वकाळ दुजें नेणे ॥ ध्रु० ॥
आतां घालीं अधःपातीं । अथवा मेळवीं निजस्थितीं ॥ २ ॥
तुझी इच्छा जे जे देवा । ते गे ते चि माझी सेवा ॥ ३ ॥
कृतबुद्धीचा निश्चय जाला । प्रेमा स्वरूपीं गुंतला ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे सावधान । तुज मज नाहीं व्यवधान[1] ॥ ५ ॥

[ ३४३ ]

॥ श्रीराम ॥

माझें माझें ह्मणतां पाहें । वय गेलें लवलाहें ॥ १ ॥
काय जीवा भूललासी । नेणसी कैसा स्वहितासी ॥ ध्रु० ॥
तुझ्या देहासकट तुझें । मरसी तेव्हां कोठें बुझे[2] ॥ २ ॥
तुझा तूं चि पाहें पाहें । अवघें कोणाचें हें आहे ॥ ३ ॥

---

१ अंतर, अवकाश, तफावत. २ समजून घे.

ज्याचें आहे तो अखंड । सांभाळितो हें ब्रह्मांड ॥ ४ ॥
तूं चि कां रे त्यावेगळा । दिनकर ह्मणे अमंगळा ॥ ५ ॥

[ ३४४ ]

॥ श्रीराम ॥

ज्यानें केलें हें ब्रह्मांड । तो चि परमात्मा अखंड ॥ १ ॥
तयासी नेणे तो पतित । अपस्मार जैसें भूत ॥ ध्रु० ॥
जे जे आहे रचना केली । ते ते सांभाळी आपुली ॥ २ ॥
अंतीं केलें तें निर्दाळी । उरों नेदी तें हि धुळी ॥ ३ ॥
ऐसा समर्थ महाराज । परमपुरुष वेदबीज ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे अवघें त्याचें । आहे नाहीं हें जयाचें ॥ ५ ॥

[ ३४५ ]

॥ श्रीराम ॥

तुझें स्वरूप कैसें आहे । तें तूं नेणसि ममतामोहें ॥ १ ॥
कां रे नेणसी आपणासी । शरण जाउनि सद्गुरूसी ॥ ध्रु० ॥
नाथिलें चि धरुनी जीवें । हुंबंतोसी भूतभावें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे सावध होईं । फिरोनि आपणासी पाहीं ॥ ३ ॥

[ ३४६ ]

॥ श्रीराम ॥

जो सत्तामात्रें करी सर्व । सगुण रचना हे अपूर्व ॥ १ ॥
ऐसा देव पाहें पाहें । येवढें करणें ज्याचें आहे ॥ ध्रु० ॥
पंचभूतेंसीं त्रिगुण । केली प्रकृति हे सगुण ॥ २ ॥
मिश्रित होउनी तियेसीं । रचे खचे नाना वेशीं ॥ ३ ॥
ऐसें करूनी निराळा । द्रष्टा होउनि पाहे लीळा ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे तो चि त्याचा । रचला अवघा त्रिपुटीचा ॥ ५ ॥

[ ३४७ ]

॥ श्रीराम ॥

अगाध देवाचें स्वरूप । पाहातां दिसे आपेंआप ॥ १ ॥

---

१ भूत अंगांत संचरल्याप्रमाणें ओरडतोस.

सद्गुरुकृपेचें करणें । उठवी संसारधरणें ।। ध्रु० ।।
पिंड ब्रह्मांड ज्याची लीळा । आपण तो चि अनुभवा आला ।। २ ।।
दिनकर ह्मणे सोहंभाव । विवरतां स्वयमेव ।। ३ ।।

[ ३४८ ]

।। श्रीराम ।।

देवावांचुन नाहीं कांहीं । देव चाळक सर्वां ठाईं ।। १ ।।
देव येकांतीं लोकांतीं । देव नांदे सर्वभूतीं ।। ध्रु० ।।
देव व्यापक चंचळ । चळे चाळी जड सबळ ।। २ ।।
दिनकर ह्मणे स्वानुभवें । कौतुक देवाचें पहावें ।। ३ ।।

[ ३४९ ]

।। श्रीराम ।।

सर्वां ठाईं घनदाट । आत्माराम सम सकट ।। १ ।।
सत्तारूप तो सर्वात्मा । सर्वांतरीं अंतरात्मा ।। ध्रु० ।।
अणुपासुनि जगदांतरीं । भरला सर्व चराचरीं ।। २ ।।
दिनकर ह्मणे तो चि येक । जाला त्रैलोक्यव्यापक ।। ३ ।।

[ ३५० ]

।। श्रीराम ।।

जड अज्ञान कर्पूर । चंचळ ज्ञान वैश्वानर ।। १ ।।
दोघां समरसीं अद्वैत । निश्चळ विज्ञान निवांत ।। ध्रु० ।।
त्वंपद अविवेक[1] जीव । तत्पद मायोपाधि शिव ।। २ ।।
क्षर[2] अष्टधा विस्तार । अक्षर कूटस्थ[3] ईश्वर ।। ३ ।।
क्षत्र अनात्मा स्थावर । जंगम अंतरात्मा चर ।। ४ ।।
दिनकर ह्मणे उपाधि ज्ञानें । निरशितां अद्वय होणें ।। ५ ।।

[ ३५१ ]

।। श्रीराम ।।

ग्रासोग्रासीं ह्मणे राम । भोजन करितां तो निष्काम ।। १ ।।

---

१ अविद्या शब्दास 'इक' प्रत्यय लागून अविवेक हें विशेषण बनलें. २ पिंडाचे चार व ब्रह्मांडाचे चार असे आठ हि देह नाशवंत आहेत. ३ देहस्थ प्रत्यगात्मा.

असो कोण्हीयेके जाति । पारि तो जडला भगवंतीं ॥ ध्रु० ॥
दृष्टीं देखे ऐके कानीं । भोक्ता ह्मणे चक्रपाणी ॥ २ ॥
देहीं उपभोग भोगितां । ह्मणे सर्वोत्तम भोक्ता ॥ ३ ॥
अखंड काया वाचा मनें । रामार्पण चि करणें ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे सावकाशें । रामरूपीं त्याचा वास ॥ ५ ॥

[ ३५२ ]

**॥ श्रीराम ॥**

अहं ब्रह्म हें स्फुरण । तें चि जाणिवेचें चिन्ह ॥ १ ॥
अष्टदेह निरसून । होये निःशेष आपण ॥ ध्रु० ॥
अखंड सोहंअनुसंधानीं । अंतरात्मा चंचळ ज्ञानी ॥ २ ॥
पंचीकर्ण महावाक्य । याच्या अर्थे पाहे अतर्क्य ॥ ३ ॥
ऊर्ध्वमुखें बाणे खूण । होय ज्ञान चि विज्ञान ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे अंतरात्मा । येणें योगें परमात्मा ॥ ५ ॥

[ ३५३ ]

**॥ श्रीराम ॥**

अंतर शृंगारीं विचारें । देह शृंगारीं आचारें ॥ १ ॥
जनीं तो चि जनार्दन । विचारआचारें संपूर्ण ॥ ध्रु० ॥
अखंड भजानाचें भूषण । ध्येय ध्याता नुरऊन ॥ २ ॥
विवेकवैराग्यसंपदा । निरसूनि त्रिविध भेदा ॥ ३ ॥
ज्ञानविज्ञानें संपन्न । शांतिक्षमेसीं सौजन्य ॥ ४ ॥

---

१ जिवांत जीव आहे तोंपर्यंत कोणत्याहि स्थितींत इंद्रियें हीं आपले व्यापार करीतच असतात. परंतु त्यांचा चालक व भोक्ता मी नसून श्रीरामप्रभु आहेत असें, जो रामनामाचा अखंड जप करतो, तो समजत असतो. २ श्रीरामचंद्र. ३ अनंतकालपर्यंत. ४ अंतरात्मा किंवा जीवात्मा हाच परमात्मा होतो; परंतु केव्हां, आपण उर्ध्वमुख करून पाहूं तेव्हां. अर्जुनाच्या दिव्य किंवा विवेकदृष्टीने आपण पाहिलें व ती च दृष्टि स्थिर केली ह्मणजे बरोबर खूण पटते.

दिनकर ह्मणे तो अवतारी । मनुष्यवेषें संवसारीं ॥ ५ ॥

[ ३५४ ]

॥ श्रीराम ॥

श्रवणद्वारें श्रवणसुख । प्राप्त होतां अवश्येक ॥ १ ॥
भोक्ता राम हें ह्मणावें । कोण्हीयेकें न चुकावें ॥ ध्रु० ॥
दृष्टीं देखतां उत्तम । वाटे आनंद परम ॥ २ ॥
स्पर्शें नीविजे सर्वांगीं । विविध भोगांचा संयोगीं ॥ ३ ॥
रसना सेवी नाना रस । होतां संतुष्ट मानस ॥ ४ ॥
घ्राणीं सुगंध सेवितां । चित्तीं संतोष पावतां ॥ ५ ॥
अंतरात्मा सर्वांतरें । विषयभोक्ता इंद्रियद्वारें ॥ ६ ॥
ह्मणे दिनकररामदास । सहजींसहज सावकाश ॥ ७ ॥

[ ३५५ ]

॥ श्रीराम ॥

आंगीं अनादीचें वारें । भरलें विषयांचें कांविरें ॥ १ ॥
ह्मणवी आपणा गोसांवी । डंमें सात्विकासी गोवी ॥ ध्रु० ॥
भांगी तमाखु हे फांसे । मांडुनि जीव फांसी कैसे ॥ २ ॥
दोनि चारी सारीपाटें । चोहटां बांधलासे मठ ॥ ३ ॥
येत्याजात्यासी विसांवा । भांगी तमाखु विडा द्यावा ॥ ४ ॥
विधिनिषेध जातिभेद । कैंचा अवघा परमानंद ॥ ५ ॥
जीविकेसाठीं लोटी धर्म । येकंकार क्रियाकर्म ॥ ६ ॥

---

१ दिनकरांनीं अवतारी पुरुषाचीं लक्षणें या अभंगांत किती थोडक्यांत व गोड रीतीनें दिलीं आहेत ! विचार–आचारें जो अंतर्बाह्य सुंदर व परिपूर्ण झाला आहे, सगुणभक्तीची त्रिपुटी मागें टाकून अखंड नामस्मरण हा च ज्याचा उच्चार बनला आहे, विवेक वैराग्य, ज्ञान विज्ञान, शांति क्षमा सौजन्य इत्यादि गुणांनीं जो संपन्न आहे तो अवतारी पुरुष होय; मग तो संसार करीत असेना कां ? २ मागील ३५१ अभंगावरील १ ल्या टीपेचें जास्त स्पष्टीकरण या अभंगांत आलें आहे. ३ वेड अथवा भ्रम. ४ सोंगट्यांचा खेळ. ५ बाजारचौकांत. ६ चरितार्थ चालण्यासाठीं.

सर्वब्रह्माचा उपदेश । वर्णाश्रमाचा र्‍हास[1] ॥ ७ ॥
शिरीं टोपी कंठीं माळा । आंगीं भस्माचा उधळा ॥ ८ ॥
कांखे कुबडी हातीं कुंचा । गळां पट्टा जोगवस्त्राचा ॥ ९ ॥
ह्मणे दिनकररामदास । डंब करी त्या नर्कीं वास ॥ १० ॥

[ ३५६ ]

॥ श्रीराम ॥

गुरुकृपेचें अंजन । लेती जयाचे लोचन ॥ १ ॥
तया कैंचें जन्मांतर । देहपुरीं येरझार ॥ ध्रु० ॥
हेतुरहित अनुभव । दृश्य द्रष्टा दर्शन वाव ॥ २ ॥
दिनकर ह्मणे निःसंदेह । कांहीं नव्हे तें[2] तो होये ॥ ३ ॥

[ ३५७ ]

॥ श्रीराम ॥

अंतरात्मा सर्व येक । त्रिभुवनीं पुण्यश्लोक ॥ १ ॥
तया नेणे तो पतित । आत्महत्यारा विख्यात ॥ ध्रु० ॥
सर्व जीवांचा पाळक । चंचळ सृष्टीचा चाळक ॥ २ ॥
जनीं वनीं निरंजनीं । जाणीवरूपें मनीं पवनीं ॥ ३ ॥
सगुण निर्गुण हें साचें । करणें ज्याच्या निश्चयाचें ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे त्याचा प्रांत[3] । ते चि गुरुकृपा निवांत ॥ ५ ॥

[ ३५८ ]

॥ श्रीराम ॥

जड चंचळ निश्चळ । त्रिपदें समजे जो केवळ ॥ १ ॥
धन्य सज्ञान तो साधु । त्यासी कैंचा भवबाधु ॥ ध्रु० ॥
तिन्ही पदार्थ वेगळाले । जेथील तेथ चि समर्पिले ॥ २ ॥
जड कर्पुर चंचळ दीप । समरसीं निश्चळ अरूप ॥ ३ ॥

---

१ र्‍हास. २ आहे नाहीं जाऊन उरलें जें परब्रह्म तें. ३ अत्यंत नाश. अंतरात्म्याची भावना हि जाऊन जेव्हां निखिल वस्तु फक्त राहील तेव्हां ती च खरी गुरुकृपा झाली असें समजावें.

सारासार विचारितां । बाणे स्वरूपसायुज्यता ॥ ४ ॥
दिनकर म्हणे परब्रह्म । तो चि जाणे जो हें वर्म ॥ ५ ॥

[ ३५९ ]

॥ श्रीराम ॥

शब्द निःशब्द प्रकार । होयो कारण ॐकार ॥ १ ॥
तो चि नसतां उरलें त्यासी । काय म्हणिजे निश्चयेंसीं ॥ ध्रु० ॥
दिवसरात्रीचे परमित । घडवी मुख्य तो आदित्य ॥ २ ॥
माया अविद्या जीव शिव । सर्व संकल्प सावेव ॥ ३ ॥
द्वैतभेदाचा विस्तार । होया कारण अहंकार ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे माया ब्रह्म । म्हणती भ्रमिष्ट धरुनी भ्रम ॥ ५ ॥

[ ३६० ]

॥ श्रीराम ॥

अतित[2] भिक्षा घेतां लाजे । तरी तो अभाग्यु बोलिजे ॥ १ ॥
भिक्षा स्वधर्म अतिताचा । त्यजितां संग्रह बहु पापांचा ॥ ध्रु० ॥
अतितें भिक्षा सोडूं नये । करावे भिक्षेचे उपाये ॥ २ ॥
षड्दर्शनी भिक्षा[3] घ्यावी । लज्जा त्यजूनि मागावी ॥ ३ ॥
भिक्षा घेतां आपपर । न म्हणावें लहान थोर ॥ ४ ॥
भिक्षा अतितपरंपरा । भाग्यें प्राप्त दिनकरा ॥ ५ ॥

[ ३६१ ]

॥ श्रीराम ॥

राम जिवाचा विश्राम । अखंड स्मरावा निष्काम ॥ १ ॥
हें चि सार्थक संसारीं । तनुमनुभावें निरंतरीं ॥ ध्रु० ॥
लौकिक सोडूनि लोकांतीं । रामीं रंगावें येकांतीं ॥ २ ॥
दिनकर रामीं रामदास । जडला नामीं सावकाश ॥ ३ ॥

[ ३६२ ]

॥ श्रीराम ॥

माझें तनु मन श्रीचरणीं । पादुकांचे स्थानीं ॥ १ ॥

---

१ होण्याला. २ अतिथी. ३ ही भिक्षा कोणची, पोट भरण्याची नव्हे, तत्वज्ञानाची.

सद्गुरुमहाराज सुखदानी । भरला त्रिभुवनीं ॥ ध्रु० ॥
निरंतर आठवीं आठवतो । मीपण घेउनियां तो ॥ २ ॥
मजविण मजला हा असे भरला । दिनकर तेथें सरला[1] ॥ ३ ॥

[ ३६३ ]

॥ श्रीराम ॥

माझें मीपण तूंपण । जालें रामार्पण ॥ १ ॥
सद्गुरुकृपेचें हें करणें । उठउनि अहंकृति धरणें ॥ ध्रु० ॥
अवघें राम जालें त्रिभुवन । सकळ हि जगजीवन ॥ २ ॥
मजविण सकळ हि हें उदास । दिनकर रामदास ॥ ३ ॥

[ ३६४ ]

॥ श्रीराम ॥

रितें रामेविण कांहिं नाहीं । अणु[2] तें हि पाहीं ॥ १ ॥
चंचळ चाळक हा सृष्टीसी । सकळ हि भूतनिवासीं ॥ ध्रु० ॥
विश्वीं विश्वात्मा परेशु । विश्वंभर जगदीशु ॥ २ ॥
दिनकर ह्मणे तो सुखदानी । अनुभवीं त्यासि निदानीं[3] ॥ ३ ॥

[ ३६५ ]

॥ श्रीराम ॥

यावें गुणधामा श्रीरामा । प्रसिद्ध पुरुषोत्तमा ॥ ध्रु० ॥
विषई जनाचा सहवास । तो वाटे यमपाश ॥ १ ॥
पळ युगसम वाटे कंठ दाटे । न कंठे हृदय फुटे ॥ २ ॥
तुझिया वियोगें सुखभोग । दिनकर ह्मणे क्षयरोग ॥ ३ ॥

[ ३६६ ]

॥ श्रीराम ॥

प्रभुविण जनवन मज वोस । वाटे सर्व उदास ॥ १ ॥
पतितपावना जगजिवना । तुजविण बाहों[4] कवणा ॥ ध्रु० ॥
नरपति सुरपति पशुपति । ब्रह्मादिक तुज ध्याती ॥ २ ॥
दिनकर ह्मणे श्रीजगदीशा । न करीं पतितनिराशा ॥ ३ ॥

---

१ संपला, खपला. २ मातीचा कण देखील. ३ अंतीं. ४ हाका मारूं.

[ ३६७ ]

॥ श्रीराम ॥

देईं मज माझा निजठेवा । तुजपासीं जो देवा ॥ १ ॥
सद्गुरु श्रीरामा सुखधामा । भुवनत्रयविश्रामा ॥ ध्रु० ॥
घेतां सुख वाटे विधिवाटें[1] । मग कां गांठि न सूटे ॥ २ ॥
दिनकर ह्मणे हें बरें नाहीं । जीव देइन तुझे पाईं ॥ ३ ॥

[ ३६८ ]

॥ श्रीराम ॥

भिक्षा भिक्षुकाचें भाग्य । भिक्षा न मगे तो अभाग्य ॥ १ ॥
भिक्षाहारी निराहारी । दर्शनमात्रें जन तारी ॥ ध्रु० ॥
भिक्षान्नाचें जें भोजन । तें चि महा सोमपान[2] ॥ २ ॥
भिक्षा प्रतिग्रहें[3] ह्मणों नये । भिक्षा अतितांची माये ॥ ३ ॥
भिक्षाराज्य अतितांचें । कोण्हा नेघवें फुकाचें ॥ ४ ॥
दिनकररामदास ह्मणे । भिक्षा अतितांचें जिणें ॥ ५ ॥

[ ३६९ ]

॥ श्रीराम ॥

भिक्षा कामधेनु माये । आह्मांघरीं उणें काये ॥ १ ॥
आह्मी सभाग्य चराचरीं । अखंड झोळी आमुचे करीं ॥ ध्रु० ॥
जो जो पदार्थ पाहिजे । तो तो तत्काळ चि लाहिजे ॥ २ ॥
पृथ्विपतीचें वैभव किती । त्याहुनि मोठी आमुची स्थिति ॥ ३ ॥
आमुचें राज्य त्रिभुवनीं । पृथ्विपतीचें येके कोनीं[4] ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे भिक्षादैव । जया नाहीं तो निर्दैव ॥ ५ ॥

[ ३७० ]

॥ श्रीराम ॥

ब्रह्म निराकार त्या नाहीं आकार । माया सविकार केली कोणें ॥ १ ॥

---

१ माझा ठेवा जो तुमच्यापाशीं आहे, तो माझेजवळून निरनिराळ्या मार्गांनीं घेतांना तुम्हाला बरें वाटलें; मग परत देतांना गांठचा कां सुटत नाहीं? २ अमृतपान. ३ दान घेणें. ४ कोपऱ्यांत. त्रिभुवनाच्या मानानें पृथ्वि हा एक कोंपरा च होय.

केली कोणे माया इचा कर्ता कोण । न कळे हे खूण सांगा स्वामी ॥२॥
सांगा स्वामी दीन दिनकर ह्मणे । निर्मिली निर्गुणें कैसी माया ॥ ३ ॥

[ ३७१ ]

॥ श्रीराम ॥

प्रकृति पुरुषें उभयता कैसीं । वर्तती तयांसी निर्मी कोण ॥ १ ॥
निर्मी कोण त्यांचें नाम रूप क्रिया । कोण ने विलया तयां दोघां ॥२॥
तयां दोघां रूप येक किंवा भिन्न । वर्तती संपूर्ण कोणे रीतीं ॥ ३ ॥
कोणे रीतीं कर्म कोण यांचा धर्म । विचारें हें वर्म निरोपावें ॥ ४ ॥
निरोपावें स्वामी ह्मणे दिनकर । दोघे सविकार किंवा ब्रह्म ॥ ५ ॥

[ ३७२ ]

॥ श्रीराम ॥

पतित पापी अथवा संत । घरा येतां अकस्मात ॥ १ ॥
भगवद्भावें त्या भजावें । शक्तिविरहित न करावें ॥ ध्रु० ॥
शत्रु मित्र राय रंक । समई ये कां पुण्यश्लोक ॥ २ ॥
हीन दीन वर्णाश्रम । दिनकर ह्मणे अवघा राम ॥ ३ ॥

[ ३७३ ]

॥ श्रीराम ॥

अंतर्बाह्य भरला राम । जिकडे तिकडे पूर्णकाम ॥ १ ॥
अणु तें हि रितें नाहीं । राम सर्वी सर्व पाहीं ॥ ध्रु० ॥
इहलोकीं परलोकीं । भरला श्रीराम जानकी ॥ २ ॥
दिनकर ह्मणे मजसहित । सीताराम जगविख्यात ॥ ३ ॥

[ ३७४ ]

॥ श्रीराम ॥

मजला ह्मणोत भला नष्ट । श्रेष्ठ अथवा क्रियाभ्रष्ट ॥ १ ॥
परि मी रामपिसा[२] जालों । गुरुवाक्यें विश्वासलों ॥ ध्रु० ॥
संतति संपति सर्वस्वेंसीं । जाव राहो ब्रह्मांडेंसीं ॥ २ ॥
दिनकर ह्मणे निरंतर । निंदू वंदू चराचर ॥ ३ ॥

---

१ मुळांत येथें फाटलेलें आहे. २ रामध्यानानें वेडा बनलों.

[ ३७५ ]

॥ श्रीराम ॥

भ्रमें नका ठकों वायां । वय चालिलें लवलाह्या ॥ १ ॥
शरण जा रे सद्गुरूसी । करील राम तो तुह्मांसी ॥ ध्रु० ॥
नव्हे कोण्ही च कोण्हाचें । आपुल्या देहासकट साचें ॥ २ ॥
दिनकर ह्मणे सावधान । अगाध गुरुकृपामहिमान ॥ ३ ॥

[ ३७६ ]

॥ श्रीराम ॥

गा वरस्य[1] होतां गंगा । तारूं लागे सकळ जगा ॥ १ ॥
तैसा सद्गुरुसंगें होसी । स्वयें तरोनि जन तारिसी ॥ ध्रु० ॥
चंदनसंगें निंब जांबळी । बसती[3] देवांचा निडळीं[4] ॥ २ ॥
दिनकर ह्मणे अळी । भ्रमरयोगें भ्रमर जाली ॥ ३ ॥

[ ३७७ ]

॥ श्रीराम ॥

माझें पूर्वपुण्य थोर । मज भेटला गुरुदातार ॥ १ ॥
घेउनि माझा जीवधर्म । मजविण केलें मज ब्रह्म ॥ ध्रु० ॥
अविद्येसीं नेली माया । अनुर्वाच्य करूनियां ॥ २ ॥
दिनकर ह्मणे अहं कोहं । नेलें त्रिपुटीसीं सोहं ॥ ३ ॥

[ ३७८ ]

॥ श्रीराम ॥

विश्वीं विश्वंभर विश्वाचा गोसांवी । नांदे सर्व जीवीं देव येक ॥ १ ॥
देव येक परि अनेक उपाधि । निरसूनि शोधीं आत्माराम ॥ २ ॥
आत्माराम येक अनेक हे माया । जातसे विलया ज्याची त्यांत ॥ ३ ॥
त्यांत ते सामाये तो हि तियेमाजीं । परस्परें निजीं निजरूप ॥ ४ ॥
निजरूपें जैसा कर्पूर जोतीसीं । सामावे आकाशीं द्वैतेंवीण ॥ ५ ॥
द्वैतेंवीण ब्रह्म अद्वैतविचारें । होती या प्रकारें सविचार ॥ ६ ॥
सविचार ज्ञानी दिनकर ह्मणे । स्वानुभवें जाणे अनुर्वाच्य ॥ ७ ॥

श्रीदिनकरकृत अभंग समाप्त.

---

१ रामरूप. २ वरदानयुक्त ? ३ गंधरूपानें. ४ कपाळावर.

# स्फुट पदें

॥ राग मालश्री ॥ [ १

॥ ध्रु० ॥ धन्य ते कौसल्या जननी धन्य दशरथ पिता । त्रिभुवनजनकां[1]ची जनकें जें काय वर्णु तयां आतां ॥ ध्रु ॥ प्रातःकाळीं उठोनि रामशब्दें आळउनी देती चुंबन मुखमेळें । नानापरीं हांसविती बोबडेंसें बोलविती घेती बला[2]य करतळें ॥ १ ॥ चारूनियां लोणी दोघेजणे मिळोनि पाजिती दूधतुपासी । माखुनियां न्हाणिती निजगृहा आणिती ह्मणती निजगुणराशी ॥ २ ॥ तों तों स्फुंदे बाळक सर्वजनपाळक चाळक जीवप्रकृतीसी । उतरूनि निंबलोणा थापटुनी पाळणा निजविती शिवमंत्रासी ॥ ३ ॥ रांगतां रंगणीं खेळतां आंगणीं न सोडिती क्षणभरी । नेणती तान्हभुक येव्हडें बाळकसुख निशिदिनिं नाहीं दुजी प[3]री ॥ ४॥ दिनकर ह्मणे धन्य सूर्यवंशीं भाग्य थोर नेणती सुरवर योगें[4] ज्याचा । तो ज्यांचा ह्मणती पुराणें वाखाणिती महिमा थोर तयांचा[5]॥५॥

राग कामोद [ २

नरदेह सार । पावन करितो साचार । लाधोनि तो जीव स्वहीत न करी ऐसा अविचार ॥ १ ॥ पळ पळ वय जातें । तें तों न फिरे मागुतें । माझें माझें ह्मणतां प्राणी नाशे अवचीतें ॥ २ ॥ बांधोनि यमपाशीं । दूत नेति सावकाशीं । तेव्हां कोण धांवणें[6] काढी तुझे पाठीसीं ॥ ३ ॥ माझें घर माझी दार । माझा सकळ संसार । अंतीं हे अंतरती तेव्हां मग कोठें था[7]र ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे सार । जों[8]वरि नरदेह स्थीर । तों[9] तूं प्राण्या स्वहीतविषईं न लवीं उशीर ॥५॥

राग चाल सदर [ ३

परब्रह्म निश्चळ । माया सकळ चंचळ । तयेसि ब्रह्म ह्मणती जे

---

१ श्रीरामचंद्राची. २ दृष्ट लागूं नये ह्मणून मुखावरून हातानें ओवाळणें. ३ प्रकार अथवा गोष्ट. ४ संयोग, सान्निध्य. ५ कौसल्या, दशरथ यांचा, किंवा ज्यांनीं श्रीरामाला आपलासा करून घेतला त्यांचा. ६ रक्षण करण्यास धावून येईल. ७ आश्रय, रहिवास. ८ यावत् स्वस्थोह्ययं देहो ।. ९ तावत् आत्महितं कुर्यात् ।.

ते मूर्ख केवळ ॥ १ ॥ होते आणि जाते । माया दृश्य भासते । ब्रह्म तें अविनाश पाहतां अदृश्य निजसत्ते ॥ २ ॥ पिंड आणि ब्रह्मांड । हें तवं मायेचें थोतांड । जीव शिव माया अविद्या भासे कल्पनेचें बंड ॥ ३ ॥ माईक निराश । संतसंगें सावकाश । होतां बाणे स्वरूपस्थिती अगाध निःशेष ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे ऐसें । संतसंगाचिसरिसें । होणें अनुर्वाच्य सहसा दुजें कांहिं नसे ॥ ५ ॥

राग मालश्री, येकताळी. [ ४

रघुपतिनामस्मरणीं । मन रंगो विहिताचरणीं । तन्मयता निजसुखकरणीं । हा लाभ लाभे ॥ १ ॥ नरदेह सार सजेना । ह्मणउनि लागे भजना । जीवें जीतें मिळती विजनीं । हा लाभ लाभे ॥ २ ॥ दुर्जय मन मंतवालें । करिं हें विषयांतुनि वालें । होतां चि वालें निवालें । हा लाभ लाभे ॥ ३ ॥ दुर्धर भवभय विरमे । निजपदिं सुखरुप करमे । पावन मुनिजन शरमे । हा लाभ लाभे ॥ ४ ॥ दिनकरदिनभूपाळें । पावन केलें कृपाळें । आपलें ह्मणतां गोपाळें । हा लाभ लाभे ॥ ५ ॥

राग सदर [ ५

॥ ध्रु० ॥ काय करावें त्रिजटे । कैसें जालें उफराटें । राक्षसांची नाना संकटें । राघवेंवीण ॥ ७ ॥ सूर्यें प्रभा वियोगिली । अंधःकारें स्वगृहा नेली । तैसी परी मज जाली । राघवेंवीण ॥ १ ॥ येउनियां राहो ग्रहणीं । शशिकला ग्रसिली वदनीं । तैसी स्थिति मजला सजनी । राघवेंवीण ॥ २ ॥ संयोगीं वियोग पाहे । क्षण तो ही मज न साहे । आतां मी करुं वो काये । राघवेंवीण ॥ ३ ॥ दिनकरवंशाभरणें --। विण माये ज्यावें कोणें । प्रेताऐसें अमंगळवाणें । राघवेंवीण ॥ ४ ॥

---

१ अनिर्वचनीय, अवर्णनीय असें जें परब्रह्मस्वरूप. २ सज्जना. ३ ज्या नरदेहाच्या स्थितींत. ४ एकांत, निरामय अशी जी स्वरूपस्थिति त्या स्थितीप्रत. ५ रंगेल. ६ वेगळें. ७ कालक्रमणा करणें. ८ सुखी होतात. (शर्म=सुख). ९ श्रीरामानें. १० सूर्यवंशाला भूषणभूत जो श्रीराम, त्याविना. ११ जगावें.

राग केदारा [ ६

आह्मी अखंड पराद्वारी । भोग भोगितां भरलों भरीं रे ॥१॥ ध्रु० ॥ ऐसें विपरित जालें थोर । जडलें पराद्वारीं अंतरें ॥ छ ॥ तेणेंकरितां उबगे जनिजना । करिती नानापरी विवंचना ॥ २ ॥ परस्त्रीसी व्यभिच्यारु घडे । तेणें लोकिका अंतर पडे रे ॥ ३ ॥ मनें देहें वाचां परवधु । आह्मां न सुटे सत्यसमंधु ॥ ४ ॥ परास्त्री ते जननी जाणा । तयेचा वियोग न घडे या मना ॥ ५ ॥ परेपोटीं अखंड जन्म । तेणें जन्म चि जालें अजन्म रे ॥ ६ ॥ दिनकर पराअंगसंगें । जाला अपर सर्वांगें रे ॥ ७ ॥

चाल—अंजनीगीत [ ७

॥ ध्रु० ॥ धन्य धन्य निशाचर । ज्यांलागीं रघुविरअवतार । त्यांच्या योगें जगदोद्धार । जाला अपार ॥ छ ॥ धन्य धन्य त्यांचे नयन । देखाति दुर्धर रणठाण । अरीभावें निर्मंती पूर्ण । गमिती निर्जं-भुवन ॥ १ ॥ धन्य धन्य त्यांचें शरिर । भेदिती स्वकरींचे शर । तेणें प्राण त्यजिती वीर । पावति पद थोर ॥ २ ॥ धन्य धन्य त्यांचा आचार । चित्तीं ध्याती निरंतर । वैरभावें अन्य व्यापार । नेणाति दुस्तर ॥ ३ ॥ दशरथनृपबाळ । मर्दित कलिकल्मशकाळ । तारित भक्तजनकूळ । दिनकरदयाळ ॥ ४ ॥

राग पावक [ ८

आह्मीं कोणाचें काई घेतलें । आह्मां कासया दुरी धरिलें । कां रे ठेविसी शब्द नाथिले । सांग तुजविण काय कोणें केलें रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ कान्होबा रुससी आह्मांवरी । आह्मा नेदिसी आपली परी रे ॥ छ ॥ तुझें करणें तें चि आह्मा सुख । तुझें बोलणें आमुचें बीक । तुझें पाहणें तें चि अलोलिक । तुझें सर्वस्व तें चि गोड

---

१ अंतःकरण. २ कंटाळा. ३ मनाचा गोंधळ. ४ मिटतात, लयास जातात. ५ स्वगृहीं ह्म० या ठिकाणीं परंधामाप्रत जातात असा अर्थ. ६ तुझे ठिकाणची एकरूपता, समरसता. ७ आवड.

देख रे ॥ २ ॥ कां रे येना तुज करुणा । कैसा विन्मुख होसि क्षण-क्षणा । आतां जाणसि तें करिं सज्ञाना । दिनकर वंदी चरणा रे ॥३॥

राग कल्याण [ ९

सकळ स्मरण कैसें विस्मरण जालें । विस्मरण तें चि कैसें स्मरणासी आलें ॥ १ ॥ ध्रु० ॥ अगाध अगाध रूप अद्भुत चि पुरातन । निरंजन निरंजन जनींवनीं परिपूर्ण ॥ ध्रु ॥ आपपर पारुषलें[1] अखंड स्वरूपस्थिति । सहजीं सहज लीळा अवलीळा उपरति[2] ॥ २ ॥ सुखीं सुख सुखावलें रूपीं रूप मुसावलें[3] । दिनकरा रामदासीं निरंतर निभावलें ॥ ३ ॥

राग विलावल [ १०

निरज्यदळनयना[4] हो रामा । निरज्यदळनयना ॥ ध्रु ॥ सतेज मुगुट कुंडलें श्रवणीं । लाजे मदन वदना हो रामा ॥ १ ॥ सुललित केशर शोभत भाळीं । पीतवसन जघना हो रामा ॥ २ ॥ आपाद रुळत सुमनमाळा । शंकित शशि रदनां[5] हो रामा ॥ ३ ॥ कर शरसज्जित चाप विराजे । निशाचरकुळकदनां[6] हो रामा ॥ ४ ॥ तोडरब्रीद पदीं असुरांवरि । दिनकरमदभेदना हो रामा ॥ ५ ॥

[ ११

सद्गुरुचरणासी । शरण सद्गुरुचरणासी । जासी तरीच पावन होसी निजसुखभरणासी[7] ॥ ध्रु ॥ अघटित माया घटणें कैसी कोण्या विचारें । वर्मावांचुन[8] सिणति मूढजन ठकले अविचारें ॥ १ ॥ विधि हरि हर मुनि दानव मानव जाले योगविलासी । ते हि सद्गुरुच्या वरदें निजप्राप्तिस आले विशेषीं ॥ २ ॥ सद्गुरुवांचुनि सद्गति न घडे बोलति वेदपुराणें । ऐसा निश्चय मानुनि अंतरिं दिनकर ह्मणे हित करणें ॥ ३ ॥

राग नाट, तिताळ [ १२

संतकृपा होये जयालागीं पूर्ण । तया नरदेहीं हें चि भूषण । संत-

---

१ कुंठित झालें, मुकावलें. २ विषयनिवृत्ति. ३ भरून उरलें. ४ नीरजदल=कमल. ५ दंत. ६ कदन=नाश. ७ भरण=पोषण, वेतन. ८ सद्गुरूस शरण जाणें ही मुख्य गोष्ट न समजल्यामुळें.

चरणीं निरंतर लीन । पावे समाधान । असंभाव्य ॥१॥ संतकृपेचें थोर महिमान । स्वयें नेणे जऱ्ही जाला चतुरानन । तेथें मनुजाचा केवा कोण । आणिलासी जाण । अविवेकें ॥२॥ संतकृपा घडे सुकृतें ज्यास । उपमा न घडे त्याच्या भाग्यास । परब्रह्म होये स्वयें सावकाश । करूनि निराश । देहभावा ॥ ३ ॥ संतकृपेचा न तुळे महिमा । जेथें नेतिशब्दें मौन निगमा[3] । तेथें पाड काई विधिआगमा । शास्त्रांचिया श्रमा । कोण लेखा ॥ ४ ॥ सर्व गूज आहे संतांचे चरणीं । नित्य दिनकर त्यासी लोटांगणी । कृपा कीजे स्वामी दीनालागुनी । दयावर पाणी । शिरीं ठेवा ॥ ५ ॥

श्रीविघ्नराज [ १३

विघ्ननिवारणचंडा[5] । दे मज बुद्धि प्रचंडा । विनवितों अतिबळभुजदंडा । श्रीविघ्नराजा ॥ १ ॥ मी तों अति अपराधी । न करुनि भजनाची विद्धि । इच्छितों कीर्तनमतिसिद्धि । श्रीविघ्नराजा ॥ २ ॥ अद्भुत कीर्तनमहिमा । न कळे जो स्तवितां निगमा । तो मी वर्णिन ह्मणतों जीवात्मा । श्रीविघ्नराजा ॥ ३ ॥ सलगी हे करितां न लजे । मागे मन इच्छित जें जें । नवल हें वाटे मज माझें । श्रीविघ्नराजा ॥४॥ दिनकरदीनदयाळा । तूं दीनबंधु कृपाळा । सांभाळीं आपुली श्रीदमाळा । श्रीविघ्नराजा ॥ ५ ॥

॥ नाम ॥ येकताळ [ १४

॥ ध्रु० ॥ रामा रे मेघश्यामा रे । तनुमनुवेधों[6] तुझिया नामा रे ॥ ध्रु ॥ देवदेवा रे देईं सेवा रे । शिव ध्यातो माझा कोण केवा रे ॥ १ ॥ दीनानाथा रे रघुनाथा रे । सनाथ करीं धरितों चरणीं माथा रे ॥ २ ॥ महाराजा रे योगबीजा रे । दिनकर दीन मोक्षध्वजा रे ॥३॥

सदर [ १५

॥ ध्रु० ॥ देवा रे महादेवा रे । शंभु त्रिपुरारि सदाशिवा रे ॥ ध्रु ॥ पंचानना रे त्रिलोचना रे । वारीं दुःख तारीं भवमोचना रे

---

१ पाड. २ मूर्ख. ३ वेदांना. ४ शास्त्रांचा. ५ विघ्न निवारण करण्यांत जो भयंकर वाटतो किंवा किती हि भयंकर विघ्नें आलीं तरी त्यांचें निवारण करणारा असा गणपति. ६ छंद.

देख रे ॥ २ ॥ कां रे येना तुज करुणा । कैसा विन्मुख होसि क्षण-क्षणा । आतां जाणसि तें करिं सज्ञाना । दिनकर वंदी चरणा रे ॥३॥

राग कल्याण [ ९

सकळ स्मरण कैसें विस्मरण जालें । विस्मरण तें चि कैसें स्मरणासी आलें ॥ १ ॥ ध्रु० ॥ अगाध अगाध रूप अद्भुत चि पुरातन । निरंजन निरंजन जनींवनीं परिपूर्ण ॥ ७ ॥ आपपर पारुषलें अखंड स्वरूपस्थिति । सहजीं सहज लीळा अवलीळा उपरति ॥ २ ॥ सुखीं सुख सुखावलें रूपीं रूप मुसावलें । दिनकरा रामदासीं निरंतर निभावलें ॥ ३ ॥

राग विलावल [ १०

निरज्यदळनयना हो रामा । निरज्यदळनयना ॥ ७ ॥ सतेज मुगुट कुंडलें श्रवणीं । लाजे मदन वदना हो रामा ॥ १ ॥ सुललित केशर शोभत भाळीं । पीतवसन जघना हो रामा ॥ २ ॥ आपाद रुळत सुमनमाळा । शंकित शशि रदनों हो रामा ॥ ३ ॥ कर शर-साज्जित चाप विराजे । निशाचरकुळकदना हो रामा ॥ ४ ॥ तोडर-ब्रीद पदीं असुरांवरि । दिनकरमदभेदना हो रामा ॥ ५ ॥

[ ११

सद्गुरुचरणासी । शरण सद्गुरुचरणासी । जासी तरीच पावन होसी निजसुखभरणासी ॥ ७ ॥ अघटित माया घटणें कैसी कोण्या विचारें । वर्मांवांचुनि सिणति मूढजन ठकले अविचारें ॥ १ ॥ विधि हरि हर मुनि दानव मानव जाले योगविलासी । ते हि सद्गुरुच्या वरदें निज-प्राप्तिस आले विशेषीं ॥ २ ॥ सद्गुरुवांचुनि सद्गति न घडे बोलति वेद-पुराणें । ऐसा निश्चय मानुनि अंतरिं दिनकर ह्मणे हित करणें ॥ ३ ॥

राग नाट, तिताळ [ १२

संतकृपा होये जयालागीं पूर्ण । तया नरदेहीं हें चि भूषण । संत-

---

१ कुंठित झालें, मुकावलें. २ विषयनिवृत्ति. ३ भरून उरलें. ४ नीरजदल=कमल. ५ दंत. ६ कदन=नाश. ७ भरण=पोषण, वेतन. ८ सद्गुरूस शरण जाणें ही मुख्य गोष्ट न समजल्यामुळें.

चरणीं निरंतर लीन । पावे समाधान । असंभाव्य ॥१॥ संतकृपेचें थोर महिमान । स्वयें नेणे ज्याही जाला चतुराननं । तेथें मनुजाचा केवा कोण । आणिलासी जाण । अविवेकें ॥२॥ संतकृपा घडे सुकृतें ज्यास । उपमा न घडे त्याच्या भाग्यास । परब्रह्म होये स्वयें सावकाश । करूनि निराश । देहभावा ॥ ३ ॥ संतकृपेचा न तुळे महिमा । जेथें नेतिशब्दें मौन निगमां । तेथें पाड काई विधिआगमा । शास्त्रांचिया श्रमा । कोण लेखा ॥ ४ ॥ सर्व गूज आहे संतांचे चरणीं । नित्य दिनकर त्यासी लोटांगणी । कृपा कीजे स्वामी दीनालागुनी । दयावर पाणी । शिरीं ठेवा ॥ ५ ॥

श्रीविघ्नराज [ १३

विघ्ननिवारणचंडा । दे मज बुद्धि प्रचंडा । विनवितों अतिबळभुजदंडा । श्रीविघ्नराजा ॥ १ ॥ मी तों अति अपराधी । न करुनि भजनाची विद्धि । इच्छितों कीर्तनमतिसिद्धि । श्रीविघ्नराजा ॥ २ ॥ अद्भुत कीर्तनमहिमा । न कळे जो स्तवितां निगमा । तो मी वर्णिन ह्मणतों जीवात्मा । श्रीविघ्नराजा ॥ ३ ॥ सलगी हे करितां न लजे । मागे मन इच्छित जें जें । नवल हें वाटे मज माझें । श्रीविघ्नराजा ॥४॥ दिनकरदीनदयाळा । तूं दीनबंधु कृपाळा । सांभाळीं आपुली ब्रीदमाळा । श्रीविघ्नराजा ॥ ५ ॥

॥ नाम ॥ येकताळ [ १४

॥ ध्रु० ॥ रामा रे मेघश्यामा रे । तनुमनुवेधों तुझिया नामा रे ॥ ध्रु ॥ देवदेवा रे देईं सेवा रे । शिव ध्यातो माझा कोण केवा रे ॥ १ ॥ दीनानाथा रे रघुनाथा रे । सनाथ करीं धरितों चरणीं माथा रे ॥ २ ॥ महाराजा रे योगबीजा रे । दिनकर दीन मोक्षध्वजा रे ॥३॥

सदर [ १५

॥ ध्रु० ॥ देवा रे महादेवा रे । शंभु त्रिपुरारि सदाशिवा रे ॥ ध्रु ॥ पंचानना रे त्रिलोचना रे । वारीं दुःख तारीं भवमोचना रे

---

१ पाड. २ मूर्ख. ३ वेदांना. ४ शास्त्रांचा. ५ विघ्न निवारण करण्यांत जो भयंकर वाटतो किंवा किती हि भयंकर विघ्नें आलीं तरी त्यांचें निवारण करणारा असा गणपति. ६ छंद.

॥ १ ॥ विश्वंभरा रे वृद्धेश्वरा रे । माझी चिंता तुज सर्वेश्वरा रे ॥२॥ दीनबंधु रे दयासिंधु रे । दिनकरामनीं तुझा वेधु रे ॥ ३ ॥

[ १६

॥ ध्रु० ॥ रामा हो जय रामा हो ॥ ध्रु ॥ सर्वकाळ स्मरणीं । स्मरतसे शूळपाणी ॥ १ ॥ अहिल्येमानसीं वेधु । मुक्त शापसमंधु ॥२॥ विमानीं गणिका हाक । मारितसे निःशंक ॥ ३ ॥ स्वर्गमृत्यपाताळीं । जीव गाती गदारोळीं ॥ ४ ॥ दिनकररामदास । अखंड ध्यातो साव- काश ॥ ५ ॥

[ १७

निंदा स्तुति आणि मानापमानीं । दुखंड नव्हे मनीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ धन्य तो संत ज्ञानी ॥ ध्रु ॥ लाभालाभीं सुखदुःखा न मानी । अखंड समाधानी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे त्रिभुवनांत कोण्ही । स्वानंदें दुजें नाणी ॥ ३ ॥

[ १८

जों नीट वैभव स्वसंपत्तीसीं । जों वृद्धि भाग्यासी ॥ १ ॥ ध्रु० ॥ तों तूं भजे रामासी ॥ ध्रु ॥ जों शक्तिसाटोप पराक्रमेंसीं । आरोग्य शरिरासी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे तुझीं जों तुजपासीं । आहेति स्वसुखेंसीं ॥ ३ ॥ तों तूं भजे रामासी ॥ ध्रु ॥

[ १९

शिवासी विष्णूचें ध्यान । हृदईं श्रीविष्णुचिंतन । तेणें तो कर्पूरगौरवर्ण ॥ १ ॥ ध्रु० ॥ अद्वैतभावें ॥ ध्रु ॥ विष्णूसी शिव शिव स्मरण । हृदईं श्रीशिवमय भजन । तेणें तो घननीळ संपूर्ण ॥ २ ॥ ऐसे हे अखंड असती । येरयेरांलागीं भजती । भक्तसंकट पडतां अव- तरती ॥ ३ ॥ येरयेरांलागीं होती । येरयेरांलागीं निमती । येरयेरां अनु ना विस्मंभती ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे येणें भावें । स्थित त्यांची नेणति जीवें । निंदिति नेणोनि शैवें वैष्णवें ॥ ५ ॥

१ तिसगांवजवळील प्रसिद्ध महादेवाचें स्थान. २ मोठ्या गर्जनेनें. ३ द्विधा मनाचा. ४ ( अर्थात् ) गात्रें.

॥ १ ॥ विश्वंभरा रे वृद्धेश्वरा[1] रे । माझी चिंता तुज सर्वेश्वरा रे ॥२॥ दीनबंधु रे दयासिंधु रे । दिनकरामनीं तुझा वेधु रे ॥ ३ ॥

[ १६

॥ ध्रु० ॥ रामा हो जय रामा हो ॥ छ ॥ सर्वकाळ स्मरणीं । स्मरतसे शूळपाणी ॥ १ ॥ अहिल्येमानसीं वेधु । मुक्त शापसमंधु ॥२॥ विमानीं गणिका हाक । मारितसे निःशंक ॥ ३ ॥ स्वर्गमृत्यपाताळीं । जीव गाती गर्दारोळीं[2] ॥ ४ ॥ दिनकररामदास । अखंड ध्यातो साव-काश ॥ ५ ॥

[ १७

निंदा स्तुति आणि मानापमानीं । दुखंड[3] नव्हे मनीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ धन्य तो संत ज्ञानी ॥ छ ॥ लाभालाभीं सुखदुःखा न मानी । अखंड समाधानी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे त्रिभुवनांत कोण्ही । स्वानंदें दुजें नाणी ॥ ३ ॥

[ १८

जों नीट वैभव स्वसंपत्तीसीं । जों वृद्धि भाग्यासी ॥ १ ॥ ध्रु० ॥ तों तूं भजे रामासी ॥ छ ॥ जों शक्तिसाटोप पराक्रमेंसीं । आरोग्य शरिरासी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे तुझीं जों तुजपासीं । आहेति स्वसुखेंसीं ॥ ३ ॥ तों तूं भजे रामासी ॥ छ ॥

[ १९

शिवासी विष्णूचें ध्यान । हृदईं श्रीविष्णुचिंतन । तेणें तो कर्पूरगौरवर्ण ॥ १ ॥ ध्रु० ॥ अद्वैतभावें ॥ छ ॥ विष्णूसी शिव शिव स्मरण । हृदईं श्रीशिवमय भजन । तेणें तो घननीळ संपूर्ण ॥ २ ॥ ऐसे हे अखंड असती । येरयेरांलागीं भजती । भक्तसंकट पडतां अव-तरती ॥ ३ ॥ येरयेरांलागीं होती । येरयेरांलागीं निमती । येरयेरां अनु ना विरंभती ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे येणें भावें । स्थित त्यांची नेणति जीवें । निंदिति नेणोनि शैवें वैष्णवें ॥ ५ ॥

---

१ तिसगांवजवळील प्रसिद्ध महादेवाचें स्थान. २ मोठ्या गर्जनेनें. ३ द्विधा मनाचा. ४ ( अर्थात् ) गार्ने.

[ २०

परमपुरुषा रामा । विश्वरूपा सगुणब्रह्मा । न कळे महिमा स्तवितां पैं निगमा ॥ १ ॥ ध्रु० ॥ श्रीदेवदेवा ॥ छ ॥ उपमा तुज न घडे न घडे । श्रुतिशास्त्रां मौन्य गाढें । तेथें माझी मति कैसी विरुढे[1] ॥ २ ॥ देवादिदेवा स्वामी । अनाथें तुजविण आह्मी । दीनानाथा वारीं भवऊर्मि ॥ ३ ॥ शिवादिकां योग तुझा । तेथें कोण केवा माझा । परि तुझी मज आशा अधोक्षजा ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे तूं विश्वाचा । सकळ मज अनुभव साचा । पाहे तंतें[2] बिरुदमाळेचा ॥ ५ ॥

[ २१

तनुमनें निजानंदें गुरूसी । भावें शरण जासी ॥ १ ॥ ध्रु० ॥ तरि तूं धन्य होसी ॥ छ ॥ शुकादिकां गुरुकृपा मिरासी । सन्मार्गें जरि घेसी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे निज प्राप्तिस येसी । अखंड सुख घेसी ॥ ३ ॥

[ २२

येउनियां नरदेहासी । अपभ्रंशीं[3] कां पडलासी । सोडुनियां निजहित भ्रमलासी ॥ १ ॥ ध्रु० ॥ तूं जीवभावें ॥ छ ॥ रात्रींदिस चिंता करिसी । विषयांचे सोसीं पडसी । आपुलें निजहित तें नेणसी ॥ २ ॥ दिनकर ह्मणे सावध होईं । सद्गुरुसी शरण जाईं । न पडें प्रपंचप्रवाहीं ॥ ३ ॥

[ २३

सखा जीवाचा श्रीराम पाहीं । त्याविण गति नाहीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ राम अखंड ध्याईं ॥ छ ॥ आकार सर्व ही आहे आपाई[4] । पाहोनी लवलाहीं[5] ॥ २ ॥ दिनेश ह्मणे मनिं सावध होईं । स्वहित नरदेहीं ॥ ३ ॥

---

१ विरूढणें=मूळ धरणें, रुजणें. २ तंतु. ३ विकृत स्थितींत. ४ विनाशी, जाणारें. ५ सत्वर.

[ २४

होउनी लंपट दाराधनासी । सेविसि विषयांसी ॥ १ ॥ ध्रु० ॥ सोडुनियां रामासी ॥ छ ॥ नेणोनियां हित कां भुललासी । गुंतसी यमपार्शी ॥ २ ॥ दिनेश ह्मणे काय उणें तयासी । जो लीन अविवेसी ॥ ३ ॥

[ २५

जो पूर्ण अंकित श्रीसद्गुरुचा । तो येक दैवाचा ॥ १ ॥ ध्रु० ॥ स्वानुभवी देवाचा ॥ छ ॥ सारुनियां अहं सोहं त्रिवाचा । स्वयंभ होय साचा ॥ २ ॥ दिनेश ह्मणे देह सगुण त्याचा। दिसे तो परि कैंचा ॥३॥

[ २६

ते धन्य जे जगदीशासी ध्याती । अखंड गुण गाती ॥१॥ ध्रु०॥ निजानंदें गर्जती ॥ छ ॥ जैस्या वनस्पती होति वसंतीं । तैसे ते स्वानुभुती ॥ २ ॥ सद्भावें दिनकर ह्मणे कल्पांतीं । कीर्तिस्वरूपें जिती ॥३॥

[ २७

श्रीहरिभजनाची बरी बंदुक निरंतर हृदईं राहे । वैराग्यदारु[1] स्वानुभवगोळा विवेकरंजंख पाहें ॥ १ ॥ ध्रु० ॥ ऐसे बळकट भारी सेवक हरिचे ॥ छ ॥ मनपवनाची समता करुनी लक्षुनि गुरुवाक्य नेटें । ज्ञानाग्निफुणगा पडतां वरता स्वानंदकडका उठे ॥ २ ॥ काम क्रोध मद मच्छर नाना भवगनिमाची सेना । निजदेशांतुन मारुन दिधली द्वैतपणेंसि दिसेना ॥ ३ ॥ दैवी संपत्ति रक्षुनि हरिजन नांदति निजसुखपेठें । अखंड जागती गर्जति नामें मग यम तस्कर कोठें ॥ ४ ॥ नवविध भजनें कलकल मोठी टाळमृदांगकीर्तनाची । दिनकर ह्मणे मज आवडि भारी ऐस्या बंधुखच्यांची[2] ॥ ५ ॥

राग कामोद [ २८

॥ ध्र० ॥ सार्थक संसारीं । रघुपतिनामें निर्धारीं । सादर होउनि तन्मय जेथें अखंड त्रिपुरारि ॥ छ ॥ अश्वमेध कोटी । बहुविध

१ सुरंगाची दारु. २ बंधुखच ( ? ) बंधूंचा मोठा समुदाय. ( खच=ढीग )

साधनपरिपाटी[1] । असतां येणें जाणें न तुटे वाउगि आटाआटी ॥१॥ नामाचा महिमा । नेणे चतुरानन ब्रह्मा । तेथें बापुडें मानव किती जाणेल सुखधामा[2] ॥ २ ॥ दिनकर ह्मणे पाहें । सार्थक नरदेहीं आहे। सारासार विचारीतां नामें गति लाहे ॥ ३ ॥

[ २९

धन्य शरयुतीर धन्य अयोध्यापुरी । धन्य ते जन वन जेथें नांदे श्रीहरी ॥ १ ॥ ध्रु० ॥ धन्य ते कौसल्या हृदईं नांदे रघुवीर । त्रैलोक्याचा बाप ह्मणवी दशरथकुमर ॥ छ ॥ धन्य त्या नरनारी नयनीं पाहति श्रीराम । धन्य सेवकजन ज्यांसी अखंड विश्राम ॥ २ ॥

[ ३०

वांजेच्या पोराचें बारसें केलें । तैसें देहामाजीं साध्य साधिलें[3] ॥१॥ ॥ध्रु०॥ देह मिथ्या पाहें देह मिथ्या पाहें । देह मिथ्या तेथें साधिसी काये ॥ छ ॥ गांव नाहीं तेथें साधिली सीमा । तैसें देहामाजीं देखिलें रामा ॥२॥ दिनकर ह्मणे अवधी च माव । देह नाहीं तेथें कैंचा पां देव ॥३॥

[ ३१

सोडुनि संसारश्रमासी जीवें । श्रीरामनाम गावें ॥ १ ॥ ध्रु० ॥ सस्वरूपीं रमावें ॥ छ ॥ निमिष्य पळ घडी उगें नसावें । स्वहित सम-

* मागील २७ व्या पदांतील " बंधुखच " शब्दावरील टीप चुकली आहे. बंधुखची=बंदुकची=गोलंदाज, करवल. हरिभजन ही बंदुक व हरिभक्त हा बंदुकची.

१ साधनांचा अनुक्रम किंवा पद्धत. २ सर्व सुखाचें आगर जो श्रीराम त्याला. ३ देह जड, नाशवंत अतएव मिथ्या आहे. तेव्हां जसें दृष्टांतांतील पोर खोटें व ह्मणून त्याचें बारसें केलें हें ह्मणणें हि खोटें च; तद्वत् मिथ्या अशा या देहामध्यें च परमात्मप्राप्ति साधिली हें ह्मणणें हि असत्य. तर मग काय देहपात झाल्यावर आत्मप्राप्ति होणार ? नाहीं. या ठिकाणीं वाच्यार्थ सोडून लक्ष्यार्थ घेतला पाहिजे. देहाची विदेह स्थिति झाल्यास देवाची प्राप्ति होते व देहीं असून विदेह स्थिति प्राप्त होऊं शकते असें ग्रंथराज आपणांस सांगतो.

जावें ॥ २ ॥ दिनेश म्हणे नरदेहीं स्वभावें । साम्राज्यसुख[1] ध्यावें ॥३॥

[ ३२

टाळुं नको नाम घेतां क्षणासी । सोडुनि आळसासी ॥१॥ ध्रु०॥ ध्याईं सर्वोत्तमासी ॥ छ ॥ नाहीं येथें कांहीं तुझी मिरासी । उगा चि भ्रमलासी ॥ २ ॥ दिनेश म्हणे हित पाहें त्वरेसीं । विलंब नको यासी ॥ ३ ॥

[ ३३

पाहें मनीं समजोनी सज्ञाना । कोण्हीच नव्हे कोण्हा ॥१॥ ध्रु० ॥ येके श्रीरामविना ॥ छ ॥ कांता न ये सुत न ये निदा[2]ना । प्रपंचसखी नाना ॥ २ ॥ दिनेश म्हणे नको देहाभिमाना । धरुनि होसि साना ॥ ३ ॥

[ ३४

कवणाचें गणगोत । कवणाची मातातात । कवणाचे सुतजामात ॥ १ ॥ ध्रु० ॥ सखया मनुजा स्वहितीं तूं सावध होईं ॥ छ ॥ कवणाचे बंधु बहिणी । कवणाचे व्याही विहिणी । सकळ हे माइक करणी ॥ २ ॥ कवणाचीं घरें दारा । कवणाचा सखासोयरा । हा अवघा विषयथारा ॥ ३ ॥ येका जगदीशावीण । अवघी हे अविद्या जाण । सोडुनि होईं सावधान ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे लाभ आहे । मोठा नरदेहीं[3] पाहें । रामपाईं स्थिर राहें ॥ ५ ॥

[ ३५

आतां निजहित पाहें । सद्गुरुचे पाईं आहे । तें तूं विचारीं लवलाहें ॥ १ ॥ ध्रु० ॥ सखया आधीं आपुलें सार्थक समजावें ॥छ॥ जोंईजणें जवंवरि हातीं । तवंवरि हे धरीं विरक्ति । साधीं वेगीं सायुज्यमुक्ति ॥ २ ॥ करितां सद्गुरुभजन । आप आपणा लाभे पूर्ण । दिनकर म्हणे सावधान ॥ ३ ॥

---

१ स्वानंदसाम्राज्यसुख. २ अंतीं. ३ नाशवंत शरीर.

[ ३६

निःशंक कीर्तनीं गावें नाचावें । सप्रेम नाम ध्यावें ॥१॥ ध्रु०॥ क्षण उगें नसावें ॥ ध्रु ॥ निरूपणीं गद्यघोषें ह्मणावें । टाळीस वाजवावें ॥ २ ॥ दिनेश ह्मणे नामउच्चार जीवें । करूनि करवावे ॥ ३ ॥

[ ३७

देवा देवा देवा देवा । दयानिधि राघवा । काय मी चुंकलें सेवा । रे रामा ॥ १ ॥ धावा करूं कोणाचा । स्वामी तूं अनाथांचा । किती बोलों दीन वाचा । रे रामा ॥ २ ॥ चांडाळें कपटवेषें । ठकूनि आणिलें कैसें । नाडिलें पूर्वदोषें । रे रामा ॥ ३ ॥ ठेविलें वनांतरीं । छळिती निशाचरीं । विक्राळा भयंकरीं । रे रामा ॥ ४ ॥ क्षणक्षणा दशानन । करितसे छळण । करीं बंदमोच्यन । रे रामा ॥ ५ ॥ वियोगाचा येक क्षण । जातो युगासमान । कृपा करीं झडकरून १ रे रामा ॥ ६ ॥ दिनकरवंशाभरणा । कळिमळविध्वंसना । पावें पावें करुणाघना । रे रामा ॥ ७ ॥

[ ३८

वाटतसे उदासीन । तुझिया संयोगेंवीण । भोग ते क्षयरोग जाण । रे राघवा ॥ १ ॥ युगाऐसा येक क्षण । जातां होतें निर्वाण । वाहातुसे तुझी आण । रे राघवा ॥२॥ रामा रामा रामा रामा । सखया रे निजविश्रामा । धावें पावें सर्वोत्तमा । रे राघवा ॥ ३ ॥ तान्हुलया जैसी माये । वच्छालागीं जैसी गाये । तैसा पावें लवलाहें । रे राघवा ॥ ४ ॥ न लवीं दिनेशा वेळु । सांभाळितां पळेंपळु । मानस न करीं विव्हळ । रे राघवा ॥ ५ ॥

[ ३९

येक मूळ त्यासी दोनि च शाखा । येक सफळ दुजी निर्फळ देखा ॥१॥ ध्रु०॥ सन्मुख होय तो देखे डोळां । विन्मुखासी होये असाध्य

१ रावणाच्या बंदिवासांत सीतेनें भाकलेली करुणा. २ दिनकराला ( सांभाळितां ).

कळा ॥ १ ॥ मुळीं बैसले ते धन्य जाले । अमरां दुर्लभ तें सेउनि धाले ॥ २ ॥ तृप्त होउनि ह्मणे दिनकर । मोक्षसुखाचे देती उद्गार ॥ ३ ॥

राग मल्लार [ ४०

होंळी आली जरा हुली पीडा पाहे दुर्धरा यमरायाची । आपुले ठाईं सावध राहावें न चाले चालि कोण्हाची रे रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ विख्यात विख्यात सद्गुरुराजा सांभाळीं दीनजनासी । आला तो मुक्ता गेला तो सहजा सांकडुं नाहीं कोण्हासी रे रे ॥ ध्रु ॥ देसाई पाटिल चौधरी पांडे अहंमिरासीचे धनी । दुष्कृत धनाचे धनवंत सांठवी रौरवगडीं नेउनी रे रे ॥ २ ॥ आतां अहंदेश सोडुनि जावें अद्वैतपूर्ण विदेशा । विवेकमाघोंडा घेईजे हातीं तो वारिल काममवासा रे रे ॥ ३ ॥ सद्गुरुराजा अद्वैतपाटणीं नांदतसे समसुखें । विवेकसंगें भेटतां त्यासी तो न ह्मणे भूपति रंकें रे रे ॥ ४ ॥ निर्भयपत्र ब्रह्मास्मिमुद्रेचें देउनि आकल्पवरी । सद्भक्तिपेंठे भाविकां राहवी मग कैंची यमराजपुरी रे रे ॥ ५ ॥ होंलि हुलि तेथें समूळ नसे न दिसे द्वंददुःकाळु । निष्कामसुखें दुमदुमी पेंठ स्वानंदसौख्यसुकाळु रे रे ॥ ६ ॥ संदेहग्राम सोडुनि दिनकर राहिला सद्गुरुपेंठे । होणें जाणें तेथें नाइकिजे कांहीं शुकादिकीं निजनेटें रे रे ॥ ७ ॥

राग कामोद, येकताळ [ ४१

दुर्जनगंर्जन रामा । सज्जनजनविश्रामा । अद्भुत पदरजमहिमा । न तुळवे परि निगमा ॥ १ ॥ अनाथ मी निःकामी । परि अखंड रंति तव नामीं । नेणें आणिक ऊर्मी । रामा रमवीं निजविश्रामीं ॥ २ ॥ दिनकरवंशभुपाळा । दिनेश दीन प्रतिपाळा । पतीतपावन माळा । ह्मणीं सुटे स्नेहाळा ॥ ३ ॥

राग श्रीराग [ ४२

श्रीमुख सुंदर । पाहाती वान्नर । नाचती आनंदें निर्भर । रघुरा-

---

१ ढेंकर. ( गीर्वाणलघुकोश ). २ हालहूल=क्षोभ, व्यग्रता, खळबळ, बंडाळी. ३ संकट, ओझें. ४ ( ? ) ५ नगरी. ६ गंजनं=लाजविणें, जिंकणें. ७ आनंद, प्रीति, आसक्ति. ८ मनाचे तरंग.

[stamp]

या ॥ १ ॥ ध्रु० ॥ जय जय वैकुंठधीशा । जय जय अयोध्यावासा । जय जय पट्टाभिशेषा । रघुराया ॥ छ ॥ सुर नर विद्याधर । करिती जयजयकार । न कळे महिमा अपार । रघुराया ॥ २ ॥ करुणेचा जळधर । वोळला कीं अपार । बाहातां चातक दिनकर । रघुराया ॥ ३ ॥

राग अहेरि [ ४३

माझिया मनें घेतला छंदु । नोसोडी गोविंदु । रात्रिदिवस ॥१॥ ॥ध्रु०॥ गोविंद गोविंद ह्मणतां भावें । गोविंद धावे । पाठी लागे ॥छ॥ रात्रि गोविंद दिवस गोविंद । अखंड गोविंद । जडला आंगीं ॥ २ ॥ मागें गोविंद पुढें गोविंद । सर्वत्र गोविंद । व्यापुनि ठेला ॥ ३ ॥ दिनकरा मन गोविंदध्यानें । गोविंद होणें । गोविंदनामें ॥ ४ ॥

राग अहेरि [ ४४

अनाथांचा नाथ पतिता पावन । कटीं कर ठेऊन । भीमातीरीं ॥१॥ध्रु०॥ विठ्ठल उभा अखंड ठेला । न्याहाळितो डोळां । पुंडलीकातें ॥ छ ॥ धन्य ते पंढरी पुंडलिकागुणें । वस्ति नारायणें अखंड केली ॥ २ ॥ दिनकर ह्मणे नवल मोठें । पंढरीं जातां विठ्ठल भेटे ॥ ३ ॥

राग अहेरि [ ४५

विठ्ठल पावे विठ्ठल पावे । विठ्ठल पावे विठ्ठलनांवें ॥ छ ॥ विठ्ठल ह्मणा विठ्ठल ह्मणा । संसारयातना बाधीना कोण्हां ॥ १ ॥ दिनकर ह्मणे विठ्ठल सेवा । देहाचिया गांवा न याल पुढें ॥ २ ॥

राग परज [ ४६

देवा किती लक्षूं वाट । क्षीण जाले नेत्रवाट । सद्गदित दाटे कंठ । दुःखें उलों पाहे पोट ॥१॥ध्रु०॥ हरि हरि हरि हरि । तारीं तारीं दीन तारीं । भवविभव हें वारीं । अनाथांसी करीं धरीं ॥ छ ॥ वास पाहे बहु दीस । वियोगाचा छेदीं पाश । आशेची नको निराश । जगदीशा घेईं येश ॥ २ ॥ जाली सीमा बोलवेना । सर्वज्ञ तूं पूर्णघना । जाणसी तें [1]करीं दीना । दिनकर [1]करी करुणा ॥ ३ ॥

---

१ भाकी.

राग परज [ ४७

धांवें पावें देवराया । जड जाली माझी काया । निर्दाळीं हे अहंमाया । ममतामुळें गेलों वायां ॥ ध्रु ॥ होती आस बहु मनीं । कामा येती मजलागुनी । सकळ तें गेलीं सोडुनी । आतां नेणें तुजवांचुनी ॥ १ ॥ कळों आलें निश्चयेंसीं । अंतीं नव्हे कोणी कोणांसी । येकायेकीं अहर्निशीं । यावें जावें हृषीकेशी ॥ २ ॥ कायावाचामनोभावें । शरण मी मज रक्षावें । दीन तुझें नुपेक्षावें । दिनकर करीं धरावें ॥ ३ ॥

राग परज [ ४८

गोड लागे तुझें नाम । शंकराचें निजवर्म । निगमा जें अनुपम्य । रामदासा बहु सुगम ॥ ध्रु ॥ सेवितां अमृत फिकें । ऐकतां नादासी[2] जिंके । देखतां अनंग मुंके[3] । काळिकाळ जया धाके ॥ १ ॥ न सेविल्या अपेक्षीना । सेविल्यासी उपेक्षीना । असंभाव्य स्थित लक्षेना । ब्रह्मादिकां बोलवेना ॥ २ ॥ निजभावें दिनकर । सेवितां तें निरंतर । लाधलें जें सुख अपार । निःशब्द तें परात्पर ॥ ३ ॥

राग भैरवी [ ४९

त्राहे त्राहे सद्गुरुराया । निरशीं अहंमाया । कृपा करीं लवलाह्या । काळ जाला सिद्ध खाया ॥ ध्रु० ॥ तव कृपेवीण जाण । वेदशास्त्रव्याख्यान । हरिकथाकीर्तन । संगीतकळा ॥ योगयाग तीर्थाटण । स्नान संध्या मुद्रा ध्यान । सकळ हें फोल जाण । देवादिदेवा ॥ १ ॥ हरिहरब्रह्मादिक । ते हि प्रभुपदीं रंक । चाळिती सकळ लोक । तुझिया सत्ता ॥ व्यास अंबऋषी शुक । साधु संत सकळिक । तव कृपां निजसुख । भोगिती सदा ॥ २ ॥ भक्ति भाव निरूपण । भूतदया अनुष्ठान । देवोदेवीं चिंतन । सप्रेम जऱ्ही ॥ तऱ्ही तव कृपेवीण । जो जो कीजे तो तो शीण । दिनकर शरण । सद्गुरुपदीं ॥ ३ ॥

---

१ एक दिवस पटकन येऊन भेट देऊन जा. २ मधुर स्वराध. ३ मुका होईल म्ह० चकित होईल. ४ काळजी अगर आदर करीत नाहीं. ५ हयगय, तिरस्कार अथवा त्याग करीत नाहीं. ६ हलविती.

राग अहेरि [ ५०

बहुत दिवस भोगियेलें दुःख । आतां देवा सुख । तुझे नामीं ॥१॥ध्रु०॥ तें चि आह्मां देईं तें चि आह्मां देईं । तें चि आह्मां देईं । पांडुरंगा ॥छ॥ पतितांचें काये पाहातोसी देवा । उदारा केशवा । मायबापा ॥२॥ दिनकर ह्मणे तुजवीण ह्मणें[1] । जरी कांहीं जाणे । तरी आण तुझी ॥३॥

राग कामोद [ ५१

नामें गजेंद्र विमान चढे । देखोनि तूज जळीं न पडे ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ हरि तारक नाम तुझें पतिता । मारकरूप मेला पाहतां ॥छ॥ वेद बहूत जना शिकवी । हरिध्यानिंधरा परि तो झकवी ॥ २ ॥ काय प्रमाण प्रतक्ष दिसे । हरि नाम सनातन तूज कसें ॥ ३ ॥ फार पुढें हरि बोलो काय । सोडविली विरुदावळि जाय ॥ ४ ॥ सर्व दिनकरप्रभु हास्य करी । नक्र गजेंद्र समान धरी ॥ ५ ॥

राग असावरी [ ५२

अच्युत अनंत स्मरण करावें । भवभयनिरसन हें चि स्वभावें ॥ ध्रु० ॥ जिहीं जिहीं सेविलें हें नामामृतसार । नाशली संसारपीडा सुटले अपार ॥ १ ॥ बळी भीष्म नारद पुंडरीक व्यास । सनकादिक ध्याती हनुमंत दास ॥ २ ॥ कृत त्रेत द्वापार कळियुगामाजीं । रामनामेंविना मुक्ति नव्हे जी ॥ ३ ॥ दिनकर ह्मणे धन्य ते जीव । जें जीवें जीत चि निरंतर शिव ॥ ४ ॥

ध्रुवक [ ५३

बहु भाग्यें उत्कट । वैकुंठा पायवाट । नित्य लाधल्यां वीट । मानुं नये बापा ॥ १ ॥ बहु भाग्यें उत्कट । गुरुवचन वरिष्ट । नित्य लाधल्यां वीट । मानुं नये बापा ॥ २ ॥ बहु भाग्यें उत्कट । संगति संतांनिकट । नित्य लाधल्यां वीट । मानुं नये बापा ॥ ३ ॥ बहु भाग्यें उत्कट । विष्णुशेषोच्छिष्ट । नित्य लाधल्यां वीट । मानुं नये बापा ॥ ४॥

---

१ कदाचित् २ हा नक्राचा धांवा आहे. ३ मुक्ततेचा सोपा मार्ग दाखविणाऱ्या खालील गोष्टी आपल्या परम भाग्यानें प्राप्त झाल्या तर त्या रोजच्या रोज आपणांस लाभतात ह्मणून त्यांचा केव्हां हि वीट येऊं देऊं नये. ४ देवाचा प्रसाद.

बहु भाग्यें उत्कट। कीर्तन घडघडाट। नित्य लाधल्यां वीट। मानुं नये बापा ॥ ५ ॥

[ ५४

नावडे नावडे मज कांहीं वो कांहीं रे। रामस्मरणावांचुनि पाहीं रे ॥ ध्रु० ॥ श्रीराम जयराम जयजयराम वो जयजयराम। निरंतर अंतरीं राहो हा चि नेम ॥ १ ॥ झडो पडो तनु अथवा चिरंतन[1] हो चिरंतन हो। परि रामस्मरणस्थितिभंग न[2]हो हो ॥ २ ॥ दिनकर रामींरामदासकृपां रामदासकृपां। भवभय निरसुनि केला मोक्ष सोपा ॥ ३ ॥

राग वैराळी [ ५५

शब्द पडतां श्रवणीं दीनबंधू रे। अति सप्रेमें उठिला जीवन-कंदु[3] रे। भक्तकरुणेचा साव्रेना वेधु[4] रे। करुणाकर चालिला कृपासिंधु रे ॥ ध्रु ० ॥ गरुडारूढ होउनी लागवेगें रे। मनपवन धांवती माग-मागें रे। पंथीं सोडिला सर्पारि[5] न पवे संगें रे। त्वरें धांविला उडी घातली श्रीरंगें रे ॥ १ ॥ तेज अद्भुत सुनीळ फांके प्रभा रे। सरोवरीं विराजे रम्य शोभा रे। नभचरां[6]सहित लोप जाला नभा रे। गजेंद्रमस्तकीं कर ठेवी स्वयंभ उभा रे ॥ २ ॥ स्वयंभतेज न्याहाळी निजनयनीं रे। हर्षे निर्भर भक्तचुडा[7]मणी रे। निश्चय मानिला अंतरापासुनी रे। दिन-करस्वामी पावला चक्रपाणी रे ॥ ३ ॥

राग रामक्री [ ५६

पाहतां अद्भुत अद्भुत चि जालें। अहं सोहं सोडूनि मन तन्म-यासि आलें ॥ ध्रु० ॥ नाठवे अत्र परत्र स्वदेहेंसीं। ब्रह्माहमस्मि सह गुणमईसीं[8] ॥ १ ॥ आपपरकडसणी[9] पारुषे[10]ली निरंजनीं। दिनकर अविमुक्त वर्णाश्रमकरुनी ॥ २ ॥

---

१ चिरंजीव. २ न होवो. ३ सर्व प्राणिमात्रास ज्यापासून जीवन मिळतें, असा मूळ आत्मस्वरूप श्रीविष्णु. ४ छंद. ५ गरुड. ६ चंद्रसूर्यांसहित सर्व नक्षत्रगण. ७ भक्तांमध्यें श्रेष्ठ जो गजेंद्र तो. ८ मायेसहित. ९ विचार. १० मुकावली, कुंठित झाली.

राग सोरट [ ५७

धन्य जन्याचें सार्थक आजि जालें । येणेंसंगें देखिलीं पाऊलें । तुटला भ्रम मन निश्चयासि आलें । निजानंदें हें ब्रह्मांड कोंदलें ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ जय रामा हरहृदयविश्रामा । अभयकर शिरीं ठेवीं मेघश्यामा ॥ ध्रु ॥ मज शोधितां ब्रह्मांडभांडोदरें[1] । धीर वीर शूर देखिले अपार । परि न दिसे हा पराक्रम थोर । त्रिभुवनीं येक स्वामी रघुवीर ॥ २ ॥ कायावाचामनेंसीं भाषदान । दास मारुती स्वामी रघुनंदन । विनटलों मी न सोडीं चरण । दिनकर रामदासीं शरण ॥ ३ ॥

केदारा [ ५८

रुसला रुसला रुसला । हरि वो सये ॥ रु० ॥ ध्रु ॥ काय करूं वो बाई । न गमे तयाविण । लाविला मनीं चुटका । वो बाई० ॥ १ ॥ पळ हरिविरहित । युगासमान जात । सत्वर त्यासी हटका । वो० ॥ २ ॥ विरहानें संतप्त । देह विकळ जात । बाहेर बाहें[2] वो नेटका । वो० ॥ ३ ॥ कठिण हृदय याचें । प्राण हरी लोकांचें । कष्टी करितो लटिका । वो बाई० ॥ ४ ॥ शब्द नाहीं सत्य ज्याचा । भरंवसा कोण त्याचा । पाचारा नंदाचा लाडिका । वो बाई० ॥ ५ ॥ ऐसे ऐकोनीयां बोल । हांसे नेटें[3] गोपाळ । तोडिला विरहतटका । वो बाई० ॥ ६ ॥ भक्तांमनीं जो जो हेत । तो तो करी भगवंत । दिनकरा भवीं सुटिका । वो बाई० ॥ ७ ॥

वैराटिका [ ५९

सती निघे सत्याचा संकल्प । न होतां आत्महत्येचें तें पाप । पतिरूपीं जरी नोहे सद्रूप । तरी सतीपणाचा कां दर्प ॥ १ ॥ ध्रु० ॥ सती पतिस्वरूपीं सद्रूप । न होतां नर्क न जाती आकल्प ॥ ध्रु ॥ पति मृत्यु पावला विदेशीं । सती मिरवे संभ्रमें स्वदेशीं । नाना भोग उपचार विलासीं । प्रेतासंगें मग निघे आगीसी ॥ २ ॥ पति नाशे

---

१ भांडें=भांडें, द्रव्य, खजिना. २. बोलावा. ३ मोठ्यानें.

जरी सती न नाशे । तरी सतीनाम तें काईसें । वांउगा डंबे[1] करूनि सायासें । प्रेतासंगें जळती तामसें ॥ ३ ॥ थितें[2] सार देहासी सोडूनी । भुतें प्रेतें मग होती स्मशानीं । डांका भोगें घुमती आसनीं । कैंच्या सत्या साजिन्या डांकीणी ॥ ४ ॥ जितां शब्द नाइके पतीचा । अंतीं त्याग करूं धांवे देहाचा । थोर नवलावो या जनाचा । असतां रवि अंधारु अंधांचा ॥ ५ ॥ धरूनि पतिचैतन्यासी चित्तीं । देह कीं विदेह नाहीं स्थिति । धन्य ऐसी सति त्रिजगतीं । चाऱ्ही मुक्ति तियेसी वंदिती ॥ ६ ॥ येणें चि जन्में जन्मनिवारण । करी ते महासति सुलक्षण । उभय वंशा केलें उद्धरण । दिनकर रामदासीं शरण ॥ ७ ॥

राग भैरवी [ ६०

नं जाणे सत्क्रियाकर्म । योग याग निष्ठा नेम । तीर्थ व्रत वर्णाश्रम । नेणें भूतदया धर्म ॥ ध्रु ॥ हीन दीन कुलक्षण । जालें स्वामी तुजवीण । दोषी पूर्ण पुरातन । न जाणे कांहीं ॥ १ ॥ध्रु ० ॥ जानकीशा जानकीशा । जानकीशा त्राहि त्राहि । पतित मी करूं काई ॥ ध्रु ॥ नेणें दान नेणें पुण्य । विधियुक्त अनुष्ठान । जप तप अनुष्ठान । नेणें कथा निरूपण ॥ ध्रु ॥ अर्थ स्वार्थें विख्यात । निंदियले साधुसंत । न जाणोनि तुझी मात । अनाथनाथा ॥ २ ॥ वेदशास्त्रपुराणासी । न जाणे मी हृषीकेशी । सार्थकाची वार्ता कैसी । न कळे कैवल्यराशी ॥ ध्रु ॥ सर्वांपरीं अज्ञान । आलों तुज शरण । दिनकरा कृपा पूर्ण । करीं रे देवा ॥ ३ ॥

राग भैरवी [ ६१

शिवच्यापखंडण । भूपदर्पभंजन । दशग्रीव हेळणकारी ॥ १ ॥ ॥ ध्रु ० ॥ देव देव देव देव । देव देव च्यापपाणी । रविवंशादिनमणी ॥ ध्रु॥ पितृवाक्य पाळण । मुनिवधु[3] तारण । सुरबंद मोच्यनकारी ॥२॥ हराविषहरण । त्रिभुवनमंडण । दिनकरभूषणकारी ॥ ३ ॥

---

१ दंभ. २ हल्लींच्या. ३ गौतमपत्नि अहल्या.

श्रीराग [ ६२

जळो या मूढाची वाणी । संशयनर्काची खाणी । उठितसे पोहाणी[1] । निंदेची सैरा ॥ १ ॥ ध्रु० ॥ सद्गुरुवीण बडबड । करिती विषई भांड । लटकी चि लडबड[2] । साहित्यशब्दें ॥ ७ ॥ कथेचिया मिसें निंदा । जल्पे शब्दीं भेदवादा । नष्ट तया प्रबोधा । मानिती सत्य ॥ २ ॥ साधुसंत परमहंस । अंतरीं मानिती हर्ष । कृपा करू जगदीश श्रोत्यांवक्त्यांसी ॥ ३ ॥ दिनकर रामदास । विनवीत साधकांस । गुरुगम्येंवीण सोसें । कराल झणें ॥ ४ ॥

श्रीराग [ ६३

वृत्तीचा उद्भवारंभ । विवेकें योजितां लाभ । प्रत्यग्वृत्ति स्वयंभ । आत्मत्व लाहे ॥ १ ॥ ध्रु ० ॥ पाहतें पाहातेपणें । पाहाणया पाहाणें । पाहोनियां पाहावणें । पाहाती कळा ॥ ७ ॥ येणें रीतीं पाहातां । अखंडैक तदात्मता । अनुभवी जाणता । जाणण्यातीत ॥ २ ॥ प्रत्याहारें निजपद । योजितां साधक सिद्ध । दिनकरा स्वानंद । सद्गुरुकृपां ॥३॥

श्रीराग [ ६४

॥ ध्रु० ॥ पाहातां वो माझें मज । नवल वर्तलें चोज । लाजिलेंपणाची लाज । बोलतां नये ॥ ७ ॥ अकळ अढळ रूप । अचळ जें अमूप । योजितां तें तद्रूप । जालीयें सये ॥ १ ॥ अहंपणा नाहीं ठावो । सोहंपणीं निर्वाहो । अहं सोहं वृत्तिभावो । समूळ नाशीं ॥ २ ॥ दिनकरा रामदासीं । ऐक्यतेचा समरसीं । दुजेंपण अहिर्निशीं । न दिसे कोठें ॥ ३ ॥

राग मारु [ ६५

॥ ध्रु ०॥ दीनवदन तुझें बाळ रे रामा । दीनवदन तुझें बाळ ॥ ७ ॥ समर्थाचें पोसिलें दुर्बळीं पांगिलें । तैसीपरी केली आजि दयाळें ॥ १ ॥ विषयांच्या भरें मोहें दंडिलें । कामें अनहित जालें रे

---

१ पोहो, रास. २ निरर्थक बडबड करणारा. ३ मूर्ख. ४ हावरेपणा. ५ स्वस्वरूपाकार. ६ इंद्रियदमनानें. वृत्ति नाहींशा केल्यानें. ७ पराधीन केलें.

॥ २ ॥ दिनकर तुझें सानुलें बाळ । उबगोनि[1] पराधीन केलें रे ॥ ३ ॥

राग पावक [ ६६

राम दीनाचा दयाळु । राम मनाचा मवाळु । राम कृपेचा कनवाळु । राम भक्ताचा स्नेहाळु रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ राम धरावा अंतरीं । त्याची न ये कोण्हा सरी रे ॥ छ ॥ राम अनाथां माहेर । राम कृपेचा सागर । राम भक्तीचा आगर । राम मानससरोवर ॥ २ ॥ राम शिवाचा विश्राम । राम जीवाचा आश्रम । राम सर्वांचा उपरम[2] । राम नाठवी तो अद्धम रे ॥ ३ ॥ राम पतितां पावन । राम विश्वाचें भुवन । राम जीवाचें जीवन । राम सर्वांसी सेव्यन[3] रे ॥ ४ ॥ ह्मणे दिनकर लॉगवेगें[4] । राम भजावा संतसंगें । जातें नरदेह वाउगें । त्याचें सार्थक भजनमार्गें रे ॥ ५ ॥

राग पावक [ ६७

काय अद्यापि निस्तुरा[5] बापा । काळ भरितसे आपुल्या मापा । जरा उमटे क्षयरोग शोफा[6] । आला अंतकाळ तो न्हे सोपा रे ॥ ध्रु० ॥ प्राणिया आपुलें हित करावें । सर्व आहे ज्याचें त्यासी विचारावें रे ॥ छ ॥ काळ ग्रासीत चालिला वया । जावं नेदी निमिष्य तें हि वायां । तां घेतला प्रपंचथाया[7] । आप्त[8] मानिलें धन जन जाया रे ॥ २ ॥ प्राण जातां सकळें राहाती । मोहममतेचीं सर्व रडती । जे या देहापासूनि जन्मती । ते चि फिरोनि देह जाळिती रे ॥ ३ ॥ अत्रवें[9] जाणोनि जोइजणें[10] । देहासकट कोणाचीं कोणें । मिथ्या विपयसुखाचीं भरणें । देह आहे तों सावध होणें ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे सर्वांसी । सुखें करा प्रपंचवाढीसी । पारि विचारूनि जगदीशासी । तयावांचूनि सर्व घसिघसी[11] रे ॥ ५ ॥

राग परज [ ६८

आळस कां नाम घेतां फुकाचें । काय तुझें वेंचे ॥ १ ॥ ध्रु० ॥

---

१ अव्हेर करून. २ शेवट करणारा. ३ सर्वांनीं सेवा, पूजा करण्यायोग्य. ४ अति त्वरेनें. ५ निसुर, निष्काळजी. ६ शोफ, अंग सुजणें, वात शिरणें. ७ छंद. ८ विश्वासार्ह, हिताचे. ९ अशाश्वत. १० भरती, मापें. ११ घसमस=असार, फोल.

१८९

राम ह्मणतां वाचें ॥ छ ॥ ब्रह्मादिकां सुख अपार ज्याचें । तुज कीर्ति न रुचे ॥ २ ॥ कैवल्यदायक थोर मोलाचें । दिनेश ह्मणे साचें गे ॥ ३ ॥

राग पावक [ ६९

राम दासांचा दयाळ । राम दासांचा स्नेहाळ । राम दासांचा कृपाळ । राम दासांचा कनवाळ रे ॥ १ ॥ ध्रु ० ॥ रामदास व्हावें सद्भावें । त्याचे स्वरूपीं समरसावें रे ॥ छ ॥ राम दासांचा सांगाती । राम दासांची विश्रांति । राम दासांची सर्व संपत्ति । राम दासांची सायुज्यमुक्ति रे ॥ २ ॥ राम दासांचें निजसुख । राम दासांचा सर्वस्व येक । राम दासांसी नाहीं आणिक । रामदासांचा दिनकर देख रे ॥३॥

राग परज [ ७०

तुझा तूं येक व्यापक रामा । अपराजित[1] कामा ॥ १ ॥ ध्रु० ॥ जीवशिवविश्रामा ॥ छ ॥ कैंचें तुजवीण दुजें आतां । अनंत सुखधामा ॥ २ ॥ दिनकर ह्मणे अगम्य लीळा । रामा घनश्यामा ॥ ३ ॥

[ ७१

नेणे संध्या नेणे स्नान । नेणे जप नेणे ध्यान । नेणे योगयाग तप दान ॥ १ ॥ ध्रु ० ॥ तें व्यर्थ जिणें ॥ छ ॥ नेणे तीर्थयात्रा ते हि । नेणे व्रत पर्व पाहीं । नेणे ब्राह्मणपूजन अणु कांहीं ॥ २ ॥ नेणे पठण श्रवण मनन । निजध्यासें नामस्मरण । दिनकर ह्मणे वायां गेलें येऊन ॥ ३ ॥

[ ७२

घेऊनियां धनुष्यबाण । पाठीसी तूणीर[2] जाण । तापसीवेषें हे कोण ॥ १ ॥ ध्रु ० ॥ साजणी बाई वो ॥ छ ॥ भस्मांकित तनु सुंदर । मस्तकीं जटाभार । दिसती हे अति सुकुमार ॥ २ ॥ वल्कलांचें परिधान । तापसी हे दोघेजण । संगें वनिता सुलक्षण ॥ ३ ॥ कवणाचीं कवणें ऐसीं । राजसें वेष तापसी । पुसोनियां पाहों यांसी

---

१ अजिंक्य. २ भाता.

॥ ४ ॥ दिनकर ह्मणे ऋषीवनिता । तटस्थ होऊनि चित्ता । पुसती करीं धरूनि सीता ॥ ५ ॥

राग पावक [ ७३

॥ ध्रु ० ॥ नभीं नभ जालें मन माझें । तेथें निरसोन गेलें माझें तुझें रे ॥ ध्रु ॥ नभ निश्चळ परब्रह्म । सर्वी सर्वातीत नित्य निःसीम ॥१॥ मन मायामय खंब्रह्मीं घारें । त्यासी उद्भवीं च लय विचारें रे ॥२॥ ह्मणे दिनेश मन उन्मन । या द्वैताचें हि नभीं कैंचें भान रे॥३

राग श्रीराग [ ७४

सकळ सारांचें सार । जेणें होये जगदोद्धार । तें हें त्रिभुवनीं थोर । नाम देवाचें ॥ १ ॥ ध्रु० ॥ नामें तुटे भवव्याधि । नामें नाशे देहबुद्धि । नामें घडे महासिद्धि । स्वरूपाची ॥ ध्रु ॥ गुरुकृपा घडे जरी । नामाचा विश्वास तरी । सहज तें निरंतरीं । उच्चारें वाचें ॥२॥ दिनकर ह्मणे अहं- । भाव नुरे सहित कोहं । अखंड वाचेसी सोहं । नामविचारें ॥ ३ ॥

[ ७५

न मानिसी भय भयंकराचें । विक्राळ स्वरूपाचें ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ कोठें त्याभीण जासी । त्रैलोक्य ज्याचे ग्रासीं ॥ ध्रु ॥ कल्पांत जो विधिहरिहरासी । पदार्थमात्र नाशी ॥ २ ॥ नाहीं दया अणुमात्र जयासी । स्वशक्तीं स्वयें त्रासी ॥ ३ ॥ दिनेश ह्मणे क्रूर कृतांतें दोषी। विनाश अष्टधेसीं ॥ ४ ॥

राग सोरठ [ ७६

अयोध्याधीश परमपुरुष माहाराज । जनकजापति विश्वमोहन योगबीज ॥१॥ ध्रु० ॥ धन्य धन्य कुळस्वामी ऐसा आह्मां पतितांचा ।

---

१ निश्चळ आकाशांत चंचळ वायु उत्पन्न होऊन पुन्हा जसा त्यांत च एकरूप होऊन मिळून जातो, तद्वत् निश्चळ परब्रह्मांतून मायामय मन उत्पन्न होतें; तरी तें विवेकानें उन्मन करावें ह्मणजे जेथून निघालें तेथेंच त्याचा लय करावा. २ भयंकर काळपुरुषाचें, मरणाचें. ३ त्याच्या भीतीनें. ४ यम. ५ पंचभूतें व त्रिगुण यांचा बनलेला जो हा जडदेह त्याचा.

ब्रह्मादिक नेणती अंत ना पार ज्याच्या स्वरूपाचा ॥ ध्रु ॥ वैकुंठनायक भुक्तिमुक्तिदायक नाममात्रें । तो न कळे काय करिल वर्णितां कीर्तिस्तोत्रें ॥ २ ॥ जयाचे अंकित शिवसनकादिक निरंतर । भज हि ह्मणती दास त्याचा ह्मणे दिनकर ॥ ३ ॥

राग सोरठ [ ७७

॥ ध्रु० ॥ येकादशीव्रत साधन विख्यात वैष्णवांचें । दुर्धर संसार नाशित पावत भाविकांचें ॥ ध्रु ॥ उद्धरिले बहु देहधारी जीव असंख्यात । जेणें वैकुंठनायक कैवल्यदायक संतोषत ॥ १ ॥ सहज रजकीण संसारदु:खें तधी उपवासी । तिच्या हातें चढे पतित विमान[2] ख्याति ऐसी ॥ २ ॥ साधन साक्षपें करितां जीव कैसे नुद्धरती । दिनकर ह्मणे धन्य तो वंश जेथें हरिभक्ति ॥ ३ ॥

[ ७८

वैष्णवजन भलता हि असो परी आवडे तो । उत्तमवर्ण परि शाक्त अनाचारी नावडे तो ॥ १ ॥ ध्रु ० ॥ देई देई देवा ऐसियांचा संगु क्षणभरी । जिवलग परी अवैष्णव नको कल्पवरी ॥ ध्रु ॥ दर्शनें जयांच्या सन्मार्ग वाढत चढोवाढीं । स्पर्शनें जयांच्या दिव्यदशास्थिति होत गाढी ॥ २ ॥ संभाषणें समाधान नि:संदेह सुख बाणे । ह्मणे दिनकर ऐसे ते वैष्णव देव जाणे ॥ ३ ॥

[ ७९

कोणाचें घरदार । कोणाचा संसार । वाउगा चि जोजार[4] । लागलासे रे ॥ कोणाचा आचार । कोणाचा विचार । नाथिला चि संचार । जडलासे रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ निजांचें निजधन । स्वस्वरूपशोधन । तयावीण बंधन । सर्व कांहीं रे ॥ ध्रु ॥ कोणाचें जनवन । कोणाचें त्रिभुवन । कोरडी च नागवणें । वैभवाची रे ॥ कोणासी काय कोण । होय आत्मबोधेंविण । दिनकरा निजखूण । रामदासीं ॥ २ ॥

---

१ नाना प्रकारचे भोग भोगण्याकरितां करावीं लागणारीं जीं कर्मे, त्या कर्मांपासून मुक्त करणारा. २ ही कथा भक्तिरहस्य प्रकरण १८ पानें ७५।७६ येथें आलेली आहे. ३ बळकट. ४ जंजाळ, खटपट. ५ बुडणूक.

[ ८०

संपत्तीच्या मौजें[1] माजसी कायी। लवलाहें आयुष्य चालिलें पाहीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ सावध सावध नरदेहा आलया। भज त्यासी जेथें जाय मूळमाया विलया ॥ छ ॥ अनादीच्या[2] मदें जीवा येथें चि गाजसी[3]। परि अंतकाळीं तप्त लोहभूमी भाजसी ॥ २ ॥ रायरंकपण अंतीं राहे सर्व संपदा। येकायेकीं जाणें सेखीं काळदंडें आपदा ॥ ३ ॥ मेल्यामागें सारखें चि जनवन आघवें। रांडापोरें रडती वैभवाच्या लाघवें ॥ ४ ॥ ह्मणे दिनकर अनुभवें अनुभवसी। तरि निजानंदसुख ये चि देहीं पावसी ॥ ५ ॥

राग वैराटिका

[ ८१

कां प्राण्या भुललासी। माझें माझें जल्पसी। अंतीं तूं कोणासी। नेसी संगें ॥ बाहातां लेंकासी। तो पुसे धनासी। नागउनी आह्मांसी। जासी कैसा ॥ १ ॥ ध्रु० ॥ प्राण्या होई सावधान। जों नाहीं आलें मरण। भजें नारायण। सोहंभावें ॥ छ ॥ पाहातां कांतेकडे। ते केंसांसाठीं रडे। या जनाचिये भिडे। न चले कांहीं ॥ पाप्याचिये पोटीं। नाहीं सुखदृष्टि। विरूपबोरांटी[4]। लागली पाठीं ॥ २ ॥ जावाई थोर थोर। ह्मणती कोपला शंकर। आमचा शनवार। अंतरला ॥ व्याही आणि विहिणी। रडती स्मशानीं।[5] आह्मा श्रावणसणीं। नेईल कोण ॥ ३ ॥ लेंकी घेती ऊर। पिटिती भूमीं शिर। न्हाण चोळी माहेर। गेलें आजि ॥ पणतु नातु सुना। ह्मणती नारायणा। आमच्या निर्वाणीं। तूं पावलासी ॥ ४ ॥ इष्टा मुत्र बळेंस[6]। टाकितां रात्रींदिस। खोंकितां झोंपेस। नेणों कधीं ॥ ऐसियें रडती। आपुल्याले स्वार्थी।

---

१ मस्तीनें. २ उत्पत्तिरहित जें परब्रह्म त्याच्या स्वरूपसादृश्यामुळें. ३ प्रताप गाजवतोस. ४ बोरांटीं=बोरीचे कांटे. कांटे अंगावर आले ह्मणजे जसें दुःख होतें, तशा तऱ्हेचें दुःख पतिनिधनानंतर कराव्या लागणाऱ्या विरूप चेहऱ्यामुळें आपणांस होईल, ह्मणून स्त्री रडत असते. ५ आह्मांला आतां घाणेरडें काम करावें लागणार, तेव्हां हें आमचें मरणच ओढवलें. ६ मुखनासिकादिमळ.

परी तुझी खंती । नलगे कोण्हां ॥ ५ ॥ जाणता जाणता । कां होसी नेणता । सोडिसी स्वहिता । विषयस्वार्थे ॥ संसार दुस्तर । त्यजीं हा अघोर । ह्मणे दिनकर । रामदास ॥ ६ ॥

राग व्याहागडा [ ८२

चित्त रंगलें गुरुपाईं । आतां भवभय नाहीं ॥ ध्रु० ॥ ऐसा अनुभव अगाधु । सरला संशयबाधु ॥ १ ॥ पाहाता पाहाणें पाहाविते । शमलें जेथिल तेथें ॥२॥ तन्मय स्वरूपीं दिनकर । न दिसे आपपर ॥३॥

राग सदर [ ८३

संतकृपेचें आखिलें । नव जाये पांगिलें ॥ १ ॥ ध्रु० ॥ सोडी अहंभाव निंदका । जासिल सेखीं नर्का ॥ ७ ॥ देव भक्तांचा साह्य-कारी । चहुं युगांमाझारीं ॥ २ ॥ कोठें निंदक तरला । देखिला ना ऐकिला ॥ ३ ॥ दुर्जनभंजन[3] गोविंद । वाहे चरणीं ब्रीद ॥ ४ ॥ दिन-कर करितसे करुणा । न वळे निंदक जाणा ॥ ५ ॥

राग सदर [ ८४

बहुतां सुकृतें नरदेहीं । येणें जालें पाहीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ सावध कारें कां रे सार्थक । सोडुनि विषय लेख ॥ ७ ॥ आयुष्य जातसे अमोलिक । न ये तें मोलें[4] देख ॥२॥ अवघीं सुखाचीं सोयरीं । देतिल येमपुरी ॥ ३ ॥ गेले थोर थोर अगणित । राहिलीं त्यांची मात ॥ ४ ॥ दिनकर सांगे मनोभावें । निंदसुरें नसावें ॥ ५ ॥

राग सदर [ ८५

माझें मजपासीं निजसुख । तें मी नेणे मूर्ख ॥ १ ॥ ध्रु ० ॥ धन्य सद्गुरुमाहाराज । दाखविलें निजचोर्ज[6] ॥ ७ ॥ करुं कां कुरवंडी देहाची । तरि हा देह त्याचा चि ॥ २ ॥ कांहीं न दिसे पाहातां । हारपली सोहंता ॥ ३ ॥ दिनकर ह्मणे हा नवलाव । गुरुकृपा अभिप्राव ॥ ४ ॥

---

१ नेमलेलें, ठरलेलें. २ विस्कळित. ३ भंजन ह्म० नाश करणारा. ४ पैसे देऊन. ५ झोंपेंत. ६ ज्ञान. चोजणें=जाणणें.

राग वैणव [ ८६

सुरवर ध्याती । मुनिगण गाती । शिवादिक वंदिती ॥ १ ॥ ध्रु ० ॥ श्रीरामकीर्ति ॥ छ ॥ श्रुति नेति नेति । अखंड वदती । शेषादिक वर्णिती ॥ २ ॥ दिनकर ह्मणे । ऐसी यांची स्थिति । स्मरणें चि उद्धरती ॥ ३ ॥

॥ पद ॥ [ ८७

॥ ध्रु० ॥ राम राम ह्मणे बापा । दुर्घट काळ होइल सोपा ॥छ॥ नाम घेतां नलगे मोल । नाम घेतां नलगे बळ । नाम घेतां नलगे शील । स्नान संध्या स्वधर्म ॥ १ ॥ नाम घेतां नलगे टाळी । नाम घेतां नलगे कळी । नाम घेतां नलगे बोली । देश अथवा विदेश ॥ २ ॥ नाम ध्यावें सर्वकाळ । नामीं नाहीं काळवेळ । विधिनिषेधाचें जाल । नामीं नलगे कांहीं ॥ ३ ॥ नाम जीवांचें जीवन । नाम सर्वांसी पावन । नाम नेणे उत्तम हीन । करी पूर्ण सर्वस्वें ॥४॥ दिनकर रामदास । भावें विनटे हरिनामास । निजानंदें सावकाश । जनीं वनीं विजनीं ॥ ५ ॥

॥ पद ॥ [ ८८

॥ ध्रु० ॥ रामा सार तुझें नाम । त्यावांचुनि अवघा भ्रम ॥छ॥ वेदशास्त्रें पुराणें । तीर्थें क्षेत्रें तपोवनें । विधिपूर्वक साधनें । आह्मां न लगती कांहीं ॥ १ ॥ नाना व्रतें उद्यापनें । तीर्थाटणें पुरश्चरणें । मंत्रयंत्रांचीं शोधनें । आह्मां न लगती कांहीं ॥ २ ॥ नाना मुद्रा ध्यानें जप । योग याग निग्रह तप । नाना मत्तांचे विक्षेप[1] । आह्मां न लगती कांहीं ॥ ३ ॥ निराधार उपोषणें । अथवा नेमेंसीं राहाणें । आगम निगम बोधणें[2] । आह्मां न लगती कांहीं ॥ ४ ॥ दिनकररामदास ह्मणे । नामेंवीण जें साधनें । तें जाण गतप्राणे । आह्मां न लगती कांहीं ॥ ५ ॥

---

१ घोटाळा, व्यग्रता. २ ( वेदशास्त्रांचें ) ज्ञान.

॥ पद ॥ [ ८९

जेव्हां देहाची निराश । तेव्हां भेटे तो परेश । आशापाशें जगदीश । लंघुनि जातसे गगनास ॥ १ ॥ ध्रु० ॥ सावध सावध संतांपाईं । स्वहिताचा लाहो घेईं ॥ छ ॥ जैसें भूसामाजीं कण । धुळीमाजीं लाभे रत्न । तैसें नरदेह जाण । प्राप्त जालेंसे निधान ॥ २ ॥ देह जोडिलासे मोलें । काळ ग्रासीतसे पळें पळें । आपें आप बुडविलें । विषयचोरीं नागविलें ॥ ३ ॥ देहीं वसे देहभाव । केविं साधे निरावेव[2] । कठिण मायेचें लाघव । मुक्त चि बद्ध जाले सर्व ॥ ४ ॥ ह्मणे दिनकर-रामदास । सोडुनि अधर्माची कास । भावें भजे जगदीश । वसे निज-पदीं सावकाश ॥ ५ ॥

राग भैरवी [ ९०

विषदाहें दाहिलें देह माझें । कां रे न द्रवे अंतर रामा तुझें । मानितोसि अनाथाचें कैसें वोझें । पदांबुजें । वीण दुजें । औषध मी न बुझें[3] ॥ १ ॥ ध्रु० ॥ देवा देवा दयासिंधु ये रे रामा । सुरनरमुनिजन-हरविश्रामा । अनाथांच्या हरिसी भवश्रमा । सुखधामा । पूर्णकामा । धांव पाव रे पुरुषोत्तमा ॥ छ ॥ पतितांसी कोण आहे तुजवेगळा । दीनबंधु नाम तुझें घननीळा । आतां किती पाहासी माझी लीळा । अवकळा । दुर्बळांला । कैसी राहे बिरुदमाळा ॥ २ ॥ ऐसे भेदतां हृदईं करुणाबाण । दयार्णव उचंबळला रघुनंदन । निवारिली भववेथाविष दारुण । समाधानें । वरदान । दिनकरा चिरंतन ॥ ३ ॥

राग भैरवी [ ९१

॥ ध्रु ० ॥ दीनबंधु येक वेळां यावें यावें । कृपादृष्टीं निजदासा अवलोकावें ॥ क्षणक्षणा परदेसीं सांभाळावें । नुपेक्षावें । प्रेम द्यावें । उपेक्षितां नुरे मी जीवें ॥ छ ॥ कायावाचामनेंसीं भाव सिद्धु । तुजवीण न सोसे दुजा वेधु ॥ किती धरूं धैर्यासी करुणासिंधु । कर्मरोधु । भवबाधु । वारीं वारीं रे देहसमंधु ॥ १ ॥ किती आतां पाहासी

---

१ छंद किंवा लाभ, २ निरवयव, निर्गुण परमात्मा, ३ जाणत नाहीं.

माझा अंत । अंतरात्मा साक्षी तूं भगवंत ॥ जाणसी तूं निश्चयें अंतर्हेत । माझें हित । तुझें उचित । दिनकर ह्मणे निभ्रांत ॥ २ ॥

॥ पद ॥ [ ९२

अयोध्यापुर नाम सुंदर शरयूतट पावन । कल्पवृक्षातळीं सावळें रूप राम हा जगजीवन । स्तविती सुर नर योगी भूधर ऋषि मुनि सिद्ध चारण । लीलाविग्रह पूर्ण पराक्रम त्रिदशबंदविमोचन ॥ ध्रु० ॥ खचितरत्नमुकुट मस्तकीं दिव्य तेज प्रकाशलें । गुंफिलीं कुरळीं सुपुष्पें भाळीं केशर दंडलें ॥ कस्तुरीवरी अक्षता रति कर्णीं तळपती कुंडलें । आकर्ण नेत्र विशाळ तीक्ष्ण पद्मपत्रसें रेखिलें ॥ १ ॥ व्यंकटें भ्रूमंडळें धनुष्याकृती अति सुंदरें । सरळ नासिक जोति निर्मळ तुळितां तुळण सरे ॥ पद्मराग सुरंग लंबित रंगला अधरांतरें । दंतकीळ हिरे अति हि दिव्य दीप्ति सुधांकुरें ॥ २ ॥ दुर्भवारि अभंग भंगित मिसुरा अधरावरि । चुबुकं सुंदर हनुवटीं रत स्मश्रुमंडित साजिरी ॥ श्रीमुखचंद्र विकास निर्मळ कोटिकाम न ये सरी । तृप्त भक्तचकोर लक्षित दुर्गतिविष वीसरीं ॥ ३ ॥ श्रीकंठ रेषत्रई विराजित शंखसादृश सुंदर । आजानुबाहु वितंडें विक्रम वैरीभार भवहर ॥ जडित रत्न सुकंकणें करीं बाहीं शोभति केयुर । रक्तरंग सुरंग रंगित सुंदर तळ श्रीकर ॥ ४ ॥ मुद्रिका सरळांगुळीं नख चंद्रज्योति प्रकाशलें । लाधतां वरहस्त मस्तकीं चकोरसंत सुखावले ॥ विशाळ वक्षस्थळाकृतिवरी रोमराजित त्रिवळें । नाभीं पद्मविकास निर्मळ जें विधी स्थळ लाधलें ॥ ५ ॥ कौस्तुभादिक भूषणें नवरत्नहार झळाळिती । वैजयंति सुगंधमाळ आपादयुक्त ते रुळती ॥ तुळसी कुसुमांकिता बहुरंग संग विराजती । पीत अंबर माळ गांठि सांनुमध्य मृगाकृती ॥ ६ ॥ उत्ताळ माळ विशाळ किंकिणि शोभाति कटिं मेखळें । पीतवास विशेष

---

१ शेष. २ देव. ३ हनुवटी. ४ अघटित, विशाळ. ५ वांकी, बाजूबंद ६ ब्रह्मदेवाला. ७ ( सानु=पल्लव ) माळेच्या दोन्ही पल्लवांच्या मध्यें. ८ तेजस्वी. ९ घुंगरु. १० कटिसूत्र, कडदोरा.

सोज्वळ दिव्यदीप्ति सोनसळा ॥ भानुचक्रसमान वर्तुळ जंघे[1] राजति निर्मळा । गुल्फ[3] वर्तुळ नीळ त्यावरि पोटऱ्या अति सरळा ॥ ७ ॥ चरण रंग सुरंग पंकज पद्म रागकळाहिन । वज्र सुध्वज पद्म अंकुश झळके चक्र सुलक्षण । ऊर्ध्वरेख सलक्षणें सरळांगुळीं नखलालन । धन्य ते जनी देखती शिरीं वंदिति पदभूषण ॥ ८ ॥ नूपुरें[4] वरि वांकि गर्जति दैत्य रुळति तोडरीं । पुष्पें वर्षति देव दुंदुभि वाद्यें वाजती अंबरीं । सूर्य सोम तटस्त वायु पशुखगादिक अंतरीं । चामरें करिं बंधु वारिती आदरें श्रीमुखावरी ॥ ९ ॥ लक्षणांकित जानकी उभि वामभागिं सतन्मया । सुग्रिवादिक वानरेश्वर नेति राक्षस जे लया ॥ बिभिषणादिक राक्षसेश्वर वर्णिती रघुराजया । भीम सन्मुख जोडलाकरिं नाम गर्जत सावया ॥ १० ॥ जडित रत्नखचित आसन त्यावरी प्रभु शोभतो । रंग लाल गुलाल धूशर गंध गर्द विराजतो ॥ जयति जय श्री रामनामें ब्रह्मगोळ हि गाजतो । दिनकरा जनिं भाग्य अद्भुत राम दासिं कृपाळ तो ॥ ११ ॥

राग कामोद [९३

नरदेहा येऊनीयां । विषयसुख मानीलें ॥ उगंडेनां[5] लोभाहार्ती । जीणें सत्य भाविलें ॥ परि नेणे घडिघडी । काळें आयुष्य नेलें ॥ मोहमदिरा सेविलासे । हित नेणे आपुलें ॥१॥ ऐसा प्राणी मूढमती । काय सांगों नवलाव ॥ अल्पासाठीं थोर हानी । अंतरीला भगवद्भाव ॥ ध्रु ॥ आपुलें हित नेणे । न पुसे भल्यांसी ॥ न पाहे वेदशास्त्र । न करी श्रवण पुराणासी ॥ देव धर्म व्रत तीर्थ । नेणे नित्यकर्मासी ॥ तथापी हि करीं कांहीं । तरि संपादीं लोकिकासी ॥ २ ॥ प्रपंच संपादीतां । सर्वां ठाईं सादर ॥ उणें चि पडों नेदी । जेथें तेथें तत्पर ॥ ऐश्या योगें वय गेलें । मृत्य आला मारेंमार ॥ बांधोनीयां येमदूतीं । नेतां विपत्ति थोर ॥ ३ ॥ जैसें करी तैसें पावे । यासी संदेह नाहीं ॥ भोगलें चि

१ जंघा=मांडी. २ प्रकाशती. ३ घोंटा. ४ पैंजण. ५ उगंडु=सुटका, बहिर्गमन.

नर्के भोगी । वासनेच्या प्रवाहीं ॥ दिनकर ह्मणे थोर । नवल नरदेहीं ॥ येऊनीयां हानी केली । भगवद्भजनेंवीण पाहीं ॥ ४ ॥

राग सदर [ ९४

असंख्यात देह पाहें । येकयेके योनीप्रती ॥ त्यांची संख्या कोण करी । नाना जीव नाना व्यक्ति ॥ चर्फडिती अहंकारें । तेथें कैंची आत्मस्थिति ॥ नरदेहावांचुनीयां । न चुके पुनरावृत्ति ॥ १ ॥ ध्रु० ॥ ह्मणोनि धन्य नरदेह । तयामाजीं ब्राह्मण ॥ कायावाचामनोभावें । भगवद्भजनीं सुलीन ॥ वर्णाश्रम रक्षुनीयां । सत्स्वरूपीं निमग्न ॥ थोरांमाजीं थोर तो चि । त्रिभुवनीं परिछिन्न ॥ छ ॥ तरोनि तारी सर्व जीवां । ऐसा थोरांहूनि थोर ॥ पुराणें महिमा ज्याची । वर्णिती अपार ॥ तयालागीं पावोनीयां । न करी स्वहितविचार ॥ पतित तो चि महापापी । दुष्ट दुरात्मा पामर ॥ २ ॥ सूर्याचीया रथावरी । असोनि नेणें आंधळा ॥ तैसा प्राणी नरदेहीं । विषयसुखें लोधला ॥ तेणें नेणें स्वतसिद्ध । आत्माराम भरला ॥ दिनकर ह्मणे मूर्ख । अमृतकुंडामाजीं मेला ॥ ३ ॥

राग पावक [ ९५

गुरु देव सकळ देवांचा । गुरु राव सकळ तीर्थांचा । गुरु शिव सकळ शिवांचा । गुरु जीव सकळ जीवांचा रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ गुरुसमान दुसरें नाहीं । ज्याचे कृपेमाजीं मोक्ष पाहीं रे ॥ छ ॥ गुरु पावन पतितांचा । गुरु नाथ अनाथांचा । गुरु तारक सद्विद्येचा । गुरु मारक अविद्येचा रे ॥ २ ॥ गुरु चैतन्य चैतन्याचें । गुरु जीवन सत्रावीचें[1] । गुरु माहेर विश्रांतीचें । गुरु सौख्य स्वसुखाचें रे ॥ ३ ॥ गुरु सत्व शुद्धसत्वाचें । गुरु कारण माहाकारणाचें । गुरु स्वरूप उन्मनाचें । गुरु ज्ञान विज्ञानाचें रे ॥ ४ ॥ गुरु माउली निजदासांची । गुरु अवधि[2] गुणसाम्येची[3] । गुरु साउली शांतिदशेची । गुरु उपाधि[4] दिनकराची रे ॥ ५ ॥

---

१ जीवनकलेचें. २ अंत, समाप्ति. ३ मायेची. ४ खूण, पदवी.

राग पावक [ ९६

हेत गोपाळ ह्मणती कान्हा । आह्मी नयों बा तुझिया राना । तेथें चारा न दिसे गोधना । थितें[1] दुबतें आटे सज्ञाना रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ कान्होबा नको तुझी संगती । आह्मी वागों आपुलाल्या मतीं रे ॥ छ ॥ कान्हो यमुनेचे परपार । नयनीं पाहातां अति दुस्तर । तेथें वससी तूं निरंतर । तेथुनि नव्हे आह्मां येरझार रे ॥ २ ॥ आह्मी दुर्बळें तुझे गोकुळीं । वसों जैसीं तैसीं ममतामेळीं । गाई चारूं यमुनापाबेळीं[2] । त्या दुभती आह्मां चुळचुळी रे ॥ ३ ॥ तें दूध लागे गोड भारी । तेथें गुंतली आशा मुरारी । म्हुण[3] गाई चारूं आह्मी गांवखेरीं[4] । तेणें गुणें माउली कृपा करी रे ॥ ४ ॥ हट करीतां गोपाळांसी । कान्हो गांठि घालि काठिकांबळीसी । गाई वळिल्या उर्ध्वरानासी । दिनकर शरण रामदासीं रे ॥ ५ ॥

राग पावक [ ९७

कृष्णा वासनेची गुळपोळी । वरि आशाशाक होती ठेविली । ममताखिचडी बरी वनमाळी । माझी लपविली अविद्येची जाळी रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ घननीळा देखिलें थोर नवल । तुझे संगतीचें कोण आम्हां फळ रे ॥ छ ॥ देवा वेणु माझा सुंदर । नादें त्रैलोक्य करी निर्भर । तो तां ठेविला शब्द गंभीर । सेखीं नेदिसी बोलों उत्तर रे ॥ २ ॥ कान्हो दुभत्या गाई अकरा । त्या तां नेल्या रे आपुल्या घरा । आम्हां गोविलें तां दातारा । घरिं कुसुमुसि मोहम्हातारा रे ॥ ३ ॥ कृष्णा कल्पना कल्पघोंगडी । येकायेकिं तां कशि आसुडिली । निजवृत्तीचि वेटोटि[6] भली । ते तां आपुलां करीं धरिली रे ॥ ४ ॥ ऐसा कैसा तूं आम्हां जोडलासी । कैसें आंकळिलें[8] गाईगोवळांसी । दृश्य दुजेपणें पाहों नेदिसी । आम्हीं काय केलें सांग हृषिकेशी रे ॥ ५ ॥ पूर्वकर्मासि कान्हो नाहिं पार । कैसें लाविलें तां आम्हांसी पर । धन्य

१ असलेलें. २ पाबळ=झरा. ३ ह्मणून. ४ गांव+आखरीं=गांवच्या लगतची जागा. ५ मनासहित दशेंद्रियें. ६ ओढली. ७ वेष्टण. ८ आटोपिलें.

तुझे ठाईं तूं चि येक थोर । ये-हवीं बोलों नेंदूं तुज उत्तर रे ॥ ६ ॥ ऐसे ऐकतां शब्द श्रवणीं । अति सप्रेम सारंगपाणी । गोवळ आळंगिले सुखसमाधानीं । मिठि पडली दोघेंविण जनीं रे ॥ ७ ॥ स्वामी कृपाळु निजदासांस । त्यांची मायामात्रा[1] हरी निःशेष । आपण न माये[2] कोठें सावकाश । ह्मणे दिनकररामींरामदास रे ॥ ८ ॥

राग सदर [ ९८

रामा रामा रामा जय रामा । आह्मां वंचिसि[3] कां मेघश्यामा । तुझे संगतीची न करवे सीमा । तो तूं ह्मणसी जा निजग्रामा रे ॥१॥ ध्रु०॥ रामा कृपादृष्टि आह्मां पाहें । तुझा वियोग क्षण न साहे रे ॥छ॥ रामा ब्रह्मादिक इच्छिति सेवा । ध्यानिं नातुडसि[4] क्षणयेक शिवा । तो तूं रात्रीदिस आह्मांमाजीं देवा । आह्मी जैसे तैसा होसि राघवा रे ॥२॥ इंद्रादिक त्रिदश देवकोटी । तुझे भेटीलागीं होति हिंपुटी । तो तूं अखंड आमुचिये दिठीं[5] । रळिया[6] करितां हांससि जगजेठी रे ॥ ३ ॥ रामा दुर्लभ तुझिया गोठी । ऐकतां आनंदु न समाय पोटीं । हर्षें वाटे धरावी हनुवटी । ऐसे सुखीं न थारों करंटीं रे ॥४॥ देवा दाखऊं तुज वांकुल्या । पाठिंपोटीं करूं गुदगुल्या । त्या तां आल्हादोनिं पोटिं घातल्या । पुढें पुराणांमाजि रूढविल्या रे ॥ ५ ॥ आह्मी वान्नरें हीन पामरें । काय जाणों तूज गव्हारें[7] । बोलों श्लाघ्यंता[8] तुजसी बा रे । क्षमा करीं तुझे अपराधी खरे रे ॥ ६ ॥ ऐसें प्रयाणकाळिं कपिगण । प्रेमें करिती घोर रुदन । नित्य आठवे स्नेहाचें लक्षण । आतां उदास केलें रामें मन रे ॥ ७ ॥ राम आश्वासुनि सकळांसी बोले । आह्मीं थोर तुह्मांलागीं कष्टविलें । तें बोलतां न ये कांहीं बोलें । आतां स्वार होणें आपुलाल्या मेळें रे ॥ ८ ॥ प्रेमसद्भाव देउनि सकळांसी । रामें बोळविलें कपिकूळांसी । पुढें आश्वासिलें वायूसुतासी । दिनकर शरण रामदासीं रे ॥ ९ ॥

---

१ मालमत्ता. २ मावे. ३ फसवतोस. ४ सांपडत नाहींस. ५ दृष्टीस. ६ क्रीडा. ७ मूर्ख. ८ योग्यता.

राग कामोद [ ९९

॥ धृ० ॥ रामा ये रामराया ये ॥ छ ॥ जनीं वनीं नाहीं कोण्ही । तुजवांचूनि मनीं नयनीं ॥ १ ॥ गणगोत माता तात । तूं चि माझें चित्त वित्त ॥ २ ॥ तुजवीण दुजी खूण । नेणें अणुमात्र जाण ॥ ३ ॥ कायावाचामनोभावें । अखंड सुखी तुझ्या नांवें ॥ ४ ॥ तुजवीण निरंतर । दिनकरा कैंची थार ॥ ५ ॥

राग कामोद [ १००

अज्ञानें नाश केला । जीव पतित जाला । स्वहित पळेंपळ । हारवीत चालिला ॥१॥ धृ० ॥ त्राहे त्राहे जानकीशा । नरदेहीं ऐसी दशा । इतरांची मात कोण । सांगों जातां दुर्दशा ॥छ॥ आशेचीं शृंकळा पाहीं । जंजेरिलीस पाईं । मोहपाश कंठीं दृढ । पडिलासे सांगों काई ॥ २ ॥ हातखोडा संकल्पाचा । मोठा आटे तयाचा । काढूनि वेगळा नेव्हे । ऐसा बद्ध अविद्येचा ॥३॥ संसाराचे बंदिखानीं । अहंकाराची दाटणी । दिनकर म्हणे परी । हाकारीनों चापपाणी ॥ ४ ॥

[ १०१

॥ धृ० ॥ सकळ कल्याण आमचें । नित्य चिंतन रामाचें ॥छ॥ प्रसाद हा चि संतांचा । दिधला जिव्हाळा प्रेमाचा । सरतों जालों कायावाचा । जनीं वनीं विजनीं ॥ १ ॥ निसंदेह जालों देहीं । संदेहासी ठाव नाहीं । भव विभव कैंचें काई । नित्य मुक्त वर्ततां ॥ २ ॥ दिनकर ह्मणे रामदास । भाग्यें भेटले आह्मांस । सुखी केलें सावकाश । निजानंद देउनी ॥ ३ ॥

राग कामोद [ १०२

॥ धृ ० ॥ दीनदयाळ रघूत्तम रे रघूत्तम रे । तारित हीनकुळोत्तम रे ॥ छ ॥ गौतमश्रापशिळा चरणें शिळा चरणें । उद्धरिली तनु दिव्यपणें ॥ १ ॥ बंदविमोच्यनँ सूरवरां सूरवरां । तारियेलें दीना दीनकरा ॥ २ ॥

---

१ जंजिरी=लहान साखळी. २ वळसा. ३ न होये. ४ मोठ्यानें ओरडून बोलावीत नाहीं. ५ कृतकृत्य. ६ गौतमाच्या शापानें त्याची स्त्री अहल्या शिळा होऊन पडली होती. ७ श्रीरामानें रावणाच्या बंदींतून देवांना मुक्त केलें.

[ १०३

राग सदर

हरि हरि हरि हरि हरि रे। हरि हरि रे। आवडि लागलि परोपरीं रे ॥ छ ॥ नावडे धन जन ममता माया रे। ममता माया रे। रातलें मानस रामपायां रे ॥ १ ॥ रामेंविण जनवन कैसें रे। जन कैसें रे। स्मशानीचें प्रेत तैसें भासे रे ॥ २ ॥ मानस रंगलें रामरूपें रे। रामरूपें रे। दिनकरा कैवल्यसुख सोंपें रे ॥ ३ ॥

[ १०४

राग सदर

॥ धृ० ॥ राम राम राम राम राम रे। राम राम रे। सदाशिव स्मरे मोक्षधाम रे ॥छ॥ देव देव देव देव देव रे। देव देव रे। अकळ न कळे याची माव रे ॥ १ ॥ धन्य धन्य धन्य धन्य लीळा रे। धन्य लीळा रे। सागरीं तारिल्या चंड शिळा रे ॥२॥ करिती सुरवर जयजयकार रे। जयजयकार रे। रामनामें केला जगदोद्धार रे ॥ ३ ॥ दिनकर रामीं रामदासीं रे। रामदासीं रे। अखंड शरण तनुमनेंसीं रे ॥४

[ १०५

राग सदर

अंधकारें सूर्य जाजावला[१] रे। जाजावला रे। मृगजळें मेरु वाहावला रे ॥ १ ॥ धृ० ॥ तैसा आत्मा बद्ध देहभावें रे। देहभावें रे। क्षणक्षणा जन्ममृत्यु पावे रे ॥ १ ॥ थिल्लरीं बुडाला निशापती रे। निशापती रे। बागुलें भक्षिला काळरातीं रे ॥ २ ॥ राणीनें गन्हवार केला राजा रे। केला राजा रे। कानावाटा व्याला सर्व प्रजा रे ॥३॥ नपुंशकें राखियेली रंभा रे। राखियेली रंभा रे। वारियानें धीर दिल्हा नभा रे ॥ ४ ॥ नाथिलें कौतुक कैसें भासे रे। कैसें भासे रे। दिनकरा सर्व अनारिसें रे ॥ ५ ॥

[ १०६

॥ धृ० ॥ नाथिलें शमलें सद्गुरुबोधें ॥ छ ॥ आपपर कांहीं न भासे नयनीं। नवल थोर जालें ॥ १ ॥ काय सांगों कवणांप्रति

---

१ रत झालें. २ ग्रासला. ३ डबक्यांत. ४ चंद्र. ५ बागुलबोवानें. ६ अमावास्येच्या रात्रीं. ७ वेगळें.

कैसें । अनु ही न उरलें ॥ २ ॥ दिनकर स्वरूपीं तन्मय योगें । योग वियोग सरलें ॥ ३ ॥

राग कामोद [ १०७

मनोवाचाकरणीं विनटलों पाईं । विनटलों पाईं । शरणागतरक्षका पाहातोसी काई ॥१॥ ध्रु० ॥ धाव धाव धाव आतां पुरली मर्यादा । पुरली मर्यादा । पतितपावन ह्मणवीसी सांभाळीं ब्रीदा ॥छ॥ धेनुवीण वछ जैसें आक्रंदे घरीं । आक्रंदे घरीं । तैसें तुझें दीन रामा पडिलें अघोरीं[1] ॥ २ ॥ नको पुरला अंत देवा पावें निदाना । पावें निदाना । दिनकर दीन अंतीं लाज हे कोणा ॥ ३ ॥

राग सदर [ १०८

धन्य शरयुतीर धन्य अयोध्यापुरी । धन्य अयोध्यापुरी । धन्य जनवन जेथें नांदे श्रीहरी ॥ १ ॥ ध्रु० ॥ धन्य ते कौसल्या हृदईं नांदे रघुवीर । हृदईं नांदे रघुवीर । त्रैलोक्याचा बाप ह्मणवी दशरथकुमर ॥छ॥ धन्य ज्या नरनारी नयनीं पाहाती श्रीराम । पाहाती श्रीराम । धन्य सेवकजन ज्यांसी अखंड विश्राम ॥ २ ॥ धन्य जे जडजीव रामीं रंगले भावें । रंगले भावें । धन्य दिनकर रामदासी स्वभावें ॥ ३ ॥

राग सदर [ १०९

बाळाचे अपराध माता पाहेल जेव्हां । माता पाहेल जेव्हां । कोणाचा आश्रयो तान्हें धरील तेव्हां ॥ १ ॥ ध्रु० ॥ तैसें तुझें दीन रामा अव्हेरीं सुखें । रामा अव्हेरीं सुखें । परी तुजवीण दुजें आणिक नोळखे ॥ छ ॥ ध्वजेचें चिरकुट[2] राजा न राखे जरी । राजा न राखे जरी । तेव्हां राज्यभार राहे कवणिये परीं ॥ २ ॥ सावध स्वामी दीनानाथा वचन अवधारीं । वचन अवधारीं । दिनकरा अव्हेरितां होईल हे परी ॥ ३ ॥

---

१ या ठिकाणीं ' घोरीं '=काळजींत, या अर्थानेंच ' अघोरीं ' शब्द वापरला आहे. २ राष्ट्राचें निशाण.

राग सदर [ ११०

मकरंद नोसोडी जैसा कमळकळिका । जैसा कमळकळिका । तैसा न विसंबे आम्हां रघुकुळटीळका ॥ १ ॥ अनुमानें उपेक्षीना प्रभा मयंका । प्रभा मयंका । तैसा न विसंबे आम्हां रघुकुळटीळका ॥ २ ॥ म्हणे दिनकर नटकी गोडी उदका । गोडी उदका । तैसा न विसंबे आम्हां रघुकुळटीळका ॥ ३ ॥

राग सदर [ १११

मीनांचे अपराध उदक पाहेल जधीं । उदक पाहेल जधीं । कैसें घडे साजीवपण विचारीं तधीं ॥ १ ॥ धृ० ॥ तैसें तूं जीवन रामा भक्तजनाचें । रामा भक्तजनाचें । उपेक्षितां येश स्वामी नासे कोणाचें ॥ छ ॥ चकोरां निराश चंद्र करील जेव्हां । करील जेव्हां । सजीव कीं निर्जीव रामा पाहें तें तेव्हां ॥ २ ॥ घन पावकधारा वर्षे चातकांवरी । चातकांवरी । दिनकर ह्मणे रामा कोणासी हारी ॥ ३ ॥

[ ११२

रामा माझा वर्णाश्रम । राम माझा निजधर्म । राम माझें नित्य-कर्म । नैमित्यादिक ॥ १ ॥ ध्रु० ॥ रामेंवीण जनवन । न दिसे भिन्नाभिन्न । रामें निजानंद पूर्ण । परिपूर्णत्वें ॥ छ ॥ राम माझा आश्रम । राम माझा विश्राम । राम माझा कुळक्रम । समूळीहुनी ॥ २ ॥ राम माझा आचार । राम माझा विचार । राम माझा साचार । संशयातीत ॥ ३ ॥ राम माझा पिता भ्राता । गोत्रगण तत्वता । इष्टमित्र सर्वथा । सुहृद राम ॥ ४ ॥ राम माझी माउली । सबाह्यत्वें सांभाळी । राम माझी साउली । सदोदित ॥ ५ ॥ राम माझा जप तप । राम माझा साक्षेप । राम माझा अमूप । सर्वी सर्व ॥ ६ ॥ राम माझा भावार्थ । राम माझा परमार्थ । दिनकरा यथार्थ । सर्वत्र राम ॥ ७ ॥

---

१ पुष्परस, सुवास. २ चंद्राला. ३ सोडीत नाहीं. ४ माशाचे. ५ चातकांवर मेघ जलाऐवजीं अग्नीची वृष्टि करतील तर.

[ ११३

सकळ हें जाईजणें । वैभव सुखाचें लेणें । सोडुनि लाजिरवाणें । जाईजे सेखीं ॥१॥धृ०॥ काय रे निस्तुरा जीवा । सोडूनियां रामसेवा । प्रपंच काबाड धावा । करिसी किती ॥ छ ॥ धन जन कामिनी । पुत्र मित्र निदानीं । राहाती सकळें सांडुनी । तुज स्मशानीं ॥ २ ॥ सर्व हि घरिंचा घरीं । वैभव संपत्ति बरी । राहिली येकलें निर्धारीं । जाणें कर्मवरी ॥ ३ ॥ नरदेहा ऐसा वास । होतां महा अप्रयास । तो हि केला विषयदास । पढतमूर्खीं ॥ ४ ॥ जे जे प्राणी रामेंविण । जीतां चि प्रेतासमान । दिनकरा नाहीं भूषण । राघवेंविण ॥ ५ ॥

राग सौरी [ ११४

विषयांचा संग बाई तोडीं लागवेगें । बाई तोडीं लागवेगें ॥ येकायेकीं साध्य साधीं सद्गुरुच्या संगें । बाई सद्गुरुच्या संगें ॥ छ ॥ वैभव संपत्ति देह जाइजणें जाणें । जाइजणें जाणें ॥ शाश्वत धरील याचें तें चि जाण सुणें । बाई ॥ १ ॥ अविद्याजनित सर्व आहे नाशिवंत । आहे नाशिवंत ॥ सद्गुरूच्या बोधें निजरूपिं लावि हेत । बाई ॥ २ ॥ आयुष्यभानु जव अस्त जाला नाहीं । अस्त जाला नाहीं । म्हणे दिनकर तव स्वरूपगांवा जाई ॥ ३ ॥

राग कामोद [ ११५

नेणें तीर्थ देव धर्म क्रिया कर्म कांहीं । पोटासाठीं जग नाडितां विचारिलें नाहीं ॥ १ ॥ धृ० ॥ रामेंवीण व्यर्थ जिणें जालें ये जनीं । नानापरीं देह पोसिलें आगीसें धनी ॥ छ ॥ श्रुति शास्त्रें पुराणें दूषिलीं मनें । सारासार विचार कांहीं भूतदया न मने ॥ २ ॥ साधुसंत भक्तवृंदें निंदिलीं द्वेषें । अणुमात्र न ये कांटाळा कीजे आतां कैसें ॥ ३ ॥ हरिकथा योगयाग स्वार्थें बुडविलें । विषयकामें सिंतरेलें पापपुण्य न कळे ॥ ४ ॥ दिनकरा रामदासीं ऐक्य साधलें । तयावीण व्यर्थ प्राणी भूमिभार जाले ॥ ५ ॥

---

१ निसुरा, निश्चिंत. २ शुनक, कुत्रें; 'वेडें' या अर्थी. ३ इच्छा, कल्पना, कामना इत्यादि. ४ शेवटच्या अग्निसंस्कारास. ५ झकविलें, फसविलें.

[ ११६

पंचभूतात्मक देह जायिजणें । ऐसें जाणानि जल्पसी अहंपणें रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ अहं कोहं हें सोडूनि सोहं साधीं । तेथें जडे अखंडता स्वरूपीं बुद्धि रे !! छ ॥ नरदेहासी आलियां नाना मतें । सांडीं साधीं आत्मज्ञान रिझें[1] तेथें रे ॥ २ ॥ दिनकर रामदासीं ऐक्यतेसीं रे । ब्रह्मीं ब्रह्मांड हें मिथ्या अनुभवेसीं रे ॥ ३ ॥

नाम येकताळ [ ११७

जय जय राम निजानंदकारणा । निजानंदकारणा । सीतापति कृपाळुवा भक्तरंजना ॥ १ ॥ धृ० ॥ जय जय रामा । रे मेघश्यामा रे ॥ छ ॥ सुरवररक्षणा रामा असुरमर्दना । गुणातीता रघुनाथा मुनिजनभूषणा ॥ २ ॥ दशरथतनुजा रामा निशिचरकंदना । रामा निशिचरकंदना । रामा रामा रामा रामा शंकरचिंतना ॥ ३ ॥ जानकीजीवना रामा भवभयछेदना । दयानिधी दीनानाथा पतितपावना ॥ ४ ॥ पुराणपुरुषा पुरातना बिभीषणसज्जना । सागरबद्धन अहिल्यातारण वाळीभेदना ॥ ५ ॥ करुणाकरा दीनबंधु रविकुळमंडणा । कौसल्यानंदना रामा दशमुखखंडना ॥ ६ ॥ अनंतजीवतारका रामा वनचरतोषना । रामा वनचरतोषना । रामा रामा रामा रामा दिनकररंजना ॥ ७ ॥

नाम येकताळ [ ११८

॥ धृ० ॥ देवो देवो रे । रामरावो रे । सकळ जीवांचा तरणोपावो रे ॥ छ ॥ दीनबंधू रे । कृपासिंधू रे । मुनिजनामनीं नित्य वेधू रे ॥ १ ॥ माहाराज रे निजबीज रे । अवतरोनि केलें देवकाज रे ॥ २ ॥ परात्परू रे । योगेश्वरू रे । क्षराक्षरातीता निर्विकारू रे ॥ ३ ॥ मोक्षधामा रे । सुरविश्रामा रे । आठवे मानसीं निजनिष्कामा रे ॥ ४ ॥ परिपूर्णा रे । रघुनंदना रे । दिनकर वंदी चरणा रे ॥ ५ ॥

---

1 आनंदित अगर समाधान मानून रहा.

[ ११९

सावध होणें सावधपणें । सावधपणें निजसुख घेणें ॥ ध्रु ॥ विषयाचें सुख स्वप्नीं हि खोटें । जागृतीसी तें केवीं होइल गोमटें ॥१॥ शिवादिक ज्या सुखें लाविलें वेढा । सेवितां तें चि तूं केवि सुटसि मूढा ॥ २ ॥ दिनकररामींरामदास ह्मणे । सद्गुरुभजनें निजसुख बाणे ॥ ३ ॥

[ १२०

होतें होणें सरलें ठाईं । दृष्टि पडतां सद्गुरुपाईं ॥ ध्रु ॥ जीवीं जीवित्व नाठवे जीवा । शिवीं शिवत्व कैंचें शिवा ॥ १ ॥ गतिमतीची खुंटली बोली । वृत्ति निवृत्ति तटस्त ठेली ॥ २ ॥ दिनकररामींरामदास । हें हि नुरे चि निशेष ॥ ३ ॥

राग अहेरी [ १२१

अंतीं काळ व्याकुळ पाडिल जेव्हां । काकुलती पाहाणें सर्वांसी तेव्हां । दारा सुत गणगोत रडतीं मावां । शोका हातीं न वेचिती धर्मासी केवां ॥ १ ॥ धृ० ॥ घडी घडी आयुष्य गेलें हातीचें । क्षणक्षणा न विसंबे जीवन जीवाचें ॥ ध्रु ॥ अनंत जन्में जोडी जेव्हां पुण्याची जोडे । तरी च प्राण्या नरदेहीं वास्तव्य घडे । तेथ हि आलीयां प्रपंच-सांकडें । निशंक कैसा नाचसी विषयांच्या कोंडें ॥ २ ॥ ऐसे आकल्पवरी विषय सेवीतां । इंद्राऐसी संपत्ति प्रपंचीं वाहातां । तिळातुल्य संतोष न बाणे चित्ता । दिनकरा रामदासीं साध्य तत्वता ॥ ३ ॥

राग अहेरी [ १२२

पावन पावन पावन रे । नरदेहाऐसें हातीं निधान रे । विषयांच्या भरें तें हि केलें हीन रे । अंतीं जाणें येकलें सुख कोण रे ॥ १ ॥ धृ० ॥ सावध सावध सावध रे । आला आला आला मृत्यु सन्नीध रे ॥ ध्रु ॥ राज्य देश धन जन जाईजणें । वैभवाचें आंखिलें सर्व जाणें । यां देखतां काळचोर घेईल घेणें । तयासाठीं स्मशानवरी

1 लटिकेंपणें, खोटें. २ पाड, थोरीव, ३ नफा. ४ कौतुकानें.

[ ११६

पंचभूतात्मक देह जायिजणें । ऐसें जाणानि जल्पसी अहंपणें रे ॥ १ ॥ ध्रु० ॥ अहं कोहं हें सोडूनि सोहं साधीं । तेथें जडे अखंडता स्वरूपीं बुद्धि रे ॥ ध्रु ॥ नरदेहासी आलियां नाना मत्तें । सांडीं साधीं आत्मज्ञान रिझें[1] तेथें रे ॥ २ ॥ दिनकर रामदासीं ऐक्यतेसीं रे । ब्रह्मीं ब्रह्मांड हें मिथ्या अनुभवेसीं रे ॥ ३ ॥

नाम येकताळ [ ११७

जय जय राम निजानंदकारणा । निजानंदकारणा । सीतापति कृपाळुवा भक्तरंजना ॥ १ ॥ धृ० ॥ जय जय रामा । रे मेघश्यामा रे ॥ ध्रु ॥ सुरवररक्षणा रामा असुरमर्दना । गुणातीता रघुनाथा मुनिजनभूषणा ॥ २ ॥ दशरथतनुजा रामा निशिचरकंदना । रामा निशिचरकंदना । रामा रामा रामा रामा शंकरचिंतना ॥ ३ ॥ जानकीजीवना रामा भवभयछेदना । दयानिधी दीनानाथा पतितपावना ॥ ४ ॥ पुराणपुरुषा पुरातना बिभीषणसज्जना । सागरबद्धन अहिल्यातारण वाळीभेदना ॥ ५ ॥ करुणाकरा दीनबंधु रविकुळमंडणा । कौसल्यानंदना रामा दशमुखखंडना ॥ ६ ॥ अनंतजीवतारका रामा वनचरतोषना । रामा वनचरतोषना । रामा रामा रामा रामा दिनकररंजना ॥ ७ ॥

नाम येकताळ [ ११८

॥ धृ० ॥ देवो देवो रे । रामरावो रे । सकळ जीवांचा तरणोपावो रे ॥ ध्रु ॥ दीनबंधू रे । कृपासिंधू रे । मुनिजनामनीं नित्य वेधू रे ॥ १ ॥ माहाराज रे निजबीज रे । अवतरोनि केलें देवकाज रे ॥ २ ॥ परात्परू रे । योगेश्वरू रे । क्षराक्षरातीता निर्विकारू रे ॥ ३ ॥ मोक्षधामा रे । सुरविश्रामा रे । आठवे मानसीं निजनिष्कामा रे ॥ ४ ॥ परिपूर्णा रे । रघुनंदना रे । दिनकर वंदी चरणा रे ॥ ५ ॥

---

१ आनंदित अगर समाधान मानून रहा.

[ ११९

सावध होणें सावधपणें । सावधपणें निजसुख घेणें ॥ ध्रु ॥ विषयाचें सुख स्वप्नीं हि खोटें । जागृतीसी तें केवीं होइल गोमटें ॥१॥ शिवादिक ज्या सुखें लाविलें वेढां । सेवितां तें चि तूं केवि सुटसि मूढा ॥ २ ॥ दिनकररामींरामदास ह्मणे । सद्गुरुभजनें निजसुख बाणे ॥ ३ ॥

[ १२०

होतें होणें सरलें ठाईं । दृष्टि पडतां सद्गुरुपाईं ॥ ध्रु ॥ जीवीं जीवित्व नाठवे जीवा । शिवीं शिवत्व कैंचें शिवा ॥ १ ॥ गतिमतीची खुंटली बोली । वृत्ति निवृत्ति तटस्त ठेली ॥ २ ॥ दिनकररामींरामदास । हें हि तुरे चि निशेष ॥ ३ ॥

राग अहेरी [ १२१

अंतीं काळ व्याकुळ पाडिल जेव्हां । काकुलती पाहाणें सर्वांसी तेव्हां । दारा सुत गणगोत रडती मावा । शोका हातीं न वेचिती धर्मासी केवा ॥ १ ॥ धृ० ॥ घडी घडी आयुष्य गेलें हातीचें । क्षणक्षणा न विसंबे जीवन जीवाचें ॥ ध्रु ॥ अनंत जन्में जोडी जेव्हां पुण्याची जोडे । तरी च प्राण्या नरदेहीं वास्तव्य घडे । तेथ हि आलीयां प्रपंच-सांकडें । निशंक कैसा नाचसी विषयांच्या कोडें ॥ २ ॥ ऐसे आकल्पवरी विषय सेवीतां । इंद्राऐसी संपत्ति प्रपंचीं वाहातां । तिळातुल्य संतोष न बाणे चित्ता । दिनकरा रामदासीं साध्य तत्वता ॥ ३ ॥

राग अहेरी [ १२२

पावन पावन पावन रे । नरदेहाऐसें हातीं निधान रे । विषयांच्या भरें तें हि केलें हीन रे । अंतीं जाणें येकलें सुख कोण रे ॥ १ ॥ धृ० ॥ सावध सावध सावध रे । आला आला आला मृत्यु सन्नीध रे ॥ ध्रु ॥ राज्य देश धन जन जाईजणें । वैभवाचें आखिलें सर्व जाणें । यां देखतां काळचोर घेईल घेणें । तयासाठीं स्मशानवरी

---

१ लटिकेपणें, खोटें. २ पाड, थोरीव, ३ नफा. ४ कौतुकानें.

येती धांवणें ॥ २ ॥ ऐसी स्थिती जाणोनि निस्तुरा कैसा । दिसेंदिस गुंतसी विषयविलासा । त्राहे त्राहे म्हणोनि स्मरें जगदीशा । दिनकरा रामेंवीण सर्व दुराशा ॥ ३ ॥

राग अहेरी [ १२३

सारासार विचार विवेकबळें । क्षणक्षणा अंतरीं स्वरूप निवळे । सोहं ब्रह्म शुद्धबोधें अखंड विवेळे । जीवशिवपण समूळ मावळे ॥१॥ ॥ ध्रु० ॥ या मनासी लावीं स्वरूपवेध रे । तेणें तूं होसी पावन सिद्ध रें ॥ ध्रु ॥ तत्वें तत्व वारितां आवरे निज । जन्म मृत्यु निवारण होणें सहज । सद्गुरुचरणीं आहे हें गूज । दिनकरा रामदासीं वर्तेलें चोज ॥ २ ॥

राग केदारा [ १२४

अऱ्हेरु न करीं रे रामा अऱ्हेरु न करीं । अंगिकारु करीं रे रामा ॥ ध्रु ॥ विशेष पाहे । अपराधी आहे । तुजविण हें कोण साहे रे ॥ १ ॥ पतितां पावन । होतां चि श्रवण । आलोंसे शरण रे ॥ २ ॥ दिनकर दीन । तूं दीनवछळ । छेदीं भवभयमूळ रे ॥ ३ ॥

राग मारु [ १२५

॥ ध्रु० ॥ अनाथांसी सांभाळीं रे रामा । ठेवीं चरणकमळीं रे । रामा ॥ ध्रु ॥ त्रैलोक्यनाथ । तूं रघुनाथ । केला शिव सनाथ रे ॥१॥ बिभीषण राक्षेस । हनुमंत दास । चिरंजीव केले उदास रे ॥ २ ॥ दिनकरमूळ । तूं चि समूळ । कां करिसी निर्मूळ रे ॥ ३ ॥

राग मारु [ १२६

॥ ध्रु० ॥ धन्य सज्जन जन रे बाबा । धन्य सज्जन जन ॥ध्रु॥ निजबोधीं हेत । हेतीं[1] निर्हेत । हेतनिर्हेतातीत रे ॥ १ ॥ मिथ्या असंत । करूनि संत । संतीं असंतीं सतंत रे ॥ २ ॥ दीन सगुण । कर निर्गुण । दिनकर गुण ना निर्गुण रे ॥ ३ ॥

---

१ स्पष्ट होणें, समजणें.

राग असावरी [ १२७

॥ ध्रु०॥ दाखवा दाखवा राम कैसा वो । रामालागीं जीव जाला पिसा वो ॥ ध्रु ॥ वैभव संपत्ति काय रामेंवीण । कळा कौशल्य काय रामेंवीण । विद्याविलास काय रामेंवीण । रामावांचुनी अववा अनुमान ॥ १ ॥ भूषण दूषण ऐसें वाटताहे । पुण्य रामेंवीण पाप भासताहे । दुर्घट संसार हीन दिसताहे । रामावांचुनी येम जाचिताहे ॥ २ ॥ वय वेंचलें आतां काय करूं । नाशलें आयुष्य त्याचा जाला केरु । वियोगें रामाच्या किती धीर धरूं । भेटवा दिनकरस्वामी रघुवीरु ॥ ३ ॥

राग पावक [ १२८

॥ ध्रु० ॥ पतित हीन दीन । आलों तुज शरण । न पाहें गुण दोष । रामा करीं पावन ॥ ध्रु ॥ भक्ति भाव नेणे कांहीं । मंदमती मी देवा । विहित कर्मपंथें । कांहीं न जाणे सेवा ॥ १ ॥ दीनबंधु नाम तुझें । भक्तजन वाखाणीती । तें चि पैं वर्म माझें । दुजें नेणे पुढती ॥ २ ॥ दिनकर दीन पाहें । दीनवछळा रामा । हातीचें नोसंडावें । साधुसंतविश्रामा ॥ ३ ॥

राग पावक [ १२९

अहंपण घेऊनीयां । मज सोहंपण दील्हें । काय सांगों नवलावो । हळु हळु तें हि नेलें ॥ ध्रु०॥ ठकांचा हि महाठकु । सद्गुरु ठक मोठा । अहं सोहं नेऊनीयां । भुलविलें आल्या वाटा ॥१॥ बोलतां न ये ऐसें । मज देखत देखतां । चोहटा केलें येणें । अनुर्वाच्य चि तत्वता ॥ २ ॥ दिनकर ह्मणे काय । उतराई होवें याचें । करणी ऐसी ज्याची । घर घेतो विश्वासाचें ॥ ३ ॥

राग श्रीराग [ १३०

पाहातें पाहाणें कैसें । सरिसें चि अनारिसें । सर्वत्र संचलें असे । समरसेंसीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ विचारीं विचारसूनीं । पाहें बरें

---

१ खर्च झालें. २ न सोडावें. ३ चोहट=चोखट=उत्तम, चांगलें. ४ व्हावें. ५ विश्वास समूळ नाहींसा करतो. ६ सारखें, बरोबर, व्यापक. ७ वेगळे, भिन्न. ८ विचारशून्यीं.

विचारूनि । गुरुकृपेंकरूनी । स्वसंवेद्य जें ॥ ध्रु ॥ शिवीं जीव जीवीं शिव । किंवा जीव तो चि शिव । अथवा दोन्ही हि वाव । येकमेकेंसीं ॥ २ ॥ दिनकर ह्मणे येक । येक ना हें अनेक । दोहींच्या निराशें देख । तें चि तें होईं ॥ ३ ॥

राग श्रीराग [ १३१

जीव[१] बद्ध बांधे कोण । शिव[२] मुक्त सोडी कोण । द्वंद्वातीत[३] करी कोण । हें मज निरोपावें ॥ १ ॥ गर्भवासीं[४] घाली कोण । निर्गतीतें[५] करी कोण । राय[६] रंक[७] होतो कोण । हें मज निरोपावें ॥२॥ स्वर्ग[८] नर्क[९] भोगी कोण । सर्व[१०] योनी फिरे कोण । जाणीव[११] नेणीव[१२] लक्षी कोण । हें मज निरोपावें ॥३॥ [१३]चराचर[१४] चाळी कोण । सर्व जीव[१५] पाळी कोण । त्रिभुवन[१६] जाळी कोण । हें मज निरोपावें ॥४॥ ऐसे हे सोळा* हि प्रश्न । दिनकर ह्मणे विवरोन । विचारी जो सुलक्षण । तो चि सुखसंपन्न सर्वदा ॥५

नाम येकताळ [ १३२

॥ ध्रु ० ॥ रघुवीर रघुवीर स्मरा रे वाचे । राम स्मरा रे वाचे । पुरती मनोरथ दोष जाती जन्मांचे ॥ ध्रु ॥ धन जन यौवन अवघें पारिखें । पाहातां अवघें पारिखें । अंतीं कोण्ही न ये कामा रामासारिखें ॥ १ ॥ अहंपणें अंतरिला कोदंडपाणी । राम कोदंडपाणी । जैसें नेणे गर्भ अंध जनक जननी ॥ २ ॥ नरदेह आहे तवं करा स्वहित । बाप करा स्वहित । दिनकर ह्मणे नामें व्हाल सनाथ ॥ ३ ॥

राग पावक [ १३३

॥ ध्रु० ॥ रामनामामृतसार चाखे । त्या सुखापुढें अमृत फिकें रे रे रे रे ॥ ध्रु ॥ नाम कल्याण कल्याणाचें । नाम मंडण मंडणाचें । नाम भूषण त्रिभुवनाचें रे रे रे रे । नाम जीवन जीवाशिवाचें रे ॥१॥

---

* सोळा प्रश्न कोठें आहेत अशी प्रथम शंका येते, पण विचार केला ह्मणजे सोळा प्रश्न कोणते ते कळतात. ते अंक घालून दर्शविले आहेत. १ परोक्ष, विन्मुख. १ भूषण.

नाम नाकळे कळे कळिकाळा । नाम आकळे येकनिष्ठ त्याला । नामें उद्धार सकळिकांला रे रे रे रे । नाम न ह्मणे तो जीत चि मेला रे ॥ २ ॥ नामापरतें दुजें कांहीं । त्रिभुवनीं तारक नाहीं । तें ध्याय तो चि मुक्त देहीं रे रे रे रे । दिनकरा तारक नाम पाहीं रे ॥ ३ ॥

राग मारु [१३४

॥ धृ० ॥ भवबंधनमुक्त करीं रे रामा । भवबंधनमुक्त करीं ॥ धृ ॥ खग नग सुर नर जळचर वनचर तव पदिं सादर जाले रे रामा ॥ १ ॥ पशु[1] वसु[2] दानव[3] मानव सेवा करिति निरंतर भावें रे रामा ॥ २ ॥ त्रिभुवनीं तुझे दास अपार अनुपम्य महिमेचे भले रे रामा ॥ ३ ॥ धीर उदार गंभीर सुंदर मनोहर स्वसुखें धाले[4] रे रामा ॥ ४ ॥ तयांमाजीं पतित दिनकर येक तारितां तुझें काय गेलें रे रामा ॥ ५ ॥

राग पावक [१३५

आपलें म्हणोनियां जवं धरूं गेलों हातीं । तवं तें चि बाऊ जालें । गिळूं धांविलें देहांतीं ॥ १ ॥ धृ० ॥ नवल नवल रे काय सांगों कोणाप्रति । अनाथ जाणोनियां । केलें निर्भय संतीं ॥ १ ॥ नाथिलें चि बुडवितें नानापरीं यातायाती । तयासी हि ठाव नसे । दुजेंपणें त्रिजगतीं ॥ २ ॥ दिनकर म्हणे धन्य नरदेहीं सत्संगति । जन्ममृत्य घेउनियां । केलें मुक्त आदिअंतीं ॥ ३ ॥

राग पावक [१३६

समळ चंचळ देव नव्हे रे । विमळ निश्चळ देव पाहें रे । खल्विदं[5] सकळ जात आहे रे । निखळ स्वरूप नित्य राहे रे ॥१॥धृ० खेळियां[6] आतां चि सावध होईं रे । सद्गुरूसी शरण जाईं रे ॥ धृ ॥ नाथिला चि अनुमान[7] खोटा रे । प्रचीतीवांचुनी भूतचेष्टा रे । वर्णेवीण जेवि भूंसकुटा रे । जाणता न पाहे निजनिष्ठा रे ॥ २ ॥ सकळ

---

१ शिवाचे गण. २ अष्टवसु नामक देवता. ३ राक्षस. ४ तृप्त झाले. ५ खलु+इदं=खरोखर हें ( सर्व ). ६ खेळण्यांत आयुष्य घालविणाऱ्या. ७ संशय.

चराचर व्याप्त रे । विवेकें पाहातां निरावेव रे । द्वैतेंवीण अनुभवीं देव रे । ह्मणे दिनकर स्वयमेव रे ॥ ३ ॥

राग केदारा [ १३७

॥ ध्रु० ॥ जरि हो मज रामदास्य मानेना । जरि हो मज रामदास्य मानेना ॥ ध्रु ॥ पडो नभमंडळ उडऊ समीर । राहोनि काय शरीर ॥ १ ॥ तडको वीज फुटो हीन शिर । व्यर्थ चि काय उशीर ॥ २ ॥ सीमा उलंघू बुडऊ सागर । काय उगा चि विकार[1] ॥ ३ ॥ उतटो भूमि खचो मेरुमंदर । चेंदो देहप्रकार ॥ ४ ॥ जनीं निरंजनीं न मिळो थार । करुणा केरी दिनकर ॥ ५ ॥

[ १३८

॥ ध्रु० ॥ चित्त दुश्चित रे । सजनराया कैसें घडेल हित रे ॥ध्रु॥ पळ निमिष्य अक्षर । क्षण तो हि नव्हेसी राघवीं स्थिर ॥ १ ॥ वय वेंचत चालिलें । अमोलिक नरदेह हातींचें गेलें ॥ २ ॥ अवघीं राहाती सदनीं । प्रपंचाचीं तुज सोडूनि स्मशानीं ॥ ३ ॥ रामेंवीण सकळ जाईजणें । दिनकर ह्मणे सुचित्त पाहाणें ॥ ४ ॥

राग श्रीराग चौताल [ १३९

निद्रेमाजीं उजागरें[3] । जागृतीसी नीजें भरे । स्वपनीं हि निदसुरें । अखंडध्यानें ॥ १ ॥ ध्रु० ॥ पाहालें पाहातेंपण । संतसंगें परिपूर्ण । स्वरूपीं लीन तल्लीन । सहजस्थिती ॥ ध्रु ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ । व्यापुनियां अंतराळ । निबिड जें निराळें[5] । अगाध घन ॥ २ ॥ स्वसंवेद्य समाधान । निरंतर ज्ञेयेंविण । दिनकरें[6] परि दीन । सद्गुरुपाईं ॥ ३ ॥

[ १४०

॥ ध्रु० ॥ आधीं गणेश वंदिला । त्याउपरी कथेसी आरंभु केला ॥ ध्रु ॥ हां हां हां दुजें वंदन शारदे । स्मरोनि मनीं सद्गुरूचीं द्विपदें ॥ १ ॥ हां हां हां संतसज्जनसात्विकां । सर्वभावें वंदू रघुकुळ-

---

१ रोग किंवा चित्तक्षोभ, व्यग्रता. २ ‘ भाकी ’ या अर्थानें. ३ जागरण. ४ झोंप. ५ निराकारस्वरूप. ६ दिनकर स्वतः स्वयंप्रकाश आहे तरी.

टिळका ॥ २ ॥ हां हां हां धन्य श्रीरामभजन । जेणें दिनकरवंश पावन ॥ ३ ॥

[ १४१

॥ ध्रु० ॥ येईं येईं गे साजणी । अवघ्या मिळों निरंजनीं ॥ ध्रु ॥ सकळा जणी येक्या भावें । खेळ खेळों अनुभवें । गुरुकृपेच्या गौरवें । सर्वकाळ सर्वदा ॥ १ ॥ भेद भेदूनि अभेदें । भेदों सर्व हि स्वानंदें । सच्चिदानंदबोधें । बोधीं बोधोनियां ॥ २ ॥ शुद्धसत्वाचे धरणीं । सोहंभावें निभावोनि । नाचों ऐक्याचां रंगणीं । अष्टभाव-संमेळें ॥ ३ ॥ भाव अभाव भावना । बोळऊनी मनकामना । सर्वे घेऊनी धारणा । प्रत्याहार समाधी ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे सहज । सहजीं साधे निजगुज । मिळणीं मिळतां तें चोज । अनुर्वाच्य होऊनी ॥ ५ ॥

[ १४२

पुण्याचें शरीर तें चि जाणिजे रे । तें चि जाणिजे रे ॥ जेणें द्रव्यदाराअभिलाष नेणिजे रे ॥ ध्रु ॥ अखंड वाचे नामघोष गर्जताहे । गर्जताहे ॥ ज्याच्या दर्शनें चि कळिकाळ तर्जताहे ॥ १ ॥ स्पर्शनें चि दिव्य देह होत आहे । होत आहे ॥ आधि व्याधि दैन्य दुःख कोठें राहे ॥ २ ॥ संभाषणें निसंदेह सुख बाणे । सुख बाणे ॥ म्हणे दिनकर ज्याचें तो चि जाणे ॥ ३ ॥

[ १४३

हाडांचा पंजर गुंफियेला नाडीं । ठाईं ठाईं चाकें कांडीं कळा जडाजोडी ॥ १ ॥ ध्रु० ॥ कोण करी ऐसें पाहें विचारून । वायां नरदेह जावं नेदी कार्येंविण ॥ ध्रु ॥ इंद्रियांची सत्ता विषयांचे भोग । नानापरी देहभाव कोणाचे हे रंग ॥ २ ॥ दिनकर म्हणे धन्य सद्गुरुमाये । तुजविण गेलीं त्यांची काय सांगों सोये ॥ ३ ॥

नाम येकताळी [ १४४

॥ ध्रु० ॥ अखंड अनुसंधानीं मन । जडतां होतसे उन्मन ॥ध्रु॥ काय सांगों नवलावो । दृश्य द्रष्टा दर्शन वावो । स्वसंवेद्य अनुभवो ।

---

१ पृथ्वीवर, जमिनीवर. २ भितात.

गुरुकृपाविचारें ॥ १ ॥ व्यास वशिष्ठ सनकादिक । शुक शौनक वाल्मिक । आत्मज्ञानी ब्रह्मादिक । गुरुकृपाविचारें ॥ २ ॥ अनुर्वाच्य सुख पाहें । सद्गुरूचे पाईं आहे । दिनकरा लवलाहें । गुरुकृपाविचारें ॥ ३ ॥

राग श्रीराग चौताल [ १४५

आपला आपणा लाभ । सोडूनि साक्षित्व लोभ । जिरऊनि वृत्तिक्षोभ । मुरे स्वानंदीं ॥ १ ॥ धृ० ॥ सद्गुरु सत्कृपावेधें । वेधिलें अंतर भेदें । निरंतर बुद्धि बोधें । अनुर्वाच्येंसीं ॥ ७ ॥ जनीं वनीं निरंजनीं । निजसुखें सुखासनीं । जागा चि निजे सूमनीं । उन्मनींसेजें ॥ २ ॥ श्री दिनकर रामीं राम । दासबोधें स्वस्तिक्षेम । असंभाव्य अनुपम्य । महावाक्यार्थें ॥ ३ ॥

राग असावरी [ १४६

॥ धृ० ॥ दीनवत्सल रघुराज । सखिये दीनवत्सल रघुराज ॥७॥ बिभीषण राक्षेस हनुमंत वीर । चिरंतनें[1] केले निर्व्याजें[2] ॥ १ ॥ चरणस्पर्शेंकरिं अवलीला कैसी । उद्धरिली मुनिभाज[3] ॥ २ ॥ दिनकर ह्मणे शुकमिसें गणिका । कैवल्यपदीं कारि राज्य ॥ ३ ॥

[ १४७

सार सार सार सार । रामनामें जगदोद्धार । वारंवार वारंवार । अनुसंधानीं निजनिर्धार ॥ १ ॥ राम राम राम राम । रात्रिदिवस हा चि नेम । हरे श्रम हरे श्रम । कळिकाळाचा अति दुर्गम ॥ २ ॥ निजविश्राम आत्माराम । दिनकरा पूर्णकाम । अनुसंधानें स्मरे राम । तैं चि लाभे मोक्षधाम ॥ ३ ॥

[ १४८

स्थिर स्थिर स्थिर स्थिर । भज भावें रघुवीर । भाव सार भाव सार । भावें चि जगदोद्धार ॥१॥ भावें राम भावें राम । रामनामें वैकुंठधाम । हीन काम हीन काम । कामें पीडी बहु येम ॥ २ ॥ धन्य धन्य

१ चिरकाल. २ निष्कपट, निर्दोष. ३ गौतमपत्नि अहल्या.

धन्य धन्य । राघवीं रातलें मन । दिनकरा श्रीरामेंविण । भजणें तें त्वि कुलक्षण ॥ ३ ॥

नाम येकताळ [ १४९

॥ धृ० ॥ कृष्णा रामा गोविंदा गोपाळा । जय जय गोपाळा । वासुदेव वनमाळी घननीळा ॥ छ ॥ अच्युता अनंता हरि मधुसूदना । जय जय मधुसूदना । आवडी लागो तुझी माझीया मना ॥ १ ॥ यावें यावें यावें देवा पतितपावना । जय जय पतितपावना । सांभाळावें दास जनींजनार्दना ॥ २ ॥ दिनकर दीन पाहे जगत्रयपाळणा । जगत्रयपाळणा । त्राहे त्राहे जगदीशा भवभययातना ॥ ३ ॥

राग पावक [ १५०

निरंतर अंतरीं हो । राम धरावा मनीं । देहीं च देहातीत । सुख लाहिजे सज्जनीं ॥ १ ॥ धृ० ॥ रामा कृष्णा वासुदेवा । गातां अळोसूं[1] नका हो । जाईजेणें[2] जवं हातीं । तवं वेग हा करा हो ॥ छ ॥ सोडूनि भाग्यमद । आणि लोकिकाची लाज । निःशंक होऊनीयां । पाहा निजानंदचोज ॥ २ ॥ दिनकर ह्मणे वेगीं । साधा घडीनें घडी । नरदेह जवं नीट । तवं टाका पैलथडी ॥ ३ ॥

नाम येकताळ [ १५१

धीर धरा धीर धरा धीर धरा शोधा परात्परा । थार करा थार करा थार करा या संसारा ॥ १ ॥ धृ० ॥ राम ह्मणा राम ह्मणा राम ह्मणा तुह्मी क्षणक्षणा ॥ छ ॥ काळ खोटा काळ खोटा काळ खोटा नका मदताठा । सुख घोंटा सुख घोंटा सुख घोंटा तुह्मी घटघटां ॥२॥ वीट नका वीट नका विटतां लागे काळधका । दिनकरा रघुवीराविण येणें या संसारा ॥ ३ ॥

नाम येकताळ [ १५२

॥ धृ० ॥ नाम ध्यावें नाम ध्यावें नाम ध्यावें चित्त द्यावें । चित्त द्यावें चित्त द्यावें चित्त द्यावें सिद्ध व्हावें ॥ छ ॥ दैन्यवाणें दैन्यवाणें दैन्यवाणें भक्तीविण जिणें । व्यर्थ जिणें व्यर्थ जिणें व्यर्थ जिणें

---

१ आळस करूं. २ नश्वर असा हा देह.

जाणोनि घेणें ॥ १ ॥ भाव धरीं भाव धरीं भाव धरीं निज निर्धारीं[1] । शुद्ध करीं शुद्ध करीं शुद्ध करीं चित्त परोपरीं ॥ २ ॥ जाईजणें जाईजणें देह लाधलें तों लाभ घेणें । लाभ घेणें ऐक्य तेणें सुख सेवणें दिनकर ह्मणे ॥ ३ ॥

राग भैरवी [ १५३

॥ धृ० ॥ सुंदर हरि भेटवा वो ॥ ७ ॥ भेटवा हरि मज । जीव जाला निस्तेज । येकदां आणा वो सहज ॥ १ ॥ पळ युगासम जाये । कृपा न ये करूं काये । उत्कंठित प्राण न राहे ॥ २ ॥ परम आश्चिर्य वाटे । हरि करी उफराटें । बोलतां न ये नेटेंपोटें ॥ ३ ॥ सकळ अन्याय जे जे । असती जाले सहजें । करूनि क्षमा ते माझे ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे ऐसी । करुणा हृषीकेशी । ऐकोनि पावले राभिकेसी ॥ ५ ॥

राग मधुमाधवी [ १५४

॥ धृ० ॥ मना नित्य करीं रामाचें चिंतन । चिंतितां राम तुटेल भवबंधन ॥ ७ ॥ योगीजनमुनिमानसरमण । रमणीय राम जीवाचें जीवन ॥ १ ॥ रामेंवीण दरिद्र सर्व संचलें । दिसेंदीस आयुष्य पाहें वेंचलें ॥ ३ ॥ दिनकरवीश विराजमान । शिव स्वयें ध्यातो होऊनि अनन्य ॥ ३ ॥

राग सदर [ १५५

॥ धृ० ॥ नाम सर्वांसीं आहे तारक । नाम ध्यावें होऊनियां निःशंक ॥ ७ ॥ नामीं रैति[2] गैति[3] तयासी इछिते । इछितां चि गति गतीसी पावे तें ॥ १ ॥ नामीं नाहीं उत्तम कीं मध्यम । नामी नाहीं हीन अधम निःकाम ॥ २ ॥ दिनकरा हीनैं[4] नामें पावन । अनामी[5] तो उत्तम परि मलिनैं[6] ॥ ३ ॥

[ १५६

रामाचा संकेतैं[7] मज सांग कांहीं । तरी च विश्वास बाणे तुझा

---

१ निश्चयरूप. २ प्रीति, प्रेम, आसक्ति, छंद, सुख, आनंद. ३ स्वर्गप्राप्ति, मोक्ष. ४ निंद्य मनुष्य देखील. ५ नाम न घेणारा. ६ अधम. ७ ठरविलेला बेत (निरोप).

ठाई । उगा चि संदेह उठे माझा देहीं । दिससी सुजाण परि कीजे काई ॥ १ ॥ ध्रु० ॥ न घडे कपट वेष भासताहे । वान्नर हे मात केवि करूं लाहे । याहिवरी कोण जाणे कैसें आहे । रामाचा प्रताप कोणा कळों पाहे ॥ छ ॥ असाध्य अशोकवन शंकरासी । जयासाठीं आटे भोंवे निर्ज्जरांसी । दुर्लभ विश्रांति येथें रावणासी । तेथें तूं वन-चर कोणेपरी येसी ॥ २ ॥ वान्नरा सागर केवी लंघवेल । दुर्घट लंका-पुर केवि शोधवेल । राक्षसांची कचें केवि वारवेल । सकळ रक्षूंनि येथें येववेल ॥ ३ ॥ सांग रे निश्चय जेणें होय मज । कोणेपरीं पाठविलें रामें तुज । संदेह सोडूनि सुखें बोल गुंज । अंतरींचें जें जें तुझें आहे चोर्ज ॥ ४ ॥ ऐकतां चिच्छक्तिशब्द हनुमंतें । आनंदें वृत्तांत सांगे येक-चित्तें । समाधान केलें कैसें कृपावंतें । दिनकर ह्मणे सुख स्वसंवित्तें ॥५॥

राग देशांक [ १५७

श्रीराम जयराम जयजयराम हा चि नेम ॥ छ ॥ हा चि निरंतर मंत्र जपावा । संसारार्णव समूळ तरावा ॥ १ ॥ शिवसनकादिक मुनि-वर ध्याती । नारद तुंबर सप्रेम गाती ॥ २ ॥ सिद्ध महा कपिलादिक नेमें । दिनकर मुक्त निरंतर नामें ॥ ३ ॥

[ १५८

आसनीं तो शयनीं भुवनीं तो । सर्व जनीं विजनीं विलसे तो ॥ १ ॥ ध्रु० ॥ अंतरात्मा राम । भक्तकामकल्पद्रुम ॥ छ ॥ श्रवणीं तो नयनीं वदनीं तो । अंतःकरणीं सदा सदनीं तो ॥ २ ॥ त्रिभुवनीं तो भ्रमभुली हारितो । दिनकर तो परि नवल करीतो ॥ ३ ॥

---

१ आटाटी, श्रम, दगदग. २ त्रस्त होतात. ३ देयांना. ४ कचाटी. ५ निवारण करतां येईल. ६ या सगळ्या अडचणींतून निभावून. ७ गुह्य गोष्ट, रहस्य. ८ प्रेरणा. ९ श्रीरामाच्या निरोपावरून मारुतीराय सीताबाईच्या शोधार्थ निघाले असतां लंकेंतील दुर्घट अशा अशोकवनांत सीतेपुढें येऊन उभे राहिले, त्या वेळीं सीताबाईनें हनुमंतास प्रश्न केले ते ऐकून. १० स्वसंवेद्य तें. हें सुख अनुभवी च जाणतो.

[ १५९

मद्यपाचां घटीं गोक्षीर निर्माण । केवि तें सुसीळ अंगिकारी बापा ॥ १ ॥ ध्रु० ॥ तैसें वर्णहींना पासीं ब्रह्मज्ञान । केवि उत्तमवर्ण । अंगिकारी तया ॥ ७ ॥ अंत्यजगृहींचें अन्न जऱ्हि आहे पक्वान्न । तऱ्हि तें विद्वज्जन । सेविती कैसें बापा ॥ २ ॥ दिनकर ह्मणे रजकगृहींचें जीवन । तृषाक्रांत ब्राह्मण । केवि प्राशी बापा ॥ ३ ॥

राग धृवक [ १६०

मंगळा मंगळ मंगळमूर्ति तुझें नाम । आठवितां मानसीं पूर्ण होती सर्व काम ॥ १ ॥ ध्रु० ॥ मोरया रे तुझें ध्यान लागो मना । ध्यानीं निश्चळ होतां पुरती सकळ मनकामना ॥ ७ ॥ दासांचें मंडन गजानना तुझें रूप । दर्शन होतां चुकती जन्ममृत्याचे आरोप ॥ २ ॥ कर्माचा उच्चार करितां वाचेसी विश्राम । नाम रूप कर्म दिनकर आळे + + + + ॥ ३ ॥

राग कामोद [ १६१

( राम श्रोत्रीं ) ऐकावा । राम नेत्रीं ( पाहावा ) । राम वदनीं घोकावा । राम निजध्यासें जिकावा ॥ १ ॥ ध्रु० ॥ मनीं तो चि ध्यावा गात्रा । तया तो चि वर मागावा । तया स्वभाव तो सांगावा । राम सोहंभावें भोगावा ॥ ७ ॥ राम रसनेनें सेवावा । राम प्रत्याहारें जेवावा । राम विश्वासें गोवावा । राम सर्वात्मक भावावा ॥ २ ॥ ह्मणे दिनकर समजावा । राम सर्वभूतीं भजावा । राम सर्वभावीं पुजावा । रामस्मरणें अहंभाव जावा ॥ ३ ॥

राग भैरवी [ १६२

जें विश्वासी तारक । जें काळासी मारक ॥ १ ॥ ध्रु० ॥ तें नाम राघवाचें । अखंड ध्यावें वाचें ॥ ७ ॥ जें जीवांचें जीवन । जें पतितांसी पावन ॥ २ ॥ जें संतांचें सौजन्य । जें दिनकरमनरंजन ॥ ३ ॥

---

१ येथून तिसगांव बाड अनुक्रम ४ मधील पदें सुरू झालीं. २ येथें 'निर्मळ' शब्द असावा तर बरें. ३ परटाच्या घरचें. ४ स्थापन, भूषण. ५ कल्पना. ६ पुढील अक्षरें फाटण्यांत गेलीं आहेत. ७ कंसांतील शब्द फाटण्यांत गेल्यामुळें अंदाजानें घातले आहेत. ८ इंद्रियदमनानें. ९ मैत्री.

राग कामोद [ १६३

॥ ध्रु० ॥ भेटवा घननील सावळा । विश्वाचा जिव्हाळा । करुणासागर निजडोळां । पाहिन वेळोवेळां ॥ छ ॥ रविकुळमंडन खंडनकर्ता अविद्येचा । भक्तजनजीवन पावनकर्ता पतितांचा ॥ १ ॥ निजसुखदायक तो येक मारक कळिकाळाचा । भवभयहारक तारक सुरनरउरगांचा ॥२॥ मुनिजनमानसराजहंसे दिनकरवंशविलास । नयनीं पाहावा हे आश न करा कोणिंह निराश ॥ ३ ॥

[ १६४

धंदा करितां दिवसा कैंची आराणुक । रात्री न सुटे निद्रा घेतां विषयसुख ॥ १ ॥ धृ० ॥ दुर्लभ आयुष्य नरदेहीं नाशे । अंतीं बांधला जासी काळपाशें ॥ छ ॥ बाळपणीं हित कैंचें मुलांमाजीं । खेळतां वेंचलें वय तें काळ मोजी ॥ २ ॥ तारुण्य सवें चि पावे विषयपुरें । पडलें वाहात प्राणी तें पापधारे ॥ ३ ॥ वार्द्धकीं ममता मोहो पदार्थमात्रीं । तृष्णा न तुटे जर्‍ही खंगला गात्रीं ॥ ४ ॥ भातुकें काळाचें येऊनि प्राणी जालें । ह्मणे दिनकर स्वहितेंविण गेलें ॥ ५ ॥

राग पाहाडी [ १६५

पळ युगासम वाटे । न कंठे अणुमात्र कोठें । कोण हें वारिल संकट मोठें ॥ १ ॥ ध्रु० ॥ बाइये गे मजला नयनीं दाखवा चापपाणी । न गमे त्या वांचुनी जनीं विजनीं ॥छ॥ भोग हे रोगाचे परी । प्रत्यक्ष विषय वैरी । भासती सुहृद मारेकरी ॥ २ ॥ दिनकर ह्मणे माझें । मीपण निरसूनि वोजें । आत्मारामीं समरससुख दीजे ॥ ३ ॥

राग पाहाडी [ १६६

पाहें पहिला देहीं जडला अहंकार । दुसरा बळ तिसरा दर्प थोर । चौथा काम पांचवा क्रोध क्रूर । साहवा परिग्रह हा अति दुस्तर

---

१ शेष, गरुड. २ मुनिजनांच्या अंतःकरणरूपी मानससरोवरांत विहार करणारा राजहंस जो राम. ३ अराणुक=शांति, तृप्ति. ४ लोभ. ५ भक्ष्य. ६ ममताळु, इष्टमित्र. ७ उत्तम रीतीनें, पूर्णपणें. ८ एकरूपतेचें सुख. ९ स्वीकार, किंवा संग्रह करण्याचा मोह.

॥ १ ॥ धृ० ॥ बाइये गे मी तवं शरण जाईन या संतांसी । आपुलें निजहित पुसेन त्यांसी ॥ छ ॥ कैसे साही चाळिती द्वेष मजसीं । मछर करितां न स्मरती दिननिशी । षड्रिपु जडले प्रसिद्ध हे जीवेंसीं । कवण्या उपायें निरसूं यांसी ॥ २ ॥ ऐसे दुष्ट दुर्जय हे सर्वांसी । नाना साधनीं चढतें बळ यांसी । यांचें वर्म मरणाचें संतांपासीं । ह्मणे दिनकर निजभावेंसीं ॥ ३ ॥

राग पाहाडी [ १६७

शोभे माहेश्वरी ठाणें । करीं कोदंड बाण । लावण्यें घननीळ रूप सगुण ॥ १ ॥ धृ० ॥ बाइये गे तनु मनु माझें वेधलें रामपाईं । न मने त्यावांचुनी आणीक कांहीं ॥ छ ॥ अनंता सृष्टीची खाणी । विधिगोळ हा जेथुनी । जडलें निरंतर तें रूप नयनीं ॥ २ ॥ अष्टभाजें निंबलोण । सोहंभावें वोवाळून । दिनकर अनन्यभावें शरण ॥ ३ ॥

राग पाहाडी [ १६८

स्वसुखासी कारण मजला । येक हा उपाय सुचला । शरण रिघावें सद्गुरूला ॥ १ ॥ धृ० ॥ बाइये गे स्वहित करूनियां घ्यावें लैगवेगें । अखंड राहावें संतसंगें ॥ छ ॥ गेली घटिका ते तवं न ये पुढें । काळ जडलासे जीवीं वाडेंकोडें । देहांतीं तयाचें बहु सांकडें ॥ २ ॥ जोंवरि स्वस्थ इंद्रियें देह प्राण । व्याधिरहित आयुष्यवृद्धि जाण । तोंवरि दिनकर ह्मणे प्रयत्न ॥ ३ ॥

[ १६९

॥ धृ० ॥ दीनदयाळ राम कृपा करी । तरी च सार्थक घडे संवसारीं ॥ छ ॥ नसतां श्रीरामदया काय जिणें । नरदेह धरूनी व्यर्थ केलें सुनें ॥ १ ॥ काय आपुलें सत्य मानुनियां । लोधसी संसारीं लाभेंविण वांया ॥ २ ॥ कोण्ही हि कोण्हाचें नव्हे आप्त पाहें । आतां

---

१ सहा हि विकार. २ चालविती. ३ अजिंक्य. ४ उत्तरोत्तर जास्त. ५ शंकराप्रमाणें. ६ उभे राहण्याची ऐट. ७ अति त्वरेनें. ८ अत्यंतपणें, मोठ्या कपटानें ( हंसकोश ). ९ शून्यरूप.

तऱ्ही मनुजा वेगीं राम बोहें ॥ ३ ॥ आपुलें सुखदुःख रामा निवेदावें । रामाचे कृपेसी भावें हिरोनि ध्यावें ॥४॥ दिनकर ह्मणे धन्य रामसेवा । जयांसी लाधली त्यांचा पूर्वठेवा ॥ ५ ॥

राग पाहाडी [ १७०

पाहातां प्रपंचरचना । अवघी विषयांची सूचना । विघडतां आप्त ह्मणों मी कोणा ॥ १ ॥ धृ० ॥ बाईगे ह्मणउनी ममता उत्तम श्रीरामांची । तयाविण सृष्टि अविद्येची ॥ ७ ॥ पाहातां गृहधनाकडे । पुत्र तयासाठीं रडे । स्त्रियेसी केशांचें संकट पडे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे राम । अवघा त्यावांचूनि भ्रम । समजोनि जो सोडी तो जीव उत्तम ॥३

राग भैरवी [ १७१

खेमार्ग धरितां तरणी । जैसी रजनीचरेंसीं रजनी ॥ १ ॥ धृ० ॥ तैसें उच्चारितां रामनाम । दोष लंघूनि जाती व्योम ॥ ७ ॥ वणवा देखोनि वनीं । जैसी वनींचीं जाती पळोनि ॥ २ ॥ दिनकर ह्मणे मर्दमुखें । जैसीं पळतीं मृगपतिहांके ॥ ३ ॥

राग केदार [ १७२

नरदेहीं उत्तम जन्म । पावोनियां सत्समागम । निजाचारें विहितकर्म । आचरे तो मार्ग परम ॥ १ ॥ धृ० ॥ रामनामें गर्जना करी । नित्यनेमें स्वधर्माचारीं । सार्थकाचा काळ जो भरी । धन्य प्राणी तो चि संसारीं ॥ ७ ॥ नित्य न्यायें वर्तणें ज्याचें । मर्यादेचें बोलणें साचें । काय सांगों आणिक त्याचें । कर्तव्य जें तें निश्चयाचें ॥ २ ॥ सर्व काळ तो सार्थकाचा । भरितसे मोठ्या दैवाचा । पुण्यश्लोक मेरु धैर्याचा । पावक चि तो वैराग्याचा ॥ ३ ॥ क्षमारूपें धरणीऐसा । आर्जवें तो उदक जैसा । आत्मज्ञानें मार्तंड जैसा । चाळक तो समीरा सारिसा ॥४॥ विज्ञानी तो नभाचे परी । व्यापक तो

---

१ बोलवा, आळवा. २ पूर्वजन्मींचें सुकृत. ३ अप्रत्यक्ष कथन, इषारा ४ मायिक. ५ आकाशमार्ग. ६ सूर्य. ७ चोरांसह. ८ रात्र. ९ ओलांडून. १०. आकाश. ११ उन्मत्त हत्ती. १२ सिंहाच्या डुरकणी बरोबर. १३ अग्नि. १४ सूर्य. १५ वायूप्रमाणें सर्व ठिकाणीं फिरणारा.

सर्वां अंतरीं । दिनकर म्हणे निर्विकारी । जन्हि वर्ते तो सदाचारीं ॥५॥

राग कल्याण [ १७३

॥ धृ० ॥ धन्य सज्जन जन रे बाबा । धन्य सज्जन जन रे ॥ छ ॥ मारुनि जीवें जिववी साचें । धाम विश्रामाचें रे ॥ १ ॥ अपरांपर न कळे पार । करीत जगदोद्धार रे ॥ २ ॥ दिनकर किंकर सज्जनपाईं । जालें समाधान देहीं रे ॥ ३ ॥

राग काफी [ १७४

॥ धृ० ॥ करीं दया रे रघुराया ॥ छ ॥ दुर्घट कळिकाळविंदाणी । टपत घात कराया ॥ १ ॥ कर्म घडेना धर्म निदानीं । कांहीं च न घडे भरायाँ[3] ॥ २ ॥ कोण्हा प्रकारें स्वहित जनीं । दिनकरा न दिसे वराया ॥ ३ ॥

राग पावक [ १७५

चालिलासी तपोवना । मजला निर्विसी कवणा ॥ १ ॥ धृ०॥ राघवा रे । राजसा रामा । घननीळशामा रामा । विश्रामधामा रामा । निष्कामकामा राघवा रे ॥ छ ॥ तुजविण परदेशीं । काळ मी कंठूं कैसी ॥ २ ॥ क्षणक्षणा दाटे कंठ । पाझरती नेत्रवाट ॥ ३ ॥ वियोगाचा येक क्षण । जातो युगासमान ॥ ४ ॥ सुंदरा सकुमारा । उभा राहे रघुवीरा ॥ ५ ॥ फिरोनियां तन्ही पाहें । जातोसि कां लवलाहें ॥ ६ ॥ दिनकर ह्मणे कौसल्या । करी करुणा वेळोवेळां ॥ ७ ॥

राग पावक [ १७६

॥ धृ० ॥ राम सच्चिदानंदघन । राम निबिड नित्य सघन ॥ छ ॥ नभें व्यापिलें दृश्य आघवें । त्याची चाळणी केली राघवें ॥१॥ राम होय नव्हे याहि वेगळा । राम सर्वांमाजीं नित्य सगळा ॥ २ ॥ राम अनेकांचा येक संचला । राम न पाहे तो सत्य वंचला ॥ ३ ॥ राम सर्वां सर्वदाट दाटला । राम शोधितां भवाब्धि आटला ॥ ४ ॥ ह्मणे दिनकररामदास रे । राम उदास निराभास रे ॥ ५ ॥

---

१ कौशल्य, कारागिरी. २ शेवटीं, अंतीं. ३ जमेच्या बाजूस कांहीं पडतें कां तें पाहिलें तर. ४ निरविसी, स्वाधीन करतोस. ५ फसला.

राग पावक [ १७७

॥ धृ० ॥ रामदास तो चि रे । देहभाव जो वेची रे ॥ छ ॥ लीळा उदास तापसी । फिरे अरण्य वापसी ॥ १ ॥ ज्ञानें सतेज तनु । नित्य वैराग्यें नूतनु ॥ २ ॥ दिनकरा निष्कामी । सर्व सोडूनि भवऊर्मि ॥ ३ ॥

राग पावक [ १७८

॥ धृ० ॥ सर्व वैभव माझें । रामा चरण तुझे ॥ छ ॥ बाप माय गोत्रज । रामा तूं चि अनुजें ॥ तन मन संतान । रामा तुझें चिंतन ॥ २ ॥ चराचराचें भान । नेणे रामावांचून ॥ ३ ॥ अहर्निशीं श्रीराम । निजनेमेसीं निष्काम ॥ ४ ॥ दिनकरकुळक्रम । भ्रम ग्रासूनि निभ्रम ॥ ५ ॥

राग पावक, येकताळ ( येकदंडीगान चाली ) [ १७९

॥ धृ० ॥ जना जाग रे निरंजनीं । देईं अविद्याझोंप सोडुनी रे रे रे रे ॥ छ ॥ काळे कठिण आहे भारी । सानें थोर तो कांहीं न विचारी । जैसा पेटला अग्नि संव्हारी रे रे रे रे । जें सांपडे तें भस्म करी रे रे रे रे ॥ १ ॥ काळ न ह्मणे ब्रह्मच्यारी । काळ न ह्मणे दुराचारी । काळ न ह्मणे नरनारी रे रे रे रे । सर्व जीवांसी काळ दंडधारी रे रे रे रे ॥ २ ॥ काळापासून ते च सुटले । जे सर्वभावें रामीं रंगले । काळ खाऊन माहाकाळ जाले रे रे रे रे । ह्मणे दिनकर ते चि येक भले रे रे रे रे ॥ ३ ॥

[ १८०

सार सार रे सखया सार । संतसंगतीचा विचार रे० ॥ छ ॥ माया असार सर्व सगुण । ब्रह्म सत्य सार नित्य निर्गुण । माया बाजीगौरी खेळ मिथ्या जाण रे० । हें जाणती संत सज्ञान रे० ॥ १ ॥ ब्रह्म अचोज चोजवेना । माया प्रत्यक्ष परि थारेनां । ब्रह्म सर्वांठाईं परि

१ बंधु. २ काल, वेळ. ३ यम. ४ गारुडविद्या. ५ जाणतां न येण्यासारखें, ६ स्थिर राहत नाहीं.

लक्षेना रे० । संतसंगेंविण अनुमानेना रे० ॥२॥ ह्मणे दिनकर तो चि संत । जो जीवशिवा करी एकांत । निजसमाधानीं ठेवी सतंत रे० । तो चि सेविजे गुरु निभ्रांत[1] रे रे रे रे ॥ ३ ॥

येकदंडीगान चाली [ १८१

॥ धृ० ॥ धीर धीर रे बापा धीर । धीर धरी तो चि नरवीर शूर रे रे रे रे ॥ छ ॥ धीरेंविण वैराग्य करंटें । धीरेविण विवेक चोरटें । धीरावांचुनि ज्ञान पोरटें रे रे रे रे । धीरेंविण नीट चि उफराटें रे० ॥ १ ॥ धीर गंभीर तो चि सज्ञान । ज्याचें अक्षई नित्य समाधान । जो निजसुखें सुखी सावधान रे० ॥ जेवि अलित रवि त्रिंबोन रे० ॥ २ ॥ ह्मणे दिनकररामदास । धीर धरूनि भजे जगदीश । समाधान तो पावे विशेष रे रे रे रे । धीर धरी त्यास पद अविनाश रे रे रे रे ॥ ३ ॥

राग पावक [ १८२

॥ धृ० ॥ राघोबा तुजविण मज कोण आहे ॥ छ ॥ सकळ चराचरीं जगीं जगदांतरीं । नेणे आणीक उपाय ॥ १ ॥ अरत्रीं परत्रीं सकळ कळत्रीं । माझें स्वहित तुझे पाय ॥ २ ॥ दिनकर दीन तुजसीं नाहीं भिन्न । भिन्न होतां चि अपाय ॥ ३ ॥

राग मारु [ १८३

॥ धृ० ॥ देहातीत स्वहित सज्जना ॥ छ ॥ शेष विरंची पार्वतिकांत । नित्य करिति येकांत ॥ १ ॥ सनकादिक मुनि ध्याति निवांत । उत्तम जें सकळांत ॥ २ ॥ सद्गुरुकृपेनें तें सुख विदित । दिनकरा सदोदित ॥ ३ ॥

[ १८४

यमुनेचे तीरीं चिरें[2], अळंकार । ठेऊनि सत्वर व्रजांगना[3] ॥ १ ॥ व्रजांगना जळीं रिघती सकळा । क्रीडती अबळा परोपरीं ॥ २ ॥ परोपरीं घेती कल्लोळीं[4] उल्लाळ[5] । सिंपित्याती जळ परस्परें ॥ ३ ॥

---

१ निश्चयपूर्वक. २ वस्त्रें. ३ गोकुळांतील स्त्रिया. ४ पाण्याच्या लाटांमध्यें. ५ उडी.

परस्परें शिरशिवणी[1] खेळती । जळीं बुडविती येकमेकां ॥ ४ ॥ येकमेकांमाजीं खेळती विनोद । तों आला गोविंद गुप्तवेषें ॥ ५ ॥ गुप्तवेषें नेलीं चिरें अळंकार । गुंडी[2] दामोदर कळंबासी ॥ ६ ॥ कळंबीं वेंघोनि[3] बैसोनि सादर । ह्मणे दिनकर अवलोकीं ॥ ७ ॥

राग पावक [ १८५

॥ ध्रु० ॥ गोविंद गोपाळ वो । कान्हो मुकुंद मुरारि ॥ वितंड खेळ खेळे । कैसा यमुनेचां तीरीं ॥ ध्रु ॥ चिरें हार अळंकार । तीरीं ठेउनि गोपिका ॥ खेळती जळकेळी[4] । नग्न होउनि निशंका ॥ सिंपिती जळ हातें । बुडविती येकमेकां ॥ आनंदें गर्जती त्या । ने देखती च नाटकी[5] ॥ १ ॥ पिलंगत[6] येउनियां । नेलीं चिरें अळंकार ॥ वेंघोनी तरुवरी । करी वृक्षासी शृंघार ॥ आपण गुप्त राहे । अवलोकी त्यांचे चारॅ[7] ॥ तों त्या पाहाती चिरें तीरीं । ने देखती जाल्यास्थिर[8] ॥ २ ॥ समस्त येऊनियां । तीरीं शोध जवं घेती ॥ मंजुळ वेणुवाद्य । कानीं गोपिका ऐकती ॥ अगाई कृष्ण गाठा[9] । नेणों आला कोणे रीतीं ॥ दिनकर ह्मणे आतां । सुखसंवादें वदती ॥ ३ ॥

राग केदार [ १८६

॥ ध्रु० ॥ आलॅगट[10] बाळमुकुंदा रे तूं । अलगट बाळमुकुंदा ॥ ध्रु ॥ जेव्हां तेव्हां हें सोसावें किती । कां खेळसी अप्रमादी[11] अरे तूं ॥ १ ॥ नंद यशोदा नीतीनें सांगती । न मानिसी तें तूं कदा अरे तूं ॥ २ ॥ दिनकर म्हणे नवल मोठें । वरिवरि बोलती प्रमदीं[12] अरे तूं ॥ ३ ॥

राग मारु [ १८७

॥ ध्रु० ॥ आमुचीं देईं चिरें रे गोविंदा ॥ ध्रु ॥ आम्ही परांगना नेणसी कान्हा । कामा नये हे रंळी[13] रे ॥ १ ॥ सासुरवासिनी पाहें

---

१ एकमेकांना टिपण्याचा खेळ. २ गुंडाळे. ३ चढून. ४ जलक्रीडा. ५ बहुरूपधारी कृष्णास. ६ लवकर लवकर धावत. ७ चेष्टा. ८ जाल्या+अस्थिर. ९ गांज्याळ, कपटी. १० ( अलक=कुरळ केश ) लहान मुलगा. किंवा ( अलगर्त= काळा पाणसर्प ). ( गीर्वाणलघुकोश ) ११ ' प्रमाद ' या अर्थानें; जसें ' अचपळ '. १२ तरुण स्त्रिया. १३ विनोद.

जनार्दना । दिगांबरी जालों जळीं रे ॥ २ ॥ दिनकरप्रभु हांसे तरु-वरी । बाहिर या सकळी रे ॥ ३ ॥

राग परज [ १८८

॥ धृ० ॥ नामें सर्व सनाथ रामाच्या ॥ ७ ॥ सुर नर वानर भूधर[1] शंकर । योगी विद्याधर[2] होत ॥ १ ॥ दानधर्म विधि शास्त्र पुराणें । वेद क्रिया व्रत तीर्थ ॥ २ ॥ दिनकरा उत्तम मध्यम कनिष्ठ । चराचरीं होत जात ॥ ३ ॥

[ १८९

॥ धृ० ॥ संतचरणीं सद्भावो । जडला चि राहो ॥ ७ ॥ विषयभावना हे उडो । संदेह हा झडो ॥ १ ॥ संकल्पकल्पित भावना । निरसूनि मना ॥ २ ॥ देह विदेह हे स्थिति । नुरऊनि चित्तवृत्ति ॥ ३ ॥ बद्ध निर्मुक्त वासना । विवरोनि ज्ञान अज्ञाना ॥ ४ ॥ दिनकर सद्गुरुचरणीं । देहेंविण लोटांगणीं ॥५॥

[ १९०

॥ धृ० ॥ आधीं सेवीं सद्गुरु करुणासागर आगर[3] जो भजनासी । तीर्थें क्षेत्रें मोक्षादिक गति साधनें ज्याच्या चरणापासीं ॥ ७ ॥ सत्संगेंविण तीर्था जासी पालट नव्हे मनासी । अस्थिपंजर बुडउनि उदकीं होतें काय तयासी ॥ १ ॥ क्षेत्रें पाहातां बहुविध प्रतिमा उपाधि लागली जनासी । पृथ्वी फिरतां जड जालें मन चुकलें हृदयस्थांसी[4] ॥ २ ॥ अवघी खटपट सद्गुरुवांचुनि स्वरूपखुण चुकलासी । दिनकर ह्मणे श्रुतिशास्त्रें बोलति पाहें समजोनि तयासी ॥ ३ ॥

राग परज [ १९१

॥ धृ० ॥ ध्याईं मन राम राम राम । शिवहृदयविश्राम ॥ ७ ॥ योगिमुनिजनामानसीं उपरम । सेविती सुखागर्भधाम[5] ॥ १ ॥ गंगा यमुना त्रिवेणीसंगम । नेमुनियां[6] प्राणायाम ॥ २ ॥ दिनकर दीनदयाळ अंतरीं । निरंतर देव निष्काम ॥ ३ ॥

---

१ शेष. २ उपदेव. ३ स्थान. ४ आत्मारामास. ५ सुखलाभाचें घर च. ६ नियमुनियां=निग्रह करून.

राग पावक [ १९२

मुनिजनमनरंजना । निशाचरकुळभंजना ॥ १ ॥ धृ० ॥ चापपाणी । देवाधिदेवा ॥ ध्रु ॥ हरविधिवरदायका । सुरवरभयमोचका ॥ २ ॥ दिनकरकुळमंडणा । भवभयमूळखंडणा ॥ ३ ॥

राग मारु [ १९३

॥ धृ० ॥ दीनवदन तुझें बाळ मी रामा ॥ ध्रु ॥ समर्थाचें पोसिलें दुर्बळीं पांगिलें । तैसीपरि केली आजि दयाळें ॥ १ ॥ विषयांच्या भरें मोह दंडित । कामें अनहित जालें ॥ २ ॥ दिनकर तुझें सानुलें बाळ । उबगोनि पराधिन केलें रे ॥ ३ ॥

राग पावक [ १९४

निद्रेसंगें सर्व निशा क्रमली । तेथें उरी कांहीं नाहीं उरली । दिवसा व्यासंग घाला घाली । नव्हे आराणुक घडी येकि केली रे ॥ १ ॥ धृ० ॥ प्राणिया कैसें घडेल सार्थक । रात्रिदिवस ऐसा चि गेला देख । द्रव्यदारेचें न सुटे मुख । वाचे न ये कधीं रघुनायक ॥ ध्रु ॥ आतां पाहातां बाळपण लीळा । तेथें खेळतां चि काळ क्रमला । सुखदुःखाचा योग लागला । कैसा अज्ञानें जीव भ्रमला रे ॥ २ ॥ पुढें तारुण्यदशा पातली । तेथें मदगर्वें गुढी उभारिली । नस्ती अहंबुद्धि थोर ठाकली । तिणें स्वहिताची पट्टधुळी केली रे ॥ ३ ॥ थोर वार्धक्यदशा दारुण । तेथें न सोडी चिंता पापिण । दिवसेंदिवस इंद्रियें होतीं क्षीण । तेणें चळे बुद्धि होये विलक्षण रे ॥ ४ ॥ ऐसा सर्व आयुर्दाय क्रमला । जैसा आला प्राणी तैसा चि गेला । कांहीं सार्थकविचार नाहीं केला । ह्मणे दिनकर धिग्य तो चि ज्याला रे ॥ ५

राग पावक [ १९५

आजि तनु मनु धनु निजभावें । येका सद्गुरूसी शरण जावें । तेथें स्वहित घडेल स्वानुभवें । नित्य अखंडस्वरूपीं रमावें रे ॥ १ ॥ धृ० ॥

---

१ सोडून दिलें. २ तृप्ति. ३ प्रसिद्धि मिळविली. ४ खोटी. ५ पट्टाधूळ=धुळधाण, ६ आयुष्याचें प्रमाण, माप. ७ जन्मला.

साधका नवल तेथील गोडी । वाचे बोलतां पडे मुरकुंडी । आतां सांगावें तें कवणें प्रौढीं । जेथें वेदांची वाचा जाली वेडी रे ॥ ध्रु ॥ शुक वामदेव व्यास वाल्मिक । ध्रुव प्रल्हाद अंबरुषी देख । अति तत्पर सनकादिक । ते हि लोधले भोगितां सुख रे ॥ २ ॥ तीव्र प्रभा रवीची दारुण । चंद्रकळा सीतळ परिपूर्ण । पद देऊनि दोघां समान । पूर्ण वसविलें अग्निस्थान रे ॥ ३ ॥ तेथें दिवस्पतीविण दिनराति । प्रभेविण प्रभा पूर्णज्योति । ध्यानेंविण अखंड ध्यानमूर्ति । जपेंविण जपाची उठे स्फूर्ति रे ॥ ४ ॥ धन्य सद्गुरुपदप्रसाद । ज्यांसी लाधला ते चि अभेद । जाला निर्द्वंद स्वरूपावबोध । दिनकरा स्वरूपीं आल्हाद रे ॥ ५ ॥

राग पावक [ १९६

[1]वराचें वरपण नेहटूनि[3] पाहातां नयनिं स्थिरावली बुद्धि वो । टकमक लागली तो नवलाव[4] योजितां सर्वांग नयनाचा वेधीं वो ॥१॥ ध्रु० ॥ बाइये मीपणेंसीं सोहंपण विघडोनि घडलें आपआपणामाजीं योजा वो ॥ ध्रु ॥ वेधाच्या वेधपणें वेधवृत्ति योजिली सर्वांगें नपुंसक बाई वो । लव[5] पळ घडि विल जवळुनि दुरि तो हालों नेदी करूं आतां काई वो ॥ २ ॥ येणें जाणें घेणें देणें खाणें पिणें अवघें दुजेंपणें तयां पाहों नेदी वो । अगुणाचा दैवगुणें लाधलिये बाइये कुळ गणगोत कैंची आदी वो ॥ ३ ॥ आदि कीं अनादि पाहातां पाहातेंपण नुरवी मायबापें दिल्हें याचां हातीं वो । तधीपासुनि मायामाहेर खुंटलें आपण चि आदिमध्यअंतीं वो ॥ ४ ॥ लक्षणेंसीं ठाणमान[6] गुण वय बोलतां तरि येणें शब्द निवटिलॆ[7] वो । ठाईंचे ठाईं कांहीं आठवेना नाठवे बोलतां चि मौन्यवेष दिल्हा वो ॥ ५ ॥ अवस्थात्रई[8] येके सेजे ऐक्यें रमतां आपणासी स्पर्शों नेदी कधीं वो । येणें योगें येके वेळे संतति वाढली त्रिभुवनाऐसी जाली वृद्धि वो ॥ ६ ॥ संतति हे माझां पोटीं पाहें

---

१ चिकटले, झोंबले. २ सूर्य. ३ लक्ष लावून, निरखून. ४ नवलाई, नवलपरी. ५ क्षण. ६ शरीराकृति. ७ निर्मूल, नाहींसा करणें. ८ जागृत, स्वप्न, सुषुप्ति.

जवं शुद्ध दृष्टी तवं मी पतीचां पाठीं बाळाला वो । दिनकरा रामदासीं ऐसी परी जाहाली अनुभवेंविण गटंगोळा वो ॥ ७ ॥

राग पावक [१९७

सजीव चि निर्मणें निमोनियां वांचणें जिणें मरणें मूळ मिथ्या रे । सद्गुरूचे कृपेनें ऐसीं साक्ष लक्षणें तयाविण नको करूं कुंथ्या रे ॥ १ ॥ धृ० ॥ खेळिया आपआपणांतें पाहें रे । उरीसीं झगटोनि जाई रे ॥ छ ॥ तुझें तुज चोरलें तें जवं नाहीं देखिलें तवं तुज भलें येणें जाणें रे । नरदेह लाधलें तेथें जैं हें चुकलें तैं अध:पातीं ठेलें ठाणें रे ॥२॥ होय नव्हे संतसंगेंविण सीण खेळिया खेळसी तैं येसील डौया रे । सावध सावध व्यवधानें न पुरे सेवीं तूं सद्गुरुपायां रे ॥ ३ ॥ आदिनाथ मीन गैनी गोरक्ष चांगदेव शिवादिक सिद्ध भले भले रे । प्रवृत्तीसी जाळुनी निवृत्तीसी निवविलें निमोनि ज्यालें दार्दुलें रे ॥ ४ ॥ पालथीये दिठिणें देखवीं तें देखणें देखिलियां सुखीं सुख जाणें रे । दिनकरा रामदासीं सजीव चि मरणें अनुभवीं हे खुण बाणे रे ॥ ५ ॥

राग देशांक [१९८

धावें कारुण्यसिंधु । निरसीं हा भवबाधु ॥ छ ॥ बळें छळी हळाहळें जीव करी चळबळ विकळ सकळ देह तळमळी जाणें ॥ १ ॥ तळतळ करी तनु तगमग भारी । कैसी तुज करुणा न ये चापधारी ॥ २ ॥ तगतग भगभग अंतरीं मोठी । धगधग धडकत जळित कंठीं ॥ ३ ॥ सगबग सगबग करचरणाची । अविचळ चंचळ गति करणाची ॥ ४ ॥ जळेंविण मीन भूमीं तडफडी रामा । तैसी गति मज परि ये सुखधामा ॥ ५ ॥ हरहर तरतर बहुतर जाली । विश्रामधामा त्वरें धांव घाली ॥ ६ ॥ करुणाकर रघुवर वरदानी । दिनकरा अभय दे धांव निदानीं ॥ ७ ॥

---

१ प्रकार अथवा गोष्ट. २ घोंटाळा. ३ लयास जाणें. ४ तुझ्यावर डाव येईल, तूं हरशील. ५ लक्ष. ६ मच्छेंद्रनाथ. ७ जन्मले. ८ स्वामी, ९ देखणें, पाहणें. १० विष. ११ इंद्रियांची.

राग देशांक [ १९९

तें चि माझें धरणें । जें प्र्‍हादाकारणें ॥ध्रु॥ सर्व असो मज फार कळेना । विष सेउनि शिव जेणें जळेना ॥ १ ॥ जेणें गजेंद्र स्वरूपनिवासी । पापी अजामिळ वैकुंठवासी ॥२॥ काशीवास निवास जयांसी । तारक जें शिव सांगे तयांसी ॥ ३ ॥ दशरथ लग्नसमंधासि जातां । सागरीं बुडतां तरला जें ध्यातां ॥ ४ ॥ गणिकादोष सुलक्षण-राशी । जें स्मरतां तिज मोक्षमिरासी ॥ ५ ॥ गौतमश्रापशिळाअघ-हारी । जें जळधीवरि पर्वत तारी ॥ ६ ॥ तें चि निरंतर नाम हरीचें । धरि दिनकर मनिं सार सुखाचें ॥ ७ ॥

राग देशांक [ २००

॥ ध्रु० ॥ पावें जानकीरमणा । दुर्धर दुर्गतिशमना ॥ ध्रु ॥ मुनिजनमनरंजन रघुनाथा । निष्ठुर केवि तुं शिवसनाथा ॥ १ ॥ कां मज कामजळांबुजें[1] यावा । यक्षेणपक्ष[2] तो कां दुरि जावा ॥ २ ॥ सज्जन जन गंजनपण[3] घेतां । नैधनगति[4] मज ते चि पाहातां ॥ ३ ॥ अपराजितसुख[5] सोडुन कामीं । रंगतरंग[6] करीं हिनकामीं ॥ ४ ॥ दिनकरवंशविराजविराजा । सर्व क्षमा करीं मज माहाराजा ॥ ५ ॥

राग देशांक [ २०१

॥ धृ० ॥ ह्मणउनि निर्भय आहें । जें जें होय तें तें पाहें ॥ध्रु॥ करुणाकर रघुवर वरदानी । आदि मध्य मज तो चि निदानीं ॥ १ ॥ सकळ चराचर जो रचि नाशी । तो जगदीश सदा मजपासीं ॥ २ ॥ अष्टकुळाचळ सागर जाती । परि तो हरि निश्चळ आदिअंतीं ॥ ३ ॥ नाशति पंचभुतें त्रिगुणेंसीं । ग्रासुनि शून्य असे अविनाशी ॥ ४ ॥ दिनकरा रामकृपामृतलेशें । भय निर्भयसम भासत कैसें ॥ ५ ॥

---

१ ‘ जळां ’ पुढील ‘ बुज ’ हीं अक्षरें अस्पष्ट आहेत. त्यामुळें अर्थ काय असावा समजत नाहीं. २ कदाचित् ‘ ईक्षण ’ चा अपभ्रंश तर नव्हे ? ३ निकृष्टा-वस्था स्वीकारली. ४ निधनगति. ५ अजिंक्य. ६ माया.

राग अहेरी [ २०२

माता राम पिता राम बंधु श्रीराम । जन राम वन राम गण श्रीराम ॥ स्वामी राम सखा राम विश्राम राम । वित्त राम चित्त राम गोत्र श्रीराम ॥ १ ॥ धृ० ॥ श्रीराम जयराम नामें उच्चारा । नरदेहीं उरी न ठेवा संसारा ॥ ध्रु ॥ इष्ट राम मित्र राम सोयरा राम । स्वार्थ राम सहज राम सज्जन राम ॥ धन राम धान्य राम भोक्ता श्रीराम । दाता राम घेता राम परमार्थ राम ॥ २ ॥ स्नान राम संध्या राम जप श्रीराम । ध्यान राम ज्ञान राम तप श्रीराम ॥ भाव राम भजन राम भक्ति श्रीराम । दिनकरा रामींरामदासीं श्रीराम ॥ ३ ॥

राग कामोद [ २०३

॥ धृ० ॥ रामरंगणीं रंग मना रे । रंग मना रे ॥ स्वयें तरोनी तारिं जना रे ॥ ध्रु ॥ संसार हा घोर थोर आहे रे । आहे रे ॥ घाला घालुनि जावें पाहे रे ॥ १ ॥ पळेंपळ निर्फळ न जावें रे । न जावें रे ॥ सफळ सकळ जिणें व्हावें रे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे निज मना रे । निज मना रे ॥ भज राम सोडीं अभिमाना रे ॥ ३ ॥

राग कामोद [ २०४

घडिघडीं जातो काळ वायां रे । वायां रे ॥ भज लवलाहें राम-पाया रे ॥ १ ॥ धृ० ॥ राम हा विश्राम भक्तजना रे । भक्तजना रे ॥ स्वयें शिव सांगे त्रिभुवना रे ॥ ध्रु ॥ स्वहितीं तत्पर व्हावें मना रे । मना रे ॥ विचारें वारावी भवभावना रे ॥ २ ॥ समर्थाची कास ज्यासी लाधे रे । लाधे रे ॥ दिनकरा कैवल्य त्यासी साधे रे ॥ ३ ॥

राग कामोद [ २०५

चोरीमारी करी पोट भरी रे । पोट भरी रे ॥ पापपुण्य कांहीं न विचारी रे ॥ १ ॥ धृ० ॥ ऐसा प्राणी थोर अपराधी रे । अपराधी रे । पूर्वजांसी नर्कवास साधी रे ॥ ध्रु ॥ सज्जनाचा अपमान करी रे । करी रे ॥ कर्म धर्म निंदी परोपरीं रे ॥२॥ होय तें चि नव्हे ह्मणे

बळें रे । बळें रे ॥ वृत्तीचे उछेद करी सळें रे ॥३॥ विश्वास दाउनी घाली घाला रे । घाला रे ॥ सितरुनी मारी स्त्रियां बाळां रे ॥ ४ ॥ ऐसे इसाळ करी पापी रे । पापी रे ॥ आपुले अवगुण सर्व लोपी रे ॥ ५ ॥ करूं नये तें चि करूं लागे रे । लागे रे ॥ दुष्कर्म करितां हि न भागे रे ॥६॥ दिनकर ह्मणे त्राहे त्राहे रे । त्राहे रे ॥ दृष्टाचे स्वभाव कोण पाहे रे ॥ ७ ॥

राग कामोद [२०६

आनंदें आनंदकंद वंदा रे । वंदा रे ॥ स्वानंदें अभेद भेदीं भेदा रे ॥१॥ धृ० ॥ सद्गुरुप्रसाद जरी लाधे रे । लाधे रे ॥ तरि च असाध्य वस्तु साधे रे ॥ ७ ॥ सद्वृत्ति सद्बुद्धिबोधें बोधें रे । बुद्धि बोधें रे ॥ स्वहित विहित निजवेधें रे ॥ २ ॥ श्रवणें मननें निजध्यासें रे । निजध्यासें रे ॥ समाधान बाणे अनायासें रे ॥३॥ सच्चिदानंदपद भेदें रे । पद भेदें रे ॥ भेदीं अभेदसुख स्वानंदें रे ॥ ४ ॥ सहजीं सहज सर्व चाले रे । सर्व चाले रे ॥ सहजें चि दिनकर बोले रे ॥ ५ ॥

राग कामोद [२०७

सद्गुरुप्रबोधें बोध मना रे । बोध मना रे ॥ सोडीं त्रिविधं साभिमाना रे ॥१॥ धृ० ॥ तत्त्वमसि वाक्य परंपरा रे । परंपरा रे ॥ विचारीं विचारें मूळ ॐकारा रे ॥ ७ ॥ अहं सोहं विवर्जित घेई रे । घेई रे ॥ सस्वरूपीं लयलीन होई रे ॥ २ ॥ सांगतां उन्मन मन जालें रे । मन जालें रे ॥ सुखासी स्वसुख सेऊं लागलें रे ॥ ३ ॥ दिनकर ह्मणे धन्य मना रे । धन्य मना रे ॥ तुझेनि पावनपण दीना रे ॥ ४ ॥

राग कामोद [२०८

बळें सबळ राम दानीं रे । निदानीं रे ॥ ऐसा न दिसे विंदानी रे ॥१॥ धृ० ॥ अभिनव कीर्ति तिहीं लोकीं रे । अवलोकीं रे ॥ ७ ॥

---

१ वृत्ति=स्फुरण, स्वस्वरूपाची मूळ आठवण. २ सळ=अभिमान, छळ, वैर. ३ फसवून. ४ इसाळु=ब्रह्मराक्षस, भूतबाधा. ५ भागणें=दमणें, थकणें. ६ दृष्ट=अनुभव. परंतु या ठिकाणीं कदाचित् 'अदृष्ट'=दैव हा अर्थ असावा. ७ सात्त्विक, राजस व तामस. ८ कुशल.

रे । सदाशिव स्वयें जें विलोकी रे ॥ ध्रु ॥ चरणें पावन श्रापशिळा[1] रे । दुशिळा रे । पूर्वापर जाली ते सुशीळा रे ॥२॥ मुनिजन येधलेसे वेधीं रे । निजबोधीं[2] रे । सर्वकाळ सोडुनि निषेधीं रे ॥ ३ ॥ शुकमिसें गणिका विमानीं रे । साभिमानी रे । पुराणीं प्रसिद्ध जन मानी रे ॥ ४ ॥ अजामिळ नारायणनामीं रे । अनामी[3] रे । दासामाजीं केला सुनामी रे ॥ ५ ॥ नामें चि प्रल्हाद दैत्यकुळीं रे । अकुळी रे । कुळीन तो जाला दासकुळीं रे ॥ ६ ॥ दिनकर रामीं रामदासीं रे । पदांसी रे । रतला होऊनि उदासी रे ॥ ७ ॥

राग कामोद [ २०९

॥ ध्रु० ॥ सोसवेना अतिशय राघवासी । राघवासी । सोडीं प्राण्या अविद्येच्या लाघवासी ॥ ध्रु ॥ अतिशय केला बहु रावणानें । बहु रावणानें । तयासी कोण गति केली पावनानें ॥ १ ॥ अतिशयें बहु जीव नाडियेले । जीव नाडियेले । बहुविध अधःपातीं पाडियेले ॥२॥ अविद्येचा थायाँ घेणें कोठवरी । प्राण्या कोठवरी । आयुष्य वेंचलें त्याची कोण परी ॥ ३ ॥ दंड धडकिल जेव्हां दंडधारी । जेव्हां दंड-धारी । तेव्हां त्याचा हात तुझें कोण धरी ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे मूर्खा सावधान । मना सावधान । रामनामस्मरणीं नको वेवधांन ॥ ५ ॥

राग कामोद [ २१०

धीर न धरे करूं काय कैसें । करूं काय कैसें । रामालागीं मन माझें जालें पिसें ॥ १ ॥ धृ० ॥ रामाचा वियोग मज साहवेना । मज साहवेना । युगासम क्षण आतां कंठवेना ॥ ध्रु ॥ न भासे साभास माझा राम कोठें । माझा राम कोठें । पाहातें पाहाणें वाटे सर्व खोटें ॥ २ ॥ दिनकरवंशाचें मंडन संतसंगें । पाहातां संतसंगें । संयोगीं वियोग जाला प्रासंयोगें ॥ ३ ॥

---

१ गौतमाच्या शापानें शिळा बनलेली अहल्या. २ आत्मज्ञानांत. ३ अप्रसिद्ध. ४ रत झाला. ५ अतिप्रसंग. ६ पतितपावन रामानें. ७ छंद. ८ गोष्ट. ९ यम. १० व्यवधान=पडदा, अडथळा. ११ दैवयोगानें.

राग परज [ २११

॥ धृ० ॥ भाग्य सफळ रे । जनाचें भाग्य सफळ रे ॥ छ ॥ हरिजन गायन करिती कीर्तन । नाम मुखीं करवादन करें ॥ १ ॥ श्रवणें मननें बाणे समाधान । पूर्ण साक्षात्कारी जालें रे ॥ २ ॥ दिनकरा धन्य सज्जनसंग । संगें चि निःसंग होणें रे ॥ ३ ॥

राग परज [ २१२

॥ धृ० ॥ तरी च साधे निधान । सजना तरी च साधे निधान ॥ छ ॥ जरी कृपा करि सद्गुरुनाथ । यथार्थ आत्मज्ञान ॥ १ ॥ श्रवण मनन शास्त्रविचारें । निजध्यासें समाधान ॥ २ ॥ दिनकरा पूर्ण साक्षात्कारीं । उडे भवभयभान रे ॥ ३ ॥

[ २१३

ब्रह्मांडमंडळीं ऊर्ध्वमुख तळुली[2] ते दाटली निर्यळ जळें रे । तेथ बहुत वृक्षवल्ली निबिड साउली त्यां लगडलीं दाट पुष्पफळें रे ॥ १ ॥ धृ० ॥ खेळिया अचोज स्थळ तें न चोजवे सहसा चोजविती ते धन्य खेळे रे । तेथील निर्मळ अद्वैतजळ तें विवेकें सेविती सोहंमेळें रे ॥ छ ॥ दोनी सात नारेळी तीन पांच केळी त्या अऱ्हांपऱ्हां तीरसंमेळीं रे । बहुत सदटा अत्यंत निकटा सफळित केळी नारेळी रे ॥ २ ॥ मध्यजळीं नलिनी[3] सुधारसें पाल्हेली[4] अमल कमळें विकासलीं रे । तेथें सिद्धअळी[5] सोहंपराग सेविती गुंजती रुणुझुणु मेळें रे ॥ ३ ॥ मीन जळीं तिरती[6] खग फळें सेविती वनचर विचरती तीरीं रे । मयुरें सारसें कोकिळा कुंजती न ये तेथें काक दुराचारी रे ॥ ४ ॥ हंसदळें चुंबिती बाह्य रस सेविती भले अळी सर्वाविशेषीं रे । असाध्य स्थान परि सिद्ध साध्य साधलें दिनकरा रामींरामदासीं रे ॥ ५ ॥

राग शंकराभरण [ २१४

॥ धृ० ॥ सद्गुरुजनकें वैद्य । प्रबोध आणिला सद्य । ब्रह्मरस-

---

१ टाळी वाजवणें. २ तळीं. (?) ३ कमलिनी. ४ विस्तारली. ५ भ्रमर. ६ पोहती.

शास्त्रप्रतिपाद्य । दिल्हीं अर्द्धमात्रा ॥ ध्रु ॥ जीवरोगी साजावला[1] । अर्धमात्रा सेऊं लागला । भवरोगालागीं मुंकला । आरोग्य जाला ॥ १ ॥ प्रथमदशेसी पथ्य । वैद्य सांगे इदमेथ्य[2] । विचारूनि भवविपथ्य । त्यक्त करावें ॥ २ ॥ अखंड साधनध्यासें । सेवावें तें चि निशेषें । न शिवावें स्नेहमानसें । रजैराईतें[3] ॥ ३ ॥ साधन साध्यासी आलें । पथ्य हि संपूर्ण जालें । भव आणि विभव शमले । सहजस्थिति ॥ ४ ॥ सद्गुरुजनक होये । तरि च दिनकरा सोये । नाहींतरी भवअपाये । जडती आंगीं ॥ ५ ॥

राग शंकराभरण [ २१५

॥ ध्रु० ॥ भवभ्रमें वृत्तिशून्य । होऊनि बोले जघेन्य[4] । प्रत्यक्षतें करी अमान्य । अहंमन्यपातें ॥ ध्रु ॥ आत्मशुद्धि सोडूनियां । मी मी माझें जल्पे वायां । नोळखे संत सज्जन सखयां । मदगर्वें घोरें ॥ १ ॥ नेणे पित्या सद्गुरूसी । नेणे माते सद्भक्तीसी । नोळखे बहिणी दयेसी । शांति स्त्रियेसी ॥ २ ॥ तापत्रयें धडधडी । विषयांची मागे कढी । विषमता होतां बडबडी । देहांतवरी ॥ ३ ॥ नोळखे प्रबोधवैद्या । बोधमात्रा ने घे सद्या । भरलीसे आंगीं आविद्या । व्याधीच्या गुणें ॥४॥ ऐसा प्राणी भवरोगी । जीवें जीत-नर्क भोगी । दिनकर ह्मणे अभागी । जाला नरदेहीं ॥ ५ ॥

राग शंकराभरण [ २१६

॥ ध्रु० ॥ कितीयेक भ्रमें जन । भ्रमलेसे वायांविण । न करी सार्थकसाधन । सिणे कार्येंविण ॥ ध्रु ॥ घर माझें जन माझें । रात्रीदिस वाहे वोझें । परि हित कांहीं न बुझे[5] । धनदारेहातीं ॥ १ ॥ वोतारियाच्या गाढवा । जेवि नसे विसांवा । तेवि प्रपंच वाहावा । करी सर्वकाळ ॥२॥ भ्रमतां चि गेला दिस । रात्रीं निद्रा सावकाश । आराणुक[6] नव्हे प्राण्यास । स्वहितालागीं ॥ ३ ॥ सेखीं जाये मरोनियां ।

---

१ सांवळला ( 'जाजावणें'च्या उलट. ) . २ इदम्+मिथ्य=इदमीथ्य ? ३ धनाचा कण असो किंवा मोठा पर्वत असो. ४ निकृष्ट, अधम. ५ जाणत नाहीं. ६ तृप्ति.

घरीं राहे पुत्र जाया । कृतकर्मभोगीं सोडाया । न येती कोण्ही ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे प्राणी । जन्मोनियां केली हानी । धन्य येक ते त्रिजनी । जे हरिभजनी ॥ ५ ॥

राग शंकराभरण [२१७

॥ धृ० ॥ बहू दिस हिंपुटी । जालों देवा मायेपोटीं । पुरे आतां जगजेठी रे । दयाळा ॥ छ ॥ त्रिभुवन शोधितां । न दिसे सुखवार्ता । तुजवीण सर्वथा रे । दयाळा ॥ १ ॥ क्षणक्षणा संतप्त । करिती हे त्रिताप । छेदीं संदेहपाप रे । दयाळा ॥ २ ॥ कवणाचा भरंवसा । मानूं आतां जानकीशा । संसारिक दुर्दशा रे । दयाळा ॥ ३ ॥ करुणासागर देवा । जरि होसी राघवा । तरि नको इछूं[1] सेवा रे । दयाळा ॥ ४ ॥ दिनकर दैन्यवाणें । केलें ये कल्पनेनें । खंडीं प्रबोधबाणें[2] रे । दयाळा ॥ ५ ॥

[२१८

अद्भुत नामाची करणी । स्वयें जाणे शूळपाणी । विषबाधा हरली ततक्षणीं ॥ १ ॥ धृ० ॥ या रामनामें ॥ छ ॥ उफराटें नाम स्मरला । वाल्हा वाल्मिकमुनि जाला । शतकोटी रामायण वदला ॥ २ ॥ दोषांची वसती भूमिका । थोरल्या नामाची गणिका । शुकमिसें नेली परलोका ॥ ३ ॥ उदकीं बुडती ज्या शिळा । दुजयासी नेती तळा । शतयोजन सागर त्या तरल्या ॥ ४ ॥ नामाचा महिमा ऐसा । वर्णवेना विधिहरशेषा । दिनकर ह्मणे मज निश्चय हा ऐसा ॥ ५ ॥

[२१९

संसारसागरीं तारु फुकाचें । प्रसिद्ध महिमेचें ॥ १ ॥ धृ० ॥ नाम रघुत्तमाचें । तुम्ही स्मरा वाचें ॥ छ ॥ जें मुख्य साधन योगेश्वराचें । माहेर सद्गतीचें ॥ २ ॥ जें विघ्ननाशक भवभ्रमाचें । दिनेश म्हणे साचें ॥ ३ ॥

[२२०

॥ धृ० ॥ ध्याई मन राम राम राम । शिवहृदयविश्राम ॥ छ ॥

१ माझ्या सेवेची अपेक्षा. २ आत्मज्ञानरूप बाणानें.

योगिमुनिजना मानसीं उपरम । सेविती सुखागमधाम ॥ १ ॥ गंगा यमुना त्रिवेणी संगम । नेमुनियां प्राणायाम ॥ २ ॥ दिनकर दीनदयार्णव अंतरीं । निरंतर देव निष्काम ॥ ३ ॥

राग पावक [ २२१

ज्यांच्या दर्शनें सन्मार्ग लागे । सर्व चिंता व्यथा भय भंगे । न्यायनीतीसीं स्वधर्म जागे । बाणे समाधान नैष्कर्म्ययोगें ॥ १ ॥ धृ० ॥ सज्जना काय सांगों नवलपरी । ज्यांचे कृपेची अनुर्वाच्य थोरी ॥ ७ ॥ ज्यांच्या संगें विवेक वैराग्य । आंगीं बाणत विज्ञानयोग । घर रिघे[4] क्षमेचें सौभाग्य । लागे भक्तिभाव यथायोग्य ॥ २ ॥ ज्यांच्या संभाषणें ज्ञान विज्ञान । प्राप्त होये स्वरूपसमाधान । भेटि आपआपणा द्वैतेंविण । न बोलवे ते गति गहन रे ॥ ३ ॥ ज्यांचें दर्शन स्पर्शन संभाषण । भाग्या लागलें जयासी घडे पूर्ण । तें चि भूमंडळीं पुण्यभाजन । ज्यासीं अखंड सज्जनभजन रे ॥ ४ ॥ या सज्जनांचा महिमा थोर । कोण जाणे अनंत अपार । जे मूर्तिमंत निर्विकार । त्यांचा पदरज ह्मणे दिनकर रे ॥ ५ ॥

[ २२२

॥ धृ० ॥ या सद्गुरूचें कैसें उत्तीर्ण होईजे । उत्तीर्ण होणें न दिसे ह्मणउनि लाजे ॥ ७ ॥ सद्भावें जरि तनु मनु धन अर्पिजे । तरि तें माझें कल्पितां चि भवीं बुडिजे ॥ १ ॥ कांहीं अर्पूं जरि देहसंपदा । तरि निवेदिलें[6] देह च्यान्ही स्वामीच्या पदा ॥ २ ॥ कांहीं दुजेपणें जरि कल्पावें । भजतां चि सर्व भिन्न पडावें ॥ ३ ॥ आतां उगें चि मौन्य धरावें । ह्मणिजे जणों जालें सर्व स्वभावें ॥४॥ दिनकर ह्मणे नवल पाहिलें । निःशब्दपणें मौन शब्दासी आलें ॥ ५ ॥

राग रामक्री [ २२३

॥ धृ० ॥ ये बाइये माझे मनीं रघुराज । जया शोभे सीता भाँज ॥ ७ ॥ आसनीं शयनीं अनु नेणें भोजनीं । जनीं वनीं विजनीं

---

१ शांति. २ ज्या सज्जनांच्या. ३ कर्ममुक्त झाल्यानें, आत्मज्ञानानें. ४ घरीं चालून येतें. ५ पात्र, ६ अर्पले, स्वाधीन केले. ७ भार्या. ८ इतर किंचित हि.

॥ १ ॥ श्रवणीं नयनीं अंतःकरणीं । निरंतर स्मरणीं ॥ २ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति निदानीं । दिनकरवरदानी ॥ ३ ॥

राग रामक्री [ २२४

॥ धृ० ॥ श्रीरामनाम स्मरणीं स्मरें रे नरा । जडां तारी जें वान्नरां ॥ छ ॥ माझें गेह न ह्मण देह दारा । काळ करील विदारा[1] ॥ १ ॥ मिथ्या जगडंबर गर्वगारा । धन जन सोडीं फुगारा ॥ २ ॥ दिनकर ह्मणे करिसी नखरा । तरी तुज सीण खरा ॥ ३ ॥

राग धनाश्री [ २२५

॥ धृ० ॥ सदाशिव मनीं धरीं मनुजा । सोडीं जाया अनुजा[2] । ॥ छ ॥ बहुकाळ गेला भोगितां यातना । नोळखतां सनातना ॥ १ ॥ नरदेह सार पुढें न लाहे । हित करीं लवलाहें ॥ २ ॥ दिनकर म्हणे सिकविलें अनुभवीं । न बुडे सत्य तो भवीं ॥ ३ ॥

राग धनाश्री [ २२६

॥ धृ० ॥ बाइये आत्मा सर्वांसी सारिखा । कोण्हासी नव्हे पारिखा ॥ छ ॥ नेणे दारा नर चाळी जगदांतर । सानें थोर निरंतर ॥ १ ॥ सकळ चराचर जड चंचळ आहे । अंतरात्मा चि पाहें ॥ २ ॥ दिनकर म्हणे जाणे तो अनुभवी । नेणे तो बुडे भवीं ॥ ३ ॥

राग मालश्री [ २२७

॥ धृ० ॥ दिनाचा तो चि करी प्रतिपाळ ॥ छ ॥ जेणें हरि हर इंद्र विधि भास्कर । निर्मिले सागर दिग्पाळ ॥ १ ॥ चंद्र तारा मेरु धराधर[3] मरुद्गण । जेणें केले हे भूपाळ ॥२॥ रची चराचर जाळी प्रति-पाळी । दिनकरस्वामी कृपाळ ॥ ३ ॥

राग भैरव [ २२८

॥ धृ० ॥ ध्याईं मन भक्तजनलालन ईश ॥ छ ॥ करुणाकर शंकर शशिशेखर । विश्वंभर जगदीश ॥ १ ॥ गौरीवर गंगाधर गिरि-वर । त्रिपुरांतक त्रिपुरेश ॥ २ ॥ अपरांपर हर कर्पूरगौर । मदनांतक

---

१ विदारण अगर नाश. २ धाकटे बंधु. ३ पर्वत, शेष.

भुवनेश ॥ ३ ॥ परमेश्वर जगदीश्वर ईश्वर । असुरांतक अमरेश ॥ ४ ॥ दिगांबर स्मरे दिनकर किंकर । भवांतक जो परेश ॥ ५ ॥

राग बिलावल [ २२९

॥ धृ० ॥ घडिघडी आठवे मनीं । घननीळतनु कोदंडपाणी ॥ छ ॥ चरणीं श्रीदावळी । कासे सोनसळा । किंकिणी मेखळा कटीं ज्वाळमाळा ॥ १ ॥ वैजयंती कंठीं नवरत्नमाळा । हृदईं जडित पदक फांकती किळा ॥ २ ॥ श्रवणीं कुंडलें मुकुट मस्तकीं । कोटीकाम सरी न पवे मुखीं ॥ ३ ॥ मृगनाभीटिळा शोभे ललाटीं । बावन चंदनें सर्वांगीं उटी ॥ ४ ॥ परिमळद्रव्यें दाटे धूशर । अद्भुतगंध सेवी दिनकर ॥ ५ ॥

राग बिलावल [ २३०

॥ धृ० ॥ माझे मनीं च्यापपाणी । अनु तें हि नेणे तयावांचूनि ॥ छ ॥ ध्यानीं ज्ञानीं अंतःकरणीं । न भासे दुजें आसनीं शयनीं ॥१॥ श्रवणीं नयनीं घ्राणीं स्पर्शनीं । रसनारस सेवितां भोजनीं ॥ २ ॥ विधिनिषेधीं देहीं विदेहीं । दिनकर ह्मणे तो चि तो पाहीं ॥ ३ ॥

राग पावक [ २३१

॥ धृ० ॥ राम जीवाचें जीवन । राम विश्वाचें भूवन रे ॥ छ ॥ राम दासांचा विसावा । रामीं वियोग नसावा रे ॥१॥ राम योगाचें मंडण । राम संसारखंडण रे ॥ २ ॥ राम सर्वांचें सेव्यन । रामीं दिनकर पावन रे ॥ ३ ॥

राग कामोद [ २३२

सुरवर मुनि । ध्याती मनीं । स्तविती वेदध्वनी । विधिहर ध्यानीं । तन्मयकरणीं । स्मरती च्यापपाणी ॥ १ ॥ धृ० ॥ राम चिंतनीं । तारक जनीं ॥ छ ॥ कृतनिर्वाहें । निजसुख लाहें । कीजे तरणोपायें । क्रूर भव आहे । दुर्धर पाहें । निश्चळ होउनि राहें ॥ २ ॥

---

१ भवन=अस्तित्व, उत्पत्ति. २ पीतांबर. ३ कटिसूत्र. ४ ज्वाल=तेजस्वी. ५ प्रभा. ६ कोट्यावधी मदनांचें तेज. ७ कस्तुरीतिलक. ८ सुगंधी द्रव्य. ९ सर्वांनीं सेवा करण्या योग्य. १० तन्मय होऊन.

चंचळ मनीं । होतां हानी । निश्चय वेदपुराणीं । दिनकर चरणीं । जोडुनि पाणी । नित्य लोटांगणीं ॥ ३ ॥

राग काफी [ २३३

॥ धृ० ॥ करुणालया रे रामराया ॥छ॥ चौऱ्यासी लक्ष दुस्तर योनी । कैसें कीजे निस्तराया ॥ १ ॥ प्राकृत हीन पतित प्राणी । भवभयेभीति मराया ॥ २ ॥ दिनकर ह्मणे कृपा करुनियां । उपाय सांग तराया ॥ ३ ॥

राग काफी [ २३४

॥ धृ० ॥ मजमाजीं माझें निदान[1] ॥ छ ॥ कृपाळुवें श्रीसद्गुरुराजें । अंतरीं रचिलें विंदान[2] ॥ १ ॥ आगम निगम शोधिती नित्य जें । निरंतर अनुसंधानें[3] ॥ २ ॥ दिनकरा अपूर्व सद्गुरुकृपा । अनुर्वाच्य वरदान ॥ ३ ॥

राग कानडी [ २३५

॥ धृ० ॥ तें चि दीजे सद्गुरुराजें । अपराजित[4] महाराजें ॥ छ॥ वेद निरंतर स्तविती अगोचर[5] । गोचर नव्हे कधीं जें ॥ १ ॥ चराचरीं अनुपम्य परात्पर । अक्षर क्षर नव्हे जें ॥ २ ॥ दिनकर चरणीं होउनि सादर । मागत सनकादिकां जें ॥ ३ ॥

राग कानडा [ २३६

सद्गुरुसारिखें निधान सृष्टीं । असोनि कां तुज न दिसे दृष्टीं ॥ १ ॥ धृ० ॥ आतां तऱ्ही प्राण्या सावध होईं । काया वाचा मनें शरण जाईं ॥ छ ॥ शिवसनकादिक योगविलासीं । ज्याचेनि तो प्रभु कां भुललासी ॥ २ ॥ ब्रह्मादिक ज्याचे अंकित भावें । दिनकर ह्मणे तूं कां बुडसी कुभावें ॥ ३ ॥

राग पावक [ २३७

जन पाहे वरपंग । परि नेणे अंतरंग । ह्मणउनि नाश पावे । भोगी स्वर्गनर्कभोग ॥ १ ॥ धृ० ॥ त्राहे त्राहे जानकीशा । नको ऐसियांचा संग । योग देईं चरणाचा । त्यासीं नको गा वियोग ॥छ॥

---

१ कारण, रोगपरीक्षा, शेवट. २ कौशल्य, लक्षण. ३ ध्यान. ४ नेहमीं च यशस्वी. ५ अगम्य.

तोंड बळें नावरती । द्वेषिती देवधर्म । पाषांड गाजविती । मुखें ह्मणंती राम राम ॥ २ ॥ कळीमाजीं मान त्यांसी । ज्यांसी प्रीति नवरसीं । दिनकर ह्मणे सेखीं । जाणवेल काळपाशीं ॥ ३ ॥

राग पावक [२३८

प्रपंच सर्व खोटा । नाडिलें थोरथोरां । ब्रह्मादिक दास ज्याचे । लेखी कोण इतरां ॥ १ ॥ धृ० ॥ सावधान सावधान गा । सेवीं सद्गुरूचे पाये । पळेंपळ आयुष्यासी । नाश होतसे पाहें ॥ छ ॥ दुर्घट काळ खोटा । ब्रह्मांड ज्याचे दाढे[1] । इतरां पामरांचा । कोण केवीं[2] तयापुढें ॥ २ ॥ ऐसा परी ठाईं विरे[3] । गुरुकृपादृष्टि होतां । दिनकर ह्मणे वेगीं । प्राण्या नव्हे रे दुश्चिंता[4] ॥ ३ ॥

राग पावक [२३९

॥ धृ० ॥ अनाथ दीन तुझें दीनवछळा रामा । पाहासी काय माझें । हरहृदयविश्रामा ॥ छ ॥ बहुत पाहिलें रे । परि नेदी थार कोण्ही । अवघीं लांचखोरें । तुझ्या चरणावांचूनी ॥ १ ॥ पतित देखतां चि । तेथें घालिसी उडी । न पाहासी जाती त्याची । पावविसी पैलथडी ॥ २ ॥ दिनकररामदास । जे ऐसें बोलती जन । तें चि तें[5] साच करीं । कृपेचें भाषदान ॥ ३ ॥

राग पावक [२४०

सोडुनी रामनामा । गोष्टी जल्पसी अद्धमा । सुटला केवि जासी । सेवितां विषयकामा ॥ धृ० ॥ सावध नरदेहीं । जातें आयुष्य वायां । पळेंपळ साधीं बापा । मनीं धरीं रामराया ॥ छ ॥ येकलें चि येणें जाणें । देखतोसी जनाचारीं । सांग पां कोण तुझें । अंतकाळीं हित करी ॥ २ ॥ प्रपंच करीं सुखें । परि न विसंबे रामा । दिनकर ह्मणे अंतीं । जासी कैवल्यधामा ॥ ३ ॥

---

१ एवढें मोठें ब्रह्मांड तें हि जो काळ ग्रासून टाकतो. २ पाड, थोरी. ३ आपल्या ठिकाणीं च नाहींसा होतो, नाश पावतो. ४ खिन्नचित्त. ५ दिनकराला 'रामाचा दास' असें जें लोक ह्मणतात तें.

राग पावक [ २४१

रामनामाचीं अक्षरें दोनी । सोपीं सुगमें धरितां मनीं । कांहीं साक्षेप[1] नलगे जनीं । यासी साक्ष आहे स्वयें शूळपाणी रे ॥ १ ॥धृ०॥ सज्जना श्रीराम जयराम जपें। तुज बाधिजेना कळीकाळ कोपें रे ॥छ॥ नामें विष चि निर्विष होये । नामें पतित पावन पाहें । नामें निषेध उडोनि जाये । नाममहिमा अगाध आहे रे ॥ २ ॥ नाममहिमा नेणती श्रुति । जेथें शास्त्रें हि तल्लीन होतीं । तेथें किती पुराणविंत्पत्ति[2] । नाम अद्भुत सर्वसंमतीं रे ॥ ३ ॥ दिनकर ह्मणे भावें । येक रामनाम स्मरावें । दुजें साधन सोडूनि द्यावें । मुक्त जनीं वनीं विचरावें रे ॥४॥

राग पावक [२४२

॥ धृ० ॥ नेणवें रे नेणवें रे । नेणवें तें केवीं जाणवें रे ॥छ॥ नाइकवें कानीं । न पाहावें लोचनीं । न गमवें चरणीं । तें चि तें रे ॥ १॥ न चितवें चितनीं । न वदवें वदनीं । न धरवें धरणीं । धारणेतें[3] रे ॥२॥ दिनकरा ह्मणीं । सद्गुरुवांचुनी । तिहीं त्रिभुवनीं । ठाईं न पडे रे ॥३॥

राग पावक [ २४३

चुकतां मुख्य देवासी । जीव नोंडले[4] निश्चयेंसीं । जाती लवलाहें[5] अधःपातासी । जन्म फिरती लक्ष चौऱ्यासी रे ॥ १ ॥ धृ० ॥ सज्जना आतां चि सावध व्हावें । धनमदासी सोडूनि द्यावें । भावें संतांसी शरण जावें । ते सांगती तें अनुभवावें रे ॥ छ ॥ पळेंपळ जातसे वायां । वेगीं सोडीं तूं धन जन जाया । खोटी देहबुद्धि ममता माया । देईं टाकूनि संसारथाया[6] रे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे मुख्य देव । तूं चि आहेसी सदा शिव । भ्रमें भुलोनि कां होसी जीव । सोडीं सोडीं हें संकल्पलाघव[7] रे ॥ ३ ॥

राग काफी [ २४४

॥ धृ० ॥ सोवळें तें काई वोवळें तें काई । सोवळें वोवळें

---

१ यत्न, खटपट. २ व्युत्पत्ति=शास्त्रपठण. ३ बुद्धीला. ४ प्रतिबंधांत पडले. ५ सत्वर. ६ संसाराचा मोह, छंद. ७ कल्पनेचें जाळें.

स्वरूपीं नाहीं ॥ ध्रु ॥ भ्रमाचें सोवळें । भ्रमाचें वोवळें । जग नागवलें भ्रमाच्या मुळें ॥ १ ॥ सोवळें वोवळें देहाचिया माथां । देह जाला[2] त्याची कोण व्यवस्था ॥ २ ॥ सद्गुरूच्या बोधें होऊनियां शुद्ध । दिनकर ह्मणे मग सोवळें प्रसिद्ध[3] ॥३॥

राग वसंत [ २४५

॥ ध्रु० ॥ देखिला हरि । नयनीं देखिला हरि । यमुनापुलिनें[4]-विहारी । नयनीं० ॥ ध्रु ॥ कमळानन प्रभु पंकजलोचन[5] । घननीळ तनु साजिरी । मुगुट मस्तकीं कुंडलें श्रवणीं । भाळीं रेखिली कस्तुरी ॥ १ ॥ वैजयंती माळा कौस्तुभ[6] गळां । श्रीवत्स[7]पद उदरीं । ज्वाळ-माळ पीतांबर जघनीं । दैत्य रुळति तोडरीं ॥ २ ॥ कल्पवृक्षातळीं त्रिभंगी ठाण । वेणुवादन अधरीं । मोहित सुर नर योगी विद्याधर । तटस्त होउनि अंबरीं ॥ ३ ॥ गौ गोप गोपी व्रजजन पाहाती । होउ-नियां निर्विकारी । दिनकर ह्मणे धन्य गोकुळवासी । क्रीडत जेथें दनुजारि[8] ॥ ४ ॥

राग काफी [ २४६

विटाळें संभूति[9] विटाळें निर्गति[10] । वर्तता विटाळ लागे सर्वभूतीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ विटाळासी वोंळी[11] ऐसा न दिसे कोण्ही । येका सद्गुरु-चरणांवांचुनी ॥ ध्रु ॥ विटाळ घरीं विटाळ दारीं । विटाळ सरिसा[12] भरला अंतरीं ॥ २ ॥ विटाळ जागतां विटाळ निजतां । स्वप्नीं हि वि-टाळें लाविली चिंता ॥ ३ ॥ विटाळाचा भक्त विटाळाचा देव । विटा-ळाची गुणमयी माया सावेव ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे पुरविली पाठी । सेखीं निमाला गुरुकृपादृष्टीं ॥ ५ ॥

राग कामोद [ २४७

सासुरवासिनी दारां[13] । तूं येवं[14] कां नेदिसी दारां[15] । यांसी न

---

१ वुडालें. २ कशापासून उत्पन्न झाला. ३ अंतःशुद्धता हें च खरें सोवळें. ४ वाळवंट. ५ कमलनयन. ६ विष्णूच्या कंठांतील रत्न. ७ विष्णूच्या छातीवरील पांढरा केशमय भोंवरा(गीर्वाण लघुकोश). ८ दानवारि,दैत्यारि. ९जनन. १०मरण. ११ निरास करी. १२ एकसारखा, व्यापकपणें. १३स्त्रिया. १४येऊं. १५घरासमोर.

लावीं भेदरा । कृष्ण करिती तुझा विदारा ॥ १ ॥ मिळोनि अवघ्याजणी । धरिती तुज विजेनीं । तेंव्हां कोणाची मी घरपूजनी । कृष्णा करूं रे दिवसरजनी ॥ २ ॥ उगा राहे माझ्या बाळा । या अलगटा गोकुळअवळा । तुजसाठीं बहु सबळा । कृष्णा देखोनि मिळती प्रबळा ॥ ३ ॥ बहुता जणी त्या मिळती । तुज परोपरीं बोलती । ह्मणउनि येते काकुलती । कृष्णा नामें तुझ्या जळती ॥४॥ तूं न करीं यांसीं रेंळी । जन्हि बोलती तुजसी सरळी । तन्हि या बहुत आहेति दुरळी । कृष्णा सिकत्रण माझी सरली ॥ ५ ॥ जननी सिकवी हरिला । तवं हरि ह्मणे पावा हरिला । इहीं चोरुनि नेलें मोहारिला । मागें पेंधा हि इहीं मोहरिला ॥ ६ ॥ दिनकर ह्मणे हरिवदना । विस्मित विस्मय वदना । भला रे सन्मतिसदना । तूं चाले आतां निजसदना ॥ ७ ॥

राग कामोद [ २४८

सद्गुरुचरण स्मरणें । देहबुद्धीच्या विस्मरणें । सदृढ होउनि धरणें । अखंड घेउनि धरणें ॥ १ ॥ पावन होणें सजनें । भजनस्थितीसी सजणें । निरसुनियां विभजणें । स्वसुख तें निजभजनें ॥ २ ॥ पावन या वरदानें । अभयंकरवरदानें । दिनकर ह्मणे निदानें । समरसले सन्निधानें ॥ ३ ॥

राग भैरवी [ २४९

॥ ध्रु० ॥ धन्य ते साधु जनीं । जे निरंतर निरंजनीं ॥ ७ ॥ दुर्जन काय करावे । जे करिती पापभरावे ॥ १ ॥ मायेनें भुलले जीव । जिणें मानिलें चिरंजीव ॥ २ ॥ दिनकर ह्मणे खोटें । रौरवपद वोखंटें ॥ ३ ॥

राग कामोद [ २५०

दुर्मति सोडुनि द्यावी । अघटित विधि[11] न वदावी । दुर्जय[12] मति न करावी । अविहित गति न धरावी ॥ १ ॥ ध्रु० ॥ रघुपतिभजनीं

---

१ भय. २ रानांत. ३ उंबरठे झिजवणें. ४ विनोद. ५ सज्ज होणें. ६ भिन्नपणा. ७ कार्यकारणभाव. ८ भराव=संचय. ९ जीवित. १० वाईट. ११ अमुक च करणें अथवा घेणें अशा अर्थाचा उपदेश तो. १२ आकळतां न येण्यासारखो.

भावें । निरंतर तल्लिन व्हावें । भवभयासी निस्तरावें । रामदास ह्मणवावें ॥ ध्रु ॥ अहंकृति ते विसरावी । निर्भय स्थिति प्रसरावी । दुर्वृत्ति ते विघरावी । सद्बुद्धि हे विवरावी ॥ २ ॥ अखंड सावध होणें । रघुपतिनाम वेणें । तरी च सार्थक जिणें । नाहींतरी दैन्यवाणें ॥ ३॥

राग पाहाडी [२५१

॥ धृ० ॥ सुंदरा रामा कैसा जातोसी वनासी ॥ ध्रु ॥ भस्मविलेपन । सर्वांगीं संपूर्ण । केलीं वल्कलें परिधान ॥ १ ॥ त्यजुनि दिव्यांबरें । बहुविधें परिकरें । अळंकार ते हि निकुरें ॥ २ ॥ रामा तूं कधीं येसी । फिरोनियां भेटी देसी । सोडुनि जातोसी प्रवासीं ॥ ३ ॥ रामा तुझिया नांवें । कोणासी म्यां आळवावें । सुखें देहासी त्यजावें ॥ ४ ॥ काय माझा अपराध । न बोलसी प्रसिद्ध । करूनि जातोसी निषेधें ॥ ५ ॥ ऐकोनी करुणाशब्दु । उभा राहे दीनबंधु । करी कौसल्या अनुवादु ॥ ६ ॥ दिनकर ह्मणे पूर्ण । मातेसी संबोधून । करी वनाभिगमन ॥ ७ ॥

श्रीराग [ २५२

अखंड चिंतन । वाचे नारायण । तयांसी निर्वाण । कोण करी रे ॥ १ ॥ धृ० ॥ धन्य जनीं ते चि येक । नामाचे धारक । कैवल्यदायक । जयांपासीं रे ॥ ध्रु ॥ घाली कळीकाळ धोके । वैष्णवांच्या महाधाकें । कोठें ते हि मनीं निकें । न मानितो रे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे भले । नामाचिया महाबळें । वैष्णव मातले । नाकळेती रे ॥ ३ ॥

राग भैरवी [ २५३

चोरा आतां कोठें जासी । बहुतां दिवसां सांपडलासी । गळा बांधोनियां पदरेंसीं । तुजला नेईन यशोदेपासीं ॥ ध्रु ॥ अगाई मी

---

१ प्राप्त व्हावी. २ चांगली. ३ निकुर=निश्चय, परंतु या ठिकाणीं 'निकें= चांगलें' या अर्थानें असावें. ४ धिःकार. ५ स्पष्टीकरण. ६ उपदेश करून. ७ नाश. ८ धाक, भय. ९ नाटोपती.

काय करी । भला रे तूं मुरारि । जेव्हां तेव्हां बाजीगारी । दाविसी आह्मां ॥ ध्रु ॥ बहू दिस केली चोरी । फावली ते तुज बरी । जासी आतां कैसेपरीं । सांग कृष्णा ॥ १ ॥ ऐसें किती सोसावें । जें तें रडे तुझ्या नांवें । पीडितोसी स्वभावें । जयातयासी ॥ ध्रु ॥ गाऱ्हाणें हें कोठें न्यावें । कोणापासीं सांगावें । उगलें[1] चि चर्फडावें । आपुले ठाईं ॥ २ ॥ गोरसासी उगाळिलें[2] । भाजनासी[3] फोडिलें । भला कृष्णा भलें केलें । कळलें तें चि ॥ ध्रु ॥ दिनकर ह्मणे बळें । अवस्थे घरीं कोंडिलें । मुक्तद्वार धरिलें । गौळणीनें ॥ ३ ॥

राग भैरवी [ २५४

तूं करिसी बहुत हि करणी । परि लोकिकतें मनधरणी ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ जवं अंतर शुद्ध नाहीं । तवं सर्व हि व्यर्थ चि पाहीं ॥ ध्रु ॥ देह पुजुनी वरि वरि काये । मळ अंतरिं भरला आहे ॥ २ ॥ आधीं अंतर शुद्ध करीं । मग बहुविध वेष धरीं ॥ ३ ॥ टिळे माळा भगवी जटा । या अवघ्या चि खटपटा ॥ ४ ॥ ह्मणे दिनकर अवघें खोटें । संतसंगेंविण उफराटें ॥ ५ ॥

राग पावक [ २५५

वाउगा संग सोडीं । सद्गुरुबोधें बोध । देहभाव निरसूनि । होय देव प्रसिद्ध ॥ १ ॥ धृ० ॥ श्रीराम जयराम । जयजयराम हा चि नेम । अखंड नामघोष । चित्तीं धरावा निष्काम ॥ ध्रु ॥ आजिचें उद्या न ये । नरदेह चालिलें । पाहासी मग कोठें । स्वहित आपुलें ॥ २ ॥ मूर्खासी छळणूक । सज्जनासी संकेतें । दिनकर ह्मणे भावें । न मानिती ते पतित ॥ ३ ॥

राग पावक [ २५६

गुरुकृपेचें नवल मोठें । आपेंआपण चि आपणा भेटे । दुजेपणेसीं अहंकारु आटे । जेथें द्वैताचा पडदा फिटे रे ॥ १ ॥ धृ० ॥ सजना तें सुख बोलवेना । जेथें जाणीव मूळ थारेना[6] रे ॥ ध्रु ॥ न

१ व्यर्थ. २ लुटलें. ३ पात्र, मडकीं. ४ उत्कंठेनें. ५ इशारा. ६ स्थिरावेना.

बोलवें तें स्वसुख बोलीं। जेथें परा[1] चि परतली। जेथें कल्पना हि मुराली। तेथें कैंची द्वैताद्वैतबोली रे ॥२॥ दिनकर ह्मणे धन्य धन्य। गुरुकृपेचें सौजन्य। ज्यांसी लाधलें ते सर्वमान्य। त्यांचे पाईं च सुख अनन्य रे ॥ ३ ॥

राग पावक [ २५७

संतसज्जन जिवलग माझे । त्यांच्या दर्शनें मी मज बुझे[2]। जाय उडोनि अविद्येचें वोझें। ज्यांचे कृपेनें द्वैताग्नि विझे रे ॥ १ ॥ धृ०॥ सज्जना काय सांगों नवलावो। जेथें वावो जाला जीवशिवभावो रे ॥ छ ॥ त्यांची सेवा ते माझी देवपुजा। त्यांचें पावनीं[3] सर्व तीर्थां राजा। त्यांच्या गुह्य गोष्टी ऐकेन वोजा। त्यांचा प्रसाद माझी मोक्षध्वजा रे ॥ २ ॥ धन्य सद्भाग्य मी येक जनीं। मज मानिलें आप्त सज्जनीं। माझें तनमन त्यांचे चरणीं। ह्मणे दिनकर हे ज्यांची करणी ॥ ३ ॥

[ २५८

जें नित्य निर्गुण गुणासी येना। तर्कासी समजेना ॥ १ ॥ धृ० ॥ तें तूं स्वरूप पाहें। पाहोनी स्थिर राहें ॥ छ ॥ निःशेष[4] जें आपेंआप स्वरूपें। सत्संगें बहु सोपें ॥ २ ॥ दिनेश ह्मणे अति अव्यंगर्वाणें। सुखासी सुख जेणें ॥ ३ ॥

राग कानडा [ २५९

॥ धृ० ॥ विचारावें इदमीथ्य[5]। चित्तीं चिंतावें अचिंत्य रे ॥ छ ॥ सत्य समाधान विहित पंथें। भक्ति विरक्ति भावार्थें रे ॥ १ ॥ ज्ञान ध्यान विधि साधन सुखें। विचारावें निजपदार्थें रे ॥ २ ॥ दिनकरा पावन सद्गुरुचरण। विहित भजन विहितार्थें रे ॥ ३ ॥

राग कानडा [ २६०

॥ धृ ०॥ जनीं भाग्याचे ते जन। ज्यांचें रंगलें राघवीं मन रे ॥ छ ॥ आपपर दुजें न दिसे कांहीं। चिंतितां चैतन्यघन रे ॥ १ ॥

---

१ परा वाणी. २ जाणतों. ३ पादतीर्थ (?). ४ पूर्ण. ५ (इदम्+मिथ्य) खरें कोणतें, खोटें कोणतें.

होत जात अवस्थात्रय कारण । नेणती सर्व करून रे ॥ २ ॥ तन मन धन नित्य रामार्पण । दिनकर ह्मणे धन्य धन्य रे ॥ ३ ॥

राग कानडा [ २६१

हित सोडिती अधम । घेती विषयसुखकाम रे ॥ ध्रु ॥ नरदेह सार विशेष ब्राह्मण । पावन पंथ स्वधर्म रे ॥ १ ॥ वेद शास्त्र मुनि पुराणें वर्णिती । अन्य देह हितधाम रे ॥ २ ॥ क्षणयेक धरणी[1] न धरी भार । जे रामीं च परि विराम रे ॥ ३ ॥ दिनकरा दर्शन स्पर्श संभाषण । करीत नर्क सुगम रे ॥ ४ ॥

राग कानडा [ २६२

॥ध्रु०॥ तुझें पावन नाम दयाळा । हरि त्रैलोक्यपाळा रे ॥ध्रु॥ सुरवरवछळ दीनजनवछळ । भक्तमुनिवछळ लीळा रे ॥ १ ॥ हरिजनकृपाळ म्हीसजनकृपाळ । विधिहरकृपाळ कृपाळा रे ॥ २ ॥ दिनकरदयाळ भूसुता[2]स्नेहाळ । दिनकरवंशविशाळा रे ॥ ३ ॥

राग भूपाळी [ २६३

॥ ध्रु० ॥ अश्वमेधांचिया कोटी । न सरती[3] येका नामासाठीं । बोले वेद हे परिपाठीं । नाम सृष्टीं । अनुपम्य ॥ ध्रु ॥ धन्य धन्य त्यांचें जिणें । ज्यांसी अखंड नाम घेणें । स्वयें तरोनि तारणें । जडमूढ हीनें । निजनामें ॥ १ ॥ नामधारक धन्य जनीं । नामधारक धन्य धनीं । नामधारक धन्य अवनीं । त्रिभुवनीं । तो येकु ॥ २ ॥ क्रेत त्रेत द्वापार कळी । मार्जी तारक नामधुमाळी । गति नाहीं नामावेगळी । नामाजवळी । निजमोक्ष ॥ ३ ॥ अखंड नामाचा हव्यास । करितां नारायेण निःशेष । ह्मणे दिनकररामदास । धन्य वंश । तयाचा ॥ ४ ॥

राग भूपाळी [ २६४

॥ ध्रु० ॥ रामीं रंगलें मानस । मनपण गेलें पैं निःशेष । स्वयें जालें जगदीश । सोहं हंसा । निजध्यासें ॥ ध्रु ॥ रामनामाचा

---

१ पृथ्वी. २ भूसुता=सीता. ३ साम्यतेला येत नाहींत. ४ रीत. ५ पृथ्वीवर. ६ कदाचित् ' ना राहे ' असावें (?)

गजर । न तुटे करितां हि अव्हेर । वृत्ति जडली निरंतर । न पडे अंतर सर्वथा ॥ १ ॥ जळीं मीनले[1] सेंधवकण । मिळणी होतां जालें जीवन । तेवि आत्मारामीं मन । होये उन्मन । निजध्यासें ॥ २ ॥ निजध्यासाची सुखश्रेणी[2] । साह्य साधकांलागुनी । तेथें उरी दुजेपणीं । न दिसे अवनीं[3] । दिनकरा ॥ ३ ॥

राग पावक [ २६५

॥ धृ० ॥ न कळे लीळा राघवाची ॥ ॥ राघवाची लीळा । अकळ सकळां । जाल्या श्रुति विकळा[4] ॥ १ ॥ कपिलादिक मुनि । शुकादिक ज्ञानी । ब्रह्मादिक चरणीं ॥ २ ॥ दिनकर दीन जनीं । स्वयें करीं धरुनी । केलें सरतें[5] सज्जनीं ॥ ३ ॥

राग पावक [ २६६

॥धृ०॥ रामनामीं । रंगलें मन ॥ ॥ न भासे भिन्नाभिन्न । सर्वी सर्व अभिन्न । अभिन्नेंसीं हारपे भिन्न ॥ १ ॥ अहं आणि सोहंपण । चैतन्येंसीं[6] चिंतन । अनुर्वाच्य बोलतां खूण ॥ २ ॥ दिनकर दीनपण । द्वैतेंवीण सुखसंपन्न । भेटलें रामनिधान ॥ ३ ॥

राग पावक [ २६७

॥ धृ० ॥ रामनामीं रंगलें मन ॥ ॥ तुटली मनकामना । समेली[7] देहभावना ॥ १ ॥ विषयांचें गोडपण । जालें विषासमान ॥ २ ॥ स्वसुखाचा दिनमणी । उगवला चिद्गगनीं ॥ ३ ॥ आनंदाचें जालेंपण । सदोति[8] रसनेविण ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे धन्य । ऐसीये स्थितीचे जन ॥ ५ ॥

राग पावक [ २६८

जितां जीवें मारी । मारूनियां तारी ॥१॥ धृ० ॥ सद्गुरु तो । सायुज्य देतो ॥ ॥ निरसी देहभाव । प्रकटी स्वयंमेव ॥ २ ॥ भवभय जाळी सर्व । करी नित्य निरावेव ॥ ३ ॥ करूनि अकर्तेपण । ऐसें

१ एकत्र झालें. २ पंक्ति. ३ पृथ्वीवर. ४ अपूर्ण, गोंधळलेल्या, दीनवाण्या. ५ वंद्य, कृतकृत्य. ६ प्राण, परमात्मा. ७ 'समरसली' किंवा 'संपली' असा कांहीं तरी शब्द असावा! ८ (?).

ज्याचें वरदान ॥ ४ ॥ निरंतर उन्मनी[1] । दिनकरा ज्याची करणी ॥५॥

राग पावक [ २६९

॥ धृ० ॥ जघन्य[2] कळीमार्जी । नाना दोषांचे उपाये । पाषांड घरोघरीं । कैंची स्वहिताची सोये ॥ छ ॥ पित्यासी पुत्र मारी । सून सासेसी धिःकारी । बाईल दादुल्याला[3] । बळें घाली मारेकरी ॥ १ ॥ मदांध धनवंत । अभिमानें चि हुंबती[4] । आचार देव धर्म । कैंचा काय हो ह्मणती ॥ २ ॥ वेदतीर्थसाधुनिंदा । कर्ममार्ग उडविती । वर्णहीना नमस्कार । भले ब्राह्मण करिती ॥ ३ ॥ असोत दृष्टभाव[5] । कोण पुरे वर्णाया । परंतु नरदेह । सार जात असे वायां ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे धन्य । जे नित्य सावधान । अखंड संतसंगीं । तनुमनेंसीं अनन्य ॥५॥

राग पावक [ २७०

॥ धृ० ॥ संसारबंदीशाळे । जन घातले काळें । सुटिका केवी होये । न पावतां वननीळें ॥ छ ॥ बाईल पाईं बेडी । स्नेहनाद खळखळी । पुत्रमोहो हातखोडा । कन्याममतेची खिळी ॥ १ ॥ प्रपंच-कोरडा तो । आंगीं वाजे फटफटां । वंचणूक[6] मीठवणी[7] । शिंपिती सटसटां ॥ २ ॥ सोयरे इष्टमित्र । जेरबंद[8] उडती । विहिणी बहिणी त्या । शिरीं पैजारा चढती ॥ ३ ॥ मान्यतेचा सुईमार । हातीं पाईं नखोंनखीं । जामात कोलदांडा[9] । सुना चपराखा मुखीं ॥ ४ ॥ ऐसी स्थिति देखोनीयां । जे हित न करिती । दिनकर ह्मणे धन्य । त्राहे त्राहे सीतापति ॥ ५ ॥

राग पावक [ २७१

॥ धृ० ॥ धांव रे रामराया । छेदीं भवपाश माझा । गांजिलों पीडिलों गा । अनन्य दास तुझा ॥ छ ॥ काम क्रोध दंभ मोहो । मद मछर विकारीं । त्रासिलें त्रासिलें गा । नावरती कोण्हेपरीं । विषय

---

१ ईश्वरस्वरूपीं मिळून जाण्याची अवस्था. २ निकृष्ट, अधम. ३ पतीला. ४ डुरकतात. ५ 'दुष्ट' या अर्थानें. ६ कपट, फसवाफसवी. ७ मिठाचें पाणी. ८ जोडे. ९ पायांत हात अडकवून बांधून गुडघ्यांत दांडा घालण्याची शिक्षा.

वीषमार । कारेती संदोषें । नाडिलें नाडिलें गा । करावें आतां कैसें ॥ २ ॥ संसारभय भारी । मज वाटतसे आतां । दिनकर ह्मणे रामा । वेगीं सोडवीं समर्था ॥ ३ ॥

राग पावक [ २७२

॥ धृ० ॥ रामनाम सार सोपें । जना सुगम फुकाचें । सायास नलगती । नित्य ह्मणतां वाचें ॥ ध्रु ॥ नाश पावे सवंसार । आट भोंवे कळीकाळा । जळती पापराशी । भय जाये अंतराळा ॥ १ ॥ स्वप्नीं हि दुःख नाहीं । तिहीं अवस्थातीत । स्वसुख सांपडे गा । जडतां नामीं हेतें[2] ॥ २ ॥ असंभाव्य नामथोरी । थोर थोर जाणती । दिनकर ह्मणे धन्य । अखंड जे जपती ॥ ३ ॥

राग पावक [ २७३

॥ धृ० ॥ जघन्य सवंसार । मना दुर्घट भारी । लागलासे ब्रह्मादिकां । नोसंडा[3] कोण्हेपरीं ॥ ध्रु ॥ काय सांगों नवलाव । नाथिलें चि प्रकटला । आदि अंत न दिसे कांहीं । लोकत्रय बुडविला ॥ १ ॥ अहंपणें पळतां गा । पाठीलाग न सोडी । चौऱ्यासी लक्ष गांवें । फेरे फिरवी कोडीं[4] ॥ २ ॥ ऐसा परी नाथिला चि । पाहें पाहें परतोनि । गुरुवाक्यें लाग मागें । ठाईं जाईल निमोनि[5] ॥ ३ ॥ वर्म याचें संतसंग । जरि लागलें हातीं । तरी मग नाम रूप । कर्मेंसीं पावे गति[6] ॥ ४ ॥ सनकादिकां हातियेर । हें चि साधलेंसे करीं । दिनकर ह्मणे तें चि । सद्गुरुवाक्य दृढ धरीं ॥ ५ ॥

राग पावक [ २७४

॥ धृ० ॥ पाहातें पाहालें गा । गुरुकृपां चोजवलें । मीपण सर्व माझें । नेणों कैसें काय जालें ॥ ध्रु ॥ देहीं च देहभाव । मावळले अमतां । नवल चोजें[10] जालें । वाचे न ये बोलतां ॥ १ ॥ कर्म

---

१ श्रम, यत्न. २ इच्छा, कामना. ३ न सोडी. ४ लटका. ५ कौतुकानें. ६ नाहींसा होऊन, लयास. ७ नाम रूप व कर्म हीं सर्व नाहींशी होतील. ८ हत्यार, साधन. ९ समजलें. १० चोज ह्मणजे नवल च.

धर्म वर्णाश्रम । नित्यनैमित्यादिक । असतां चि पारुषलें । होय नव्हे सकळिक ॥ २ ॥ अखंड समाधानीं । दिनकरा उन्मनी । स्वसुख कोंदलेंसे । जनीं वनीं विजनीं ॥ ३ ॥

राग कामोद [ २७५

नरदेहीं ब्रह्मज्ञान । न करितां आहे सीण । जन्ममृत्यूचें भूषण । लागे पाठीं जाण ॥ १ ॥धृ०॥ नरदेह सार सजना । नाना सुकृतीं जो जोडेना । तो न करीं दैन्यवाणा । लावीं सद्गुरुचरणा ॥ ७ ॥ सद्गुरुचरणध्यासें । सुख पावसी अनायासें । शुकादिकां ज्याचें पिसें । तें निज होसी तूं विश्वासें ॥ २ ॥ जें श्रवणेंविण ऐकावें । जें स्पर्शेंविण स्पर्शावें । जें नेत्रेंविण पाहावें । जें रसनेविण चाखावें ॥ ३ ॥ जें घ्राणेंविण जिघ्रणें । जें शब्देंविण अनुवादणें । तें चि सद्गुरूचें करणें । दिनकर ह्मणे ब्रह्मज्ञानें ॥ ४ ॥

[ २७६

संसृतिवन अत्यंत रामा दारुण । स्वकर्मपंथें चालतां लागे कठीण । तेथें वसती विषय पांच दुर्जन । तेहीं धरिलें त्रितापचाप सज्जुन ॥ १ ॥ धृ० ॥ कैसें नाम तुझें रे पतितपावन । अनाथनाथ हें मिरविसी किती भूषण । नामासारिखें दिसोनि येना लक्षण । आतां सोडुनी श्रेष्ठत्व ऐकें वचन ॥ ७ ॥ कामबाण लाउनी मज विंधिलें । क्रोधदोरें सर्वांग माझें वेष्टिलें । मोहपाश घालुनी कंठीं गोविलें । ऐसें करुनी निजज्ञानधन हरिलें ॥ २ ॥ विवेकअश्व सज्जुनी बैसणें । प्रबोधशस्त्रेंकरुनी त्यासी मारणें । निजज्ञानधन आमुचें आह्मां सोडणें । दिनकररामींरामदास तुझें जाणणें ॥ ३ ॥

राग अहेरी [२७७

॥ धृ० ॥ अहंगड जेणें जिंकिला होडा । तो नर गाढा । जाणते नो ॥ ७ ॥ अविद्येची खिंडी साधनें मोडिली । अखंड ठेविली ।

---

१ खुटलें, मुकावलें. २ लाभेना. ३ वेड. ४ स्वस्वरूप. ५ वास घेणें. ६ प्रतिव्याख्यान करणें. ७ संसाराची. ८ टोंचलें. ९ पैजेनें. १० बलाढ्य.

संद्वियावाट ॥ १ ॥ सोहंहंसाभरें चढती गडा । मोक्षाचिया हुडीं[1] । बैसती सुखें ॥ २ ॥ निसंदेहनिशाण निगडीं[2] तळपे । दिनकरा आपें-आप निराशें ॥ ३ ॥

राग अहेरी [ २७८

निसंदेहनिशाण पाहातां डोळां । डोळियाची कळा । कळासली[3] ॥ १ ॥ धृ० ॥ कौतुक कौतुक भासे नेत्रेंविण । मुकियानें खूण । सांगितली ॥ छ ॥ दिनकररामींरामदास ह्मणे । वांजेचें तान्हें मृगजळीं पोहें ॥ २ ॥

राग बिलावल [ २७९

॥ धृ० ॥ सज्जना सद्गुणनिधाना । दीनानाथा पतितपावना ॥ छ ॥ अपराध शतकोटी । नाणुनियां निजदृष्टीं । बाळकासी देणें भेटी । निजानंदें ॥ १ ॥ परम कृपाळु देवा । दीनानाथा राघवा । भक्तजनदयार्णवा । देवादिदेवा ॥ २ ॥ दिनकर तुझें तुज । स्मरतसे सहज । उपेक्षूनि कोण काज । सांग देवा ॥ ३ ॥

[ २८०

जो भक्तवत्सल कृपाळ आहे । तो देव मनीं पाहें ॥ १ ॥धृ०॥ मग निवांत राहें ॥ छ ॥ ज्याची लीळा श्रुतिशास्त्रां न लाहे । तो देव मनीं पाहें ॥२॥ दिनेश ह्मणे गुण निर्गुण नव्हे । तो देव मनीं पाहें ॥३॥

राग वैराळी [ २८१

॥ धृ० ॥ रामकृपेचा आल्हाद माजला रे । सत्यसंकल्प राघवें सिद्धी नेला रे । दीनदयाळ अद्भुत न तुळे लीळा रे । भावबळें भाविकांसी पावला रे ॥ छ ॥ चरणस्पर्शें अहिल्या तारिली रे । चाप भंगूनि जानकी वरिली रे । येका बाणें ताटिका निवटिली[4] रे । लोकत्रई विख्यात कीर्ति केली रे ॥ १ ॥ अभयवरदें हनुमंत दास केला रे । वाळी वधुनी सुग्रीव रक्षिला रे । रावण वधुनी बिभीषण राज्यीं

१ बुरुजावर. २ निगड ह्मणजे साखळदंड. ३ लागली. ४ वधिली.

स्थापिला रे । त्रिदशांचा बंद मुक्त जाला रे ॥ २ ॥ भरतभेटीचा आनंद जाला थोर रे । सुखी केले कपी रीस निशाचर रे । सुरवर वर्षले पुष्पांचे संभार रे । त्रिभुवनीं जाला येक चि जयजयकार रे ॥ ३ ॥ रामराज्याचें निशाण त्रिभुवनीं रे । अनु न दिसे विषम जनीं वनीं रे । हीनें दीनें ब्रह्मानंदीं समाधानी रे । दीन दिनकर रामदासांचे चरणीं रे ॥ ४ ॥

राग वैराळी [२८२

॥ ध्रु० ॥ राम दासांचा स्नेहाळ परोपरीं रे । करी साभांळ तयांचा निरंतरी रे । दासांसाठीं रूपें धरी नानापरीं रे । त्यांचीं विघ्नें स्वयें देव अंगिकारी रे ॥ ७ ॥ मछरूपें रक्षिलें चतुराननां रे । कूर्म होऊनि आधार सहस्राननां रे । शूकररूपें स्थापिलें महिमाना रे । करुणाकर सांभाळी दीनजना रे ॥ १ ॥ प्रल्हादाकारणें नृसिंह स्वयें होणें रे । वामन होऊनि निर्जरां सौख्य देणें रे । फरशरामस्वरूपें महि रक्षणें रे । सुखी केलें त्रैलोक्य रघुनंदनें रे ॥ २ ॥ पांडव रक्षिले श्रीकृष्णें विग्रहवेषें रे । बोध्यावतारीं जो करी तो पावे तैसें रे । कल्की होऊनि मारिल सर्व म्लेंछें रे । दिनकरस्वामीचा प्रताप भक्त सोसे रे ॥ ३ ॥

राग केदार [२८३

॥ ध्रु० ॥ दीनबंधु रे दीन तारीं । या संसारसिंधुमाझारीं रे ॥ ७ ॥ याणें बुडविले राये थोर थोर । मी तों मानवी किंकर रे ॥ १ ॥ मतिमंद न कळे कांहीं । ऐसियाचें पाहासी काई रे ॥ २ ॥ कृपा करीं सद्गुरुराया । दिनकर वंदितो पायां रे ॥ ३ ॥

राग केदार [२८४

॥ ध्रु० ॥ मन पापी रे मन पापी । भरे संकल्पविकल्पीं रे ॥ ७ ॥ मन दुर्घट लंपट मोठें । आकळितां नाकळे करंटें ॥ १ ॥

---

१ देवांचा. २ ढीग. ३ प्रतिकूल, वैरभावाचें. ४ ब्रह्मदेवास. ५ शेषाला. ६ देवांना. ७ साकार रूपें धरून.

निजसेवेचें सोडूनि सुख । मागे विषयांची भीक निःशंक रे ॥ २ ॥ दिनकरा अनावर मन । आकळितां होइजे धन्य रे ॥ ३ ॥

राग केदार [२८५

॥ धृ० ॥ रघुपतिपदकमळांची आवडी नलगे पापियासी । निशिदिनिं मानस चंचळ भारी पडिलें विषयसोसीं रे ॥ छ ॥ जळो हें मन लंपट माझें न जडे रामपाईं । नाथिलें चि चिंतन करवी फिरवी सकळां ठाईं रे ॥ १ ॥ विषयसुखाची चटपट न सरे अवस्था तिहीं माझारीं । ब्रह्मादिक ठकिले जेणें करणें त्या कोण परी रे ॥ २ ॥ जरि उपजे करुणा रघुराया तरि हें मन आकळे । ह्मणे दिनकर तरी च सार्थक नाहींतरी गिळिजे काळें रे ॥ ३ ॥

राग केदारा [२८६

॥ धृ० ॥ राम दासांचा कैवारी । आहे निरंतरी ॥ छ ॥ येथें नाहीं पैं अनुमान । निश्चयेंसीं जाण ॥ १ ॥ ऐसें जाणसी सुनाटों[१] । तरि कां गर्वताठा ॥ २ ॥ दिनकर ह्मणे रे पापिष्टा । निंदा न करीं नष्टा ॥ ३ ॥

राग केदारा [२८७

॥धृ०॥ राम इच्छेचा दातार । सत्य हें उत्तर ॥ छ ॥ काया वाचा आणि मनें । घेईं भार्षेदानें[३] ॥ १ ॥ मनीं न धरीं अनुमान । वाहातों त्याची आण ॥ २ ॥ दिनकर रामाचें लडिवाळ । करितो तो सांभाळ ॥ ३ ॥

राग केदारा [२८८

॥ धृ० ॥ देव तुटेला फुटेना । करा विवंचना ॥ छ ॥ भूतें होतीं आणि जातीं । वोसरतीं कल्पांतीं ॥ १ ॥ नाश होतसे सर्वांस[४] । राहे अविनाश ॥२॥ दिनकर देवाचा अंकित । अखंड सदोदित ॥३॥

राग केदारा [२८९

॥ धृ० ॥ निश्चळ स्वरूप देवाचें । मंडण निजदासांचें ॥ छ ॥ चंचळ प्रत्यक्ष दिसतें । होतें आणि नाशतें ॥ १ ॥ निश्चळ चंचळीं

---

१ चिंता. २ शून्यरूपा. ३ वचनें. ४ संशय.

निर्मळ । पाहें सर्वकाळ ॥ २ ॥ दिनकर सांगतो हे खूण । पाहें विचारून ॥ ३ ॥

राग केदारा [ २९०

॥ धृ० ॥ देव देवांचा कैवारी । तो चि आह्मांघरीं ॥ छ ॥ सर्वांतरींचा चाळक । कुळदेवत तो येक ॥ १ ॥ दुजें पाहातां दिसेना । भजावें तें कवणा ॥ २ ॥ पंचभूतें हें नाशती । देव चि आदि-अंतीं ॥ ३ ॥ भूतां भजती ते अंतीं । भूतें चि पुडती होती ॥ ४ ॥ दिनकरकुळींचें मंडण । दैवत रघुनंदन ॥ ५ ॥

राग केदारा [ २९१

॥ धृ० ॥ राम दासांचें मंडण । पाहें विचारून ॥ छ ॥ रामीं न साहे कल्पना । द्वैतबुद्धि जाणा ॥ १ ॥ रामीं जडतां अंतर । होतें तदाकार ॥ २ ॥ रामीं रंगला दिनकर । भावें निरंतर ॥ ३ ॥

राग केदारा [ २९२

॥ धृ० ॥ रामा पतित मी जाण । आलों तुज शरण ॥ छ ॥ दोष केले रे अपार । नाहीं पारावार ॥ १ ॥ कास सोडिली धर्माची । धरिली अधर्माची ॥२॥ दिनकर पापांचें भांडार । करीं त्याचा उद्धार ॥३॥

राग केदारा [ २९३

बहुतां सुकृतें नरदेहीं । येणें जालें पाहीं ॥ १ ॥ धृ०॥ सावध ह्मणऊनि श्रीरामीं । सोडुनि भवभयऊर्मी ॥ छ ॥ न दिसे शाश्वत देहाचें । क्षणभंगुरपण याचें ॥ २ ॥ दिनकर ह्मणे हा संसार । आहे बहु दुस्तर ॥ ३ ॥

राग केदारा [ २९४

॥धृ०॥ भगवत्कथेचा अव्हेर । करी तो पापी नर ॥छ॥ महा-दोषांचा गिरिवर । धरणी मानी भार ॥ १ ॥ पतनीं[1] पूर्वज रिचवती[2] । नुद्धरती कल्पांतीं ॥ २ ॥ दिनकर ह्मणे हा नरदेह । पावोनि केलें काय ॥ ३ ॥

---

१ अंतःकरण. २ नरकांत.

मराठी ग्रंथ ... नं. २५७ ता. ...

राग केदार [ २९५

काय अपराध देखिला । माझा अनहित केला ॥ १ ॥ धृ० ॥ करुणा करा जी श्रीरामा । सुरनरहरविश्रामा ॥ छ ॥ भोळ्यांभाविकांची थार । आत्मा रघुवीर ॥ २ ॥ ऐसें बोलती श्रुतिशास्त्रें । दिनकर ह्मणे मूळमंत्रें ॥ ३ ॥

राग केदार [ २९६

॥ धृ० ॥ देव भावाचा भुकेला । न पाहे जातिकुळा ॥ छ ॥ काय गणिकेचें पाहिलें । वैकुंठासी नेलें ॥१॥ अजामिळासी विमान । काय केलें भजन ॥ २ ॥ वान्नर तारिले अगणित । काय केलें सुकृत ॥ ३ ॥ चिरंजीव केला रे बिभीषण । लंका दिधली जाण ॥ ४ ॥ न्हावी चांभार कुंभार । उद्धरिले अविचार ॥ ५ ॥ ब्राह्मण मोमीन तारिले । अंत्यज पावन केले ॥ ६ ॥ सिंपी सोनार गोळक । उद्ध--रिले निःशंक ॥ ७॥ कुणबी गुणीजन संन्यासी । नेले वैकुंठासी ॥८॥ ऐसे अपार गणनेसी । कितेक दासदासी ॥ ९ ॥ सकळां भाव चि प्रमाण । वरकड निष्कारण ॥ १० ॥ कळाकुंसरी करितां । गेले अधःपाता ॥ ११ ॥ दिनकर किंकर रामाचा । राम चि तारक त्याचा ॥ १२ ॥

राग केदारा [ २९७

॥ धृ० ॥ हेत गुंतला श्रीरामीं । ठकली भवभयऊर्मी ॥ छ ॥ येकीं नाठवे अनेक । मायेचें कौतुक ॥ १ ॥ देहधामाचें चिंतन । करितां विस्मरण ॥ २ ॥ तिहीं अवस्थां माझारीं । नेणों दुसरी परी ॥ ३ ॥ अखंड खंडेना चिंतन । न कळे तनु मनु धन ॥ ४ ॥ दिनकरवंशाचा दिनमणी । सबाह्य अंतःकरणीं ॥ ५ ॥

राग देशी [ २९८

॥ धृ० ॥ रघुपति कैं भेटे । हें मज सांगे त्रिजटे । वियोगाचें मूळ तुटे । दुखजळधी आटे ॥ छ ॥ परम विषम वाटे । कैसें जालें उफराटें । तेणें शोकें ह्रदय फुटे । लवलव कंठ दाटे ॥ १ ॥ प्रतिपळ-

बिळ मोठें । गत मज जालें अति खोटें । परि आतां अनु ना कंठे । दुस्तर गति वाटे ॥ २ ॥ परम विकळ वाणीं । करुणा बोले प्रतिक्षणीं । दिनकरप्रभुवांचुनी । शोक अशोकवनीं ॥ ३ ॥

राग देशी [ २९९

॥धृ०॥ रामा तूं ये रे ये रे मज भेटी दे रे । तुजवीण दीनानाथा जालों हीन रे ॥ ध्रु ॥ जळेंवीण जळचर चंद्रेवीण चकोर । तुजवीण निरंतर तैसें किंकर ॥ १ ॥ मेघेंवीण चातक सूर्येंवीण चक्रवाक । तैसें स्वामीवीण रंक जालें विन्मुख ॥ २ ॥ अतुरें[1] अविचार जाला तुजवीण दिनकर । त्याचे शिरीं अभयंकर ठेवीं निरंतर ॥ ३ ॥

झंपताल [ ३००

बोल वानरा तूं कोणाचा आहेसी । राहसी कोठें तूं कोठूनि आलासी । येथें न फुटे रे पंथ वारयासी । देहधारी तूं कैसेपरीं येसी ॥ १ ॥ धृ० ॥ सांग सांग रे पुसतें मनोभावें । गुह्य काय तें उदास न करावें ॥ ध्रु ॥ तवं स्वानंदें तो लोळे भूमीवरी । उडे पडे करी छंद नानापरी । दावी वांकुल्या सवें चि गुरुगुरी । सप्रेम होउनी साष्टांग नमस्कारी ॥ २ ॥ नाचे नाचतां दाखवी हावभाव । हा हा सीता ह्मणोनि मूर्छित राघव । तुझ्या वियोगें वृक्षांसी वाली कवें[2] । दास रामाचा मी नव्हे माते मावें[3] ॥ ३ ॥ शब्द ऐकतां सप्रेम जाली सीता । समाधानें ह्मणे धन्य हनुमंता । दिनकरकुळभूषणाची[4] वार्ता । कैसी सत्वर समूळ सांग कथा ॥ ४ ॥

राग सोरट [ ३०१

॥ धृ० ॥ राम दीनाचा दयाळ ह्मणवितो कैसा हरि[5] । कां रे येना करुणा माझी करूं आतां कोण परी ॥ ध्रु ॥ वियोगाचा क्षणु न कंठे रामेंविण तो हि कोठें । कर्म[6] खोटें उफराटें प्रकटलें ऐसें वाटे

---

१ उतावीळ. २ कवटाळणें, आलिंगन( ? ) ३ कपट. ४ सूर्यवंशाला भूषणभूत अशा श्रीरामाची. ५ आर्तांचें दुःख हरण करणारा. ६ दैव.

॥ १ ॥ जळो जळो हे दुर्दशा रामेंविण जीजे[1] काई । प्राणेंविण श्रृंगार देहीं विटंबु हा तेवि पाहीं ॥ २ ॥ निर्बुजवाणें[2] न कंठे परजनीं वनवासीं । दशग्रीवें[3] पापाचारें विध्वंशिलें संयोगासी ॥ ३ ॥ रामसंयोगीं वियोग तेणें माझा प्राण फुटे । होती सजळ नयन न बोलवे कंठ दाटे ॥ ४ ॥ दिनकरवंशचूडामणी[4] वांचुनी काय जिणें । रवि असोनी अंध तमासी वियोगु काय जाणे ॥ ५ ॥

राग भैरवी [ ३०२

पतीतपावन रामा । जानकीजीवन रामा । वनचरसेवन रामा । हरिजनभुवन रामा ॥ १ ॥ सुरवरतोषण रामा । भवाब्धिशोषण रामा । रविकुळभूषण रामा । वाळीविनाशन रामा ॥ २ ॥ दोषनिवारण रामा । अहिल्यातारण रामा । निजहितकारण रामा । दिनकरउद्धरण रामा ॥ ३ ॥

राग भैरवी [ ३०३

जय रामा राजिवनेत्रा । रघुपति पुण्यपवित्रा । शशांकशेखरमित्रा[5] । सुललित[6] सुंदरगात्रा ॥ १ ॥ रामा दीनदयाळा । विधिहरसुरनरपाळा । पाहें अनाथकृपाळा । दिनकरवंशभुपाळा ॥ २ ॥

राग पावक [ ३०४

माझें मीपण मी पाहों जा[7]जाये । तों तें स्वरूप तुझें चि आहे रे ॥ १ ॥ धृ० ॥ काय सांगों देवराया । कैंचा संसार नाथिली माया रे ॥ ध्रु ॥ पाहों गेलों जों अळंकार । तों तें अवघें सुवर्णसार रे ॥२॥ देखों गेलों जों कल्लोळांसी[8] । तों तें अवघें जळराशी रे ॥ ३ ॥ दृष्टीं पाहातां पट्ट वस्त्र मूळ । तों तो अवघा तंतु केवळ रे ॥ ४ ॥ तैसा दिनकर ह्मणे मी माझें । पाहों गेलों तों तें स्वरूप तुझें रे ॥ ५ ॥

राग पावक [ ३०५

देव दीनाचा कैवारी । देव अनाथ अंगिकारी । देव पतितां

---

१ जगावें. २ घाबरलेल्या मनाच्या स्थितींत. ३ रावणानें. ४ शिरोरत्न. ५ चंद्र आहे शिरीं ज्याच्या त्या शंकराच्या मित्रा, रामा. ६ कोमल. ७ "जाणें" शब्दाची द्विरुक्ति केलेली दिसते. ८ लाटा, तरंग.

साहकारी । मां तो दासासी केविं अव्हेरी रे ॥ १ ॥ धृ० ॥ प्राणिया तयासी शरण जावें । कायावाचामनोभावें रे ॥ छ ॥ ज्याचे सेवक असंख्यात । शिवसनकादिक विख्यात । दास अनंत होत जात । ऐसा देव परम अद्भुत रे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे देवाचा । छंदु लागावा मनासी साचा । नरदेह पुढें प्राप्त कैंचा । हें समजेल तो दैवाचा रे ॥ ३ ॥

[ ३०६

॥ धृ० ॥ सज्जना तें चि तूं परब्रह्म पाहें रे । त्रिपुटी जेथ न साहे रे ॥ छ ॥ पिंड ब्रह्मांड अवस्था अभिमानी । मात्रा गुण स्थानें नव्हे रे । अविद्या माया जीवेश्वरेंसीं । षट्‌कौशिकें न राहे रे ॥ २ ॥ दृश्य नव्हे जें द्रष्टा जें नव्हे । दर्शन तेथें कैंचें काय रे ॥ ३ ॥ कर्माकर्मविवर्जितपंथें । संतीं जें वसविलें ठाय रे ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे जे जीवेश्वरामिरासी । अपूर्व जे सकळांसी आहे रे ॥ ५ ॥

राग केदारा [ ३०७

॥ धृ० ॥ जाय शोधीं रे हनुमंता । कोठें आहे सीता ॥ छ ॥ न करीं आळस सहसा । पाहातां दक्षदिशा ॥ १ ॥ करीं करमुद्रा हे घेणें । भेटतां खुण देणें ॥ २ ॥ निजखुणेचें विंदाणें । पुसेल सुलक्षण ॥ ३ ॥ दिनकरप्रभु हें बोलतां । चरणीं ठेवी माथा ॥ ४ ॥

राग केदार ( ३०८

राम जावाना जावाना । जातो राम धीर न धरवें मना ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ राम जीवाचें जीवन । गे बाइये राम वंशासी मंडण ॥ छ ॥ हां हां जन वन वाटे उद्वस । गे बाइये कैकैनें केली निराश ॥ २ ॥ हां हां दिनकरकुळदर्पण । गे बाइये करी वनाभिगमन ॥ ३ ॥

राग देशी [ ३०९

तपोवनासी चालिला न राहे रामराजा । वार्ता माजली नगरीं जाला थोर गाजावाजा ॥ १ ॥ धृ० ॥ राम न राहे न राहे न चाले

१ तर मग. २ (?) ३ 'दश' (?) किंवा दक्ष ह्म. उजवी. ४ लक्षण. ५ ओस.

प्रेतन कांहीं । येकमेकांसी बोलती करावें हो आतां काई ॥ १ ॥ हाट-बाजारीं ग्रामस्त कलालिती घरोघरीं । हतभाग्य या जनाचें न भोगे चिचापधारी ॥ २ ॥ लोक दाटले चौबारां बिदोबिदीं दैन्यवाणे । मुखीं बोलती करुणा राम जातो काय जिणें ॥ ३ ॥ शोक अद्भुत नरनारी करिती घोरेंघोषें । चांडाळिणी भरतमाते नांव केलें काय ऐसें ॥ ४ ॥ पैल चालला उदास न पाहे मागें पुढें । दिनकरवरदाई न पुसत जात कोडें ॥ ५ ॥

राग वैराटिका [ ३१०

॥ धृ० ॥ राम जातुसे वनासी योगवेषें । लीळाविग्रहीं कौतुक थोर भासे ॥ ध्र ॥ भस्म चर्चिलें वल्कलें परिधान । संगें अनुज सौमित्र सुलक्षण । सीता सुंदरा ते न पाहे फिरोन । तिघें चालिलीं निशंक उदासीन ॥ १ ॥ जाली अयोध्या उद्वस भयासुर । येकी राहिली दुर्दशा महाक्रूर । भूमंडळीं मांडला हाहाकार । नभीं करिती सुरवर जयजयकार ॥ २ ॥ अंतराळीं दाटले सुरवर । ब्रह्मानंदें थोर वाद्यांचा गजर । त्रिभुवनी दाटला धुमधुमकार । वंशमंडण स्थिर पाहे दिनकर ॥ ३ ॥

राग श्रीराग [ ३११

जातां रघुवीर न चाले समीर । पशु मुखीं चार । न सेविती ॥ १ ॥ न सेविती नीर ज्यांचा जो आहार । दुखिते अपार । वियोगानें ॥ २ ॥ वियोगानें दीनें जालीं सर्व जनें । दिनकर ह्मणे । राम जातां ॥ ३ ॥

सवाई [ ३१२

येऊं नको सीते जाय फिरोनि बहूत कठीण असे वनवासी । कर्कश रान भयंकर पर्वत दुर्धर पंथ अलोट जिवांसी । दुर्धर वृक्ष

१ कलकल किंवा गडबड करिती. २ चव्हाट्यावर. ३ घोर ह्मणजे भयंकर. ४ कौतुकानें, आवडीनें. ५ स्वकीय इच्छेनें. ६ धाकटा बंधु लक्ष्मण.

निबीड नसे जळ वात झडाडित शीत प्रवासीं । दीन दिनेश ह्मणे बन दुस्तर भोगिसि व्यर्थ चि काय भवासी ॥ १ ॥

सवाई [ ३१३

ऐकोनि निग्रहे[1] बोलत जानकि शब्द हे काढिले कोठुनियां । जाइल हे तनु येथुन फिरोन प्राण समागमें देउनियां । निग्रह हा मजलें[2]सिकसा बहु येत असे जनिं टाकुनियां । हास्य करूनि दिनेश ह्मणे पुढें प्रत्यय येइल येथुनियां ॥ १ ॥

श्लोक [ ३१४

पृथ्वीच्या तीर्थराशी वरटिक महिषी माळ शंभू निवासी । सेवाळें पंचक्रोशीं जळ लव शिरसीं वंद्य जें निर्जरांसी । ध्यातां गातां शिवासी भवभय निरशी ज्या घरीं मुक्ति दासी । तो हा येरूळ[3]वासी अनुदिनिं स्मरतो जामदग्नीजितोंसी[4] ॥ १ ॥

राग श्रीराग [ ३१५

भस्म विलेपन । रुद्राक्ष धारण । केलें परिधान । वल्कलांचें ॥१॥ शिरीं जटाभार । करीं चापशर । पाठीसीं तूणीर । शोभे कैसें ॥ २ ॥ शोभे समागमें । सीता भाजे[5] वामें[6] । चाले अविश्रमें । लक्ष्मण ॥ ३ ॥ चालतां उदास । जाती सावकाश । लावियेला ध्यास । विश्वजना ॥४॥ जन जाले दीन । येका रामेंवीण । दिनकरा प्राण । जातां बरें ॥ ५ ॥

• राग श्रीराग [ ३१६

रामेंवीण भोग । सर्व क्षयरोग । जैसा घरीं मांग । सुशीलाचे ॥ १ ॥ धृ० ॥ तैसें सर्व कांहीं । रामेंवीण पाहीं । शीघ्र आज्ञा[7] देईं । वसिष्ठा तूं ॥ छ ॥ वसिष्ठा तूं श्रेष्ठ । सूर्यवंशीं पष्ट । चुकवीं हे कष्ट । वियोगाचे ॥ २ ॥ पाहें गुरुराया । वधूनि हे मार्या[8] । भेटेन भाइया । राघवासी ॥ ३ ॥ राम आहे जेथें । जाईन मी तेथें । भरत भावार्थें ।

---

१ निरोध करून. २ कसे शब्द तोडावयाचे? ३ वेरूळ येथील देव, श्रीशंकर. ४ परशरामास जिंकणाऱ्या श्रीरामास. ५ भार्या. ६ डावीकडे. ७ मला रामाला भेटण्याची आज्ञा. ८ कैकयी मातेला मारून किंवा माया दूर सारून.

बोलतसे ॥ ४ ॥ बोलतां भरत । सप्रेम सर्व हि । दिनकरा पाहीं । आर्त कैसें ॥ ५ ॥

झंपताळ [ ३१७

पतितपावना । वारिजासना । भवविदारणा । वाळिभंजना ॥ जळधिबंधना । पंकजासना । असुरकंदना । कमळलोचना ॥१॥ धृ०॥ येई राघवा । पावें राघवा । भवभयें जिवा । गांजिलें बहु ॥ छ ॥ जय सीतावरा । जय कृपाक्षरा । जय धनुर्धरा । धामसुंदरा ॥ जय सुखार्णवा । जय कृपार्णवा । जय दयार्णवा । हरि भवार्णवा ॥ २ ॥ निशिचरार्दना । जय जनार्दना । भक्तभावना । अमररक्षणा ॥ सजन-आश्रमा । सिद्धसंगमा । जय मनोरमा । राजसोत्तमा ॥ ३ ॥ शशिध-रांतरा । जळदभासुरा । धृतधनुःशरा । जय चिदंबरा ॥ ताडछेदका । दशमुखांतका । धनुष्यभंजका । कैवल्यदायका ॥ ४ ॥ संतरंजना । असंतगंजना । नियंतभूषणा । कृतांतकंदना ॥ दिनकरप्रभु । विनति हे चि जी । वासु देइजे । चरणि नित्य जी ॥ ५ ॥

राग माळाश्री [ ३१८

॥ धृ० ॥ काय माझें पाहासी । दयाळा काय माझें पाहासी । अनाथ मी परदेशी ॥ छ ॥ अगणित सेवक भुवनत्रई तुझे वसउनियां विजनासी । नाना साधनीं सावध साक्षपी न विसंबती या मनासी ॥ १ ॥ नाना गृह बहुविध उपाधी पाहिजे ज्या समयासी । तें तें अ-नुकुळ करुनी तत्काळ सादर होति तयासी ॥ २ ॥ जयंत्या पर्वे महो-त्सव यात्रा दिड्या टाळ मृदांगेंसीं । गाति नाचती ब्रह्मानंदें डोलती निवेदुनि मन निजांगेसीं ॥ ३ ॥ नाना साधक सोडुनि बाधक जाले थोगविलासी । तनु मनु धन अवघें करुनि रामार्पण सेविती निष्काम

---

१आवड. २कमलासना. ३अक्षरा=परमात्मा, विष्णु.४ धाम=तेज,प्रकाश, स्वरूप. ५ राक्षसांना मारणारा. ६ शंकराच्या अंतरीं वास करणाऱ्या रामा. ७ जलद+भासुर=तेजस्वी. ८ गंजन=जिंकणें. ९ नियत ह्म. जितेंद्रिय, निश्चयी. १० अरण्यांत वस्ति करून राहिलेले. ११ स्वाधीन करून, अर्पून.

फळासी ॥ ४ ॥ ऐसे उत्कट भजनस्थितीचे दास रामा सद्गुणराशी ।
तयामाजीं रंक येक आपुलें ह्मणौनि उद्धरीं दिनकरासी ॥ ५ ॥

[ ३१९

नेणें ज्ञान भजन मतिसेवन । नेणें नामाभिधान ॥ १ ॥ धृ० ॥
दयाळा ऐसा मी अज्ञान ॥ छ ॥ नेणें विधियुक्त आगम निगम । आ-
णिक योगविधान ॥ २ ॥ नेणें विवेक वैराग्य विज्ञान । शांति क्षमा
समाधान ॥ ३ ॥ नेणें मुद्रा समाधि व्युत्थान । उन्मनी अनुसंधान
॥ ४ ॥ नेणें लक्ष अलक्ष परात्पर । त्राहे ह्मणे दिनकर ॥ ५ ॥

[ ३२०

॥ धृ० ॥ त्राहे त्राहे त्राहे दीनबंधु करुणासिंधु । न लागे
मज तुझा वेधु[1] ॥ छ ॥ अखंड लागला या विषयांचा छंदु । निशि-
दिनिं तळमळ कामक्रोध भवबाधु यांजहोतां नाठवे श्रीहरिकथाबोधु
॥ १ ॥ बोध होतां मनीं मोठा सीण वाटे परि हें खोटें तुजविण देवा
उफराटें ॥ छ ॥ अंतीं सोडीना काळ पाप मोठें । हर हर सवंसारीं
नाडियलें चाटेपोटें त्यावांचुनी वेळु जाय निंदाद्वेषक[3]चाटें ॥ २ ॥
ऐसें आयुष्य गेलें हातोंहातीं त्याची खंती न लागे देवा माझां चित्तीं
॥ छ ॥ पाळिलों तें अवघीं शेषीं अंतरती । दिनकर ह्मणे किती
सांगणें हें तुजप्रति रघुपति कोण्या तोंडें करूं आतां विनति ॥ ३ ॥

[ ३२१

॥ धृ० ॥ हर हर हर देवा महादेवा सदाशिवा कर्पुरगौरा
देवराया ॥ छ ॥ सार्थक घडाया तुझी इच्छितो दया । घडि घडि गत
वय होय जाय लवलाह्या । तुजवीण उपाय काय आहे तराया ॥ १ ॥
देवा देवा देवा देवा मन्मथारि गौरीरमणा भयशमना करुणाळया
शूळी ॥ छ ॥ शंभुवांचुनी अंतीं कोण पाळी । भवभय दुर्धर वाटे मज
बहु फार करीं त्यांचा संहार हिमकरमौळी ॥ २ ॥ पतितपावना
जीवना आमुचिया सखया सजना भजनासी लावीं आपुलिया ॥ छ ॥

१ छंद. २ विषयांपासून होणाऱ्या उपाधींमुळें. ३ सांकडींत सांपडल्यामुळें.

तुझिया भजनेंवीण जिणें वाया । दिनकर ह्मणे हीनें दीनें आह्मी जैसीं तैसीं रक्षीं देवा पायापासीं न ह्मणे नाथिला थायीं ॥ ३ ॥

[ ३२२

जय शंभु गिरिजारमणा । दुर्धरकळिकल्मषशमना । भवहरणा देवा रिपुदमना ॥ १ ॥ धृ० ॥ कैलासनाथा ॥ छ ॥ महादेवा आदिपुरुषा । जगजीवना शिव सर्वेशा । पशुपति जनतारण । जगदीशा ॥ २ ॥ हर हर शंकर शूळी । तारीं आत्रेयमौळी । दीन तुझें दिनकर सांभाळीं ॥ ३ ॥

[ ३२३

महादेवा नीळकंठा विशाळा । अगाध तुझी लीळा ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ सदाशिवा दयाळा ॥ छ ॥ भवाब्धि दुस्तर देखोनि डोळां । धावा तुझा केला ॥ २ ॥ अनाथ दिनकर असे कृपाळा । सांभाळीं स्नेहाळा ॥ ३ ॥

[ ३२४

सदाशिवा महादेवा सुरेशा । ब्रह्मांडनिजकोशा ॥ १ ॥ धृ० ॥ देवा देवा महेशा । मां पाहि जगदीशा ॥ छ ॥ गंगाधरा गिरिवरा गुणेशा । नागेंद्रमणिभूषा ॥ २ ॥ पंचानना चंद्रकोटिप्रकाशा । पशुपति सर्वेशा ॥ ३ ॥ शंभो गजाजिनधरामरेशा । स्मरारि भूतेशा ॥४॥ दिनेश ह्मणे मज तुझी च आशा । निरंतर विश्वेशा ॥ ५ ॥

[ ३२५

परात्परा भवहरा उदारा । कैवल्यदातारा ॥ १ ॥ धृ० ॥ शिवकर्पुरगौरा ॥ छ ॥ गौरीवरा गंगाधरा अपारा । ब्रह्मांडभांडोदरा ॥२॥ निरंतरा गिरिवरा ॐकारा । तारीं तूं दिनकरा ॥ ३ ॥

[ ३२६

दनुजनिबर्हण भूतगणईशा । सुरवरमंडण जय जगदीशा ॥१॥ ॥ धृ० ॥ शिवा शिवा शंकर शूळी । पाळीं आत्रेयमौळी ॥ छ ॥ अ-

---

१ छंद. २ कल्मष=पाप. ३ अत्रिऋषीचा पुत्र जो चंद्र तो ज्याच्या मस्तकीं आहे अशा शंकरा. ४ दनुज=दानव, दैत्य. निबर्हण=नाशक, जिंकणारा.

नाथदीनजनवछळ तूं रे । ह्मणउनि शरणागत तुज मी रे ॥२॥ पतितजनपावन ब्रीद तुझें । दिनकर ह्मणे हें भूषण मांझें ॥ ३ ॥

राग परज [ ३२७

व्यापक निज गगनाऐसें । मोठें आपुल्या अवकाशें । परि तें नभ नव्हे साभासें ॥ १ ॥ धृ० ॥ तूं जाण सजना ॥ छ ॥ नभ ह्मणिजे शून्य हें पाहें । शून्य तें अज्ञान आहे । अज्ञानीं गुणसप्तक लवलाहें ॥ २ ॥ काम क्रोध मछर मान । शोक मोह मद भय जाण । नभीं हे गुणसप्तक परिपूर्ण ॥ ३ ॥ नाम रूप कर्म जयासी । सगुण ह्मणावें त्यासी । त्रिपुटी न साहे ब्रह्मासी ॥ ४ ॥ ब्रह्मीं परतल्या श्रुति । तेथें शून्यवाद तो किती । दिनकर ह्मणे हे वाउगी वित्पत्ति ॥ ५ ॥

राग परज [ ३२८

जेथें परतल्या श्रुति । स्वानुभवें ह्मणती नेति । न चाले तर्काची वित्पत्ति ॥ १ ॥ धृ० ॥ तें ब्रह्म पाहें ॥ छ ॥ जेथें निःशब्द वाचा । खुटे संकल्प मनाचा । ह्व्यास शमला लक्षांचा ॥ २ ॥ ध्यानाचा मगडा[1] मोडे । ज्ञानाची जाणीव उडे । जेथें उगवे संसृतिचें कोडें ॥ ३ ॥ जयासाटीं शंकर योगी । होउनियां महा वीतरागी । निरंतर तें होउनि जें भोगी ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे ऐसें आहे । अणुता महता जें न साहे । सत्संगेंविण कोण्हास नव्हे ॥ ५ ॥

[ ३२९

जों देह सुंदर तारुण्य बापा । जों दूरि काळखोपा[2] ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ तों तूं पाहें स्वरूपा । सत्संगें जप अजपा ॥ छ ॥ जों इंद्रियें मन सचेतने पां । अलिप्त महापापां ॥ २ ॥ त्रिदोष जों देहीं न येति कोपा । जों शक्ति साक्षेपा ॥ ३ ॥ आरोग्य वैभव जों भोग सोपा । न पावे विक्षेपा ॥ ४ ॥ दिनेश ह्मणें तुझें आयुष्य मापा । भरोनि न ये जों पां ॥ ५ ॥

---

१ मुळांत "मगडा" आहे, पण "मडघा" पाहिजे, असें वाटतें. पहा श्रीमत् दासबोध ५-९-२९. मडघा=मठ, घर. जेथें ध्यानाचें उच्चाटण होतें. जेथें ध्यान शिल्लक राहत नाहीं. २ खोप=पोट.

[ ३३०

जें ब्रह्म निर्गुण निःसंग आहे । जें दृश्य अनु नोहे ॥ १ ॥ तें तूं स्वरूप पाहें ॥ छ ॥ काळत्रयाहुनि अबाध होये । संकेत जें न साहे ॥ २ ॥ नाहीं जया जन्ममृत्यु जरा हे । जैसें तैसें राहे ॥ ३ ॥ दिनेश ह्मणे जें गुरुसंप्रदायें । स्वानुभवें लाहे ॥ ४ ॥

[ ३३१

जें ब्रह्म निर्गुण निराभिमानी । अपार सुखखाणी ॥ १ ॥ धृ०॥ तें तूं स्वरूप पाहें । पाहोनी स्थिर राहे ॥ छ ॥ जें नित्य निर्मळ निःसंगवाणें । ज्या दृश्य नाहीं होणें ॥ २ ॥ दिनेश ह्मणे गति अगम्य ज्याची । वेदां न वदवे चि ॥ ३ ॥

[ ३३२

विश्रांति जे महा तपोधनाची । मिराशी मोक्षाची ॥ १ ॥धृ०॥ दया गुरुकृपेची ॥ छ ॥ जे मूळछेदक भवद्रुमाची । अपार स्वसुखाची ॥२॥ दिनेश ह्मणे मज ते प्राप्त साची । निष्काम पुण्याची ॥३॥

[ ३३३

धरा निजध्यास सदाशिवाचा । तारील भव साचा ॥ १ ॥धृ०॥ जप श्रीराघवाचा ॥ छ ॥ विश्राम जो या जगत्रयाचा । अगाध विजयाचा ॥२॥ दिनेश ह्मणे मज संयोग त्याचा । विनाश काळाचा ॥३॥

[ ३३४

अनाथ मी दीन तुझें कृपाळा । त्रैलोक्यप्रतिपाळा ॥ १ ॥ ॥ धृ० ॥ दीनबंधु दयाळा । उद्धार तां केला ॥ छ ॥ निष्कामपुण्यें फळासां आलीं । जें जें होतीं केलीं ॥ २ ॥ ब्रह्मादिकां भेटि महाग तुझी । चिंता तुला माझी ॥ ३ ॥ कोण्यागुणें तुझें उत्तीर्ण होणें । वोवाळूं तनुप्राणें ॥ ४ ॥ स्वरूप तुझें हें मज प्राप्त जालें । गजेंद्रपण गेलें ॥ ५ ॥ भूमंडळीं भाग्य माझें अपार । लाधलों पद थोर ॥ ६ ॥ रक्षियलें ब्रीदमाळे सुरेशा । दिनेश जगदीशा ॥ ७ ॥

[ ३३५

निंदूं नको मुखें स्वकर्म कांहीं । त्याविण गति नाहीं ॥ १ ॥

॥ धृ० ॥ याचा विचार पाहीं ॥ छ ॥ न बांधतां तारू जळप्रवाहीं । राहिल उरि काई ॥ २ ॥ जाणें असे परस्थळासी पाईं । ठेउनि पाय गेहीं ॥ ३ ॥ न सुटती सुखसंभोग देहीं । कर्मे चि केलें काई ॥ ४ ॥ दिनेश ह्मणे निज स्वधर्म सोई । चाळोनि लवलाहीं ॥ ५ ॥

[ ३३६

आकाश जैसें असे सुश्यामतेसीं । चैतन्य जडजीवांसीं ॥ १ ॥ तैसा राम दासांसीं । अखंड सहवासी ॥ छ ॥ सुवर्ण पाहें जैसें अळंकारेंसीं । सिंधु कल्लोळासीं ॥ २ ॥ जैसी धरामर गुणें घटेंसीं । गोडि गुळापासी ॥ ३ ॥ तंतुत्व जैसें असे पटेंसीं । बीजत्व वृक्षेंसीं ॥ ४ ॥ दिनेश ह्मणे प्रभा रवीसीं । सुगंध पुष्पेंसीं ॥ ५ ॥

[ ३३७

अखंड जें निजगतीस देतें । हिरोनि भवनेतें ॥ १ ॥ धृ० ॥ रामनामजपातें ॥ छ ॥ नाशित जें महा अहंकृतीतें । तमासि निरशीतें ॥ २ ॥ मारीत जें कामक्रोधभयातें । दोषांसि पळवीतें ॥ ३ ॥ त्रासित जें कळिकाळा निघातें । स्वानंद उद्भवितें ॥ ४ ॥ ऐक्यासी आणुनि जीवेश्वरातें । द्वैतासि विघडीतें ॥ ५ ॥ सप्रेमवैराग्यशांतिक्षमेतें । आणी विज्ञानातें ॥ ६ ॥ मोक्षश्री संपदा घेउनि येतें । दिनेश ह्मणे जें तें ॥ ७ ॥

[ ३३८

॥ धृ० ॥ बापा दुर्घट आहे भवभय भारी ॥ छ ॥ ज्या धाकें ऋषिमुनिवरें भ्यालीं धरिती योग बिच्यारीं ॥ १ ॥ जैसा सिंह मृगासि झपेटी । तैसा काळ जीवारि ॥ २ ॥ दिनकर ह्मणे मनीं सावध आतां । चिंतीं तो शरधारी ॥ ३ ॥

[ ३३९

॥ धृ० ॥ जीव कैसा आहे मनुजा पाहें ॥ छ ॥ जीव कोठुनि येतो कोठें जातो । करितो काय उपाये ॥ १ ॥ स्वाधिन हा कीं पराधिन ऐसा । विचारणें लवलाहें ॥ २ ॥ दिनकर ह्मणे खुण पावसि जरि तूं । धरिसी सद्गुरूपाये ॥ ३ ॥

[ ३४०

॥ धृ ॥ जीव कोठुनि आला कोठें गेला ॥ छ ॥ जीव सगुण कीं हा निर्गुण आहे । पाहें विवरोनि मूळा ॥ १ ॥ आश्रम जाति कुळक्रम याचा । कोण तो धर्म जिवाला ॥ २ ॥ माता कोण पिता वसतें स्थळ वर्ण तो कोण निराळा ॥ ३ ॥

[ ३४१

॥ धृ० ॥ ह्मणउनि सावध बापा नरहरि स्मरणें ॥ छ ॥ जगदीशभजनेंविण सीण ऐसें । बोलति वेदपुराणें ॥ १ ॥ दोषांचा जळधी कळि आहे । कैसें होइल तरणें ॥ २ ॥ दिनेश ह्मणे किति येणें जाणें । रघुपतिच्या विस्मरणें ॥ ३ ॥

[ ३४२

॥ धृ० ॥ चित्ता सावध होईं नरहरिस्मरणीं ॥छ॥ श्रीहरिस्मरणेंविण क्षण गत जो । तो जाणें यमधरणी ॥ १ ॥ उठतां बसतां धंदा करितां । अखंड अंतःकरणीं ॥ २ ॥ आठ हि प्रहर दिनेश ह्मणे हरिभजनाची भरीं भरणी ॥ ३ ॥

[ ३४३

विषई जन हे केवळ दुर्जन सज्जन मानिसी कैसा । पाळिसी पोसिसी धनकण लाविसी परि हा अविद्येचा फांसा ॥ १ ॥ धृ० ॥ भज रे दीनबंधु । राम करुणासिंधु ॥ छ ॥ लाउनि ममता दाविती समता । भैंदें हें दिवसाचीं । मोहफांसा घालुनि पतिता नागविती तुज साचीं ॥ २ ॥ हातें नेती पायें नेती । निशिदिन न विचारीती । दिनकर ह्मणे हें समजोनि रावत्र स्मर रे बऱ्या रीतीं ॥ ३ ॥ भज रे दिनबंधु ॥ छ ॥

राग वैराटिका [ ३४४

बोले सद्बुद्धि तूं सद्विद्ये साजणी । हा चि जपु जनीं वनीं निरंजनीं । जीव जीतो बाई अखंड चिंतनीं । याचें साह्य केलें बरें साहीजणीं ॥ १ ॥ धृ० ॥ बाइयें गे जपेंविण जप सोहं अजपा । सांगे सद्गुरु उपदेशसार सोपा । याचा विचार उघडा आहे बापा । अहं

सोहं निरसुनी मग पाहें पां ॥ ध्रु ॥ वकार आदि आहे सकार ज्याचा अंतु । आधारचक्रदळीं गणराज जगतु । सा शतें तेथें पुरला संकेतु । बाळक श्रीहरीचा ब्रह्मा जाणवतु ॥ १ ॥ तया आसन षट्दळस्वाधिष्ठानीं । सा सहस्र जप जपतो नित्यानि । वरता मनपुरीं वो गोविंद साजणी । दशदळकमळीं वैसे आसन घालुनी ॥ २ ॥ डफांत अक्षरें हें पत्रीं नेसउनी । जपे सा सहस्र मग वरी शूळपाणी । कठांत नीळोत्पळदळ द्वादश आसनीं । मंत्र अजपा सा सहस्र हृदयस्थानीं ॥ ४ ॥ स्वर सोळा कंठीं सहस्र जीवाचे । तयासी राहणें नित्य द्वार नासिकाचें । तयावरतें घडलें बैसणें शिवाचें । येक सहस्र जप लक्ष योगियांचें ॥ ५ ॥ हकार सकार हें बीज वो तेथीचें । तेथें मान पुरलें बाई वोंकाराचें । ब्रह्मस्थानीं बैसणें सद्गुरूचें । सरलें कारण तेथें वर्णअक्षरांचें ॥ ६ ॥ येक सहस्र मंत्र तेथें उच्चारला । जाण जीवशिवाचा ऐक्यभाव जाला । जीवीं शिव शिवीं जीव समरसला । तेथें द्वैतभाव उडोनियां गेला ॥ ७ ॥ ऐसें समाधान घडे स्वानुभवें[1] । ज्यासी लाधलें हें तेणें चि जाणावें । ध्येय ध्याता ध्यान निरसूनि स्वभावें । स्वसंवेद्य स्वरूप दिनकर ह्मणे व्हावें ॥ ८ ॥

राग पावक [३४५

॥ धृ० ॥ राम माय राम बाप । राम सखा सोयरा । इष्ट मित्र पुत्र बंधु । राम सर्व परंपरा ॥ ध्रु ॥ राम जन राम वन । राम सुखसंपन्न । तन मन धन राम । राम सर्व त्रिभुवन ॥ १ ॥ स्नान राम संध्या राम । जप तप यज्ञ दान । राम वर्णाश्रमधर्म । राम विधिविधान ॥ २ ॥ इहलोक परलोक । राम सर्व चराचर । मीपण सर्व माझें । राम ह्मणे दिनकर ॥ ३ ॥

राग पावक [३४६

॥ धृ० ॥ पतितपावनाचा । गुण ध्यात्वा कोणीयेकें । नाथिलें[2] सोडुनियां । धन्य व्हावें पुण्यश्लोकें ॥ ध्रु ॥ थोर थोर जेणें पंथें । गेले

---

१ श्री दिनकर महान् योगी होते याचा हे पद पुरावा होय. २ लटकें, माया.

त्या चि पंथें जावें । अविद्येच्या साभिमानें । दुःख कासया भोगावें ॥ १ ॥ स्वर्ग नर्क यमयातना । पुण्यपापात्मक भोग । भोगितां क्षीण मोठा । न धरितां सत्संग ॥ २ ॥ दिनकर ह्मणे धन्य । नरदेहीं जालें येणें । पळेंपळ घडीघडी । स्वहिताचा लाहो[1] घेणें ॥ ३ ॥

[ ३४७

पवित्र निर्मळ परत्रदातें । जीवांसी उद्धरितें ॥ १ ॥ धृ० ॥ नाम स्मरा सुचित्तें ॥ छ ॥ नाहीं असें दुजें भवद्रमातें । छेदुनि गति देतें ॥ २ ॥ दिनेश ह्मणे नका दुजे विधातें । याविण सर्व रितें ॥ ३ ॥

[ ३४८

श्रीराम निष्काम जीवीं धरावा । अखंड मुखीं गावा ॥१॥धृ०॥ क्षण वायां न जावा ॥ छ ॥ संसारीचा सर्व सोडुनि गोवा । सप्रेम राम ध्यावा ॥ २ ॥ हा येक दिनकर ह्मणे विसांवा । त्रैलोक्यवासी जीवां ॥३

राग कल्याण [३४९

॥ धृ० ॥ बहुविध जडदेहीं । चंचळ हा । चाळक आत्मा पाहा । करितो करवीतो । सकळ हि हा । कार्य कारण तो हा ॥ छ ॥ ऐके श्रवणीं तो । ऐकवितो । नाना शब्द तो होतो । स्पर्शे त्वचेसि तो । स्पर्शवितो । नाना स्पर्श तो होतो ॥ १ ॥ पाहे नयनीं तो । पाहवितो । नाना रूपें तो होतो । सेवी रसनेनें । सेववितो । नाना रस तो होतो ॥ २ ॥ हुंगे घ्राणें तो । हुंगवितो । नाना गंधें तो होतो । ऐसा होउनि तो । वर्तवितो । दिनकर ह्मणे चराचर तो ॥ ३ ॥

राग पावक [ ३५०

॥ धृ० ॥ सद्गुरु देवधर्म । स्नान संध्या कुळक्रम । सर्व हि सर्वातीत । सद्गुरु परब्रह्म ॥ छ ॥ सद्गुरुवास जेथें । तें चि माझें काशीक्षेत्र । क्षेत्रवासी लोक नाना । देव ते चि पवित्र ॥ १ ॥ सद्गुरूचें पायवणी । सर्वतीर्थां सिरोमणी । भागीरथी आमुची ते । जनीं वनीं त्रिभुवनीं ॥२॥ तारकउपदेशें । प्रत्यक्ष ब्रह्म करी । सद्गुरु विश्वेश्वर । द्वैतभाव निवारी

---

[1] लाभ.

॥ ३ ॥ गुरु तीर्थ तीर्थराज । गुरु क्षेत्र सर्व क्षेत्रां । गुरु देव सर्व देवां । गुरु मंत्र सर्व मंत्रा ॥ ४ ॥ तनुमनुजीवेंभावें । अनन्य शरण । दिनकर रामदासीं निमग्न परिपूर्ण ॥ ५ ॥

राग केदार [ ३५१

॥ धृ० ॥ भिक्षा कामधेनु निजांची । भाग्यश्री अतितांची । अखंड दुभतसे । अमृताची । साही दर्शनाची ॥ ७ ॥ भावें बोळली । ज्यांतरीं । तो धन्य संसारीं । पुण्यश्लोक तो । चराचरीं । संसारिक जन तारी ॥ १ ॥ भिक्षुक भिक्षेचा भुकेला । न विसंभे क्षण तिजला । पंचमहायज्ञ । तिजवरी । करितां जनीं उद्धरला ॥ २ ॥ भिक्षाहारी तो । निराहारी । त्रैलोक्यामाझारीं । दिनकर ह्मणे तो । श्रीहरि । समई गृहस्थाघरीं ॥ ३ ॥

[ ३५२

गान मनीं वरदान । देई साहित्यविंदान । पदप्रमय निदान । छंद बंद धारणा । राग रंग तानमान । भेद आळाप समान । गिडी भोंवरी प्रमाण । युक्तायुक्त कारणा । अर्थ लापणिका रस । श्रुतिसमेळ सुरस । श्रोत्यां नुपजे विरस । करितां विचारणा । मतिहीन दिनकर । तूं चि ठेवीं शिरीं कर । आहे तुझें मी किंकर । मूढबुद्धीवारणा ॥ १ ॥

[ ३५३

प्रज्ञासरस्वति माये । वंदूनियां तिचे पाये । कथा करितां अपाय । अणुमात्र नव्हती ॥ विद्यामात्र परिपूर्ण । वाणे चातुर्याची खूण । रागरंग तानमान । गातां संत रिझती । समयाचें सुचे ज्ञान । सुचे सर्व समाधान । कोठें तें हि विलक्षण । नव्हे वर्ततां स्थिति ॥ दिनकर ह्मणे वर । वंदनें चि ऐसा थोर । जरि शिरीं ठेवी कर । तरि सिद्धि बोळती ॥ १ ॥

[ ३५४

सद्गुरूचे पदरज । शिरीं पडतां सहज । स्वर्गीं नाचती पूर्वज । ब्रह्मानंदें डुल्लती । तीर्थें इच्छिती तयासी । क्षेत्रें लक्षिती पंथांसी । तीर्थ

बाधों कां आह्मांसी । तेणें दोष जळती । देव येती दर्शनासी । सिद्ध घेती संवादासी । हर्ष थोर साधकांसी । भाग्योदय बोलती । दिनकरा हें गहन । पदरजांचें विंदान । मां ते कृपा होतां पूर्ण । नेणों कैसे बोळती ॥ १ ॥

[ ३५५

सर्व साधनाचें फळ । गुरुदास्य हें केवळ । दग्ध होती मनोमळ । पदरज लागतां ॥ बहु जन्में चित्त हीन । जालें होतें जें मळिण । शुद्ध होय अनुतापोन । चरणतीर्थ मागतां ॥ तीर्थें तपें योगें दानें । जें नेदवे वेदाध्येनें । प्राप्त नव्हे जें निदानें । सदाचारें वागतां॥ ऐसें परम गहन । कोण्हा न संगवे पूर्ण । दिनकरा तें संपूर्ण । गुरुवाक्यें जागतां ॥ १ ॥

[ ३५६

सत्संगाचें महिमान । नीचें नवें समाधान । निजानंदें प्रेमा पूर्ण । अष्टभाव स्फुरती ॥ तुटे विषयांचा ध्यास । मोडे प्रपंचहव्यास । मन नेघे माइकास । धरी स्वरूपीं रति ॥ बाणे विवेक वैराग्य । शुकादिकांचें जें भाग्य । शांति क्षमा यथायोग्य । देहभाव विरती ॥ काय सांगों नवलाव । त्रिपुटीसीं ज्ञेय वाव । दिनकरा स्वयमेव । दृश्य द्रष्टा नुरती ॥ १ ॥

[ ३५७

सावधान सावधान । गुरुवाक्यें अनुसंधान । पळभरि वेवधान । कामा नये साधका ॥ ज्ञानेंवीण जो विचार । तो चि जाण भूतसंचार । जीवा होतां अविचार । युक्ति त्याची बाधका ॥ स्वहिताचा निःसंदेह । पावोनियां नरदेह । तेथें वाउगा संदेह । जन्ममृत्यूचा धाका ॥ सर्व सोडूनि नावेक । करीं मुक्तीचा विवेक । तरी पावसी सम्यक । चराचरवेधका ॥ १ ॥

---

१ नित्य.

[ ३५८

गुरुकृपेचें अंजन । लेती जयाचे नयन । तया स्वरूपनिधान । श्रमेंवीण सांपडे । मनोवाचा अगोचर । नव्हे इंद्रियां गोचर । सर्वी सर्व सर्वांपर । येकायेकीं आंतुडे ॥ भेद भेदूनि अभेद । सुख सांपडे विशद । जयालागीं टोंके वेद । पुराणासी नातुडे ॥ ऐसें सुख वरी पूर्ण । दिनकरा जें गहन । गुरुकृपेचें विंदान । भावबळें विरूढे ॥ १ ॥

[ ३५९

संतसंगें सारासार । मना विवर विचार । तरी पावसी साचार । स्वस्वरूप अंतरीं ॥ मद मछर शमेल । मोह माया विरमेल । दंभ प्रपंच दमेल । कल्पनेची कातरी ॥ भव दुर्धर कापेल । कळिकाळें विळपेल । देहबुद्धि करपेल । ज्ञान साधिसी जरी ॥ सुख सुखें थोरावेल । ब्रह्मानंद हेलावेल । गुरुकृपा निभावेल दिनकरा भीतरी ॥ १ ॥

[ ३६०

गुरुकृपेंवीण काय । मना करिसी उपाय । उपाय चि तो अपाय । जन्ममृत्युदायक ॥ श्रम करावा केला चि । आविवेक नाथिला चि । भ्रमें भ्रमावें वांया चि । भजमजों माईक । देव धर्म तीर्थ व्रत । योग याग कर्म नित्य । न कारिती जीवन्मुक्त । पुनरावृत्ति योजक ॥ ऐसें नाथिलें चि सर्व । काल्पनीक मिथ्या भाव । दिलकरा स्वयमेव । गुरुकृपा सम्यक ॥ १ ॥

[ ३६१

अगणित पुण्य होय । तरी लागे रामसोये । लोकलाज भग काय । अलोलिक विश्रामु ॥ जेथें मी तूं ऐसी भाप । कांहीं नुरे चि निशेष । तेथें कल्पनाप्रकाश । धरी कोण वेश्रमु ॥ अनुर्वाच्य अडनांव । निर्विकल्प ज्याचा गांव । अहं आत्मा ब्रह्मभाव । तेथें कोठें संभ्रमु ॥ संतकृपेचा पवाड । निसंदेह तो निवाड । दिनकर ह्मणे गोड । सेवित्याचा आश्रमु ॥ १ ॥

[ ३६२

करीं टाळी वाचें राम । दास गर्जती निष्काम । सर्वकाळ हा

च्चि नेम । ध्यान दृष्टि लक्षुनी ॥ हरिकीर्तनीं सौरस । समुदायाचा ह-व्यास । पर्वेजयंत्यांचा ध्यास । चित्त वित्त लाउनी ॥ ब्रह्मानंदें हेला-वती । शांती चोहटां नाचती । आपपर हें नेणती । संतोषासी सेउ-नी ॥ ऐसे वैष्णव उदार । देती सुखाचे उद्गार । त्यांचे पदीं दिनकर । देहभाव निरसुनी ॥ १ ॥

[ ३६३

सुरवर नरशूर । यक्ष गंधर्व किन्नर । योगी मुनी विद्याधर । रामनामें गर्जती । दैत्य राक्षेस दानव । ऋषेश्वर गण मानव । पशु पक्षी सदाशिव । रामनामें गर्जती ॥ अहिराज फणीवर । नद नदी सरोवर । मेरु धरा गिरिवर । रामनामें गर्जती ॥ चंद्र तारा दिनकर । म्हीस कपि तरुवर । सर्व जीव चराचर । रामनामें गर्जती ॥ १ ॥

[ ३६४

धन्य धन्य नरदेह । स्वहिताचा निःसंदेह । पारि पूर्व पुण्य साह्य । बरें जालें पाहिजे ॥ जरि पूर्व पुण्य होय । तरि लागे राम सोय । जन्ममृत्यूचे अपाय । येहीं कोठें राहिजे ॥ स्वसंवेद्य सुखघन । निजानंदें परिपूर्ण । देहभावनिरशन । अहंकारें नुरिजे ॥ दिनकर ह्मणे पूर्ण । पावोनियां समाधान । स्वसंवेद्य सुखावोन सर्वमान्य होइजे ॥१॥

[ ३६५

जन पाहे वरपंग । परि नेणे अंतरंग । ऐसियांचा गुणसंग । कामा नये साधका ॥ देहबुद्धीचे दायक । नवरसिक गायक । नाना दुर्भेद वादक । गोष्टी बोले भेदका ॥ निंदी सन्मार्ग संतांसी । द्वेषें रची अपायासी । प्राणी नेणे स्वहितासी । युक्ति नेघे बोधका ॥ दिनकर ह्मणे हिन । प्राणी ठके कार्येवीण । अंतीं आरूढपतन । कर्ममार्ग-छेदका ॥ १ ॥

[ ३६६

सोफी जंगम जटिळ । द्विज संन्यासी सुशीळ । नाथ भराडे घडील । क्षपणीक बैरागी ॥ निराहारी दिगंबर । मायाधारी वस्त्रधर ।

भगवे तांबडे फकीर । उवडे बोडके भंगीं ।। जिंदे मुल्लां कलंदर । बंदे सेख मुसाफीर । वल्ली काजी पेगंबर । बेकइद दुरंगी ।। ऐसे अनंत वेषज । पंथ चालती निर्लज । दिनकरा ते सहज । धन्य जाले स्वरंगीं ।।१।।

[ ३६७

गुरुकृपा हो जयासी । जावें शरण तयासी । तो चि वारील भयासीं । ब्रह्मज्ञान बोधुनी ।। जन्म मृत्याचे अपाय । त्यास रचील उपाय । दृढ धरावे ते पाय । प्रत्ययेंसीं शोधुनी ।। ज्ञानतेज प्रकाशेल । बुद्धिकोश विकासेल । अहंतम विनाशेल । मत्तवाद रोधुनी ।। दिनकरा समाधान । गुरुकृपें अनुसंधान । प्राप्त होतां अभिधान । सोहंसिद्धी साधुनी ।। १ ।।

[३६८

राम नाम सत्य सार । नित्य जपे गौरीहर । तें चि ध्या रे निरंतर । भवभयछेदक ।। अंबऋषी पराशर । व्यास नारद तुंबर । शुक पुंडरीक थोर । रामनामें निष्टंक ।। अगणित भक्तराज । ज्यांच्या नामें निजराज्य । स्वर्गीं पावती पूर्वज । ब्रह्मानंदें निशंक ।। दिनकर ह्मणे वाड । नरदेहीं फिटे चाड । संतसंगें पुरे कोड । रामनामें सम्यक ।।१।।

[ ३६९

सगबग सगबग । विषयांची लगबग । कामा नये तगबग । घरदार धनाची ।। झगमग झगमग । जाईजणि तगमग । वैभवाची सगमग । माझी तुझी जनाची । देहरंग वोरंगेल । पद पदवी खंगेल । अंतीं स्वहित भंगेल । तेव्हां आस्ता कोणाची ।। ऐसा नव्हे जों प्रयोग । तों तूं साधी आत्मयोग । दिनकरा स्वसंयोग । वृत्ति सोहंपणाची ।। १ ।।

[ ३७०

हरिकथा नामघोष । करताळिका विशेष । समुदाये हरिदास । हर्षयुक्त गर्जती ।। विणे वाजती झणाण । टाळ वाजती खणाण । चंग वाजती चणाण । संतजन रिझती ।। घुमघुमिती मृदांग । स्वरें गाजती

उपांग । तेणें माजे रसरंग । अभाविकें तर्ज्जेती[1] ॥ दिनकर ह्मणे रम्य । रामकथा अनुपम्य । परि भाविकांसी गम्य । ते तेथें चि मज्जती ॥१॥

[ ३७१

कल्पनेची शेंडी बोडी । त्रिगुणाचें सूत्र तोडी । षड्गुणाचें वस्त्र वेढी । निर्वासना रंगेंसीं ॥ सोहंभाव दंड धरी । ज्ञानकमंडलु करीं । विज्ञानाचें जीवन भरी । सर्वभूतनिवासी ॥ सहज सिंहासना-वरी । निसंदेह संध्या बरी । निराक्षर जप धरी । अगणत गणनेंसी ॥ संतसंगें हा संन्यास । घेई करूनि विन्यास । दिनकर ह्मणे वेष । न मिरवी कुडीसी ॥ १ ॥

[ ३७२

उन्मनीची पुडी जेवी । पूर्णतेची सुंठी सेवी । नारायण धरी जीवीं । नारायण होउनी ॥ अलोलिक मठीं वास । निरंतर सावकाश । देहबुद्धीचे धातूस । स्पर्शों नेदी नयनीं ॥ पूर्वाश्रमीं नाम जीव । स्मरण होतां स्मरे शिव । निरसुनी देहभाव । तें चि स्नान करूनी ॥ न बोडुनी हा सन्यास । साधकांसी सविशेष । दिनकरा स्वप्रकाश । ज्ञानबोधें बोधोनी ॥ १ ॥

[ ३७३

ब्रह्मज्ञानेंवीण नर । नर नव्हे खरा खर । हीण केला संवसार । सर्वापरी पाहातां ॥ पळेंपळ सावकाश । होतो आयुष्यासी नाश । अंतीं पडे काळपाश । निदसुरें[2] राहतां ॥ गेला नये येक क्षण । सेखीं होय विलक्षण । अंतरला सुलक्षण । अहंकार वाहतां ॥ दिनकर ह्मणे धन्य । नरदेहीं हें जघन्य[3] अंतीं तुज राखे कोण । ममतेचें वाहातां ॥१॥

[ ३७४

देहबुद्धीचा संकल्प । देई सोडुनी विकल्प । मनीं धरीं निर्विकल्प । स्वस्वरूप सोयरे ॥ नरदेहीं पळेंपळ । जातें आयुष्य निर्फळ । न करितां तें सफळ । अंतीं नर्क काय रे ॥ संतसंगती धरूनी । पाहे

---

१ बडबडतीं, शिव्याशाप देती. २ दुश्चित्तपणें, आळसांत. ३ अधम.

विवेकें करूनी । अविद्येक विवरूनी स्वसंवेद्य होय रे ॥ दिनकर ह्मणे गम्य। जये कृपेनें अगम्य। तये मूर्तीचा संगम। सोडूं नको पाय रे ॥१॥

[ ३७५

भक्तीवीण ब्रह्मज्ञान । ज्ञानेंवीण तें भजन । कामा नये परिछिन्न। येकेंवीण येक रे ॥ भक्तिज्ञानाचा विचार । कर्मेंवीण अनाचार । युक्त नव्हे तो विचार । येकेंवीण येक रे ॥ भक्ति ज्ञान कर्ममार्ग । विणा वैराग्यें अभाग्य । बाधक हें यथायोग्य । येकेंवीण येक रे ॥ भक्ति ज्ञान कर्मयोग । वैराग्येंसीं फळत्याग । ऐसें नव्हतां अमार्ग । दिनकरा काय रे ॥ १ ॥

[ ३७६

काळदंडें धडकील । कळीमळें सडकील । भवरोग थडकील । निदसुरें राहातां ॥ योग जरेचा घडेल । तारुण्य हें विघडेल । तेव्हां दास्य न घडेल । राघोबाचें पाहातां ॥ दोष देहीं मिडकेल । पुण्यमार्ग फडकेल । आयुष्य हि झडकेल । कर्मबोझें वाहतां ॥ सेखीं सर्व वोसरेल । पापें प्राणी घसरेल । जो श्रीरामा विसरेल । दिनकरा बाहतां ॥ १ ॥

[३७७

घडी घडी आयुष्यासी । मूर्खा होत आहे नाश । सेखीं पडे काळपाश । तेव्हां कोण सोडील ॥ गंडा पोरें घरबार । विषयांचा हा जोजार । काळ करील संहार । क्षणामाजी नाडील ॥ अंतीं नाठवेल राम । शिवहृदयविश्राम । कैसा नाथिला चि भ्रम । अंतराय पाडील ॥ दिनकर ह्मणे धन्य । दोहींकडे नागवण । ना प्रपंच ना भजन । पक्ष कोण वोढील ॥ १ ॥

[३७८

पदोपदीं आत्मघात । जीवीं जडला संघात । केला अज्ञानें आघात । जन्ममृत्यु लाउनी ॥ आत्मा अविनाश घन । दाट निबिड सघन । त्यासी नाथिलें चि विघ्न । नेणिवेसी भाउनी ॥ नेणिवेनें बद्ध

जीव । जाणिवेनें मुक्त शिव । स्वस्वरूपीं दोन्हीं वाव । भावनेसी खाउनी ॥ आत्मा ऐसा निष्कळंक । त्यासी जीवत्वें कळंक । दिनकरा हें निष्टंक । गुरुकृपेवांचुनी ॥ १ ॥

[ ३७९

भवभय अनिवार । वाटतसे मज फार । कांहीं न कळे निर्द्धार । कैसे परि तरिजे ॥ जरी करूं तीर्थाटण । योग याग अनुष्ठान । तरी नाहीं आंगवण । वाउगें चि मरिजे ॥ पळेंपळ संवसार । वायां केला भूमिभार । मृत्यु आला मारेंमार । आतां काय करिजे ॥ दिनकर ह्मणे येक । संतकृपेचा विवेक । लाधे तरी च सार्थक । नाहीं तरी नुरिजे ॥ १ ॥

[ ३८०

जय राम जय राम । नित्य जपों पूर्णकाम । जनसज्जनविश्राम । सदाशिवचिंतनु ॥ योगियांचें निजधाम । साधकांचा मनोधर्म । मुनिजनध्येयवर्म । पूर्वापर नूतनु ॥ वेदशास्त्रें जयालागी । कर्म धर्म ज्यांची मागि । पाहातातिे वीतरागी । राम तो पुरातनु ॥ दिनकर ह्मणे देव । अनुर्वाच्य ज्याची माव । त्याचा जाणे अभिप्राव । केवि मानवी तनु ॥ १ ॥

[ ३८१

शुकमिसें गणिकेसी । जेणें नेलें वैकुंठासी । भावें स्मरतां तयासी । काय गती नव्हेल ॥ महा पतित कौळिक । मरामिसें तो वाल्मिक । ज्याचें काव्यवर टीक । वंद्य केलें केवळ ॥ पापराशी अजामीळ । पुत्रमिसें तो सुशीळ । अंतीं लाधला कैवल्य । निजानंद निर्मळ ॥ दिनकर ह्मणे राम । पतितांचा पूर्ण काम । मां तो सुशीळां विराम । ध्यातां केवि होईल ॥ १ ॥ ३० ॥

[ ३८२

निरसुनी भवभ्रंम । करी ज्ञानाचा संभ्रम । तेणें पावसी निःभ्रम । भ्रमाविभ्रमातीता ॥ सुख सांपडे दडस । पुरे मनाची भडस ।

---

१ घनदाट, भरींव, पुष्कळ. २ हौस.

माजे विवेक घडस । सारासार शोधितां ॥ धन्य धन्य नरदेह । समाधानें निसंदेह । उडे विदेह अदेह । समाधानी राहातां । दिनकर रामदास । ह्मणे होउनी उदास । करीं सद्गुरूचें दास्य । सुखी होसी तत्वता १

[ ३८३

कर्में करिती प्रतापें । परिहारिलीं त्रितापें । जाती कुंथतें संतापें । जन्ममृत्यूच्या घरा ॥ देहभावनेच्या पापें । द्विजें गिळिलीं अमूपें । केवि होती तें निष्पापें । नाहीं निश्चयो खरा ॥ याग सकाम संकल्पें । स्वर्ग इछिती आकल्पें । इछितां चि गेलीं कल्पें । येतां जातां संसारा ॥ ऐसीं पतितें कुरूपें । दिनकरा महत्पापें । लक्ष चौऱ्यासी विरूपें । भोग भोगिती बरा ॥ १ ॥

[ ३८४

शुद्ध आत्मज्ञान धन । जया नित्य तो सधन । तया कल्पांतीं नैधन । होतां न दिसे नरा । विधिविधान गहन । शीळ चालवी सहन । नित्य विज्ञान वहन । ज़यालागी विहारा ॥ निजपणें तो संपन्न । पण ग्रासुनियां पण । पणोपणीं हि आपण । विचरत चतुरा ॥ पदोपदीं धरा धन्य । धन्य जेणें त्रिभुवन । केला पतितीं अमान्य । दिनकरा तो खरा ॥ १ ॥

[ ३८५

कर्में मातला कर्मिष्ठ । भ्रमें भ्रमला भ्रमिष्ट । धर्में फुगला धर्मिष्ठ । पात्रापात्र भुलला ॥ मदें मातला मदांध । मोहें मोहिला मोहांध । धनें मातला धनांध । तया न दिसे भला ॥ दोषें कंटाळेना मन । गर्वे आंधळे नयन । तेणे न देखे सज्ञान । अणुमात्र तो डोळां ॥ परि जाणवेल तेऽहां । नर्कीं पचविती जेऽहां । दिनकर ह्मणे देवा । विसरला हें त्याला ॥ १ ॥

[ ३८६

मदगदळ सदळ । याची लागतां वदळे । भवव्याधींचे गोंदळ । घरोघरीं घालिती ॥ मान्यतेची वळवळ । देहीं न राहे निवळ । अप-

वादाचें कवळ । द्वेषमुखें सेविती ॥ विधिनिषेधांचा चळ । राहों नेदीं पैं निश्चळ । स्वर्ग नर्क अविचळ । ज्याच्या संगें भोगिती ॥ ऐसे अविचार खळ । दिनकरा ते बखळ । मदें मातले निखळ । कुंभपार्की पचिती ॥ १ ॥

[ ३८७

तन मन धन जन । काळ करील तर्जनें[2] । खोटें मायेचें सौजन्य । सर्व सोडितां बरें ॥ मान्यतेची कणकण । आंगीं जडतां निकण । काळ मारी चडकन । अपमानाचीं भरें ॥ ब्रह्मद्वेषाचें भूषण । मिर्वी निंदेचें शासन । ऐसियासी आश्वासन । काळदंडें आदरें ॥ सर्व सोडूनियां येक । धरीं विवेक सम्यक । दिनकर ह्मणे भाष । तो चितरे हें खरें ॥ १ ॥

[ ३८८

सुरवर नरशूर । नामें पावन असुर । मुनिवर वनचर । ऱ्हीसतारक खरा ॥ जड तारिले जळांत । सिंधु बांधला पळांत । शिरोमणी सकळांत । राम चित्तीं तो धरा ॥ तीर्थ व्रत दान पुण्य । सर्व कीजे रामार्पण । तरि होइजेल धन्य । निजपदीं चतुरा ॥ दिनकरकुळकाम । जीवीं धरावा निष्काम । स्वप्नीं तो हि भवभ्रम । कोण्हा न दिसे बरा ॥ १ ॥

[ ३८९

तन मन जन धन । वन भुवन साधन । सर्व आहे हें नैधनें[3] । सारासार पाहातां ॥ सार शोधीं सावधान । काळें मांडिलें संधान । रामीं लावीं अनुसंधान । सावधान तत्वता ॥ पद पदवी जाईल । जऱ्ही जाला ईश्राईल । अंत सकळां होईल । येथें नाहीं अन्यथा ॥ दिनकर ह्मणे राम । धरीं सोडूनि विराम । तेणें पावसी आराम । सुखरूप सर्वथा ॥ १ ॥

---

१ ग्रास. २ मागें टाकणें. ३ विनाशी. ४ ( ? )

[ ३९०

गुरुकृपेवीण दक्ष । बोले ज्ञानज्ञेयपक्ष । केवि पावेल तो मोक्ष । ब्रह्मस्थितिवेगळा ॥ अनुभवेंवीण देख । शिकविलें बोले शुक । तैसें ज्ञान तें शाब्दिक । जना बोधूं शिकला ॥ नसे वैराग्याचा लेश । कैंचा कर्मांचा हव्यास । ज्ञानमार्ग तरी वोस । अहंकारें नाशिला ॥ दिनकर ह्मणे मूर्ख । मानी विषयांचें सुख । परि रौरवांचें दुःख । अंतीं भोगी येकला ॥ १ ॥

[ ३९१

बोलण्यानें होतो नाश । न बोलावें सविशेष । नेमक चि स्वप्रकाश । सर्वां ठाईं पाहिजे ॥ तरि होइजेल धन्य । जडजावें राजमान्य । नाहींतरी ते जघन्य । अपवादें लाहिजे ॥ ह्मणऊनियां नेमक । वर्तणूक प्रपंचिक । तथा हो कां परमार्थिक । तन्हि न्यायें राहिजे ॥ ऐसे नीतिवंत नर । नरवेषें ते ईश्वर । धन्य ह्मणे दिनकर । ऐसे नरदेही जे ॥ १ ॥

[ ३९२

उडऊनि वर्णाश्रम । तोंडें बोले सर्वब्रह्म । काय कैंचे देवधर्म । काल्पनिक आघवें ॥ कैंचे स्वर्ग कैंचे नर्क । कैंचे विधींचे संपर्क । ऐसें बोधूनि कुतर्क । रची नाना लाघवें ॥ अविद्येचें जाड बळ । धरूनियां अनर्गळ । क्रियेवीण शब्दजाळ । न्यायनीति नाठवे ॥ दिनकर ह्मणे श्रम । करी केला चि वेश्रम । अंतकाळीं अविश्रम । केवि राम आठवे ॥ १ ॥

[ ३९३

अनुभवेंवीण ज्ञान । भुंके नरवेषें श्वान । शिश्नोदरपरायण । विषयांसी सोंकलें ॥ निंदी तीर्थ देव धर्म । विधिविधान स्वकर्म । भूतदया नित्यनेम । शब्द सांगे शिकले । जें जें दिसे तें तें ब्रह्म । ऐसें भजन सुगम । उपदेशी सर्वब्रह्म । बोल बोले मोकळे ॥ दिनकर ह्मणे काय । शब्दब्रह्में हित होये । तरि धरूनि उपाय । साधक कां थोकले ॥१॥

---

१ लौकिक. २ मिश्रण. ३ हंताग्रत. ४ आयकाळी [illegible]

[ ३९४

किती संसाराचा सोस । जीवा करिसी विशेष । वय वेंचलें उदास । रांडापोरें पोसितां ॥ माझें घर माझी दार । माझा सकळ संसार । ऐसा नाथिला जोजार । खरपणें वाहातां ॥ सेखीं जाणें येकलें चि । तेव्हां संगति कोणाची । प्रपंचाची कीं देवाची । येमदूत ताडितां ॥ दिनकर ह्मणे वेगें । सवें सांडूनियां मागें । हित करीं संतसंगें । सुखी होसी तत्वतां ॥ १ ॥

[ ३९५

काय जीवा भुललासी । माझें माझें जल्पतोसी । सोडूनियां राघेवासी । विषयांसी सेविसी ॥ वय वेंचे पळेंपळ । अंतीं राहेल सकळ । तेव्हां कोणाचें तूं बळ । येमदूतां दाविसी ॥ घालूनियां कर्मपाश । दूत नेती सावकाश । तेव्हां यातना कोणास । आपुली तूं लाविसी ॥ आतां तऱ्ही मूढा सोय । धरीं सद्गुरूचे पाय । दिनकर ह्मणे काय । नाथिलें चि भाविसी ॥ १ ॥

[ ३९६

मना सोडावे ते जन । जेथें बहुत दुर्जन । खळ खोटे बुद्धिहीन । सारासार निंदिती ॥ भाव भक्ति ना आचार । कैंचा स्वधर्म विचार । चोर कठोर साचार । हीनजना वंदिती ॥ हरिकीर्तन पुराण । कथासार निरूपण । तेथें नाहीं ज्याचें मन । सज्जनासी खेदिती ॥ ऐसियांसी नमस्कार । दिनकरा निरंतर । जैसे क्रियेचे विखार[1] । स्वहितासी छेदिती ॥ १ ॥

[ ३९७

नरदेहीं सावधान । जीवा नको वेवधान । लावीं रामीं अनुसंधान । करीं हित आपुलें ॥ आतां जाणें क्षणा जाणें । नाहीं कोण्हासी राहाणें । सेखीं लागेल भोगणें । कर्म केलें नाथिलें ॥ होऊनियां शुद्धबुद्ध । देव भजावा प्रसिद्ध । तयावीण दुजा वेध । जयातें चि नाडळे ॥

---

१ विषाकार, सर्प.

दिनकर ह्मणे नीट । पंथ सोडूनि अव्हाट[1] । धरी तयासी कचाट । पदोपदीं दाटकें ॥ १ ॥

[ ३९८

अज्ञानाचें तूं निधान । जीवा आहेसी संपूर्ण । रात्रिदिस वणवण । रांडापोरें पोसितां ॥ द्रव्यदाराअभिलाष । विषयांचा आशापाश । गळां पडिला विशेष । ज्ञानपंथ नेणतां ॥ नरदेहाऐसा वास । पावोनियां सावकाश । अहंकारें नासलास । मी मी माझें जल्पतां ॥ आतां तऱ्ही निजसोय । धरीं सद्गुरूचे पाय । दिनकरा प्राप्त काय । देहबुद्धि वाहतां ॥ १ ॥

[ ३९९

पृथ्वी आप तेज वारा । चहूं भूतांचा पसारा । महद्भूत सैरावैरा[2] । तें पांचवें पाहातां ॥ अंतरात्मा तो चंचळ । चळे चाळी दृश्यमूळ । तो चि शोधावा सकळ । भूतमात्रीं तत्वता ॥ सत्तारूप तो चैतन्य । द्रष्टा साक्षी जो अनन्य । स्वसंवेद्य घन शून्य । ऐसीं नामें धरिता ॥ दिनकर ह्मणे दृश्य । निरसितां स्वप्रकाश । उरे द्रष्टत्वें साभास । दर्शन हि सर्वथा ॥ १ ॥

[ ४००

दृश्यासवें द्रष्टा जाय । येथें सांगावें तें काय । दर्शनासी ते चि सोय । येक येकासी मूळ ॥ वाच्यात्रिपुटीचें भान । निरसितां परिपूर्ण । अनुर्वाच्य निरंजन । परब्रह्म निर्मळ ॥ द्वैतभावाचे जघन्यें[3] । भेदाभेद जाले शून्य । चौ वाचां पडिलें मौन्य । ऐसें जालें निर्मळ ॥ संतसंगें हा विचार । विचारितां सारासार । निसंदेह हा निर्द्धार । दिनकरा केवळ ॥ १ ॥

[ ४०१

जड चंचळ निश्चळ । तिन्ही पदार्थ केवळ । यांत उत्तम निवळ । निरासितां जें उरे ॥ आत्मा चंचळ तो सार । देह जड तो

---

१ आडवाट. २ सर्वव्यापी असें आकाश. ३ निकृष्ट, हलक्या प्रकारचे.

असार । विवरतां सारासारें । निश्चळ चि साजिरें ॥ सावधान जीव दक्ष । तो चि होऊनि सापेक्ष[1] । गुरुकृपें पावे मोक्ष । तत्काळ चि विचारें ॥ दिनकर ह्मणे व्यस्त[2] । अस्तऊनियां समस्त । संप्रज्ञातसमाधिस्थ । निरंतर तो चि रे ॥ १ ॥

[ ४०२

जडदेहीं सर्वकाळ । अंतरात्मा तो चंचळ । चळे चाळी दृश्यमूळ । द्रष्टा होऊनि सदा ॥ तिहीं अवस्थांचें भान । बरें संसारिक ज्ञान । प्रपंचाचा ऊगखूंग । संरक्षितो सर्वदा ॥ परि नाहीं आत्मज्ञान । मोक्षदातें जें गहन । तरी सीण कायेंवीण । पदोपदीं आपदा ॥ दिनकर ह्मणे काये । नरदेहीं हे अपाये । पशुप्राणियांची सोय । कैसी होय गोविंदा ॥ १ ॥

[ ४०३

अधऊर्ध्व समसंधि । श्वासोश्वासीं दृढ बुद्धि । करूनियां साध्य साधीं । गुरुवाक्यें साधका ॥ तिहीं अवस्थांमाझारीं । स्मरण करावें अंतरीं । जडांनियां निरंतरीं । चराचरवेधका ॥ मनपवन समान । अग्निचक्रीं समासन । घालूनियां कीजे ध्यान । ध्यात्रें मोक्षदायका ॥ दिनकर ह्मणे सद्य[6] । साक्षात्कारें स्वसंवेद्य । पद वेदप्रतिपाद्य । प्राप्त होय आयका ॥ १ ॥

[ ४०४

मायाब्रह्माचा विचार । विचारी जो सविचार । काय जाणे अविचार । अज्ञानें जो गुंतला ॥ देहबुद्धीचा वोखर । वाहे प्रपंच-आखर । पाप पिकवी तो खर । अहंकारें वोतला ॥ सत्य मानूनि संसार । करी कर्तृत्व असार । देत आकल्प विसार । रौरवांसी पातला ॥ न विचारितां अज्ञान । दिनकर ह्मणे ज्ञान । केवि पावेल विज्ञान । संकल्पें जो भूतला ॥ १ ॥

---

१ संबद्ध, अवलंबणारा. २ गोंधळलेल्या विचाराचा. ३ विरसूनियां. ४ बाटाघाट. ५ खालीं वर वाहणारे प्राणवायुपंचक. ६ तत्क्षणीं.

[ ४०५

काय सांगावें नवल । देतां देहाचें कावेल । प्राप्त होतसे केवळ । कैवल्य चि जीवांसी ॥ कांहीं नलगे सायास । नाना प्रयत्नीं प्रयास । बोले भागवतीं व्यास । तो स्वरूपनिवासी ॥ होतां तत्वांचा विनाश । पद पावे अविनाश । तया कल्पांतीं हि नाश । नव्हे तुके शिवासीं ॥ नरदेहीं हें साधन । जया साधे तो चि धन्य । दिनकर सावधान । अस्तां मायाप्रवासीं ॥ १ ॥

[ ४०६

देव वेदप्रतिपाद्य । असंभाव्य स्वसंवेद्य । स्वप्रकाश सर्वआद्य । निजानंद केवळ ॥ सर्वां सर्व सर्वेश्वर । अंतरात्मा जीवेश्वर । जो हें होय चराचर । पाळी जाळी सकळ ॥ द्रष्टा साक्षी ब्रह्मनिष्ठ । कल्प कल्पांत कनिष्ठ । काळ अक्षरवरिष्ठ । महद्भूत सोज्वळ ॥ दिनकर ह्मणे देव । पिंड ब्रह्मांड सावेव । कर्ता भोक्ता हर्ता शिव । शक्तियुक्त चंचळ ॥ १ ॥

[ ४०७

थोरांहून महाथोर । तो हा विश्वीं विश्वंभर । सर्वाधार सर्वेश्वर । सर्वांतरनिवासी ॥ गुणात्मक तिन्ही देव । ब्रह्मा विष्णु महादेव । यांचा देव सदाशिव । सेव्य सर्व जीवांसी ॥ मायेआविद्येचें भान । सर्व होऊनि आपण । पंचभूतिक सगुण । स्वयें चाळी सर्वांसी ॥ स्वस्वरूपाचिये खुणें । जाणे नेणे[3] ज्ञानाज्ञानें । तो चि दिनकर ह्मणे । भोगी मुक्ति भवासी ॥ १ ॥*

[ ४०८

कायें[3] पाहासी निदान दीनबंधु ॥ ध्रु ॥ ममतापरें सर्व सोडुनि गेलीं । आतां तूं धांव कृपासिंधु रे ॥ १ ॥ नक्र जळीं बळें काळ चि

---

१ कौल, किंवा कवल ह्म० ग्रास. २ नित्यकल्प व महाकल्प या भेदेंकरून तो (हंसकोश). ३ जाणणें, नेणणें. * मागील पदांक ३५२ पासून ४०७ पर्यंतचीं ५६ पदें एका च छंदाचीं व एका च जातीचीं सारखीं आहेत. मुळांत प्रत्येक पदा-पुढें पदाचा अनुक्रमांक १ ते ५६ पर्यंत दिलेला आहे. ३ हा गजेंद्राचा धावा आहे.

भासे । सोसवेना मज क्रूर बाधू रे ॥ २ ॥ दीनें कारि मी परि दिनकर तूं रे । त्याचा छेदीं विरोधु रे ॥ ३ ॥

राग परज [ ४०९

॥ ध्रु० ॥ स्मर मन राम राम राम ॥ छ ॥ पतितपावन करुणासागर । मुनिजनमनविश्राम ॥ १ ॥ परमपुरुष भवबंधविनाशन । हरहृदयानंदधाम ॥ २ ॥ मुनिवधुश्रापविमोचन देव । दिनकरवंशआराम ॥ ३ ॥

॥ राग रामक्री ॥ [ ४१०

॥ ध्रु० ॥ माझा सार्थकदिवस आजि ॥ छ ॥ सद्गुरूचे पाय देखिले नयनीं । आल्हादें जीव सुखामाजीं ॥ १ ॥ स्वरूपीं तन्मय मानस जालें । होउनि विषयांसी वाजी ॥ २ ॥ दिनकर ह्मणे अनुर्वाच्य केलें । ठेविलें संतसमाजीं ॥ ३ ॥

[ ४११

॥ ध्रु० ॥ मनुजा सावध सद्गुरुभजनीं । होसी पावन विजनीं ॥ छ ॥ सनकादिकांचें हें वर्म । मुनिजनमानसधर्म ॥ १ ॥ सकळ हि साराचें निजसार । सद्गुरुवाक्यविचार ॥ २ ॥ दिनकर + +[3] णे जो सविचार । तो उतरे भवपार ॥ ३ ॥

राग गौडी [ ४१२

॥ ध्रु० ॥ रामा मानस स्थिर न व्हाय ॥ छ ॥ अध्यात्मविद्येचा विचार न करी । न धरी स्वहितसोय ॥ विवेक वैराग्य नावडे भजन । आवडे कोकउपाय ॥ १ ॥ श्रृंगारिक नटनाट्य भांडीव । श्रवणीं ऐकों जाय ॥ काव्यरसिक कळावंत गायन । गीत नृत्य पाहों ठाय ॥ २ ॥ विरहानळ जेणें होय प्रदीप्त । वाढे काम अपाय ॥ ऐसे अनर्थ वरी न वरी हित । दिनकर ह्मणे करूं काय ॥ ३ ॥

---

१ दीनपणें करुणा भाकी. २ कंटाळा, त्रास. ३ या पुढें ज्या ठिकाणीं फुल्या दिल्या आहेत तीं अक्षरें फाटण्यांत गे.. आहेत असें समजावें. ४ कामविषयक शास्त्र. ५ वाद्यें ? ६ स्वीकारी.

राग काफी [ ४१३

पावन नरदेह पावोनि काय असुरा । प्राण्या जाळासी निदसुरा । स्वहित सोडुनी विषयसैरा सेविसी पामरा ॥ १ ॥ धृ० ॥ सावधान होईं रे । मागें पुढें पाहीं रे । रामावांचुनि सखे कोण देहीं गेहीं रे ॥ छ ॥ काळ हा कठिण व्यापक मोठा सगुणीं व्यापला । त्रितापें कोपला । प्रळय करीतां न ह्मणे पर अथवा आपला ॥ २ ॥ विषम-काळीं सखीं तें पिसुणीं येती स्मशानवरी । फिरोनि जाती घरा ॥ ऐसें जाणोनि दिनकर ह्मणे रामीं कां न्हसी पुरा ॥ ३ ॥

राग काफी [ ४१४

काम नको क्रोध नको शोक मोह ताठा । नको घोर गर्व-फांटा । मान अपमान नको दंभ द्वेषवाटां ॥ १ ॥ धृ० ॥ रामा भजन तुझें देईं । मज ठेवीं अभेदसोईं । अहंतापाविण +++ग भेद कोणे ठाईं ॥ छ ॥

( पुढील दोन चरणें फाटण्यांत गेलीं )

\+ + + + + + ॥ २ ॥

क्रियेवीण बोल नको नको निंदा स्तुति । असंतसंगति । दिनकर ह्मणे कांहींच नको तुजविण सीतापति ॥ ३ ॥

राग काफी [ ४१५

शिवादिक सिद्ध साधु सनकादिक ज्ञानी । महा समाधानी । हें चि सांगोनि गेले वसिष्ठ कपिल महामुनी ॥ १ ॥ धृ० ॥ गुरूसी शरण जावें । स्वस्वरूप विवरावें । सारासार विचारूनि साधनीं दृढ व्हावें ॥ छ ॥ उत्तम नरदेह तेथें उत्तम आयुष्य । जाणे तें मनुष्य । त्याहीमाजीं उत्तम आत्मसाधनीं निमिष्य ॥ २ ॥ येचि देहीं याचि डोळां सोहळा स्वसुखाचा । जरी भोगिजेना साचा । ह्मणे दिनकर तरी सीण कां वैराग्याचा ॥ ३ ॥

राग काफी [ ४१६

संसार तुटका । अवघा चि फुटका । काइयासी कांहीं लविता नलगे माईक लटका ॥ १ ॥ धृ० ॥ सा[illegible] होईं रे । परतोनि पाहीं

रे । मी माझें ह्मणतोसी त्यासी + + काई रे ॥ ध्रु ॥ उगा चि हुंबसी । नाथिल्यासी झोंबसी । आपुलें पारिखें ह्मणतां काळपाशीं लोंबसी ॥ २ ॥ वाउगें बोलसी । सीमा सांडुनी चालसी । चौऱ्यासी लक्ष योनी पूयपंकीं लोळसी ॥ ३ ॥ विषय वानिसी । तेथिल सुख मानिसी । रौरवांचा भोगीं दुजें कोण आणिसी ॥ ४ ॥ ह्मणे दिनकर देखोनि डोळे झांकिसी । गिळिले विळे जाणवती तुज जेव्हां तूं बोकिसी ॥ ५ ॥

राग वैराटिका [ ४१७

॥ ध्रु० ॥ + + + + जयां । तो चि प्राप्त तयां । + + + + वायां । ठेऊं नये ॥ ध्रु ॥ मेघ चातकासी । खतें काउळ्यांसी । सेव्य चकोरासी । चंद्रामृत ॥ १ ॥ तितरांसी खडे । मयोरांसी किडे । राजहंसांपुढें । मुक्ताफळें ॥ २ ॥ रात्रीचा दिवस । होतसे येकांस । दिवसाचा वास । रात्री येकां ॥ ३ ॥ विश्वीं विश्वंभर । भरला अपार । देतसे उदार । ज्याचें त्यासी ॥ ४ ॥ दिनकर ह्मणे । प्राप्त क्रियमाणे । संचिताच्या गुणें । त्रिभुवनीं ॥ ५ ॥

राग वैराटिका [ ४१८

अनंता जन्मांचें । सुकृत अनंत । घडे अकस्मात । सदैवांसी ॥ १ ॥ ध्रु० ॥ तरी च सार्थक । संतसमागमें । लाधती संभ्रमें । पुण्यश्लोक ॥ ध्रु ॥ विधीनें आचार । स्वधर्में विचार । करी निरंतर । ब्रह्मार्पण ॥ २ ॥ श्रवण मनन । निजध्यास पूर्ण । साक्षात्कारें ज्ञान । विचारणा ॥ ३ ॥ दिनकर ह्मणे । + + चा तो जाणे । स्वस्वरूप बाणे । स्वानुभवें ॥ ४ ॥

[ ४१९

( पहिलीं दोन चरणें फाटण्यांत गेलीं ) ॥ १ ॥ ध्रु० ॥ धन्य जालों आह्मी सज्जनसंगतीं । धन्य जालों आह्मी रे । सज्जन-संगतीं । संसार पुढती पारुषला रे ॥ ध्रु ॥ कोटी यज्ञाची फळश्रुति जाणा । कोटी यज्ञाची रे । फळश्रुति जाणा । वंदितां चरणा भावें

संतांच्या ॥ २ ॥ आमचें सर्व हि सद्गुरूचे पाय । आमचें सर्व हि रे ।
सद्गुरूचे पाय । दिनकरा लय रामदासीं रे ॥ ३॥

---

## हिंदुस्थानी पदें

राग कामोद [४२०

स्वहितके काज येक येही विचार । रामस्मरण करीं बारें हि बार ॥१॥ धृ० ॥ भज्य मन रामचरन सुखसार । छोरि उपाधीबिखें संसार ॥ छ ॥ पतितको पावन राम हि राम । और भज्यनसे कछु नहि काम ॥ २ ॥ दिनकरअंतर सो हि सुधार । रामभजनबिन दुख अपार ॥ ३ ॥

राग गौडी [४२१

अंतसमे कोड नावे साथ । बकत सुहृद त्रिया और हि भांत ॥१॥ धृ० ॥ राम कहो रघुनाथ कहो रे । भवसागर हा जात बहो रे ॥ छ ॥ धन्य जो बनवाकी बलिहारी । चरन लगन जिन्हें अहिल्या तारी ॥ २ ॥ आप बुडे बुडावे औरसे । सो जड जल तारे सो प्रभु कैसे ॥ ३ ॥ बनचर ले लंकापुर घेरे । रावनके दस सीसे उतारे ॥४॥ त्रिदश देवको बंद छुरावे । दिनकरमनमे सो राम गावे ॥५॥

राग कामोद [४२२

करम करामति काम कुसंग । त्यजीं भज राम अनंत अभंग ॥१॥ धृ० ॥ निशिबासर यहि बाणिबखान । राम हि राम सुधारसपान ॥छ॥ सार सुधारससें अगणित । दीन दिनकर सो सुख लेत ॥ २ ॥

राग गौडी [४२३

गुरुजीकी बात प्रचीतसें पाई । जे बातसें अहंममता गमाई ॥ १ ॥ धृ० ॥ वो हि धंदा लागो भाई । अहं सोहं ज्याहां मिटगये दोई ॥ १ ॥ ज्युतें देखूं उतें मै मेरा सांई । देखणा देखे सो वाबिण वो हि ॥ २ ॥ अपनी लीला आप हि ज्याने । आपें हि दिनकर होय बखाणे ॥ ३ ॥

राग केदारा [ ४२४

बाबा कामक्रोधको कछु नहि काम । ज्याके संग पिरत अति-जेम ॥ १ ॥ धृ० ॥ कर ताळी बाबा कहो मुख राम । निकी बाट चढतें निजधाम ॥ छ ॥ धन दारा घर ममता फांसीं । डारिकें फेरत लछ चौऱ्यासी ॥ २ ॥ काह करते प्राणी अनहित अपना । यो नर-देह बाबा जैसा स्वपना ॥ ३ ॥ गहेला लोक कहे सब मेरा । राम-दीपकबिन सब हि अंधेरा ॥ ४ ॥ कहत दिनकर रामदास होणा । रामभजनबिन पळ हि न जीवना ॥ ५ ॥

राग कामोद [ ४२५

ज्ञानी ग्यान चिन्हत हो राम । ध्यानी ध्यानसें पूरनकाम ॥ १ ॥ ध्रु० ॥ मेरा तन मन सबसें उदास । चरनकमलका ले रहे बास ॥ छ ॥ ज्योगी जटिल पंडित हरिदास । प्रभुगुनरति करते विलास ॥ २ ॥ ज्यप तप मुद्रा आसन नेम । दिनकर ज्याणे तिहारो नाम ॥ ३ ॥

राग केदारा [ ४२६

राम राम कहिये मूढमती । राम राम कहिये ॥ छ ॥ भवसाग-रमां हि बुडबुडीं मरिये । सो नामतरणीच्ये हि क्यौं न तरिये ॥ १ ॥ विषयबीष कैसें अम्रित माने । जौं मीन लोहसें मोहित रतिये ॥ २ ॥ आयुर्बल पळपळ मित ज्यावे । अंतसमें कोउ संग न आवे ॥ ३ ॥ जननि जनक सुत धन जन दारा । संपत प्रांतसमें पच्यतायें ॥ ४ ॥ दिनकर कहे मूढ भ्रमगति त्यजिकें । निजहित रामभजनसें हि करिये ॥ ५ ॥

राग कामोद [ ४२७

गावं ते निगमगुण तेरे रे । सांईसें सिरताज्य कोई नहीं रे ॥१॥ धृ० ॥ तूं हि तूं हि तूं हि दीनबंधू रे । छेदक भवबंध कृपासिंधू रे !! १ ॥ ध्रुव अंबरीष गज गणिका रे । भाषत अबिगत भाषा रे ॥२॥ बळि बिभीषण हनुमान रे । चरनके पास दिनकर दीन रे ॥३॥

[ ४२८

बैष्णवजनप्रतिपाळक कैसा । जाहां देखूं वाहां जैसाको तैसा ॥ १ ॥ धृ० ॥ रामदाही रामदाही सांची बात । निमिष न ज्युदा होवे प्रभुको साथ ॥ छ ॥ खातें पीतें जन बनमें सांथी । मनमें बैठे रघुराज्यगुसांई ॥ २ ॥ प्रगट निरंजन सबघट देखूं । दिनकर कहे हुं और न लेखूं ॥ ३ ॥

[ ४२९

ना कछु भाऊं ना कछु लेऊं । सहजस्वरूपकी बात बताऊं ॥ १ ॥ धृ० ॥ सबघट व्यापि रेहे भरपूरा । जगमें रहे जगजीवन हि सारा ॥ छ ॥ यैं हि बकत बेदशास्त्रपुराणा । त्यजी जग जीवनअंतर लेना ॥२॥ अंतरमां हि निरंतर सांई । कहे दिनकर कांहां खाली नाहीं ॥३॥

राग मारु [ ४३०

॥ धृ० ॥ दूरि करो गुमराई बाबा ॥ छ ॥ तेढी बातसे कछु नहि काम । आछी हे गरिबाई रे ॥ १ ॥ बुरे फेलसे कोउ न जींके । ज्यमकी बुरी खसलाई रे ॥ २ ॥ कहे दिनकर येक रामभजनबिन । झूटी सब चतुराई रे ॥ ३ ॥

राग तुंडी [ ४३१

॥ धृ० ॥ भावभगति लगाऊं । हरजीसें भावभगति लगाऊं ॥छ॥ कामिनि कांचन और सुहृदजन । ममता परनज्य गाऊं ॥ १ ॥ छिन छिन काल घटत घटज्यावे । बहुरि न नरदेह पाऊं ॥ २ ॥ कहे दिनकर हूं सब समज्याऊं । रामचरन रमिज्याऊं ॥ ३ ॥

राग कल्याण [ ४३२

॥ धृ० ॥ कब देखूं रघुराय मईरी कब देखूं रघुराय ॥ छ ॥ गृहभ्रनज्यनकी पीरत न भावे । लागी धनकमन तन जरज्यावे ॥ १ ॥ नवरसरंगसें चित्त न रीझे । झुरत निशिदिन सोहि बात खोजे ॥ २ ॥ मुनिजीवनबिन दिनकर प्यासा । मरज्यावे कछु नहीं दिलासा ॥ ३ ॥

राग सारंग [ ४३३

॥ धृ० ॥ सोरंग सारंगीमे सुभावे रे ॥ छ ॥ संगीत ज्यामें

सारंग आवे । सारंगधर समज्यावे रे ॥ १ ॥ तानमानकी झरके रिझयावे । रागरंग रमज्यावे ॥ २ ॥ टाळ मृदांग जंत्र ज्यमावे । दिनकरमन रसभावे रे ॥ ३ ॥

राग काफी [ ४३४

॥ धृ० ॥ दुनियामें हि खुदाई बंदे ॥ छ ॥ भलेकूं भीस्त बुरेकूं दोज्यख। कमावे वैसी कमाई ॥ १ ॥ फकीर जिंदे मुल्ला काजी। सबकोई दुनियासें हि ॥ २ ॥ पीर पेगंबर वल्ली मुसाफिर । दिनकर कहे इहांसें हि ॥ ३ ॥

राग केदार [ ४३५

॥ धृ० ॥ अज्यब बात चलाई गुनीनर ॥ छ ॥ धात न सूझे बात न सूझे । तनमन रीझरिझाई ॥ १ ॥ अपनि पराई तरख न बूझे । सोहि गति बनिआई रे ॥ २ ॥ गुनीनर प्यार दिनकर समजे । संगीतसें समज्याई रे ॥ ३ ॥

राग कामोद [ ४३६

बैष्णवपदरजको महिमान । घरदोरें बैकुंठनिधान ॥ १ ॥ धृ० ॥ बैष्णवजनकी लेऊं बलाय । साकत ठोर हि देऊं उठाय ॥ छ ॥ जे धरणीपर बैष्णवबास । नित्य ताहां रहे भक्तबिलास ॥ २ ॥ बैष्णवसंग भला पल येक । कोटि बरस साकतको लेख ॥ ३ ॥ नावे तोल करो हो बिच्यार । जों सोना तुलसी हरिभार ॥ ४ ॥ दिनकर बैष्णवजनको दास । पाया अबिगत बास उदास ॥ ५ ॥

राग कामोद [ ४३७

॥ धृ० ॥ निशिदिन रामभजनकी तार । लागी न ज्यानु और बिच्यार ॥ छ ॥ न देखूं मनमें रतिको रंग । रामसें रति गतिलागि अभंग ॥ १ ॥ यामें वामें तामें राम । सकळ जीवनमें पूरनकाम ॥ २ ॥ ज्यागतें सपनें सोवतें राम । दिनकर लेवे सुखबिश्राम ॥ ३ ॥

राग कामोद [ ४३८

बैष्णवघरको लांघन सार । साकतघर भोज्यन ज्यों मसार

॥ १ ॥ धृ० ॥ सुन बैरागी प्राणको प्यार । बैष्णवज्यनका धब्य बिच्यार ॥ छ ॥ बैष्णवसंगसें बैकुंठबास । साकत केलीयें नर्कबिलास ॥ २ ॥ कहे दिनकर परमार्थ बिच्यारी । तन मन धन संतन परिवारी ॥ ३ ॥

राग तुंडी [ ४३९

॥ धृ० ॥ साधो पदका मगज्य न पाया । तो प्रकट हि राम छपाया ॥ छ ॥ पदमें काया पदमें माया पदमें पिंड समाया । पिंड पदसें न्यारा रामजी न खोज्या तिन पाया ॥ १ ॥ पदमें ज्यनबन पदमें त्रिभुवन पदमें सुरीज्य चंदा । पदमें स्थावर पदमें ज्यंगम पदमें सच्चिदानंदा ॥ २ ॥ पढना गुणना क्या है पंडित ज्यब थें मर्म न ज्याना । खरपर चंदन जैसो भय्या वैसा शास्त्रपुराणा ॥ ३ ॥ वै पदकी जुगति हात न आवे तो सब हि कालको ख्याल । पाया दिनकर पद उन्मनी अबिगत करत कलोल ॥ ४ ॥

श्रीदिनकरकृत पदें समाप्त

---

## [ ५१ ]

॥ श्रीराम ॥

### श्रीदिनकरकृत श्लोक[१] ( पुरवणी )

जनासि जाणतो हरी । वसे नियंत अंतरीं ।
नभासि व्यापिलें असे । तयासि रूप कायसें ॥ १ ॥
नसा असा तसा हरी । विचारितां परोपरीं ।
तयासि वाच्य बोलतां । घडेल दोष तत्वतां ॥ २ ॥
सुजाण हें विचारणें । अखंड रूप शोधणें ।
वितंड तंड खंडणें । प्रचंड बंड वारणें ॥ ३ ॥

---

१ या मासिकाचें वर्ष १ लें अंक ३ रा यांत ५० श्लोक पूर्ण केल्यानंतर मागाहून आढळलेले श्रीदिनकरांचे श्लोक यापुढें दिले आहेत.

घटीं नभासि भासणें । तयासि अंश बोलणें ।
घटासि तें चि भाविता । चतुर मानिती वृथा ॥ ४ ॥
विवेक जाणती भले । सुखासनीं विराजले ।
विवेकहीन पामरें । विचारिलीं दिवाकरें ॥ ५ ॥

[ ५२ ]

॥ श्रीराम ॥

कुलाळ माथणी घडे । सुतार मंदिरीं जडे ।
सुन्या कटार घीसडे । प्रमाण काय हें पडे ॥ १ ॥
प्रपंच ब्रह्म येसणा । घडेल केवि सज्जना ।
प्रभेसि सूर्य बोलणें । विचक्षणीं विचारणें ॥ २ ॥
हरि प्रपंच निर्मिता । नव्हे प्रपंच तो स्वतां ।
गुरूप्रति विचारणें । स्वयंभ वस्तु पाहाणें ॥ ३ ॥
घटीं मठीं चिदांतरीं । नभासि राहाणें परी ।
नव्हे उपाधि ते स्वता । विचक्षणीं विचारितां ॥ ४ ॥
सतंत अंत त्या नसे । नियंत अंतरीं वसे ।
निरास अंतरा घडे । निजात्मरूप नीवडे ॥ ५ ॥
दिवाकरा प्रमाण ते । प्रचीति शास्त्रसंमतें ।
अयुक्त शब्द बोलतां । उगा चि सीण तत्वतां ॥ ६ ॥

[ ५३ ]

॥ श्रीराम ॥

ज्याकडे समर्थ राम । त्यासि काय धामधूम ।
मूढांसि हे परंपरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ १ ॥
सहाय राम तो कुळीं । करील काय रे हुळी ।
उगें चि कां भरीं भरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ २ ॥
रहित सर्व भूवनें । पदार्थ अर्थ भूषणें ।
पळोनि काय पामरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ३ ॥

करील राम तें खरें । अचूक तें विधीसि रे ।
उगा चि संशयो नरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ४ ॥
करू करील तें सुखें । हरू हरील तें निकें ।
भरोनि काय नीकरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ५ ॥
अनंत हेत चाळितो । तया पतीत वाळितो ।
सुलीन होत दुर्भरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ६ ॥
चळेल तें सुखें चळो । वळेल तें सुखें वळो ।
भरोनि काय नीकरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ७ ॥
उठेल तें सुखें उठो । लुटेल तें सुखें लुटो ।
न ये दुरोक्ति अंतरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ८ ॥
जळेल तें जळो सुखें । पळेल तें पळो सुखें ।
न जाववे दिगांतरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ ९ ॥
जनीं वनीं निरंजनीं । नियंत राम रक्षणीं ।
छळाल कां दिवाकरा । त्यजूनि निश्चयो खरा ॥ १० ॥

[ ५४ ]

॥ श्रीराम ॥

श्रीमारुतीचे पदीं लीन होतां । मग त्यासि कैंची भवभूतचिंता ।
दासांत हा श्रेष्ठ वरिष्ठ आहे । भावें भजे तो स्वतसिद्ध पाहें ॥१॥

[ ५५ ]

॥ श्रीराम ॥

रघुपती तुझें नाम चांगलें । हृदइं चिंतितां चित्त रंगलें ।
परम सूख तें नित्य संचलें । केवि वैखरीं जाय बोलिलें ॥ १ ॥
शंकरादिकां नित्य चिंतन । ध्यान लागलें परम पावन ।
संतसज्जना तें चि साधन । भवभयासि जें करित कंदन ॥२॥
गहन येव्हडें जें त्रिभूवनीं । प्राप्त तें मला केवि चिंतनीं ।
जरि दया घडे कृपावलोकनीं । दिनकरा गती पतितपावनीं ॥३॥

[ ५६ ]

**श्रीराम**

तपमय तरणीसा[1] वन्हि वैराग्य याचा ।
मुगुट मुनिजनाचा मेरु धैर्यागुणाचा ।
भजन जळद[2] साचा सिंधु शांतीरसाचा ।
वदत विकळ वाचा बंधु तो राघवाचा ॥ १ ॥

[५७]

**श्रीराम**

*दिवस नेमिले आजि संपले । नियत चूकला जो असे दिल्हा ।*
*जीवन जीविचें सौख्य इच्छिचें । कां नये पाहा विकळ प्राण हा ॥ १ ॥ध्रु॥*
राम कां न ये स्वामि कां न ये । सजन कां न ये नियत निश्चयें ॥ध्रु॥
कंप सूटला कंठ दाटला । नयन ते कसे सजळ जळदसे ।
पळ युगासमें विण रघोत्तमें । जातसे मला योग खंडला ॥ २ ॥
पतित मी असे काय जीतसे । धन्य ते हरी जे बराबरी ।
नयनिं पाहती वदनिं बोलती । श्रवणिं ऐकती शब्दजुत्पती ॥ ३ ॥
पूजिती करीं वंदिती शिरीं । चरणिं धांवती कार्य साधिती ।
धन्य ते जनीं धन्य ते वनीं । सर्व सोडिती राम सेविती ॥ ४ ॥
बंधु मी परी ते न ये सरी । विमुख जाहलों सुखासि वंचलों ।
धन्य ते हरी धन्य ते हरी । धन्य ते हरी भजति श्रीहरी ॥ ५ ॥
मुनिवराश्रमीं सौख्यसंभ्रमीं । स्वामि गुंतला तयासि लुब्धला ।
कीं सती सिता चरणिं चालतां । श्रमलि त्या गुणें वसविली वनें ॥ ६ ॥
कीं सखा हरी विंधिला शरीं । धरणिं पाडिला दास पीडिला ।
कोप तो मनीं धरुनियां वनीं । नाथ राहिला पण विभांडिलों ॥ ७ ॥
कीं नरोत्तमें परम विक्रमें । कार्य साधिलें चरित्र संपलें ।
म्हुण निजाश्रमा त्यजुनि हे सिमा । गमन योजिले सह कपीकुळें ॥८॥
देह सोडणें परि न राहाणें । वदत संभ्रमें भरत निंभ्रमें ।

---

१ सूर्याप्रमाणें तेजस्वी. २ मेघ. ३ निश्चय. ४ जिंकिला. ५ निश्चित होऊन.

अग्नि चेतवा पतित सोडवा । ह्मणत जों असें वर्त्तलें कसें ॥ ९ ॥
तवं पुढें हरी जोडलां करीं । चरणिं लोळतो वचन बोलतो ।
दिनकरप्रभू येतसे विभूं । शोक सोडणें विमान लक्षणें ॥ १० ॥

[ ५८ ]

**श्रीराम**

झडकरि कपिकंठीं घातली प्रेममीठी ।
हृदय चिरुनि यातें साठऊं काय पोटीं ।
जिवलग अति माझा राम घेऊनि आला ।
परम विकळ जीवा आजि आनंदु जाला ॥ १ ॥

[ ५९ ]

॥ **श्रीराम** ॥

गणपति रुप तूझें आठवीतां स्वभावें ।
पळति सकळ विघ्नें देहभावा मुरावें ।
विमळमतिप्रकाशें वैखरी शब्द बोले ।
दिनकर वर लाभे जन्मसाफल्य जालें ॥ १ ॥

[ ६० ]

॥ **सवाई** ॥

विघ्नविनायक वंदुनि राम मनीं धरणें करणें हित जें तें ।
जाइल जन्म नरा नुसता मग होसिल मीन जसा गाळिं गुंते ।
सोडुनि वैभव लोकिक गौरव तत्पर सज्जन रंजति जेथें ।
सादर होउनि दीन दिनेश ह्मणे तरि सत्वर रंग तुं तेथें ॥ १ ॥

[ ६१ ]

॥ **श्रीराम** ॥

भेदुनि भेद अभेद भजें भजतां तरसी निजनिश्चळतेसीं ।
सार विच्यारुनि चा[1]र विदारुनि पाहें विचार बरा वि[2]त्ररेसीं ।
अद्भुत हा भव दारुण मारुन सारुन संशय नश्चयकोशीं ।
निर्भयता गुरुराजकृपा जरि दीनकरा + + प्राप्ति ते ऐसी ॥ १ ॥

---

१ महान्. २ वेड्यावेड्याकृति.

[ ६२ ]

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ राघवा विधिगोळ हा प्रभुवीण वोस मला सदा ।
माधवा विनती तुह्माप्रति पावणें मज येकदां ॥ धृ ॥
सूर्यवंशविभूषणा हरतोषणा अघशोषणा । पावना विनती० ॥ १ ॥
कारणा भवहारणा जनतारणा रिपुमारणा । जीवना विनती० ॥२॥
मायका सुखदायका श्रुतिसायका रघुनायका । आयका विनती० ॥३॥
चंचळा चपळात्मका जडचाळका विधिपाळका । तारका विनती० ॥४॥
दिनकरा करुणाकरा शिरिं ठेविजे अभयंकरा । श्रीकरा विनती० ॥५॥

[ ६३ ]

॥ अनुष्टुप्छंद ॥

॥ श्रीराम ॥

श्रवणीं कीर्ति ऐकावी । नयनीं मूर्ति लक्षिजे ।
वदनीं वर्णिजे गूणा । घ्राणें निर्माल्य जिघ्रिजे ॥ १ ॥
पदीं देवाळया जाणें । करें श्रीराम पूजणें ।
प्रदक्षणानमस्कारें । मस्तकें वंदिजे पदा ॥ २ ॥
अखंड हृदईं ध्यान । काया वाचा मनोदयें ।
निराभिमान साष्टांगें । वंदिजे राम सर्वदा ॥ ३ ॥
सर्वांगें रंगतां रामीं । कोण बाधा घडे जना ।
सद्भावें वर्म हें घेतां । धन्य धन्य जगत्रईं ॥ ४ ॥
आत्मनिवेदनीं भक्ती । राघवीं नित्य ज्यां घडे ।
दिनकरा काय ते बाधा । बापुडी केवि त्यांकडे ॥ ५ ॥

[ ६४ ]

॥ श्रीराम ॥

घटा भंग जाला मठा भंग जाला । परी भंग न्हे चि जैसा नभाला ।
तदंन्याय आत्मा असे सर्वभूतीं । भुतें नाशतां नाश न्हे सतंतीं ॥ १ ॥

[ ६५ ]

॥ श्रीराम ॥

दुर्जनीं बहु गांजिलें हरी । बोलतां नभ समावें मोहरीं ।
जाणतो [1]रविकुळार्क अंतरीं । साक्ष यासि त्रिजटा असे तरी ॥ १ ॥
त्रिजटा बहु प्रकार संचिते । दुःखसागर बळें [2]विसंचिते ।
धैर्यदायक भयासि भंजिते । हे मना बहुतसाल रंजिते ॥ २ ॥
हे सखी विगतराग सायका । भ्रांतिमोचक सुखावहायका ।
चित्तरंजक कसी रघुत्तमें । निर्मिली परजनीं विरोत्तमें ॥ ३ ॥
नव्हे इचें अंतर राक्षसाचें । सावेव हें रामगवाक्ष साचें ।
इच्या निमित्यें मजला अशोखीं । तो रंजवी कीं सहसा अशोखीं ॥ ४॥
आतां असो हें वद राघवाची । वार्ता कशी ते तरि लाघवाची ।
दशग्रिवें आणिलियांवरी रे । वियोग कोणेपरि सावरी रे ॥ ५ ॥

[ ६६ ]

॥ भुजंगप्रयात छंद ॥

॥ श्रीराम ॥

प्रभूघाटउंची मनें कल्पवेना । महाखष्ट तो मार्ग ही लक्षवेना ।
पुढें फांकले पंथ नाना प्रदेशीं । त्वरें पाव रे राघवा ये प्रवासीं ॥ १ ॥
तृणें दाटल्या वृक्षलता अनेका । रिसें वानरें शूकरें व्याघ्र देखा ।
गिरीकंदरीं बाहती कर्कशेंसीं । त्वरें पाव रे० ॥ २ ॥
अपर्णी तरू सर्व छायेविना ते । फळेंवीण ते दाटले घोरपंथें ।
न ये येक तो पक्षि ही या वनासी । त्वरें पाव रे० ॥ ३ ॥
प्रमाणुप्रमाणें न भारी न वाजे । देहे थोर [3]जाजावलें काय कीजे ।
श्रवे स्वेद आंगीं निसर्वा दशेसीं । त्वरें पाव रे० ॥ ४ ॥
तपे तीव्र आदित्य माध्यान्हकाळें । तनु श्रांतली वोष्ठ हे शुष्क जाले ।
भ्रमे सर्व काया न थारे भुमीसी । त्वरें पाव रे० ॥ ५ ॥
कसा श्वास उश्वास हा टाकवेना । दमा दाटला धाप ते सावरेना ।

---

१ श्रीरामास. २ नाश करते. ३ त्रासलें.

गडाडी कर्फे कंठ कैवल्यराशी । त्वरें पाव रे० ॥ ६ ॥
तृषेनें प्रभु प्राण हा शोषला रे । करीं जीवना भेटि तोषीं जिवा रे ।
पुढें बोलवेना दशा प्राप्त ऐसी । त्वरें पाव रे० ॥ ७ ॥
कृपासागरें ऐकतां शब्द ऐसे । उडी घातली बाळकालागि सोसें ।
बहू तोषवीलें सुखानंदतेसीं । प्रभू पावला वारिलें संकटासी ॥ ८ ॥
दिनानाथ हा पावला पावला रे । सुधासिंधु हा बाळका तोषला रे ।
सवासीं प्रवासीं सितेचा निवासी । प्रभू पावला० ॥ ९ ॥
दिनेशा कृपा पूर्ण पैं राघवाची । तेथें कोण चिंता जिवांच्या रिपूंची ।
दिनानाथ हा सेवकांचा विलासी । प्रभू पावला० ॥ १० ॥

*[ ६७ ]

॥ भुजंगप्रयात छंद ॥

॥ श्रीराम ॥

करी आटरंगासि जो यंत्र रेखी । घवावीत पूजा महाडंब लोकीं ।
अशी लापणीका करी शिष्य नाना । नव्हे सद्गुरु तो जनीं घातघेणा ॥ १ ॥
वदे शब्द वाचाळ ज्ञानें उदंडें । महा गद्यपद्यादिकांचीं प्रचंडें ।
परी अंतरीं शुद्ध साक्षित्व येना । नव्हे सद्गुरु० ॥ २ ॥
मुखें कान फुंकी शिरीं हात ठेवी । वसेना परी अंतरीं ते टवावी ।
गुरुत्वें चि घूमें न जाणे निदाना । नव्हे सद्गुरु० ॥ ३ ॥
स्वसंवेद्यता शुद्ध आत्मत्व जाणे । परी शिष्यबोधार्थ तात्पर्य नेणे ।
प्रबोधी पदार्थादि ज्ञानासि नाना । नव्हे सद्गुरु० ॥ ४ ॥
बहू शोधनें मंत्रयंत्रादिकांचीं । महा कीळणोत्कीळणें साधनांचीं ।
सदा सांगणें लक्षध्यानाभिधाना । नव्हे सद्गुरु० ॥ ५ ॥
बरीं आसनें लक्षमुद्रालयाचीं । बहू शोधनें देहशुद्धी शमाची ।
प्रबोधी तदर्था स्वरूपार्थवीना । नव्हे सद्गुरु० ॥ ६ ॥

---

* ६७ व ६८ या श्लोकांत भोंदू गुरूचीं लक्षणें दिलीं आहेत. १ अट्ट=अतिशय, रंग=विलास. २ शब्दपांडित्य. ३ घातकी. ४ कार्यकारण.

मदोन्मत्तता प्राप्त होते जयानें । सदा भ्रष्ट तो भ्रष्टवी भ्रष्टतेनें ।
करी साधकां बोध तो ज्ञानवीना । नव्हे सद्गुरु० ॥ ७ ॥
घणाणीत घंटा महानाद कानीं । बरा फुंकिती मंत्र बीजाक्षरानीं ।
कचाटें बहू शब्दगाथे चि नाना । नव्हे सद्गुरु० ॥ ८ ॥
किती पद्धति बोधनें न्यासमात्रा । किती मंत्र मंत्रावळी त्या विचित्रा ।
करी बोध चांडाळ कांटाळवाणा । नव्हे सद्गुरु० ॥ ९ ॥
असो वाम दक्षेण हे मार्ग सैरा । प्रबोधीत जे भ्रष्ट शिष्यां विचारा ।
ह्मणे दीन दीनेश तो नष्ट जाणा । नव्हे सद्गुरु० ॥ १० ॥

[ ६८ ]

॥ श्रीराम ॥

तोंडावरी थुंकुनि कान फुंकी । भोंदूनिया लोक जनीं विवेकी ।
न ऊठिती अंकुर फुंकिल्याचे । पळोनि जाती मग बोडकीचे ॥ १ ॥
पूजार्चनें तोषवी जीव सैरा । स्वइच्छतें भोजन द्रव्य दारा ।
सारूनियां अर्थ समस्त त्यांचे । पळोनि जाती० ॥ २ ॥
करूं नये ते चि करूनि कर्मे । अधर्म तो स्थापिति सर्वब्रह्में ।
उपंढ्रे होतां मग तें न रूचे । पळोनि जाती० ॥ ३ ॥
सच्छांस्त्रकर्मीं करणें दिसेना । सद्वासना अंतरीं ते वसेना ।
लाऊनियां पंथ अनर्गळांचे । पळोनि जाती० ॥ ४ ॥
अनेक पंथार्थ अनेक भेदीं । अनेक लीळा जठरार्थ शुद्धि ।
करूनियां छंद अनेकतेचे । पळोनि जाती० ॥ ५ ॥
पदोपदीं मार्ग अनंत नाना । स्थापूनियां भोगिती प्रौढि नाना ।
विचारितां शास्त्रप्रचीत वाचे । पळोनि जाती० ॥ ६ ॥
उपाधि लाऊनि समस्त शिष्यां । नानाप्रकारें कथिती भविष्या ।
प्रकार होतां अनु हीनें त्याचे । पळोनि जाती० ॥ ७ ॥
कित्तेक शाक्तार्थ प्रबोधकारी । कित्तेक ते शांभव वेषधारी ।
निर्धार ते स्थापुनि हीनतेचे । पळोनि जाती ०॥ ८ ॥

१ कुटिल, योग्य. २ ढोंगउघडकी. ३ मनस्वी लोकांचे. ४ न्यून, उणें.

अनेक वैनायक[1] मार्गमार्गी । अनेक ते सौर हि वैष्णवांगी ।
उच्चारितां आत्मप्रचीत वाचे । पळोनि जाती ० ॥ ९ ॥
असोत हे नष्ट पतीत पापी । दुर्वृत्त चांडाळ अघोररूपी ।
सन्मार्ग देखोनि दिवाकराचे । पळोनि जाती ० ॥ १० ॥

[ ६९ ]

॥ शार्दूलविक्रीडित छंद ॥

॥ श्रीराम ॥

हा संसार पुढें पुन्हां तुजकडे येईल हें कैं घडे ।
ऐसें जाणोनि रोकडें हरिकुडें चौऱ्यासिचें सांकडें ॥
रामीं चित्त बुडे विवेक उघडे अज्ञान तें वीघडे ।
ऐसें जेथ घडे दिवाकर ह्मणे लागा त्वरें त्याकडे ॥१॥

[ ७० ]

॥ मालिनीवृत्त छंद ॥

॥ श्रीराम ॥

स्वहित जिविं धरावें साधकें सिद्ध व्हावें ।
अविहित समजावें तें चि सोडूनि द्यावें ।
पळ हि स्थिर न व्हावें सार शोधीत जावें ।
विहित भजनभावें ब्रह्मबोधीं भरावें ॥ १ ॥
भवभय निरसावें साधनीं दृढ व्हावें ।
निजहित विवरावें सत्क्रियेतें धरावें ।
दिननिशि समजावें स्वाश्रमीं धर्म जीवें ।
करुनि हि करवावें स्वाधिकारें स्वभावें ॥ २ ॥
अवचिति मरणाची धाडि घालील घाला ।
तरि मग हित कोठें सांपडे आपणाला ।
ह्मणउनि भजनाची सत्क्रिया ते धरावी ।
सुगम विहितपंथें सद्गती ते वरावी ॥ ३ ॥

---

१ गाणपत्य.

असुर अशुभपंथें आगमी[1] साधकानें ।
स्वपनिं हि न भरावें दुर्गती प्राप्त तेणें ।
परम पतित जे ते साधकां भ्रष्टवीती ।
प्रकृति विधिविधानें सांगती मंत्र देती ॥ ४ ॥
नरवपु बरवी हे जों जिवा लाधलीसे ।
रघुविरभजनें तों तोडि निर्वाणफांसे ।
पळभरि परि नाहीं देह हा शाश्वताचा ।
बहुत कठिण आहे सूत तो भास्वताचा[2] ॥ ५ ॥
बहुत सुकृत जेंव्हां पुण्य जन्मांतरींचें ।
तरि च द्विजवराचें देह लाधेल साचें ।
त्यजुनि अकृत कर्में शुद्ध सन्मार्ग चाले ।
रघुविरसुदयेची कीर्ति त्यालागि बोळे ॥ ६ ॥
रघुविरभजनानें सृष्टि हे माजवावी ।
रघुविरगुणकीर्ती कीर्तनें गाजवावी ।
रघुविरवरदाची योग्यता ते वदावी ।
रघुविरकरुणेची प्राप्ति ते आठवावी ॥ ७ ॥
सजनभजनभावें ज्ञानवैराग्यपंथें ।
स्वसुख अनुभवावें मोक्षसाम्राज्य तेथें ।
दिनकर ह्मणे ऐसें ज्यां जिवां प्राप्त जालें ।
त्रिभुवनि सुख त्यांचें कोण बोलेल बोलें ॥ ८ ॥

[ ७१ ]

॥ मालिनीवृत्त छंद ॥

॥ श्रीराम ॥

प्रकट स्वरुपसिद्धी सज्जनाच्या प्रसंगें ।
अगणित सुख लाभे ज्ञानविज्ञानयोगें ।
विषयविकृति[3] येतां शुद्ध वैराग्य बाणे ।
अनुभव स्वरुपाचा जो करी तो चि जाणे ॥ १ ॥

---

१ भावी. २ सूर्याचा. ३ विकृति=रूपांतर, क्षोभ.

अकृत विकृत कर्मे आसुरी संपदेचीं ।
स्वपनिं हि परि कैसी नातळे वृत्ति ज्याची ।
निगमविधिप्रमाणें वर्त्तणें प्रत्ययाचें ।
सुकृत चि विचरे तो नित्यनैमित्यकाचें ॥ २ ॥
अणुहिपरि निषिद्धा नातळे काम्यकर्मा ।
प्रतिदिनिं परमार्थें आचरे नीजधर्मा ।
स्वसुख अमुप भाग्यें थोर शांतिक्षमेचा ।
उपरम[2] गुरुवाक्यें ठाव घे ऊगमाचा ॥ ३ ॥
परम सुकृप जैसा चातकां मेघ बोळे ।
सुरस भजनें तैसा वर्त्तवी लोक भोळे ।
भवभयघन वारा होउनी जो निवारी ।
करवि सुकृत कर्में धर्म नाना प्रकारीं ॥ ४ ॥
दिनकर ह्मणे ऐसे धन्य साधू कृपेचे ।
विहित सुगमपंथें तारिते भाविकांचे ।
निरसुनि देहबुद्धि ऐक्य जीवेश्वरेंसीं ।
करुनि पदनिवासी देति सायुज्यतेसी ॥ ५ ॥

[ ७२ ]

॥ श्रीराम ॥

रघुविरभजनाची अंतरीं वृत्ति लागो ।
रघुविरस्मरणाची मानसीं स्फूर्ति जागो ।
रघुविरकरुणेचा वासनावास मागो ।
रघुविरगुण आतां वाणि हे नित्य सांगो ॥ १ ॥
चतुरपण जनीं हें पाहतां आडळेना ।
निकट रघुविराचें रूप कैसें कळेना ।
चपळपण वळेना गर्वताठा गळेना ।
तुजविण जगदीशा कर्म खोटें टळेना ॥ २ ॥

---

१ राक्षसी, मायावी. २ शांति.

तरुणपण देहाचें लोपतां वेळु नाहीं ।
तनु मन धन अंतीं वोसरे सर्व कांहीं ।
सकळ जन बुडाले व्यर्थ मायाप्रवाहीं ।
झडकरि सजना रे हीत शोधूनि पाहीं ॥ ३ ॥
पळपळ चळताहे बाळतारुण्य देहीं ।
तळमळ विषयांची नाठवे हीत कांहीं ।
ळळळळ गरळा तो काळ गाळीत आहे ।
जळजळ शितळा हे भक्ति सेऊनि राहें ॥ ४ ॥
दिनकरकुळवल्ली लोटली अंगभारें ।
रघुविरअवतारें दाटलीं थोरथोरें ।
सुखरुप सुखवासीं राहिले योगराशीं ।
सफळ शितळ छाया फावली रामदासीं ॥ ५ ॥

[ ७३ ]

॥ भुजंगप्रयात छंद ॥

॥ श्रीराम ॥

जडेना झडेना बुडेना उडेना । ढळेना पडेना घडेना दडेना ।
तुटेना फुटेना घटेना विटेना । अखंडैक तें मीपणें आकळेना ॥ १ ॥
निराकार आकार सत्ता जयाची । निराधार आधार हे स्थीत ज्याची ।
तयाची लिळा पाहातां तों दिसेना । तयावीण वास्तव्य कोठें घडेना ॥२
नभें व्यापिलें सर्व त्रैलोक्य जैसें । स्वसंवेद्य शून्यासी व्यापूनि तैसें ।
प्रमाणांतरीं वर्ततें साक्षिरूपें । अखंडीत देशीं विदेशीं स्वरूपें ॥ ३ ॥
चळे सर्व सत्ता जयाचे लिळेनें । तयावीण कर्त्ता असे कोण जाणे ।
अविचार सोडूनि कर्ता विचारीं । विचारें तरी तूं स्वयें निर्विकारी ॥४॥
असे अंतरीं देव तो कां कळेना । किती पूजिसी वृक्ष पाषाण प्राण्या ।
असे काय त्या सेंदुरामाजि बापा । करीं सद्गुरु देव जोडेल सोपा ॥५॥
अणूमाजिं ही राम आहे सुजाणा । किती ब्रह्मगोळे तयामाजि जाणा ।
तयाची लिळा तूळितां तूळवेना । बरें पाहतां त्याविना राहवेना ॥ ६ ॥

प्रतीता जिवा देव कोठें चि नाहीं । अहंतागुणें वारले मूढ पाहीं ।
अभावीक तो वासनापूर लोटे । पडे गर्वधारे तया ठाव कोठें ॥ ७ ॥
सुखाचा सुखें सद्गुरु तो करावा । तया सत्य तो देव आधीं पुसावा ।
तयावीण तों सर्व हि व्यर्थ आहे । ह्मणे दीन दीनेश सत्शास्त्र पाहें ॥८॥

[ ७४ ]

॥ श्रीराम ॥

सदाशीवध्यानें सदाशीव होणें । असें बोलती वेदशास्त्रें पुराणें ।
प्रचीतीसि ही येतसे अन्वयानें । जया ध्यान जें तें चि त्यालागि होणें ॥१॥
अळी होतसे कीटकाकार पाहें । जळीं सैंधवा ऊरि कोठूनि राहे ।
तदन्याय ध्यावा महादेव देहीं । स्वयंमेव व्हावें महादेव पाहीं ॥ २ ॥
नृदेहासि यावें वृथा कां सिणावें । सदा देवदेव्यांसि कीती पुजावें ।
नसे येकि निष्ठा मनीं शुद्धभावें । तया तारिता कोण आहे निभावें ॥३॥
नसे नाथ तो येक पण्यांगनेसी । बहू अर्थ देखे वरी शीघ्र त्यासी ।
देहांतीं तिला कोण येईल कामा । नसे येकि निष्ठा तया हे चि सीमा ॥४॥
निमिष्यें पळें सर्व आयुष्य गेलें । पुढें तें न ये पाहातां काय केलें ।
त्वरेनें पाहा रे जगन्नाथ कैसा । नका स्थीर राहों भजा पार्वतीशा ॥५॥
न ये धाम कामा न ये काम कामा । न ये कामिनी पुत्र जामात कामा ।
न ये सर्व कामा असें जाणतोहे । परी वासनेनें उगंडो न ल्हाये ॥ ६ ॥
तडीतापँडी ये घरा अन्न मागे । तयासीं बरी गोष्टि ते ही न सांगे ।
गचाळूनि भुंके महाश्वान जैसा । पुढें जातसे तो स्मशानासि कैसा ॥ ७ ॥
असे भूलले जीव देवासि कैसे । स्वहीतासि सोडूनि होताति पीसे ।
मि माझें तुझें जल्पती वोसणातीं । अंतीं शोभनी का मुखीं राख माती ॥८॥
सदाशीव जीवासि हा चोजवेना । कदां सद्गुरूवीण ठाईं पडेना ।
नसे राउळीं देउळीं कीं स्मशानीं । महादेव तो अंतरीं मोक्षदानी ॥९॥

---

१ माजले. २ व्यासीनें, संदर्पानें. ३ निभावानें ह्म० शेवटपर्यंत सुखरूपतेनें ( नेणारा ). ४ वेश्येला. ५ उद्धार. ६ लाहे, प्राप्त होत नाहीं. ७ खांद्यावर कावड घेऊन तीर्थयात्रा करणारे. ८ उगीच आरडून. ९ बरळतात.

स्वयें शीव होऊनि शीवा भजावें । तया भक्त अनन्य ऐसें ह्मणावें ।
न होतां असें व्यर्थ तें सर्वकांहीं । ह्मणे दीन दीनेश हे साक्ष पाहीं ॥ १० ॥

[ ७५ ]

॥ अनुष्टुप् छंद ॥

॥ श्रीराम ॥

महेशा गिरिजानाथा । शरणागतवच्छळा ।
शंकरा दास रामाचे । आह्मी तुह्मी यथार्थ कीं ॥ १ ॥
मारकांपासुनी रामें । वृद्धेशा तुज रक्षिलें ।
वडली साक्ष ते तूला । ह्मणौनी छंद तो तुतें ॥ २ ॥
तैसें चि मज ही पाहें । विषयांतूनि काढिलें ।
तुह्मी आह्मी श्रिरामाचे । सदाशीव ह्मणे खरें ॥ ३ ॥
मृडानीशा तुझी लीळा । ब्रह्मादिक न जाणती ।
किंमात्र मानवी मी रे । उभयां केवि साम्यता ॥ ४ ॥
रथ्योदक हेमभद्र । जळधीस दुजें कधीं ।
स्वस्वरूपीं दिनेशा रे । तैसे आह्मी तुह्मी सदा ॥ ५ ॥
विषाची नीळिमा कंठीं । नीळकंठ ह्मणोनियां ।
परंतु दाह तो नाहीं । नीळिमाभास राहिला ॥ ६ ॥
नाम रूप क्रिया देहीं । ह्मणौनि विषईं जिऊ ।
आत्मत्वीं मिळतां वृत्ती । राहिला भास व्यर्थ तो ॥ ७ ॥
दिनेश शिव श्रीरामीं । ऐक्यभावें निरंतरीं ।
अद्वैत द्वैत असतां हि । दिनेशशिवसंगमु ॥ ८ ॥

[ ७६ ]

॥ प्रमाणिका छंद ॥

॥ श्रीराम ॥

गिरी प्रशस्त साजिरे । जसें अढंचें पांजिरे ।
दरेकुव्या विशाळल्या । बऱ्या मनासि वाटल्या ॥ १ ॥

---

१ सर्व जगाला जाळणाऱ्या हलाहलविषाच्या त्रासापासून. २ स्वानुभव-दिनकर ग्रंथांत या वृद्धेश्वर देवालयाचें चित्र दिलें आहे. या ठिकाणीं राहून श्रीदिनकरांनीं तपश्चर्या केली. ३ यःकश्चित्. ४ मोठमोठे. ५ पिंजरे.

संग्रहा २०९

तरु प्रचंड दंडसे । उदंड जाड वाडसे ।
फुलीं फळीं विराजती । सुगंध गंध माजती ॥ २ ॥
बहू विहंग गर्ज्जती । मयूर फार गाजती ।
झडाड वायु झाडितो । बळें तरु कडाडितो ॥ ३ ॥
अशी वनांतरा बरीं । हरित रंग साजिरी ।
प्रशस्त वाटली मना । तुरे चि कामकामना ॥ ४ ॥
बहुत सौख्य लाधलें । तनूमनासि साधलें ।
दिवाकरा हळूहळू । सुखावला पळेंपळु ॥ ५ ॥

[ ७७ ]

॥ श्रीराम ॥

दयाळ सद्गुरू कसा । पयोद[१] चातकां जसा ।
तसा पतीतपावनु । कळीकृतांतसूदनु[२] ॥ १ ॥
जिवेजिवांसि जीववी । परंतु भाव नूरवी ।
सुवर्च हा पुरातनु । कळीकृतांत ० ॥ २ ॥
कृपाकटाक्ष यक्षणें[३] । मुढें चि तें सुलक्षणें ।
अलक्ष लक्षवी मनु । कळी ० ॥ ३ ॥
समस्त व्यस्त[४] अस्तवी[५] । प्रशस्त[६] वस्तु शस्तवी[७] ।
निबीड नित्य नूतनु । कळी ० ॥ ४ ॥
निरोपमासि ऊपमा । जसी नभासि नीळिमा ।
प्रतक्ष जो निरंजनु । कळी० ॥ ५ ॥
नसोनि जो बहू असे । असे नसे असा असे ।
नियंत[८] अक्षई तनु । कळी० ॥ ६ ॥
दयाळ धीरधारकु । समस्त हेतचाळकु ।
असंग जो सनातनु । कळी० ॥ ७ ॥

---

१ मेघ. २ नाश करणारा. ३ ईक्षणें. ४ विपरीत गोष्टी. ५ नाहींसा करतो. ६ शुभ, श्रेष्ठ. ७ कल्याणप्रद करतो. ८ नियत=जितेंद्रिय, स्थिर.

जनीं निरंजनीं प्रभु । स्वयंभ नित्य सप्रभु[1] ।
असंख्य भेदभेदनु । कळी० ॥ ८ ॥
नमो प्रभू दयानिधी । असे वदों कसे विधी ।
विरोध रोधवेदनु । कळी० ॥ ९ ॥
परात्परु पुरोगमु । निःशब्द जेथ नीगमु ।
दिनेश आर्तमोदनु । कळी० ॥ १० ॥

[ ७८ ]

॥ श्रीराम ॥

गजासि धूतलें जळें । सवें चि तो मळे मळें ।
तसा मदांध बोधिला । परंतु तो भवांधिला[2] ॥ १ ॥
दुधांत कृष्णकोळसा । न्हे चि शुद्ध टाळसा[3] ।
तसा मदांध बोधिला । परंतु० ॥ २ ॥
सुगंध चर्चिलें खरा । न संडि जेवि आखरा[4] ।
तसा मदांध बोधिला । परंतु ० ॥ ३ ॥
जऱ्ही सुखासनीं सुणें । तऱ्ही न संडि भुंकणें ।
तसा मदांध बोधिला । परंतु० ॥ ४ ॥
दिवाकरा जळीं खडा । जसा असोनि कोरडा ।
तसा मदांध बोधिला । परंतु० ॥ ५ ॥

[ ७९ ]

॥ इंद्रवज्रा छंद ॥

॥ श्रीराम ॥

जाईजणें वैभव सर्व आहे । जाईल तेंव्हां सहसा न राहे ।
हें जाणतां तल्लिन त्यासि होसी । मूर्खा कसा व्यर्थ चि नाडतोसी[5] ॥ १ ॥
पतंग जैसा झकटी दिपातें । तों तो करी दग्ध सुबद्ध त्यातें ।
तैसें चि तूळा विषयाभिलाशीं । मूर्खा० ॥ २ ॥

---

१ सप्रभ=सदृश. २ पुन्हा संसाराच्या आधीन झाला. ३ टाळ ह्म० एक प्रकारचा मोती. ४ गांवाबाहेरील उकिरडा. ५ अडकतोस, प्रतिबंधांत पडतोस.

जाईल दारा धन पुत्र पाहें । कोण्हीं तुला सोडविसें न राहे ।
अंतीं दया तों न घडे यमासी । मूर्खा० ॥ ३ ॥
जामात कन्या ममतापरें रे । अंतीं न येती रडती घरीं रे ।
भोंदूनियां राहति सर्व शेषीं । मूर्खा० ॥ ४ ॥
दयाळ जो राघव तो स्मरें रे । तेणें सुखी होसिल सज्जना रे ।
सोडूनियां दीनकरप्रभूसी । मूर्खा० ॥ ५ ॥

[८०]

॥ मालिनीवृत्त छंद ॥

॥ श्रीराम ॥

रघुविरगुण गावे लोकिकीं माजवावे ।
बहुत हि विवरावे कीर्तनें गाजवावे ।
शरिर विषमकाळें व्यर्थ जाईल पाहें ।
पळभरि परि तें ही स्थीर कोठें न राहे ॥ १ ॥
रघुपति मति देतो प्रेमळां रंजवीतो ।
निजपदसुख भक्तां देउनी गाजवीतो ।
तरि मग मतिहीना पाहिजे काय आतां ।
अगणित सुख रामीं आदरें गूण गातां ॥ २ ॥
विकळ सकळ काळें राघवेंवीण जीणें ।
मळमळ विषयांची ते चि ते काय घेणें ।
पळपळ मतिमंदा जाय आरण्यपंथें ।
न करि आळस धांवें राम भेटेल तेथें ।
वटवट किती आतां कोणती उरि आहे ।
श्रवणिं नयनिं दातीं टाकिला पंथ पाहें ।
फटफट हतभाग्या वेश्रमोंई सुटेना ।
रघुपतिगुण गातां चित्त कैसें रिझेना ॥ ४ ॥

---

१ आपापलें कर्म. २ अति श्रम करण्याची हांव.

दिनकरकुळदीपा वर्णितां काय वेंचे ।
सुहृदजनगुणांला वर्णितां काय सांचे ।
त्वरित सुरस पाहें तें चि सेऊनि राहें ।
निरस जरि सुटेना तैं पुढें येम आहे ॥ ५ ॥

[ ८१ ]

**श्रीराम**

झडकरि झडकावें स्थीर कोठें न व्हावें ।
न पुसत सकळांला गुप्त होऊनि जावें ।
स्थळगति न वदावी जावया यावयाची ।
प्रकटित न करावी मात जे अंतरीची ॥ १ ॥
प्रचलित हि न व्हावें झाडखंडीं भरावें ।
स्थळ सुचिर पाहावें साधतां स्थीर व्हावें ।
बहुविध न फिरावें रान तें वाउगें चि ।
सुगम जरि मिळाली वस्ति ते साधकांची ॥ २ ॥
गिरि खळि दरकूठ्या कूहरें शीखरें हीं ।
गवि गडिदरि गूहा गव्हरें भूयरें हीं ।
जळमळित तडागें साजिरें कूप बावी ।
सरोवर विहिरे ही रम्य टांकीं असावीं ॥ ३ ॥
अमळ जळ तुटेना खंडवोघीं पडेना ।
परम सुरस ऐसें स्थान कोठें दिसेना ।
खळखळ जळ वाहे दाटले वृक्ष जेथें ।
जनपद हि न पावे राहावें स्वस्थ तेथें ॥ ४ ॥
क्रिडति मयुर भारी फोडिती शब्दटाहो ।
पसरुनि बरिं पिच्छें नाचती ते पाहा हो ।
बहुविध खग येती बोलती रम्य वाणी ।
तनु मन जिव नीवे ऐकतां शब्द कानीं ॥ ५ ॥

सुचिर सितळ छाया डोलती वृक्ष वातें ।
मघमघ कुसुमांचा गंध रंजी मनातें ।
सफाळित तरु सैरा उंच आकाशमार्गें ।
सुरस महि सुजाणा भाग्यवंतांसि भोगे ॥ ६ ॥
जरि घडे मठ तेथें मांडणी मंडपाची ।
तरि मग मन आस्था[1] काय वाहेल कैंची ।
नुतन हरिहरांचीं देउळें मारुतीचीं ।
रघुविरवरदाची प्राप्ति तैं जाण तें चि ॥ ७ ॥
रघुपति मग तेथें आठवे नाठवीतां ।
रघुपतिं मग तेथें धांवतो दूरि जातां ।
रघुपति मग तेथें सोडितां ही न सोडी ।
दिनकरवरदें हे लाविली नित्य गोडी ॥ ८ ॥

[ ८२ ]

॥ श्रीराम ॥

निरुपण हि करावें सार तें वीवरावें ।
अघटित विघडावें सत्य शोधीत जावें ।
मुढजन उगवावे राघवीं रंजवावे ।
अविहित न वदावें शास्त्र साक्षीस द्यावें ॥ १ ॥
रघुपतिभजनाची भावना माजवावी ।
रघुविरवरदाची प्राप्ति ते गाजवावी ।
रघुविरचरणाची ख्याति जे ते वदावी ।
रघुविरकरुणेची स्थीत रक्षीत जावी ॥ २ ॥
सफळ सकळ तेव्हां भाग्य जाणोनि घ्यावें ।
रघुपति मनिं जेव्हां आठवे रे स्वभावें ।

---

१ आवड.

तरि मग उरि कोठें जन्ममृत्यासि आहे ।
बहुत सुकृत गाठीं तैं चि हे प्राप्ति लाहे ॥ ३ ॥
पशुपति विधि वेदें स्फुरंती रामछंदें ।
मुनिजन गुण गद्यें वर्णिती साधुवृंदें ।
त्रिभुवनजन ज्याची कास वेष्टूनि चाले ।
रघुविर तुज तो रे नाठवे काय जालें ॥ ४ ॥
भवभरिं न भरावें द्वंद्व सोडूनि द्यावें ।
मनकृत न करावें संतसंगीं वसावें ।
स्वसुख जिविं धरावें सर्व तल्लीन व्हावें ।
दिनकर निजभावें सांगतो हीत घ्यावें ॥ ५ ॥

[ ८३ ]

॥ श्रीराम ॥

अलगट मन मोठें नावरे आवरीतां ।
वटवट विषयांची ते चि तें नित्य चिंता ।
खटपट न सरे रे काय कैसें करावें ।
विनवितों रघुराया हातिचें नोसडावें ॥ १ ॥
तुजविण शिण ऐसें अंतरीं वाटतें रे ।
तुजविण शिण कानीं गोष्टि म्यां ऐकिली रे ।
तुजविण शिण जाला थोरथोरांसि देवा ।
मुढमति मनुजाचा आणिला कोण केवा[1] ॥ २ ॥
रघुपति विनवीतों सर्वभावें स्वभावें ।
पतित परि मि तूझें ठाउकें हें असावें ।
विकृति[2] मज दिनाची सर्वथा नाठवावी ।
परम दिनदयाळें वासना पूरवावी ॥ ३ ॥
तडपड त्रय तापें जाहाली अंतराची ।
चरफड करुं कीती शुद्धि नेणें सुखाची ।

---

१ पाड, थोरीव. २ विकार, कुबुद्धि.

विकळ पडलि काया धांव रे देवराया ।
तुजविण जगदीशा पूरवी कोण थाया ॥ ४ ॥
अतुर बहुत आहे जाण मी जानकीशा ।
तुज चि शरण आलों छेदिं रे मोहपाशा ।
मुढ मति अति माझी जाणसी तें करीं रे ।
दिनकरपतिताचा भार देवा तुला रे ॥ ५ ॥

[ ८४ ]

॥ श्रीराम ॥

सरसर परता रे पार पाहें परेचा ।
वच वच निरशीं रे छंदु घे आत्मयाचा ।
चळवळ करितो रे काळ त्रिकाळत्राणा ।
त्वरित ठकुनि यातें येश घ्यावें सुजाणा ॥ १ ॥
परधन परदारा स्वप्नि ही नातळावी ।
परन्युन परनिंदा ते कधीं नाठवावी ।
रघुविरगुणकीर्ती अंतरीं आठवावी ।
स्वहित विहितपंथें ऐक्यनिष्ठा धरावी ॥ २ ॥
पुटपुट विषयांची पूरली सर्व जन्मा ।
कधिंन्नधिं हि न बोले वैखरी रामनामा ।
यमपुरिस तयाचे सोयरे नर्कवासीं ।
निडळिं धरुनि वाहे पाहती वास त्याची ॥ ३ ॥
नमन जरि न मानें रामपादारविंदीं ।
गमन जरि न मानें रामगूणानुवादीं ।
स्तवन जरि न मानें रामलीळावतारा ।
हर हर तरि कां रे पीडिली तातदारा ॥ ४ ॥

---

१ छंद. २ उतावीळ. ३ ठकवून, फसवून. ४ स्पर्श करूं नये. ५ कपाळावर हात ठेवून. ६ मातोश्रीला.

प्रतिदिनिं परिमीतें कर्म क्रीया करावी ।
प्रतिदिनिं परिमीतें वृत्ति रामीं रमावी ।
प्रतिदिनिं परिमीतें नित्यनेमें उरावें ।
दिनकर ह्मणे शेषीं सर्वकांहीं नुरावें ॥ ५ ॥

[८५]

॥ भुजंगप्रयात छंद ॥

॥ श्रीराम ॥

दिनानाथ हा राम सौजन्यसिंधु । जयाचा शिवा मानसीं नित्य वेधु ।
तयाचा जिवां मानवां ध्यास लागे । तरी मोक्ष येऊनियां दास्य मागे ॥१॥
सदा सर्वदा राम वाचेसि ध्यावा । निजध्यास तो अंतरींचा न जावा ।
अखंडीत खंडों नये सर्वकाळीं । निजानंदनामामृताची धुमाळी ॥ २ ॥
बरें पाहतां सार सर्वागमाचें । महागूज हें शोधितां नीगमाचें ।
निजानंद जें ध्यान गौरीहराचें । मना जाण पां नाम तें राघवाचें ॥३॥
कळीकाळ संहारितो सर्व जाॅलें । तया त्रासि तें नाम नेणेति मूॅलें ।
वृथा जन्मलीं सीणसीणों चि मेलीं । महा सुस्थळा येउनी हानि केली ॥४॥
बरा देह पावोनि वायां न जावें । सुध्यॉं संप्रदायें चि देवा भजावें ।
ह्मणे दीन देवेविना हीत नाहीं । न माने तरी शास्त्र शोधूनि पाहीं॥५॥

[ ८६ ]

॥ इंद्रवज्रा छंद ॥

॥ श्रीराम ॥

असार संसार कळोनि कां रे । मदांध होसी भरसी भरीं रे ।
ज्यांचेनि संगें न भिसी भवाला । बांधोनि देती तुज ते यमाला ॥ १ ॥
दाराधनें कां मनि तोष घेसी । ऋणानुबंधें सुख लाधलासी ।
तें सत्य मानूनि रिझों नको रे । न मानिसी हें तरि कष्टती रे ॥ २ ॥
प्रताप सोपा करिं येक बापा । अत्यादरेंसीं भज रामरूपा ।
उद्धार तेणें करिं पूर्वजांचा । संसार हा मानवि दों दिसांचा ॥ ३ ॥

---

१ सर्व शास्त्रांचें. २ वेदांचें. ३ जें निर्माण झालें आहे तें. ४ मूळचें.
५ सीधा, सरळ, जो विहित असेल त्या.

आईजणें वैभव सर्व आहे । जाईल हें सत्य घडी न राहे ।
होसील कष्टी मग तूं सुजाणा । नव्हे असें तों भज रामराणा ॥ ४ ॥
काबाडधंदा करिसी किती रे । पळ येक रामीं स्थिरता नव्हे रे ।
कोण्या मुखें भेटसि त्या प्रभूतें । जाणें न चूके तुजलागि तेथें ॥ ५ ॥
अधोमुखें जैं तुजलागि पोटीं[1] । वास्तव्य होतें तुजलागि कष्टीं ।
ध्यातां चि तेथें प्रभुध्यानमाळा । तूं सूटलासी मग जाण बाळा ॥ ६ ॥
सोडूनि तो जानकिनाथ कैसा । लोलुप्त रे कामिनिच्या विलासा ।
जळो जळो वित्पत्ति त्यां मुढांची । जे नाठवीती करुणा प्रभूची ॥ ७ ॥
ज्याचे लिळेनें रवि शेष शंभु । मेरु धरा सागर तो स्वयंभु ।
चाळूनियां सर्व जिवीं विवर्ते । तो राम मूढांमनिं न प्रवर्ते ॥ ८ ॥
आहारनिद्राभयमैथुनानें । पशुत्व जीवासि दुराभिमानें ।
द्वेषूनि नानापरि साधुवृंदें । अधोगतीं वास करीं विषादें ॥ ९ ॥
अनेक जन्मार्जित पापगांठी । उच्चारितां जानकिनाथ होटीं[2] ।
जाळी जसा पावक काष्टराशी । दिवाकरा राम तसा अघाशी ॥ १० ॥

[ ८७ ]

॥ उपेंद्रवज्रा छंद ॥

॥ श्रीराम ॥

सकाळवेळीं रघुराजनामें । स्तोत्रें ह्मणावीं बहुसाल नेमें ।
उपाय नानापरिचे करावे । सत्पंथ हे सज्जन हो धरावे ॥ १ ॥
पतीत ते उत्तम रामनामें । सनाथ होती परिपूर्णकामें ।
कैवल्यधामीं वसणें तयांचें । अखंड रामीं मन लिप्त ज्यांचें ॥ २ ॥
सर्वस्व जावें परि येक यावें । तेथें मनें निश्चळ नित्य व्हावें ।
निःशब्द वेदादिक जेथ जाले । आनंद तो अद्भुत कोण बोले ॥ ३ ॥
बहूत जन्में बहु पुण्य सांचे । तरी च ये अव्यय नाम वाचे ।
समस्त संसारसुखासि आंतें । निजात्मभावीं रमणें निवांतें ॥ ४ ॥

१ मातेच्या उदरांत. २ ओष्ठीं, तोंडानें. ३ पातकें भस्म करितो. ४ निर्गुण सायुज्याचे ठिकाणीं. ५ शाश्वत, निरंतर. ६ व्याप्त.

विचारितां दीनकरा स्वभावें । नृदेह मोठा पुढती न फावे ।
जाणोनि हें जे करिती स्वहीता । ते धन्य लोकीं मजला पाहातां ॥५॥

[ ८८ ]

॥ द्रुतविलंबित छंद ॥

॥ श्रीराम ॥

न भजतां भजतां रघुनायका । सजन हो जन हो गुज आइका ।
विधिविना जन्हि नाम मुखासि ये । पतित ही परि मोक्षनिवासिंये ॥१॥
अतिशयें विषयातुर पातकी । हिंसक[1] दुर्जन सज्जनघातकी ।
अवचटें जरि नाम जपासि ये । पतित ही० ॥ २ ॥
नाम अंतरिं अनामिकें[2] स्मरे । तरि असाध्य अघें परि घस्मरें ।
जळति तैं जिव स्वात्मसुखासि ये । पतित ही० ॥ ३ ॥
सुखमया समया जरि लाहिजे । तरि मना सुमना गति पाहिजे ।
सुखरुपें स्वरुपें स्वगतीसि ये । पतित ही० ॥ ४ ॥
तदुपरी मनुजें नमनावया । गरज कोण अमान्य करावया ।
दिनकरा रघुराजपदासि ये । पतित ही० ॥ ५ ॥

[ ८९ ]

॥ श्रीराम ॥

सकळ बंद विमोचन राघवें । वदत संत शिवादिक लाघवें[3] ।
श्रवण तें असतां भ्रमसी मना । कशि तुला न सुटे हिन कामना ॥१॥
किति तुला शिकऊं मुढअंतरा । न करिसी सुचना मर कातरा ।
जळसिना चि सुखें वडवानळें । हरि करी तरि हें मज मानलें ॥ २ ॥
तळमळीत कशी विषईं स्पृहा । तशि तुला नलगे मति निस्पृहा ।
पतित तूं विषयांध जनावरा । न भजसी रघुराज अनावरा ॥ ३ ॥
शिकविलें करिसी जरि बोधसी । सुरस सुंदर तें सुख लाधसी ।
रिझसि उत्तम प्रत्यय अंतरीं । तरि मना गति ते जगदांतरीं ॥ ४ ॥

---

१ दयाहीन २ कुप्रसिद्ध. ३ कनवाळूपणानें. ४ मित्रा, म्याड. ५ इच्छा.

सुखमया समया जरि लाहिजे । तरि मना सुमना गति पाहिजे ।
दिनकरा न धरीं मदमान्यता । रघुपतीविण सर्व जघन्यता[1] ॥ ५ ॥

[ ९० ]

॥ इंद्रवज्रा छंद ॥

श्रीराम

जिणें जिवांचें अघटीत वाटे । जो हे न जाती परमार्थवाटे ।
तो हे प्रवाहीं पडिले भवाचे । हे वानिती हा अति लाभ वाचें ॥ १ ॥
पार्थी गिताबोध रमारमानें[2] । केला तसा शास्त्रविचारमानें ।
होईल तेथें गुरुला भजावें । सन्मार्गसा पाहोनियां भजावें ॥ २ ॥
जन्मांतरों दोष अमोघवाणे[3] । उपेक्षिजेतो[4] तारि राघवानें ।
तैं आसुरी कर्म करी विकारी । लोकोत्तरीं मी ह्मणे निर्विकारी ॥ ३ ॥
अपेयपानें पद ये विधीचें[5] । तैं कां करावें करणें विधीचें ।
अभक्ष्य खातां जरि मोक्ष होतो । कां राक्षसांला तरि नर्क हो तो ॥४॥
उन्मत्तद्रव्यें स्वसुखें घडावीं । संसारिकें कां तरि वीघडावीं ।
योगेश्वरीं ज्ञानविचार केले । ते काय तेहीं हिन चार केले ॥ ५ ॥
भ्रष्टाधिकारें जरि मोक्ष लाभे । तैं वायसांला गति कां न लाभे ।
प्रबोध शिष्यांप्रति भाविलासे । नाना प्रयत्नें अविधी विलासें[6] ॥ ६ ॥
समस्त सेवी[7] परि अग्नि जाळी । ते मक्षिका काय अभेद जाली ।
तैसेपरी बोध अनर्गळांचा । जैसा भिना पारधि तो गळाचा ॥ ७ ॥
उच्छेदुनी सन्मति नीगमाची । जो साधकां दे मति आगमाची ।
सांगे क्रिया कामिक वेसनाच्या । नाना विधानें रिति आसनाच्या ॥८॥
मंत्रार्चनें यंत्रविधीमहात्मा । सद्वंशजां बोधित जो महात्मा[8] ।
स्वयें बुडे बूडवि ईतरांसी । कोठें गती त्या असे कातरासी ॥ ९ ॥

---

१ क्षुद्रत्व, निकृष्टावस्था. २ रमेला रमविणारा जो श्रीकृष्ण त्यानें. ३ हटकून फलदार्या होणारे. ४ उपेक्षा करितो. ५ ब्रह्मदेवाचें. ६ वेड्या कृति. ७ कर्ता ' मक्षिका '. ८ मनस्वी मनुष्याचा.

रात्रीं क्रिया आचरती विकारें । दिसां वरे वर्तति निर्विकारें ।
असोत हे हीन ह्मणे दिनेशु । ज्यां कर्मकाळीं नलगे दिनेशुं[1] ॥ १० ॥

[ ९१ ]

॥ अनुष्टुप् छंद ॥

॥ श्रीराम ॥

अविद्याझोंप आलीसे दाटलीसे अहंभरें ।
संसारस्वप्न त्यामाजीं देखतो जीव साजिरें ॥ १ ॥
मी मी माझ्या तुझ्या घोरें[2] घोर तो लागला असे ।
वोसणातो[3] सुखें दुःखें स्वर्गिच्या इहलोकिंच्या ॥ २ ॥
सद्गुरुबोधसूर्याचा प्रकाश भुवनत्रइं ।
असतां जीव तो नेणे स्वरूपस्थिति जागृति ॥ ३ ॥
जागृति स्वरूपावस्था प्राप्त नव्हे चि ज्यां जिवां ।
तयांच्या पूर्वपापासी पार नाहीं जळो जिणें ॥ ४ ॥
दिनेश जागृती आला सद्गुरूनें प्रबोधिला ।
अखंड स्वरूपावस्था निजांची लाधली बरी ॥ ५ ॥

[ ९२ ]

## ॥ श्रीमारुतिस्तवराज ॥

॥ अनुष्टुप् छंद ॥

॥ श्रीराम ॥

धन्य धन्य कपीराजा महाराज भुमंडळीं ।
वरिष्ठ सकळांमध्यें दास्यभक्तीस आश्रयो ॥ १ ॥
वर्णितां महिमा याचा ब्रह्मादिक अशक्त कीं ।
स्वयंभ रुद्र हा आहे रामदास्यासि वेषज्ञु ॥ २ ॥
न घडे अन्य वेषानें रामदास्य यथाविधी ।
ह्मणौनि वानरीं काया प्रीतिनें धरिली शिवें ॥ ३ ॥

---

१ कर्मे करतांना ज्यांना रात्र पाहिजे असते, ह्म० अंधारांत पातकें करणारे.
२ काळजीनें. ३ बरळतो.

पूर्वींच हारिली चिंता अल्प हि ठेविली नसे ।
राहिली येकि सेवेची तद्रूप जाहला स्वयें ॥ ४ ॥
घराची लागते चिंता वानरा नलगे चिंते ।
स्त्रियेची वाहावी चिंता ब्रह्मचारी ह्मणौनियां ॥ ५ ॥
वस्त्र मूत्र दीर्घशंका हे चिंता वारिली कशी ।
गर्भीं च घेतली कास हेमकौपीन अक्षई ॥ ६ ॥
त्रैलोक्य डंखिलें नेमें कामसर्पें अति क्रुरें ।
तयासी मर्दिता येक मारुती न दिसे दुजा ॥ ७ ॥
त्रैलोक्य दास मारांचे[1] हरीचा दास मार तो ।
समान न तुळे कोण्ही पाहातां हि युगायुगीं ॥ ८ ॥
क्षुधा तृषा माहामारी पाडिती अंतराय कीं ।
ह्मणौनि साधिला योगु अन्नोदक असो नसो ॥ ९ ॥
वज्रांगघात चालेना शस्त्रास्त्रें पडतां वरी ।
वहनें भूषणें वस्त्रें धनधान्य गृहादिकें ॥ १० ॥
क्षुधा तृषा सखीं मित्रें सुहृदें सुखसोयरीं ।
माता पिता स्त्रिया पुत्र सर्वत्र आप्त पारखीं ॥ ११ ॥
जन्ममृत्यादिकें सेरीं[2] सुखदुःखें समस्त हीं ।
पूर्वीं च वारिलीं तेव्हां वान्नरी वेष घेतला ॥ १२ ॥
न लोटे वासनालोटें दिव्यदेही महाबळी ।
सर्वांगें रंगला रामीं रामदास यथार्थ हा ॥ १३ ॥
तृटी[3] रामवियोगाची कल्पं[4] थोडा असी गमे ।
तयासी व्यसि जें अस्ती कैसें तें घडतें पाहा ॥ १४ ॥
पूर्वीं च तोडिल्या वोढी जितेंद्रिय पराक्रमी ।
आधिव्याधि नसे कांहीं रामसेवेसि रातला ॥ १५ ॥

---

१ मदनाचे. २ अफाट. ३ काष्ठेचा $\frac{1}{8}$ काल, किंचित् काल. ४ ब्रह्मदेवाचा दिवस ह्मo ४३२ कोटी सौरवर्षे.

न कळे पार पैं याचा महाराज कपीकुळीं ।
कृपाळु निजदासांचा सांभाळ करि सर्वदा ॥ १६ ॥
निर्विलें राघवें यासी सांभाळीं दास आमुचे ।
तयांची सर्व ही चिंता मारुती तुजला असे ॥ १७ ॥
रामवाक्यें सदाकाळीं सांभाळी रामसेवकां ।
जळीं स्थळीं महाघोरीं रक्षिता मारुती असे ॥ १८ ॥
नसे हे अन्यथा वाणी प्रत्यक्ष साक्ष बाणली ।
आणि आज्ञा समर्थाची ह्मणौनि अन्यथा नव्हे ॥ १९ ॥
राम सौमित्र भरत शत्रुघ्न मारुती स्वयें ।
जानकीसहितें साही षड्गुणेश्वर राम हा ॥ २० ॥
अभिन्न अंतरात्मा हा संसारार्णवतारकु ।
भिन्नता भावितां यासी रौरवीं वास पूर्वजां ॥ २१ ॥
अथर्वणी श्रुती साक्षी पाहाणें यासि साधकें ।
अन्यथा वाटतां वेगीं वाल्मिकीकृत शोधणें ॥ २२ ॥
मारुती सारथी आतां चिंता काय जनीं वनीं ।
निःसंदेह सदाचारें क्रीडतां भय बाधिना ॥ २३ ॥
मारुती सेवणें आधीं मारुतीपर्व रक्षणें ।
आपदीं चिंतणें त्यासी निमिष्यार्ध न सोडणें ॥ २४ ॥
आधि व्याधि जरा मृत्यु ग्रह रोग दरिद्रता ।
शाकिनीडाकिणीव्येथा भूतबाधा न बाधिती ॥ २५ ॥
हनुमत्कवचें स्तोत्रें स्तवराज स्तुती सदा ।
सहस्त्रनाममंत्रांचीं पुरश्चरणें क्रिया विधी ॥ २६ ॥
रामउपासकीं नेमें मारुती सेवणें सदा ।
मारुतीसेवनें होतें सर्व ही हें यथार्थ चि ॥ २७ ॥
वंदणें मारुतीमूर्ति चिंतणें मारुती मनें ।
पूजणें मारुती नेमें सेवणें मारुती सदा ॥ २८ ॥

१ मारुती हा च. २ मारुतीवर्णनपर अध्यायः किंवा मारुतीचा उत्सव.

मारुतीदर्शना आधीं जाईजे नेमधारकें ।
प्रातर्मध्यान्ह सायान्हीं त्रिकाळीं साधकें हरी ॥ २९ ॥
पूजणें वंदणें भावें साष्टांगीं करुणाळया ।
सर्वस्व हि निवेदावें काया वाचा मनोदयें ॥ ३० ॥
कृपाळु मारुती आहे रामदासांसि निश्चयें ।
यदर्थीं संशयो नाहीं त्रिशुद्धि सत्य सत्य हें ॥ ३१ ॥
सर्व हि सर्वदा जाणा संप्रदाय हरीगुणें ।
दिनकरा कृपाळू तो ठेविला हस्त मस्तकीं ॥ ३१ ॥

इति श्रीदिनकररामींरामदासविरचित हनुमंतस्तवराज संपूर्णमस्तु ॥ श्रीहनुमंतार्पणमस्तु ॥

श्रीदिनकरकृत श्लोक संपूर्ण

---

# श्रीदिनकरकृत ललितें आरत्या वगैरे

॥ १ ॥ **ललीत** ( येकताळ ) [ १

॥ श्रीराम ॥

अष्टभावेंसीं विनित । होऊनि सप्रेम हनुमंत । चरणावरी दंडवत निजानंदें उद्बोधें ॥ १ ॥ धृ० ॥ आतां विश्रांतीसी घ्यावें । दासा सेवादान द्यावें ॥ ध्रु ॥ सुरवर उभे अंतराळीं । सनकादिक भूमंडळीं । वशिष्ठादिक ऋषिमंडळी । नाना स्तवनें स्तविती ॥ २ ॥ नारद तुंबर चतुरानन । करिती स्वानंदें कीर्तन । सदाशिव कर जोडुन । स्वगणेंसीं प्रार्थिती ॥ ३ ॥ अष्टदिशा लोकपाळ । उडगणें[२] ग्रहमंडळ । सप्तसागर अष्टाचळ । क्षणक्षणा वंदिती ॥ ४ ॥ अंगद सुग्रीव जांबुवंत । रीसावानरांसहित । बिभीषण आर्तभूत । निशाचरांसमवेत ॥५॥ भरत सौमित्र शत्रुघ्न । तिष्ठत सीता कर जोडुन । भक्तसमुदाय संपूर्ण । ब्रह्मानंदें बोलती ॥ ६ ॥ तीर्थें व्रतें देवधर्म । विधी आगम नीगम ।

---

१ निश्चयेंकरून. २ नक्षत्रें.

दानें यज्ञ जप कर्म। नामघोषें गर्जती ॥ ७ ॥ चार्‍ही वाचा अष्ट सिद्धि। मोक्ष मुक्ति नव हिं निधी। नमिती आपुलाले विधीं। परोपरीं स्वानंदें ॥ ८ ॥ ऐसा त्रैलोक्यसमुदाय। नयनीं लक्षुनि रामपाय। स्तविती होउनी तन्मय। जयजयकारें गर्जती ॥ ९ ॥ दिनकर रामींरामदास। बहुडाविलें सकळांस। देव गेले सुखशयनास। स्वानंदेंसीं परिवारें ॥ १० ॥

॥ २ ॥ श्रीराम ॥ [ २

॥ धृ० ॥ देईं हें चि वरदान। जर्‍ही मांडलें निदान ॥ धृ ॥ जयजयकारें रामनाम। अखंड वाचेसी निष्काम। अष्टभावें पूर्णप्रेम। ब्रह्मानंदीं मिश्रित ॥ १ ॥ वर्णाश्रमयुक्त कर्म। चतुर्विध क्रियाधर्म। उपासना नित्यनेम। ज्ञानविज्ञानेंसहित ॥ २ ॥ दिनकर ह्मणे देव। इच्छीतसे हें चि दैवं। याविण नलगे दुजी माव। काळत्रईं सर्वथा ॥ ३ ॥

॥ ३ ॥ श्रीराम ॥ [ ३

अविहित होतें तें विहितासी आलें। अविहित होतें रे। विहितासी आलें। संतसंगें जालें। समाधान रे रे ॥ १ ॥ धृ० ॥ संतसंग धरा संतसंग धरा। संतसंग धरा रे। संतसंग धरा। येकनिष्ठभावें रे ॥धृ॥ संतकृपेचा महिमा अपार। संतकृपेचा रे। महिमा अपार। संसार दुस्तर तो चि तो सोपा रे ॥ २ ॥ दिनकर ह्मणे मी संतांचें अंकित। दिनकर ह्मणे रे। मी संतांचें अंकित। देहाचें लळित त्यांचे कृपेनें रे ॥ ३ ॥

॥ ४ ॥ श्रीराम ॥ [ ४

नामघोष मुखीं करीं वाजे टाळी। नामघोष मुखीं रे। करीं वाजे टाळी। पातकांची होळी। तये क्षणीं रे ॥ १ ॥ धृ० ॥ नामघोष करा नामघोष करा। नामघोष करा रे। नामघोष करा। न याले संसारा। येकसरें रे ॥ धृ ॥ हें चि येक आह्मा द्यावें निरंतर।

---

१ कुबेराचे नऊ प्रकारचे खजिने. २ मागें सारिलें.

हें चि येक आह्मां रे । द्यावें निरंतर । कीर्तनीं सादर । नित्य व्हावें तुह्मी ॥ २ ॥ आब्रह्मापासुनी उद्धरेल वंश । आब्रह्मापासुनी रे । उद्धरेल वंश । तुटतील पाश । जन्ममृत्याचे ॥३॥ रामदासांचा दिनकर ह्मणे । रामदासांचा रे । दिनकर ह्मणे । अखंड घेणें । विश्राम रामीं ॥ ४ ॥

॥ ५ ॥ श्रीराम ॥ [ ५

आणिक नलगे आह्मां कांहीं । तुझ्या नामावांचुनि पाहीं ॥ १ ॥ ध्रु० ॥ देवा होईं सावधान । मुदल देईं नामऋण ॥ छ ॥ नामऋणें बांधलासी । आतां सुटला केवीं जासी ॥ २ ॥ कोण्ही नव्हतें तुजला जेव्हां । साहकारी केलें तेव्हां ॥ ३ ॥ त्याच्या बळें हें ब्रह्मांड । रचूनि केलें येव्हडें बंड ॥ ४ ॥ तधींपासुनी आह्मांसी । दरिद्र आलें अहंकारेंसीं ॥ ५ ॥ जेणें रीतीं ज्याचें घ्यावें । तेणें रीतीं त्याचें द्यावें ॥ ६ ॥ दिनकर ह्मणे वेगु करीं । विलंबु करितां कोणा हारी ॥ ७ ॥

॥ ६ ॥ श्रीराम ॥ [ ६

वैष्णवांत वरटीक । दास्यभक्तीचा निष्टंक ॥१॥ ध्रु० ॥ स्वयंभ उभा महाद्वारीं । गर्जतसे जयजयकारीं ॥ छ ॥ दर्शन होतां अकस्मात । दोष लंघिती दिगांत ॥ २ ॥ ऐसी जोडलीसे धुर[1] । दिनकरा निरंतर ॥ ३ ॥

॥ ७ ॥ श्रीराम ॥ [ ७

॥ ध्रु० ॥ हां हां हां नयनीं देखिला शंकर । देखतां चि श्रम हरला अपार ॥ छ ॥ हां हां भस्म चर्चिलें सर्वांगीं । शैल्यबाळा[2] शोभतसे वामांगीं ॥१॥ हां हां नंदीवहन सुंदर । समागमें भूतांचा परिवार ॥२॥ पंचानन पंचदशलोचन[3] । पंचमुगुट शिरीं विराजमान ॥ ३ ॥ हां हां श्रवणीं नागेंद्रकुंडलें । गळां रुंडमाळापदक शोभलें ॥ ४ ॥ हां हां व्याघ्रांबर वसन । दिनकरें केलें साष्टांग नमन ॥ ५ ॥

---

१ जबाबदारी, जोखड. २ पर्वताची कन्या जी पार्वती. ३ पंधरा डोळ्यांचा; प्रत्येक मुखाचे ३ डोळे, याप्रमाणें पंचमुखांचे १५.

॥ ८ ॥ श्रीराम ॥ [ ८

अनंकोळित[1] अनकळित आकळूं आलें । आकळूं आलें । संकळितां[2] युक्तीं कैसें ळळित जाहालें ॥ १ ॥ धृ० ॥ धन्य वो धन्य माये सद्गुरूराजा । सद्गुरूराजा । सोहंभावें वोवाळूं सहजींसहजा ॥ ध्रु ॥ कायावाचामनेंसीं ळळित संपलें । ळळित संपलें । गळित पळित वळित जेथिल तेथ निमालें ॥ २ ॥ अहंकोहंसोहंतीत माजलें नीज । माजल नीज । दिनकरा रामदासीं सिद्ध सहज ॥ ३ ॥

॥ ९ ॥ श्रीराम ॥ [ ९

जाहालें कीर्तन आतां संपली कथा । संपली कथा । शुद्धाबद्ध शब्द क्षमा करणें सर्वथा ॥ १ ॥ धृ० ॥ आह्मी बाळेभोळे दास केलों संतांचे । केलों संतांचे । न्यून तें पूर्ण करुन घेणें कथेचें ॥ध्रु॥ बोबडे बोल बाळ बोलतां वाचे । बोलतां वाचे । हर्षें बाप वेऊनि त्यासी कडीये नाचे ॥ २ ॥ आवडीच्या भरें तुह्मी भोक्ते रामरस । भोक्ते रामरस । निरंतर सेवा ह्मणे दिनकररामदास ॥ ३ ॥

---

## ॥ १ ॥ आरती मारुतीसाहेबांची [ १०

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जयजया भीमराजा । नीळतमाळ तेजा ॥ आरती वोवाळीन । सद्भावें सहजा ॥ ध्रु ॥ जन्मतां ख्याति केली । मार्तंड दंडीला ॥ भंगिल्या देवकोडी । शक्र बळभग्न केला ॥ साटोपशक्ति मोठी । पुढें राम भेटला ॥ सुग्रीवा सख्य केलें । राज्यपदीं स्थापिला ॥ १ ॥ जानकी दक्षणेसीं । शोधियेली स्वलीळा ॥ शोधितां शोधितां पैं । संपाती भेटला ॥ दिधली शुद्धि तेणें । तो हि पावन केला ॥ ठेउनी वानरांसी । सिंधु वोलांडीला ॥ २ ॥ जाउनी पडलंके । क्रौंचेसी मारिलें ॥ अद्भूत साक्षपेंसीं । लंकापुर शोधिलें ॥ विटंबूनि रावणासी । सीताशुद्धीसि केलें ॥ मारिलें बनकरांसी । लंकापुर जाळिलें ॥ ३ ॥ वंदूनि जानकीतें । उलंघिला श्वेतु ॥ भेटला राघवासी । पदीं विनित होतु ॥ देऊनि ब्रह्मपत्र । केला शुद्धिसंकेतु ॥ चालिला राम-

---

१ निरुपद्रव. २ एकत्र करुन.

राजा । सिंधूसी पालाणितु ॥ ४ ॥ सुवेळें राम नेले । राक्षेस वाधले ॥ मारिलें रावणासी । राज्य बिभीषणा दिल्हें ॥ घेउनी दिव्य सीता । विमानारूढ जाले । भरथा शुद्धि नेली । पैल श्रीराम आले ॥ ५ ॥ भेटले बंधुवर्ग । जाला आनंद थोर ॥ त्रैलोकीं रामराज्य । होती जयजयकार ॥ अक्रासहस्र वर्षें । राज्य केलें सुचीर ॥ प्रयाण निजधामा । होतां केलें महेंद्र ॥ स्थापिलें वरदहस्तें । सांभाळीं चराचर ॥ ६ ॥ वर्णितां कीर्ति भीम । भीम पराक्रम ॥ शक्ति ही भीम कैसी । न बोलवे निस्सीम ॥ विरंची शेष चित्तीं । विस्मित श्रीराम ॥ दिनकर दीन तेथें । वर्णी केवि परम ॥ ७ ॥

## ॥ २ ॥ आरती मारुतीसाहेबांची [ ११

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय देव जय देव जय अंजनिसूता । जय जय हनुमंता । अभयवरदें तुझ्या न मनी भववेथा ॥ धृ ॥ भूभुःकारें भूधरफणिकुळसमवेतें । धधेरिलीं पाताळें सप्त हि कंचुक ते ॥ दणदणिलें भूमंडळ सागरजळ तप्ते । निशिचर भूचर खेचर त्यजिती प्राणातें ॥ १ ॥ तडतडिले अष्टाचळ गडगडिलें गगन । सर्सरितीं नक्षत्रें धरणीवरि लीन ॥ वोढवलें सर्वत्रां अमरांसी पळण । चतुरानन शशिशेखर मानिति बहु शीण ॥ २ ॥ जन्मतेसमईं जेणें हुंकारवचनें । सत्राणें आक्रमिलें रविमंडळ पेणें[३] ॥ ते समईं त्रिभुवन दंडळलें जाणें । तो हा हनुमंत दिनकर पूजी सुमनें ॥ ३ ॥

## ॥ ३ ॥ आरती श्रीरामाची [ १२

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय राम जय राम जय जानकिरमणा । चरणांप्रति शरणांगत तृष्णांकुरदहना ॥ दिनकरकुळभूषण दूषणभवहरणा । निजभावें आरती रघुपति जगजिवना ॥ धृ ॥ अपरांपर विश्वंभर शरयूतिर-

---

१ आच्छादिलें. २ सप्तकंचुकब्रह्मांड=५ मूळपंचतत्वें, १ अहंकार व १ महत्तत्व मिळून सप्तकंचुक त्रैलोक्य. ३ पेणा=मुक्काम.

वासी । क्रीडत सुखसागर निशिचर गण त्रासी ॥ धन्य धरणीतळ चरणीं गुणराशी । धन्य दशरथनृपती जगदिश सुत ज्यासी ॥ १ ॥ अयोध्यानगर धन्य धन्य नृपवनिता । धन्य त्या नरनारी देखति नयनीं रघुनाथा ॥ धन्य नवमास हृदईं कौसल्या माता । धन्य तो रघुवंशीं त्रिभुवनजनजनिता ॥ २ ॥ धन्य कविवर वाल्मिक वदला अनागंत[1] । रामायण शतकोटी धन्य श्रोता श्रवणस्त ॥ धन्य नर निशाचर श्रवणीं मन विनित । खग नग गण गंधर्व पशुपतिसमवेत ॥ ३ ॥ धन्य ऋषि मुनि ज्ञानी जपि तपि अगणीत । फणिवर भूचर नभचर जळचर गुणलिप्त ॥ सुरनर विद्याधर कीर्तनि रत चित्त । धन्य मूढ जड जीव जे श्रवणें संतृप्त ॥ ४ ॥ रजनीचर कृतवैरें प्रभुकरें वध होत । धन्य सफळ जिणें तें चि कैवल्यपद प्राप्त ॥ श्रवणें पठणें भजनें रघुपति सुख देत । धन्य दिनकर रामींरामदासीं कृतार्थ ॥ ५ ॥

## ॥ ४ ॥ आरती श्रीरामाची [ १३

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय राम जय राम जय करुणासिंधु । द्वद्वत निजस्वरूपा अविगत तव वेधु ॥ छ ॥ न कळे पदरजमहिमा वदतां शेषासी । अनुभवितां मुनिमुद्रा[2] पडली निगमांसी ॥ तपि गणपति तप सोडुनि वंदी तीर्थासी । अवस्थातीत होउनी लक्ष्मी तव दासी ॥ १ ॥ अतुळ न तुळसि सहसा परि तूं तुळिलासी । त्रिभुवनजनका कैसा दशरथसुत होसी ॥ तुझी लीळा तूं चि जाणसि सुखरासी । तनुमनुभावें शरण दिनकर चरणासी ॥ २ ॥

## ॥ ५ ॥ आरती सदाशिवाची [ १४

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय शांभ जय शांभ जय विश्वंभरा । आर्तें आर्ता सद्गति दे कर्पुरगौरा ॥ छ ॥ गौतमिपति गिरिजापति त्रिभुवनपति पूर्णा । वृषवाहन अहिभूषण पंचानन सगुणा ॥ स्मरदाहक

---

१ भविष्यमान्. २ मौन.

त्रिपुरांतक सुरगंजकदमना। करुणाकर शशिशेखर असुरांमरकरणा ॥ १ ॥ व्याघ्रांबर माळाधर विषधर शुळपाणी। अजरांमर अपरांपर सगुणेश्वर अगुणी। भुतनायक भवभंजक निजपदसुखदानी। पटीश-पाशुपतधर वैस्वानर नयनीं ॥ २ ॥ शशांकवत वपु शोभत भस्मांकित आभो। मस्तकीं जटाजुटीं राजत अति शोभा। गणितां गुणंगणना चिरल्या दशशतफणिजिव्हा। तेथें दिनकर किंकर कैसें वर्णी तुज स्वयंभा ॥ ३ ॥

## ॥ ६ ॥ आरती शंकराची ॥ [ १५

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय शांभ जय शांभ। जय शूळपाणी। त्राहे पुनरपि आतां जननीस्तन वदनीं ॥ धृ ॥ नंदीस्कंदारोहण चर्चन भस्माचें। वामांगीं गिरितनया सैन्य भूतांचें। पंचानन शशिशेखर स्वरूप स्फटिकाचें। नयनत्रय शोभति कंठीं हार रुंडोंचे ॥ १ ॥ मस्तकीं जटाजूटीं गंगा शोभत। गजचर्म परिधान हातीं बाजेचें गात। फुंपात पन्नग श्रवणीं सोडिति धुधुवात। हर हर ह्मणोनि दिनकर चरणा वंदीत ॥ २ ॥

## ॥ ७ ॥ आरती वृद्धेश्वराची ॥ [ १६

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय देव जय देव। जय वृद्धेश्वरा। अजरा अमरा आरति तुज कर्पुरगौरा ॥ धृ ॥ सुरवर मुनिवर किन्नर स्तविती गुण गाती। विद्याधर + वि नाचति फणिवर स्तुति करिती ॥ १ ॥ परमानंदें छंदें गर्जति शिववरदें। लक्षुनि नयनीं वदनीं बोलति हर गद्यें ॥ २ ॥ वामांगीं गिरितनया खळखळी शिरीं गंगा। कळिमळ विगळित नामें ने ने भव भंगा ॥ ३ ॥ शशांक मिर्वत भाळीं उधळी भस्मारा। अहिभूषण पंचानन नुघर्डी शिखिनेत्रा ॥ ४ ॥ जटा पिंगट सुंदर दशकरशिव शोभे। हर हर घोषें गर्जेति गण गणपति ऊभे ॥ ५ ॥

---

१ पट्टीश=पट्टा. २ प्रतिबिंब. ३ त्रायें=रक्षण कर. ४ कबंधांचे. ५ मस्तकावरील तृतीय नेत्र.

व्याघ्रांबर माळाधर विषधर शुळधारी । दिनकर किंकर चरणीं पाहे त्रिपुरारी ॥ ६ ॥

## ॥ ८ ॥ आरती गंगेची ॥ [ १७

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय देवी जय देवी जय वृद्धगंगे[1] । जय मातृगंगे । आतें दर्शनें होतां तापत्रय भंगे ॥ धृ ॥ अगाध महिमा उपमा न दिसे गुणग्रामे । अगम्य करणी तरणी सकळां गति सीमे ॥ १ ॥ प्रसिद्ध पावन पतितां आहेसि कळिमाजीं । नेणति ते तुज पापी रौरव त्यां सहजीं ॥ २ ॥ सहजें दर्शन स्पर्शन संभाषण जालें । दिनकर दिन तुझें बाळक रंगणिं तुझे लोळे ॥ ३ ॥

## ॥ ९ ॥ आरती विष्णूची ॥ [ १८

॥ श्रीराम ॥

॥ धृ० ॥ जय देव जय देव जय वारिजनयना[2] । आतें आरति उजळितों तुज पन्नगशयना[3] ॥ धृ ॥ अंबुजवदना सगुणा चतुरानन नाभीं । वामांगीं निधितनया[4] लक्षित पद उभी ॥ १ ॥ रत्नांकित शिरिं मुगुट झळकत अति तेजें । कुंडलें डोलति श्रवणीं अभिनव श्री[5] माजे ॥ २ ॥ भाळीं केशर आंगीं मळयानिळ[6] दर्पे । बहुविध परिमळ-द्रव्यें मघमघिती अमुपें ॥ ३ ॥ कंठीं कौस्तुभमाळा पीतपट कटिं साजे । असुर तर्जति[7] चरणीं तोडरब्रिद गाजे ॥ ४ ॥ भक्तांचें निजमंडण दंडण असुरांचें । आयुधांकित चतुर्भूज तिष्ठत रुप हरिचें ॥ ५ ॥ गरुडवहनीं केशव सालंकृतध्यानीं । देखे दिनकर नयनीं निर्भय वरदानी ॥ ६ ॥

---

१ श्रीवृद्धेश्वराजवळून वाहणारी लहान नदी. २ कमलनयना. ३ शेषशयना. ४ लक्ष्मी. ५ सौंदर्यकांति. ६ चंदन. ७ भितात.

॥ श्रीराम ॥

ग्रंथ संग्रह
नं.
ता.
ठाणे

# श्रीदिनकरांची स्फुट कविता

## सूची

### अ

ॐकार अ. २९३, ३५९
अंगांत येणें श्लो. २४
अघटित घडणें ,, १
अजपाजप-विधि प. ३४४
अजामिळकथा श्लो. ९, अ. २४१
अंतरात्मा अ. ३५७
  -राम सर्वत्र प. १५८
  -सर्वांस सारखा प. २२६
  -चा शोध प. ३९९
अंतर्शुद्धि प. २५४
अध्यात्मसंस्थापन श्लो. २६
अनन्यभक्त-व्याख्या ,, ७४
अनर्गळ मनुष्य प. ३९२
अनिर्वाच्य सुख अ. ११, २९३, २९४
अनेक पंथ श्लो. ६८
अन्नदान ,, २२, अ. ८५
अभक्तजन ,, ४४
अभिमान ,, २०, अ. ३३
अरण्यसेवन ,, १०, ४९
अर्जुनारि ,, ३२
अविद्या ,, १५
  -झोंप ,, ९१
  -बद्ध प. १००
  -भ्रम श्लो. २४
असून नसणें ,, १५
अष्टदेहनिरसन ,, ५०
अहंकार ,, ३६, ३७ अ. ६२, १०७, २७४, ३००, ३४१, ३५९
  -रूपी किल्ला चढणें प. २७७
अहंबुद्धित्याग अ. ६
अहंभाव अ. १८, २७० ३३४,
अहंमाया अ. ३३०
अहं सोहं श्लो. १२, ३६, अ. २२६
  -वृत्तिरहित ऐक्य प. ६४
अहल्या ( शिळा ) श्लो. ९
अज्ञान (भ्रम, भ्रांति) श्लो. ९, अ. १९
  -कोणतें अ. ३०
  -चें निधान प. ३९८
  -सी भ्रम अ. २६१
  -सी मुक्ति आत्मज्ञानें अ. ३०
  -सी मोठी धवाधवी आहे अ. ३०२

### आ

आत्मनिवेदनी भक्ति श्लो. ६३

आत्मप्रतीति ,, ६८
आत्मबोध अ. ६५, प. ७९
आत्मयोग प. ३६९
आत्मशोधन श्लो. १२, १३, २०, अ. ६२, प. ६४
आत्मसाधन प. ४२५
आत्मसुखसोहळा भोगणें श्लो.८८, प. ४१५
आत्महित ,, १०, ११, ७२, ८२, ८७, अ. ३२, ४६, ५८, २६६,
– प्रयत्न कोठवर प. १६८
आत्मज्ञान अ. ६५, १४०, १५६, १६०, २६१, २९८, ३१४, प. ४०२
– प्रवाह श्लो. ५०
– च्या पायऱ्या प. ४१८
आत्मा निष्कळंक प. ३७८
– नुभवसुख प. २५६
बद्ध होत नाहीं प. १०५
सर्वत्र चाळक प. ३४९
सर्वभूतीं श्लो. ६४
ज्ञानघन प. ३८४
आत्माराम अ. १५२, १५९
घनदाट अ. ३४९
येक अनेक माया अ. ३७८
ब्रह्मांडायेव्हडा अ. ३०७
आत्म्याचें वर्णन अ. २१२ ते २१७
आयुष्यनाश श्लो. १, २०, ३५, ७४, अ. २, १६०, २३३, ३२९ प. ६७, १९४, ३७३, ३७४, ३७६, ३७७, ३९४, ३९५, ३९७, हिं. प. ४२६
आहारनिद्रा इत्यादि श्लो. ८६
आळस श्लो. १, अ. १९१

इ

इंद्रियें व त्यांचे विषय अ. २९०, ३५४

उ

उदास-जनीं वनीं अ. १४९
उपदेशाचे वाम मार्ग श्लो. ६७
उपरोधिक अभंग अ. १४७
उपाधि अ. २६९
उलट्या काळजाचा सावकार अ. १७२

क

करंटपण श्लो. १५, २७
कर्तव्यकर्म ,, ८४
कर्मउपासनाज्ञान ,, १२, ४६, अ. १, १०, २४९, २५७, २९८, २९९, ३०४
कर्म त्रिविध ,, १३,
निष्काम ,, १८
कलियुगमाहात्म्य अ. २५४, २५६, प. २६९
कल्पना श्लो. १९, अ. ४०, ६२, १८५
काबाडधंदा ,, ८५
काम श्लो. ४०, (पुष्कळ ठिकाणीं)
कामिनीकांचन ,, ४२, ४३, ४४ ८६
कार्यकर्ता ,, १८

काळ ( यम ) ,, १, ७, ९, ११, १४,१९,२०,३४,४२,४३,५८ ७२,८५, अ. २४,१४०, प. १७९,२३८,३७७,३८७, ३९५ ४१३
कीर्तन श्लो. ५०, अ. ३, १४३, १४४, १४५, २५८, ३०८ ते ३१०, प. ३६
नामसंकीर्तन अ. १४५,१५३
भगवत्कथा प. २९४
भगवद्भजन प. ९३
हरिकथा-कीर्तन अ. १५५,१६४ १६५, १६६ प. ३७०,
कीर्ति अ. १२५
कुळस्वामिनी अ. १९३
कृष्ण
कृष्णस्वरूपाचें वर्णन अ.१२१
कान्होबाची करुणा प. ८
कान्हा व गोपाळ यांचें प्रेम प. ९६, ९७
गोपीकृत कृष्णस्तवन प. ५८
राधाकृत हरीची करुणा प.१५३
कृष्ण गोपी विनोद प. १८४ ते १८७, २५३
कृष्णस्तवन प. २४५
कृष्णास यशोदेचें समजावणें प. २४७
कैवल्याचा लाभ अ. १४
कोडें अ. ३४, ३६, ८१, ८२, १५७, २२३, प. ३९, २१३, २१४

## ख

खंडेराव अ. १९४
खेळणें श्लो. १

## ग

गजेंद्राचा धावा प. ४०८
गजेंद्रकृत विष्णुस्तवन प. ३३४
गजेंद्रमोक्ष प. ५५
गणपतीस्तवन श्लो. १, २, ४०, ५९, ६०, अ. १५, प. १३, १६०, ३५२
गर्भवासाचें दुःख श्लो. १९, ८६
गर्व श्लो. ३८, ४३, ७३
गीताबोध ,, ९०
गीताभागवत अ. ६५,१२५.२५५
गुरु ( सद्गुरु शब्द पहा )
गुरुगीता उपदेश अ. २०४
गोविंद सर्वत्र अ. २८२,२८३, २८४, प. ४३
गंगेची आरती आ. १७

## च.

चांगलें वर्तन अ. २७८
चापपाणी श्लो. २०
चारीखाणी चारीवाणी श्लो. ३६
चित्कळा श्लो. १७
चित्तशुद्धि प. १५२
चित्त रामरंगणीं रंगवावें अ. ९२
चिरंतनपद श्लो. २१
चिरंजीव दास ,, २३

## ज

जगजीवन सबघट व्यापि रहे। हिं प. ४२९
जगदीशध्यान प. २६
जन अ. ५७
जनस्थिति अ. २५४,२५६
जनकजननीदास्य श्लो. ५०
जनीजनार्दन अ. ३४१, ३५३
जन्ममरण फेरे श्लो. १, ३६
जन्मांतरीचे दोष ,, ९०

जरेचीं चिन्हें अ. २१८ (वृद्धावस्था पहा)
जागृति स्वरूपावस्था श्लो. ९१
जाणीव अ. १२
– चें चिन्ह अ. ३५२
नेणीव प. ३७८
जिणें श्लो. १०, प. ७१
जीव श्लो. ७४, प. ३३९, ३४०,
– शिवपण ,, ६६, अ. ३,
– ईश्वरऐक्य अ. २५५, २५६

ठ

ठसठोंबस अ. १५१

त

तत्त्वमसि महावाक्य श्लो. १२,४६ अ. २२४, प. १४५, ३०४
तल्लीनता श्लो. ३९
तारुण्यांत च परमार्थसाधन श्लो. ११, ७२, प. ३२९
तृष्णा श्लो. ५०
तोडरीं ब्रीद श्लो. ३७
त्रयोदशाक्षरी मंत्र प. १५७
त्रिजटा प. ५, २९८
त्रिताप श्लो. ३९
त्रिदश ,, २
त्रिपुटी ,, ४, ५२, अ. १२, २४७, २६२, प. ३९९, ४००

थ

थोरांमाजीं थोर प. ९४

द

दया क्षमा शांति श्लो. ३९
दशमुख ,, ३२
दशावतारवर्णन ,, २३, ३७, प. २८२
दांभिक अ. ३५५ (भोंदु शब्द पहा)
दासबोध प. १४५
दास्यभक्ति श्लो. ९२
दिनकर गोसावी (विशेष उल्लेख)
रघुराजें स्वगृहामाजिं नेला श्लो. २१
–चें आर्तचित्त ,, ४५
–वर प्रभूचा कृपाहस्त ,, ४५
–कुळवल्ली ,, ७२
–जननी-संवाद अ. ८५, ८६
–रामें आलिंगूनि बुझाविला अ. ८०
–चा स्वानुभव अ. २६३
–वर संकट अ. ३१६
–नें केलेला रामाचा धावा प. ३८
दिवाळखोर अ. १७१, १७२
दुर्जन श्लो. १०, १९
शास्त्रें निंदिती ते दुर्जन अ. २०
चांडाळ, पापी अ. ४९
मूर्खांच्या संयोगें अनहित होतें अ. १३५
दोष करितां सुख वाटे अ. १४२
नाम न घेतां निंदा करणारा अ. १४४
दुर्जना रौरवपद वोखटें प. २४९
दुर्जनासी नमस्कार प. ३९६
–संग श्लो. १०, १९, २६, ८६
दुर्बुद्धि श्लो. २७
दुर्योधन राजा अ. २८
दृष्टांत
दर्पण व प्रतिभास, श्लो. ८, अ ६३
मच्छ व गळ ,, १५, ४०, ४३, ६०
जळ व पद्म ,, १५
हंस व क्षीर नीर ,, १६

रत्नमणी कवडीमोल ,, ४१
छाया व पुरुष ,, ५०
अळी व कीटक ,, ७४
जळ व सैंधव ,, ७४
पण्यांगनेचा नाथ ,, ७४
चातक व पयोद श्लो. ७७, अ. ७९
नभ व नीळिमा ,, ७७, प. ३३६
गजासि धूतलें जळें। सवेंचि तो मळें मळे। श्लो. ७८
दुधांत कृष्ण कोळसा। नव्हेचि शुद्ध टाळसा। ,, ,, ,,
सुगंध चर्चिलें खरा। न सांडि जेवि आखरा। ,, ,,
जऱ्ही सुखासनीं सुणें। तऱ्ही न सांडि भुंकणें। ,, ,,
जळीं खडा। जसा असोनि कोरडा। ,, अ. १५९
पतंग व दिवा श्लो. ७९
जळेंवीण मच्छ अ. ४२
पतिवीण कांता ,, ४२, ७९
वसंतावीण औषधी ,, ४२, ७९
चंद्रेवीण चकोर ,, ४२, ७९
आकाशाचे प्राणी वोविजे वेसणी। ,, ६३
उदकीं दिनमणी सांपडे ,,
मृगजळडोहीं मीन तळपत ,, ,,
गंधर्वनगरीं मनोहर रचना ,, ,,
रवीच्या वियोगें चक्रवाक ,, ,, ७९
श्वानामुखीं परमान्न ,, १५८
मर्कटासी सिंहासन ,, ,,
अंधापुढें सूर्य ,, ,,
नपूंसकापुढें रंभा ,, ,, प. १०५
सेळियेगळां जैसे स्तन ,, ,,
गोंचिड लिगटे दुधापासीं। परि ते सेवी अशुद्धासी। ,, १५९
बेडुक अखंड कमळापासीं। परि गांठि पडली चिखलासी। ,, ,,
जीवनाविण तडाग ,, १६१
सूर्येवीण आकाश ,, ,,
अंधकारें सूर्य जाजावला प. १०५
मृगजळें मेरु वाहावला ,, ,,
थिल्लरीं निशापति बुडाला,, ,,
बागुलें काळ भक्षिला ,, ,,
–राणीनें राजा गरवार केला व तो कानावाटें प्रजा व्याला ,,
वारियानें नभा धीर दिल्हा ,, ,,
मद्यपाच्या घटीं गोक्षीर निर्मळ। केवि तें सुसीळ अंगिकारी। प. १५९
अंत्यजगृहींचें अन्न जरी आहे परमान्न। तरी तें विद्वज्जन सेविती कैसें। प. १५९
रजकगृहींचें जीवन। तृषाक्रांत ब्राह्मण केवि प्राशी। प. १५९
खमार्गे धरितां तरणी। जैसी रजनीचरेंसीं रजनी। प. १७१
वणवा देखोनि वनीं। जैसीं वनींचीं जाती पळोनी। प. ११७
मदमुखें। जैसीं पळती मृगपतिहांकें। प. १७१
अळंकार व सुवर्ण प. ३०४, ३३६
कल्लोळ व जळराशी ,, ,,
पट व तंतु ,, ,,
चैतन्य जडजीवासी प. ३२६
धराभरगुणें घटेसी ,, ,,

गोडि गुळापाशीं ,, ,,
बीजत्व वृक्षेसी ,, ,,
प्रभा रवीसीं ,, ,,
सुगंध पुष्पेंसी ,, ,,
देव
काळाचा हि काळ अ. ६८
क्षुद्र, उदंड श्लो. २४, अ. ३११ ३१२
– देवतापूजन श्लो. ७४
नामरूपातीत अ. ४३
– कळा ४१
– शोधन ,, ७३
दासास सांभाळतो अ. २८
चोजवला अ. २८६
द्वैतेंवीण सर्वांठायीं अ. ३३२
घरीं भेटतो ,, ३२६
येक सत्य, माया मिथ्या ,, ३३९
विमळ, निश्चळ प. १३६
मुख्य देव कोणता ? तत्त्वमसि प. २४३
सगुण निर्गुण नव्हे प. २८०
अविनाशी, भूतें नाशवंत प. २८८
भावाचा भुकेला। न पाहे जाति-कुळा प. २९५
– ची करुणा अ. २६३,३१८ ते ३२०
– चा वियोग प. ४६
– चा धावा अ. २७६,, ४७
– चीं अनंत नामें प. १४९
– चें स्वरूप निश्चळ श्लो. ७३ ,, २८९
– चें स्वरूप सर्वी सर्व सर्वेश्वर अ. ३४७, ३४८, प. ४०६, ४०७,
– सीशरण जावें प. ३०५
– चा समारंभ अ. १९१
– सी मोतिची उपमा न साहे अ. २८४
– स प्रार्थना अ. २२८
देहबुद्धित्याग श्लो. ५, ४८, अ. ११, २५, ४०, १४०, ३२५, ३२६, ३७४, प. ४०५
देहभाव ठाणापति अ. २९६
देहभावाचा निरास प. ८९
देहसार्थक अ. २४४
देहातीत स्वहितसुख प. १५०, १८३,
देहाभिमान अ. २७०
देही असून विदेही श्लो. ३९
दैवी संपदा अ. २५७
द्वंद्व श्लो. १
द्वैत अद्वैत ,, ४, १३, अ. ३५०
द्वैतबुद्धि ,, ४८

ध

धर्मसंस्थापना श्लो. १
धर्मस्थापक अ. २४९
धातुवृक्षपाषाणपुजा श्लो. ७३
धीर धरूनि भजे जगदीश प.१८१
ध्यान जें जया तें त्यालागि होणें श्लो. ७४

न

नक्राचा धावा प. ५१
नरजन्म ( व्यर्थ ) श्लो. ८, १२ १५, ३०, ५०
जन्माचें सार्थक अ. ६५, प. ५७
जन्म उत्तम पावोन व्यर्थ घालविणें अ. २५६
नरदेह अशाश्वत, नश्वर श्लो. ८,

८०, अ. २२९, २८९, प. ३०, १५२, २९३
अशुद्ध विटाळाचा अ. २३०
पावन, अमोलिक, धन्य श्लो. १५, १७, ४१, ४४, ४७, ८७, अ. ११, ४०, २८५, प. १२१, १२२, १७२, ३६४
–देहाचें महत्व व सार्थक अ. ७४, ९५, १२५, १६७, २३३, २३७, २४३, प. २, ८०, ८१, ८४, ९४, ११६, १५०, २७५, ३४६, ३९७, ४१३
भक्तिवीण वायां गेलें अ. २७१, ३३०, प. ९३, १६४
–चें भूषण कोणतें ? अ. ३२८
–देहींच पंढरपुरयात्रा अ. ३३६
नरकाचें साधन अ. ३२५
–देहीं अभागी प्राणी कोण, तर भवरोगी प. २१५
–देह सार, विशेष ब्राह्मण । प. २६१, २७५
नरवेषें ईश्वर प. ३९१,
नरहरिस्मरण प. ३४१, ३४२
नर्कवास श्लो. ७, ११, ४४, अ. ४, ९, ३३, ४९, ५९, १६२, २५८, २९१, प. ३८५, ३८६
नामऋण ल. ५
नामधारक प. २५२, २६३
नाममहिमा प. ४८, ५०, ५१, २६३, ३४७ ( रामनाममाहात्म्य पहा)
नामसंकीर्तन ल. ४
नाम सार अ. ३, २८२, ३२४, प. ७४, १९६
नामस्मरण अ. २८८, ३४०, प. ३६, १४२, ३४२ ( रामनामस्मरण पहा )
–चें फल अ. १९७
नामाची विक्री अ. ६०
नारायणावांचून अन्य कांहीं नेणो अ. १५१
निंदक अ. ३५, ४९, ७२, १७५, २५८, प. ८३
निंदा श्लो. १, १०, १९, २७, अ. ३३, २८९, २९१, २९२
निरंजनस्थिति प. ५६
निरूपण श्लो. १
निर्विकल्पस्थिति अ. १८९
निशाचर धन्य प. ७
निश्चयाचा त्याग श्लो. ५३
निष्ठा ,, ७४
नेति ,, ३
नेमक बोलणें चालणें प. ३९१
नैराशता श्लो. २९

प

पढतमूर्ख अ. १६८
पतितजन प. ३८३, ३८५, ३८६
पंथ नीट धरावा प. ३९७
परमार्थवाट श्लो. ९०
परधन ,, ४०
परांगना, परजाया, ,, १, २७, ३२, ४०, ८४
पराद्वार अ. ८३, प. ६
परावाणी अ. ८३, १४७
पंचभूतें श्लो. १३, अ. २११, प. ३९९

वायुवर्णन अ. १२८
पंचीकरण अ. २१२ ते २१७
पंढरपुरयात्रा अ. ३३६
पंढरी व विठोबा अ. ३७७
–चे वैष्णव अ. ४८
पापी प्राणी प. २०५
पाषांडमत श्लो. १५, अ. ९
पांडुरंग अ. २८८
–धावा अ. १९६
पुरुषार्थ ( चाऱ्ही ) श्लो. ३२
पूर्वजांचा उद्धार ,, ७, ८६
प्रकृतिपुरुष अ. ३७१
प्रपंच ( संसार शब्द पहा )
प्रपंचाचीं सर्खी ( स्त्री, पुत्र, आप्त, सोयरीं ) अंतीं कामा न येती श्लो. ८, ११, १४, २०, ३४, ३८, ४०, ७४, ७९, अ. ५८ ८४, २०७, २४६, २४८, २७५, प. ३३, ३४, ८०, ८१, १२३, १६९, १७०, २१६, ३७४, ३७५, ४१३, हिं. प. ४२६
प्रवृत्ति निवृत्ति श्लो. ५
प्राकृतभाषा ,, ४०

**ब**

बाणेश्वर ,, १
बुऱ्हाणशाही ,, १
बोध ,, ३९, ४५, ४६, ८४ (ज्ञान शब्द पहा )
ब्रह्म
विमळ– श्लो. १३ अ. ६६
अनुर्वाच्य– ,, १६ अ. ११३, प. ४००
निर्गुण– श्लो. १७, ७३
सर्व– अ. ६६, ८७
– स्वरूप श्लो. १७, २०, ४०, ४५, ५०, अ. ५०, ६३, ६६, ६७, ८८, १६८ ते १७० १८०, २०८, २१०, २२४, प. १३९, १९६, २४२, २५८, ३०६, ३२७, ३२८, ३३०, ३३१
– ज्ञान अ. २८७, प. ३७३

**भ**

भक्त ( वेषधारी ) अ. १५४
भक्ति श्लो. ३९
–ज्ञान, कर्मयोग, वैराग्य आणि फलत्याग हीं एकावीण एक नाहीं प. ३७५
–वीण जिणें दैन्यवाणें प. १५२
–पेठें भरला हाट अ. ११, ६०, ७५
भजन श्लो. १, ५०, ६१
–सार अ. १६१
–नाचा विटाळ अ. १६७
–नेवीण ब्रह्मज्ञान अ. १७८
भरत–विलाप श्लो. ५६, ५७, ५८
भव
–रोग अ. २८२
–सागर श्लो. ४३
भाव
धरणें प. १५२
–तसा देव श्लो. ३७, अ. १७९, ३३३
भावार्थ ,, ८
भिक्षा
स्वधर्म अतितांचा अ. ३६०
भिक्षुकांचें भाग्य ,, ३६८
कामधेनु ,, ३६९, प. ३५१
भीमानदी अ. २८७

भूतदया अ. ८५

म

मत्सर अ. ७०
मद श्लो. २६, २७
मदांध ,, ७८
मन
अनावर, पापी प. २८४, २८५
उन्मन प. ७३
मनाची वृत्ति श्लो. २०, अ. ९१
मनास बोध श्लो. २, ६ ते २०, ८८, ८९, अ. ९६, प. २०७, २०९
मरणदुःख श्लो. २८
माझा मी एकला अ. ३२१,३२२
मातोश्रीला शिणवणें श्लो. ८३
मानस अस्थिर असणाराची स्थिति प. ४१२
माया श्लो. १३, २९, ५०
अविद्या अ. २४८
ग्राहिणरूप अ. २२५
निर्गुणें कैसी निर्मिली अ. ३७०
ब्रह्माकार कल्पूं नये अ. ६७, २५९, प. ३
–ब्रह्मविवरण प. १८०, ४०४
हे मांगीण अ. १०७
मिथ्या अ. ५०
साकार तेवढी– अ. ६६
–येचें स्वरूप अ. १०६, १६८, २०८, २०९, २१०
मारुती
–स्तवन श्लो. ५४, ५७, ५८, रामदासरूपानें अ. ४५, ल. ६
–स्तवराज श्लो. ९२
–सीतासंवाद श्लो. ६५, अशोकवनांतील प. १५६,३००
सीताशुद्धीस जाण्यास श्रीरामाची आज्ञा प. ३०७.
–ची आरती आ. १०,११
मीतूंपण श्लो. १२,१५,२४,४०, ७४,९१, अ. ६२, ९४,३३८, ३६३
मी माझा निरास अ. ५०,५८, १०८,२४७, ३४३. प. २, ३९८
मुक्तीच्या पायऱ्या अ. ६४
मूर्ख श्रोते काय ह्मणतात अ. १२६
मूर्खा कसा व्यर्थ चि नाडतोसी श्लो. ७९
मृत्युलोक अ. ४४
मृत्यापासून कोण राखील अ. २२७
मृत्या( मरणा )ऐसा वैरी अ. २३२
मृत्यु लागला पाठीसीं अ. २३६
मृत्यु ( कृतांत ) क्रूर प. ७५
मोह श्लो. ४३
मोक्षसाम्राज्य ,, ७०
मोक्षश्री अ. ३१५

य

यद्दृष्टं तन्नष्टं अ. १६९
यम यातना ४७( काळ शब्द पहा )
यवनांचें राज्य अ. २५४
येकंकार अ. ९, ३१३
येकांत श्लो. १०
भूगर्भशून्यवास व्यर्थ श्लो. ४९
सद्गुरूसीं–अ. २४७
येकादशी–व्रत अ. ९७,९८, १०० ते १०३
– माहात्म्य प. ७७

र

राम–उपासना श्लो. १०, ११, १३, १४, १८, २०, ४६, ५०,

६०, ७५, अ. ७८, ८०, १८६
राज्याभिषेकाच्या वेळचें रामरूपाचें वर्णन प. ९२
रामगुणवर्णन प.२८१
रामा विसरेल तो पापी घसरेल प. ३७६
अगणित पुण्य होय। तरी च लागे रामसोय। प. ३६१
रामाचें बाळपण प. १
तूं निष्काम, तुला नाम, रूप, कर्म आह्मीं लावलें ह्मणून आह्मी थोर अ. ८०
राघवाचे भेटीची इच्छा अ. ७९
रामउपासकीं नेमें मारुती सेवणें सदा। श्लो. ९२
खरी रामउपासना श्लो.६३
रामरूप श्लो. २४, २७,प. १०, १६७
रामरूपीं तन्मयता श्लो. २८, अ. १८३, १८४
राघवाची आवडी घे श्लो. १९
रामाचा धावा अ. ४२, ४४, ३१७, ३२३, ३६५ ते ३६७,प. ९९,१००, १०७, १९८, २७१
रामाचें चिंतन अ. २२१, २९५, प. १५४, ३३८
रामाचें ध्यान कर अ.२४६, प. १९१
राघवाचा छंद घे अ. १३६
रामाजवळ मागणें ल. २
रामाला शरण जा अ. २३६
राम-करुणा श्लो. २६, २९, ३१ ३२, ३३, ३५, ३६ ते ३८, ८३, अ. २०७, २५१, प. ६०, ६५, ९०, ९१, १०९, ११०, १११, १२४, १२५, १२८, १३४, १३७, १६५, १७४, २००, २१०, २१७, २३३, २३७, २३९, २७५, २९५, २९९, ३१८ ते ३२०
राघवा विनती तुह्माप्रति पावणें मज येकदा। श्लो. ६२
त्वरें पाव रे राघवा ये प्रवासीं। श्लो. ६६
प्रभू पावला वारिलें संकटासी। श्लो. ६६
रामा आह्मी पतित कां ? व तूं पावन कसा ? अ. ८०
रामवियोगाचें एक पळ हि साहवेना अ. ११६
संसृतिवनांतून सोडविण्याविषयीं रामास प्रार्थना प. २७६
रामा मी पतित तुज शरण आलों प. २९२
राम वनवासास जातांना कौसल्येनें भाकलेली रामाची करुणा प. १७५, २५१
जें येईल तुझ्या मना। तें करीं रघुनंदना। अ. ३४२
राममाहात्म्य श्लो. ८७,८८, अ.२९,१२९,१३८,२२०,२३४ प. १७१,१८८,२१८,३३७
रामनामेंविना मुक्ति नव्हे प. ५२
रामनाम सार तारक, पावन प. १३३,२६२, ३६८, ३८८
रामनाम सोपें, सुगम, फुकाचें प. २७२
रामनामस्मरण श्लो. ६ ते ९, १५,१६,३४,३८ ते ४४,४७,५०,

,७२,७९,८८,८५ ते ८७,अ.१४, ९३,१४७,१६५, १६६, १७३, १७४,१९३,१९४,१९८,२४४, २६६,२८५,३५१,३६१, प.४, १८,२३,२८, ३१, ३२, ५४, १३२,१४०,१४७,१५१,१५२, १६१,१६२,२१९,२२४,२२९, ३४८,३८१,४०९,हिं.प.४२१, ४२६,४२७

नामस्मरण करतां नामातीत होणें अ. ५

सर्वी सर्वभावीं व सर्वकाळीं राम चिंतावा। अ. ११२, प. ३६३

श्रीराम जयराम हा जप अ.१९२, प. २५५,३३२,३८०

रामनाम मंत्र दो अक्षरांचा अ. १९९, २१९

रामनामरत्न कंठीं बांधा अ. २४३

नामस्मरण कोणीं केलें अ. २६६

रामनामीं रत होणें अ. ३२७, प. २६६,२६७

रामनाम स्मरतां आळस नको प. ६८,१५०

रामनामीं नलगे कांहीं।प.८७,८८

निर्लज्य, निःशंक होऊन नाम घेणें प. १५०,१५५

स्मरा श्रीराम राम रे। श्लो. ४९

नामीं नाहीं लहान थोर प. १५५

रामनामस्मरणीं नको वेवधान। प. २०९, २४१

नाम अखंड घेणें। तरीच सार्थक जिणें। प. २५०

जप तप मुद्रा आसन नेम। दिनकर ल्याणे तिहारो नाम। हिं. प. ४२५

रामभजन श्लो. ३८, ५०, ७०, ८६, अ. ६१, ९५, १५०, २३९, २४२, ३०६, प. १४८, २०३, २०४, ३४३, ४१४, हिं. प. ४२०, ४२२, ४२४, ४३०, ४३७

रामभक्ति श्लो. ५०, उत्कट–प. ३१८

रामस्तवन श्लो. १, १५,१६, २६, ३०, ५५, ५७, ८९, अ. ६, ७३, ७७, ९५, २५३, ३४४, प. १४, १६, २०, २९, ४१, ४२, ५७, ६१, ६६, ७०,७६, १०२ ते १०४, ११७, ११८, १४६, १६३, १८२, १९१, १९२, २२३, २२७, २३२, ३०२, ३०३, ३१७, हिं. प. ४२८, ४३१, ४३२, ४३३, ल. १

राम दासासाठीं नाना रूपें धरी। प. २८२

राम दासाशीं अखंड सहवासी। अ. २६० प. ३३६

राघवाची लीळा अकळ सकळा। प. २६५

मानस रामीं रंगणें प. २६४,२८९

आपलें सर्वस्व रामार्पण करणें प. २६०, ३८८

रामाचा वियोग मज साहवेना। प. १२७, २१०

रामकीर्ति प. ८६

रामवनवास प. ७२, ३०८ ते ३१३, ३१५, ३१६

मी रामपिसा झालों अ. २७४
राम अंतर्बाह्य भरला आहे अ. २५९, ३७३, प. २३०
रामावांचून कोणी कामा न ये अ. ८४
निजपददानी येक आत्माराम अ. ७१, प. २०८
रामाऐसें दुजें कांहीं नाहीं। अ. ७१, ११६, ११७, ३६४, प. ३३, ३४
रामकृपा अ. ५९, प. १६९, २०१
रामाचा पार न कळे अ. ५७
रामावीण सर्व खटाटोप व्यर्थ। अ. ५५, २६७, २८२, प. ११५, १३८, १७०
रामावीण जन ते वोकासमान। अ. ५२, २७५, प. ११३
राघवाची कथा पतितपावन । अ. ४६
राम जवळ असल्यावर भीति नाहीं श्लो. ५३
रामाची प्राप्ति केव्हां होईल श्लो. ८१, ८२
रामाचा अवतार जगदोद्धारार्थ अ. ४७
पूर्वपुण्य होय। तरी लागे रामसोय। प. ३६४
राम माझें सर्वस्व अ. ७, २६४, प. ६९, १७८, २०२, २१२, ३४५
राम माझें कुळदैवत अ. २३१
राम सर्वांचें सेवन प. २३१
राम सर्वां ठायीं अ. ८, १६, १०४, १०५, प. १७६
राम जवळ असतां विषयांच्या भरानें समजत नाहीं अ. १११
राम दासांचा कैपक्षी अ. १३७, १३९, २२२, प. २८६
राम सकळ देवांचा कैवारी अ. १९५ प. २९०
राम इच्छेचा दातार प. २८७
राम दासांचें मंडण प. २९१
श्रीरामीं हेत गुंतला प. २९७
रामनामें निसंतान होतें, भीक लागे अ. ३११
वानरसेनेस निरोप देते वेळीं त्यांनीं केलेली प्रार्थना प. ९८
रामेवीण उदंड देव अ. १७६, १७७
रामाची क्षमा मागणें श्लो. २६
राम शुद्ध परब्रह्म अ. २००
राम त्रैलोक्याचा विश्राम अ. २४०
रामदास (समर्थ) श्लो. १, ६, १२, ७२, अ. ७०, १४३, १५०, २३१
समदास्य श्लो. ३८, ९२, प. १३७, २५०
समर्थांचा अनुग्रह श्लो. ४६
समर्थांची आज्ञा ,, ९२
रामाचे दास श्लो. ७५, अ. १९० १९१, २८०
कृपाळु मारुती आहे रामदासासि निश्चयें। श्लो. ९२
रामदासांचा संग अ. ६
रामदास दासांचा कैवारी अ. ४५
रामदास धन्य अ. ५२, ५६
रामासी भजतां रामदास होणें अ. ५६, ७६

रामींरामदासांची शागीर्दी दिनकरांनीं केली अ. ६०
रामींरामदासीं दिनकरा सहवास घडला अ. ६५
दिनकरा मुक्ति रामदासीं अ. ८१
रामदास रामीं पावले सद्बोध । तो चि पैं प्रसाद दिनकरा । अ. १२५
पुरा रामदासी अ. २००
आह्मी दास सज्जनाचे । सांप्रदायी रघुनाथाचे । अ. २४५
रामदास माझ्या सोयरे जीवाचे । अ. २८१
रामदासकृपा प.९
रामदासाचा दिनकर प. ६९
रामदास भाग्यें भेटले प. १०१
दिनकर रामदासीं ऐक्य प. ११५, ११६
रामदास कोण प. १७७
दिनकर रामदासांचे चरणीं प. २८१, ३५०
रामाची आरती आ. १२, १३

ल

लोकराहटी अ. ८६

व

वनश्री श्लो. ८१
वर्णाश्रमधर्मसंरक्षण श्लो. ३७, अ. १,९,८२,२४९,२५५,२५६
वाच्यांश व लक्ष्यांश श्लो. १२
वादविवाद श्लो. १५, अ. २८२, ३३४
वाऱ्याचें तुफान श्लो. २१
वासना श्लो. ५०, अ. २७०,२९०
विकल्प श्लो. ४८
विचार श्लो. ७,९,१२, अ. २९३, प. १३१,३३९,३४०
सार- श्लो.२४,४१,५०,प.१२३, ४०१
विमळ- श्लो. ५०
ब्रह्मीं मूळमाया कैसी झाली हें प्रत्ययेंसीं विचारणें अ. २१०, २११
तुझा तूंचि पाहें । अवघें कोणाचें हें आहे । अ. ३४३
अंतर शृंगारीं विचारें । देह शृंगारीं आचारें । अ. ३५३
देहेंद्रियादि कोणीं केले याचा विचार कर प. १४३
विचारावें इदमीथ्य प. २५९
मायाब्रह्माचा विचार विचारी जाणे प. ४०४
विटाळ प. २४६
विठ्ठल प. ४४, ४५
वित्पत्ती (व्युत्पत्ति) श्लो. १९,३८, ८६
विपरीत बोध श्लो. ९०
विरक्तानें कोठें व कसें रहावें श्लो. ८१
विवेक श्लो. ३९,४७,४८
वेदांतींचा- अ. ६६
-प्रळय अ. २२५
विवेकें वृत्ति योजितां साधक सिद्ध होये प. ६३
सर्व सोडूनियां येक । धरीं विवेक सम्यक । प. ३८७
विश्वाचें ऐक्य श्लो. ३९
विश्वास ,, ५०
विषय ,, १, १५, १९
विषयवीष ,, २७, ३८

रतिकांतविलास ,, ४१, ४४, ५०, ७९
विषयाची मळमळ ,, ८०, ८९
विषयांची भीक अ. ६९
विषयासक्ताचें ज्ञान अ. १५८
विषयांचा सोस अ. २००
विषयध्यास अ. २२७
विषयसेवन प. २४
विषयी जन ते दुर्जन प. ३४३
विषयांचें सुख मूर्ख मानी प. ३९०
विषयांचा आशापाश प. ३९८
विष्णु श्लो. २३
–ची आरती आ. १८
विज्ञानयुक्त संन्यास प. ३७१, ३७२
वीट
पांच गोष्टींचा मानूं नये प. ५३
वीतरागी श्लो. ३८
वृद्धावस्था श्लो. २०, ३४, अ. २००
वृद्धेश्वर श्लो. ७५, प. १५
–जवळची वनश्री ,, ७६
– ची आरती आ. १६
वेद–शास्त्रें–पुराणें ,, ३, ७, २९, अ. ३०, १२५, २३७,
आगमनिगमाचें सार श्लो. ८५
श्रुति ,, १७
न माने तरी शास्त्र शोधूनि पाहें ,, २५
व्यासकृत अष्टादश पुराणें अ. १४
वेदांचें महत्व अ. १८१
पुराणें गर्जती अ. २६३, २६४
वेद जगद्गुरु अ. ३०५
वेरूळचा महादेव प. ३१४
वेश्यादास अ. ८९, १६२, २५८
वैभव–संपत्ति–भाग्य वगैरे श्लो. ९, १९, २०, ३८, ७९
– जाईजणें, नश्वर श्लो. ८६, अ. १४०, २३६, प. ६७, ८०, ११३, ११४, १२२, ३८९
– चो फुंज श्लो. ८
वैराग्य श्लो. ६, १० ते १२, ३९, ७०
स्मशानवैराग्य आणि विवेकयुक्त वैराग्य अ. १८८
वैष्णव अ. ११, २५८
– चें कीर्तन अ. ९८ ते १०२
ऐसे वैष्णव उदार। देती सुखाचे उद्गार प. ३६२
वैष्णवांच्या पायाची जोड कशी होईल? अ. ११९
वैष्णवपदरजको महिमान। हिं. प. ४३६
वैष्णवसंग अ. ९९, प. ७८
वैष्णवांच्या संगें निरंतर सुख अ. २१
वैष्णवसंगसे बैकुंटबास हिं. प. ४३८

## श

शंकर (हर, शिव, पिनाकी, सदाशिव, महादेव) श्लो. १, ७
– स्तवन श्लो. ७४, ७५, प. २२५, २२८, ३२१, ३२६, ल. ७
शिव विष्णु अद्वैत प. १९
– चा पार्वतीस उपदेश अ. १९२
– ची आरती आ. १४ १५

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ३६५

शारदा(सरस्वति)स्तवन श्लो. १, ३, ४० प. ३५३
शास्त्रप्रतीति श्लो. ६८
शुक व कुंटिणी श्लो. ९
शुद्ध सद्वासना श्लो. १८
श्रवण-मनन-निदिध्यास प.२०६, २११, २१२
श्रीरंग अ. २८३
श्रीराम मंत्र
गुरुसंप्रदायेंवीण सर्वांना सुलभ असा कोणता मंत्र असेल तर तो ' श्रीराम ' हाच अ. १२९
श्रोत्यांस विनंती ल. ९

### ष

षड्रिपु प. १६६,२७१

### स

सज्जन ( संत शब्द पहा )
सती कोण प. ५९
सत्कीर्ति श्लो. २७
सत्ताधारी स्वहिताला अंतरतो अ. २३८
सत्य, असत्य अ. ३३५
सत्रावी कळा अ. १२७
सद्गुरु
भोंदू गुरूचीं लक्षणें श्लो. ६७,६८
– करणें श्लो. ७३
हीन गुरु श्लो. ९०
– च्या बोला विश्वासणें अ. ५
– स्मरण अ. ५३
गुरुराजें थोर नवल केलें अ. ६५
– चोज अ. १४६
– पाठीराखा करी अ. २२७
– चा अंकित प. २५
– वीण बडबड करूं नका प. ६२
– नें उत्तीर्ण कसें व्हावें प. २२२
– असेचें अनुसंधान ठेवा प. ३५७
सद्गुरुकृपा अ. [illegible], २९७ प. ७४, ८५
– कोणावर होते ३७, ३९, ६१
–झाल्यावर अ. १०, २७९, २९७
– चें फळ अनुर्वाच्य सुख अ. २२ प. २३४
गुरुदेवकृपेनें राम नाठवितां आठवे । अ. १०९
– नें आत्मज्ञान व आत्मज्ञानें मोक्ष अ. ११० प. २१२
सद्गुरुमाये कृपा करीं अ. २०१,प. २८३
– चा महिमा अनुर्वाच्य ,, २०५, ३७५
– नें राम चोजवला ,, २६९
– चें करणें ,, ३४७, ३६३
– चें अंजन लेणें ,, ३५६
– योगानें निरंजनीं मिळणें प. १४१
– विचारें सर्व कांहीं होतें ,, १४४
– चा वेध प. १४५
– नें आत्मस्वरूप पाहणें प. १९७
– प्रसाद जरी लाधे। तरीच असाध्य वस्तु साधे। प. २०६, ४०१
– दृष्टीं विटाळ निमाला प. २४६
– चें नवल प. २५६, ३५८
– नें देहभाव हारपला ,, २७४
– ची दया ,, ३३२
– वीण उपाय ते अपाय होती ,, ३६०
– होय जयासी। शरण जावें तयासी। ,, ३६७
– वीण नुसत्या शब्दज्ञानानें मोक्ष मिळणार नाहीं ,, ३९०

**सद्गुरुचरण**
सद्गुरुपाय धरीं अ. २४, प. २३८, २३९, ३७४, ३९५, ३९८
गुरुदेवापायीं सर्वस्व अर्पण अ. ११५
सद्गुरूचे पायीं मोक्षसुख अ. ३१४, प. ३५
सद्गुरुचरणीं लीन अ. ३६२
सद्गुरुचरणीं दृष्टि पडतां काय होतें प. १२०
– प्रतापें जन्ममृत्यु निवारण होतात प. १२४
– प्रसादें स्वरूपावबोध झाला प. १९५
– स्मरणें पावन होणें प. २४८, २५९
सद्गुरूचें पदरजविंदान प. ३५४, ४१०
– हें च आमचें सर्वस्व प. ४१९
**सद्गुरुदास्य** श्लो. २९, ४६, ४८
सद्गुरुसेवा अ. ५४
सद्गुरुचरणसेवा अ. २०३, २०४,
– सकळ साधनांचें फळ प. ३५५
– उदास होऊन कर। सुखी होसी प. ३८२
**सद्गुरुनमन**
अव्यक्त–श्लो. ४
व्यक्त– ,, ५
श्रीगुरुवंदन ,, ४०
सद्भावें नमन सद्गुरुचरणा अ. २४०
**सद्गुरुबोध** अ. १२०, १२२, १२४, १२७
– सूर्यप्रकाश श्लो. ९१
दिनेश जागृती आला। सद्गुरूनें प्रबोधिला। श्लो. ९१
– झाल्यावर अ. ६५, प. १०६
– घें अंतर शुद्ध कर। तें च सोंवळें। प. २४४
**सद्गुरुभजन** श्लो. ९०, अ. २३, प. ४११
आहे आहे सद्गुरुराया। प. ४९
– नें निजसुख बाणे प. ११९
**सद्गुरुमहिमा** प. ३५०
सद्गुरूचा प्रताप अ. १८७
**सद्गुरुसंग** अ. ३७६
सद्गुरूच्या संगें साध्य साधीं। प. ११४
सद्गुरुसंगें मृत्यु निवारीं। अ. २३२
**सद्गुरुस्तवन** श्लो. १
गुरुवीण ज्ञान नाहीं ,, १७
सद्गुरुवीण देव ठायीं पडेना। ,, ७४
सद्गुरु दयाळ कसा ,, ७७
जीवाच्या जीवना सद्गुरुनिधाना। अ. ४
अखंड सद्गुरूचें नाम। माझें विश्रांतीचें वर्म। अ. १२
सद्गुरु माझा बापमाये। अ. १३
सद्गुरु वर्णवेना अ. ६५
विषयभीक शमे ऐसें स्थळ त्रिभुवनीं गुरुवीण नाहीं अ. ६९
सकळ देवांचा देव गुरुदेव अ. ११८
सद्गुरुवियोग न साहे ,, १३०
गुरुवीण कांहीं न कळे ,, १४७
सद्गुरुवीण ज्ञान व्यर्थ ,, १५८
बहुतां जन्मांच्या शेवटीं। स्वामीचरणीं पडली मिठी। अ. २०२

•सद्गुरुभक्ति सार । सर्वांमध्यें थोर। अ. २०४
सद्गुरुवांचून कोण्ही कोण्हाचें नाहीं । ,, २४८
सद्गुरुसमर्था न ओळखतां हानी होते अ. ३००
माझें पूर्वपुण्य थोर । मज भेटला गुरुदातार । ,, ३७७
सद्गुरुराज सांभाळी दीनजनासी । प. ४०
चित्त रंगलें गुरुपायीं । प. ८२
गुरु सर्व सर्वांचा प. ९५
सद्गुरूनें काय केलें प. १२८, १३०, २६८
सद्गुरूस धन्यता ,, १४३
सद्गुरुराजें । ब्रह्मस्वरूपप्राप्ति दीजे। प. २३५
गुरूजीकी बात प्रचीतसे पाई । हिं. प. ४२३
सद्गुरुस्वरूप श्लो. १३, अ. ६५
सद्गुरूस शरण
रीघ शरण सद्गुरुपायीं । अ. २, ११३,१२३,१४०, प. ११, २१,२२,१३६,१६८,२३६
दिनकर सद्गुरुचरणीं । देहेंवीण लोटांगणीं । प. १८९
– जावें । स्वस्वरूप विवरावें । प. ४१५
सद्गुरूची आरती ल. ८
समाधान अ. २९३, २९४,२९६, ३०५
– परतें सुख नाहीं अ. १४९
सर्वब्रह्म श्लो. ६८
– चा उपदेश अ.२५४,प.३९२, ३९३
सर्वब्रह्म्या बैल अ. ३१३
सर्वं खल्विदं ब्रह्म अ. ९
सर्वांभूतीं भगवद्भाव अ. ३७२
संकल्प ( कल्पना ) अ. २७०
संचित-क्रियमाणाप्रमाणें फल-प्राप्ति प. ४१७
संत, साधु, सज्जन श्लो. १९, अ. २८२
संत कोण श्लो. ४८, ६०, ७१, अ. ५०, १४७
संतांपुढें ज्ञानजेवण मागणें अ. १७
यज्ञदानादिकांचें पुण्य साधुदर्शनांत अ. २०
संतकृपाप्रसाद अ. ४२, प. १२,. १०१, २५७, ३७९, हिं. प. ४३९, ल. ३
संतपदवंदन अ. ३७, ६९,१५५
सज्जनसेवा अ. ८५
साधूंचें दास्य अ.९६,१३१,१३२
संतचरणाचें महत्व अ. १३२, १३३, प. २२१
संतचरणीं ज्याचा भाव नाहीं अ. १३४, प. १८९
आत्मज्ञानी संत भाग्यें भेटती ,, १४१
संत काय करतात ,, १४८
संतनिंदक अ. १६२, १६३
सज्जनांचे गुणदोष पाहूं नये अ. २०६
ज्ञानी संतांनीं काय केलें पाहिजे,, २४९, २५०
संतभेटीकरितां आतुर ,, २७७
ज्ञानी संत धन्य प. १७, १२६, १७३, २४९

पडिपूंचें मरण संतांपासीं ,, १६६
तो चि संत । जो जीवशिवा करी येकांत । ,, १८०
संतांस शरण जा ,, २४३
साधुद्वेष श्लो. ८६
साधु अनंत वेषधारी प. ३६६
संत-संग श्लो. ११,१२,१९,२६, ५०,६९, अ.३८,३९,४०,५१, २२९,२३०,२७४,२८६,२९३, प. ३७५,४००
सात्विकांच्या संगें अहंभाव नुरे अ. १८
सिद्धाला देखील ब्रह्मस्वरूपाची प्राप्ति संतसंगानें च अ. ९०, १६९, २६५, प. २५८, ३२८
संतसंगें जीव पावे निजयोग अ. १०८,२२३
संतसंगें खूण बाणे अ. १६८
संतसंग घडे ते नरदेहा येऊन धन्य अ. २५०, प. १३५,४१९
संतसंग नाहीं तर स्वहित नाहीं अ. २७३
साधूंचे पायीं अविश्वास अ.२९१
सज्जनसंगतीं सुकृती सायास ,, २९६
संतसंगें जनीं वनीं मुक्त ,, ३०२
सत्संगावांचून देव चोजवेना ,, ३३२
संतसंग तारक ,, ३३३
संतसंगें सार्थक अ. ३४०
संतसंगें मायानिरास प. ३
मायाब्रह्माची समजूत संतसंगाशिवाय पटणार नाहीं प. १८०
सत्संगाधीण तीर्थादिक साधनें व्यर्थ प. १९०
सज्जनसंगाचें महत्व प. २११, ३५६,३५९
संतसंगाचे ठिकाणीं अनन्य ते धन्य प. २६९
संतसंग हें संसाराचें वर्म प. २७३
सर्व सोडूनियां मागें । हित करीं संतसंगें । प. ३९४
सदैव व सुकृती यांना च संतसमागम होऊन सार्थक घडतें प. ४१८
संतुष्टता श्लो. ३९
संदेह, निःसंदेह श्लो. ५०, अ. ३०१
संशय श्लो. ५०
संसार ( प्रपंच, भव ) श्लो. ८
भवभय श्लो. १५, प. ३३८, ३७९, भववेथा श्लो. २९, भव दारुण श्लो. ६१, ६८
संसारिक दुःख श्लो. १९,अ.८४
संसारभोग श्लो. ३८
प्रपंचविलास श्लो. ४४,४७
प्रपंच व ब्रह्म एक कसे श्लो. ५२
संसार असार श्लो. ८६
भवनदीचा प्रवाह श्लो. ९०
संसारस्वप्न ,, ९१
संसार पुरे अ. ४
संसार धरणें ,, ३७
संसाराचा थार ,, ३८
संसाराचा रुणी ,, ३९
संसार दुस्तर ,, ६१, प. २०३, २९३
संसाराची चिंता ,, १०६, २६१
प्रपंचघडामोड ,, २४३

संसार केवळ मृगजळ ,, २४८
प्रपंच चोरांचा थारा ,, २७५
संसार खोटा, सत्य मानिला ,, ३०७, प. २३८, २७३
प्रपंचवारुळीं संसार भुजंग ,, ३१७
प्रपंच सुखें करा, परी जगदीशासी विचारा प. ६७, २४०
संसारांत प्राणी धन्य कोणचा ,, १७२
भवभ्रम प. २१५, २१६
संसाररूप बंदिशाळेचें वर्णन ,, २७०
संसाररूपी निबिड अरण्य ,, २७६
संसारसिंधूनें थोर थोर राये बुडविले ,, २८३
ना प्रपंच ना भजन । दोहींकडे नागवण ,, ३७७
संसारांत वय वेंचलें ,, ३९४
संसार हा तुटका फुटका आहे ,, ४१६
साधक
साधकाचीं लक्षणें श्लो. ७०
साक्षात्कारें स्वसंवेद्य पद मिळविण्याकरितां साधकानें कोणता आचार पाळावा प. ४०३
साधु ( संत शब्द पहा )
सायुज्यता श्लो. ३९, ७१
साक्षात्कार कोणत्या उपायानें होतो तो क्रम अ. ९६
साक्षेप ( प्रयत्न ) श्लो. १ अ. १९१
सिद्धेश्वर श्लो. १,-वंदन श्लो. २५
सीता ( जानकी ) श्लो. २२
-स्वयंवर ,, ३२
-शोक ,, ३५, प. ५, २९८, ३०१
-मारुतीभेट प. १५६, ३००
मारुतीजवळ सीतेनें केलेलें त्रिजटावर्णन श्लो. ६५
सुविद्या श्लो. १५
सोंवळेंओंवळें भ्रमाच्या मुळें प. २४४
स्वधर्म श्लो. ७, ९, १०
स्वधर्मरक्षण अ. २५५, २५७
स्वधर्म गेला बारा वाटीं ,, २५६
स्वधर्मनिंदा ,, २७२
स्वधर्मांप्रमाणें चालून स्वकर्तव्यकर्म केलेंच पाहिजे; त्यावीण गति नाहीं प. ३३५
स्वरूपधारणा श्लो. ४८
स्वरूपसायुज्यता अ. ३५८
स्वसंवेद्य रूप ,, ६२
स्वहितमूळ कोणतें श्लो. ४९, अ. २१८
स्वस्वरूप पाहणें अ. ३४५
स्वात्मानुभव अ. ३३, ५८
स्वानुभवाचें लक्षण अ. ४१
स्वार्थ परमार्थ अ. २३७

ह

हरि
पतितपावन हरि भजा अ. २४१
हरिकीर्तन अ. ९७, ९८, १००
हरिकथानिरूपण अ. १०१
हरिजनांना योध्याची उपमा प. २७
हरिदासांचे दास अ. १८२
जेथें हरिभक्ति तो वंश धन्य प. ७७, २१६
हरीचें निर्गुण, अनुर्वाच्य स्व-

रूप श्लो. ५१
हिमाग्निधूम्रपान व्यर्थ श्लो. ४९
हीन आचारें मोक्ष नाहीं श्लो. ९०
हीन कामना श्लो. ८९
हीन प्राणी, जे वरपंग पाहणारे ते प. ३६५

क्ष

क्षुधा श्लो. २२

ज्ञ

ज्ञान
ज्ञानेंवीण मोक्ष नाहीं अ. १
स्वरूपज्ञान नाहीं त्याशी रौरव मिराशी अ. १९
अनुभवेंवीण शब्दज्ञान खोटें अ. ८७
ज्ञानारूढ होतां संसार नाशे, सहित कल्पना अ. १२५
सूर्याप्रमाणें ज्ञानी हा अवस्थात्रयीं जैसा तैसा अ. १२५
ज्ञानावांचून व्यर्थ अ. २३५
ब्रह्मज्ञानेंवीण उपदेश फोल अ. २९९
कोरडे ब्रह्मज्ञान्याची स्थिति अ. ३०३,३०४
ज्ञानी कसा ओळखावा अ.३०४, ३२८
विज्ञानाची व्याख्या श्लो. ९, अ. ३१
ज्ञानाचें विज्ञान होतां समाधान अ. ३३१
जड–चंचळ–निश्चळाचें ज्ञान ,, ३५८
सविचार ज्ञानी ,, ३७८
निरसूनि भवभ्रम । करीं ज्ञानाचा संभ्रम । प. ३८२


REFBK-0001456



॥ श्रीराम ॥

स्थापना ] **सत्कार्योत्तेजक सभा–धुळें** [ शके १८१५

हेतुः—

(१) श्रीरामदासी वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन करणें,
(२) इतर वाङ्मयाचें संशोधन व प्रकाशन करणें,
(३) वाङ्मयाचा अभ्यास करणें,
(४) मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन व प्रकाशन करणें,
(५) भारतवर्षाच्या इतिहासाच्या साधनांचें संशोधन व प्रकाशन करणें,
(६) इतिहास व इतिहासशास्त्र यांचा अभ्यास करणें,
(७) महाराष्ट्रधर्माचा विचार करणें,
(८) ऐतिहासिक स्थलांचा जीर्णोद्धार करणें,
(९) साधनसामुग्री सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणें,
(१०) वरील हेतूंना धरून जरूर ती योजना वेळोवेळीं करणें.

**सभासदः—**

(१) १००० किंवा जास्त रुपये एकदम किंवा दरसाल १०० देणारे संस्थेचे **आधारस्तंभ** सभासद होत.
(२) ५०० किंवा जास्त एकदम किंवा दरसाल ५० देणारे **आश्रयदाते** सभासद होत.
(३) २०० किंवा जास्त एकदम किंवा दरसाल १२ देणारे **सहानुभूतिक** सभासद होत.

**कार्यक्रमः—**

(१) श्रीरामदास आणि रामदासी **ग्रन्थमाला** चालविणें,
(२) श्री रामदास आणि रामदासी **मासिक** चालविणें,
(३) इतिहास आणि ऐतिहासिक **मासिक** चालविणें,
(४) महाराष्ट्रधर्म **ग्रन्थमाला** चालविणें,
(५) कवि आणि काव्य **मासिक** चालविणें,
(६) इतर **स्वतंत्र** ग्रन्थ लिहिणें व प्रकाशित करणें,

इत्यादि.

१४५८

श्रीराम

# श्रीरामदास आणि रामदासी ग्रन्थमाला

| भाग | | | किंमत |
|---|---|---|---|
| (१) श्रीमत् दासबोध प्रस्तावनेसह कापडी अगर सुटा | | | २–०–० |
| (२) श्रीसमर्थांचीं दोन जुनीं चरित्रें | | .... | १–०–० |
| (३) श्रीरामदासांची कविता | .... | .... | २–०–० |
| (४) श्रीरामीरामदासांची कविता | | .... | २–०–० |
| (५) श्री श्लोक मनाचे | .... | .... | ०–५–० |
| (६) श्रीस्वानुभवदिनकर | .... | .... | १-१२-० |
| (७) श्रीदासविश्रामधाम, ४ खंडांपैकीं खंड १।२।३ तयार | | | ६–०–० |
| (८) श्रीसमर्थप्रताप | .... | .... | ०-१२-० |
| (९) श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें | .... | .... | ३–०–० |
| (१०) श्रीकरुणाष्टकें व (११) श्रीसमर्थांचीं लघुकाव्यें हे दोन भाग क्रमानें लवकर च प्रसिद्ध होतील. | | | |
| (१२) श्रीसीतास्वयंवर | .... | .... | ०-१२-० |
| (१३) श्रीरामदासपंथक्रमसार | ... | .... | ०-५-० |
| (१४) श्रीनिवृत्तिराम | .... | .... | १-०-० |
| (१५) श्रीसांप्रदायिक विविध विषय प्रथम खंड | | .... | १-८-० |
| (१६) श्रीदिनकरांची स्फुट कविता | .... | .... | १-८-० |

वरील १० व ११ भागांखेरीज बाकींच्या १४ भागांची एकंदर किंमत रु. २३–१२ होते, परंतु तयार असलेले सर्व भाग घेऊन पुढील भाग घेण्याचें आश्वासन देणारांस मालेचे **कायम ग्राहक** समजून त्यांना वरील १४ भागांची किंमत फक्त रु. १९८३ पडेल. पाठविण्याचा खर्च वेगळा.

व्यापाऱ्यांस शेंकडा २० टक्के कमिशन.

**मुंबईतील एजन्टः**–परचुरे पुराणीक आणि मंडळी, बुकसेलर्स माधवबाग, मुंबई.

चिटणीस–सत्कार्योत्तेजक सभा–धुळें.

